## राष्ट्रसंताचा आर्त संदेश

आपल्या लोकांचे कर्तव्य आता हेच असू शकते की,
ह्या वाङ्मयाला करोडो मुखी व कानी जाऊ द्यावे,
हजारो भाविकांत ती भक्ति वाढवावी
आणि त्या वाङ्मयाची जी कीर्ती आहे,
ती स्वार्थपुर्तीसाठी न पसरविता
परोपकारः पुण्यात पापाय परमपीडनम्
ह्या प्रवृत्तीने समजून घेतली पाहीजे, वाढविली पाहिजे.

## ग्रामगीतेची फलश्रुती

ग्रामगीता नव्हे पारायणासी । वाचता वाट दावी जनांसि ।
समूळ बदलवी जीवनासी । मनी घेता अर्थ तिचा ॥
ही नव्हे फुले टाकण्यासाठी । ही ग्रामाची उद्धारदृष्टि ।
आजच्या युगाची संजीवनी बुटी । मानतो आम्ही ग्रामगीता ॥
याने संस्कार बनतील उत्तम । मनुष्य होईल चारित्र्यक्षम ।
सुख, शांति लाभेल करिता उद्यम । सांगितले जे या ग्रंथी ॥
ग्रामगीता वाचून करी चिंतन । त्यास होईल आत्मज्ञान ।
दिव्य दृष्टीची संत-खूण । कळे त्यासि आचरता ॥
ग्रामगीतेतील उद्योगचिंतन । जो कोणी करील मन लावून ।
त्याचे घरी धन, धान्य । भरपूर येईल समजावे ॥
स्त्रिया-मुले होतील आदर्शपूर्ण । हा ग्रंथ घरी होता पठन ।
ग्राम होईल वैकुंठभुवन । वाचता, वर्तता ग्रामगीता ॥
जे कोणी माझे स्नेही प्रेमळ । त्यांनी करावा ग्रंथाचा सुकाळ ।
घरोघरी चालवावा प्रचार निर्मळ । ग्रामगीता - वाचनाचा ॥
शोषण अथवा शासन । याचे गळोनि पडेल बंधन ।
नाही शत्रूंचे आक्रमण । स्वयंपूर्ण गाव होता ॥

सहयोग रू ५०/-
(फक्त साधकांसाठी)

ग्रा म गी ता

वंदनीय राष्ट्रसंत श्री तुकडोजी महाराज विरचित

# ॥ ग्रामगीता ॥

वंदनीय राष्ट्रसंत श्री तुकडोजी महाराज विरचित



# आत्मानुसंधान भु-वैंकुंठ अड्याल टेकडीची प्रकाशने

### ✡ मराठी साहित्य ✡

✡ ग्रामगीता ओवीबद्ध (मध्यम)
✡ ग्रामगीता ओवीबद्ध (मोठी १/८)
✡ ग्रामगीता सार
✡ गद्य ग्रामगीता
✡ सार्थ ग्रामगीता
✡ सार्थ आनंदामृत
✡ सार्थ आत्मप्रभाव
✡ कर्मयोगी (पु. तुकारामदादा चरित्र)
✡ कार्यश्रृंखला (परिचय पुस्तिका)
✡ विचारधारा भाग १ (तुकारामदादा भाषण)
✡ विचारधारा भाग २ (तुकारामदादा भाषण)
✡ विचारपुष्प (नारखेडे दादा साहित्य)
✡ आरोग्य संजीवनी
✡ ज्ञानदीप (संस्कार शिबीर मार्गदर्शिका)
✡ शिक्षण भाग १
✡ शिक्षण भाग २
✡ शिक्षण भाग ३
✡ गावातून विश्वाकडे
✡ राष्ट्रसतांचा विश्वव्यापी देव आणि सामुदायीक प्रार्थना (इंजि. भाऊ थुटे)
✡ तुकडोजींची ग्रामगीता आणि वास्तवाचा मार्ग
✡ पोहण्याची कला व व्यायामाचे प्रकार

**पॉकेट साईज पुस्तके**

✡ सक्रिय पाठ
✡ अंतरंग भजनावली (ध्यान प्रार्थना भजन)
✡ ग्रामजागृती भजनावली (युवा, ग्राम, राष्ट्र)
✡ सत्ता लोकांचे हातात व चरसंडासच का?
✡ शिक्षण
✡ सत्संग (पाक्षिक:मराठी, हिंदी, इंग्रजी) (वार्षिक १०० रू., आजीवन १५०० रू)
✡ ग्राम आरोग्य (मासिक: हिन्दी, इंग्रजी) (वार्षिक १५० रू., आजीवन २००० रू)
✡ व्हॉईस ऑफ संत तुकडोजी (त्रैमासिक : इंग्रजी) (वार्षिक १०० रू, आजीवन २००० रू)

---

### ✡ हिंदी साहित्य ✡

✡ ग्रामगीता गद्य
✡ ग्रामगीता सार
✡ ग्रामगीता पद्य
✡ राष्ट्रजागृती भजनावली

### ✡ इंग्रजी साहित्य ✡

✡ Gramgeeta
✡ The Essence of Gramgeeta
✡ The Letters of Tukadoji



# पुस्तक मिळण्याची ठिकाणे

✡ आत्मानुसंधान भु-वैकुंठ, अड्याल टेकडी, ब्रम्हपूरी (चन्द्रपूर) ७७७६९०१६९५, ९९२१५८९५१४, ९२८४४२४७८१
✡ अध्यात्म गुरुकुल, गुरुकुंज मोझरी (अमरावती) ९७६७०६६६२२
✡ ग्रामगीता तत्त्वज्ञान दर्शन मंदिर, पंढरपूर (सोलापूर) ९६३७६१९३६९
✡ पुज्य चैतन्य महाराज, कोंडदेव व जामदरी आश्रम, भोकर, नांदेड ९५४५८५३१८३
✡ श्री आर. जी. माचेवाड , समर्थ नगर (नांदेड) ९७६४९८६४९८
✡ श्री सत्यपाल महाराज , सप्तखंजेरी वादक, आकोट (अकोला) ९४२३१२८१४३
✡ श्री वा. ग. वैद्य गुरुजी (वरोरा, चन्द्रपूर) ९७६७५१६९४२
✡ श्री गुरुदेव सेवामंडळ, ऊर्जानगर, चंद्रपूर ९४२१७२४२७६, ८८०६०२५८३६
✡ श्री सुभाष टापरे , दूर्गापूर , चंद्रपूर ८९७५५५६०४८
✡ श्री विशाल वसंता नखाते, मोखारा, पवनी, भंडारा ८३०८७८१७३१, ७७२१८८१६८४
✡ डॉ. प्रमोद माळवे, भांडे प्लॉट, नागपूर ९०९६६०७०२७, ९९२१८२१०४४
✡ श्री तुषारभाऊ सुर्यवंशी, वृंदावन नगर (नागपूर) ९४२२१२७३८९
✡ श्री संदीप पाल महाराज, सप्तखंजेरी कीर्तनकार, तुरखेड,९८५०३०१३७२
✡ श्री बाळकृष्ण हांडे, विश्वव्यापी गुरुदेव सेवामंडळ , वर्धा,९४२००६५६९६
✡ श्री भाऊ थुटे , सप्तखंजेरी वादक, (वर्धा) ९४२२१४३९८२
✡ श्री प्रविणभाऊ देशमुख , सप्तखंजेरी कीर्तनकार, वर्धा, ९३७०५१६६५३
✡ श्री डॉ. एस. जी. नावाडे, पुणे/यवतमाळ - ९८२३२८५५९८, ९४०४३६३४९५
✡ श्री सुरेशभाऊ देसाई , पुणे ८३०८८०३३४१

# ग्रामगीता

## वंदनीय राष्ट्रसंत श्री तुकडोजी महाराज विरचित

विश्वं पुष्टं ग्रामे अस्मिन्ननातुरम् ।
गावागावातील ही सर्व जनता निरोगी, धष्टपुष्ट व सुखी असो !!
(ऋग्वेद, १-११४)

......................


*** संपादक**
सुदामजी सावकर
साहित्यरत्न (अमरावती)

*** प्रकाशक**
श्री गुरुदेव आत्मानुसंधान अड्याळ टेकडी
ता. ब्रम्हपुरी, जि. चंद्रपूर (महा)



* सर्व हक्क जनता जनार्दनाचे स्वाधीन



* आवृत्ती १ / एप्रिल २०२६

*** मुद्रक**
सौरभ प्रिंटींग प्रेस
नवी शुक्रवारी , महाल, नागपूर





## निर्देश

आषाढी शुद्ध एकादशी । बावीस जुलै त्रेपन्न वर्षी।
चंद्रभागेचिया कुशी । ध्यानावस्थित राष्ट्रसंत।।१।।
प्रचंड यात्रा भक्तमेळा । क्षणैक सारोनि वेगळा।
राष्ट्रसंत-हृदयी विठ्ठल सावळा । प्रगटोनि स्फुरवी ग्रामगीता।।२।।
सतरा ऑक्टोबर त्रेपन्नसाली । विजयादशमी पुण्यशाली।
अश्विन शुद्ध नवमीसि आली । बौद्धजयंतिसहित।।३।।
त्या समुहूर्ती सेवाश्रमी । गुरुकुंजी ध्यानयोगधामी।
ग्रामगीतेची प्रगटली उर्मी । लेखनारंभरूपाने।।४।।
भ्रमणशील राष्ट्रसंत । नाही क्षणाचीही उसंत।
त्यातचि वेळ साधुनि नित्य । लिहिती सत्य ग्रामगीता।।५।।
मोटारवाहनी अग्निरथी । जेथे जाती तेथेही लिहिती।
नित्य नवी उसळे स्फूर्ति । गुंफण विविध विषयांची।।६।।
शके उठराशे शाहत्तरी । चौपन्न साली शुक्रवारी।
अठ्ठावीस मे रोजी निर्धारी । वैशाख वद्य एकादशी।।७।।
नारदजयंतीचा सुयोग । तैसाचि अमृतसिद्धियोग।
परिपूर्ण केला ग्रामगीता-ओघ । प्रार्थनामंदिरी गुरुकुंजी।।८।।
तैशातचि मध्यंतरी । जाहली ग्रामगीतेची चोरी।
परंतु रोगे छळिलियावरि । तस्कर आणी अनुतापे।।९।।
लाभे डवरगावांतरी । डॉक्टर गुलाबरावाकरी।
देववाणी अमर खरी । लोक-जीवन-कल्याणी।।१०
त्या ग्रामगीतेचे संपादन । राष्ट्रसंतांची आज्ञा मानून।
केले गुरुकृपेने पूर्ण । झाला पावन सुदामा।।११
धन्य युगग्रंथ ग्रामगीता । राष्ट्र-जीवनाची संहिता।
प्रगट झाली विश्वहिता । नित्य निनादो घराघेरी।।१२


**-श्री सुदामजी सावरकर, संपादक**

# अर्पण – पत्रिका



सर्व ग्रामासि सुखी करावे । अन्न – वस्त्र – पात्रादि द्यावे ।
परि स्वतः दुःखचि भोगावे । भूषण तुझे ग्रामनाथा ! ।।
कष्ट करोनि महाल बांधसी । परि झोपडीहि नाही नेटकीशी ।
स्वातंत्र्याकरिता उडी घेशी । मजा भोगती इतरचि ।।
ऐशा भोळया शंकरासि । सौख्य लाभावे सर्व देशी ।
मानवाची पूर्णता तुजसी । प्राप्त व्हावी, मना वाटे ।।
म्हणोनी केली 'ग्रामगीता' । जागृत व्हाया ग्राम – देवता ।
संबंध यावा सागर – सरिता । ऐसा तुझा सर्वांशी ।।
तुझ्या श्रमास प्रतिष्ठा मिळो । सकळांचे लक्ष तुजकडे वळो ।
मानवतेचे तेज झळझळो । विश्वामाजी यायोगे ।।
म्हणोनि तुजसि करितो अर्पण । तू विश्वाचे अधिष्ठान ।
तुझेचि व्हावे आधी उत्थान । विश्वामाजी म्हणोनिया ।।
ऐसेचि होवो जनी, वनी । संतोष होईल माझिया मनी ।
मित्रत्व वाढो त्रैभुवनी । तुकडया म्हणे ध्येय हेचि ।।

नागपूर.
दि. २६/८/१९५५





## 'ही हृदसस्फूर्ति राष्ट्रसंतांची'

(चाल–व्हा पवित्र अपुल्या दही.....)

दुमदुमवा कानोकानी, ही ग्रामगीतेची वाणी।
सुजन हो!।।धृ.।।

उद्दिष्ट धर्मपंथांचे । मतितार्थ सर्व ग्रंथांचे । ग्रंथी या ।।
सृष्टि–दृष्टि भगवंताची, संकल्पपूर्ति संतांची । ग्रंथी या ।।
शास्त्र–गुरु–अनुभवदीप । गीतेचे सक्रियरूप । ग्रंथी या ।।
स्थल–काल–तारतम्यता, तर्क शुद्धता, समन्वय–खाणी ।
ही ग्रामगीतेची वाणी । सुजन हो ! ।।१।।

हे गाव घटक विश्वाचे । हे जनक नगर–तीर्थाचे । निश्चये ।।
ते पुरुष सुक्त वेदाचे । हे विश्वरूप गीतेचे । गावि या ।।
सर्वाभूति भगवद्भाव । ज्ञान–भक्ती–सार्थक व्हावं । या स्थळी।।
म्हणूनिया करा सत्क्रिया, दुख गावि या, न उरू द्या कोणी ।
ही ग्रामगीतेची वाणी । सुजन हो ! ।।२।।

हरी सर्वचि जीवन व्याधी । सर्वांगीण उन्नती साधी । ग्रंथा हा ।।
ती ब्रह्मलक्षणे सारी । प्रत्यक्ष आणी संसारी । ग्रंथ हा ।।
मानव्या मूर्ति आदर्श । समुदायवृत्ति–उत्कर्ष। घडवि हा ।।
पाखांड रुढ्यांचे बंड । करी शतखंड । चंड वाग्बाणी ।।
ही ग्रामगीतेची वाणी । सुजन हो ! ।।३।।

प्रभू विठ्ठलयातूनि वदला । ही समाज रचना बदला । सत्वरी ।।
वैकुंठी प्रेमानंद । कृतयुगीचा समातवाद । अनुभवा ।।
परमार्थरूप व्यवहारी । आनंद लहरि घरि–दारी । उसळावा ।।
प्व्हा राव–रंक सारिखे । कुणी न पारखे । धर्म–पंथांनी ।
ही ग्रामगीतेची वाणी । सुजन हो ! ।।४।।

सेवा हि क्रांतिमय येथे । नव विश्वचि उदया येते । यातूनी ।।
ईश्वरी राज्य न्यायाचे । शोषणादि विरहित साचे । गावि या ।।
प्रत्यक्ष फलश्रुति लाभे । वैकुंठ भूवरी शोभे । राष्ट्री या ।।
अवतार कार्य जीवनी । दैव जिंकुनि । करा सुखदानी ।।
ही ग्रामगीतेची वाणी । सुजन हो ! ।।५।।

दिव्य देह मुरलीमधुनी । स्फरली युग संजीवनी । प्रभू वरे ।।
ज्ञानेश मालिका फळली । ग्रामदेव पूजनी वळली । प्रभू वरे ।।
हे हृदय राष्ट्रसंतांचे । उजळील सद्गुरु वाचे । प्रभू वरे ।।
हे सुदाम हृदयस्फर्ति वाङ्मयी मूर्ति । प्रचारक जननी ।
ही ग्रामगीतेची वाणी । सुजन हो ! ।।६।।

–सुदामजी सावरकर(साहित्यरत्न)

## आर्त संदेश

''जे कोणी माझे स्नेही प्रेमळ ।
त्यांनी करावा ग्रंथाचा सुकाथ ।
घरोघरी चालवावा प्रचार निर्मळ ।
ग्रामगीता वाचनाचा ।।''

–राष्ट्रसंत तुकडोजी महाराज

''आपल्या लोकांचे कर्तव्य आता हेच असू शकते की,
ह्या वाङ्मयाला करोडो मुखी व कानी जाऊ द्यावे,
हजारो भाविकांत ती भक्ति वाढवावी
आणि त्या वाङ्मयाची जी कीर्ती आहे,
ती स्वार्थपूर्तीसाठी न पसरविता
'परोपकारः पुण्याय पापाय परपीडनम्'
ह्या प्रवृत्तीने समजून घेतली पाहिजे, वाढविली पाहिजे.''

–राष्ट्रसंत तुकडोजी महाराज



## राष्ट्रसंतांचे संक्षिप्त जीवन-दर्शन

अमरावती निकटची यावली ही वं. राष्ट्रसंतांची चिमुकली जन्मभूमी. श्री बंडोजी अर्थात नामदेव गणेशपंत इंगळे ठाकुर ब्रह्मभट्ट हे त्याचे तीर्थरूप. माता मंजुळादेवी ही वरखेडच्या तुकारामबुवा वानखेडेची कन्या. स्वाभिमानी पिता शिवणकाम करी नि भक्तिमती माता दळणकांडण करी. गुरूकृपेनं या अशिक्षित दांपत्याचे चंद्रमौळी झोपडीत वैशाख शुद्ध नवमी शुक्रवार, दि. ३०/४/१९०९ रोजी या एकुलत्या सुपुत्राचा जन्म प्रचंड वादळातच झाला. अकोटचे ब्रह्मनिष्ठ हरिबुवा नि माधानचे अलौकिक संतश्री गुलाबराव महाराज यांनी स्वतःनामकरणविधी संपन्न केला. 'माणिकदेव' या जन्मनावाऐवजी गुरुदत्त 'तुकड्या' हे नावच प्रचारात आलं. पूर्वज दत्तभक्त नि विठ्ठलभक्त, पण माता-पित्यांचे स्वभाव नावांप्रमाणे विषम नि गृहदशा अतीव खडतर. या वातावरणात अनेक कष्ट सोशित माणिकदेव चिंतनशील पण हूड बनला. शाळेत घातलं तरी 'शाळा कोण करी । जावे नदीचिया तीरी' असा प्रकार, पण परीक्षेत मात्र पास ! एकांती ध्यान नि लोकांती कविता-कीर्तन हा त्याचा बालछंद ! पोहणं, अश्वारोहण, कुस्त्या आदि नव्या कला निर्भयतेनं तो आत्मसात करी. चांदुरबाजारच्या विमलानंद भारतीकडून छंदगायन, यावलीच्या हनवती बुवाकडून खंजरी नि सातळीकोतळीकर महाराजांकडून योगासनं नि एकतारी आदि गोष्टी त्यानं सहज अवगत केल्या.

बालपणीच मातेबरोबर गृहत्याग करण्याची पाळी आली नि वरखेड क्षेत्री नाथपंथी विदेही संत श्री आडकोजी महाराजांच्या सहवासात त्याचं अंतरंग फुललं ! गुरु आज्ञेनं तो स्वकाव्य करून गाऊ लागला. १९२१ साली शतायुषी आडकोजी बाबा समाधिस्थ झाले, तेव्हा माणिकदेवाला विशेष प्रसाद लाभला. गुरुविरह असह्य होऊनही मातेला दिलेल्या वचनासाठी त्यानं प्राथमिक शिक्षण पूर्ण केलं नि मग व्याकुळमनानं विनातिकीट धक्के खात पंढरपूर गाठलं. तिथल्या पुंडलिकाच्या आदर्शानं त्याला मातृपितृसेवेचा पाठ दिला नि यावलीस येऊन शिवणकाम करीत त्यानं मातेचा सांभाळ केला. पण ईश्वरदर्शनोत्कंठा प्रबल होऊन १९२५ मध्ये त्यानं विरक्त वृत्तीनं शिवणयंत्र विकून दानधर्म केला नि रामटेकच्या अरण्याची वाट धरली! रामटेकच्या वनात ध्रुवाप्रमाणे तपस्या करतांना नारदाप्रमाणे एक अज्ञात महायोगी त्याला लाभले. त्यांनी स्वतच्या योगगुंफेत त्याला हठयोग शिकविला.

चिमूरभागातील श्रीमंत कृष्णराव भुते श्रद्धेनं या बालयोग्याला नेरीला घेऊन गेले. तिथल्या भूतेश्वर मंदिरात भोजपत्रावरील एक पुरातन अध्यात्मग्रंथ वाचून तपोभूमी गोंदूडा, महारण्य ताडोबा, रामदिघी आदि वनात अल्पावधीत प्रेमयोग-राजयोगादि साधनानुभव घेत 'है विश्वयोग इसका' या सुत्रानुसार ते खरे विश्वयोगी बनले ! आदिवासी समाजात 'देवबाबा' म्हणून त्यांनी कर्मज्योत पेटवली. नेरीच्या फकीरांना मंत्रतंत्रादि साधनाचा फोलपणा पटविला. भाबड्या लोकांनी त्यांना विष दिलं. पण त्यांनी मात्र जगाला 'आनंदामृत' दिलं ! याचवेळी चिमूरला 'माणिक प्रासादिक बालसमाज' जन्मास आला त्यानं १९२९ साली महाराजांची पहिली हिंदी भजनावली प्रसिद्ध केली !

काशी-प्रयाग-ओंकारेश्वर-हरिद्वार-पुष्करराज-पशुपतिनाथ (नेपाळ) आदि दूरस्थ नि अनेक निकटस्थ तीर्थक्षेत्रे पाहून तसंच लष्करीबाबा, वसिष्ठ महाराज, दादाजी धुनिवाले आदि अनेक संतांच्या भेटी घेऊन महाराजांनी प्रारंभीच समाज निरीक्षण केलं नि एक्के-सप्ताह-भजन-ज्ञानचर्चादि 'जुनीच साधनं' घेऊन त्यातून समन्वयक पण तारतम्य दृष्टीनं नवी मुरड समाजाला दिली. देवभक्त, सुशिक्षित-अशिक्षित, गृहस्थ-संन्यस्त, विभिन्न धर्मपंथीय आदिंना एकत्र गुंफण्यासाठी 'श्रीगुरुदेव' सर्वांपुढे ठेवला. अल्पवय नि साधा वेष पण प्रखर अध्यात्मतेज, बालकात खेळणं-पोहणं पण अलौकिक ऊर्ध्वदृष्टी, निरागस बालहास्य नि अद्‌भुत योगानुभव, घोडा-छकडा-सायकल-मोटर आदि चालविण्यातलं चापल्य नि ढोल-शंख-खंजरी-एकतारी आदि वाद्य वाजविण्यातील कौशल्य, पण त्याच बरोबर अप्रतिम प्रभावी भजन रचना नि दिग्गज पंडितांनाही थक्क करणारी ज्ञानचर्चा-अशा या सव्यसाची व्यक्तिमत्त्वामुळे विलक्षण आकर्षणानं, प्रचंड लोकसंग्रह घडून चैतन्याची अपूर्व लाट समाजात संचरली !

१९३० च्या वैदर्भीय गोंडवनातील सत्याग्रही शिबिरामध्ये 'झूठी गुलामशाही क्या डर बता रही है ?' अशी ओजस्वी राष्ट्रीय भजनं गाजविल्यामुळे तेव्हां महाराजांना पकडण्याचा असफल प्रयत्न झालेला होता. १९३३ चा चिमूरचा प्रथम चातुर्मास महाराजांचं असामान्य व्यवस्थापन कौशल्य नि क्रांतिप्रवण कार्य चुणूक दाखविणारा ठरला. १९३५ चा सालबर्डीचा महायज्ञ तर 'न भूतो न भविष्यति' असा झाला ! त्यानं महाराजांची महनीयता भारतापुढं आणली ! चहा-धुम्रपानाबरोबरच अनियमितपणाची आहुती देऊन खादीधारी महाराजांनी यावेळी



जणू कायाकल्प केला ! याचवर्षी जनसमूहाला नीट कार्यप्रवत्त करण्यासाठी त्यांनी गुरुकुंज-मोझरीत 'श्रीगुरुदेव आरती मंडळ' उभारून शिस्तबद्ध संघटना सुरु केली ! काही द्वेषभक्तांनी महाराजांविरुद्ध म. गांधीजीकडे कांगाळी केल्यामुळे १९३६ साली त्यांनी भेटीस बोलावलं नि महाराजांच्या व्यक्तिमत्वानं आकर्षित होऊन एक महिना सेवाग्रामला साग्रह ठेवून घेतलं.

गुरुकुंज नि नागठाणा-आश्रमात युवकांच्या प्रशिक्षणार्थ महाराजांनी चातुर्मास्य घेतले, रा. स्व. संघ, भारत सेवा दल, कुस्तीगिरांचे आखाडे आदि संस्थामध्ये जाऊन 'जाग उठो बालवीरो अब तुम्हारी बारी है', म्हणून ललकारी दिली ! १९४१ ला तर युवकांचा स्वतंत्र राष्ट्रधर्म शिक्षण वर्ग महाराजांनी घेतला. प्रतिदिवशी कित्येक हजार लोकांना आपल्या प्रभावी भजन भाषणातून राष्ट्रीयतेची दीक्षा देणाऱ्या महाराजांनी ४२ च्या स्वातंत्र्यसंग्रामात अपूर्व रंग भरला ! 'झाडझडूले शस्त्र बनेंगे, भक्त बनेगी सेना, पथ्थर सारे बाँम बनेंगे, नाव लगेगी किनारे' याच प्रात्याक्षिक चिमूर-आष्टीला तर कमालीचं दिसलं ! याच संदर्भात आंग्लसत्तेने महाराजांना नागपूर, रायपूर तुरुगांत चार महिने डांबल नि नंतर सुद्धा चंद्रपूर, वर्धा जिल्ह्यात प्रवेशबंदी केली ! याकाळी प्रत्येक तुरुंगातून महाराजांच्या अनुयायांच्या आरती-प्रार्थना निनादत होत्या.

जेलबाहेर येताच नेताविहीन भयत्रस्त जनतेत महाराजांनी भारतव्यापी 'विश्वशांती नामसप्ताह' गाजवून नवजीवन उत्पन्न केलं. सर्वांगीण मानवधर्माची शिकवण स्थायी करण्यासाठी याच १९४३ मध्ये 'श्रीगुरुदेव' मासिक सुरू केलं. अकोला-चातुर्मास्यात शेकडो 'प्रचारक' निर्माण केले नि आदेशाचा शंख फुंकून विस्कळित आरतीमंडळ शाखांचे 'श्रीगुरुदेव सेवामंडळ' नावानं उत्तम पुनरुज्जीवन केलं ! गावोगावी प्रचार प्रशिक्षणाबरोबर ग्रामीण उद्योगवर्ग, व्यायामवर्ग, आयुर्वेदवर्ग, महिलोन्नतिवर्ग, रामधून, सामु. प्रार्थना, पंचमहोत्सव, यात्राशुद्धी, बलिदानबंदी, व्यसननिर्मूलन, गोवंशरक्षण, विवाहसुधार, सहभोजन, कुस्तीस्पर्धा, भजनस्पर्धा आदि उपक्रमाची प्रभावी लाट निर्माण केली नि केंद्र-तालुका-जिल्हा-प्रांत कार्यालयं उघडून प्रचारकांची सक्षम साखळी गुंफली. १९४५ साली अखिल महाराष्ट्र शारीरिक शिक्षण परिषद गाजविली नि नागपूर आखाडा संघटनेचं दुष्कर कार्य केलं. १९४६ ला वरखेडच्या मंदिरापासून मंदिर प्रवेशाची लाट उठविली नि दुष्काळात जनतेत मानवता जागवीत इंग्रजांना इशारा दिला- 'चेत रहा है भारत

दुखसे, आग बुझानी मुश्किल है । उठा तिरंगा बढावे छाती, अब बहिलाना मुश्किल है ।।'

१९४७ ला लाभलेल्या स्वराज्याचं सुराज्यात रूपांतर करण्याच्या संदेशाबरोबरच तसे सर्वकष कार्यक्रम महाराजांनी प्रकर्षानं केले. सेवासप्ताह, स्वच्छतासप्ताह, स्वावलंबन सप्ताह, नवनिर्माणसप्ताह, राष्ट्रीय एकात्मता-सप्ताह, श्रमदानयज्ञ, जनजागृती समयदानयज्ञ, राष्ट्रधर्म जनजागृती, प्रचार-यात्रा, ग्रामनिर्माणपर्व आदि धार्मिक अवगुंठनातील ही नावेच त्यांची दिशा सुचवितात. म. गांधीच्या निर्वाणामुळे राष्ट्रनेत्यांच लक्ष महाराजांकडे विशेष वळलं. १९४८ च्या सेवाग्राममधील देशी-विदेशी शांतिदूतांच्या मेळाव्यात या 'राष्ट्रसंता' ला दिल्लीच्या नेत्यांनी पाचारण केलं नि त्यांचं कार्यक्षेत्र चौफेर विस्तारल. महाराष्ट्रीय व्यापारी संमेलन, अ. भा. राष्ट्रभाषा प्रचार संमेलन, समाजसेवी संमेलन, विदर्भ साहित्य संमेलन, अ. भा. नशाबंदी संमेलन, हरिजन संमेलन, भारत सेवक समाज संमेलन अशी शेकडो संमेलनं, महाराजांनी आपल्या प्रभावी मार्गदर्शनानं गाजवली. पंजाबातील वेदांत परिषद, नागपूरची महाराष्ट्र मुद्रण परिषद, अमरावतीची महागाई परिषद किंबहुना गोंदियाची तमाशा परिषद सुद्धा त्यांच्या व्यक्तिमत्वानं दिपून गेली ! आदिवासी युवक प्रशिक्षण, ग्रामसहायक प्रशिक्षण, कुष्ठरोग निवारण, दाईवर्ग, अ. भा. आयुर्वेद महासंमेलन आदि असंख्य योजनांना त्यांनी आश्रय दिला. शिख संमेलन, वीरशैव संमेलन, पारशांचा महोत्सव, राज्यपाल डॉ. चेरियन यांचा ख्रिस्ती उत्सव, भंडाऱ्याच्या अवलिया बाबांचा मुस्लिम उत्सव अशा सर्वातच ते समप्रेमानं संमिलित झाले. !

विभिन्न स्तरातील शेकडो सामाजिक, साहित्यिक, शैक्षणिक, धार्मिक आदि संमेलन त्यांना वैशिष्टपूर्ण मार्गदर्शनानं गाजविली, असंख्य योजनांना आश्रय दिला. गांधी स्मृतिदिनाचे प्रचंड विधायक महोत्सव, नाग-विदर्भ, गोंडवन नि मराठवाडा विभागात घेऊन महाराजांनी नवनिर्माणाची अपूर्व लाट उठविली. जी पाहून केंद्रीय मंत्रीही थक्क झाले ! इंदुर, कोल्हापूर, औंध, जत आदि संस्थानांमध्ये त्यांनी प्रजाहितैषी राष्ट्रीयतेला बळ दिलं ! निजाम स्टेटच्या सरहद्दीवर गावोगावी वर्ग घेऊन रझाकारांच्या प्रतिकारार्थ शक्तिसंवर्धन केलं ! अहेरी संस्थानातील आदिवासींना जवळ केलं. पंजाब नि यू.पी. ते म्हैसूर हा सर्व भूभाग महाराजांच्या खंजरीनं जागविला. गोमंतक नि नेपाळही मुग्ध केला !

पंढरपुरी 'संतसंमेलन' घडविण्याचं अवघड कार्य करणाऱ्या राष्ट्रसंतांनी



अखिल भारतीय स्तरावर सुद्धा 'भारत साधु समाज' निर्मिण्याचं दुष्करकार्य करून दाखविलं नि तीन वर्षेते सर्व महामंडलेश्वरांचे अध्यक्ष राहिले ! गुजरात नि मुंबईत 'सर्वधर्म परिषद' गाजविणाऱ्या महाराजांना विश्वधर्मपरिषदेसाठी ५२ सालीच अमेरिकेचं निमंत्रण आलं होत. १९५५ साली जपानचं निमंत्रण स्वीकारुन त्यांनी तेथील विश्वधर्म नि विश्वशांति परिषदांना स्तिमित केलं. ते अठरा देशांच्या समितीचे सल्लागारही नियुक्त झाले. व्हियतनाम आदि देशांची निमंत्रण त्यांना नंतरही येत राहिली.

पण महाराजांना भारतातच खचून कामं होती. १९४८ ला दिल्लीच्या निर्वासित शिबिराला त्यांनी दिलासा दिला. पुण्याचा जलप्रलय, विदर्भातील पूर-कहर, नागपूरचा हिंदू-मुस्लिम दंगा, कोयना-भूकंप अशा प्रत्येक संकटात ते धावून गेले. उत्तरी सीमेवरील १९६२ मध्ये चीनी आक्रमण हटविण्यासाठी संरक्षण निधीला नि सैनिकी शाळेला प्रोत्साहन नि सेवाग्रामच्या शांतिसभेला कलाटणी देऊन आसामात नि सर्वत्र वीरश्री संचार केला. १९६५ च्या पाकिस्तानी आक्रमणात लाहोर सीमा दौरा करून लष्कराला जोश दिला. 'उणे दिसे ते पूर्ण करी । जगाचा तोल बोधे सावरी' या सूत्रानुसार शासनाच्या समाज शिक्षण, परिवार नियोजन, नशाबंदी आदि योजनांमध्ये प्राण ओतला. साने गुरुजींचा मंदिर प्रवेश यत्न, विनोबाजींचा भूदानयज्ञ, ना. नंदाजींचा भारत सेवक समाज नि पं. जवाहरलालजींची राष्ट्रीय एकात्मता समिती' अशा सर्व उत्तम कार्याला महाराजांनी स्वसामर्थ्य दिलं. त्यांचा आवाकाही विलक्षण ! त्यामुळे ११ दिवसात ११ हजार एकर भूमी भूदानात मिळविली. एकेका दिवशी १०,१० गावीची मंदिरे हरिजनांना खुली केली. १०३ डिग्री ज्वरातही १,५०० मैलाचा भजनी दौरा केला. गांधी स्मृतिप्रित्यर्थ १०० गावं आदर्श केली नि समयदान यज्ञात हजार ग्रामीणांची कवायत घेऊन कोटी तासांची भेट भगवान बुद्धाला वाहिली. आपला जन्मदिन करू इच्छिणारांना 'ग्रामजयंती' साठी प्रवृत्त करून राष्ट्रपतीसमोर पाचशे चरख्यांचा सूत्रयज्ञ करून दाखविला ! सतत कार्यव्यस्त प्रवासातच सुमारे ५० हिंदी-मराठी गद्यपद्य ग्रंथ लिहून प्रसिद्ध केले नि केवढंतरी साहित्य अजून हा अप्रकाशित राहिलं.

भंगी कुटीपासून राष्ट्रपती भवनापर्यंत खंजरी घुमविणाऱ्या राष्ट्रसंतांनी 'बिगड गई शासन की रीति' असं राष्ट्रपुरुषांना समक्ष ठणकावलं ! विश्व हिंदु परिषदेच्या नाशिक नि प्रयागच्या अफाट संमेलनात सारे महामंडलेश्वर, शंकराचार्य नि महंत काबीज केले. म. गांधीजी, महामना मालवीय, लालबहादुर शास्त्री,

पं. नेहरु, राष्ट्रपति डॉ. राजेन्द्रप्रसाद, डॉ. सर राधाकृष्णन, डॉ. सी. डी. देशमुख, शिक्षण महर्षी डॉ. पंजाबराव देशमुख, डॉ. हेडगेवार, आचार्य कृपलानी, आचार्य डॉ. आर्यनायकम्, साथी जयप्रकाश नारायण, भाई डांगे, स्वातंत्र्यवीर सावरकर, सं. वा. किर्लोस्कर, पं. सातवळेकर, पद्मश्री खांडेकर, आचार्य अत्रे, शाहू मोडक, योगीराज सितारामदासजी, महामंडलेश्वर जयेंद्रपुरीजी अशा विभिन्न क्षेत्रातील हजारों दिग्गजांनी मुक्तकंठानं ज्यांचा गौरव गेला, अशा सहस्त्रपैलू व्यक्तिमत्त्वाच्या राष्ट्रसंतांनी मातीतून सेना निर्मून अल्पावधीत जे अमोल नि अमोघ कार्य सर्वांगीण दृष्टीनं उभं केलं त्याला तोड नाही ! १९६८ साली कमालीच्या वेदना चालू असताही महाराजांनी निरंतर 'राष्ट्रधर्म जनजागृति' दौरा केला. उज्जयिनीला कार्यकर्ता संमेलन नि गुरुकुंजात १६ राज्यांच्या प्रतिनिधींच शिबीर गाजवीत 'गांधी गीतांजली' पूर्ण केली ! आषाढीला पंढरीच्या देवदरबारी शेवटचं भजन करून केला. रुग्णशैयेवरूनच राष्ट्रासाठी व्यापक लेख लिहिला नि भक्तांसाठी आकाशवाणी वरून'आर्त संदेश' देऊन गुरूकुंज गाठलं! मुंबई नि गुरूकुंजात विविध क्षेत्रातील हजारो प्रकाशित व्यक्तिची नि लाखो दर्शनार्थी नरनारींची रीघ लागली ! कोटी कोटी कंठातून प्रार्थना निनादल्या. कॅन्सरच्या वेदना किती भयानक असतात म्हणून प्रतिपादन करून नागपूर सारख्या मध्यवर्ति ठिकाणी हॉस्पीटल निर्माण करण्यास कार्यकर्त्यांना प्रवृत्त केलं व अखेरची पत्रपरिषद नि सर्वधर्मीय प्रार्थना घेऊन महाराजांनी अश्विन वद्य पंचमी, शुक्रवार, दि. ११/१०/६८ रोजी दुपारी ४.५८ ला देह ठेविला ! मृत्युंजयाचं एक प्रचंड वादळी जीवन 'तुकड्या कहे आँधी लाऊँ । मैं भी मरकर जी जाऊँ' हा संकल्प घेऊन विराम पावताच असंख्य नेते, मंत्री, संस्था, वृत्तपत्र, महंत नि धर्मपंथ यांनी शोकविव्हल श्रद्धांजली वाहिली ! त्यावेळी –

**बांधल्या तळ्याचा फुटलासे पाट ! ओघ बारा वाटा मुरडताती ।।**
**हरिणीविण खोपी पडियेली ओस । दशदिशा पाडसे भ्रमताती ।।**

**– संत नामदेव**

अशी अनुयायांची अवस्था होणं स्वाभाविकच आहे ! परंत वं. राष्ट्रसंतांनी 'ग्रामगीता माझे हृदय । त्यात बसले सद्गुरुराय !!' ही जाणीव देणारा 'ग्रामगीते' चा अमर ठेवा सर्वांसाठी देऊन ठेवला आहे ! त्यांचं समग्र जीवनदर्शन 'जीवनयोगी राष्ट्रसंत' या ग्रंथात उपलब्ध आहे !.....

**– सुदाम सावरकर**



# ग्रामगीतेवर थोरांची पुष्पवृष्टी

**□ ''तुकडोजीबाबांची 'ग्रामगीता' ही आज गीता – ज्ञानेश्वरी प्रमाणं जनतेला खरं ज्ञान देऊन खेडयापाडयात – झोपडीझोपडीत सुख समाधान पैदा करील, असा भरवसा वाटतो. आज अशा ग्रंथाची गावोगावी गरज आहे. या ग्रंथापासून साध्याभोळया समाजाला ज्ञान मिळून , त्यांच्या हातूनच त्यांचं दुःख दैन्य दूर होण्याचं भाग्य त्यांना मिळू शकेल, इतकं याचं महत्त्व आहे. भगवंताच्या गीतेचं खरं मर्म – 'सर्व जीव देवासमान समजून सेवा करा' – हे या ग्रंथाच्या रुपात आज पाहिजे, तशातऱ्हेने प्रगट झालं आहे अन् यातूनच प्रपंच – परमार्थ साधला जाईल. तुकडोजीबाबांचा हा बहुमोल प्रसाद सर्वांना सुखशांती देवो हीच सदिच्छा !''**

**– वैराग्यमूर्ती श्रीसंत गाडगेबाबा**

**□ ''श्रीतुकडोजी महाराज आज कित्येक वर्षे अखंड जनसेवेत राबत आहेत. ग्रामीण जनतेची सेवा हा एकच ध्यास त्यांनी धरला आहे...... ग्रामरचनेच्या कोणत्याही अंगाकडे त्याचे सहसा दुर्लक्ष झालेले नाही..... त्यांच्या अंगातील तळमळ त्यांच्या एकेक उद्गारात आणि हालचालित दिसून पडल्याशिवाय राहत नाही. मला भू–दानाच्या चक्रव्युहात अडकलेला पाहून त्यांनी मदतीसाठी धाव घेतली.... त्यांचे ग्रामकार्य इतके स्वयंभू आहे की, त्याला अशा प्रस्तावनेची काही गरज नव्हती...... त्यांची ही 'ग्रामगीता' त्यांनीच म्हटल्याप्रमाणे 'स्वानुभव संमत' आहे. त्यामुळे आपोआपच ती शास्त्रसंमतही झाली आहे. त्यांच्या विवेचनात वाचकांना संकुचितपणा आढळणार नाही. भोळया कल्पनांना कोठेच वाव नाही. अगदी आधुनिक मन त्यात पाहावयास सापडते. बाळगोपाळांना यातून चांगली प्रेरणा मिळेल यात शंका नाही.!''**

**– आचार्य विनोबा भावे**

**□ ''शासनाच्या यंत्रणेद्वारे जे कार्य होऊ शकत नाही, त्याहून अधिक उत्तम कार्य संत तुकडोजी करीत आहेत. संत राष्ट्रकार्यही करू शकतात, या गोष्टीवर केवळ या उदाहरणामुळे मी विश्वास करू लागलो. देशोन्नतीच्या दृष्टीने त्यांनी फार मोठे कार्य केले आहे.... विकासयोजना सफल करण्याचे शिक्षण घेण्यासाठी कार्यकर्त्यांनी संत तुकडोजीच्या जवळ जायला हवे.!''**

**– पंडित जवाहरलाल नेहरु**

**□ ''ग्रामीण लोकजीवनाशी समरस होऊन अशिक्षित लोकांना वर उचलण्याचे यशस्वी प्रयत्न रात्रंदिवस करणारे संत तुकडोजी महाराज हे महान लोकशिक्षक आहेत. त्यांना वस्तुतः 'डॉक्टर ऑफ दि सोशल एज्युकेशन' या पदवीने विभूषित करायला हवे!''**

**– आचार्य आर्यनायकम्**

**※ अंतिम रुग्णशैयेवरील वं. राष्ट्रसंतांना आम्ही विचारले–'वर्तमान काळात आपला संदेश काय? या विज्ञानयुगात जगून जगविण्याचा उपाय कोणता?' राष्ट्रसंत म्हणाले,**

ग्रामगीतेतून मी हृद्‌गत विचार ठेऊन दिले आहेत. विश्वप्रेम हेच सर्व रोगाचे औषध! त्याचा आरंभ प्रत्येक गावापासून व्यक्तीपासून व्हावा. सामुदायिक प्रार्थना व 'ग्रामगीता' याचे दान राष्ट्रसंतानी सारी शक्ती खर्चून राष्ट्राला दिले आहे..... ग्रामगीतेसारखा ग्रंथ वाचण्याचा माझा अधिकार आहे.

### – आचार्य दादा धर्माधिकारी

□ ''भारतातील बहुसंख्य जनता खेडे गावात राहत आहे.... अज्ञान, दारिद्रय भोळ्या समजुती वगैरेंनी गावातील जनता ग्रासली गेली आहे. तिच्या जीवनातील हरएक बाबीविषयी योग्य विचार तिच्यापुढे मांडून 'उध्दरेदात्मनात्मानम्‌' या रीतीने तिला स्वत:चा उद्धार करण्यास प्रवृत्त करावे हा उद्देश महाराजांचा हा ग्रंथ लिहिण्यात आहे!.... 'आधी केले मग सांगितले' अशारीतीने या ग्रंथाची रचना झाली आहे. त्यामुळे त्यातील विचार 'गुरुशास्त्रस्वानुभवसंमत' आहेत. म्हणून या ग्रंथाची थोरवी अनन्य साधारण आहे... या ग्रंथात सर्वत्र विखुरलेले उदात्त विचार ग्रामिकाप्रमाणे नागरिकांनाही उद्‌बोधक व उपयुक्त होतील असे आहेत. ग्रंथाची भाषा प्रसादगुणयुक्त व ग्रामीण जनतेला समजेल अशीच आहे. ग्रंथात मधून मधून घातलेल्या भारतीय व अन्यदेशीय संतांच्या चित्रांच्या योगाने... सर्व धर्माच्या अनुयायांविषयी प्रेमभाव वृध्दींगत होईल यात संशय नाही.

### – महामहोपाध्याय वा. वि. मिराशी

□ हया ग्रंथात काय आहे? हा प्रश्न विचारण्याऐवजी मला वाटते, काय नाही? हा प्रश्न विचारावा. उत्तरात असे आढळेल की, या ग्रंथात सर्वच आहे. विशेषत: बहुजन समाजाच्या उत्कर्षाला ज्या ज्या गोष्टी हव्यात त्या विशिष्ट पद्धतीने फार खोल भावनांचे अधिष्ठान घेऊन प्रासादिक वाणीने 'ग्रामगीते'त सांगितल्या गेल्या आहेत.... वस्तुत: तीच वाङ्‌मयकृती आधुनिक काळात श्रेष्ठ की जे पूर्वी नव्हते ते प्रभावीपणे सांगू शकते, असंख्यावर प्रभाव पाडू शकते... हा ग्रंथ पूर्व परंपरेच्या चौकटीतला नाही.... ग्रामोद्धारांच्या सर्वांगीण योजनेचे प्रभावी दिग्दर्शन महाराजांनी यात केले, त्यात ग्रंथाचे प्रकाशन एक हजार ठिकाणी भारतात एकाच वेळी आज होत आहे, एवढी मोठी योजना हेच या ग्रंथाचे परंपरेची फळी फोडण्याचे उदाहरण आहे. केवळ रामदासांची परंपरा देऊन या ग्रंथाची समाधी कृपा करून बांधू नका... ज्याने आपल्या अध्यात्माची मजल विश्वापर्यंत मारली आहे. त्याच देशात समाजात अनंत दु:खे आहेत... ती समाजाला दिसतच नाहीत... या न दिसणाऱ्या दु:खांना वाचा फोडणे व तिही विशिष्ट पद्धतीने फोडणे यातच नाविण्य आहे, यातच क्रांतीची बीजे आहेत. 'ग्रामगीता' हा केवळ वंशपरंपरेचा ग्रंथ नाही, तो असा क्रांतिदर्शी आहे... आजचे अत्यंत दुर्लक्षित दु:खी जीवन म्हणजे ग्राम ! खेड्यातील शल्य काय आहे, याचा परिहार कसा होईल, ही आजची प्रधान समस्या आहे... या एका दुर्लक्षित दु:खक्रांत खेड्याकडे महाराजांनी लक्ष केंद्रित केले आणि त्यावर लिहिले आहे. महाराज योगी आहेत. नव्हे ते योग्यांच्याही पलीकडे गेलेले आहेत, महान आध्यात्मिक आहेत... आज अंतरीचा देव जागविण्याचे कार्य ग्रामाला धरून करावयाचे आहे. महाराजांनी ग्रामाला सजीव वस्तू कल्पून 'ग्रामगीता' लिहिली आहे. त्या सजीव कृशकाय ग्रामपुरुषांचे दु:ख महाराजांच्या हृदयाला भिडले. उफाळलेल्या भावना ग्रामगीतेत आविष्कृत झाल्या... दुर्लक्षित ग्रामजीवनात चैतन्य



ओतण्यासाठी लिहिलेली ही 'ग्रामगीता' केवळ जुन्याच्या तोडीची म्हणून मोलाची नव्हे. तर एका उपेक्षित दु:खाला वाचा फोडणारे तिच्यातील क्रांतिकारी नाविन्य हे महत्वाचे आहे.... ग्रामात नवचैतन्य यावे, या आंतरिक तळमळीने अतिशय प्रासादिक वाणीने महाराजांनी ही गीता विस्तारश: लिहिली आहे. ही वाचायला लागले की वाटू लागते, ग्राम चैतन्यमय झाले ! दुर्लक्षित अन्याय, दु:ख, शल्ये, यातना गावागावात भयानकता निर्माण करीत असतांना त्यांच्याकडे लक्ष वेधण्याचे काम शेकडो व्याख्याने करणार नाहीत, ते या एकटया ग्रंथाने केलेले आहे! नवकार्याला आधारभूत असा हा प्रमाणग्रंथ आहे, यात शंका नाही.

### – विख्यात साहित्यिक पु. ल. देशपांडे

□ ''संत तुकडोजी महाराज यांच्या 'ग्रामगीते' सारख्या सुलभ, सुबोध व सर्वस्पर्शी ग्रंथाला प्रस्तावनेची आवश्यकता नाही..... 'आपल्या देशातील झोपी गेलेली खेडी जागी व्हावीत, अज्ञान, लोकभ्रम आणि सामाजिक जडत्व यामुळे त्या खेड्यातल्या जीवनाला जी अवकळा आली आहे ती नाहीशी व्हावी,.... त्यांच्या मरगळलेल्या जीवनात चैतन्य निर्माण व्हावे,.... सांस्कृतिक वारसाच्या दृष्टीने भाग्यशाली असलेला हा देश शिक्षण, आरोग्य, धनधान्य इत्यादी बाबतीत तितकाच वैभवशाली व्हावा, म्हणून संत तुकडोजी महाराजांचे मन सदैव तळमळत आले आहे, शरीर वर्षानुवर्षे अष्टौप्रहर त्याकरिता झिजत आले आहे.... भारतातील बहुजन समाजाने आपले जीवन आता अंतर्बाह्य बदलले पाहिजे या एकाच विचाराने त्यांचे जीवनाचा अणू नि अणू व्यापून टाकला आहे. या उत्कट तळमळीतूनच ''ग्रामगीता'' हे महाराजांचे पुस्तक निर्माण झाले आहे.... अद्यापही लिहिणे–वाचणे येणारी माणसे फार थोडी... त्यांना पचेल अशा भाषेत आणि रुचेल अशारीतीने जे लिहिले जाते तेच काय ते त्यांच्यापर्यंत पोहचू शकते. 'ग्रामगीतेत' हा गुण फार मोठ्या प्रमाणात आहे.... काही ओव्या तर मंत्र्यांपासून महंतापर्यंत सर्वांनी सुवाच्य अक्षरात लिहवून समोर टांगून ठेवाव्यात, इतक्या अर्थपूर्ण आहेत.... असे खडे बोल या 'ग्रामगीते'त सर्वत्र विखुरलेले आहेत. तोच तिचा विशेष आहे. तुकडोजी महाराजांनी आपली खेडेगावे किती बारकाईने पाहिली आहेत, तिथल्या नव्या–जुन्या सामाजिक रोगांचे अवलोकन किती सुक्ष्मतेने केले आहे, त्या रोगांवर सौम्य, साधे पण प्रभावी उपचार किती सहानुभूतीने सुचविले आहेत आणि सुखी व सत्प्रवृत्त ग्रामजीवनाचे स्वप्न कसे कुशलतेने रेखाटले आहे, हे ही 'गीता' सहज चाळून पाहणाऱ्याच्या सुद्धा लक्षात येईल!''

### – ज्येष्ठ साहित्यिक वि. स. खांडेकर

□ ''राष्ट्रसंत श्री तुकडोजी महाराज यांच्या भजनात आणि त्यांच्या वक्तृत्वात जो विलक्षण प्रसाद आहे, तो त्यांच्या व्यक्तित्वातून आविर्भूत होऊन त्यांच्या वाणीत आणि वाङ्‌मयात उतरलेला आहे.

ही संपूर्ण गीता काळजीपूर्वक वाचल्याने मला असे वाटले की, तीत महाराजांच्या व्यासंगाचे आणि चिंतनाचे, अवलोकनाचे आणि अनुभूतीचे मोठे लोभस प्रतिबिंब पडलेले आहे. त्यांचे व्यक्तित्व, विचार आणि कार्यपद्धती यांचा साक्षात आदर्शच जणू त्यांनी या गीतेच्या रुपाने जनतेपुढे, ठेवलेला आहे. त्या दृष्टीने या ग्रामगीतेला

महाराजांचा जीवनग्रंथच म्हणणे खरोखरी योग्य होईल.... त्यांच्या व्यक्तित्वात, वाणीत आणि वाङ्मयात विलक्षण प्रसाद असण्याचा जो उल्लेख केला, तो किती यथार्थ आहे, याची कल्पना ही 'ग्रामगीता' वाचून उत्कृष्ट रीतीने येईल. 'प्रसाद' हा शब्द मी साहित्य आणि अध्यात्म या दोन्ही शास्त्रातील अर्थानी येथे योजिलेला आहे. त्यांच्या ओव्या या जितक्या सहज सुंदर आणि आबालसुबोध आहेत तितकाच त्यातील विचारांचा परिपाकही केव्हा रसाळ, केव्हा तिक्ष्ण तर केव्हा कटू वाटण्यासारखा असून सुध्दा, एकप्रकारची नितान्त सहृदयता आणि विशालता त्यात ओतप्रोत भरलेली आहे....

या ग्रामगीतेच्या ४१ अध्यायात एकंदर आठ पंचके असून, त्यात ग्रामजीवनाच्या पुनर्घटनेचा प्रपंच जसा सर्व तपशिलात शिरुन खोलवर केलेला आहे, तसाच हरएक बारीक सारीक बाबतीत सद्धा ध्येयवादाची दिशा धरून दूरवरही केलेला आहे.

खेडूताच्या रोजच्या आयुष्यक्रमातील एकही बाब महाराजांच्या बारीक नजरेतून सुटलेली नाही, व ती सुधारण्याचे उपाय सुचवितांना त्यांनी कोणत्याही प्रकारचा संकोच केलेला नाही त्यादृष्टीने ही 'ग्रामगीता' म्हणजे खेडुताच्या तात्त्विक जीवनापासून तो धार्मिक जीवनापर्यंत सर्वांगीण जीवनाच्या पुनर्घटनेचा एकापरीने सूत्रग्रंथच आहे, असे म्हटले तरी शोभेल. 'भूवैकुंठ' या ३९ व्या अध्यायात त्यांनी आदर्श खेड्याचे जे कल्पनाचित्र रेखाटलेले आहे, ते उदात्त असून, तशा प्रकारची खेडी जर या भारतात निर्माण झाली, तर त्याचे राष्ट्रीय पुनरुत्थान सहजगत्या घडून येईल. या 'ग्रामगीते' चा एक चमत्कृतिजनक विशेष मला फार जाणवला तो हा की, आपल्या लोकसमाजाची परंपरागत धर्मदृष्टी आणि आधुनिक लोकशाहीचे नवे तत्त्वज्ञान या दोहोंचा मेळ महाराजांनी त्यात मोठ्या कौशल्याने घातलेला आहे.... संतपुरुष हा त्या त्या युगाचा प्रसव व युगाचा प्रवर्तक असतो. आजचा काळ केवळ अध्यात्माचा प्रपंच मांडण्याचा नाही. या संक्रमणकाळी या महान तत्वज्ञ संताने समन्वयी व सर्वोदयात्मक धोरणाने मार्ग काढला आहे.... लोकशाहीतले रोजचे ग्रामीण जीवन कसे असावे, खेड्याच्या वाटयास आलेल्या सत्तांशाचा उपयोग कसा करावा, याचा सोपत्तिक व मूलगामी विचार या ग्रंथात केला आहे... शेकडो गीताभाष्ये आजवर झाली असली, तरी ग्रामगीतेचे लोकोत्तरत्व आगळे आहे ! या युगात समाजाला नवे वळण लावण्याचे कार्य हा ग्रंथ निश्चितच करील !''

**– श्री. ग. त्र्यं. माडखोलकर,** संपादक 'तरुण भारत'

☐ ''राष्ट्रसंतांनी खेडयातील जीवनाचा गाभाच आत्मसात केला आहे. महाराजांची वाणी जितकी वात्सल्यपूर्ण आहे तितकीच रोखठोक आहे. संघटनाचातुर्य महाराजांच्या लेखनात व जीवनात दरून पाहणाऱ्यालाही दिसून येते. त्यांच्या अंतःकरणाला व्यापून असणारी आकांक्षा ग्रंथपठनापूर्वीच्या प्रार्थनेतही स्पष्ट होते. ग्रामगीतेमध्ये व्यक्त झालेल्या विचारात व्यवस्थितपणा व सुसंगती आहे. आणि म्हणून त्यांची अभिव्यक्ती स्पष्ट व सरस आहे. कित्येक ओव्या सुभाषितासारख्या सहज स्मरणीय आहेत. मधून मधून व्यंजन, उपरोध, विनोद कथा यांचाही रंग ग्रामगीतेत भरला गेला आहे. 'महिलोन्नति' व 'वैवाहिक जीवन' यावरील अध्याय आश्चर्य वाटण्याइतके पुरोगामी



व प्रगतिक आहेत. वैवाहिक जीवनाविषयीचे विचारही असेच उच्च, प्रगत ध्येयाने उत्सफूर्स्त झालेले आहे. ग्रामगीतेची पारायणे व पठन केवळ खेडयातीलच नव्हे तर सर्व शहरवासी जनतेलाही सन्मार्गावर नेवो हीच प्रार्थना.

**– प्रा. कुसुमावतीबाई देशपांडे**

☐ ''आधुनिक काळामध्ये 'संत' या महान पदवीला पात्र असे थोर पुरुष केवळ महाराष्ट्रात अथवा भारतातच काय पण सबंध जगामध्ये एका हाताच्या बोटावर मोजण्या इतकेच असतील नसतील. तशा महान संतामध्येच तुकडोजी महाराजांची गणना केली पाहिजे. संत तुकडोजी महाराज म्हणजे चैतन्याचा मूर्तिमंत झरा, भक्तीचा साक्षात् महापूर आणि मानवतेचा प्रत्यक्ष अवतारच होते. अत्यंत ओजस्वी आणि संपूर्ण मानवतावाद विचारांचा राष्ट्रसंत हा एक प्रचंड स्थंडिलच होता. त्यांची ती उज्वल शिकवण भारतीयांच्या अंतःकरणावर शिलालेखा सारखी कोरलेली राहील !''

**– आचार्य अत्रे,** संपादक 'मराठा'

''राष्ट्रसंत श्री तुकडोजी महाराजांनी प्रत्येकाला कळेल अशा भाषेत सत्य, पावित्र्य, प्रामाणिकपणा व सेवा याचा संदेश घरोघरी पोहोचविला. उज्ज्वल भविष्य निर्माण करण्याचे कामी जनतेचे मनोबल वाढविण्यात त्यांचा मोठा हात आहे.

**– केंद्रीयमंत्री ना. यशवंतराव चव्हाण**

☐ भारताचे माजी अर्थमंत्री श्री. सी. डी. देशमुख यांनी लोकसभेत उद्घोषिले होते की, ''हल्ली ग्रामसुधारणाबाबत सरकार अधिकाअधिक लक्ष घालीत असून त्यासाठी बराच पैसा खर्च केला जात आहे, हेच कार्य बिनसरकारीरीत्या श्रीसंत तुकडोजी महाराजांनी मध्यप्रदेशात व हैद्राबाद राज्यात चालविले असून, त्यांचे गौरवार्ह आहेत. लोकांच्या हृदयात आत्मोद्धाराची प्रेरणा निर्माण करुन, संघटीतपणे त्यांना ग्रामसुधारणेच्या कामास लावणे हे कार्य खरोखरच राष्ट्रोन्नतीच्या दृष्टीने अत्यंत हिताचे व महत्वाचे आहे. त्यासाठी त्यांनी मराठी भाषेत 'ग्रामगीता' नावाचा ग्रंथ लिहिला असून तो प्रत्येक गावागावातून वाचला जाणे जरुरीचे आहे. त्याकरिता त्याची विविध प्रांतीय भाषांमधून भाषांतरे होऊन ती त्वरीत जनतेच्या हाती जायला हवी. कारण, विकासाची खरी प्रेरणा त्यातून जनतेला मिळू शकेल.''

**– भारताचे माजी अर्थमंत्री श्री. सि. डी. देशमुख**

'नागपूर विश्वविद्यालया'ने प्रस्तावात म्हटले की – ''राष्ट्रसंताची ग्रामगीता ही सर्वसाधारण जनतेची भगवद्‌गीता झाली आहे, महाराज प्राचीन संस्कृतीचे अभिमानी असूनहीत्यांचा दृष्टिकोण अद्ययावत् शास्त्रीय होता. त्यांच्या वाणीने केवळ विदर्भातच नव्हे तर भारतात सर्वदूर सामाजिक आणि राष्ट्रीय जागृतीचे प्रचंड कार्य घडवून आणले.'' अशा राष्ट्रसंताच्या 'ग्रामगीते' वे पाच अध्याय नागपूर विद्यापीठानेही एम्. ए. च्या अभ्यासक्रमात सामावून घेतले हे अभिनंदनीय आहे.

**– नागपूर विद्यापीठ**

# ब्र. कर्मयोगी संत श्री. तुकारामजीदादा गीताचार्यांचा संक्षिप्त जीवन कार्य परिचय

पुज्य श्री गीताचार्य तुकारामजीदादांचा जन्म कुऱ्हा (दे), चांदुर बाजार, अमरावती येथे गीताजयंती दि. ९ डिसेंबर १९१४ रोजी झाला. त्यांच्या आईचे नाव सौ. यमुनाबाई व वडिलांचे नाव गंगारामजी भुस्कडे असे होते. लहानपणापासून त्यांना संत साहित्य वाचनाची आवड होती. विद्यार्थी जीवनातच त्यांनी पायदळ चालण्याच्या शर्यतीत, लाठी-काठीला गद्‌गाफरी खेळात प्रथम क्रमांक प्राप्त केला. संस्कृत व इंग्रजी विषयात प्राविण्य प्राप्त करून हायर मॅट्रीकची परिक्षा पास केली. भगवद्‌गीतेचे अठराही अध्याय बिनचूक पाठ केल्याबद्दल दादांना सुवर्णपदक मिळालं! वयाच्या २१ वर्षीच सात वर्षपर्यंत घरच्या तळघरातच ध्यानयोगाचा अभ्यास केला.

१९३८ च्या चातुर्मासात महाराजांनी दादांना 'गीता मास्तर' म्हणून दादांची नेमणूक केली. दादांनी दलित, महारांच्या उद्धरासाठी व जातीभेद नष्ट करण्यासाठी अनेक कार्य केले. प्राणावर खेळून त्यांनी अनेक ठिकाणी बलिप्रथा बंदी केल्या. गावात गंगाराम महाराला झालेल्या मारहानीच्या अन्यायार्थ प्रतिकार केल्याबद्दल त्यांना अमरावती कारागृहात जेल झाली. तेथे चक्की पिसणे, तेलघाणी ओढणे, मस्तावलेल्या रेड्याला चारणे, बेड्या टाकून बगिच्यात कामं करणे, फाशी दिलेल्या प्रेताला खांद्यावर घेऊन दहनस्थानी घेऊन जाणे असे अनेक कामं दादांनी सहर्षाने केले. त्याच जेलमध्ये पुढे लोकसभाध्यक्ष श्री. एम्. भक्तवत्सलम् व माजी राष्ट्रपती श्री व्ही. व्ही. गिरी यांना पुज्य दादांनी प्राणायाम व गीतापाठ शिकविला.

गूळ-शेंगदाण्यावर रोज २८-३० कोस पायी चालून विविध शिबिरे, सम्मेलनं, सप्ताह, वर्ग घेऊन सेवामंडळाच्या ४० हजार शाखा दादांनी निर्माण केल्या. म्हणूनच महाराजांनी दादांना प्रचारमंत्री म्हणून नियुक्त केलं. १९५१ मध्ये गुरुकुंजाचे सर्वाधिकारी म्हणून दादांची निवड झाली. सेवामंडळाच्या प्रचारासाठी दादा वंदनीय महाराजांसोबत बिहार, गुजरात, भूदान-आंदोलनात तसेच डॉ. राजेंद्र प्रसाद यांचे म्हणण्यावर जपानमध्ये सिमिझ्यू येथे ५ व्या विश्वशांतिपरिषदेमध्ये सुद्धा महाराजांचे द्विभाषिक व कार्यवाहक म्हणून कार्यरत होते. म्हणूनच महाराजांनी राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय संपर्क अधिकारी म्हणून १९६० ते १९६५ पाच वर्षापर्यंत संपूर्ण भारतात गुरुदेव सेवामंडळ व दुसऱ्या स्वयंसेवी संस्थांशी संपर्क साधण्याचे काम दादांकडे दिले होते.



दादा जयप्रकाशजी नारायण यांच्या अवार्ड संस्थेचे एक्झीक्युटीव्ह मेंबर होते. गुलजारीलाल नंदा यांचेशी त्यांचे घनिष्ठ संबंध होते. दादांच्या गव्हर्मेंटची रेल्वेच्या फर्स्ट क्लासची पासमुळे सर्व प्रांतातील मुख्यमंत्र्यांशी भेटण्याचा प्रसंग दादांना आला.

पुज्य दादांनी सुविचार स्मरणी, गीताप्रसाद, युगप्रभात आदी वं. महाराजांच्या ग्रंथाचा इंग्रजीत अनुवाद करून छापला. आदर्श ग्राम निर्माण योजने अंतर्गत अनेक गावांना त्यांनी पंचायत राज, सहकारी सोसायट्या, पंचवार्षिक योजना, सेवामंडळाचे तत्त्वज्ञान, आदर्श ग्राम रचना, पंचायत राज, पंचवार्षिक योजना, सहकारिता, खादी ग्रामोद्योग, ग्रामआरोग्य, अध्यात्म आदी विषयांचे शिक्षण दिले. दादा मातीच्या भांड्यात जेवण करायचे व उकडलेली बिना तिखटमिठाची भाजी पोळी घ्यायचे.

१९६५ साली वं. महाराजांनी स्वतःसहीत व दादांनाही संस्थेच्या कार्यातून मुक्त केले. तेथे संचालक मंडळाची नियुक्ती केली. पुज्य दादांच्या ध्यानयोगासाठी वंदनीय महाराजांनी चंद्रपूर जिल्ह्यातील ब्रह्मपुरी तालुक्यातील अड्याळ टेकडीची निवड केली. १६.०२.१९६७ ला महाराजांनी ध्यानयोग मंदिराचे उद्‌घाटन केल्यानंतर त्या बांधकामाला पंचक्रोशीतील हजारो कार्यकर्त्यांचे श्रमदानात हात लागले. सिमेंट, लोखंड, रेती, बैलगाडी, गिट्टी, विटा, बांधकामात सहकार्य, गवंडी, मंदिराचा बांधकाम प्लॅन इत्यादी सर्व काम श्रमदानातून केले.

३० जुलै १९६७ गुरुपोर्णिमेला महाराजांनी सायंकाळी पुज्य दादांना ध्यानयोग मंदीरात बारा वर्षाच्या मौन साधनेकरीता बसविले. सोमवारी दादा ग्रामगीतेवरील सत्संग देत व चर्चा करून कामाची योजना समजावून सांगत. इकडे एका पत्रकावर, मी तुकारामदादांना स्वतंत्र काम दिल्यामुळे त्यांना निवडणूक मंडळातून मोकळे केले आहे, असे दिनांक ११.१०.१९६७ ला वंदनीय महाराजांनी आपल्या हस्ताक्षरात सहीनिशी लिहून दिले.

दादांनी स्वतःच्या हिस्स्याची शेतजमिन गुरुदेव सेवामंडळाच्या मध्यवर्ती कार्यालयात दान केली व घराच्या जागेचा हिस्सात गावात सामु. प्रार्थना मंदिर निर्माण झाले. श्री तुकारामदादांनी आपल्या नावावर काहीही इस्टेट ठेवली नाही. तन दिया, मन दिया और जो बच गया धन दिया....असे त्यांचे प्रत्यक्ष जीवन कार्य होते. सत्संग भवनाचे बांधकामासाठी हजारो लोकांनी श्रमदानातून विणामजुरी, विणापैशाने काम करून ८०द्ध६० फूटाचा स्लॅब अवघ्या चार तासात श्रमदानातून पूर्ण केला. अध्यक्ष, सेक्रेटरी, पावती बुक, वर्गणी, सरकारी अनुदान विणा केवळ सत्संगाच्या प्रेरणेतून लोक स्वेच्छेने गवंडी, सुतार, लोहार, दगड फोडणे इत्यादी काम करणारे कुंटुंब सांभाळून श्रम करीत होते.

अंतिम आजारात बॉम्बे हॉस्पीटलमध्ये ८ ऑगस्ट १९६८ ला रक्षाबंधन दिनी 'दादा ! तुम्ही सेवामंडळाचे तत्त्वज्ञान जोपासण्यास खर्ची पडले. याही पुढे सेवामंडळाचे तत्त्वज्ञान रक्षण करण्यासाठी ही राखी मी बांधत आहे.' असे म्हणून पुज्य दादांना सेवामंडळ तत्त्वज्ञानाच्या रक्षणाची राखी बांधली.

१९७३ ला वनमंत्री मधुकरराव चौधरी पुज्य दादांच्या भेटीकरीता आले, तेव्हा सर्वांच्या उदरनिर्वाहाची विचारपूस केली. येथील लोकं फलफूल व कंदमुळ्यांवर राहतात पाहून तुरंत ४० लोकांसाठी ४० एकर जमिन दिली. नंतर दादांनी क्रमाकमाने अड्याळ टेकडीवर ग्राम स्वावलंबनाच्या दृष्टीने गोरक्षण, अध्यात्म गुरुकुल, सुत कताई, कपडा विणाई, योग निसर्गोपचार केंद्र, हातकागद निर्मिती, अध्यात्म गुरुकुल, महिलाश्रम, पंच महोत्सव इत्यादी प्रयोग सुरू केले.

श्री लक्ष्मणदादा नारखेडे यांनी वयाच्या ५० वर्षानंतर सेवामंडळाच्या कार्यासाठी पु. दादांकडे आपले जीवन समर्पित केले. महाराजांच्या पुण्यतिथीला गुरुकुंजात आपले विचारकार्य स्वतंत्रपणे मांडायण्यासाठी १९७९ मध्ये तीन एकर शेती विकत घेऊन तेथे ग्रामीगीता विश्वविद्यापीठाची संकल्पना साकार केली. अड्याळ टेकडीप्रमाणेच सर्व काम लोकसहयासेग व श्रमदानातून पूण झाले. या विद्यापीठाचे उद्घाटन पु. दादांच्या उपस्थित सेवामंडळाच्या हजारो कार्यकर्त्यांसोबत त्यावेळचे मध्य प्रदेशचे मुख्यमंत्री ना. दिग्वीजयसिंग यांचे हस्ते झाले. यावेळी पद्मश्री अण्णा हजारे महाराष्ट्राचे मंत्री शिवाजीराव मोघे, अनील देशमुख हे सुद्धा उपस्थित होते.

पू. दादांनी अड्याळ टेकडीवरून सार्थ आनंदामृत, ग्रामगीता, सार्थ ग्रामगीता छापून त्यांचे इंग्लीश, उर्दू, संस्कृत, हिंदी भाषेत भाषांतरीत करून ना नफा ना तोटा तत्त्वावर प्रकाशित केल्या. ड्रगलेस ट्रिटमेंट हा निसर्गोपचार सिध्दांत दादांनी आपल्या अंगी उतरविला व देशी प्राकृतिक चिकित्सेचा प्रचार-प्रसार केला. अनेक शिबिरात, नॅशनल कॉन्फरन्समध्ये भाग घेतला. चरसंडास, लघवीघराचा भरपूर प्रचार केला.

पू. दादांनी त्यांच्या ७५ व्या वर्षी ९/१२/१९८९ ला अमृत महोत्सवात अध्यक्ष श्री मधुकरराव चौधरी यांच्या समक्ष त्यांची श्री गुरूदेव सेवामंडळाच्या तत्वज्ञानाची जबाबदारी त्यांचे पुढील कार्यवाहक श्री लक्ष्मणभाऊ नारखेडे यांचेकडे जाहीररीत्या सोपविली व भु-वैकुंठ अड्याळ टेकडी कार्याचे अध्यक्ष म्हणून डॉ. नवलाजी मुळे, यांना जाहिर केले.

पुज्य दादांनी १९९३ च्या ग्रामस्वराज्य प्रशिक्षण वर्गापासून भारतीय संविधानाच्या ४० व्या कलमानुसार गावागावात पंचायत, ग्रामसभा, दारूबंदी इ. प्रयोग सुरु केले.



कुऱ्हाडबंदी, चराईबंदी, नसबंदी, नशाबंदी, श्रमदान तसेच मृदसंधारण पाणलोट विकास कार्यक्रम अनेक गावांत राबविण्यात आले. महाराष्ट्र शासनाच्या आदर्शगांव संकल्प समिती मध्ये गीताचार्य तुकारामदादा प्रथम पासूनच सदस्य होते. मा. अण्णा हजारे मुबंईला उपोषणाला बसले असतांना लिंबुपाणी देऊन दादांनी अण्णांचे उपोषण सोडविले.

डॉ. बी. डी. शर्माजी, आयुक्त भारत सरकार यांच्याद्वारे अनेक गावांत गावगणराज्य शिलालेखाचे उद्घाटन केले. १९९१ ला चोरटी गावात ग्रामसभा घेऊन गावातील जल, जंगल, जमीन यांचेवर हक्क प्रस्थापित केल्यामुळे वनविभागामार्फत पोलीस कारवाही करण्यात आली. चराई बंदी, कुटुंबनियोजन, हातभट्यांवर बंदी, गावात रस्ते, पाझर तलाव, ग्रामसंरक्षण दल व न्यायमंडळ करण्याचे ठराव ग्रामसभेत पारीत करण्यात आले. त्यानंतर गावात ग्रामसभेमार्फत गुरुकुल, क्रीडा मंडळ, सांस्कृतिक मंडळ, गोवंश सुधार, धान्य कोष, ग्राम निधी असे अनेक प्रयोग स्थापन करण्यात आले. ग्रामविकास मंत्री मा. आर. आर. पाटील यांनी दादांपासून हे सर्व शिकूनच महाराष्ट्र राज्यात महात्मा गांधी तंटामुक्त समितीची स्थापना केली. शासकीय अधिकाऱ्यांनी ही ग्रामसभेची चळवळ दाबून टाकण्यासाठी ४१ लोकांना तुरूंगात टाकले. दादांच्या प्रयत्नाने सर्व ४१ लोकं बेगुनाह सिद्ध होवून त्यांची सुटका झाली. लाखापूर गावात ग्रामसभेच्या प्रकरणात अध्यक्ष व अकरा जणांवर गुन्हे दाखल झाले परंतु शेवटी गावकऱ्यांचा विजय होऊन अखेर सर्व लोक निर्दोष सुटले.

१९९८ ला डॉ. ब्रम्हदेव शर्माजींच्या सूचनेवरून मध्य प्रदेशचे मुख्यमंत्री श्री दिग्विजयसिंग स्वतः अड्याळ टेकडीचा प्रयोग पाहण्यासाठी प्रत्यक्ष हेलिकॅप्टरने आले. टेकडीच्या सर्व विभागाची, चोरटी, लाखापूरची पाहणी करून दादांशी चर्चा केली. परत गेल्यावर ५५ हजार हिन्दी ग्रामगीता छापून त्या मध्यप्रदेशातील ५५ हजार ग्रामपंचायतीला दिल्या. ग्रामसभेला पूर्ण अधिकार देण्याच्या दृष्टिने दादांच्या मार्गदर्शनात एक टास्क फोर्स समिती स्थापन केली. इकडे महाराष्ट्रात उपमुख्यमंत्री आर. आर. पाटलांनी सुद्धा या कार्यासाठी महाराष्ट्राची टास्क फोर्स कमेटी स्थापन करून त्यात पूज्य दादांना व डॉ. ब्रम्हदेव शर्मा यांना कमेटीवर घेतलं. महाराष्ट्रात सुध्दा ग्रामसभेला घटनेप्रमाणे सर्वोच्च अधिकार बहाल करण्यात आले.

श्री संत गजानन महाराज संस्थान, शेगांवचे अध्यक्ष भाऊसाहेब श्री शिवशंकरभाऊ पाटील व सोबत श्री रावसाहेब शिंदे (चेअरमन, रयत शिक्षण संस्था) यांनी चोरटी लाखापूर या दादांच्या प्रयोगाला गावांना भेट दिली. त्यांच्या आर्थिक सहयोगातून तसेच गावकऱ्यांच्या श्रमदानातून गावात भव्य सामुदायिक प्रार्थना मंदिर (ग्रामसभा भवन) निर्माण

झाले. २३ एप्रिल १९९९ साली मा. ब्रम्हदेव शर्मा व पु. दादांच्या उपस्थितीत गावगणराज्याची घोषणा करण्यात आली. मदनापूर, गोंदोडा, सोनेगांव, विहीरगांव, केसलाबोडी, दसोडा, म्हसली अशा अनेक विविध गावांत ग्रामसभा, ग्रामसंरक्षण दल स्थापन करून शिलालेख गाडून गावगणराज्याची स्थापना केली.

सन २००० मध्ये दोन एकर जागा पंढरपूरला घेऊन तेथे भव्य ग्रामगीता सक्रिय दर्शन मंदिराचे भव्य बांधकाम निर्माण केले. मध्यप्रदेशचे मुख्यमंत्री दिग्वीजयसिंग व महाराष्ट्राचे मुख्यमंत्री ना. विलासराव देशमुख यांच्या उपस्थितीत पुज्य दादांच्या मार्गदर्शनात त्यांचे हस्ते भूमिपुजनाचा कार्यक्रम संपन्न झाला.

भंडारामधील गवराळा गावाला २००१ मध्ये पु. तुकाराम दादांचे हस्ते गाव गणराज्य प्रकरणात काही प्रमुख कार्यकर्त्यांवर गुन्हे दाखल केले. तिनही कार्यकर्त्यांनी ३ दिवसाचे जेल भोगले. न्यायालयात अखेर विजय ग्रामसभेचा झाला. २००२ मध्ये मोझरीवरून १०-१२ कि. मी. अंतरावर केकतपूर गावाच्या हद्दीतील ९७ कोटी रूपयांचा बांधून झालेला दारूच्या कारखाना अनेक गावातील ग्रामसभा ठराव जमा करून कलेक्टरकडे अर्ज व चेतावनी देवून बंद केला.

२००४ मध्ये लोणारा (वर्धा) गावातील ग्रामसभेची परवानगी न घेता वन विभागाने सागवानी लाकूड तोडले म्हणून महिला पुरुषांनी ग्रामसभेतून अडथळा केला व सर्व लाकडांचा डेपो गावाबाहेर तयार केला. शेवटी शासनाला ते लाकूड भेटलेच नाही. २००५ ला बेल्लरपार गावाला वनविभागाने तोडलेले वृक्ष ग्रामसभेने जप्त करून गावात डेपो तयारे केले असता दहा लोकांना नागपूर येथे सेंट्रल जेलमध्ये कारावास झाला. पाच वर्षानंतर शेवटी बेल्लरपार ग्रामसभेचा विजय झाला. २००५ पू. दादांच्या भरीव प्रयत्नानेच आंदोलन यशस्वी होऊन नागपूर विद्यापीठाला राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ नाव प्राप्त झाले. नक्षलवादी हिंसाचारामुळे निरपराध आदिवासींना विश्वास देण्यासाठी प्रा. सुरेश द्वादशीवारांच्या २००६ च्या लोकयात्रेचे प्रमुख मार्गदर्शक पू. गीताचार्य श्री तुकारामजीदादा होते.

२७ मे ला अड्याळ टेकडीवर उन्हाळी व्यायाम व संस्कार शिबीर सुरू असतांनाच पुज्य दादांना विश्रामासाठी पुणेला (सासवड) नेण्यात आले. नंतर त्यांच्या त्यावेळच्या ड्रायव्हरच्या सांगण्यानुसार ८ जून २००६ ला रात्री ९.०० च्या दरम्यान पुज्य दादा अनंतात विलीन ब्रम्हलीन झाले. दिनांक १० जून २००६ शनिवार रोज दुपारी ४.५० वा कर्मश्री श्री शिवशंकरभाऊ पाटील यांच्या हस्ते त्यांचा समाधीसोहळा भु-वैकुंठ अड्याळ टेकडी येथे लाखों गुरुदेवभक्तांच्या उपस्थितीत पार पडला.



# विषयानुक्रम


| अध्याय | | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| **सद्धर्म मंथन पंचक** | | |
| १. | देवदर्शन | १ |
| २. | धर्माध्ययन | ११ |
| ३. | आश्रमधर्म | २० |
| ४. | संसार–परमार्थ | २९ |
| ५. | वर्ण–व्यवस्था | ३९ |
| **लोकवशीकरण पंचक** | | |
| ६. | संसर्ग–प्रभाव | ५० |
| ७. | आचार–प्राबल्य | ५९ |
| ८. | प्रचार–महिमा | ६८ |
| ९. | सेवासामर्थ्य | ७८ |
| १०. | संघटन–शक्ती | ८८ |
| **ग्रामनिर्माण पंचक** | | |
| ११. | ग्रामरक्षण | ९७ |
| १२. | ग्रामशुध्दी | १०६ |
| १३. | ग्रामनिर्माण कला | ११५ |
| १४. | ग्राम–आरोग्य | १२५ |
| १५. | गोवंश–सुधार | १३५ |
| **दृष्टिपरिवर्तन पंचक** | | |
| १६. | वेष–वैभव | १४३ |
| १७. | गरीबी – श्रीमंती | १५३ |
| १८. | श्रम – सपंत्ती | १६२ |
| १९. | जीवनशिक्षण | १७१ |
| २०. | महिलोन्नती | १८० |

| अध्याय | | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| **संस्कारशोधन पंचक** | | |
| २१. | वैवाहिक जीवन | १८९ |
| २२. | अंत्यसंस्कार | १९८ |
| २३. | सणोत्सव | २०८ |
| २४. | यात्रा–मेळे | २१७ |
| २५. | देव–देवळे | २२५ |
| **प्रेमधर्मस्थापन पंचक** | | |
| २६. | मूर्ति–उपासना | २३४ |
| २७. | सामुदायिक प्रार्थना | २४३ |
| २८. | प्रार्थना व विश्वधर्म | २५१ |
| २९. | दलित–सेवा | २६० |
| ३०. | भजन–प्रभाव | २६९ |
| **देवत्वसाधन पंचक** | | |
| ३१. | संतचमत्कार | २७७ |
| ३२. | संतस्वरुप | २८६ |
| ३३. | अवतारकार्य | २९५ |
| ३४. | प्रारब्धवाद | ३०३ |
| ३५. | प्रयत्नप्रभाव | ३११ |
| **आदर्श जीवन पंचक** | | |
| ३६. | जीवन–कला | ३२० |
| ३७. | आत्मानुभव | ३२९ |
| ३८. | ग्राम–कुटूंब | ३३७ |
| ३९. | भू–वैकुंठ | ३४६ |
| ४०. | ग्रंथाध्ययन | ३५६ |
| ४१. | ग्रंथ–महिमा | ३६६ |

# प्रार्थना

(ग्रंथ पठनास आरंभ करण्यापूर्वीचे स्तवन)

(भुजंग–प्रयात)


नमो सद्गुरु । ज्ञानदीप – प्रकाशा ।
नमो आद्यरुपा ! अनंता परेशा ।
नमो मंगलामंगल । द्वैत हारी ।
नमो त्वत्कृपा पूर्ण दोषा निवारी ।।

तुझे रुप ते पाहू दे विश्वव्यापी ।
तुझी पाऊले सेवु दे ग्रामरुपी ।
तुझे ज्ञान सर्वांतरी संचरु दे ।
तुझा सत्य–आनंद लोकी भरु दे ।।

खरे नाम निष्काम ही ग्रामसेवा ।
झटू सर्वभावे, करु स्वर्ग गावा ।।
कळो हे वळो, देह कार्यी पडू दे ।
घडू दे प्रभो ! एवढे हे घडू दे ।।


□ □ □





वं. राष्ट्रसंत श्री तुकडोजी महाराज

## ।। चित्र परिचय ।।



### अ. १ – वं. राष्ट्रसंत श्री तुकडोजी महाराज

राष्ट्रसंत श्री तुकडोजी महाराज हे पंढरपूर क्षेत्री आषाढी एकादशीस चिंता जगाची करीत चंद्रभागे तटाकी बसले असता, याच अध्यायातील ओवी ४३ व ४४ मध्ये वर्णन केल्याप्रमाणे, विश्वाचा विचार करण्या ऐवजी खेडयांची उन्नती करण्यासाठी 'ग्रामगीता' लिहण्याची प्रेरणा ईश्वराने त्यांना दिली. 'देव भक्तासवे जातो. ध्यानरुपे' ही समर्थ उक्ती व कर्तृत्वाभिमान न घेण्याची भक्त–मनोवृत्ती लक्षात घेता यात चमत्कारिक वाटण्याचे कारण नाही.





• अध्याय पहिला •

# देवदर्शन

।। श्रीगुरुदेवाय नमः ।।

ॐ नमोजी विश्वचालका । जगद्वंद्या ब्रम्हांडनायका ।
एकचि असोनि अनेका । भासशी विश्वरूपी ।।१।।
आपणचि झाला धराधर । उरला भरोनि महीवर ।
अणुरेणूंतूनि करिशी संचार । विश्वनाटक नटावया ।।२।।
आपणचि मंदिर, मूर्ति, पुजारी । आपणचि पुष्पे होऊनि पूजा करी ।
आपणचि देवरुपे अंतरी । पावे भक्तां ।।३।।
गणेश, शारदा आणि सद्गुरु । आपणचि भक्त–कामकल्पतरू ।
देवदेवता, नारद, तुंबरू । आपणचि जाहला ।।४।।
नाना चातुर्यकला–व्यापे । आपणचि गाये, नाचे, आलापे ।
प्रसन्न होऊनि आपणचि सोपे । भक्तिफळ दावी ।।५।।
गुरू–शिष्य एकाच स्थळीचे । भिन्न नाहीत पाहता मुळीचे ।
सुखसंवाद चालती भिन्नत्वाचे । रंग रंगणी आणावया ।।६।।
हे जयाचिया अनुभवा आले । त्याचे जन्ममरणदुःख संपले ।
आत्मस्वरूप मूळचे भले । ओळखले म्हणोनिया ।।७।।
त्यासि नाही उरला भ्रम । विश्व आपणासह झाले ब्रह्म ।
तो जे जे करील ते ते कर्म । पूजाच तुझी ईश्वरा ! ।।८।।
तुझ्या शक्तीची ही पूर्णावली । अजूनि नाही जीवभावात शिरली ।
म्हणोनीच अज्ञानदशा उरली । आम्हांपाशी ।।९।।
जेव्हा तुझे दर्शन घडे । उघडती विशाल ज्ञानाची कवाडे ।
मग मी – तू – पणाचे पोवाडे । कोठचे तेथे ? ।।१०।।
ज्यासि तुझे दर्शन घडले । त्यास कैचे परके राहिले ? ।
सर्व विश्वचि झाले आपुले । दिव्यपणी ।।११।।
परि आम्ही वंचित दर्शनासि । परसुखे आनंद कुठला आम्हासि ? ।
आपुल्या स्वार्थे अल्पसंतोषी । मानतो स्वर्ग ।।१२।।

दुसऱ्याची उणीव पाहता हसणे । दुसऱ्याची आपत्ति पाहून पळणे ।
दुसऱ्याचे वैभव देखोनि जळणे । होते ऐसे ॥१३॥
कष्टासाठी कोणी मरो । प्रतिष्ठेसाठी आम्हीच उरो ।
लोभासाठी कुणाहि स्मरो । होते ऐसे ॥१४॥
हे जेव्हा अनुभवा आले । तेव्हाच 'अल्पज्ञ आम्ही' कळले ।
म्हणोनि तुझ्या नामी वेधले । चित्त सर्वतोपरी ॥१५॥
दुजा कोणा शरण जावे । तरी सर्वांगीण शक्ति केवि पावे ? ।
एकेकाचे चरण धरावे । तरि वेळ जीवा फावेना ॥१६॥
उजेडाकरिता काजवे धरावे । भुललिया मार्गी परतो जावे ।
तेथे 'स्वसंवेद्य' कैसे व्हावे । निर्भयपणे ? ॥१७॥
तारकेवरि दृष्टि धरली । तीचि स्वये क्षणात उडाली ।
तैसी गति होईल आमुची भली । विशाल मार्गी ॥१८॥
तूची खरा निश्चयी अविनाशी । कधीकाळीहि न ढळशी ।
सर्व गुणज्ञान तुझेपाशी । हवे ते ते लाभती ॥१९॥
यासीच पाहिजे सूर्यकिरण । अनेक मार्ग दिसती दुरून ।
अनुभवाया आपुले चिंतन । ध्येय - प्राप्ति रूपाने ॥२०॥
सूर्य जैसा नभी उगवला । अंधःकाराचा नाश झाला ।
तैसा तू हृदयी प्रकटला । जीव झाला विश्वव्यापी ॥२१॥
चंद्राचे किरण व्यापले । चकोरचित्त प्रसन्न झाले ।
तैसे तू आपुलेसे केले । मग पळाले ताप सारे ॥२२॥
जोवरि पंचानन नाही दिसला । तोवरि अतिगर्व जंबुकाला ।
तैसा तुझा प्रकाश नाही पडला । तोवरि ग्रासती विकारशत्रु ॥२३॥
सूर्ये जीवन देता आपुले । कमल जैसे हसले, फुलले ।
तैसे तुझ्या दर्शनाने झाले । कृपापात्र जीवांचे ॥२४॥
राजहंसे चोच पुरविता । पाणी, दुधाची होय भिन्नता ।
तैसे तुझे ज्ञान स्पर्शे चित्ता । दोष - निर्दोषता उमगे ॥२५॥
अति काळोखी वीज कडाडे । दुरावला गडी दृष्टीस पडे ।
तैसे तुझ्या दर्शनप्रतापे घडे । शांतीप्राप्ति ॥२६॥
अज्ञानामुळे विकार माजती । अज्ञानेचि लाभते कुसंगती ।
अज्ञानानेच दुरावते प्राप्ति । सत्यस्वरूप देवाची ॥२७॥



तुझे दर्शन म्हणजे ज्ञान । अंतरंगात आनंदभान ।
वस्तु भरोनि पूर्णपण । तुझ्याठायी ॥२८॥
म्हणोनि हे ज्ञानसमुद्रा ! पूर्णकलात्मक आत्मचंद्रा ।
सर्वांगविकासा स्वर्गमुनींद्रा ! कृपा करी आम्हांवरी ॥२९॥
जीवाचे दारिद्र्य द्याया निवारून । एक तूचि आहेसि संपन्न ।
म्हणोनि आलो तुला शरण । सर्वज्ञा, आदिपुरुषा ! ॥३०॥
होतो तुझेचि परि दुरावलो । ठायीच असोनि भुललो ।
मृगजळास पाणी समजोनि धावलो । हरिणापरी ॥३१॥
सुकलिया नदीसि पाहूनि । त्रस्त होती पिपासू प्राणी ।
भरते येता जाती आनंदूनि । तैसेचि करी आम्हांसि ॥३२॥
कोवळे अंकुर भूमीवरि फुटले । जेथे मंद, शीतल वर्षा चाले ।
त्यापरीच समाधान झाले । आर्त जीवांचे तव कृपे ॥३३॥
ऐसे व्हावयासि करितो प्रार्थना । तन्मय करोनि जीवप्राणा ।
भिन्न उरोचि नये वाटे मना । व्हावे लवणा - समुद्रापरी ॥३४॥
यात असती किती अडथळे । आकुंचित केले अज्ञान - मळे ।
परि तुझ्या विशालतेचे चिंतन बळे । करील मोकळे आम्हांसि ॥३५॥
आम्ही कितीहि दडलो, पडलो तरी । तुझे लक्ष उडत्या घारीपरी ।
निवडोनि काढी अज्ञानाबाहेरी । सुख सर्वतोपरी द्यावयासि ॥३६॥
भुललिया वत्सा गाय हंबरे । पक्षिणी अंडाभवती फिरे ।
तान्हुल्या माय काम करिताहि सावरे । आपुलेचि म्हणोनि ॥३७॥
भिंगोटी अळीसि गोंजारी । निजध्यासे आपणासमान करी ।
तैसा देव भक्तालागी धरी । साधनजाळे पसरोनि ॥३८॥
ऐसे हे प्रत्यक्षचि घडे । जीव आर्त होता मार्ग सापडे ।
मार्गे चालता साक्षात्कार जोडे । व्यापक देवदर्शनाचा ॥३९॥
हे जाणोनि करितो प्रार्थना । पूर्ण व्हावया मानवांची आराधना ।
विश्वरूप पहाया देवदर्शना । आलो चरणा निर्धारे ॥४०॥
तू व्यापक सर्वांतरात्मा । सत्यज्ञानानंद निष्कामा ।
तैसेचि होणे हृदये आम्हा । तरीच होय तुझी भक्ति ॥४१॥
म्हणोनि आमुची बुद्धि विशाल करी । कर्म करावया भूलोकावरि ।
आयुष्य दे शतक निर्धारी । जीवो आम्ही विश्वसेवे ॥४२॥

पुण्यक्षेत्र पंढरपुरी । बैसलो असता चंद्रभागेतिरी ।
स्फुरू लागली ऐसी अंतरी । विश्वाकार वृत्ति ॥४३॥
तेथे दृष्टांत होई अद्भूत । कासया करावी विश्वाची मात ? ।
प्रथम ग्रामगीताचि हातात । घ्यावी म्हणे ॥४४॥
विश्व ओळखावे आपणावरून । आपणचि विश्वघटक जाण ।
व्यक्तीपासूनि कुटुंब निर्माण । कुटुंबापुढे समाज आपुला ॥४५॥
समाजापुढे ग्राम आहे । ग्रामापुढे देश राहे ।
देश मिळोनि ब्रम्हांड होय । गतीगतीने जवळ ते ॥४६॥
मानवमात्राचे प्रथम माहेर । आपुले गाव त्यातील घर ।
यातूनि प्रगति करीत सुंदर । पुढे जावे विश्वाच्या ॥४७॥
प्रथम पाया मानव - वर्तन । यास करावे उत्तम जतन ।
गाव करावे सर्वांगपूर्ण । आदर्श चित्र विश्वाचे ॥४८॥
गाव हा विश्वाचा नकाशा । गावावरुन देशाची परीक्षा ।
गावचि भंगता अवदशा । येईल देशा ॥४९॥
आकारे पृथ्वी असो विशाल । नद्यापर्वतांनी महाप्रबल ।
परि आमुचे गावचि मूल । घटक विशाल पृथ्वीचा ॥५०॥
गावचि जरि उत्तम नसले । तरि देशाचे भवितव्य ढासळले ।
ऐसे मानावे जाणत्याने भले । हृदयामाजी ॥५१॥
गावाच्या प्रसन्नतेत संत प्रसन्न । विश्व प्रसन्न, देव प्रसन्न ।
सर्वांआधी मन प्रसन्न । करावयाचे आपुले ॥५२॥
हे ओळखाया ज्ञान व्हावे । ज्ञान अनुभवासि आणावे ।
मगचि सुख संपादावे । विश्वरूप - दर्शनाचे ॥५३॥
जाणावे ग्राम हेचि मंदिर । ग्रामातील जन सर्वेश्वर ।
सेवा हेचि पूजा समग्र । हाचि विचार निवेदावा ॥५४॥
यासाठी करावा ग्रंथ प्रारंभ । आचरण - ज्ञान मूळारंभ ।
सक्रियतेचा मूळ स्तंभ । उभारावा ॥५५॥
ऐसा ऐकिला मधुर आवाज । भीमेतिरी असता सहज ।
तैसाचि वंदिला पंढरीराज । ध्यानरूपाने ॥५६॥
केले साधुसंतांचे चिंतन । करावया ग्रामाचे पुनर्निर्माण ।
नवीन काहीच न सांगेन । जुनेचि देणे देवाचे ॥५७॥



संत-महंतांनी कथन केले । परि ते पुढे विपर्यस्त झाले ।
मानवा - मानवात खंड पाडले । पाखंड्यांनी ॥५८॥
विशालता गेली मानवांची । रचना केली जाति, पंथांची ।
कामाची होती ती कायमची । विभागणी माथी बैसली ॥५९॥
सेवेसाठी पंथ - मंडळ । ते जनाशी वितंडायाचे झाले खेळ ।
असोनि एकचि गोपाळ । लढले जैसे यादवांपरी ॥६०॥
है द्वैत जावे निघोन । म्हणूनि सेवा आरंभावी आपण ।
ऐसा संकल्प दृढ धरोन । ग्रंथ केला सद्भावे ॥६१॥
आपुल्यापरी काम घ्यावे । जैसे जयासि साधेल बरवे ।
उत्तमचि करीत जावे । ईश्वरगुरुसि स्मरोनी ॥६२॥
वाङ्मयी सेवा सेवाचि जाण । जेणे मार्गी लागती जन ।
जन तितुका जनार्दन । जाणूनि कार्य करावे ॥६३॥
जे जे आपणासि कळते । ते ते सांगावे सकळांते ।
आपुलेचि म्हणोनि जन ते । मायबाप ॥६४॥
सांगणाराचि हुशार झाला । ऐकणारा वाया गेला ।
ऐसा समज ज्याने केला । बुडाला तो अहंकारे ॥६५॥
सर्वचि ऐकतील ऐसे नाही । यासि आहे मागील ग्वाही ।
म्हणोनि सेवा खंडो द्यावी । ऐसे नाही उचित ॥६६॥
आत्मसंतोषाकारणे । विश्वसेवेच्या प्रेरणेने ।
ग्रंथ रचिले सहृदयपणे । थोर जनांनी ॥६७॥
काही सांगती विश्वाची कहाणी । काही बोलती देश लक्षूनि ।
आपण सांगावी ग्रामावरूनि । 'ग्रामगीता' ॥६८॥
कृष्णगीता, रामगीता । हंसगीता, हनुमंतगीता ।
शिवगीता, अवधूतगीता । कथिल्या कोणी ॥६९॥
गुरुगीता, गणेशगीता । पांडवगीता, भगवद्गीता ।
देवगीता, देवीगीता । सर्व झाल्या ॥७०॥
सर्वांचा एकचि सार । शुद्ध करावे हृदय - मंदिर ।
सुखी करावे चराचर । तरीच पावे सद्गति ॥७१॥
'विश्वब्रम्ह' बोलत गेला । सभोवती समाज दुःखी बुडाला ।
ग्रामसेवाहि न कळे ज्याला । त्याचे ज्ञान व्यर्थचि ॥७२॥

वनी तीर्थी फिरोनि आला । आपुला गाव नाहि सुधारला ।
तो कैसा म्हणावा महाभला । एकटाची ॥७३॥
संतांचे ऐसेचि वचन । आपण तरला ते नव्हे उद्धरण ।
लोकांस लावी सन्मार्ग पूर्ण । तोचि तरला पूर्णपणे ॥७४॥
ठेवोनिया संतांवरि विश्वास । हाचि धरिला मनी निजध्यास ।
आरंभ केला ग्रामगीतेस । आपुल्यापरी सेवाभावे ॥७५॥
माझी मला साक्ष आहे । मी ग्रंथकर्ता विद्वान नोहे ।
परि धान्यराशीत आपुले पोहे । टाकावे वाटती ॥७६॥
देव प्रेमाचा भुकेला । न पाही जातपात अथवा कला ।
साधाभोळाहि उद्धरिला । ऐसा लौकिक तयाचा ॥७७॥
देव सौंदर्याचा भोक्ता असता । तरि कुब्जेवरि का प्रसन्न होता ? ।
देव जरि वैभवचि इच्छिता । तरि विदुराघरी कां धावे ? ॥७८॥
देवा कलाकौशल्यचि रुचे । तरि का वेड पेंध्यावाकुड्याचे ? ।
मीपण जिरवी ब्रम्हदेवाचे । तेथे पांडित्य काय करी ? ॥७९॥
ऐसे देवाचे गोडवे । सांगावे ते कमीच पडावे ।
म्हणोनि आपुल्यापरी चिंतावे । कार्य करावे भक्तीने ॥८०॥
आपुला विश्वास जैशापरी । तैसी करावी चाकरी ।
येथे बोलायाची उरी । आहे सर्वांलागोनि ॥८१॥
आपणासि देवापायी समर्पावे । विश्वी विश्वाकार व्हावे ।
पाहावे तैसे बोधीत जावे । जीवांलागी ॥८२॥
ऐसे धरोनि मानसी । आरंभ केला ग्रामगीतेसि ।
प्रार्थूनिया संतमहंतांसि । आशीर्वाद घेतला ॥८३॥
संतमहात्म्यांचे हृद्‌गत । देवाचा शुभ सृष्टिसंकेत ।
विशद कराया सरळ भाषेत । सुखसंवाद आरंभिला ॥८४॥
येथे श्रोती विचारिले । ग्रामगीतेप्रति लिहिणे झाले ।
त्यात संतदेव कासया घातले । स्तुतिस्तोत्रे गौरवूनि ? ॥८५॥
आपुले गाव उन्नत करावे । सकल लोक हाती घ्यावे ।
यासि देवाचे गोडवे । गावेत कासयासि ? ॥८६॥
काय देव न म्हणता काम नोहे ? । संता न भजता वाया जाय ? ।
आशीर्वाद न घेता येतो क्षय । सत्कार्यासि ? ॥८७॥



कासयासि मध्यस्थता । उगीच देवधर्माची कथा ? ।
करावी सर्व आपण गाथा । मारावी माथा देवाच्या ॥८८॥
ऐसे देवावरि विश्वासूनि । लोक झालेत दुबळे मनी ।
गाव भिके लागले याच गुणी । सोडा 'देव देव' बोलणे ॥८९॥
तुमचे म्हणणे मी एकेले । लोक पराधीन, आळशी झाले ।
परि देवाने ऐसे सांगितले । कोठे आहे ? ॥९०॥
अहो ! देवचि ऐसा नाही झाला । मग सांगेल कैसा इतराला ? ।
हा तो विपर्यास केला । भित्र्या, आळशी लोकांनी ॥९१॥
ज्यासि करणे नको काही । त्याने द्यावी देवाची ग्वाही ।
आपुली पापे लपवावी सर्वही । पाठीमागे ॥९२॥
लोकांत वाढवावा भ्रम । आपुले चुकवावेत श्रम ।
देवाचिया नामे चालवावे कुकर्म । त्यांनीच समाज बुडविला ॥९३॥
म्हणोनि मी तैसे न सांगेन । येथे जे केले देवस्मरण ।
ते भित्रे, आळशी कराया जन । नाही जाणा निर्धारे ॥९४॥
देव म्हणजे कर्तव्यशूर । न्यायनीतीचे माहेर ।
क्रांतिकार्याचे दिव्य निर्झर । अग्रसर जगामाजी ॥९५॥
देव म्हणजे अतिमानव । मानवाचा आदर्श गौरव ।
त्याचे कार्य ध्यानी राहो । स्फूर्ति यावया पुढिलांसि ॥९६॥
येथे मुख्य देवाचे व्याख्यान । नाही केले यथार्थ पूर्ण ।
देवासि पुरुषोत्तम समजून । वागा म्हणालो सर्वांना ॥९७॥
मुख्य देवाचे आरंभी स्मरण । त्यातहि त्याचे एकेक लक्षण ।
तेच साधकासि व्हावे साधन । म्हणोनिया आठविले ॥९८॥
चला विशालतेच्या मार्गी । जे गेले ते तरले जगी ।
भरोनि दिली अंतरंगी । हीच कीर्ति भाविकांच्या ॥९९॥
मित्रहो ! गाव व्हावे स्वयंपूर्ण । सर्व प्रकारे आदर्शवान ।
म्हणोनीच घेतले आशीर्वचन । पूर्वजांचे ॥१००॥
आशीर्वाद म्हणजे त्यांचे वचन । ऐकोनि घ्यावे देऊनि श्रवण ।
त्या फळवावे कार्य करोन । यासि आशीर्वाद बोलती ॥१०१॥
लोक थोर आशीर्वाद घेती । परि कार्य थोडेहि न करिती ।
तेणेचि फजीत पावती । गुलाम दुर्बळ होऊनि ॥१०२॥

आमुचे आशीर्वादाचे लक्षण । थोरांनी करावे मार्गदर्शन ।
बोधमार्ग उमगावा आपण । सफल करावा संकल्प ॥१०३॥
एरव्ही थोरांनी म्हणावे 'शतं जीव' । आम्ही व्यसने करावी मृत्युठेव ।
अभ्यास न करिता 'बुद्धिमान भव' । आशीर्वाद कैसा फळे ? ॥१०४॥
अंध दुबळा भाविकपणा । तो कधीहि न रुचे माझ्या मना ।
संतदेवाची निष्क्रिय गर्जना । करील तो आस्तिक नव्हे ॥१०५॥
आम्ही मुख्यतः कार्यप्रेरक । चालती आम्हां ऐसे नास्तिक ।
ज्यांचा भाव आहे सम्यक । 'सुखी व्हावे सर्व' म्हणूनि ॥१०६॥
भलेहि तो देव न माने । परि सर्वां सुख देऊ जाणे ।
मानवासि मानवाने । पूरक व्हावे म्हणूनिया ॥१०७॥
ग्रामातील सर्व जन । होवोत सर्वसुखी - संपन्न ।
घेऊ नये कुणाचा प्राण । समाजस्थिति टिकावी ॥१०८॥
आम्ही सर्वचि संतुष्ट राहू । सर्व मिळोनि सर्व खाऊ ।
राबू सर्व, सुखे सेवू । जे जे असेल ते सगळे ॥१०९॥
आमची संपत्ति नसे आमची । आमची संतति नसे आमची ।
कर्तव्यशक्तीहि नसे आमची । व्यक्तिशः उपभोगार्थ ॥११०॥
हे सारे गावाचे धन । असो काया, वाचा, बुद्धि, प्राण ।
ऐसे असे जयाचे धोरण । तो नास्तिकहि प्रिय आम्हा ॥१११॥
तो तत्त्वतः नास्तिकचि नोहे । जो सर्वांसि सुखविताहे ।
तो 'देव देव' जरी न गाये । तरी देवसेवाचि त्या घडे ॥११२॥
आम्ही देवाचे नाव मध्ये घातले । परि सर्वांच्या सुखार्थ कार्य केले ।
कर्तव्यतत्परतेसीच वर्णिले । जिकडे तिकडे ॥११३॥
लोकांपुढे विशाल ज्ञान । ठेवाया अत्युच्च आदर्श कोण ? ।
म्हणोनि देवाचे नामाभिधान । घेतले विशाल भावाने ॥११४॥
आम्ही आपुल्यासाठी मरतो । देव सकळांसाठी कार्य करतो ।
हाचि भाव त्याने स्फुरतो । म्हणोनि धरिला देव चित्ती ॥११५॥
देव म्हणजे घेवचि नोहे । सर्व काही देवचि आहे ।
ऐसा ज्याचा संप्रदाय । त्यासि भजू जीवभावे ॥११६॥
अंतिम ध्येय अखंड शांति । अनुभवा यावी जीवाप्रति ।
याचलागी केली स्तुति । साध्य-साधनाची ॥११७॥



जे शांति आणि सत्य । अंगी मुरवोनि झाले कृतकृत्य ।
तेचि सेवामूर्ति संत स्तुत्य । आदर्शरूपे ॥११८॥
उदारचरित संत-सज्जन । मनोभावे तयांसि वंदन ।
जे उपदेशिती 'जनी जनार्दन' । गाव सुखसंपन्न करावया ॥११९॥
साधुसंत, देवधर्म । मानवोद्धारचि त्यांचे कर्म ।
तेचि आठवूनि उद्धरू ग्राम । तुकड्या म्हणे ॥१२०॥
इतिश्री ग्रामगीता ग्रंथ । गुरूशास्त्र-स्वानुभव संमत ।
देवसंत वंदोनि कथिले हृद्गत । प्रथम अध्याय संपूर्ण ॥१२१॥

॥ सद्गुरुनाथ महाराज की जय ॥

## ॥ अभंग ॥

भूती देव म्हणुनि भेटतो या जना । नाही हे भावना नर - नारी ॥
जाणे भाव पांढुरंग अंतरीचा । नलगे द्यावा साचा परिहार ॥
दयेसाठी केला उपाधी - पसारा । जडजीवा तारा नाव कथा ॥
तुका म्हणे नाही पडत उपवास । फिरतसे आस धरोनिया ॥

**- श्रीसंत तुकाराम महाराज**

## ।। चित्र परिचय ।।



### अ. २ – श्री समर्थ रामदास स्वामी

गुरुजनी ऐसे द्यावेत धडे । आपुला आदर्श ठेवोनि पुढे ।
विद्यार्थी तयार होता चहूकडे । राष्ट्र होई तेजस्वी ।।७।।

तिनशे वर्षांपूर्वी 'दासबोधा' सारख्या सुगम ग्रंथाद्वारे महाराष्ट्रास धर्मज्ञान देणारे व स्वतः आजीवन ब्रम्हचारी राहून धनुर्धारी रघुवीर व वीर हनुमान यांची गावोगावी प्रस्थापना करीत सूर्यनमस्कारादिद्वारे तरुणांमध्ये धर्म प्रेम व कार्यशक्ती जागृत करणारे आचार्य. या अध्यायाच्या विषयीचे जणू आदर्शच !



• अध्याय दुसरा •

# धर्माध्ययन

।। श्रीगुरुदेवाय नमः ।।

देवे निर्माण केली क्षिती । प्रजा वाढवी प्रजापति ।
मानवसमाज राहावया सुस्थिती । धर्म सकळा निवेदिला ।।१।।
'धर्म' बोलावया शब्द एक । परि त्याचा विस्तार अलौकिक लौकिक ।
आणि पारमार्थिक । मिळोनिया ।।२।।
अनेक प्राणी जेथे राहती । त्या सर्वांची राहावी सुस्थिति ।
समान समाधानाची गति । त्यास धर्म म्हणावे ।।३।।
आत्मरूपाची धारणा । सर्वाठायी समभावना ।
विश्वकुटुंब ऐशा आचरणा । धर्म म्हणावे निश्चये ।।४।।
आपुली साधावी उन्नति । सौख्य द्यावे इतरांप्रति ।
या उद्देशे जी जी संस्कृति । धर्म म्हणावे तिजलागी ।।५।।
परस्परांशी वागणूक । ज्यात न्याय – नीति सम्यक ।
प्रत्येकाचे कर्तव्य चोख । धर्म ऐसे त्या नाव ।।६।।
कोणाचा द्रोह न करून । करावा ऐहिक उत्कर्ष पूर्ण ।
साधावे आत्म–समाधान । हाचि बाणा धर्माचा ।।७।।
सर्वांस असावा संतोष । दुःख न व्हावे प्राणीमात्रास ।
याचा सक्रिय कराया अभ्यास । धर्मनीति बोलिली ।।८।।
भिन्न लोकांची भिन्न कामे । मिळोनि पुरती जीवनकर्मे ।
असोत भिन्न गुण, भिन्न नामे । परि सुख सर्वांचे सहकारी ।।९।।
नको सत्तेचा बडगा त्यासि । नको दंडभय सत्कर्मासि ।
आपापले कर्म सर्वांसि । धर्म शिकवी सर्वांगे ।।१०।।
धार्मिक त्यासचि म्हणावे । सत्तेवाचूनि वागे बरवे ।
स्वये आपुल्याचि स्वभावे । समरस होई सर्वांशी ।।११।।
नको वैद्य अथवा डॉक्टर । आपणचि राहे आरोग्यतत्पर ।
नको वकील, न्यायाधीश दंडधर । न्यायव्यवहार सहजचि ।।१२।।

नको धाक तरवारीचा । चुकीस्तव तळमळे आत्मा साचा ।
साक्ष देतो अंकुश देवाचा । अंतरामाजी ॥१३॥

ऐसे ज्याचे हृदयी स्फुरण । तोचि खरा धर्मवान ।
बाह्य अवडंबर धर्मचिन्ह । ते ते गौण, धर्म नव्हे ॥१४॥

शुद्ध सात्त्विकता प्रकट करावी । लौकिकी तीच जागवावी ।
आपुल्या चारित्र्याने सांभाळावी । सुव्यवस्था जगाची ॥१५॥

व्यक्तिधर्म, कुटुंबधर्म । समाजधर्म, गावधर्म ।
बळकट होई राष्ट्रधर्म । प्रगतिपथाचा ॥१६॥

व्यक्ति व्हावी कुटुंबपूरक । कुटुंब व्हावे समाजपोषक ।
तैसेचि ग्राम व्हावे राष्ट्रसहायक । राष्ट्र विश्वा शांतिदायी ॥१७॥

याकरिता जी जी रचना । तियेसि धर्म म्हणती जाणा ।
देशद्रोह, अधार्मिकपणा । एकाच अर्थी ॥१८॥

मुख्य धर्माचे लक्षण । त्याग, अहिंसा, सत्य पूर्ण ।
अपरिग्रह, ब्रह्मचर्य जाण । तारतम्ययुक्त ॥१९॥

निर्भयता, शरीरश्रम । परस्परांशी अभेद प्रेम ।
पूरक व्हावया विद्या सत्कर्म । सकलांसाठी ॥२०॥

सर्व विश्वचि व्हावे सुखी । ही धर्माची दृष्टि नेटकी ।
ती आणावी सर्व गावलोकी । तरीच लाभ ॥२१॥

विश्वाचा घटक देश । गाव हाचि देशाचा अंश ।
गावाचा मूळ पाया माणूस । त्यासि करावे धार्मिक ॥२२॥

व्यक्तिधर्म सर्वां कळावा । कुटुंबधर्म आचरणी यावा ।
ग्रामधर्म अंगी बाणावा । राष्ट्रधर्माच्या धारणेने ॥२३॥

व्यक्ति – व्यक्ति व्हावी धार्मिक । धर्म नव्हे एकांगी लटक ।
भौतिक आणि पारमार्थिक । विकास व्हावा सर्वांचा ॥२४॥

प्रत्येकासि शरीर, मन । वाणी, इंद्रिये, बुद्धि, प्राण ।
या सर्वांचे विकास – साधन । तोचि धर्म ॥२५॥

ऐशा सद्धर्माचे ज्ञान । आधी प्राप्त व्हावे सर्वांगीण ।
मगचि त्यासारिखे जीवन । जगता येई या लोकी ॥२६॥

यासाठीच आश्रमव्यवस्था । पूर्वजांची उत्तम प्रथा ।
आरंभी मिळे धर्माची संथा । पुढे जीवन धर्ममय ॥२७॥



मानव पशुयोनीतूनि आला । नराचा नारायण होणे त्याला ।
यासाठी संस्कार देऊनि सावरिला । क्रमाक्रमाने ॥२८॥

मानवाकडोनि जे जे घडते । ते बरे – वाईट दोन्ही होते ।
त्यातूनि निवडावे लागते । पापपुण्य ॥२९॥

त्याचे सुधारोनि आचरण । द्यावे लागते नवे वळण ।
जेणे आपुले करील उद्धरण । इतरां सहायक होऊनि ॥३०॥

यासाठी धर्मे नेमिले संस्कार । आश्रम गोविले जीवनी चार ।
आयुष्य कल्पुनि वर्षे शंभर । विभागिले ते उन्नतिस्तव ॥३१॥

मानव जीवनी करिता पदार्पण । ब्रह्मचर्याश्रम लागे जाण ।
जो सर्व आश्रमांचे मूलस्थान । पाया म्हणावा जीवनाचा ॥३२॥

ज्याचा ब्रह्मचर्याश्रम साधला । त्याचा पुढील काळ सुखी गेला ।
मग प्रत्येक आश्रम त्याला । उत्कर्षदायी होतसे ॥३३॥

या ब्रह्मचर्याश्रमाचे साधन । चाले गर्भधारणेपासून ।
पोटातचि असता जीव पडोन । जतन करावा संस्कारे ॥३४॥

संस्कार दुष्परिणामकारी । न पडावे आतील गर्भावरि ।
म्हणोनि मातापित्यांनी सदाचारी । राहावे सद्भावे ॥३५॥

न करावे अश्लील भाषण । न बघावे दृश्य हीन ।
न राहावे व्यसनाधीन । दुर्गुणी अन्न न खावे ॥३६॥

आहारविहार सात्त्विक पूर्ण । उत्तमगुणी चिंतन, वाचन ।
न ऐकावे शृंगारगायन । गर्भवतीस घेवोनि ॥३७॥

येथोनि पाहिजे जतन केले । पुढे मूल जन्मासि आले ।
तेव्हापासूनि संस्कार घडले । पाहिजेत सत्कर्माचे ॥३८॥

घरी पुत्ररत्न जन्मले । काही दिवस त्याचे कौतुक केले ।
परि जन पुढे पाहू लागले । कर्तव्य तयाचे ॥३९॥

मुलगा काय खेळणे खेळतो । काय बघतो, कोठे जातो ।
कैसा बोलतो, चालतो, गातो । पाहती जन ॥४०॥

मुलास जैसे कळो लागले । तैसे त्यास सांभाळणे अवश्य झाले ।
त्याचेसमोर न पाहिजे बोलिले । दुर्विषय कोणी ॥४१॥

त्यावरि उत्तम संस्कार घडावे । म्हणोनीच व्रतबंधादि बरवे ।
शिकवावे, पाठ करोनि घ्यावे । उत्तम विषय ॥४२॥

मग जो तो त्यासि म्हणे । काय रे ! केले की नाही वाचणे ? ।
कैसा फिरतोसि रानेवने । वेड्यापिशासारिखा ? ॥४३॥
तुज नाही दिले कां संस्कार । घडावया सद्‌गुणी व्यवहार? ।
काय करिती पालक चतुर? । लक्ष नाही तुझ्यावरी ॥४४॥
सांगितली नाही कां स्नानसंध्या । स्मरावयासि जगद्वंद्या? ।
नमस्कारिले नाहीस कां प्रतिपाद्या । सकाळी, सायंकाळी जाऊनि ॥४५॥
मग कां फिरतोसि रानावना? । कैसा होशील शहाणा? ।
उपदेश देती ऐसा, सद्‌गुणा । वाढवाया जन थोर ॥४६॥
घडावया उत्तम संस्कार । मायबाप शिकविती सदाचार ।
व्हावया उत्तम, गुणी, चतुर । मोठेपणी ॥४७॥
आठ वर्षाचे आतचि त्याला । पाहिजे उपनयन संस्कार केला ।
तोहि नको रुढीचा बांधला । नाटक नुसते बटूचे ॥४८॥
उपनयन म्हणजे विद्येचे व्रत । ब्रह्मचर्याश्रमाची सुरुवात ।
गुरुजवळी करणे समर्पित । जीवन त्याचे घडवावया ॥४९॥
तोहि गुरु असावा ब्रह्मचारी । अथवा वानप्रस्थ तरी ।
त्याने घ्यावी काळजी पुरी । मुलांचिया ब्रह्मचर्याची ॥५०॥
त्याचे राहणे, खाणे, पिणे । खेळ खेळणे, ग्रंथ वाचणे ।
लक्ष ठेवावे आचार्याने । मनोरंजनादिकावरि ॥५१॥
जरा चुकलिया चुकतचि जाते । मग सावरेना काही केल्या ते ।
इंद्रिया वळण जैसे लागते । तैसेचि होते जन्मभरि ॥५२॥
म्हणुनि गुरुआश्रमी नियम । प्रत्येक आचरणी संयम ।
छात्रालयी हीच उत्तम । दृष्टि असावी सर्वत्र ॥५३॥
मुलगा अभ्यासा लागला । की सात्विक खाणे असावे त्याला ।
खारट, आंबट, तिखट, मसाला । देऊ नये भोजनी ॥५४॥
चमचमीत, चुरचुरीत । अति मधुर, तळीव पदार्थ ।
अथवा रुक्ष, कृत्रिम मिश्रित । भोजनासि न द्यावे ॥५५॥
साधे, ताजे अन्न द्यावे । वेळेवरि झोपवावे, जागवावे ।
झोपता, जागता जवळी नसावे । स्पर्शणारे कोणी ॥५६॥
कराया लावावे प्रातर्ध्यान । सायंकाळी प्रार्थना पूर्ण ।
झोपता, जागता चिंतन । आदर्श महापुरुषांचे ॥५७॥



नित्यनियमे उषःपान । सूर्यनमस्कार, आसन ।
पोहणे आणि निंबसेवन । आरोग्यदायी जे सोपे ॥५८॥
शीतजले करवावे स्नान । सकाळी रानीवनी गमन ।
करवावे नेहमी पठणपाठण । चारित्र्यवंतांचे ॥५९॥
शौकिन राहणी वर्जावी । सुगंधी अत्तरे, फुलेही त्यजावी ।
कोणी बाल न ठेवी, तेल न लावी । ऐसे करावे ॥६०॥
बघू न द्यावे दर्पणी तोंड । वाढू न द्यावे पोषाखाचे बंड ।
पान बिडी, चहाचे थोतांड । सर्वतोपरी वर्जावे ॥६१॥
कोणीहि न घ्यावे मादक द्रव्य । तोंडी नसावे नाटकी काव्य ।
समजावूनि द्यावे सेव्यासेव्य । उपवासहि करवावा ॥६२॥
कराया सांगावे आपुले काम । दुसऱ्यासाठीहि परिश्रम ।
शिकवावे बंधुभगिनी-प्रेम । सेवाधर्म शिकवावा ॥६३॥
बसवू नये मुलींसह शिक्षणी । तेथे संमिश्र नाटके कोठोनि? ।
स्त्रैणांसंगती श्रृंगारगायनी । क्षणभरीहि बसो न द्यावे ॥६४॥
मुलाचे वय जसजसे वाढे । तोडावे स्त्रियांचे संबंध गाढे ।
नेहमी चारित्र्यवंताचे धडे । द्यावेत तयासि ॥६५॥
विवाहादि कार्ये न दाखवावी । शृंगारकाव्ये न शिकवावी ।
व्यायामदंगली खेळवावी । मुले निर्भयत्वे ॥६६॥
अश्लीलता कोठेहि न दिसावी । दिनचर्या आदर्श असावी ।
सकाळी, सायंकाळी द्यावी । बाद्धिके ब्रह्मचर्याची ॥६७॥
सांगावे ब्रह्मचर्याचे महिमान । ब्रह्मचर्याचा उद्देश कोण ।
काय सेविल्या होते रक्षण । ब्रह्मचर्याचे ॥६८॥
ब्रह्मचर्य म्हणजे ब्रह्माचरण । ब्रह्मतेजाचे साधन ।
विद्याप्राप्तीचे वर्तन । वीर्यरक्षण ब्रह्मचर्य ॥६९॥
ब्रह्मचर्यासमान कोण । जगी महत्त्वाचे साधन ? ।
जो ब्रह्मचर्य करी पालन । तो देवासमान होतसे ॥७०॥
रिद्धिसिद्धी त्याच्या दासी । देव धावतो त्याच्या हाकेसि ।
सूर्यासमान कांति तयासि । लाभतसे निरोगी ॥७१॥
भीष्माचा व्रतनिश्चय । कार्तिकेयाचे चातुर्य ।
शुकाचा ज्ञानयोग निर्भय । लाभे ब्रह्मचर्याने ॥७२॥

अवधूताची दृष्टी विशाल । हनुमंताचे महाबल ।
ब्रम्हचारी पावे महाचपल । वज्रदेह ॥७३॥
सर्व बळांत वीर्यबळ । वीर्य नाही तो दरिद्री, दुर्बळ ।
रोगांचिया मुखीचा कवळ । नेहमी होतो ॥७४॥
ज्याने वीर्य सांभाळले । यश तयासि माळ घाले ।
वीर्य क्षीण होता मृत्युने केले । शिकार त्यासि ॥७५॥
वीर्याअंगी आहे ओज । वीर्याअंगी नवे तेज ।
वीर्याअंगी आरोग्यबीज । बुद्धिसामर्थ्यहि ॥७६॥
ऐका वीर्य कैसे बनते । चाळीस शेर अन्न पचते ।
त्याचे एक शेर रक्त होते । वीर्य त्याचे दोन तोळे ॥७७॥
पुरुष रोज एक शेर जेवला । तरी एक महिना तीस शेराला ।
त्यांत दीड तोळा उपजला । वीर्यरसबिंदु ॥७८॥
तो नष्ट होय एका क्षणी । केवढी थोर केली हानी ! ।
द्रव्य मिळविले कष्ट करोनि । केली धुळधाणी हौसेने ॥७९॥
ब्रह्मचारी पतन पावला । महिन्याची कमाई खोवतो क्षणाला ।
केवढा हा तोटा झाला । आयुष्याचा ? ॥८०॥
साता दिसां अन्नरस होई । तो साता दिसा रक्तपण घेई ।
रक्तामधूनि मांस होई । थोडे थोडे ॥८१॥
त्यातूनि मेद आणि हाडे । साता दिसा मज्जा वाढे ।
मग वीर्य निपजे थोडे थोडे । सप्ताहानंतरी ॥८२॥
बेचाळीस दिवसानंतर । वीर्य शुक्रधातु शक्तिकर ।
त्यासि किती प्रयास दिवसरात्र । अन्नखर्च कितीतरी ॥८३॥
ते अमोल वीर्य देहातील रत्न । ज्यावरि देहाचे जीवन ।
ते आरोग्यदायी अमृतकण । तेज वाढे रोमरोमी ॥८४॥
म्हणून यासि सांभाळावे । ओज, सामर्थ्य वाढवावे ।
सूर्यचंद्रापरी शोभावे । ब्रह्मचर्याने ॥८५॥
ऐसे शिकवावे बाळा, तरुणा । बौद्धिक द्यावे सर्व जना ।
बुद्धि बनता वेळ लागेना । जीवन आदर्श व्हावया ॥८६॥
गुरुजनी ऐसे द्यावेत धडे । आपुला आदर्श ठेवोनि पुढे ।
विद्यार्थी तयार होता चहूकडे । राष्ट्र होई तेजस्वी ॥८७॥



चोवीस वर्षे ऐसी गेली । त्याची जीवन सफलता झाली ।
गृहस्थपणे गुढी उभारिली । सत्कार्याची त्यापुढे ॥८८॥
ब्रह्मचारी घे गृहस्थपण । शंभर वर्षे जगे तयाचे संतान ।
रोगराई, दुबळेपण । तया न बाधे सर्वथा ॥८९॥
यानेच गाव होईल आदर्श । बलवान बनेल सर्व देश ।
मानवसमाजाचा उत्कर्ष । होईल सर्वतोपरी ॥९०॥
हे साधाया पहिला उपक्रम । पाहिजे ब्रह्मचर्याश्रम ।
जेणे प्रजा होई कार्यक्षम । स्वतःसाठी तैसी राष्ट्रासाठी ॥९१॥
राष्ट्रासाठी जीवन बनविणे । त्यासि चारित्र्ययोग संपादणे ।
आरोग्यबल शरीरी राखणे । ब्रह्मचर्यायोगे ॥९२॥
परस्परांत प्रेम राखणे । समाजाकरिता तत्पर होणे ।
त्यासाठीहि आधी जीवन बनविणे । हाचि पाया आवश्यक ॥९३॥
जे हे नियम मुलांसाठी । तीच मुलींकरिता रहाटी ।
वयाचीच मुख्य विषमता पोटी । राही तयांच्या ॥९४॥
भारती झाल्या ब्रह्मचारिणी । विद्यासंपन्न तेजस्विनी ।
त्यांचे आश्रम स्वतंत्र स्थानी । आदर्शरूप ॥९५॥
जोवरि हे होते आश्रम । तोवरि राष्ट्र बलवान उत्तम ।
वाढूनि व्यसने, विषयप्रेम । पतन झाले समाजाचे ॥९६॥
धर्माचा पाया विद्यार्थीधर्म । तयासाठी ब्रह्मचर्याश्रम ।
त्यानेच जीवन होईल उत्तम । व्यक्तीचे आणि राष्ट्राचे ॥९७॥
म्हणोनि साधा या व्रतनियमाला । असेचि आश्रम काढा गावाला ।
शिकवा आपुल्या भावी पिढीला । लक्ष देऊनि मित्रहो ! ॥९८॥
मी हे जाणतो मागील वर्म । त्या काळी सुलभ श्रद्धा, संयम ।
तैसे आज करिता आश्रम । कठिण जाईल गावासि ॥९९॥
उपभोग सकलांचे वाढले । राहणीमाजी अंतर पडले ।
सभोवताली तार चढले । विषयसतारीचे ॥१००॥
मुलींचे विद्यालय अलग नाही । विधवाहि शृंगाराविण न राही ।
धाक कोणाचा कोणाहि । उरला दिसेना ॥१०१॥
नटवेष घुसले जीवनी । भुलविले चित्रपट – कादंबऱ्यांनी ।
अध्यापक तोचि विलासी, व्यसनी । शृंगारकाव्य शिकवितो ॥१०२॥

रस्तोरस्ती खाद्यपेये । वैभवशाली विद्यालये ।
चैन हेच जणु जीवनध्येय । कोणी सोय लावावी कोणा ? ॥१०३॥
ऐसे वातावरण जरी असले । तरी हृदयवंताने पाहिजे सुधारले ।
आपुले गाव बिघडू दिले । ऐसे न करावे सुज्ञाने ॥१०४॥
नियमित मुलांचे वर्तन । नियमित ठेवावे खानपान ।
नियमित ब्रह्मचर्याचे पालन । घडलेच पाहिजे ॥१०५॥
सर्व भुक्तिमुक्तीसि कारण । असे ब्रह्मचर्य धर्मज्ञान ।
म्हणोनि विनवितो श्रोतेजन । इकडे दुर्लक्ष न व्हावे ॥१०६॥
ऐसे साधाल जेवढ्यापरी । संतान बळकट होईल संसारी ।
गावचे स्वास्थ्य वाढेल निर्धारी । तुकड्या म्हणे ॥१०७॥
इतिश्री ग्रामगीता ग्रंथ । गुरु-शास्त्र-स्वानुभव-संमत ।
धर्म ब्रह्मचर्य निवेदिले येथ । दुसरा अध्याय संपूर्ण ॥१०८॥

॥ सद्गुरुनाथ महाराज की जय ॥

## ॥ अभंग ॥

कुग्रामीचा वास आयुष्याचा नाश । विद्येचा अभ्यास, तेथे कैचा ? ॥
तेथे कैचा देव, तेथे कैचा धर्म ? । कैसे कर्माकर्म कळेचि ना ॥
कळेना परीक्षा – चातुर्य – मर्यादा । लागतसे सदा पोटधंदा ॥
पोटधंदा नीच जनाचि संगति । तेथे कैची गति विवेकाचि ? ॥
विवेकाचि गति सज्जनसंगती । दास म्हणे स्थिति पालटावी ॥

– समर्थ रामदासस्वामी



# ॥ चित्र परिचय ॥



## अ. ३ – श्रीसंत सावता महाराज

आपुले घरचि नव्हे घर । विश्व आपुले मकान सुंदर ।
हेचि शिकावया असे संसार । उद्धार तो याचि मार्गे ॥८४॥

सहाशे वर्षांपूर्वी 'प्रपंची असोनि परमार्थ साधावा' हे सूत्र स्वतःच्या आचरणाने सिद्ध करणारे गृहस्थाश्रमी संत सहा कोसांवरील पंढरीसहि न जाता ग्रामसेवेतच ईश्वरसेवा समजून कुटुंबासह मळ्यात राबणारे तत्त्वज्ञ कर्मयोगी, त्यांनी श्रमरूपी कोयत्यानेच 'साठविला दाता त्रैलोक्याच'

• अध्याय तिसरा •

# आश्रम–धर्म

॥ श्रीगुरुदेवाय नमः ॥

श्रोतियांनी प्रश्न केला । मागे ब्रह्मचर्याश्रम निरुपिला ।
जीवनविकासाचा बोलिला । पाया धर्ममय ॥१॥
तेथे संशय उत्पन्न झाला । काय ब्रह्मचारी राहणे सर्वाला ।
मग संसाराचा उलाढाला । कोणी करावा ? ॥२॥
याचे उत्तर आहे सोपे । जग चाले कोणाच्या प्रतापे ? ।
आपुलेच रडे आपणा न संपे । म्हणे जगाचे कैसे होय ? ॥३॥
अरे ! तुम्हांस याची चिंता कशाला ? । ते पाहू द्या निर्मित्याला ।
तुम्ही साधलिया साधा व्रताला । ब्रह्मचर्याच्या ॥४॥
नैष्ठिक ब्रह्मचर्य पाळा । परंतु अधःपात टाळा ।
वृत्ति आठवे विषयचाळा । तरि सांभाळा गृहधर्म ॥५॥
चोवीस वर्षे ब्रह्मचर्य । नियमे सांभाळिले वीर्य ।
तरि का याने खुंटेल कार्य । संसाराचे ? ॥६॥
मुलगा जरा वयात आला । हवे तैसे वागू लागला ।
बाळपणीच भोगी तारुण्याला । जन्म गेला दुःखी मग ॥७॥
ऐसे क्षयी श्वानसूकर । दुबळे पाप्याचे पितर ।
यांनी होईल कां संसार । कधी सुखाचा ? ॥८॥
त्याचे जीवन म्हणजे पाप । त्याचा संसार म्हणजे ताप ।
त्याचे संतान म्हणजे शाप । संसारासि ॥९॥
संसार सर्व सुखी व्हावा । आपुलाहि उद्धार घडावा ।
यास्तव ब्रह्मचर्याचा ठेवा । साधलाचि पाहिजे ॥१०॥
संसारपथ न मोडावा । प्रजातंतु न खंडावा ।
म्हणोनि ब्रम्हचाऱ्याने साधावा । गृहस्थाश्रम ॥११॥
ध्यानी घेवोनि निसर्गनियम । धर्मे योजिला गृहस्थाश्रम ।
ज्याने व्यक्ति – गांव – राष्ट्र उत्तम । धारणेत चाले ॥१२॥



इंद्रियांची दुर्धर गति । ती लागेना सहज हाती ।
पुढे होऊ नये फजीती । म्हणोनि यावे या मार्गी ॥१३॥
एरव्ही लग्न केलेचि पाहिजे । त्याविण कार्यचि न साजे ।
ऐसा आग्रह धरतील जे । ते व्यर्थवादी ॥१४॥
जयासि साधे इंद्रियदमन । वृत्ति सत्कार्यी रमे पूर्ण ।
त्याने केलेचि पाहिजे लग्न । ऐसे नाही ॥१५॥
परि संसार न करिता विरागी होय । त्यासि आहे महाभय ।
सेवासाधनाहि कठिण जाय । बिकट आहे मार्ग तो ॥१६॥
मुक्याने वेद अभ्यासावे । लंगड्याने पर्वती चढावे ।
आंधळ्याने युद्ध करावे । तैसे कठिण ब्रह्मचर्य ॥१७॥
हे साधणे सोपे नाही । तैसिच ही निसर्गाशी लढाई ।
म्हणोनि त्याचा राजमार्ग तोहि । कथिला धर्मे ॥१८॥
मुलगा धर्मविद्या शिकला । अभ्यासाने सद्‍गुणी झाला ।
शक्तियुक्तींनी उंबरठा गाठला । तारुण्याचा ॥१९॥
घडले निष्ठावंत ब्रह्मचर्य । शरीरी प्रगटले ओजवीर्य ।
निसर्गेचि झाले अनिवार्य । लग्न करणे ॥२०॥
न जाणो लग्नासि झाला उशीर । घडेल झणी दुर्व्यवहार ।
म्हणोनि वडील होती चिंतातुर । मुलासाठी ॥२१॥
योग्य देती लग्नसंस्कार । बालपणाचा पाडोनि विसर ।
करिती तया जबाबदार । दीक्षा देवोनि संसाराची ॥२२॥
गृहस्थाचा काय धर्म । कोणते आचरण, काय वर्म ।
कैसे आचरावे कर्म? । गृहस्थाश्रमा शिकविती ॥२३॥
आजवरि होता ब्रह्मचारी । आता वाढली जबाबदारी ।
पत्नी येता आपुल्या घरी । घरचि लागे साधावे ॥२४॥
मागे विद्यार्जनाचा व्यवहार । पुढे पाऊल पडे कामावर ।
म्हणोनि सावध – सावधान सत्वर । बोलती ज्ञाते ॥२५॥
निधी घेऊनि ज्ञानाचा । मार्ग सुधारावा जीवनाचा ।
धर्म साधावा कुटुंब राष्ट्राचा । याचसाठी सावधान ! ॥२६॥
प्रकृतीचा संयोग दिला । व्यक्तीने कुटुंबरूपे विकास केला ।
तेणे घराचा भार पडला । अंगावरि ॥२७॥

कैसे घडेल उद्योग करणे । आपुला सर्वांचा निर्वाह साधणे ।
लग्नसंस्कारे लाविली बंधने । समाजधर्माची ॥२८॥
एकपत्नीव्रता घ्यावे । वाईट कुणाकडे न बघावे ।
हेच निश्चयाने शिकवावे । लागे तया ॥२९॥
काही घडता दुर्व्यवहार । कलंक लागे घराण्यावर ।
म्हणतील मुलगा कुलांगार । जन्मा आला ॥३०॥
याच कारणासि जपावे । सात्विक मार्गा अवलंबावे ।
संती सांगितले जे बरवे । तेचि करावे सर्वथा ॥३१॥
एकांती, लोकांती स्त्री पाहोन । होऊ न द्यावे वृत्तीचे उत्थान ।
प्राण गेलियाहि अमोल जीवन । खोवू नये कुमार्गी ॥३२॥
एका पत्नीसि शास्त्रे नेमिले । ऐशा गृहस्थाश्रमी राहिले ।
तरी ब्रह्मचारीच म्हणविले । पाहिजे आम्ही ॥३३॥
गृहस्थाश्रम जरी घेतला । पथ्याने विषयी वागला ।
तरी तो ब्रह्मचारीच समजला । जातो गृहस्थ ॥३४॥
त्यासाठी उभयतांनी पाळावा संयम । कारणाविण नको समागम ।
एरव्ही आपले व्रतनियम । दोघांनीहि आचरावे ॥३५॥
संतानाकरिताच वीर्य देणे । एरव्ही आपुले ब्रीद रक्षिणे ।
ऐसे साधले जीवन ज्याने । तोचि महान तपस्वी ! ॥३६॥
अहो ! लग्न जरी केले । तरी विषय दास्य नाही सांगितले ।
जन्म निभवावयासि मिळविले । साथीदार लग्नाने ॥३७॥
जिंकावया कामवृत्ति । पत्नी, नव्हे वाढवाया ती ।
उत्तममार्गे मिळवावी संपत्ति । तीहि आसक्ति जिंकाया ॥३८॥
जीवन – शक्ति एक झाली । तेणे सुकीर्ति प्रकाश पावली ।
सत्कार्य – कळी उमलो लागली । ऐसे व्हावे ॥३९॥
सुख व्हावे मातापित्यांसी । बंधुभगिनी आणि इतरांसि ।
वागण्याची रीति ऐसी । मोह पाडी सर्वांना ॥४०॥
मोकळे बोलणे गोजिरवाणे । चाल चालणे चारित्र्याने ।
जीवन कंठणे उज्ज्वलतेने । थोरामोठ्यांचे पाहूनि ॥४१॥
संतऋषींनी कथिले ज्ञान । त्याचे करणे अध्ययन ।
यानेच फिटेल ऋषिऋण । गृहस्थाचे ॥४२॥



संतान करावे आदर्श साचे । तरि ऋण फिटे मातापित्याचे ।
अथवा आपणचि नाम वाढवावे तयांचे । देशसेवेने ॥४३॥
विश्वी देव जाणूनि सेवावा । तोचि वैश्वदेव बरवा ।
प्राणीमात्रासि वाटा द्यावा । हाचि यज्ञ पावन ॥४४॥
यानेचि फिटे देवऋण । गृहस्थाश्रमी सर्वांचे जीवन ।
संतोषवावे दीन, दु:खी जन । सेवाभावे ॥४५॥
उचित करावी कुटुंबसेवा । जीवसेवा, ग्रामसेवा ।
ध्यानधारणेचा ठेवा । त्रिकाळ नेमिला सर्वांसि ॥४६॥
गृहस्थाश्रमी ऐसे वर्तले । अतिमहत्त्व जीवना आले ।
साधुसंती गौरविले । ऐशा गृहस्थाश्रमा ॥४७॥
असो कोणताहि आश्रम । त्यात मुख्य असे संयम ।
विकासाचा वाढता क्रम । त्यागबुद्धीच्या ॥४८॥
गृहस्थासि संतान झाले । उपभोगाचे पारणे फिटले ।
पुढे संस्कार बळावले । त्यागवृत्तीचे ॥४९॥
आपुली असली-नसली हौस । वाहे मंद सावकाश ।
सुख व्हावे पुत्ररत्नास । वाटे पित्यासि ॥५०॥
आपणासि आवडे घास । तो राखूनि देई तयास ।
दुसऱ्याच्या सुखार्थ भोगी त्रास । हे शिक्षण गृहधर्मी ॥५१॥
त्याच्या गुणात आपुले भूषण । त्याच्या कीर्तीत समाधान ।
तो वाईट होता दूषण । लागेल आम्हा ॥५२॥
ऐसी धरोनि दूरदृष्टी । व्हावे लागे त्यासाठी कष्टी ।
प्रसंग पडता उठाउठी । धावूनि झेली स्वत:वरि ॥५३॥
परि आपुल्या पुत्राकारणे । कोणावरि अन्याय न करणे ।
आपुल्याऐसीच समजणे । मुले सर्वांचि ॥५४॥
सर्वांकरिताच झटावे । ऐसे व्यापकपण साधावे ।
हेच गृहस्थाश्रमी शिकावे । लागे तत्त्व ॥५५॥
पुत्रावरि दया करी । तीच दासदासीवरि ।
पंक्तिप्रपंच नाही अंतरी । तोचि धन्य गृहधर्म ! ॥५६॥
पुत्र शिकूनि मोठा झाला । एक होता दुसराहि जन्माला ।
तिसरा होताचि संसार संपला । पाहिजे पित्याचा ॥५७॥

न संपता मग यातना । भोगाव्या लागताति नाना ।
वानप्रस्थाश्रम म्हणोनिच जाणा । योजिला धर्मसंस्कारे ॥५८॥
ऐसे जयाने साधले । त्यासीच 'पुरुष' म्हणणे शोभले ।
एरव्ही ते विषयी झाले । गधे, घोडे, वानर ॥५९॥
मी तो ऐसे नवल पाहिले । एकाने चाळीस विवाह केले ।
त्यास साठ पुत्र झाले । ते राहिले शेतावरि ॥६०॥
एका शेतावरि एक पत्नी । चिमण्या हाकली महाराणी ।
लग्न म्हणजे आमदानी । जंगली जेठांची ॥६१॥
असा हा संसाराचा तमाशा । वारे ! संसाराची आशा ।
सगळ्या आयुष्याची दुर्दशा । वासनेपायी ॥६२॥
काही दोनचार स्त्रिया करिती । आयुष्य सर्वांचे नागविती ।
ही तो आहे पशुवृत्ति । गृहस्थाश्रम म्हणो नये ॥६३॥
पुरुषा बहुपत्नींचा अधिकार । स्त्रियांनी कां न करावे चार ? ।
हा दुर्गतीचाचि विचार । दोघांचाहि ॥६४॥
एका स्त्रियेसि दहा पती । अजूनहि कोठे असे ही रीति ।
त्या माऊलीची कोण गति । देव जाणे ॥६५॥
हा सर्व अज्ञानाचा पसारा । वाढवाल तेवढा वाढे भारा ।
म्हणोनि आळा या विकारा । घातलाचि पाहिजे ॥६६॥
एकदा एक पत्नी केली । पुढे पत्नीची भाषाचि संपली ।
तरीच दोघांनाहि लाभली । शांति संसारी ॥६७॥
संसार सदाचाच अपूर्ण । विकारी नसे समाधान ।
ऐसी गाठी बांधोनि खूण । विचारे सुख साधावे ॥६८॥
दोघांचे व्हावे एक मन । तेथेचि नांदे स्वर्ग पूर्ण ।
होता आदर्श एक संतान । पांग फेडील देशाचा ॥६९॥
यावरि श्रोती विचारिले । संतानासाठी लग्न नेमिले ।
परि एका स्त्रियेसि संतान न झाले । म्हणूनि केले दुजे लग्न ॥७०॥
त्यासि निषेधिले आपण । आता सांगा न होता संतान ।
कैसे फिटू शकेल ऋण । देशाचे आणि वडिलांचे? ॥७१॥
लग्न केलियाहि वरि । पुत्र न होता उदरी ।
म्हणती त्यास अधोगति सारी । प्राप्त होते ॥७२॥



याचे उत्तर यथार्थ ऐका । हा समजचि वेड्यासारखा ।
सेवेने, ज्ञानाने मुक्तिसुखा । प्राप्त होतो कोणीहि ॥७३॥
पुत्र न होताचि एक । संन्यासी ब्रह्मचारी कित्येक ।
तरले ऋषिमुनि, संत देख । बुडाली अनेक श्वानसूकरे ॥७४॥
'निपुत्रिकास अधोगति' । ऐसे जे ग्रंथवेत्ते म्हणती ।
त्यांच्या म्हणण्याची निष्पत्ति । दुसरी होती ॥७५॥
भारती ऐसा काळ आला । संन्यास देती ज्याला त्याला ।
महत्त्व न द्यावे लग्नकार्याला । ऐसे झाले ॥७६॥
ज्याने त्याने तप करावे । ऐसे धरले बहुतांच्या जीवे ।
म्हणोनि हे बंधन घालावे । लागले ग्रंथकर्त्या ॥७७॥
पुत्र व्हावा कुल – उद्धारी । एरव्ही ती वांझचि बरी ।
ऐसेहि बोलिले निर्धारी । ग्रंथामाजी ॥७८॥
यातूनि हाच निघे सार । समाजधारणेसाठी संसार ।
पुत्र नसताहि होतो उद्धार । प्रयत्नशील गृहस्थाचा ॥७९॥
समाजाच्या उन्नतीचे सूत्र । खंडू न द्यावे सर्वत्र ।
यासि पूरक तोच योग्य पुत्र । बाधक तरि ती अधोगति ॥८०॥
'पापपुण्य आपुले आपणा । पुत्र बंधु न तारी कोणा' ।
ही ग्रंथाची सत्य घोषणा । विसरू नये कोणीहि ॥८१॥
एक पुत्र जरी नसला । सर्व पुत्र आपुलेचि म्हणाला ।
सर्वांच्याहि उपयोग आला । तरि झाला उद्धार त्याचा ॥८२॥
असेल मुलासाठी धन । करावे सत्कार्यासि अर्पण ।
यात भावना ठेवू नये भिन्न । तरीच पावे सद्‌गति ॥८३॥
आपुले घरचि नव्हे घर । विश्व आपुले मकान सुंदर ।
हेचि शिकावया असे संसार । उद्धार तो याच मार्गे ॥८४॥
ऐसा करावा पूर्ण विचार । दोघांनी आपुले शोधोनि अंतर ।
दूरदृष्टीचा साधावा व्यवहार । पुत्र असले, नसले तरी ॥८५॥
मन काढावे घरातूनि । पुत्रास जबाबदारी समजावोनि ।
पुत्र नसता गावास अर्पूनि । देशाटनी निघावे ॥८६॥
निघावे पत्नीस घेऊनि । जी धर्मअर्थकामी सांगातिणी ।
ती जरि साथ न दे मोक्षसाधनी । पुत्राजवळी राहू द्यावे ॥८७॥

पत्नी जरी देई सहयोग । तरी जीवनी वर्जावा भोग ।
दोघांनीहि अंगी बाणवावा त्याग । निश्चयाने त्यापुढे ॥८८॥
कार्य संपले संसाराचे । पुढील जीवन वानप्रस्थाचे ।
मिळोनि तपाचे सद्वर्तनाचे । धडे पाळावे दोघांनी ॥८९॥
पाहावी विशाल स्थाने, मंदिरे । तीर्थे, वने, मुनि – कुटीरे ।
अनासक्त व्हावया मने शरीरे । चित्त लावावे सत्कार्यी ॥९०॥
सेवाकार्यासि वाहून घ्यावे । अध्यात्मभावा अनुभवीत जावे ।
आणिकासहि धडे द्यावे । शिकवावा सेवाभाव ॥९१॥
सेवेसाठी घ्यावी दीक्षा । न्यावी लया गावाची अवदशा ।
काम करावे भरुनि हर्षा । सर्वांसाठी अंतरी ॥९२॥
शिक्षणसंस्था, आश्रमसंस्था । सत्संगसंस्था, परमार्थसंस्था ।
यांची करावी सर्व व्यवस्था । शांतीसाठी ॥९३॥
अंध, पंगु, महारोगी । अनाथ आणि वृद्ध जगी ।
आश्रम चालवावे जागजागी । त्यांच्या सेवेचे ॥९४॥
गृहस्थांना वेळ न फावे । म्हणोनि वानप्रस्थे लक्ष द्यावे ।
मुलाबाळांसि संगोपावे । ब्रह्मचारी रक्षूनि ॥९५॥
द्यावे जीवनाचे शिक्षण । जेणे कार्यकर्ते निघतील पूर्ण ।
सर्वांगीण उन्नतीचे ज्ञान । द्यावे तया आश्रमस्थानी ॥९६॥
हे कार्य वानप्रस्थाने करावे । घरादारांचे बंध तोडावे ।
अनासक्तीने वागावे । सेवेसाठी सर्वांच्या ॥९७॥
नुरता संसारात वासना । वैराग्य येते सहज वर्तना ।
उरले ते हेचि कार्य जाणा । शिक्षण द्यावे सर्वांसि ॥९८॥
ग्रामसेवाचि देशसेवा । देशसेवाचि ईश्वरसेवा ।
हेचि अनुभवावया जीवभावा । वानप्रस्थ आश्रम ॥९९॥
तिसरा वानप्रस्थ आश्रम । हा संन्यासाचा उपक्रम ।
व्हावया वासनेचा उपशम । अंतरामाजी ॥१००॥
पुढे आहे संन्यासधर्म । वानप्रस्थाचा तोडण्यासि भ्रम ।
अनुभवूनि आत्माराम । वृत्ति उपराम कराया ॥१०१॥
जेव्हा घरातूनि मन निघाले । सर्वदेशी होऊनि सेवे लागले ।
संन्यासवृत्तीने क्रमे साधले । परमात्म्य अंगी ॥१०२॥



संन्यासी शिकवी वानप्रस्थासि । शेवटी स्थितप्रज्ञता कैसी ।
प्राण गेल्याहि आसक्तीसि । स्पर्श मुळी होईना ॥१०३॥
वानप्रस्थी संसार त्यागला । संन्यस्तीस्वरूपी योग झाला ।
परम रस वृत्तीने चाखला । धागाचि खुंटला आसक्तीचा ॥१०४॥
कळला आत्मा – परमात्मा सकळ । जीव – ब्रह्म कैवल्यकेवळ ।
प्रज्ञावृत्ति होय निश्चळ । स्वरूपामाजी ॥१०५॥
ही स्थितप्रज्ञता अंगी मुरली । त्यासि जीवन्मुक्ति लाभली ।
याचि देही त्याने साधली । पूर्ण सफलता जीवनाची ॥१०६॥
तो सकळा झाला स्फूर्तिदायक । निःस्पृहतेने मार्गदर्शक ।
जीवनदृष्टि देई सम्यक । सर्व जगाला ॥१०७॥
हेचि सत्य – धर्माचे ध्येय । हेचि सर्व कर्माचे श्रेय ।
सर्व ग्रंथांचे हेचि तात्पर्य । तुकड्या म्हणे ॥१०८॥
इतिश्री ग्रामगीता ग्रंथ । गुरुशास्त्र – स्वानुभव – संमत ।
तिन्ही आश्रम – निरूपिले येथ । तिसरा अध्याय संपूर्ण ॥१०९॥


॥ सद्गुरुनाथ महाराज की जय ॥

## ॥ अभंग ॥

आमची माळियाची जात । शेत लावू बागाईत ॥
आम्हा हाती मोट–नाडा । पाणी जाते फुलझाडा ॥
शांती–शेवंती फुलली । प्रेम–जाईजुई व्याली ॥
सावताने केला मळा । विठ्ठल देखियला डोळा ॥

– श्रीसंत सावता महाराज

## ॥ चित्र परिचय ॥



### अ. ४ – स्वामी वासुदेवानंद सरस्वती

ऐसा संन्यास सर्वांनी घ्यावा । आधी आपुला प्रपंच सावरावा ।
मुरलिया फळापरी सुखवावा । समाज मग ॥६०॥

अलीकडेच होऊन गेलेले वानप्रस्थ व संन्यास–आश्रमाचे आदर्शभूत संत श्री टेंबेस्वामी कडकडीत दीक्षेची जणू प्रतिमाच, पण संपूर्ण भारतात फिरून उपदेशाबरोबरच रोगपीडितांना अप्रतिम औषधे देण्याचेही ते सेवाकार्य करीत.



• अध्याय चौथा •

# संसार–परमार्थ

॥ श्रीगुरुदेवाय नमः ॥

मागे झाले निरूपण ! चार आश्रमांचे वर्णन ।
त्यांतील तत्त्व आहे सनातन । सर्वांसाठी ॥१॥
त्यांची करू जाता योजना । उत्तम चाले समाजधारणा ।
ऐहिक उत्कर्ष, अध्यात्मसाधना । सर्वांसि साधे ॥२॥
व्यक्तीचीहि पूर्ण उन्नति । समाजाची उत्तम स्थिती ।
आश्रमधर्मी साधे निश्चिती । आजहि सर्व ॥३॥
लहानपणी ब्रह्मचर्य पाळावे । गुरुघरी विद्यार्जन करावे ।
पुढे लग्न करोनि निभवावे । पुत्रपौत्रां ॥४॥
ब्रह्मचर्ये घ्यावी धर्मसंथा । गृहस्थे साधावी अर्थव्यवस्था ।
काम जिंकणे वानप्रस्था । मुक्त व्हावया ॥५॥
पुत्र कामकाजी लागले । की वैराग्य घ्यावे आपण भले ।
सेवासाधनार्थ सोडिले । पाहिजे घर ॥६॥
करावी ग्रामसेवा, ज्ञानसेवा । वानप्रस्थवृत्ति बाणवूनि जीवा ।
आणि मोक्षासाठी साधावा । संन्यासभाव ॥७॥
संन्यासी सर्वांसीच होणे आहे । त्याविण मोक्षाची नाही सोय ।
मोक्षावाचूनि तरणोपाय । दुसरा कोठे ? ॥८॥
वासना हाचि भवसागर । आसक्ति हाचि खरा संसार ।
ज्ञाने त्यांचा पावणे पार । हाचि मोक्ष ॥९॥
झाला वासनेचा नाश । त्यासीच नाम असे संन्यास ।
मग त्याचे सर्व करणे निर्विष । आदर्श लोकी ॥१०॥
मुक्त तो वासनेतूनि मोकळा । कोठे नाही आसक्तीचा ळळा ।
ओळखोनि आत्मस्वरूपी सकळा । विलीन होई ॥११॥
हीच जगाची अंतिम धारणा । कर्म कराया निर्मळ बाणा ।
यातचि वसते उपासना । उद्धाराची ॥१२॥

ही भूमिका ज्यासि गवसली । त्याची कर्मे योगरूप झाली ।
ही संन्यासदशा साधिली । पाहिजे सर्वांनी ॥१३॥
चौथा आश्रम वृद्धपण । ऐसे असले जरी वचन ।
तरी या आत्मविकासासि बंधन । लागू नसेचि वयाचे ॥१४॥
हे सर्व काही वृत्तीवरी । वृत्तीच करावी लागे सुसंस्कारी ।
बाह्य दीक्षा सहायकारी । म्हणोनि वर्णिली धर्मग्रंथी ॥१५॥
कल्पिले आयुष्याचे चार भाग । भोगातूनि साधाया त्याग ।
परि आज शतवर्षाचे आयुष्य अव्यंग । कोणास लाभे? ॥१६॥
म्हणोनि प्रथा न पाहता दीक्षांची । तत्त्वे चारहि आश्रमांची ।
आचरावी जीवनी साची । तातडीने सर्वांनी ॥१७॥
मात्र ज्या क्षणी वैराग्य आले । तेव्हाचि घर सोडूनि पळाले ।
ऐसेहि नाही पाहिजे केले । वेड्यापरी ॥१८॥
कोणी वैराग्य येता घर सोडती । तीर्थाटनी भटकाया जाती ।
जीवन दुसऱ्यावरि जगविती । भीक मागती दारोदारी ॥१९॥
पुन्हा वाढती क्रोध, कामभाव । भोगूनि दुःख, पाहूनि गौरव ।
संसाराचा पुन्हा प्रभाव । पडे त्यावरी ॥२०॥
यासाठी दीक्षासंस्कारे घेणे । उचित जीवाच्या प्रगतीकारणे ।
परि बहिरंग दीक्षेचे सोंग धरणे । व्यर्थचि आहे ॥२१॥
माझा विश्वास आहे संस्कारावरी । परि व्यवस्था लागते तैशापरी ।
नाहीपेक्षा उपेक्षाचि बरी । ऐशा दीक्षेची ॥२२॥
मग ती असो आश्रमदीक्षा । संप्रदायदीक्षा, गुरुदीक्षा ।
व्रतदीक्षा वा कार्यदीक्षा । धर्मदीक्षेसहित ॥२३॥
दीक्षेने मन तयार होते । परि कर्म पाहिजे नित्य केले ते ।
आचाराविण फजिती होते । दीक्षितांची ॥२४॥
एकादशीची घेतली दीक्षा । भोजन करी मागोनि भिक्षा ।
लोक पाहूनि हा तमाशा । हासती वेडा म्हणूनिया ॥२५॥
दीक्षा घेतली व्रतबंधाची । नाही संध्या नित्यनेमाची ।
काय करावी संस्काराची । व्यवस्था तेथे ? ॥२६॥
ब्रह्मचर्याची दीक्षा घेतली । संयमदृष्टीच बिघडली ।
तैसीच गृहस्थाश्रमाची झाली । उलटी रीति ॥२७॥



आश्रमपण निघानि गेले । तमाशाचे भाव वाढले ।
तत्त्वाविण सामर्थ्य कुठले । दीक्षेमाजी ? ॥२८॥
वानप्रस्थ म्हणोनि घर सोडले । बाहेर व्यापार करू लागले ।
संन्यासी मानासाठी झगडले । तरि ते व्यर्थ ॥२९॥
घातली भगवी वस्त्रे अंगावरी । परि क्रोध भरला अंतरी, बाहेरी ।
लंगोटीसाठी झगडा करी । यजमानापाशी ॥३०॥
चुंगी मागूनि धन जमवी । झोपडी बांधूनि वैभवे सजवी ।
राख फासूनि संन्यासी म्हणवी । दासचि तो संसाराचा ॥३१॥
न सुटे झोपडीचा अभिमान । मांजरी-श्वानावरि प्रेम पूर्ण ।
वेळ न फावे ब्रह्मज्ञान । सांगावया, अनुभवावया ॥३२॥
ही कसली आहे दीक्षा । नाही सेवा, नाही तितिक्षा ।
पशू जैसे शोधती भक्ष्या । मागती भिक्षा चैनीसाठी ॥३३॥
जी दीक्षा जयाने घ्यावी । त्याने ती पथ्ये सांभाळावी ।
वृत्ति वाकडी होऊ न द्यावी । वाईट कर्मी ॥३४॥
नाहीपेक्षा ऐसेचि जगावे । काम करोनि न्याये वागावे ।
नाव बदनाम होऊ न द्यावे । दीक्षा घेऊनि कोणती ॥३५॥
सुखे करावा संसार । साधेल तैसा परोपकार ।
चारहि आश्रमांचा सार । आचरणी आणावा ॥३६॥
बायकामुलांची चिंता लागली । म्हणोनि वैराग्याची दीक्षा घेतली ।
ते वैराग्य नव्हे, कुचराई केली । सोंग घेवोनि वैराग्याचे ॥३७॥
एका साधकास वैराग्य आले । त्याने घरादार सोडूनि दिले ।
लंगोटी लावूनि स्नान केले । अरण्यामाजी ॥३८॥
रोजरोज स्नान करी । लंगोटी सुकवी झाडावरी ।
तेथे उंदीर जाऊनि कातरी । लंगोटी त्याची ॥३९॥
तो लंगोटी मागाया गावी जाय । म्हणे काय करावा उपाय ? ।
लंगोटी आमुची खाऊनि जाय । उंदीरराजा ॥४०॥
लोकांनी वैराग्यास सुचविले । तेथे पाळा मांजरीची पिले ।
म्हणजे लंगोटी राखाया झाले । सेवकचि ते ॥४१॥
घेतले वैराग्याने मना । आणले मांजरीच्या धना ।
मग त्यांच्या खाण्याची विवंचना । लागली मागे ॥४२॥

लोक म्हणती गायी पाळा । म्हणजे त्यांचा निर्वाह सगळा ।
आपणासहि मिळेल गोळा । दहीदूधलोण्याचा सात्विक ॥४३॥
तेहि त्याच्या मना आले । लोकांसि मागूनि गोधन केले ।
पुढे चाऱ्याचि चिंता चाले । मनी त्याच्या ॥४४॥
चाऱ्या-गवताची मागे भीक । लोक म्हणती बाबा ! हे दुःख ।
करा तेथेचि शेती आणिक । थोडीबहू ॥४५॥
तेहि पटले त्याचे चित्ती । मिळविली मनमाने शेती ।
राबविली गडीमाणसे, पूर्ति । करावया तिची ॥४६॥
अधिकाअधिक तेचि केले । धनधान्य जमा झाले ।
सांभाळायाचे कोडे पडले । मनामाजी ॥४७॥
कोण मिळेल ईमानदार । नसावा ऐदी अथवा चोर ।
आपला म्हणोनि करील व्यवहार । ऐसा कोण शोधावा ? ॥४८॥
लोक म्हणती कोणी ठरवावे? । बुवा म्हणे लग्नचि करावे ।
म्हणजे होईल आता बरवे । धना, मना सांभाळाया ॥४९॥
बिचाऱ्याचे वैराग्य गेले । पुन्हा संसारबंधन गळी पडले ।
याचे कारण संस्कार पालटले । नव्हते पूर्वीहि ॥५०॥
म्हणोनि म्हणतो वैराग्यासाठी । घर सोडणे नको उठाउठी ।
त्यासाठी पाहिजे बुद्धि गोमटी । सेवाभावना, त्यागवृत्ति ॥५१॥
आपुले घर सोडूनि द्यावे । गावचि घर समजोनि राहावे ।
सर्व गावाचे काम करावे । देवसेवा म्हणूनि ॥५२॥
मनी ठेवावे ईश्वरभजन । काम करावे गावाचे पूर्ण ।
फुकाचे न करावे भोजन । वैराग्याने कधीहि ॥५३॥
वैरागी अथवा संन्यासी । बाह्य त्यागचि नको त्यासि ।
त्यागवृत्तीने गृहस्थासी । वैराग्य साधे संसारी ॥५४॥
वैराग्य म्हणजे आसक्तित्याग । संग्रहत्याग, उपभोगत्याग ।
लागावी अंगी कार्याची आग । ग्रामसेवा करावया ॥५५॥
आपुल्या मुलासारखीच सर्व मुले । होवोत ऐसे मनी आणिले ।
त्यांच्या जोपासनेचे व्रत घेतले । तोचि विरागी म्हणावा ॥५६॥
आपल्या अंगी असो फाटके । परि गावलोक राहोत नेटके ।
हे साधावया जो कवतुके । कार्य करी जोमाने ॥५७॥



त्यासीच म्हणावे वैरागी । जो सर्व लोभांचा परित्यागी ।
सेवेसाठी कष्ट घे अंगी । नेहमीच लोकांच्या ॥५८॥
अनेक साधिती स्वावलंबन । दानी दुसऱ्यास पुरवी धन ।
जो सर्वस्व आपुले दे अर्पोन । तोचि संन्यासी म्हणावा ॥५९॥
ऐसा संन्यास सर्वांनी घ्यावा । आधी आपुला प्रपंच सावरावा ।
मुरलिया फळापरी सुखवावा । समाज मग ॥६०॥
काही मुलांनाच संन्यास देती । त्यांची असते कोवळी स्थिती ।
ते जंव भर वयात येती । पापे करिती मनमाने ॥६१॥
संन्यास घेतलिया स्वये । मग लग्नहि करिता न ये ।
मग शोधती नाना उपाय । उपद्रव बनतो गावाचा ॥६२॥
संन्याशाने संन्यास द्यावा । गावकऱ्यांनी जाच सोसावा ।
ऐसा बुद्धिहीनपणा कां करावा । समाजाने ? ॥६३॥
म्हणोनि हे चूकचि आहे । तो संन्यास संन्यासचि नोहे ।
वानप्रस्थचि संन्यासी राहे । धोका न होय मुलांऐसा ॥६४॥
संन्यास म्हणजे थकता काळ । आत्मचिंतनी जावा वेळ ।
आशीर्वाद मिळावा सकळ । जनलोकांसि ॥६५॥
परि ज्यांनी कष्टचि नाही केले । गृहस्थी जीवन नाही अनुभविले ।
ते संन्यासी म्हणती झाले । आश्चर्य वाटे ! ॥६६॥
ही घडी जेव्हापासूनि चुकली । ग्रामाग्रामाची फजिती झाली ।
प्रजा सर्व भिके लागली । गृहस्थाश्रमाची ॥६७॥
झुंडच्या झुंड मुले नेती । कोणी बैरागी, संन्यासी करिती ।
आणि मग बोके होऊन फिरती । लोकांमाजी ॥६८॥
त्यांना नसतो सेवेचा आदर । नसतो कळला काही व्यवहार ।
मनास येईल तो उपकार । करिती लोकी ॥६९॥
म्हणोनि हे पाहिजे बदलले । अल्पवयी न पाहिजे मुंडले ।
त्यास अभ्यासोनीच काढले । पाहिजे आधी ॥७०॥
कोणी असती महासंस्कारी । कोणा उपजत अनुभव-थोरी ।
त्यांनी इच्छेप्रमाणे संसारी । व्हावे, न व्हावे ॥७१॥
त्यांना नसे आडकाठी । परि हे सूत्र नव्हे सर्वांसाठी ।
याने मोडेल परिपाठी । उत्तम गुणांची ॥७२॥

हे संतजनांनी जाणले । म्हणोनीच कळवळोनि सांगितले ।
रांडापोरे सोडू नका बोलिले । परमार्थासाठी ॥७३॥
करावा सुखाने संसार । करावा अतिथींचा सत्कार ।
बांधा सोपे, माडद्या, घर । उत्तम व्यवहारे धन जोडा ॥७४॥
वैराग्य वाढवा त्यातूनि । सेवा, परोपकार साधूनि ।
रंगा सदाचारे भक्तिरंगणी । हाचि राजमार्ग संतांचा ॥७५॥
ऐसेचि संती सांगितले । कितीतरी संत ऐसेचि वागले ।
त्यानेच नाव अमर झाले । तयांचे लोकी ॥७६॥
हे जाणूनि वागावे आपण । गृहस्थाश्रमचि उज्ज्वल करून ।
वैराग्याचे तत्त्व सांभाळून । लोकसेवा साधावी ॥७७॥
सवे घेवोनि आपुली पत्नी । सेवा करिती मिळोनि दोन्ही ।
हेचि आहे वैराग्याची निशाणी । संसारसंग सुटावया ॥७८॥
यातूनचि प्रकटे खरा संन्यास । नाहीतरी अवघा त्रास ।
आपण न तरे, न तारी कोणास । आसक्त नर ॥७९॥
आणि कोणी निरासक्त असला । संन्यास घेवोनि वनी गेला ।
तोहि नाही उपयोगा आला । समाजाच्या ॥८०॥
गृहस्थाश्रमासि नाही जाणले । ज्याने त्याने मनानेच केले ।
यानेच कार्य विस्कळीत झाले । समाजाचे ॥८१॥
गीतेने यथार्थ ज्ञान दिले । परि ते जनमनाने नाही घेतले ।
रूढींच्या प्रवाही वाहू लागले । विसरले सर्वभूतहित ॥८२॥
ब्रह्मचारी अभ्यासचि करी । वानप्रस्थ वनीच विचरी ।
संन्यासी निरासक्तीच्या भरी । विटाळ मानी जगाचा ॥८३॥
ऐसे झाले धोरण आजचे । त्यामुळे ओझे वाढले गृहस्थाश्रमाचे ।
प्रत्येकाने प्रत्येकाचे । पूरकत्व सोडले ॥८४॥
सर्वांनी सर्वचि सोडले । परि गृहस्थाने अधिक जोडले ।
कष्ट करिता करिता मोडले । हाड त्याचे ॥८५॥
सर्वांनाचि मदत करावी । पुन्हा दीनताचि अंगी घ्यावी ।
वरोनि त्यासि म्हणे गोसावी । 'लटका संसार छोड दे' ॥८६॥
हे सर्व सहन करोनि । आपुली हौस, त्रास विसरोनि ।
जगाची राखी लाज देऊनि । धनमानादि ॥८७॥



स्वतः शरीराने राबावे । आपुले जीवन आपण निभवावे ।
अधिकाअधिक देतचि जावे । गावासाठी ॥८८॥
साधु आला, संत आला । राजा आला, रंक आला ।
अतिथि, पाहुणा, भुकेला आला । सर्वांसाठी गृहस्थाश्रम ॥८९॥
करी आलेल्यांचा सत्कार । संत, साधूंचा सन्मान सुंदर ।
सार्वजनिक कामांचाहि बोझा वर । सांभाळितसे प्रेमाने ॥९०॥
आला जातिदंड, राजदंड । तोहि भरतसे उदंड ।
मुंगीपासूनि सर्व ब्रह्मांड । जीवजन त्याचेवरि ॥९१॥
हे सर्व गृहस्थाश्रम करी । मुलेबाळे पोसोनि घरी ।
काटकसरीने उरवूनि, करी । अन्नदान नम्रतेने ॥९२॥
गृहस्थधर्म म्हणजे जबाबदारी । स्त्रीपुत्रांपरीच सर्वतोपरी ।
देश – भेष सांभाळणारी । वृत्ति असे त्याची ॥९३॥
एरव्ही असोत सर्व आश्रम । सर्वांत मोठा गृहस्थधर्म ।
गृहस्थधर्मावरीच योगक्षेम । चालतसे सर्वांचा ॥९४॥
ब्रह्मचर्याची शिक्षा, दीक्षा । वानप्रस्थांची तितिक्षा ।
संन्यासी, ज्ञात्यांची समीक्षा । गृहस्थधर्माच्याचि योगे ॥९५॥
त्यासचि लोक फजूल म्हणती । आणि त्याचेवरीच जगती ।
ही कैसी आहे रीति । संसाराची ! ॥९६॥
म्हणोनि संती गृहस्थ गौरविला । धन्य धन्य म्हणितले त्याला ।
तोचि जगाचा मातापिता ठरला । पालनपोषण करणारा ॥९७॥
त्याचे उपकार एरव्ही फिटेना । एकचि आहे त्याची साधना ।
गृहस्थाचे पुत्र जाणा । शिकवोनि स्थाना बसवावे ॥९८॥
लहानपणीच आश्रमी न्यावी मुले । जैसे विश्वामित्रे राम-लक्ष्मण नेले ।
सांदीपनी, द्रोणांनी शिकविले । तैसे विविध ज्ञान द्यावे ॥९९॥
माधुकरीपुरतेचि गावी न यावे । गावाचे जीवन सुधारावे ।
घृणा करिता नरकी जावे । लागेल अहंकारे ॥१००॥
जोवरि हवे आहे शरीर । आवश्यक वाटे अन्नवस्त्र ।
तोवरि न म्हणावा मिथ्या संसार । सेवा करावी सर्वांनी ॥१०१॥
गुरु म्हणोनि न गुरगुरावे । आत्मवत् सर्वांसि जाणावे ।
उठण्या-बसण्यापासूनि शिकवावे । आईसारिखे अज्ञ जना ॥१०२॥

आपापले कार्य सर्वांनी करावे । परस्परांना पूरक व्हावे ।
म्हणजे जगाचे ओझे जावे । झेलले सहज ॥१०३॥
आश्रमांनी मुले शिकवावी । गृहस्थांनी मदत पुरवावी ।
मुले वाढता पित्याने घ्यावी । परवानगी पुत्रांची ॥१०४॥
जावे देशपर्यटनी । अथवा राहावे ग्रामसुधारणी ।
पुढे संन्यासीहि होऊनि । सेवाभावेचि वागावे ॥१०५॥
आपले पोट सर्वांनी भरावे । वृत्तीसि कार्ये वाढवीत न्यावे ।
म्हणजे गृहस्थावरि अवलंबावे । ऐसे नव्हे ॥१०६॥
आपापले कार्य सांभाळावे । जीवमात्रासि संतुष्ट करावे ।
कोणीच कोणावरि न राहावे । विसंबोनि ॥१०७॥
मग पुढे सर्वचि आहे सेवा । कार्य करावे जीवाभावा ।
उरला असेल तो सगळा ठेवा । वाटून द्यावा गावासि ॥१०८॥
कोणा काय देतो सेवाधन । आपुले कार्य सांभाळून ।
यावरीच खरे महिमान । लौकिकांचे आपुल्या ॥१०९॥
ऐसी आहे परंपरा । जेणे चाले जगाचा पसारा ।
वेगवेगळ्या कामांचा बटवारा । सारखाचि व्हावा ॥११०॥
येथे सर्वांसीच काम करणे । कोणीच उत्तम, कनिष्ठ न म्हणे ।
सर्व मिळोनि जग सजविणे । आपुल्यापरी ॥१११॥
मानावे सकलांचे आभार । करावा परस्परांसि पूरक व्यवहार ।
असो संन्यासी वा गृहस्थ नर । सारखा अधिकार सर्वांचा ॥११२॥
गृहस्थ तनुमनाने कष्ट करिती । संन्यासी त्यांना दिशा दाविती ।
मग कां उगेचि पाया पडती । एक – एकाच्या? ॥११३॥
मला हे काही समजेना । कोणाचे उपकार आहेत कोणा? ।
सर्वचि आपापुल्या स्थाना । धन्य असती ॥११४॥
पुत्रधर्म पाळता पुत्र श्रेष्ठ । पितृधर्म पाळता पिता वरिष्ठ ।
तेथे म्हणावे श्रेष्ठ, कनिष्ठ । कोणी कोणा? ॥११५॥
पाया तयानेच पडावे । ज्याने आपुल्या कर्मासि चुकावे ।
नाहीतरि प्रेम ठेवावे । परस्परांचे दोघांनी ॥११६॥
कोणी कोणासि न लेखावे हीन । तो असे सर्वेश्वराचा अपमान ।
अभिमानी संन्याशाहूनि महान । ठरे लीन पतिव्रता ॥११७॥



एरव्ही कोणाचाहि आदर । सर्वांनी करावा होऊनि नम्र ।
हा तव आश्रमधर्माचा सार । अहंकार नसावा ॥११८॥
हीनतेची भावनाहि नसावी । निष्ठेने सत्कार्ये करावी ।
सहकार्य द्यावे आपुल्या गावी । गृहस्थाने ॥११९॥
आपुला साधावा गृहस्थाश्रम । पाळावा ग्रामसेवाधर्म ।
गावाकरिताच आपुला नेम । सांभाळावा ॥१२०॥
कष्ट करोनि धन जोडावे । ते धन सत्कार्यीच लावावे ।
कधीहि निरर्थक न वेचावे । छंदी कुणाच्या लागूनि ॥१२१॥
याचे मिळावया शिक्षण । व्हावे गावोगावी कथा, प्रवचन ।
वाढवावा गृहस्थाश्रमाचा मान । नीटनेटका करावया ॥१२२॥
नेटका ऐसा प्रपंच झाला । तरी परमार्थ त्यातचि साधला ।
हा समन्वय संती सांगितला । तोचि खरा ग्रामधर्म ॥१२३॥
आमुचा गृहसंसारचि सार । आहे सहकार्याचे भांडार ।
सर्व मिळोनि उजळु सुंदर । ग्रामधर्म आपुला ॥१२४॥
ग्रामधर्माचे महत्त्व थोर । त्यात गृहस्थधर्माचा मोठा अधिकार ।
महातीर्थांचे तीर्थ सुंदर । तुकड्या म्हणे ॥१२५॥
इतिश्री ग्रामगीता ग्रंथ । गुरु-शास्त्र-स्वानुभव-संमत ।
निरूपिला संसारात परमार्थ । चौथा अध्याय संपूर्ण ॥१२६॥


॥ सद्गुरुनाथ महाराज की जय ॥

**॥ श्लोक ॥**

नको होउ तू, लोकनिंदेश पात्र । नको लोक निंदा करू, हो सुपात्र ।
नमी सर्वभूतांसि, हो लीन चित्ता । त्वरे आदरे तू, स्मरे नित्य दत्ता ॥

**– श्रीस्वामी वासुदेवानंद सरस्वती**

## ।। चित्र परिचय ।।



### अ. ५ – श्रीमत् स्वामी रामतीर्थ

लोकशिक्षण, न्यायरक्षण । जनांचे पोषण आणि श्रमदान ।
यासाठी जे जे करिती प्रयत्न । त्यांना साधेल वर्णाश्रम ।।

पंजाबमध्ये प्रोफेसर होऊन व आदर्श गृहस्थाश्रमानंतर विद्वत्संन्यास घेऊन जपानादी देशांना प्रभावी उपदेश देऊन गेलेले आधुनिक संत. ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व शुद्र या चारही वर्णाच्या तात्विकतेला महत्त्व देऊन सर्वांना ग्रामसेवेस प्रवृत्त करण्याचे महत्कार्यही त्यांनी नव्या दृष्टीने आपल्या वाङमयाद्वारे केले.



• अध्याय पाचवा •

# वर्ण–व्यवस्था

।। श्रीगुरुदेवाय नमः ।।

साधावया पुरुषार्थ परम । आचरावया मानवधर्म ।
निवेदिले चार आश्रम । गृहस्थाश्रम मुख्य त्यात ।।१।।
गृहस्थाश्रमीच समाज बहुतेक । त्याच्या गरजा असती अनेक ।
आणि प्रकृतीनेहि लोक । भिन्न भिन्न ।।२।।
जरी मानव दिसती समान । दोन हात, पाय, डोळे, कान ।
तरी स्वभावाचे भिन्नपण । ओळखू येते ।।३।।
स्वरूपाची धारणा वेगळी । जी विचारे भरली सगळी ।
संस्कार खेळती चेंडूफळी । वेगळाले ।।४।।
एक शांत, एक उग्र । एक चंचल, एक एकाग्र ।
कोणे निवडावी समग्र । गुणकर्मे ती ।।५।।
मग मानव कैसा म्हणावा एक । अधिकारहि न दिसे सम्यक ।
त्याचे जीवनहि भिन्नतेचे निदर्शक । स्वभावापरी ।।६।।
भिन्न वृत्ति, भिन्न प्रकृति । भिन्न कुटुंबे, भिन्न संगति ।
ती आदळती परस्परांवरती । ज्ञान नाही म्हणोनि ।।७।।
त्यात एक संधि ओळखू येते । स्वभाव साम्य निवडले जाते ।
राजस, तामस, सात्त्विक दिसते । प्रकृति वेगळाली ।।८।।
स्वभावाचे तीनचि प्रकार । त्यात बसती सर्व प्राणीमात्र ।
जितुके म्हणोनि विषमयंत्र । या जगी जीव कोटीचे ।।९।।
ज्याचे अंगी जो मुख्य गुण । त्यापरीच त्याचे सारे वर्तन ।
प्रत्येकाचे कर्म भिन्न । एकमेकांपासूनि ।।१०।।
प्रत्येक भिन्न दिशेस जाई । तरि समाज कैसा सुदृढ राही? ।
मग कैसी उन्नति होई । व्यक्तीची आणि देशाची? ।।११।।
हे धर्मवेत्त्यांनी जाणले । गुणकर्मविभाग ध्यानी घेतले ।
परस्परांसि पूरक बनविले । समाजव्यवस्थेकारणे ।।१२।।

सत्वप्रधान, रजप्रधान । मिश्रित आणि तमप्रधान ।
शुद्धाशुद्ध लक्षूनि गुण । विभाग चार नेमिले ॥१३॥
निसर्गावरि केली रचना । म्हणोनि म्हणती ईश्वरी योजना ।
कल्पिले बुध्दि-बाहु-उदर-चरणा । समाजपुरुषाच्या ॥१४॥
मुळात सर्वचि एकसम आहे । परि अनंत गुण व्यापले राहे ।
गुण गुणासि पोषक होय । यासीच संसार बोलती ॥१५॥
धंदे असती अनेक गुणांचे । परि मुख्य भेद चारचि त्यांचे ।
म्हणोनि 'चातुर्वर्ण्य' नाव याचे । ठेविले ऋषिजनी ॥१६॥
संरक्षण देती ते क्षत्रिय । व्यापार करिती ते वैश्य निर्भय ।
न्यायदर्शन योजनाकार्य । ब्राह्मणवर्णा नेमिले ॥१७॥
या तिन्ही कामी अनधिकारी । तया शूद्र नाम निर्धारी ।
करी सर्वांची सेवा, चाकरी । तोहि सर्वांसि पूरक ॥१८॥
सत्य, न्याय, अस्तेय, संयम । सर्वांसि सारखाचि नियमधर्म ।
परि आपापले भिन्न कर्म । वाहूनि पूजिती समाजदेवा ॥१९॥
जो ज्यापाशी उत्तम गुण । त्यानेच त्याचे चालावे जीवन ।
समाजाचेहि धारण, पोषण । हीच योजना चातुर्वर्णी ॥२०॥
भिन्न गुणांचा सहकार्य संगम । त्यांत सर्वांचाचि योगक्षेम ।
मग कैसा चाले जीवनसंग्राम ? । वर्गकलह न राहे ॥२१॥
सर्वकाली, सर्वदेशी । नैसर्गिक गुणभिन्नता ऐसी ।
म्हणोनि वर्णाश्रम योजना जगासि । शांतिदायी ॥२२॥
परि हे तत्त्व राहिले मागे । आसक्तीचे जडता धागे ।
आपुला पुत्र शूद्रापरी वागे । तरी त्या गणावे आपुल्या वर्णी ॥२३॥
नजरे आड केले कर्मगुण । जन्मावरोनि चालले वर्ण ।
धंद्यावरोनि जाति भिन्न । वाढल्या लोकी ॥२४॥
त्यातहि ज्ञात्यांनी ठेविले धोरण । कर्मातूनि गुण निर्माण ।
केले संस्कारांची देऊनि घडण । जन्मलेल्यासि त्या वर्णाचे ॥२५॥
पूर्वी त्यासाठी होते संस्कार । शिक्षणक्रम शिकवी व्यवहार ।
मागील ऋषी असती चतुर । समाज व्यवस्था चालवाया ॥२६॥
तयांनी कुटुंबेच संस्थामय केली । बालपणापासून शिकवण दिली ।
परंपराचि तैसी बनविली । प्रयत्नांनी गुणकर्माची ॥२७॥



शेतकऱ्याच्या मुलास शेती । तरवार क्षत्रियपुत्राहाती ।
वैश्याची मुले तराजू धरती । लहानपणापासूनि ॥२८॥
ब्राह्मणाच्या मुला मंत्र, जप । शिकविला जाई आपोआप ।
ऐसा हा परंपरेचा व्याप । चालला होता ॥२९॥
जो जयाने धंदा केला । त्याचा स्वभावचि तो बनला ।
स्वभाव बनता संस्कार जडला । अंगी तयाच्या ॥३०॥
तैसेचि मग त्याचे वर्तन । तैसेचि खेळणे, बोलणे, भोजन ।
अंगे-अंगे जाती बनून । संस्कारसंगे ॥३१॥
परि ही परंपराहि मोडली । सत्तालोभे फूट पाडली ।
लहान थोरांसि भावना वाढली । उपभोगाची ॥३२॥
काही आपत्ति, काही संगति । काही सत्ता, काही प्रकृति ।
यामुळे दुसऱ्यांचे धंदे हाती । घेतले सुखास्तव ॥३३॥
वैश्यधंदा एकाने धरला । व्याजभोगी व्यापारी बनला ।
आपुल्याहि मित्राचा घेतला । मुनाफा त्याने ॥३४॥
त्यात तारतम्यचि न राही । भरमसाट वाढली मुनाफेशाही ।
जनतेचे हित कोण पाही । मिसळून देई माल खोटा ॥३५॥
खोटे बोलणे सहजी घडे । स्वार्थापायी पाप वाढे ।
यास कोणी सांभाळील चोखडे । सत्ता नसता जागरूक ॥३६॥
सहज कोणी त्यास म्हणावे । तरी शत्रुभाव अधिक बळावे ।
मग दोघांचेहि धंदे बरवे । एकाच मार्गी ॥३७॥
गावचे लोक विरुद्ध होती । म्हणती आमुचीच का धर्मे फजिती ? ।
तेही पुढे कामचोर होती । अडवणूक करिती वैश्याची ॥३८॥
सर्वांमध्ये कलह माजे । त्यासि निवारावे क्षात्रतेजे ।
तरि तेहि बिचारे पोटाच्या काजे । धावती स्वैर ॥३९॥
जिकडे पैसा, मान मिळे । तिकडे धावती क्षत्रियबाळे ।
न्याय, नीति कोण सांभाळे ? । झुके पारडे पैशांनी ॥४०॥
चोरी पकडण्या चोर धावले । शिपायी बाणा घेऊनि भले ।
तेणे चोरांना अधिकचि फावले । चोरी करण्या गावाची ॥४१॥
तेथे ब्राह्मणांनी करावे न्यायदान । सर्वांसि ठेवावे सेवापरायण ।
तरि तेहि पाहूनि दान, मान । झाले त्यांचेच साह्यकारी ॥४२॥

पुढे ऐसीच झाली रीति । दंडुकेशहासि क्षत्रिय म्हणती ।
चोर, व्यापारी त्यासि बोलती । लोक वैश्याधिकारी ॥४३॥
बुद्धीने जो फाटाफूट करी । तो ब्राह्मण जाहला निर्धारी ।
ऐसी बिघडली वर्णव्यवस्था पुरी । गावोगावी ॥४४॥
त्यामाजी जो कमजोर ठरला । तो शूद्र म्हणोनि बाहेर काढला ।
अन्नानदशा करोनि सोडला । जीवनकलही ॥४५॥
वर्ण, जातीचे गुणकर्म नाही । मोडून केली नोकरशाही ।
नागविली भावना सर्वही । वर्णाश्रमाची ॥४६॥
अभिमान राहिला वर्णाचा । चुराडा झाला गुणकर्माचा ।
ऐसा घडविला संस्कार गावाचा । घडी काही बसेना ॥४७॥
ऐसे मुळीच पूर्वी नव्हते । परस्परपूरक धंदे सर्व ते ।
सर्वांचेच कल्याण त्यांत होते । समभावनेने ॥४८॥
परि तो सारा वर्णाश्रम । आज होऊनि बसला भ्रम ।
वर्णाश्रमातील नेमिले काम । बहुतेकांनी सोडले ॥४९॥
ब्राह्मण जोडे शिवण्यासि लागला । चांभार तो पुजारी बनला ।
क्षत्रिये नोकरीपेशा धरिला । वैश्याघरी ॥५०॥
वैश्य लढे सैन्यात जाऊन । शूद्र करितो कथा, कीर्तन ।
यासि वर्णसंकर म्हणती जन । करिती मात्र सर्वचि ॥५१॥
परि जाति मागचीच सांगती । कामे मात्र भलतीच करिती ।
तेणे होते अनिश्चिती । समजावया लोकांसि ॥५२॥
वडिलांचा धंदा भिन्न होता । तो मुलांच्या जंव नसे हाता ।
तरि वडिलांचा धंदा मुलाने सांगता । अर्थ काही निघेना ॥५३॥
म्हणोनि जेणे जे काम करावे । त्याच वर्ण – जातीचे म्हणवावे ।
ऐसे तरी असावे बरवे । वर्ण, जाति मानलिया ॥५४॥
ऐसेचि नामाभिधान चालते । आणि सर्व लोक तैसेचि वागते ।
तरी वर्णव्यवस्था भ्रष्ट झाली म्हणते । कोण कैसे ? ॥५५॥
परि जन ऐसे म्हणावया लाजती । कर्मे मात्र विपरीत करिती ।
पूर्वजांचिया नावे जगती । आळशापरी ॥५६॥
जरी झालो कर्मभ्रष्ट । तरी आपण इतरांहूनि श्रेष्ठ ।
ऐशा प्रतिष्ठेसाठी बळकट । धरिली रुढि ॥५७॥



वास्तविक कामाकरिता वर्ण झाले । समाजासि सर्वचि लागले म्हणोनि ।
सर्वांनाचि महत्त्व भले । ब्राह्मणापासोनि महारावरी ॥५८॥
त्यात 'तू नीच, मी उच्च' म्हणोन । वाढविले आडंबर पूर्ण ।
त्यानेच जाहले पतन । वर्णाचे आणि गावाचे ॥५९॥
प्रत्येक धंद्याचे गम्य भिन्न । वेगळी खुराक, वेगळे वळण ।
यासाठीच होते वेगळेपण । रोटीबेटी – व्यवहाराचे ॥६०॥
तेथे अज्ञानाने भेद पाडले । हाती सत्ता ते मोठे ठरले ।
समाजाची स्वच्छता करीत मेले । ते ते बोलिले नीच ऐसे ॥६१॥
वास्तविक नीचता दुराचारे होते । खरी उच्चता तपाने लाभते ।
जातीमातीवरी कैसी ठरते । उच्च – नीचता ? ॥६२॥
ज्याने काही नीचता केली । समाजाने त्यास शिक्षा दिली ।
म्हणोनि अस्पृश्यता बोलली । काही कारणे ॥६३॥
परि त्यांची पीढीच नीच समजावी । आपुली नीचता ती लपवावी ।
दुसऱ्याची उत्तमताहि न गौरवावी । प्रथाच पडली यापरी ॥६४॥
अरे ! हे कुठले न्यायदान ? । हे तो गुलामीचे लक्षण ।
याने कैसे होईल पुनर्निर्माण । गावाचे आमुच्या ? ॥६५॥
म्हणोनि अस्पृश्यता क्रियेवरि मानावी । जाति सर्व एक जाणावी ।
आपापल्या परीने उचलावी । कामे सकळांनी ॥६६॥
जाति सर्वांची एकचि आहे । परि धंदा गुणकर्मासम राहे ।
आपल्या उद्योगाच्या प्रवाहे । ओळखी द्यावी ॥६७॥
एरव्ही सर्वत्रचि सर्व वर्ण । सर्वांतचि दिसती सर्व गुण ।
परि कोणते गुणप्राधान्य । तेचि ओळखावे मुख्यतः ॥६८॥
शूद्राघरी उत्तम वर्तनी जन्मला । तो शूद्रचि कैसा राहिला? ।
तैसा क्षत्रियाघरी भ्रष्ट निपजला । तो क्षत्रिय कैसा? ॥६९॥
एक ब्राह्मण दुकानी बैसला । मांसमच्छी विको लागला ।
त्याची पूजा कराया एक गेला । शोभा देईल काय ते? ॥७०॥
ब्राह्मण म्हणवूनि विलास करी । नाना व्यसने अंगीकारी ।
करी नोकरी, सावकारी । तो ब्राह्मण कां मानावा? ॥७१॥
परंपरेने गोसावी होणे । मग त्याने विवाहाचा थाट करणे ।
ते केवढे होय लाजिरवाणे । लोकांमाजी? ॥७२॥

आचार्य आणि आचारी । एकाच जातीचे अधिकारी ।
म्हणोनि काय आदर एकाचपरी । करावा लोकी निष्ठेने ? ॥७३॥
ऐसे कोणासहि ब्राह्मण म्हणावे । पूजूनि त्याचे पाय वंदावे ।
त्याने जोड्यांच्या दुकानी नोकर कां न व्हावे । पाय पुसाया? ॥७४॥
वास्तविक जातिवंत जे ब्राह्मण । त्यांनी स्वतःच टाळावे हे पूजन ।
म्हणावे माणुसकीनेच नमन । करू या सर्वां ॥७५॥
आपण वेगवेगळा धंदा करणारे । सर्व बरोबरीचे मित्र बरे ।
हे पूजेचे ढोंग सारे । आम्हीच कासया करावे ? ॥७६॥
ऐसे लोकांसि शिकवावे । बिघडले दिसेल ते सुधारावे ।
जनासि उद्योगि बनवावे । आपुल्यापरी ॥७७॥
'जेथे दिसती ब्राह्मणांचे गुण । त्यासि आदरे म्हणावे ब्राह्मण' ।
ऐसा स्थापिलाचि आहे सनातन । नियम वर्णाश्रमाचा ॥७८॥
म्हणोनि गुणांवरचि लक्ष द्यावे । 'जो ज्या गुणी तो त्या वर्णी म्हणावे' ।
सर्व गुणांचा आदर स्वभावे । सर्वांकरिता असावा ॥७९॥
जो जैसा कर्म करू लागला । तो त्याचि वर्णाचा अधिकारी झाला ।
सर्वत्र नियम हा चालला । तरीच होईल सुव्यवस्था ॥८०॥
येथे संशय उभा झाला । विविध कर्मे करावी लागती एकाला ।
तरि काय वेळोवेळी म्हणो त्याला । ब्राह्मण, क्षत्रियादि गुणाऐसे ? ॥८१॥
एक वैश्यकर्मी असला । परि ध्यानासाठी मंदिरी बसला ।
तरि तो वैश्य कसा ठरला । तया स्थानी ? ॥८२॥
एक भंगी काम करी । वेळ मिळताचि ये प्रार्थना मंदिरी ।
त्याचे भंगी नामचि उच्चारी । कोणत्या न्याये ? ॥८३॥
त्या क्षणी तो खराच ब्राह्मण । परि त्याचे नित्य कर्म अन्य ।
म्हणोनि प्रामुख्याने नामाभिधान । धंदे पाहूनि ठेविती ॥८४॥
एकाचे लक्ष्य मुख्यतः व्यापार । परि तो करितो कीर्तन सुंदर ।
म्हणोनि त्यास ब्राह्मण म्हणणे साचार । होईल कैसे ? ॥८५॥
सद्ब्राह्मण शेती करू लागला । म्हणोनि तो माळीच मानला ।
याने येईल क्षणाक्षणाला । अनावस्थाप्रसंग ॥८६॥
बहुरुपी कधी राजे बनती । म्हणोनि काय राज्य चालविती? ।
ज्याची कला त्याचे सांगाती । येरां काय वैभव ते? ॥८७॥



म्हणोनि याची ऐसी आहे रीति । ज्यात ज्याची मुख्य अंतरवृत्ति ।
त्याच्या जीवनाची निश्चिती । दाखवि ते विशेष कर्म ॥८८॥
त्याचे विशेष कर्म कोणते । गुण कोणते, विषय कोणते ।
अंग कोणते, अंतरंग कोणते । ते पाहूनि नाम ठेवावे ॥८९॥
ज्यामध्ये ज्याचे सर्व तनुमन । सर्वस्व ज्याचे ज्यात लवलीन ।
ऐशा प्रमुख गुणांवरून । म्हणावा तो त्या वर्णाचा ॥९०॥
येथे म्हणण्याचेचि नाही महत्त्व । जे जयाचे असेल सर्वस्व ।
त्यापरी त्याचा व्हावा गौरव । समाजामध्ये ॥९१॥
समाजाची रचना नेटकी । बसेल तैसे करावे कौतुकी ।
दीक्षा घ्यावी समजोनि निकी । गुणकर्मांची ॥९२॥
जाणत्यांनी तत्त्वे अभ्यासावी । रूपांतरे व्यवहारी आणावी ।
बिघडली घडी दुरुस्त करावी । समाजाची ॥९३॥
सुखी व्हावा गृहस्थाश्रम । मिटावा जीवनाचा संग्राम ।
सहकार्याने नांदावे ग्राम । यासाठी बुद्धि सर्वां द्यावी ॥९४॥
जेव्हा गुण गुणांशी द्रोह करी । तेव्हा पडे बुद्धि अपुरी ।
हे सांभाळण्याचे कार्य करी । ब्राह्मण्य ते ॥९५॥
गुणासि गुणाचे सहकार्य । मिळोनि व्हावे सफल कार्य ।
हा सृष्टिक्रमाचा व्यवसाय । ब्राम्हण्याकडे ॥९६॥
हे करावया ऐक्य निर्माण । आज पाहिजेत गुणवंत ब्राह्मण ।
ब्राह्मण्यावाचूनि हे साधन । घडेचि ना ॥९७॥
सामुदायिक बुद्धीची शिकवण । सर्व जीवांत समत्त्वस्थापन ।
विषम पात्रांचे समाधान । करून देणे ब्राह्मणकर्म ॥९८॥
ब्राह्मण तो दूरदृष्टी । त्याचे घरचि समष्टी ।
सुरळीत चालण्या होय कष्टी । ब्राह्मण तो ॥९९॥
ब्राह्मण हृदयाचा अति निर्मळ । दुष्टबुद्धीचा महाकाळ ।
हिंसेवाचूनि करी प्रांजळ । मन दुर्जनांचे ॥१००॥
शक्तियुक्तीचा उदार । भक्तिमुक्तीचा आधार ।
सर्वोदयाने संसार । नटवी जो ॥१०१॥
जो सर्वांसि प्रेमे सांभाळी । गावसेवाचि मानी आगळी ।
उणे पडो नेदी कधी काळी । कोण्याप्रकारे ॥१०२॥

त्याचे लक्ष नोहे एरव्ही । जे बिघडले ते नीटचि करवी ।
जुळवा-जुळवीची पैरवी । ब्राह्मणाकडे ॥१०३॥
सर्वांशी सर्वांचे जुळवावे । कीर्तिस्फूर्तीने ग्राम भरावे ।
लौकिक, पारमार्थिक पडो न द्यावे । उणे ग्रामवासियांचे ॥१०४॥
गाव करावे व्यवहार चतुर । त्यात भरावे निर्मळ संस्कार ।
परस्परात निर्मावा सहकार । न्यायनीतीने चालण्या ॥१०५॥
हे शिकवाया थोरांच्या कथा । सांगत जाव्या, मिटाया व्यथा ।
त्याग वाढवावा उचित प्रथा । थोरामोठ्यांच्या दावूनि ॥१०६॥
त्यासाठी कृष्णकथा, रामजन्म । चालवावा महात्म्यांचा पुण्यतिथिक्रम ।
ग्रंथांतरीचा न्यायसंग्राम । शिकवावा निर्भय व्हाया ॥१०७॥
प्रत्येकाचे कर्तव्य सांगोनि । आपुल्या उत्साहे उद्योगी लावोनि ।
करावी ग्रामाची मेळणी । विशाल मार्गे ब्राह्मणे ॥१०८॥
असोनिया गावी ब्राह्मण । पडली तटे, चालले भांडण ।
तरि समजावे तो पावला पतन । गाव मोकाट सुटले हे ॥१०९॥
त्याने आपली निष्ठा सोडली । म्हणोनि लोकांनी हेळसांड केली ।
याचेकडे कां न आली । पुकार लोकांची ? ॥११०॥
जंव ब्राह्मणचि चुको लागले । तव गावचि स्वैराचारी झाले ।
नाना तऱ्हेचे तमाशे माजले । गावामाजी ॥१११॥
लोकश्रद्धेत व्हावया बदल । काय कारण घडले प्रबल ? ।
हे जाणेल तोचि निर्मल । त्यागी, तपस्वी ॥११२॥
प्रभाव ऐसा अंगी यावया । त्याग, यमनियमांची दीक्षा तया ।
पाहिजे, म्हणोनि तपश्चर्या । करावी लागे ब्रह्मकर्म्या ॥११३॥
आबालवृद्धा समजाविण्यासाठी । ओज, तेज असावे पाठी ।
म्हणोनि जप, तप, सद्ग्रंथ कंठी । धारण करावे ब्राह्मणाने ॥११४॥
उपदेश देता रागावू नये । लोभे निर्णय चुकवू नये ।
म्हणोनि सांभाळावा इंद्रियजय । अध्यात्म उपाय त्यासाठी ॥११५॥
आधी त्याग त्याने करावा । तरीच मग लोकांसि शिकवावा ।
याच मार्गे परिणाम पहावा । लोकांमाजी आपैसा ॥११६॥
ही दीक्षा ज्याने घेतली । आपुली भोगवासनाचि निरसली ।
त्यासीच ब्राह्मण संज्ञा मिळाली । वर्णाश्रमाची ॥११७॥



ऐसे गुण जो धरण्यासि चुकला । तो ब्राह्मण म्हणोनि गौरविला ।
तरि व्यर्थचि आहे त्याला । पदवी अजागळापरी ॥११८॥
जातिवेषासि वंदने । हे तो दसऱ्याचेचि सोने ।
फिटले कोणाचे पारणे । रुईफळे खाऊनि ? ॥११९॥
ब्राह्मण मुळी जाति नोहे । ती विशालतेची पदवी आहे ।
हे समजोनि धरावी सोय । ग्रामवासियांनी ॥१२०॥
सर्वांघटी ब्रह्म, ईश्वर । पाहूनि होई सेवातत्पर ।
तोचि ब्राह्मण, सर्वांवर । प्रभाव पाडी नम्रतेचा ॥१२१॥
त्याचे चारित्र्य बघूनि उज्ज्वल । लोभ करिती त्यावरी आबाल ।
सर्वांसीच सांगे विशाल । धर्म मानव जागृतीचा ॥१२२॥
ब्राह्मण असे अस्पृश्यांचा । क्षत्रियांचा, वैश्यादिकांचा ।
कोणाशीच पारखा त्याचा । शब्द नाही ॥१२३॥
त्याने सर्वांचे भले पाहावे । भिन्न गुणांचे लोक जुळवावे ।
आणि गाव चालवूनि संतोषावे । बुद्धि देवोनि ॥१२४॥
उगीचचि लोक ना ऐकती । त्यासि दंड देईल हा ब्रह्ममूर्ति ।
परि ग्रामी वाईट चालीरीती । प्राण गेल्या न ठेवी ॥१२५॥
ब्राह्मणाचे वचन ना ऐके । तो तिन्ही लोकी न टिके ।
याचे कारण हेचि इतुके । ब्राह्मण अनर्थ करीना ॥१२६॥
त्याची हेचि साध्यमुद्रा । शांति लाभावी आब्रह्मशूद्रा ।
ग्रामसुखात सुख लोकेंद्रा । तपस्वियासि ॥१२७॥
म्हणोनि ब्राह्मणवर्ण श्रेष्ठ बोलला । उगीच नाही डांगोरा पिटला ।
भृगुची लाथहि झेलता झाला । देव माझा ॥१२८॥
ऐसे ब्राह्मणत्व निर्माण करा । प्रचारक होऊनि घरोघरी फिरा ।
तरीच सर्वांसि मिळे आसरा । सुखशांतीचा ॥१२९॥
हे ब्राह्मणत्व नव्हे जातीय । कुणीहि साधावे निर्भय ।
जो आदर्श प्रचारक होय । तोचि ब्राह्मण निर्धारे ॥१३०॥
ब्राह्मण सर्वांची सद्बुद्धी । ती करील अन्य गुणांची वृद्धी ।
गावी नांदतील ऋद्धीसिद्धी । गुणकर्मांच्या सहकारे ॥१३१॥
हरिकथानिरूपण, राजकारण । सावधपण, सेवाप्रयत्न ।
हा चारी वर्णांचा सार न्यूनपूर्ण । प्रत्येकाने आचरावा ॥१३२॥

लोकशिक्षण न्यायरक्षण । जनांचे पोषण आणि श्रमदान ।
यासाठी जे जे करितील प्रयत्न । त्यांना साधेल वर्णाश्रम ॥१३३॥
स्वभावे सर्वांनी कर्म करावे । गाव सौंदर्ये सजवावे ।
सर्वांसह उद्धरोनि जावे । तुकड्या म्हणे ॥१३४॥
इतिश्री ग्रामगीता ग्रंथ । गुरु – शास्त्र – स्वानुभव – संमत ।
वर्ण – धर्म निरूपिला येथ । पाचवा अध्याय संपूर्ण ॥१३५॥

॥ सद्‌गुरुनाथ महाराज की जय ॥

## ॥ गीत ॥

प्यारे भारतके हिंदु बासिंदो ।
गुस्सा मत करना जाहिदो रिंदो ।


नाम तो ले रहे व्यास का तुम ।
काम करते अदना दास का तुम ।

ब्राह्मणों ! आप सीख लो विद्या ।
फिर घर घर फिरो पढाते जा ॥

**– स्वामी रामतीर्थ**



# ॥ चित्र परिचय ॥



## अ. ६ – आचार्य विनोबा भावे

अस्थिपंजर फकीर तो आज । भूमिदान यज्ञाचा उठवी आवाज ।
तरि तीच लाट उसळली सहज । गावोगावी ॥९७॥

माणसांच्या हृदयातील सत्प्रवृतीला जागवून विरोधाशिवायच समाजातील विषमता नष्ट करण्याचा महान प्रयोग भूमिदानयज्ञाद्वारे करीत असलेले आजचे दधीची ! यांच्या कार्याचे प्रतिबिंब गावोगावी ज्या वेगाने उमटत आहे त्यावरून 'गाव म्हणजे शुद्ध आरसा' हा या अध्यायाचा सिद्धांतच सिद्ध होतो.

• अध्याय सहावा •

# संसर्ग प्रभाव

॥ श्रीगुरुदेवाय नमः ॥

ईश्वरे जग केले निर्माण । त्याचे कार्य अजूनि अपूर्ण ।
ते आपल्यापरी कराया पूर्ण । सद्बुद्धी दिली मानवा ॥१॥
एकापासूनि अनेक व्हावे । अनेकांसि एकत्वि आणावे ।
हा आपुला मूळ संकल्प देवे । चित्ती घातला सर्वांच्या ॥२॥
अनेक ईषणा, प्रेरणा । त्या कारण होती आत्मविकसना ।
पुत्रपौत्रादि रूपे नाना । मानव आपणा प्रकटवी ॥३॥
कोणी शिष्यशाखा वाढवी । कोणी ग्रंथादिक उपजवी ।
जगी आपुली परंपरा चालवी । ऐसी इच्छा स्वाभाविक ॥४॥
जगावरचि मानव जगला । समुदायातचि उन्नत झाला ।
तो समुदायाचे कार्य विसरला । तरि ते उचित कैसे ? ॥५॥
पिंडब्रह्मांड हे निगडित । संस्कारहि जगाशी संबंधित ।
आत्मज्ञाने राहो जीव अलिप्त । परि उपेक्षा न व्हावी जगाची ॥६॥
सत्य, शिव, सुखी, सुंदर । ऐसा व्हावा हा संसार ।
हे सोपविले कर्तव्य थोर । देवे मानवांप्रति ॥७॥
मानवे आपुला उद्धार करावा । तैसाचि समाज सुधारावा ।
यासाठीच दिला धर्म आघवा । नेमूनि सकळा ॥८॥
यासाठीच झाले अवतार । यासाठीच संत, भक्तांचा व्यवहार ।
'सुखी करीन अवघाचि संसार' । ब्रीद तयांचे ॥९॥
न सुधारवे अखिल विश्व । तरी उन्नत करावे आपुलेचि गाव ।
यानेच संतोषेल देवाधिदेव । लाभेल ठेव मोक्षाची ॥१०॥
हे ठीक म्हणती श्रोतेजन । परि गावाप्रति आमुचे कर्तव्य कोण ? ।
काय होईल आम्हीच झुरोन ? । गावी कोणी ऐकेना ॥११॥
सर्व करिती आपुल्यासाठी । स्त्री, पुत्रांसाठी, चैनीसाठी ।
परि आठवचि नाही येरासाठी । काही करावे म्हणूनि त्या ॥१२॥



सर्वांस वाटे आमुचे ऐकावे । पण ऐकतील कैसे हे न ठावे ।
म्हणोनि वास्तव पुढे जावे । न वाटे कोणा ॥१३॥
कार्य करावया पुढे जावे । साथ न मिळता फजीत व्हावे ।
संकटी कोणी जीव द्यावे ? । वाटे ऐसे बहुतेका ॥१४॥
आम्हांस वाटे गाव सुधारावे । परि सांगा त्यासाठी काय करावे? ।
कैसे वळतील आघवे । लोक सन्मार्गी? ॥१५॥
आपण पुसलिया प्रश्नाचे । मी उत्तर देईन साचे ।
परि लक्षी ठेवोनि हृदयाचे । आचरा तैसे ॥१६॥
मी सांगेन म्हणूनि नव्हे । संती हेचि कथिले बरवे ।
माझा विश्वास जेथे धावे । तेचि सांगेन तुम्हाला ॥१७॥
सर्वांआधी एक निश्चय । लोक असती अनुकरणप्रिय ।
विशेष दिसे ती घेती सोय । न सांगताहि ॥१८॥
मुख्य कार्यकर्त्याची राहणी । निरीक्षोनि बघती कोणी ।
लागती त्याच्याच मागे धावोनी । वत्स जैसे ॥१९॥
म्हणोनि कार्यकर्त्यात असावे आकर्षण । सेवा, चारित्र्याचे ओज पूर्ण ।
सुधार नोहे त्यावाचून । गावाचा कोण्या ॥२०॥
या मार्गानेचि जनजागृति । हेचि सूत्र घ्यावे हाती ।
आपण वागावे तैसे वागती । जनहि सारे ॥२१॥
यासाठी प्रथम करावी आपुली शुद्धि । शरीरशुद्धि, हृदयशुद्धि ।
घरशुद्धि, ग्रामशुद्धि । सर्वतोपरी ॥२२॥
जैसे तुम्ही कराल आपुले घर । ते पाहतील जन सत्वर ।
करतील तैसेचि प्रकार । आपुल्या घरी ॥२३॥
सुंदर दृश्य पाहता डोळा । आवडे पाहणारासि तसाच सोहळा ।
आपणहि वर्तावयाचा चाळा । करितो प्राणी ॥२४॥
फुललेली बाग पाहिली । अनंतरंगी फुले फुलली ।
सुरस फळांनी बहरली । सौंदर्यखाणि ॥२५॥
पाणी वाहे झरणापरी । वृक्ष – लतांच्या कुंजांतरी ।
आमोद दरवळे नानापरी । फळाफुलांचा ॥२६॥
गर्द छायेतळी हिरवळ । दुर्वांकुरांचे जाळे कोमल ।
नाना रंगी फुलपाखरे सोज्वळ । मन मोहविती जीवांचे ॥२७॥

कोठे पाणी चमके आरशापरी । कोठे दगडांच्या कणांची कुसरी ।
कोठे कोमल रूप भूमि धरी । वाटे अंकी लोळावे ॥२८॥
कोठे भूमिचेहि भिन्न वर्ण । कोठे काळे, पिंगटपण ।
कोठे पांढरे, लाल मधून । सुवर्णापरी ॥२९॥
लतालतांवरी झुलती पक्षी । सर्व फळाफुलांचे साक्षी ।
जरी फिरती अंतरीक्षी । पिकली फळे त्या ठावी ॥३०॥
उडोनि तेथेचि मारिती झडप । रसाचा आस्वाद घेती अमूप ।
जैसा करील प्राणी संकल्प । तैसा भोग त्या पावे ॥३१॥
जिकडे तिकडे सुगंध उसळे । उल्हासित इंद्रिये भोगती सगळे ।
नाक, कान, जीभ, डोळे । नाना विषयरसानंद ॥३२॥
ऐसे दृश्य पाहे प्राणी । तेव्हा आपणहि करावे वाटे मनी ।
जातो घरासि परतोनि । सजवाया घर आपुले ॥३३॥
लहान अंगणी बाग लावी । अथवा कुंडीतचि फुले फुलवी ।
शृंगारी झोपडी आपुली बरवी । आपुल्यापरी ॥३४॥
जरि त्या बागचि न दिसता । तरि तो कैसा प्रयत्न करता? ।
ऐसाचि आहे मानवा तत्त्वता । जे देखे ते आपण करी ॥३५॥
विशेषतः ऐसे मुलांचे वागणे । त्यांचे कार्यचि प्रतिध्वनि उठवणे ।
जे जे पाहतील डोळयाने । तेचि आचरती उल्हासे ॥३६॥
म्हणूनि मुख्यांची ही जबाबदारी । ते जे करतील ग्रामाभीतरी ।
मुले आचरतील घरी, दारी । माता-पित्यासि वळवोनि ॥३७॥
एका प्रमुखाने कोंबडी पाळली । तिला सुंदर पिली झाली ।
दुसऱ्यानेहि तीच घेतली । कला त्याची ॥३८॥
मग गावासी तोच आनंद । चढला तयांना उन्माद ।
लढाई करण्याचा लागला नाद । कोंबडियांची ॥३९॥
एकदा कोंबड्यांची झुंज पाहिली । सर्व गावास धुंदी चढली ।
मग कोंबडयात्रा भरली । लढाईसाठी ॥४०॥
बांधती कोंबड्यांच्या पायी सुरा । लढविती मैदानी भराभरा ।
रक्तबंबाळ खेळ सारा । क्रूर वृत्तीने वाढविला ॥४१॥
मग पाटील म्हणे कर लावा । पैदासीचा धंदा वाढवा ।
लोक चेतले गावोगावा । झुंज करण्या कोंबड्यांची ॥४२॥



बिचाऱ्या दीन जीवाने काय केले । यांनीच त्यास निमित्त धरले ।
त्यांचे प्राण लढता गेले । धंदे वाढले पापांचे ॥४३॥
एका प्रमुखाने चालना दिली । ती रीति सर्व गावाने उचलली ।
प्रौढ माणसेहि करू लागली । लढाई मग कोंबड्यांची ॥४४॥
सारी शक्ति कोंबड्यांमागे । प्रतिष्ठितहि झाले बेढंगे ।
म्हणोनि एकाने आपुल्या अंगे । नगर – आखाडा निर्मिला ॥४५॥
जमविले बाल, तरुण काही । उल्हास ओतिला त्यांच्या देही ।
व्यायामाच्या नव्या उत्साही । लाविले तया ॥४६॥
प्रथम भरविली गावी दंगल । इनामी कुस्त्यांचा जंगी मेळ ।
पाहताचि मुलेबाळे सकळ । लागले करण्या व्यायाम ॥४७॥
घरोघरी मुले खेळती कुस्ती । गल्लीगल्लीत चंग बांधती ।
चढली व्यायामाची मस्ती । लहान, थोरां ॥४८॥
कवायत करेला, मल्लखांब । लाठीकाठी भाला लेजीम ।
तरवार छडीपट्टा मर्दानी काम । व्यायामाचे ॥४९॥
त्याने गावातील वाईट व्यसन । सर्वचि गेले हारपोन ।
शरीर कमविण्याची लागली धुन । लहान, थोरा ॥५०॥
जो तो आपुली छाती पाही । दंड – मोंढे फिरवीत राही ।
मांडियांचे पट वाढवी देही । सौंदर्य यावया मल्लाचे ॥५१॥
मैदानी मर्दानी खेळ चाले । सर्व गाव लाल मातीने रंगले ।
कोंबडयांचे व्यसन कमी झाले । लढाई गेले विसरोनि ॥५२॥
दुसऱ्या एकास बुद्धि सुचली । त्याने जोडी चारुनि मस्त केली ।
दुसऱ्या बैलजोडीशी लाविली । धावण्यासाठी ॥५३॥
जनलोकांचे लक्ष वेधले । त्यातचि मनोरंजन वाटले ।
पुढे शंकरपट सुरू झाले । गावोगांवी ॥५४॥
त्यात काही उद्देश उत्तम असती । बैलांना खुराक देवोनि बनविती ।
स्पर्धेने वाढविती बैलांची शक्ती । शेतीसाठी ॥५५॥
पण त्यातूनि प्रकटे दुष्परिणाम । राहते मागे उत्तम काम ।
बैल पळविण्याचाचि हंगाम । पुढे येतो ॥५६॥
मग जो बैल पळेना । त्यास टोचती तुतारी – अणा ।
रक्ताळोनि दुखविती प्राणा । नंदीबैलांच्या ॥५७॥

राहिले शेतीभातीचे काम । शंकरपटाचाचि उद्यम ।
माणसे करिती कसाबकर्म । नानापरी ॥५८॥
सहजचि गाडी जुंपती । पुराणी हाती धरोनि टोचती ।
पळता पळेना तरी मारिती । निर्दयपणे ॥५९॥
गाव पडले त्याच प्रवाही । उत्तम नाद घेणेचि नाही ।
राक्षसी धंदे ग्रामी सर्वही । वाढू लागती त्वरेने ॥६०॥
ऐसा धूमधडाका चालला । एकाने गावी तमाशाचि आणला ।
सारा रागरंग बदलला । मागीलपैकी ॥६१॥
जो तो लावणी मुखे उच्चारी । घरी, दारी, शेती, मंदिरी ।
ज्याच्या त्याच्या तोंडी सारी । गाणी विषयांची ॥६२॥
तमाशाचे प्रस्थ वाढले । लहान मुलांत संस्कार बिंबले ।
मुले, तरुणहि नटू लागले । तमाशगिरापरी ॥६३॥
जो तो चांगभांग करी । मुद्रा सुरु झाली लाजरी ।
हावभाव शरीरावरी । नाचती घरी मुलेबाळे ॥६४॥
आईवडील कौतुक करिती । मुली मौज म्हणोनि हसती ।
कोणी ताट पाट बडविती । डफासारिखे आनंदे ॥६५॥
परंतु कोणी इकडे बघेना । काय होणार विटंबना ।
सारा गाव तमाशाच्या रंजना । राजी झाला ॥६६॥
'डुबती म्हणे' ढोलक ओरडून । तुणतुणे म्हणे 'कोण कोण' ।
मंजिरा सांगे 'सर्व जन' । परि कोणा न कळे हे ॥६७॥
मग कुठले कथा, कीर्तन । भजन वा साधूंचे प्रवचन ।
टिंगल करिती मार्गी तरुण । सद्भावांची ॥६८॥
ज्याने गावी तमाशे आणले । त्याचे पुत्र नाचे निघाले ।
गावोगावी जाऊ लागले । तेथेहि झाले सुरू फड ॥६९॥
मुलींना मार्गी जायाची चोरी । मुले छळती निलाजरी ।
येणे – जाणे वाढवूनि घरी । नेल्या काढूनि कित्येक ॥७०॥
मग पाटलासि पडला उजेड । अरे ! हे काय वाढले थोतांड? ।
माझ्या घरातहि शिरले बंड । तमाशाचे ॥७१॥
माझ्या भावाने तमाशा आणला । त्याचा तर वंशचि बिघडला ।
मुलगी पळाली, मुलगाहि गेला । घर दुसऱ्याचे बुडवोनि ॥७२॥



मग विचारी ज्याला त्याला । कैसे बंद करावे तमाशाला ? ।
जो तो म्हणे तुम्हीच होऊ दिला । धिंगाणा या गावाचा ॥७३॥
कुस्ती, व्यायामाच्या नादात । गाव सुंदर, आदर्श, अद्भूत ।
परि हे भलभलते छंद नेत । लया सगळया गावासि ॥७४॥
सुंदर होते मुलांचे खेळणे । बरे होते बैल तयार करणे ।
पण या पापाने औदासीन्य । आणले गावी ॥७५॥
आता भोगा त्याची सजा । सारीच मुले वाजविती वाजा ।
झाला तमाशाचाचि अगाजा । सर्व गावी उत्सवी ॥७६॥
या गावात जे जे येती । ते तमाशाचे रंगीच रंगले असती ।
ओघ न थांबवे पाटलाप्रति । कठिण झाले ॥७७॥
एकाने त्यात छंद आणला । दारू पिऊनि फिरू लागला ।
तमाशाने आनंदाचा लोकाला । कळस दिसे त्या ठायी ॥७८॥
हळुहळू तीच वाढली प्रथा । दारूबाजांचा जमला जत्था ।
काय पुसता गावाची व्यथा । आता तुम्ही ॥७९॥
कोणी दंढारी, तमाशे करी । कोणी दारू पिऊन, शिव्या उच्चारी ।
कोणी कोणा न माने तिळभरी । लहान, थोर स्वैर झाले ॥८०॥
व्यभिचाऱ्यांची झाली दाटी । गंजिफा खेळती पैशांसाठी ।
मुले करिती चोरी – चपाटी । काढती भट्टी घरोघरी ॥८१॥
मांस खाण्याचे वाढले व्यसन । चैन न पडे मद्यावाचून ।
अनेक रोग मांसमद्यातून । वाढले गावी ॥८२॥
मुले तेल लावूनि बाल फिरविती । पान चावूनि कोठेहि थुंकती ।
सिगारेट ओढूनि धूर सोडिती । धाकचि नाही कोणाचा ॥८३॥
मजूर कष्टाने पैसा मिळविती । तोहि दारुपायी उधळिती ।
मुलाबाळां उपवास पडती । होय दुर्गति जीवनाची ॥८४॥
दारु पिऊनि मारिती स्त्रीला । सगळया गावीच चळ सुटला ।
पूर आला भांडाभांडीला । कोर्ट कचेऱ्या गजबजल्या ॥८५॥
लोळे गटारात अमीरहि । कोणीहि कोणास मारुनि देई ।
मुलीबाळी सुरक्षित नाही । ऐसा प्रसंग ओढवला ॥८६॥
पैसा अडका नष्ट झाला । ऐसा गाव 'उन्नती' स चढला ।
सगळया गावाचाचि धिंगाणा केला । दारूबाजांनी ॥८७॥

गावचा मुखंड दारू प्याला । म्हणूनि व्यसन लागले बहुतेकाला ।
मग सर्व गावचि लागला । गटारगंगेमार्गी ॥८८॥
तैसेचि आहे जुगाराचे । चोरीचे आणि व्यभिचाराचे ।
पहिले बिघडती मुखंड आमुचे । मग बिघडे गाव सारा ॥८९॥
आज जे जे लोकांचे बिघडले । ते तरी कुणाचे होते पाहिले ।
म्हणोनीच तैसे करू लागले । लोक सर्व ॥९०॥
स्वतः प्रथम त्याने आचरिले । मगचि लोकांना सांगितले ।
म्हणोनीच जनलोक रंगले । रंगी त्याच्या ॥९१॥
सर्व गावाचे वर्तन । कार्यकर्त्यावरचि जाण ।
कार्यकर्ते गावाचे प्राण । समजो आम्ही ॥९२॥
गावी चार भले वागती । तरीच गाव होय उत्तम गति ।
मुख्य म्हणविणारे स्वार्थ साधती । तरि सर्व गावचि तैसे ॥९३॥
गाव म्हणजे शुद्ध आरसा । जे दाखवाल ते दिसेल सहसा ।
जे कराल ते करील खासा । गाव आमुचा ॥९४॥
मी जे प्रारंभी बोललो । बाग बघोनि प्रसन्न झालो ।
तैसाचि घरी वर्तू लागलो । ऐसे होते सकळांचे ॥९५॥
म्हणोनि मी आपणासि विनवितो । योग्य जो वाटे आदर्श तो तो ।
निर्माण करूनि ठेवता, येतो । प्रभाव आपुल्या अंगी ॥९६॥
अस्थिपंजर फकीर तो आज । भूमिदानयज्ञाचा उठवी आवाज ।
तरि तीच लाट उसळली सहज । गावोगावी ॥९७॥
आपली झुगारुनि सुख, चैन । किती लोक दान मागती फिरून ।
गरीब – अमिरहि स्वार्थ विसरुन । देती भूदान उल्हासे ॥९८॥
पुढारी जे जे गावी करी । लोक तैसेचि वागती घरोघरी ।
म्हणोनि याची आहे जबाबदारी । मुखंडावरती ॥९९॥
तेव्हा काय करावे आपुल्या गावी । ती योजना आपण ठरवावी ।
तैसीच आपुली सर्व सुधारावी । टापटीप ॥१००॥
त्यात नेहमी सावध असावे । जे जे करणे असेल बरवे ।
ते दूरदृष्टीने शोधूनि पाहावे । तेव्हा घ्यावे कार्य हाती ॥१०१॥
नाहीतरि सहज केले । परि ते प्राणावरीच आले ।
सारे गावचि बिघडले । होईल ऐसे ॥१०२॥




म्हणोनि गावी तेच सुरू करावे । ज्याने गाव नावलौकिक पावे ।
एरव्ही शिवे–आतहि येऊ न द्यावे । विडंबनकार्य ॥१०३॥
कदाचित केले एखाद्याने । तेहि सहन करु नये कोणे ।
लावावी उधळोनि समंजसपणे । वाईट रीति ॥१०४॥
कारण जैसी संगति घडे । तैसे अनुभवा येई रोकडे ।
म्हणोनि सावध असावे मागेपुढे । उत्तम गुण वाढवाया ॥१०५॥
उत्तम खेळ, उत्तम कार्य । उत्तम कला, उत्तम सौंदर्य ।
गावास भूषण ज्याने होय । ते अगत्याने उचलावे ॥१०६॥
कोठे काही व्यसन घुसले । त्यास लगेच पाहिजे कमी केले ।
त्यासाठी गावाचे मुखंड लागले । पाहिजेत पाठी ॥१०७॥
जरी काही नाराजी झाली । मुलेबाळे रुसू लागली ।
तरी पाहिजे समज घातली । वडीलधाऱ्यांनी ॥१०८॥
सर्वामाजी उत्तम उपाय । ते वातावरणचि बदलूनि जाय ।
ऐशा नव्या छंदाची द्यावी सोय । कार्यकर्त्यांनी ॥१०९॥
कार्यकर्ता तोचि गावचा । ज्यास लोभचि नाही कोणाचा ।
आमुचा गावचि मोक्ष आमुचा । मानावा त्याने ॥११०॥
मग त्याचा आदर्श गाव पाही । सर्व गावचि सुधरोनि जाई ।
मुखंडावरीच गाव राही । तुकड्या म्हणे ॥१११॥
इतिश्री ग्रामगीता ग्रंथ । गुरु – शास्त्र – स्वानुभव संमत ।
निवेदिले ग्रामजीवनमर्म येथ । सहावा अध्याय संपूर्ण ॥११२॥

॥ सद्गुरुनाथ महाराज की जय ॥

निढळीचा घाम यज्ञीय ते द्रव्य । जीवनाचे काव्य विन्या म्हणे ॥

**– आचार्य विनोबा भावे**

## ।। चित्र परिचय ।।



### अ. ७ – महात्मा ज्योतिराव फुले

लाख बोलक्यांहूनी थोर । एकचि माझा कर्तबगार ।
हे वचन पाळोनी सुंदर । गाव सुधारावे कार्याने ।।१०७।।

प्राणांतिक आपत्ति सोसूनही स्त्रिया, अनाथ मुले, अस्पृश्य व श्रमिक समाज यांच्या सुखासाठी झटणारा महाराष्ट्राचा आद्य समाजसुधारक महात्मा १८४८ मध्ये मुलींची व ५१ मध्ये अस्पृश्यांची पहिली शाळा आणि ५३ मध्ये बालहत्या–प्रतिबंधक गृह स्थापून १८६८ मध्येच यांनी अस्पृश्यांना आपली विहीर खुली करून दिली. नेटाने अशी स्वतःपासून सुरुवात करणारा पुरुषच समाज बदलवू शकतो, हे या अध्यायाचे तात्पर्य.



• अध्याय सातवा •

# आचार–प्राबल्य

।। श्रीगुरुदेवाय नमः ।।

एका सज्जने प्रश्न केला । लोकरहाटी कळली आम्हाला ।
पुढारी नेतेच सुधारती गावाला । सत्य हे सारे ॥१॥
परि भल्यांनीच गोंधळ घातला । पुढारी पुढिलांचा अरि झाला ।
तयांच्या नगाऱ्यापुढे कसला । आवाज आमचा ताण मारी? ॥२॥
न्यायदेवता सिंहासनी बसविली । तीच अन्याय करूनी गेली ।
मग कैची सुव्यवस्था आली? । सांगा सांगा ॥३॥
सत्संगतीसि पंडित बोलाविला । त्यानेच गावी कलह केला ।
शहाणा म्हणावा तोच निघाला । महामूर्ख जैसा ॥४॥
प्रसन्नतेकरिता ठेविले गायन । तेथे ऐकावे लागले रुदन ।
आपल्या पोटाची सोय व्हावी म्हणून । अडे, ओरडे ॥५॥
घोडे शिकवाया आणला स्वार । तोचि पडला मोडोनि कंबर ।
कैसे बसतील मग इतर । घोडयावरी? ॥६॥
इमानदार म्हणोनि पाहिला धनी । त्यानेच केली बेईमानी ।
आता विश्वास ठेवावा कोणी । कोणावरी? ॥७॥
मुले शिकविण्या ठेविला मास्तर । त्यानेच केला दुर्व्यवहार ।
शिक्षकासीच शिक्षणाची जरूर । ऐसे झाले ॥८॥
औषधि द्याया आणिला डॉक्टर । त्याने रोग्यासि दिले जहर ।
आता कोणी करावा उपचार? । सांगा सांगा ॥९॥
ऐसे झाले आमुच्या गावी । सांगा काय व्यवस्था करावी? ।
कोणास हाक मारुनि घ्यावी । विश्वासाने? ॥१०॥
जन मनात येईल ते करिती । दारू पिती, तमाशे नाचविती ।
पुढारीच पुढाकार घेती । ऐशा कामी ॥११॥
गुंडांस धरोनिया हाती । करिती मनी येईल त्याची फजिती ।
त्यावाचोनि पुढाऱ्याची गती । म्हणती प्रगतिपथा येईना ॥१२॥

ऐसेचि धरिले त्यांनी मनी । नाश केला गावी फिरूनि ।
आता चोरचि झाले धनी । सज्जन मेले उपवासी ॥१३॥
गाव सगळेचि बिघडले । आपल्यापरी स्वैर झाले ।
नाही कुणाचे वर्चस्व राहिले । कोणावरि ॥१४॥
सांगा सांगा काय करावे ? । तुम्ही म्हणता गाव सुधारावे ।
कोण्या मार्गे आपण जावे । ऐशा स्थिती? ॥१५॥
आपण करावे काही साधन । हसती टिंगल करोनि जन ।
म्हणती हा आला साधु कुठोन । पोट भरावया? ॥१६॥
खराटा घेवोनि झाडझुड करावी । तेथेचि मलविसर्जना बसवी ।
म्हणती तुमची सेवा तुम्ही चालवावी । आम्ही करू ऐसेचि ॥१७॥
काही सांगावे शहाणपण । म्हणती तुम्ही सांगणारे कोण? ।
खुशी वाटेल तैसे करोन । राहू आम्ही ॥१८॥
ऐसी झाली गावाची स्थिती । वाईट वाटते हृदयाप्रति ।
सोडूनि जावे गावा येई चित्ती । परि जीवा आवडेना ॥१९॥
शेवटी आलो तुम्हासि शरण । तुम्ही गाव केले आदर्श म्हणोन ।
कैसे वळविले तेथील जन?। सांगा आम्हांलागोनि ॥२०॥
मित्रा ! तू विचारिला प्रश्न बरवा । अति हर्ष झाला माझ्या जीवा ।
मी सांगेन धरोनि भावा । वर्म माझे ॥२१॥
प्रथम कळू दे तुझी साधना । काय ठेवितोसि आपुली धारणा ।
दिनचर्येची कैसी रचना । आहे तुझ्या ? ॥२२॥
हेचि आहे मुख्य खूण । जोवरि वक्त्याचे न दिसे आचरण ।
तोवरि लोक वागतील म्हणोन । समजू नये ॥२३॥
लोकांसि जे जे शिकवावे । ते आधी आपणचि आचरावे ।
नुसते पुढारी म्हणोनि मिरवावे । तेणे आदर न वाढे ॥२४॥
एकेक विषयाचे पुढारीपण । घेवोनि तैसे केले आचरण ।
त्यांनीच बिघडवू शकले गाव पूर्ण । गुंड, व्यसनी, व्यभिचारी ॥२५॥
तैसेचि गाव सुधाराया आपण । विशेष केले पाहिजे आचरण ।
जेणे येईन अंगी आकर्षण । गावास वेधून घेणारे ॥२६॥
येर पुढारी असोत सर्वहि । परंतु आपला मार्ग खुंटला नाही ।
लोक जणु वाटचि पाहती सदाहि । कोण होतो पुढे म्हणोनि ॥२७॥



यासाठी निराशेचे नाही कारण । आचरणे साधावे पुढारीपण ।
सत्यचि प्रभावी सर्वांहून । ही अमोल खूण विसरू नये ॥२८॥
ज्यांने सत्याशी नाते जोडले । त्यांचे अंगी गुरुत्वाकर्षण आले ।
सांगण्याहूनिहि सामर्थ्य चाले । त्याच्या शुद्ध जीवनाचे ॥२९॥
यासाठी प्रथम पाहिजे इंद्रियनिग्रह । खानपानादिकी नियमाग्रह ।
सर्वचि विषयी असंग्रह । आपुल्यासाठी म्हणोनि ॥३०॥
पवित्र, मित आहार–विहार । निद्रा थोडी, शांति फार ।
सदा प्रसन्नता मुखावर । बोलता, चालता ॥३१॥
यमनियमादि तैसी आसने । साधोनिया आरोग्य राखणे ।
बुद्धि – बल – चातुर्ये वर्तने । तेजोमय असावे ॥३२॥
आपुल्या कष्टावरीच जगावे । कुणाचे उपकार अंगी न घ्यावे ।
कमीत कमी खर्चाने राहावे । साध्या घरी ॥३३॥
अंग झाकण्यापुरते कपडे । शिवले असावेत साधे भाबडे ।
शौकपाणी न आवडे । राहावे ऐसे ॥३४॥
आपुले, परक्याचे हित । दोन्ही असावेत लक्षात ।
जेणे परक्यासि वाटे पसंत । तैसा व्यवहार करावा ॥३५॥
आपुल्या कोणत्याहि कारभारी । अन्याय न व्हावा कोणावरी ।
सावधानी असावी हृदयांतरी । सर्वकाळ सत्याची ॥३६॥
दया, क्षमा, शांती, नम्रता । प्रत्येक जागी प्रामाणिकता ।
सरळपणा आणि प्रेमळता । ही दैवी संपत्ति साधावी ॥३७॥
सार्वजनिक कामी जाऊनि । कष्टत जावे निःस्पृहपणी ।
जाति – पक्ष – मित्र – शत्रु म्हणूनि । पक्षपात कोठे नसावा ॥३८॥
असभ्य, हेकट नसावे वर्तन । कर्कशता न दिसावी वागण्यातून ।
कुणाचीहि निंदा, स्तुती ऐकोन । दुराग्रही मन न करावे ॥३९॥
प्रत्यक्ष दोष पाहिल्याविण । अथवा न समजता विश्वसनियांकडून ।
करु नये न्यायदान । शोधल्यावाचून सर्व पक्ष ॥४०॥
सामुदायिक जबाबदारी । असेल जी जी नागरिकावरि ।
न चुकता पाळावी ती निर्धारी । स्वार्थ उरी न ठेविता ॥४१॥
न करावी कोणाची निंदास्तुती । आपण आदर्श करावी कृति ।
स्त्रिया, मुले वृद्धादि सर्वांसांगाती । वागावे प्रेमे, विश्वासे ॥४२॥

राखावी शब्दांची किंमत । वेळेचे महत्त्व सदोदित ।
दुसऱ्यांचे सुख-दुःख आघात-हित । आपणा इतुकेची जाणावे ॥४३॥
हे सर्व जंव पाहतील जन । म्हणतील हाचि आहे सज्जन ।
वाढेल तुमच्या कार्याचे महिमान । हळूहळू ॥४४॥
लोकांसि कळेल तुमचे वर्तन । अंतर्बाह्य सात्विक पूर्ण ।
मग पाहतील देवाप्रमाण । तुम्हालागी ॥४५॥
मित्रा ! ऐसे जंव तू करिशी । तव लोक राहतील प्रसन्न तुजशी ।
ऐकण्याची वाटेल खुशी । लोकांना तुझे ॥४६॥
म्हणतील तुम्ही सांगावे । तैसेचि आम्ही वागावे ।
तुमच्या बोलण्यातून निघावे । तरि मरण होईल आमुचे ॥४७॥
तेव्हा प्रथम करावा विचार । आपण घ्यावा की नाही पुढाकार ।
एकदा पाऊल टाकता समोर । मागे घेऊ नये कल्पांती ॥४८॥
ज्यासि वाटे जनसेवा करावी । त्याने प्रथम लोकलाज सोडावी ।
आपुल्या आत्म्याची ग्वाही घ्यावी । कार्य सत्य म्हणोनिया ॥४९॥
ज्यात आहे सर्वांचे सुख । ते सत्कार्य न करिता राहावे विन्मुख ।
हे तो आहे घोर पातक । समजोनि घ्यावे ॥५०॥
साहेल तैसी करावी सुरुवात । मुरवावया जनलोकांत ।
हृदयात आणि इंद्रियात । मेळ राहू शके ऐसी ॥५१॥
क्रमाने पाऊल पुढे घ्यावे । कार्य करिता समाधान मानावे ।
विरोधकांसि उत्तर द्यावे । नम्रतेने ॥५२॥
लोकांसि बोलणे शिकवावे । तरि आपण उत्तमचि बोलावे ।
बोलण्यात माधुर्य ओतावे । आपुल्या प्रेमे ॥५३॥
आपुल्या बोलण्याने उबगतील जन । ऐसे कधी न करावे भाषण ।
कोणाचेहि पूर्ण ऐकल्याविण । न द्यावे मधून उत्तर ॥५४॥
आपुले बोलणे प्रेमाचे । दुसऱ्याचे बोलणे क्रोधाचे ।
परि ते सहन करावे त्याचे । वार अंगी ॥५५॥
दुसऱ्याने कितीहि क्रोध केला । तरि हसोनि पाहिजे मावळिला ।
उत्तर देता यावे शांतीने त्याला । आपुल्यापरी ॥५६॥
शंका विचारावयाची दाटी । लागेल पदोपदी पाठी ।
सहन करोनि ही आटाआटी । पाय पुढे टाकावा ॥५७॥



एकदा झालिया निश्चय । मग लोकचि होती सहाय्य ।
कामे करावयाची सोय । सोपी होते ॥५८॥
आपोआपचि होतो निर्वाळा । तांडा जमतो भोवती सगळा ।
निवडावा त्यातूनि जिव्हाळा । आहे कोणा ॥५९॥
त्यासचि साथी करावे । शक्तियुक्तिने मन भरावे ।
कार्य करावयासि सोपवावे । आपुल्या जैसे ॥६०॥
ऐसे मिळता काही जन । आरंभ झाला सत्कार्या पूर्ण ।
मग सहजचि घ्यावे महत्पुण्य । गाव - सेवेचे ॥६१॥
याहून नाही दुसरा उपाय । आपुल्या गावाची लागाया सोय ।
हाचि मंत्र आहे सिद्धांतमय । गाव आपुले सुधारावया ॥६२॥
हे ऐकोनिया माझे उत्तर । प्रश्नकर्ता बोलला चतुर ।
यासी लागतील दिवस फार । तोवरि गावाचे होईल कैसे ? ॥६३॥
आपण सांगितले जे साधन । तेहि आहे महाकठिण ।
कोण साधील यमनियम, आसन । ध्यानादि सर्व ? ॥६४॥
त्यासि वर्षेहि बरीच लोटती । तोपर्यंत आमुची गात्रे शिथिल होती ।
मग कोण पाहील गावाप्रति । उत्तम आहे की वाईट ? ॥६५॥
आम्ही मध्येच गेलो मरून । मग इच्छा राहील अपूर्ण ।
काय सांगावे पुढे कोण । करील कार्य आमुचे ? ॥६६॥
यासाठी सांगा सोपा उपाय । ज्याने साधेल सर्व सोय ।
देऊ आम्ही खर्च जरी ये । त्यासाठी काही ॥६७॥
मित्रा ! ऐक याचे उत्तर । तुज सोडोनि गाव व्हावे सुंदर ।
ऐसी इच्छा धरिशील तीव्र । तरि ती वेडेपणाची ॥६८॥
माझे गाव सुंदर व्हावे । मी चोरजारचि राहावे ।
ऐसे विसंगत दिसते आघवे । म्हणणे तुझे ॥६९॥
व्यक्तिशुद्धीविण दुसरा उपाय । काय आहे व्हाया साहाय्य? ।
टिकविण्यास गावी उत्तम सोय । याविण मजला दिसेना ॥७०॥
तू म्हणशील सत्तेने सुधारावे । ताबडतोब कायदे करावे ।
तुझ्यासारखे टाळतील आघवे । ते तैसेचि ठेवावे स्वार्थी जन ॥७१॥
हे म्हणणे कोण ऐकेल ? । कितीहि उदार बोलले बोल ।
तरी जनमन ते ओळखील । छीथू करील आमुचीहि ॥७२॥

आणि तैसेचि करू जावे । तरि गाव कैसे सुधारावे ? ।
व्यक्ति मिळोनीच गाव आघवे । हे विसरता सर्व फोल ॥७३॥
लोक सुधारणेच्या रेखा फाडती । पैसा देऊन करू म्हणती ।
परि पैसा घेऊनि फसविती । ऐसे लोक उभेच तेथे ॥७४॥
करू म्हणती व्याख्याने देऊन । तरि लोकहि शिकती व्याख्यान ।
काय होय यातूनि निष्पन्न? । जोवरि मानव ना बदले ॥७५॥
त्यास मुख्य पाहिजे अंतःकरण । जिव्हाळ्याची सेवा पूर्ण ।
तरीच ग्राम होईल नंदनवन । अवडंबरावाचूनि ॥७६॥
वास्तविक त्यासी वेळहि नाही । सवेच चालेल सुधारणाहि ।
सुरू करोनि सांगत जाई । शिकवी मनासहित जना ॥७७॥
बोल, बोल याचे उत्तर । तुझी तयारी आहे काय सत्वर? ।
नाही तरी वेळ मात्र । गमावू नकोस आमुचा ॥७८॥
तेव्हा तो निराशेने वदला । अपरिग्रह जरि आम्ही केला ।
काय राहील मुलाबाळाला? । मग काय झाला फायदा माझा? ॥७९॥
कासया करावे एवढे कठिण? । चालू द्या जैसे चालती जन ।
आपणचि दुःखी होऊन । का मरावे यासाठी ? ॥८०॥
ऐसे बोल ऐकता प्रश्नकर्त्यांचे । बोललो तुम्हीच गुंड गुंडाचे ।
पुन्हा त्यातहि आमुचे । साहाय्य घेता बुडवाया ॥८१॥
तुम्हीच गाव बुडविला । सांगायासि आले बोलबाला ।
ऐसाच वाटे घात झाला । सर्व गावदेशाचा ॥८२॥
तुमच्यावरूनि मज बोध झाला । देश अशांनीच गर्तेत घातला ।
शहाणे म्हणवूनि नाश केला । गावाचा तुम्ही ॥८३॥
प्रथम जे तुम्ही ऐसे बोलले । जे जे जन सुधारण्यास आणले ।
त्यांनीच गाव बुडविले । आमुचे सर्व ॥८४॥
हे म्हणणे सारे लटके । तुम्हासीच द्यावे वाटे फटके ।
नाहीतरि करा आता निके । सांगतो तैसे ॥८५॥
तो भला काही पाय घेईना । फसला मोह – कर्दमी नाना ।
म्हणे आलो होतो आपुल्या दर्शना । लाभ होईल म्हणोनि ॥८६॥
गावी येती साधु – महंत । कार्यकर्ते, विद्वान, पंडित ।
त्यांचे संगति तैसा तैसा शास्त्रार्थ । करावा हीच रुचि मज ॥८७॥



जैसे आम्ही पोथी, पुराण वाचतो । तैसीच त्याची चर्चा करतो ।
कोण शहाणा हे पाहतो । वरच्यावरि ॥८८॥
तैसा बोललो आपली ज्ञानचर्चा । नेहमीच चालती गप्पा आमुच्या ।
होतील कधीकाही मनाच्या । भावनाहि ऐशा ॥८९॥
तुम्ही तर नेटचि लाविला । सांगता सुरुवातचि करावयाला ।
यास पाहिजे विचार केला । काही वर्षे ॥९०॥
मी ऐकले त्याचे म्हणणे । विव्हळ झालो जीवेप्राणे ।
ऐसेहि जन निर्मिले भगवंताने! । वाटले मना ॥९१॥
हात जोडले तयाप्रति । म्हणालो आता नको आपुली संगति ।
बहु ज्ञान दिले तुम्हाप्रति । वस्तादाने ॥९२॥
परंतु यापेक्षा मूर्ख बरे । ते ऐकोनि घेती बिचारे ।
आम्ही प्रयत्न करु म्हणोनि सारे । घरी जाती सद्‌भावे ॥९३॥
तुम्ही दिसता पढत-मूर्ख । दुसऱ्या दुखवोनि घेता सुख ।
कळोनि न वळे याचे कौतुक । करावे तरि लाजिरवाणे ॥९४॥
परि आता एक ध्यानी ठेवावे । याने आपुले भले कधीहि नोहे ।
परि कुणातेहि समाधान पावे । या चर्चेने क्रियायोगे ॥९५॥
असो, मजसी जैसा प्रश्नकर्ता भेटला । तैसा का कोणी शहाणा उठला ।
तरि त्याने घातचि झाला । ग्रामसेवाकार्याचा ॥९६॥
बोलण्यात ते अति शहाणे । परि कार्य त्यांचे ओंगळवाणे ।
कैसे गाव सुधारेल याने ? । सांगा मज ॥९७॥
न सोडताहि पेंढारीपण । त्यांना पाहिजे पुढारीपण ।
इच्छिती संन्याशाचा सन्मान । पत्नी घेऊनि खांद्यावरि ॥९८॥
साधूशी भाविकपणे बोलती । मूर्खापाशी महंत होती ।
व्यसनी लोकांमाजी मिळून जाती । व्यसने भोगता ॥९९॥
आपणा सर्वत्र मान मिळावा । धनाचाहि संग्रह व्हावा ।
आणि जरा ताणहि न लागावा । ऐसा व्यापार हवा त्यासि ॥१००॥
हेचि ओळखावे धूर्तपण । यासीच पढतमूर्ख म्हणती शास्त्रज्ञ ।
त्यालागी करूनहि प्रयत्न । असाध्य त्यांचा खाता रोग ॥१०१॥
त्यापासोनि ग्राम वाचवावे । खरे सात्विकपण गावी भरावे ।
सरळपणासाठीच प्रयत्न करावे । सुधारकांनी ॥१०२॥

यासि मज एक साधन सुचे । जे जे असतील गावी ऐसे ।
आधी त्यांचेच लागावे कासे । ससेमिरा घेऊनिया ॥१०३॥
जे जन बोलण्यात जिंकती । आचरणात मागे राहती ।
त्यांची घ्यावी चातुर्ये झडती । ग्राम हाती घेवोनि ॥१०४॥
फुकी ज्ञानचर्चा नाही झाली । म्हणोनि ज्ञानशक्ति कमी पडली ।
ऐसी कधी न पडावी भुली । लोकास माझ्या ॥१०५॥
अदंभ, दया, अभयादि गुण । त्यासीच गीता म्हणे ज्ञानखूण ।
क्रियावान तोचि पंडित पूर्ण । सर्वभूतहिती रत ॥१०६॥
लाख बोलक्यांहूनि थोर । एकचि माझा कर्तबगार ।
हे वचन पाळोनि सुंदर । गाव सुधारावे कार्याने ॥१०७॥
सुधारणेची करिता बोलणी । म्हणावे, चला कामे करू मिळोनी ।
घ्या हे टोपले माती भरोनि । शिरावरी आपुल्या ॥१०८॥
सर्वांसीच लावावे काम । हाचि मार्ग सर्वात उत्तम ।
यानेच बनेल आदर्श ग्राम । सहाय्य देता सत्कार्या ॥१०९॥
आदर्श न करिता जीवन । कैसा मिळेल आदर्शाचा मान ? ।
कैसा जगी आदर्श होय निर्माण? । तुकड्या म्हणे ॥११०॥
इतिश्री ग्रामगीता ग्रंथ । गुरु-शास्त्र-स्वानुभव-संमत ।
कथिला ग्रामोन्नतीचा आचारपथ । सातवा अध्याय संपूर्ण ॥१११॥

॥ सद्गुरुनाथ महाराज की जय ॥


## अभंग वचने

सर्व धर्मामध्ये आत्मज्ञान श्रेष्ठ । कोणी नाही भ्रष्ट ज्योति म्हणे ॥
खरी नीति हाचि मानवाचा धर्म । बाकीचे अधर्म ज्योति म्हणे ॥
सत्यावीण नाही जगी अन्य धर्म । कळवावे वर्म ज्योति म्हणे ॥

– महात्मा ज्योतिराव फुले



## ॥ चित्र परिचय ॥



## अ. ८ – भगवान गौतम बुद्ध

हाती न घेता तरवार । बुद्ध राज्य करी जगावर ।
त्यासी कारण एक प्रचार । प्रभावशाली ॥४०॥

अडीच हजार वर्षांपूर्वी जगाचे दु:ख निवारण्यासाठी राज्यत्याग करून तपस्वी झालेले बुद्ध प्रवर्तक, यांनी प्रथम आपल्या पंचभिक्षूंना प्रचाराची दीक्षा दिली व स्वत:ही ४५ वर्षे प्रचारार्थ भ्रमण केले. पालीसारख्या वेश्या व अशोकासारखे क्रूर सम्राट बौद्ध प्रचारानेच बदलून गेले होते व जगातील असंख्य देश बुद्धधर्मी झाले होते. आजही जगातील ४० कोटी लोक बुद्धानुयायी आहेत व भारताच्या ध्वजावर अशोकचक्र विराजीत आहे. स्वामी विवेकानंद म्हणतात–'बुद्धानेच प्राय: या देशात धर्मप्रचाराची प्रथा सर्वप्रथम सुरू केली व तीही संस्कृताऐवजी लोकभाषेतून !'' प्रचाराचा आदर्श याहून थोर कोणता?

• अध्याय आठवा •

# प्रचार महिमा

॥ श्रीगुरुदेवाय नमः ॥

एक साधुवेषी मजशी बोले । आमुचे आचरण जरी भले ।
परि लोक दुसऱ्यांनी दिपविले । न ऐकती ते ॥१॥
वाईटाकडे सहज प्रवृत्ति । अनेक प्रलोभने दुष्टांचे हाती ।
आम्रतरू मेहनतीनेहि न जगती । गवत वाढे न पेरता ॥२॥
ऐसा अनुभव मज आला । सांगोनीहि न पटे जनतेला ।
वाटे काय करावे याला । ऐकती ना हे वेडे जन ॥३॥
म्हणोनि प्रार्थना करितो साहेबासि । त्यांनी करावे कायद्यासि ।
जनता उद्धारावी हवी तैसी । दंड, कैद करोनि ॥४॥
ऐकताचि त्याचे वचन । म्हणालो मग सरकारचि झाला भगवान ।
कासया करिशी देवाचे भजन ? । पुजावे जोडे साहेबाचे ॥५॥
वास्तविक संतांचे सांगणे प्रेमाचे । सरकारचे सांगणे दंडुक्याचे ।
जरी पर्यायाने दोघांचे । एकचि ध्येय पाहता ॥६॥
यात दमनाने लोक भिती । तेवढ्यापुरते नीट वागती ।
आणि मार्ग काढोनि पापे करिती । कोट्यानुकोटी ॥७॥
तैसे नाही साधु, संतांचे । त्यांचे बोलणे आपुलकीचे ।
एकदा विचार पटले त्यांचे । लोक मरेतो न विसरती ॥८॥
साधूंनी देवासि प्रार्थावे । सकळ जनासि बोधित जावे ।
ऐसे आहे साधन बरवे । साधु, संतांचे ॥९॥
पूर्वी प्रचारक साधू म्हणोन फिरती । गावोगावी लोकां जागविती ।
'आलख' म्हणोन पाहरा देती । घरोघरी अरुणोदयी ॥१०॥
त्यांचे प्रेमचि कार्य करी । लोक उठती नित्यनेमावरि ।
राहणे टापटिपीचे बाहेरी । अंतरी निर्मळपणा ॥११॥
कथा-कीर्तनादिकांच्यायोगे । पापभीरुता अंगी वागे ।
तेणे कायद्याविणहि सुमार्गे । जाती बहुजन ॥१२॥



जगी काही लोक अज्ञानी । ते दुसऱ्या ऐसी करिती करणी ।
थोरांचे आदर्श जीवन म्हणूनि । पाहिजे अनुकरणास्तव ॥१३॥
काही लोक चिकित्सक । विचार पटताचि वागती चोख ।
त्यासाठी उत्तम विवेचक । प्रचारक पाहिजे ॥१४॥
काही लोक प्रलोभनी पडले । लाभ असेल तेचि घेति भले ।
त्यांना स्वर्गसुख पाहिजे दाविले । दुःखे निवारुनि सेवकांनी ॥१५॥
परंतु भयावाचोनि काही लोक । न ऐकतीच बोध सम्यक ।
दंडाविण जैसे पशू देख । न चालतीच योग्य मार्गे ॥१६॥
त्यांना हित कोणी शिकवावे? । कोणी मूर्खाचे हृदय धरावे? ।
म्हणोनि सत्तेने सरळ करावे । ऐसा मार्ग वाढला ॥१७॥
साम, दाम, दंड, भेद । राजनीति ही बहुविध ।
कायद्याच्या आधारे शुद्ध । करू पाहे जनलोकां ॥१८॥
कायद्यानुसार गावरचना । कायद्यापरी करावे वर्तना ।
कायद्यानुसारचि जना । सहाय्य द्यावे परस्परे ॥१९॥
जो करील कायदाभंग । त्यासि दंड द्यावा, लागवेग ।
यासाठी नेमावा लागे मग । राजा, सत्ताधीश, मुखंड ॥२०॥
परि राजा हा विष्णु-अंश बरवा । ऐसा लोकी करावा गवगवा ।
तेव्हाचि कायदा त्याचा चालावा । यातहि आले प्रचारतंत्र ॥२१॥
देश हा देवचि पवित्र । कायदा त्याचे व्यवस्थासूत्र ।
ते न पाळता पातक थोर । प्रचारतंत्र हे आवश्यक ॥२२॥
सत्ता, कायदा, ध्वजावरि श्रद्धा । प्रचारेचि निर्माण होई सदा ।
त्याविण नुसते भय सर्वदा । नियमयुक्त न ठेवी ॥२३॥
उलट राजभयादि नसून । लोकात प्रचार होता पूर्ण ।
आत्मसाक्षीने वागती जन । उत्तम, हाहि अनुभव ॥२४॥
तैसेच कायद्याची चुकवोनि रेषा । किती करिती पापे नित्यशा ।
परि विचार भिन्नता प्रचारे सहसा । पाऊल न पडे वाम मार्गी ॥२५॥
सारांश सत्तानामेहि राज्य करी । प्रचारचि सर्व जीवनावरी ।
सत्ता देहासचि बंधनकारी । अंध भिकारी कायदा ॥२६॥
प्रचार मनावरि संस्कार करी । तो संस्कार अंतरी, बाहेरी ।
राज्य करोनि मानवा सुधारी । गाव करी तीर्थचि तो ॥२७॥

हे सत्तेने कधीच नव्हे । उलट चुकारासि लाभ पावे ।
गरीब, सज्जन उगीच मरावे । ऐसेहि होते ॥२८॥
सत्तेने जे कायदे केले । त्यांचे फायदे मुजोरांनी घेतले ।
आणि दुबळे, भोळे मागेच राहिले । ऐसे झाले आजवरी ॥२९॥
म्हणोनि कायदाचि नव्हे सर्व काही । प्रचाराऐसे श्रेष्ठ नाही ।
सर्वांसि मानवतेचे पाठ देई । तो नियमन करी न करिता ॥३०॥
राजे किती आले, गेले । त्यांचे कायदे नष्ट झाले ।
सत्तेचे दरबार उजाडले । परि राज्य चाले संतांचे ॥३१॥
संतांचा तो प्रचार अमर । अजूनहि लोक-मनांवर ।
राज्य चालवोनि निरंतर । लाखो जीवा उध्दरितो ॥३२॥
नलगे सत्तेचा बडगा । नको भयभीतिहि सन्मार्गा ।
आपापले कर्तव्य जगा । प्रचारसूर्यचि दाखवी ॥३३॥
जेव्हा जाणीव देणे अपूर्ण पडे । तेव्हाचि दंड, भेदाचा अवलंब घडे ।
ऐसेचि वाढत गेले पोवाडे । विकृतीचे ॥३४॥
परि दंडे अन्याय जरि नाशते । लोक जरि सुधारले असते ।
तरि तुरुंग हे न वाढते । गुन्हे न होते अधिकाअधिक ॥३५॥
हेचि जाणोनि सज्जन म्हणती । जागवा हृदयातील अंतर्ज्योति ।
तरीच सुधारेल मानववृत्ती । जग होईल आदर्श ॥३६॥
जे जे म्हणती सत्तेवाचून । गाव होईना आदर्शवान ।
त्यांचे हे म्हणणे नाही परिपूर्ण । ठेवावी खूण बांधोनि ॥३७॥
त्यासि पाहिजे सत्प्रचारक । प्रेमळ, सरळ, नम्र, भाविक ।
सत्तेवाचूनिहि करी हाक । पूर्ण लोकांची सेवाप्रेमे ॥३८॥
अहो ! जनशक्ति केवढी महान । ती जो आणील संघटोन ।
तो स्वर्गावरीहि लावी निशाण । आपुल्या कार्ये ॥३९॥
हाती न घेता तरवार । बुद्ध राज्य करी जगावर ।
त्यासि कारण एक प्रचार । प्रभावशाली ॥४०॥
जगी आजवर जे कार्य घडले । ते प्रचारकांच्या करवी झाले ।
प्रचारक नाही म्हणोनि अडले । कार्य आपुले ॥४१॥
ग्राम सुधारावयाचा मूलमंत्र । उत्तम पाहिजे प्रचारतंत्र ।
प्रचारकांवाचूनि सर्वत्र । नडते आहे ॥४२॥



प्रचारकाची पाठ वळे । तिकडे तिकडे सूर्य मावळे ।
उदासीनतेचे अंधारजाळे । पसरोनि राही ॥४३॥
प्रचार जेथे धावला दिसे । तेथील गाव स्वर्गचि भासे ।
जनलोक न्यायास साजेसे । वागती तेथे ॥४४॥
प्रचारक प्रेतात प्राण आणी । दुबळ्यासि करी कार्याभिमानी ।
बिघडवी आणि सुधारवी दोन्ही । प्रचारक ॥४५॥
प्रचार ही कला आहे । प्रचार अंतःकरणहि राहे ।
पोट भरावयाचाहि उपाय । प्रचारतंत्र ॥४६॥
प्रचार खोट्यास खपवी बाजारी । प्रचार गोट्यास देव करी ।
प्रचार युद्धाची वाजवी भेरी । वृष्टीहि करी अमृताची ॥४७॥
काहीकांचा स्वभावचि असे । अपप्रचार करोनि भरावे खिसे ।
जना नागविता आनंद दिसे । काहीकांना ॥४८॥
परि तो प्रचारक दुराचारी । आपण मरूनि इतरां मारी ।
यानेच बिघडली गावाची थोरी । अशांती संसारी माजली ॥४९॥
त्यांच्या विषारी प्रचाराहून । झाला पाहिजे प्रबल पूर्ण ।
सत्य-प्रचार आपुला महान । तरीच परिवर्तन सहज घडे ॥५०॥
जोवरि अंतःकरण नाही गुंतले । तोवरि प्रचार वरवर चाले ।
यासाठी पाहिजे जीवनचि रंगले । प्रचारकाचे ॥५१॥
मित्रहो ! आदर्श कराया ग्राम । उत्तम प्रचारक पाहिजे प्रथम ।
तरी चाले उत्तम काम । गावाचे आपुल्या ॥५२॥
राणी-माशी जाऊनि बैसली । तेथे मधमाशांची रीघ लागली ।
पाहता पाहता सृष्टी सजली । होईल ऐसे ॥५३॥
श्रोतियांनी विचारला प्रश्न । प्रचार करील गावी पूर्ण ।
तया प्रचारकाचे लक्षण । कैसे असे ? ॥५४॥
प्रचारकाचे वर्तन कैसे ? । राहणी, स्वभाव, भाषण कैसे ? ।
ध्येय, धोरण, साधन कैसे । गावासाठी ? ॥५५॥
याची उत्तरे श्रवणी ऐका । जे जे गुण व्हावेत प्रचारका ।
ते अंगी बाणता सुधारील लोका । कोणीहि सहज ॥५६॥
गावाचे भवितव्य कराया उज्ज्वल । पाहिजे प्रचारक-शक्ति प्रबल ।
प्रचारकाअंगी पाहिजे शील । सत्य, चारित्र्य, नम्रता ॥५७॥

प्रचारकाची मुख्य लक्षणे । सत्तेवाचूनि कार्य करणे ।
आत्मशुद्धिने गाव सुधारणे । गवसे तया ॥५८॥
त्यासि सत्तेची नाही चाड । नसे धनाचा मोह द्राड ।
आत्मप्रेमाचा झरा अखंड । वळवी मना ॥५९॥
प्रचारक स्वभावाचा सरळ । वाईट मनोवृत्तीचा काळ ।
अंतःकरण पाण्याहूनि निर्मळ । अहिंसक ॥६०॥
बोलण्यात राही निर्भय । कष्ट करण्यातहि पुढेच पाय ।
वागणूक तरि आदर्श राहे । प्रचारकाची ॥६१॥
प्रचारकाची दिनचर्या । वेळ जराहि न घालवी वाया ।
जे जे शोभे सेवेच्या कार्या । ते ते करी सर्वची ॥६२॥
नेत्री तयाच्या सात्विक तेज । बोलण्यात भरले असे ओज ।
राहणीत वैराग्य, त्याग सहज । प्रचारकाच्या ॥६३॥
पिकलिया फळाचे देठ तुटले । तैसे प्रचारकाचे मन झाले ।
आसक्तिविषय सर्व गेले । इंद्रियांचे ॥६४॥
इंद्रियांसि नुरली ऊर्मि । सर्व उन्मुख सेवाकर्मी ।
पावसाळा, हिवाळा, गर्मी । सारखीच त्यासि ॥६५॥
परि उदास नसे प्रचारकाची मति । नेहमी दिसेल हसरी मूर्ति ।
सदा कार्य करावयाची स्फूर्ति । स्फुरली दिसे ॥६६॥
कधी न करी चिडचीड । कोसळे कां आपत्तीचा पहाड ।
श्रम करोनि जिवापाड । लोक लावी सन्मार्गी ॥६७॥
प्रचारकासि उरले नाही घर । सर्वचि घरे त्याचे माहेर ।
सर्व जन हेचि त्याचे गोत्र । विश्वामाजी ॥६८॥
नाही सत्तेचे प्रलोभन । प्रतिष्ठेचेहि कुठले भान ? ।
आपणासाठी न मागे धन । रेंगाळोनि कोणा ॥६९॥
सत्कार्यासाठी पाठी लागे । धन, जमीन, मान मागे ।
सर्वस्व मागे, प्राण मागे । न संकोचता ॥७०॥
आपणासाठी काहीच नाही । जे करील ते सर्वांचे पाही ।
प्राण तोहि अर्पावा ही । भावना सेवेसाठी ॥७१॥
सर्व करणे सर्वांसाठी । आत्म्यासाठी, देवासाठी ।
बांधावया मनुष्यत्वाच्या गाठी । समाधाने ॥७२॥



त्यासि एकचि वासना उरली । जनता पाहिजे सुखे सुधरली ।
मानवांची दैना गेली । पाहिजे, पळोनिया ॥७३॥
सर्वांची प्रार्थना व्हावी एक । मानवांचा व्यवहार मानवा पूरक ।
राहणी सर्वांची समान, सात्विक । सर्वांसाठी ॥७४॥
याचसाठी आटाआटी । करावया पडतो संकष्टी ।
प्राण तोहि अर्पावा शेवटी । वाटे त्यासि ॥७५॥
ही भूमिका साधुसंतांची । हीच साधने प्रचारकांची ।
प्रचाराचा कळस सत्यचि । संतपण ॥७६॥
खरे प्रचारक साधु, संत । त्यांनीच कळविला जगाचा हेत ।
सत्य काय, काय असत्य । जगामाजी ॥७७॥
तेथुनीच प्रचारकांची निर्मिती । प्रचारक सत्य समजावोनि घेती ।
शंकासमाधान ऐकती । मन लावोनि ॥७८॥
जया क्षणी बोध झाला । अंतःकरणी स्फुरू लागला ।
त्यासि अभ्यासाने चांगला । बळकट करिती सत्संगी ॥७९॥
मनन करोनि आत्मसात करिती । मग पुढे तैशीच होय मति ।
एकदा वाणी रंगली सुमती । सरळ चाले माप तिचे ॥८०॥
उत्तम पुरुषाने कान फुंकले । समजा त्याने मंत्रचि घेतले ।
मग वारियापरी प्रचार चाले । प्रचारकाचा ॥८१॥
प्रचारक प्रचारानेच प्रचार करी । त्याचे माप चाले वाऱ्यावरि ।
वाहन पोहोचण्याचे अगोदरी । प्रचार धावे तयाचा ॥८२॥
जो जो कोणी जिकडे भेटला । त्यास आपुले सांगत सुटला ।
पाहणेचि नाही मेघापरी त्याला । घेतो कोणी की नाही ॥८३॥
फाटका-तुटका कोणी दिसो । गरीब-अमीर कोणी असो ।
विद्वान, शिक्षित हसो, रुसो । प्रचार त्याचा बंद नाही ॥८४॥
कोणी असो कोण्या पंथाचा । आधार देई त्यासीच त्याचा ।
ओघ चालला प्रचाराचा । खळगे भरीत दिसती ते ॥८५॥
जरा मुखवटा डोळ्यांनी पाहिला । वाचा फुटली प्रचारकाला ।
राघूपरी बोलत सुटला । होय-नव्हे सर्व काही ॥८६॥
लोकांनी जरी थांब म्हटले । तरी याचे कार्य झाले ।
जरा वेळाने पुन्हा चाले । रस्ता करीत शब्दगंगा ॥८७॥

प्रचारकाचे बोल तत्त्ववादी । अचूक धरूनि संशया छेदी ।
टोचक नसताही मर्मभेदी । सरस हृदयाचे ॥८८॥
कोणी विरोधक शिव्या देई । हसूनि त्याचे शब्द साही ।
गोड बोलूनि समजावीत जाई । आपुले म्हणणे ॥८९॥
सहनशीलताचि त्याचे ब्रीद । कधी तोंडी न ये अपशब्द ।
जरी झाला वादविवाद । तरी गांभीर्यासि न सोडी ॥९०॥
कोणासि 'हट' न बोलता । अंगी ठेवोनि सहनशीलता ।
आपुले तत्त्व बोलता, चालता । समजावोनि दे प्रचारक ॥९१॥
गोड बोलूनि मना वळवी । गावाच्या सेवेलागी लावी ।
अनंत प्रकारे वृत्ति बरवी । करोनि सोडी ॥९२॥
बिघडलेले घर सुधरवी । फाटाफूट तेथे संगति जुळवी ।
निर्दयासीहि दया उपजवी । नाना प्रयत्ने ॥९३॥
प्रचारकाची यत्नसाधना । सांगताचि न ये एक कोणा ।
नाना प्रकार, नाना योजना । प्रचारकापाशी ॥९४॥
कोठे भजनातूनि प्रचार करी । कोठे प्रार्थना करूनि कानी भरी ।
कोठे कथा सांगूनि मनासि सावरी । प्रचारक ॥९५॥
कोठे कीर्तन, प्रवचन करी । तुंबडी, पोवाडे नानापरी ।
यात्रा, उत्सव हाती धरी । प्रचारक ॥९६॥
कोठे उद्योगातून हात घाली । कोठे कलारंजनाने जनता वेधली ।
मनोरंजनातूनहि चाली । चालावी कोठे ॥९७॥
कोठे व्यायामातूनहि स्फूर्ति भरली । कोठे पार्टीतहि सभा रंगली ।
कोठे लग्नातून सुरुवात केली । पाहिजे त्याने ॥९८॥
कोठे जन्मतिथी, पुण्यतिथी । मौजीबंधनेहि न ठेवी रिती ।
जैसी वेळ पडे प्रचारकाप्रति । सर्व करी स्वभावे ॥९९॥
कोठे शिंपियाचे दुकानी । कोठे न्हावियाचे सलूनी ।
ओटी, चोहटी, चहूकोनी । प्रचार चाले ॥१००॥
हाटी, बाजारी तेचि करी । तमाशीहि तेच बोले वैखरी ।
प्रचारकाची ऐसी बावरी । जिव्हा असे ॥१०१॥
कोठे आईबाईपाशी बैसे । त्याने घरातील वळवी माणसे ।
काय मार्गाने प्रचारक घुसे । हे तो सांगता न ये कोणा ॥१०२॥



कामातूनि, गाण्यातूनि । हसण्यातूनि, व्यसनातूनि ।
चालता, बोलता प्रचारवाणी । रंगे त्याची ॥१०३॥
प्रचारक असे बालकात बालक । तरुणासि बोधाया तरुण सम्यक ।
वृध्दासि द्यावया अनुभव तात्त्विक । त्यांचेपाशी ॥१०४॥
मुलांत जाऊनि सेवा वाढवी । मुलींमाजी कला उपजवी ।
तरुण – तरुणी दोघांतेहि लावी । गाव – सेवेला ॥१०५॥
व्यसनाधीनाची धरी संगती । परि नीट करावया त्याची मति ।
डाव न चुके कल्पांती । प्रचारकाचा ॥१०६॥
नाना कला त्याच्या अंगी । जैसी वेळ पडे प्रसंगी ।
रंगवी नाना साधन – रंगी । प्रचार आपुला ॥१०७॥
तारतम्य ठेवोनि अंतरी । गोड बोलोनि प्रचार करी ।
वाटे टाकली मोहनी बरी । गावावरि प्रचारकाने ॥१०८॥
तो प्रचारक आवडे सर्वांच्या मनी । त्यासि बघताचि पडे मोहनी ।
लोक धावती बोलताक्षणी । कार्य कराया गावाचे ॥१०९॥
हा–हा म्हणता गावात फिरला । सवे लोकांचा थवा घेऊनआला ।
सांगेल तैसे करू लागला । प्रचारक त्यासि ॥११०॥
ऐसा प्रचारक जादुगर । त्याच्या मुठीत जनसागर ।
नव्या सृष्टीचा कारागीर । साधासुधा ॥१११॥
प्रचारक सर्वांशी बोलणी पुरे । ज्ञान अंगी त्याच्या संचरे ।
रोमरोमात – वैराग्य अंकुरे । दिसती तयाच्या ॥११२॥
म्हणोनि असे आकर्षण । लोक धावूनि येती पक्ष्यासमान ।
करावया गाव स्वयंपूर्ण । प्रचारकचि पाहिजे ॥११३॥
त्याचे अंगी महान निश्चय । जे संकल्पील, घेईल ठाय ।
नाना करोनि उपाय । साधील त्यासि ॥११४॥
त्याचा प्रचार महाप्रबल । चालतसे सर्वस्पर्शी, सर्वकाल ।
प्रचाराविण एकहि बोल । न निघे त्याचा ॥११५॥
'काय करावे' हेचि बोलणे । न करावे ते ते काहीच न जाणे ।
'नाही' हे बोलणेचि उणे । त्याच्या जीवनकोशी ॥११६॥
काय नाही आमुच्या गावी । त्यासि ही वदंताच कळावी ।
हाती घेता करोनि दावी । पूर्तीच त्याची ॥११७॥

नसले ते ते उभे करी । लोकजीवनाची कलाकुसरी ।
चेतना जीवा – जीवात भरी । सत्कार्याची ॥११८॥
ज्याचा प्रचार हाती धरला । समजोनि जावे पूर्ण केला ।
नाहीतरि आपणचि मेला । समजावा प्रचारक ॥११९॥
म्हणोनि बोललो गावाचे अधिष्ठान । प्रथम पाहिजे प्रचारक महान ।
जी जी असेल ती उणीव भरोन । काढावया गावाची ॥१२०॥
सारांश, प्रचारक ज्या गावी । तेथे दुसरी पंढरीच जाणावी ।
जना, मना पाषाणा नाचवी । आनंदाने ॥१२१॥
ऐसे प्रचारक निवडा गावी । मग गाव नांदेल वैभवी ।
सेवामंडळे स्थापूनि द्यावी । सेवेसाठी ॥१२२॥
ऐसे गाव ज्यांनी केले । तेचि कीर्तिवंत होती भले ।
म्हणोनि पाहिजे आरंभिले । प्रचारकार्य ॥१२३॥
त्यासाठी पुनःपुन्हा बोललो । प्रचारक करावयासि लागलो ।
प्रचारकांकरवी झालो । 'दास' सर्व लोकांचा ॥१२४॥
निश्चये ग्राम निर्मावया । प्रचारक हाचि मुख्य पाया ।
ग्रामगीताहि याच कार्या । निर्माण केली तुकड्या म्हणे ॥१२५॥
इतिश्री ग्रामगीता ग्रंथ । गुरु – शास्त्र – स्वानुभव – संमत ।
कथिला प्रचार महिमा येथ । आठवा अध्याय संपूर्ण ॥१२६॥


॥ सद्‌गुरुनाथ महाराज की जय ॥

''भिक्षुंनो ! धर्म वादविवादात नाही, तो प्रत्यक्ष वागणुकीत आहे. आधी स्वतः त्याचा आचार करा नि मग गावोगावी दारोदारी फिरून लोकांत त्याचा प्रचार करा. सगळीकडे सुख–शांतीची एक लाट पसरून जाऊ द्या.

**– भगवान गौतम बुद्ध**



# ॥ चित्र परिचय ॥



## अ. ९ – श्रीसंत दामाजी महाराज

संत दामाजीने सेवा केली । प्रसंगी धान्य कोठारे लुटविली ।
देवानेहि कदर केली । फेडले ऋण येवोनि ॥२८॥

१३ व्या शतकात महाराष्ट्रात १२ वर्षांचा 'दुर्गादेवीचा दुष्काळ' पडला असता मंगळवेढ्याचे सुभेदार दामाजी यांनी सरकारी धान्य लुटवून लोकांचे प्राण वाचविले व एका देवहृदयी महाराने त्यांच्यावर होणाऱ्या राजकोपाचे निवारण केले. ''हरहर विठ्ठल जगदुद्धार ! जाहला महार मजसाठी'' – (दामाजी) ही प्रसिद्ध कथा म्हणजे सेवेचा सक्रिय पाठच होय !

• अध्याय नववा •

# सेवा–सामर्थ्य

॥ श्रीगुरुदेवाय नमः ॥

श्रोतियांनी विचारिले । प्रचारकार्याचे महत्त्व कळले ।
परि हे सर्वांसीच साधेल भले । ऐसे नाही ॥१॥
आदर्श प्रचारक मिळणे कठीण । मिळाले तरी टिकणे कठिण ।
आमुच्यासाठी दुजा मार्ग कोण । ग्रामोन्नतीचा ? ॥२॥
तरी ऐका याचे उत्तर । मी एक गाव पाहिले सुंदर ।
शिस्त, शांतता, व्यवस्था घरोघर । लोक निर्व्यसनी तेथीचे ॥३॥
पाहूनि वाटले आश्चर्य ! । शोधिले, कोणाचे हे कार्य ? ।
कोणा प्रचारकाचे चातुर्य । फळा आले ? ॥४॥
तव तो नेता आला समोर । लोकांनी त्याची करिता पुकार ।
म्हणे मी आपुला सेवक साचार । होतो वर्गात एकदा ॥५॥
त्यासि पाहता नवल वाटले । कैसे याने हे कार्य केले ? ।
ज्यासि बोलताहि न ये चांगले । कलाकुशलता नाही अंगी ॥६॥
दिसे बिचारा साधाभोळा । परि हृदयी कार्याचा जिव्हाळा ।
हवा – हवाच वाटे सकळा । सेवागुणे ॥७॥
प्रचार न करिताहि सेवा । आकर्षित करू शके गावा ।
हाचि रहस्यबोध बरवा । मिळे या ठायी ॥८॥
सेवा शब्दाविणहि बोलकी । सर्व लोकां करोनि सुखी ।
त्यांचे हृदय सहज जिंकी । आत्मीयता वाढवी ॥९॥
नाना साधनी केला प्रचार । त्याने जरी होतो संस्कार ।
तरी सेवेविण निर्धार । न राहे टिकोनि जनांचा ॥१०॥
सेवेने मन हाती घ्यावे । तरीच ते उकलोनि वळविता यावे ।
नुसत्या उपदेशाच्या प्रभावे । कार्य न टिके जीवनी ॥११॥
अहो ! उत्तम प्रचारक नाही बोलला । तरी आवडे त्याचे वर्तन लोकाला ।
मोह पाडी गावकऱ्याला । सेवाप्रेम त्याचे ॥१२॥



तो जंव जंव मार्गी चाले । कार्य करी पाउलापाउले ।
लोक पाहताचि नम्र झाले । दिसती त्यासि ॥१३॥
तो नसेल जरी बोलका । व्याख्याता, उपदेशक नेटका ।
तरी वक्त्या पंडितांहूनि लोकां । वजन तयाचे ॥१४॥
ऐसेचि लोक गाव सुधारती । देशाचे नाव उज्ज्वल करिती ।
नसेना कोणा त्यांची माहिती । सुगंध उधळती वनपुष्पे ॥१५॥
मोठे महाल उभारिले । पाहावयास उंच दिसले ।
तरी ते दगडावरि ठाकले । पायाच्याचि ॥१६॥
पाईक दगड काही दिसेना । परी महत्त्व त्यासचि असे जाणा ।
तैसे सेवेचे महत्त्व राष्ट्र – उत्थाना । सर्वतोपरी ॥१७॥
ज्याची सेवा करील प्राणी । त्याचे मन घेई मोहूनि ।
लंगोटीहि देईल सोडूनि । उदारपणे तो ॥१८॥
सुंदर गायन मृगा ऐकविले । त्याचे हृदय प्रसन्न झाले ।
मग न कळे त्या सर्वस्वहि घेतले । ऐसे होते ॥१९॥
सेवेने अंगी सामर्थ्य येते । जे जे बोलाल तेचि घडते ।
हस्ते, परहस्ते सर्वचि होते । काम त्याचे ॥२०॥
लोकास एकदा भरवसा आला । म्हणजे सेवा रुजू झाली भगवंताला ।
मग काय उणे असे त्याला ? । मागेल ते ये धावोनिया ॥२१॥
सेवकास संकल्प करणे पुरे । इच्छा होता घरी अवतरे ।
वाटेल त्या मार्गे सारे । घडे मनासारिखे ॥२२॥
परि ते नसे उपभोगास्तव । ऐसे सेवक मानील सदैव ।
तोचि भोगिल सेवेचे वैभव । शेवटवरि ॥२३॥
ज्यासि उपभोग – वासना झाली । त्याचि सेवाचि संपली ।
पुढे पुढे निंदा झाली । होईल ऐसे ॥२४॥
परि जो सेवाचि मानतो धन । काही अपेक्षा न ठेवोन ।
तो झाला शेवटी भगवान । पुजू लागले घरोघरी ॥२५॥
लोक धनवानांना पुसेना । लोक सत्तेला ओळखीना ।
परि सेवाधाऱ्याचे चरणा । पुजू लागती जीवाने ॥२६॥
जगात जेवढे पूज्य पुरुष झाले । ते सर्व सेवेनेचि गौरव पावले ।
सेवा सोडताचि राक्षस ठरले । मारले गेले देवाकरवी ॥२७॥

संत दामाजीने सेवा केली । प्रसंगी धान्य कोठारे लुटविली ।
देवानेहि कदर केली । फेडले ऋण येवोनि ॥२८॥
येथे देवाने फेडले ऋण । म्हणजे मुखी थाटले नारायण ।
पुरविले बेदरी जाऊनि धन । भलतियाने ॥२९॥
कोणा मुखी काय ठाके । हे कोण सांगेल कौतुके ? ।
जरि कर्म असेल निके । जनसेवेचे ॥३०॥
सर्व कर्मे, व्रते करोनि । तीर्थाटनी, वनी फिरोनि ।
करावी लागते सेवाच जनी । सत्कीर्तीसाठी ॥३१॥
तीर्थी दान, सत्पात्रभोजन । यज्ञादिकी खर्चावे अन्न, धन ।
त्यात सेवादृष्टीनेच सांगितले पुण्य । एरव्ही मिथ्या ॥३२॥
ज्यासि जरुरी त्यासि न द्यावे । पवित्र स्थान म्हणोनि उधळावे ।
तरि तेणे पुण्य कधी न पावे । जनसेवेचे ॥३३॥
तीर्थ समजती पुण्याची खाणी । आणि पापमय गावीचे प्राणी ।
त्यासि तीर्थीहि धोंडापाणी । सांगितले संती ॥३४॥
काशीच्या गंगेची कावडी । ओतावी तहानेल्या जीवाचे तोंडी ।
यातचि तीर्थाहूनि पुण्यकोडी । सांगती नाथ ॥३५॥
आपण झिजोनि अंगे स्वतः । जीवजंतूसि द्यावी प्रसन्नता ।
सुखी करावी गावीची जनता । हीच सेवा पुण्यकर ॥३६॥
ऐसी सेवा जया घडे । तुटे संसाराचे बिरडे ।
सखा भगवंत हृदयी जोडे । अंतर पडेना यासि ॥३७॥
सेवा हीच धन, संपत्ति खरी । न सरे जन्मजन्मांतरी ।
वाढवी विश्वाभिमान अंतरी । ग्राम – पूजन सेवामय ॥३८॥
म्हणोनि म्हणतो सेवा करा । उत्तम हाचि मार्ग बरा ।
आपल्या जन्मासि उद्धरा । गावासहित ॥३९॥
जरि कराल सेवा ऐसी । तरीच उद्धराल जीवासि ।
उन्नत कराल गावासि । सर्वतोपरी ॥४०॥
एरव्ही सर्वचि करिती सेवा । कोणी कुटुंबसेवा, कोणी लोकसेवा ।
परि त्याने ग्रामोद्धार कां न व्हावा । तेहि सांगो ॥४१॥
सेवेसाठी सर्वचि तत्पर । चालला सेवेनेच व्यवहार ।
या सेवेचे नाना प्रकार । परि वर्म वेगळेचि ॥४२॥



'आमुच्या गावाचा मी पाटील । म्हणोनि करितो सेवा बहाल' ।
म्हणवितो ऐसा सेवक खुशाल । परि राबवी गरिबाला ॥४३॥
ज्याची बैलजोडी उपाशी । आतावरि गेली होती कामासि ।
परि दया न येता म्हणे त्यासि । जुंप गाडी साहेबासाठी ॥४४॥
दुपारवरि काम केले । घरी जेवावयासहि नाही गेले ।
तरी बोलावून घातले । बिगारीसाठी ॥४५॥
जोडी, माणसे मारूनि उपाशी । खूश करतो साहेबासि ।
याची आपुली सेवा ऐसी । साहेब म्हणे धन्य तया ॥४६॥
आमुच्या घरी झाले लग्न । परि गावकऱ्यासि भासले विघ्न ।
खाती चोरपोर झपाटून । कष्ट करणारे मेले घरी ॥४७॥
गावी मेजवानीच्या घातल्या पंगती । सेठ, सावकार जमवोनि अति ।
केली गोरगरिबांची माती । कदर नाही तयांची ॥४८॥
'चले बे साली' म्हणोनिया । जमा केल्या आयाबाया ।
घरचे काम टाकूनिया । बिगार केली रात्रंदिनी ॥४९॥
शेवटी कामे सुंदर झाली । शाबासकी जहागिरदारा मिळाली ।
कामे करणारी उपाशी पाठविली । हेहि एक सेवा असे ॥५०॥
साहेब येतो आमुच्या गावी । म्हणोनि रात्र जागवावी ।
मरेमरेतो करावी । गाव – दुरुस्ती लोकांनी ॥५१॥
याने तोंडपाटीलकी करावी । कपड्यास वळी पडो न द्यावी ।
शेवटी शाबासकी यानेच घ्यावी । जनता सगळी दूरचि ॥५२॥
गाव केले अति सुंदर । राबवोनि नारी, नर ।
तेथे नाव एकट्याचे थोर । 'सेवाशील नेता' म्हणोनि ॥५३॥
एकाने खूप धन लाविले । गावी उत्तम देऊळ केले ।
उदार म्हणोनि नाव गाजले । परि नाही कळले वर्म त्याचे ॥५४॥
आधी लुटले जनलोकांसि । जमा केल्या धनाच्या राशी ।
मग बांधिले देऊळासि । शीग काही उतरेना ॥५५॥
चोरी करूनि धनी झाला । दान देण्यात शूर ठरला ।
बिचारा गरीब तसाचि मेला । कळला नाही कष्ट करोनि ॥५६॥
म्हणती सेवकाचे फोटो लावा । आदर्श सामोरीच दिसावा ।
हीहि आहे उदंड सेवा । भिकारी म्हणती अन्नदाता ॥५७॥

काही देवाचे भजन करिती । मनी प्रतिष्ठेची हाव धरिती ।
भोळ्या, भाळ्या लुबाडिती । 'आम्ही सेवक' म्हणोनिया ॥५८॥
मनात येईल तेवढी वर्गणी । गोळा करावी चहूबाजूंनी ।
'सेवेसाठी बांधू धर्मशाळा' म्हणोनि । शेवटी राहावे आपणचि ॥५९॥
जमा करावा आधी फंड । ज्ञान सांगोनिया उदंड ।
जनसेवेचे कार्य प्रचंड । तपशीलवार रेखाटूनि ॥६०॥
दावूनि त्याचे फायदे नाना । उत्तेजित करावे लोकांना ।
शेवटी सेवेच्या नावे धिंगाणा । स्वार्थाचाचि चालतसे ॥६१॥
काहीजण यज्ञयागादि करिती । विश्वशांतीचे ध्येय बोलती ।
आपणचि मेजवानी झोडती । सेवक सगळे म्हणवोनि ॥६२॥
लोकांसि व्हावी मदत उत्तम । म्हणोनि करिती धर्मार्थ कार्यक्रम ।
त्यात चैन करुनि वाढवावे नाम । ऐसेहि सेवक असती काही ॥६३॥
सेवा आपुल्या हौसेसाठी । नाहीतरि कोण करी आटाआटी ? ।
प्रतिष्ठा होताच समाधान पोटी । मानती प्राणी ॥६४॥
काही जनांनी सेवा केली । नाव न निघता झुगारुनि दिली ।
उलटी भांडणे माजविली । 'आपुले काय ?' म्हणोनि ॥६५॥
काहींनी धंदा उभा केला । सेवेने दिपविले थोरा–मोठ्याला ।
आतूनि नष्ट केले लोकजीवनाला । भ्रष्ट वस्तु पुरवोनिया ॥६६॥
एक तमासगीर मजसी भेटला । त्याने वेश्या जमवोनि नाच केला ।
म्हणे मी सेवा अर्पावयाला । झटतो आहे जनतेसि ॥६७॥
कोणी काळाबाजार, लाचलुचपती । यांचेहि बुद्धिने समर्थन देती ।
लोकांच्या अडचणी हातोहाती । भागवू म्हणती सेवाचि ही ॥६८॥
एकाने भिकारी जमा केले । गावोगावी सोडूनि दिले ।
त्यांचे पैसे हिरावून घेतले । सेवा केली म्हणोनिया ॥६९॥
कोणी कोणी सेवा करी । तन, मन लावोनि हवे तोवरि ।
फोटो काढण्यापुरती चाकरी । पुढे फरारी होताति ॥७०॥
काही सेवेस्तव प्रवासा गेले । चारीकडोनि फिरोनि आले ।
पुढे बिचारे घरी बसले । मतलब झाला म्हणोनिया ॥७१॥
काहींनी लोकां चेतविले । सेवा–म्हणोनि तट पाडले ।
आपण आतूनि मिळोनि गेले । स्वार्थ साधला म्हणोनिया ॥७२॥



एकाने जनता घ्याया हाती । सेवाव्रताची केली प्रगती ।
शेवटी घेतली सत्ता हाती । सेवा घडावी म्हणोनिया ॥७३॥
गेली सेवेत वर्षे किती । आता अधिकार व्हावा म्हणती ।
शेवटी लोकांस पिळूनि खाती । करू प्रगति म्हणोनिया ॥७४॥
काहींनी सेवा आरंभिली । सेवा घेण्यातचि वेळ गेली ।
ज्याची सेवा हाती घेतली । त्याचेच मोडले कंबरडे ॥७५॥
सेवा करायासि साधू आले । नवरदेवापरी तोरा चाले ।
सेवेऐवजी जडचि झाले । पारडे यांचे ॥७६॥
आजवरी जन ऐसेचि फसले । म्हणोनि पाहिजे सावधान केले ।
विचाराविण जे सेवाकार्य चाले । घातुक झाले ते सर्व ॥७७॥
ऐसी नसावी सेवा कोणाची । सेवेने वृद्धी व्हावी सहकार्याची ।
गरज पुरवावी परस्परांची । लोभ न ठेविता ॥७८॥
सर्वांस व्हावे समाधान । सेवक–सेवाभावियांसि पूर्ण ।
घेता, देता, दोघेजण । संतुष्ट व्हावेत सेवेने ॥७९॥
सेवा नसावी वरपंग दांभिक । आत एक, बाहेर एक ।
सेवा नसावी कृत्रिम, सुरेख । कागदी फुलांपरी ॥८०॥
सेवा नसावी प्रतिष्ठेपुरती । सेवक नव्हे तो, जो आपस्वार्थी ।
बिघडविल जनजीवनाची शांती । दुष्परिणामी सेवेने ॥८१॥
खरी सेवा म्हणजे निष्काम कर्म । परस्परांच्या सुखाचे वर्म ।
समजोनि करील जो त्याग–उद्यम । तोचि सेवाभावी समजावा ॥८२॥
ज्याने आपुले घर विसरावे । त्यानेच 'गाव माझे' म्हणावे ।
तोचि करील जीवे भावे । सेवा आपुल्या गावाची ॥८३॥
ज्यासि घरची आवड निवड । तो घालू न शके लोकहिताची सांगड ।
जरी बोलका असेल गोडधड । तरी लोक त्याचे न ऐकती ॥८४॥
ज्याचा घरचा स्वार्थ वाढला । त्यासि लोकसेवा व्यवसाय झाला ।
ऐसे दिसता जनतेला । कोण मानील भावाने ? ॥८५॥
स्वार्थासाठी बुवा बने । स्वार्थासाठी नेता होणे ।
स्वार्थासाठी प्राणहि देणे–घेणे । सर्वचि करिती बिचारे ॥८६॥
परि यातून जो निघाला । निष्काम सेवा कराया लागला ।
तोचि सेवक म्हणोनि चमकला । सर्व लोकी ॥८७॥

म्हणोनि कार्यकर्त्याने ओळखावे । आपुले स्वार्थ आवरोनि घ्यावे ।
तरीच पाऊल पुढे टाकावे । सेवेसाठी ॥८८॥
सूर्य सकळांची सेवा करी । बदला न मागे तिळभरी ।
सातत्याने चाले तयाची चाकरी । सेवाभावे ॥८९॥
'वृक्ष सर्वांची सेवा करितो । छाया, पुष्पे, फळे देतो' ।
शेवटी प्राण तोहि कार्या लावितो । सेवेसाठी ॥९०॥
मागे काहींनी सेवा केली । धन धान्य, राज्येही अर्पिली ।
शेवटी देह देवोनीही पूर्ति केली । सेवेची त्यांनी ॥९१॥
त्यांच्या सेवेची पुराणे झाली । त्यांची कीर्ति स्फूर्तिरूपा आली ।
ती आपणहि पाहिजे अंगिकारिली । सेवा कराया ॥९२॥
सेवेचे अनंत प्रकार । ते समजोनि करावी निरंतर ।
आपणासि साधेल तो व्यवहार । सेवाभावाने करावा ॥९३॥
अन्नसेवा, धनसेवा । श्रमसेवा, ज्ञानसेवा ।
शेवटी ते प्राणसेवा । औषधादि रूपे ॥९४॥
व्यवहारसेवा, सद्धर्मसेवा । सर्वात मोठी आत्मसेवा ।
आत्मसेवेतचि सर्व सेवा । साधती सत्य ॥९५॥
आत्मसेवा नव्हे इंद्रियसेवा । तो आहे निर्मळ ज्ञानठेवा ।
गाव तितुका उन्नत करावा । सत्संगतीने ॥९६॥
सेवा म्हणजे एक नव्हे । प्रत्येक कार्य सेवामय आहे ।
परि त्यात व्यक्तिभावे न साहे । संग्रहवृत्ति ॥९७॥
अपरिग्रह सर्वतोपरी । हेचि सेवा आहे खरोखरी ।
त्याहिपेक्षा आणिक सरोबरी । आहे सेवेची ॥९८॥
आपण भूमिसमान राहावे । दीन हीना वरि उचलावे ।
त्यातचि समाधान मानीत जावे । सेवकाने ॥९९॥
आपण द्यावे, आपण द्यावे । हेचि अंतरी जपत राहावे ।
आपुले कष्ट अर्पोनि सेवावे । यज्ञशेष जैसे ॥१००॥
कष्ट व्हावे सर्वां त्यापरी । यशहि वाटावे सर्वांचे घरी ।
आपण काहीच नाही, चतुरी । मानावे ऐसे ॥१०१॥
प्रतिष्ठेसाठी सेवा नोहे । ती स्वाभाविक हौसचि आहे ।
आत्मसमाधान हेचि राहे । पूर्ण फळ तियेचे ॥१०२॥



आम्ही सर्व गाव साफ केले । सर्वांच्या मनी सुख वाटले ।
सर्व लोक आनंदित झाले । हीच त्याची पूर्णता ॥१०३॥
आमुच्या गावी थोर आले । म्हणोनि ग्राम सुंदर सजविले ।
परि करणारांचेचि नाव पुढे केले । तोचि खरा सेवक ॥१०४॥
नाहीतरि कष्टासि दडे मागे । नाव होता पुढे धाव घे ।
लोक हासती नाना रंगे । टिंगल करोनि नेत्याची ॥१०५॥
ज्यासि आहे प्रलोभन । ईर्ष्या, राग, द्वेष जाण ।
त्याची सेवा विडंबन । समजा खऱ्या सेवेचे ॥१०६॥
जो दुसऱ्यासि उत्तम करितो । त्यातचि आनंद मानतो ।
तोचि सेवक मी समजतो । येत्या युगाचा ॥१०७॥
प्रत्येक जीवाचा हाचि विकास । सर्वांभूती समजावे आपणास ।
तैसेचि साधावे व्यवहारास । आपणासि नमवोनिया ॥१०८॥
सर्वांचा भार आपणावरि । तीच समजावी सेवा खरी ।
हे कठिण व्रत न साधे जरी । आपले ओझे तरी नसावे ॥१०९॥
आपुल्या आल्याचा न पडो धाक । आपल्या गेल्याचा होवो शोक ।
ऐसा मोहनी – वृत्तीचा सेवक । पाहिजे गावी ॥११०॥
नाहीतरि सेवक आला घरा । धाक पडला रांडापोरा ।
आता कोठोनि याची व्यवस्था करा? । म्हणती आम्ही गरीब ॥१११॥
वास्तविक सेवक येता घरा । मिळावा सर्व घरासि सहारा ।
आनंद वाटावा लहान, थोरां । खेळीमेळी तयाच्या ॥११२॥
सेवाभावी आला गावी । तेव्हा दसरा–दिवाळीच वाटावी ।
सर्वांची मने संतोषावी । सहकार्याने ॥११३॥
ऐसा सेवक असावा आदर्शवान । राहणी, बोलणी करील भजन ।
सदासर्वदा सत्कार्यी मन । सेवकाचे ॥११४॥
अडीअडचणी लोक सांगे । सेवक पुरवोनि देई अंगे ।
ऐसे जीवजनांचे अनंत प्रसंगे । काम करी सेवक तो ॥११५॥
प्रयत्न करी नानापरी । दुर्गुण काढावया बाहेरी ।
तारतम्य ठेवोनि अंतरी । तेचि असे सेवाकार्य ॥११६॥
त्यास आपुले ठावेचि नाही । जे जे करील ती सेवाचि सर्वहि ।
कामे करोनीहि वाचा नाही । स्वार्थ, सुखाची ॥११७॥

घरी, दारी सर्वदुरी । सेवकाचे प्रेम सर्वांवरि ।
तरीच तो प्रचार करी । आदर्शाचा कृतीने ॥११८॥
गावी असोत पक्ष, पंथ । भिन्न जाती, मते अनंत ।
ती सर्वचि गुंफिली जातील सूत्रात । सेवेच्या एका ॥११९॥
ऐसाचि सेवक जनतेने पाळावा । त्याचि मार्गे गाव उत्तम करावा ।
सर्व लोकात प्रेमभाव निर्मावा । सेवकाने ॥१२०॥
ऐशा सेवकाची अति जरूरी । सेवक पाहिजे घरोघरी ।
सेवकावाचूनि कुटुंब, नगरी । उत्तम नव्हे ॥१२१॥
म्हणोनि बोलिलो बोल । सेवा कार्य महाप्रबल ।
सेवक मिळता सुखी होईल । गाव सारे ॥१२२॥
श्रोतेहो ! समजा याचे महत्त्व । सर्वांत लोकसेवेचे श्रेष्ठत्व ।
हृदयी पटवोनि घ्या तत्त्व । निघा सेवा करावया ॥१२३॥
त्यासि कला, कुशलता नको कांही । प्रांजळ जिव्हाळाचि यशदायी ।
लागा लागा या मार्गी सर्वहि । तुकड्या म्हणे ॥१२४॥
इतिश्री ग्रामगीता ग्रंथ । गुरु – शास्त्र – स्वानुभव – संमत ।
सेवा-साधना वर्णिली येथ । नववा अध्याय संपूर्ण ॥१२५॥

॥ सद्‌गुरुनाथ महाराज की जय ॥

## ॥ अभंग ॥

करितां परोपकार । त्याच्या पुण्या नाही पार ॥
करितां परपीडा । त्याच्या पापा नाही जोडा ॥
आपुले परावे समान । दुजा चरफडे देखोन ॥
आवडे जगा जे काही । तैसे पाही करावे ॥
उघडा घात आणि हित । सेना म्हणे हे निश्चित ॥

– श्रीसंत सेना महाराज



## ॥ चित्र परिचय ॥



## अ. १० – श्रीगुरु गोविंदसिंह

फोड चोखाया लावोनि जैसे । शिष्य निवडिले रामदासे ।
मृत्युच्या कसोटीवरि पाहणे तैसे । गुरु गोविंदसिंहाचे ॥१००॥

शिख धर्माचे दहावे ‘गुरु’ व वीर संत. सन १७०० मध्ये आनंदपूर येथे यज्ञ करून ‘गुरुदक्षिणा म्हणून धर्मासाठी शिर द्यायला कोण तयार आहे? अशी त्यांनी विशाल समाजाला हाक दिली व क्रमशः दयाराम खत्री (लाहोर), धर्मदास जाट (दिल्ली), मोहकम शूद्र (द्वारका), साहेबचंद्र न्हावी (बेदर) व हिम्मत कहार (जगन्नाथ) हे त्यांच्या मृत्युच्या कसोटीवर उतरताच या पंचप्याऱ्यांना मुख्य करुन जातिभेदरहित ‘खालसा’ संघटना स्थापन केली. त्याची ही ‘निवडणूक’ आदर्श आहे ! ‘‘चिडियोंसे मै बाज लडाऊँ’’। सवा लाख से एक लडाऊँ । जब गुरु गोविंद नाम कमाऊँ’’ याप्रमाणे शिकरा पक्षी शूरतेचे प्रतिक म्हणून त्यांनी पुढे केला. गुंड राज्याच्या प्रतिकारार्थ स्वतःच्या मुलांची व सर्वस्वाची आहुती देणारा हा महात्मा म्हणजे ग्रामनेत्यांचे स्फुर्तिकेंद्रच !

• अध्याय दहावा •

# संघटन–शक्ती

॥ श्रीगुरुदेवाय नमः ॥

एक सेवानुभवी श्रोता । गहिवर दाटोनिया चित्ता ।
म्हणे माझी ऐका शोककथा । एकदा कानी ॥१॥
सेवावृत्तीने वागता । ग्रामोद्धाराचे फळ ये हाता ।
लोकवशिकरणाचा सेवेपरता । मंत्र नसे कोणी ॥२॥
हे आहे सर्वचि खरे । अनुभवासहि ये निर्धारे ।
परि काही लोक स्वार्थभरे । द्वेषी होती सेवेचे ॥३॥
त्यात काही विद्वान, काही श्रीमान । राजदरबारीहि काहींचे वजन त्यांना ।
गावाचे हवे पुढारीपण । स्वार्थासाठी जेथे तेथे ॥४॥
लोक राहावेत पंखाखाली । म्हणजे आपुली पोळी पिकली ।
म्हणोनी खेळती अनेक चाली । सोंग घेवोनि सेवेचे ॥५॥
देती मिळवोनि दुर्मिळ सामान । कोणास काही प्रलोभन ।
व्यसनी गुडांस देती प्रोत्साहन । करिती संपादन प्रेम ऐसे ॥६॥
तेथे आमुची सेवा सगळी । प्रसंगी होऊनि पडे दुबळी ।
जनता फसते भोळी भाळी । जाऊनि जाळी तयाच्या ॥७॥
आमुच्या गावी हेचि झाले । गाव सेवकांनी उत्तम केले ।
परि पुढे दुर्भाग्य ओढवले । याच मार्गे ॥८॥
सुंदर वेली लावल्या अंगणी । घालोनिया परिश्रमाचे पाणी ।
फुला – फळांनी गेल्या बहरोनि । गगन भेदी ॥९॥
तैशात सोसाटियाने आणावे वादळा । गळावा फळे, फुले, पाचोळा त्यासवे ।
वेलींचाहि चोळामोळा । व्हावा क्षणी ॥१०॥
कैसे दुःखी न होईल मन । ज्याने वाढविले करोनि जतन ।
गेले घराचेचि सुंदरपण । एकाएकी ॥११॥
तैसे गाव नीतीने जतन केले । मुलांबाळांसहि सांभाळिले ।
परस्परात प्रेम नांदले । सेवागुणे खेळीमेळी ॥१२॥



परि घुसले गावचे भेदी । लाविली स्वार्थासाठी उपाधि ।
उगीदुगी करोनि भ्रमविली बुद्धि । पाडली फूट ॥१३॥
सेवेचे सोंग उभे केले । आपले स्तुतिपाठक घुसविले ।
वाईट झाले ते ते माथी मारले । खऱ्या सेवकांच्या ॥१४॥
नथीतून जैसा मारावा तीर । तैसे असती बहादूर ।
परि गाव केला चकनाचूर । द्वैत पाडोनि ॥१५॥
नाना तऱ्हेचे वाद वितंड । नाना पक्षांचे माजविले बंड ।
कधी आड, कधी उघड । सुरू झाले कार्य त्यांचे ॥१६॥
गोंधळवोनि टाकिले जनमना । झाला प्रेम–शक्तिचा धिंगाणा ।
जिकडे पाहावे तिकडे कल्पना । फुटीर वृत्तिच्या ॥१७॥
काही सज्जनांनी गाव जमविले । काही गुंडांनी गाव नाशविले ।
नाना तऱ्हेचे तमाशे झाले । गावी आमुच्या ॥१८॥
व्यक्तिस्वार्थ बोकाळला । जो तो मनाचा राजा झाला ।
वेगवेगळ्या प्रलोभनी गुंतला । समाज सारा ॥१९॥
अमिषामाजी लपला गळ । परि माशासी दिसे आमिषचि केवळ ।
तैसे भ्रमिष्ट झाले लोक सकळ । प्रलोभनापायी ॥२०॥
काही अतिनम्रता दाखविती । साहेबांचे जोडेहि पुसती ।
मनी वासना वाईट धरती । अधिकारी व्हाया गावाचा ॥२१॥
नाही कोणा सेवेचे भान । घालिती सत्तेसाठी थैमान ।
गाव केले छिन्नभिन्न । निवडणूकी लढवोनि ॥२२॥
गावी होती निवडणुकी । माणसे होती परस्परात साशंकी ।
कितीतरी पक्षोपक्षांनी दुःखी । व्यवहारामाजी ॥२३॥
तैसीच येथे गति झाली । कोणी जातीयतेची कास धरिली ।
कुचेष्टा करोनि प्रतिष्ठा मिळविली । वचने दिली हवी तैसी ॥२४॥
काहीकांनी मेजवानी दिली । दारू पाजूनी मते घेतली ।
भोळी जनता फसवोनि आणिली । मोटारीत घालोनिया ॥२५॥
ऐसा सर्व प्रकार केला । गुंडगिरीने निवडून आला ।
म्हणे संधी मिळाली सेवकाला । सेवा करीन सर्वांहूनि ॥२६॥
साधन ज्याचे मुळात अशुद्ध । त्याचा परिपाक कोठून शुद्ध? ।
लोकां पिळोनी व्हावे समृद्ध । गावी दुफळी माजवोनि ॥२७॥

सत्तेसाठी हपापावे । वाटेल तैसे पाप करावे ।
जनशक्तीस पायी तुडवावे । ऐसे चाले स्वार्थासाठी ॥२८॥
याने गावाची होय दुर्दशा । मतमतांतराचा वाढे तमाशा ।
सज्जनांची होय निराशा । मरणापरी ॥२९॥
आता सांगा काय करावे? । कासयाने गाव सुधारावे ? ।
जे जे होईल ते ते पाहावे । ऐसे वाटे निराशपणे ॥३०॥
ऐसा श्रोतयाने प्रश्न केला । मी तो मनापासोनि ऐकला ।
मित्रहो ! उपाययोजना तुम्हाला । सांगतो माझेपरी ॥३१॥
परिस्थिती ही साचचि आहे । परि निराश होणे काम नोहे ।
दुर्जनांचे बळ वाढाया हे । कारण होई निराशा ॥३२॥
आपणास काय करणे? । ऐसे बोलती लोक शहाणे ।
तरि समजावे गाव या गुणाने । नष्ट होईल सर्वस्वी ॥३३॥
मग तो मुखंडहि नव्हे । ऐसे कां न समजावे ? ।
निर्धाराने प्रयत्न करावे । सर्व मिळोनि जाणत्यांनी ॥३४॥
ऐसे असावे धोरण । तेचि कार्यकर्त्यासि भूषण ।
गाव निर्मावया आपुले प्राण । पणा लावावे ॥३५॥
विरोध होता बसावे घरात । ऐसे नोहे सेवेचे व्रत ।
गंगा घाबरती पाहोनि पर्वत । तरी सागरा न मिळती ॥३६॥
कोरड्या हौदामाजी तरावे । याने गौरव कोणा पावे ? ।
पुरांच्या लाटांतुनि पोहूनि जावे । यातचि वैशिष्ट्य आपुले ॥३७॥
म्हणोनि कर्तव्य सांभाळावे । गावशील जतन करावे ।
सोसाट्याने झडपू न द्यावे । गावचे कोणी ॥३८॥
ग्रामसेवाचि ईश्वर-सेवा । ऐसे समजावोनि जीवा ।
गाव सेवेसि तत्पर करावा । सर्वतोपरी ॥३९॥
नि:पक्षपणे बौद्धिके द्यावी । सर्वांची समजूत पटवावी ।
बुद्धी गावाची सांभाळावी । प्रचाराद्वारे ॥४०॥
जनजागृति झालियाविण । न संपेल गावाचे दैन्य ।
दृष्टी येता लोकांसि, दुर्जन । मेख गडवू न शकती ॥४१॥
या कार्यासि मिळावी जोड । म्हणोनि हाती घ्यावेत काही मुखंड ।
तेणे शक्ति लाभे तोडीस तोड । पडती फिके ग्रामशत्रु ॥४२॥



असो, नसो साथ सत्तेचा । सहयोग मिळवावा सज्जनांचा ।
जनसेवकांनी ग्रामराज्याचा । पाया रचावा सत्यावरि ॥४३॥
ज्यांना ज्यांना न्यायाची चाड । आणि गाव-सेवेची आवड ।
त्यांचीच संघटना व्हावी दृढ । करावी वाढ दिसंदिस ॥४४॥
जाणता दिसेल तो निवडावा । जिव्हाळ्याचा पुरुष वेचावा थोरांचिया ।
नेतृत्वे चालवावा । कारभार ग्रामोन्नतीचा ॥४५॥
श्रोता म्हणे तेहि झाले । महाप्रयासे सज्जन जमविले ।
परंतु एकदा चुकले । ते सुधरेचना की ॥४६॥
अहो ! एक कमेटी बसली । गावी सुंदरता आणाया भली ।
म्हणे पाहिजे निवडणूक केली । पुढाऱ्यासाठी ॥४७॥
कोण गावाचा पुढारी ठरवावा ? । आधी मान कोणास द्यावा ? ।
कोणाच्या हाते चालवावा । कारभार गाव-सेवेचा ? ॥४८॥
म्हणोनि निवडणूक ठरविली । ती जणु आगीत बारुद पडली ।
अथवा रॉकेलाची टाकीच ओतली । अग्निमाजी ॥४९॥
तेणे जाहला अग्निबंबाळ । मतामतांचा हलकल्लोळ ।
एकमेकासि पाहती महाकाळ । शहाणे गडी ॥५०॥
जो तो म्हणे मीच शहाणा । कोणीच कोणाचे ऐकेना ।
अरे ! तोबातोबा ! आरडाओरडांना । सुमारचि नाही ॥५१॥
घरोघरी मारामारी । बायको उठुनि नवऱ्यास मारी ।
मुले म्हणती आम्ही शहाणे भारी । पुस्तके सारी शिकलो की ॥५२॥
कोण पुढारी समजावा? । विचार झाला सगळ्या गावा ।
एकएकाच्या न मिळे भावा । सांगा काय करावे ? ॥५३॥
श्रोतियाचा हा अनुभव । येत आहे गावोगाव ।
परंतु तेथे मुळातचि ठेव । चुकली सारी ॥५४॥
गढूळ पाणी ढवळो जाता । घाणचि उफाळोनि ये हाता ।
जेथे सेवेची नाही आत्मीयता । तेथे गोंधळ सहजचि ॥५५॥
याचसाठी आधी सेवाभावी । लोकांचीच संघटना व्हावी ।
तेथे रीघचि नसावी । अन्य कोणासि ॥५६॥
गावातील एकेक सज्जन । शोधून घ्यावे त्यासि जोडून ।
सेवाभावी मंडळचि संपूर्ण । तयार करावे प्रयत्ने ॥५७॥

त्याचे प्रामाणिक सत्कार्य । लोकांपुढे येता निर्भय ।
आपोआपचि होईल निश्चय । लागेल सोय गावासि ॥५८॥
सेवेची ही नैतिक सत्ता । वजन मिळवील गावहिता ।
मग कोणी विरोध तत्त्वता । न टिके तेथे ॥५९॥
टाकूनि दाब कोणावरि । लालूच दावूनि करिती फितुरी ।
विघ्ने आणिती सत्कार्यावरि । होतील दुरि ते सर्व ॥६०॥
सेवासंघटनेचा प्रमुख । तो निवडोनि देता चोख ।
हळुहळू गाव होईल सुरेख । सर्वतोपरी ॥६१॥
श्रोता म्हणे ठीक हे सारे । परि गावी आले निवडणुकीचे वारे ।
तेणे गाव आमुचे भरी भरे । भलतैशाचि ॥६२॥
स्वार्थापायी सेवा – विरोध । करणारे जे गावचे मैंद ।
ते नानामार्गे करिती बुद्धिभेद । जनतेचा तयेवेळी ॥६३॥
तेथे आम्ही काय करावे? । गाव कैसे सुधारावे ? ।
याचे समाधान ऐकावे । श्रोतेजनी ॥६४॥
सांगितले ते साचचि आहे । गावोगावी अनुभवा ये ।
यासाठी सरळ दावावी सोय । विचाराने गावलोका ॥६५॥
निवडणुकीची चालू प्रथा । हीच मुळी सदोष पाहता ।
म्हणोनि योग्य दृष्टी द्यावी समस्ता । गाववासिया ॥६६॥
जीवनाची जबाबदारी । किती आहे निवडणुकीवरि ।
हे पटवोनि निवडणूक खरी । करवावी न गोंधळता ॥६७॥
विचार केलिया हळूहळू । आपैसाचि मार्ग ये कळू ।
निवडणुकीचे तत्त्व जाता आकळू । मिटेल गोंधळ सहजचि ॥६८॥
अहो ! पुढारीपण कशाला? । सेवा गावाची करावयाला ।
मग सेवेची कसोटी लावा की आपुला । समजेल पुढारी कोण तो ॥६९॥
कोण गावासाठी झटे ? । कोण उठतो रोज पहाटे ? ।
घेऊनि हातामाजी खराटे । झाडतो कोण ? ॥७०॥
साध्या राहणीने दिवसभरी । कोण गरीबाचे काम करी ? ।
कोण पायी फिरोनि करी वारी । गावाची आमुच्या ? ॥७१॥
कोण नीतीने असे चांगला ? । पक्षपात न आवडे कोणाला ? ।
छदामासि नसे लाजीम झाला । गाव–निधीच्या ॥७२॥



कोण सर्वांचे पाहतो सुख, दुःख । कोणाचे दिसे सेवेसाठी मुख ।
हीच त्याची जाणावी ओळख । निवडावया ॥७३॥
किंवा सकळांना सांगा काम । सोडा हुकूम आपुला बेफाम ।
कोण पाहा न करिता आराम । काम करी गावाचे ॥७४॥
मग तोचि म्हणावा पुढारी । आंधळाहि त्याची निवड करी ।
येथे कासयास ही टिमकी भरजरी । जाहिरातींची ? ॥७५॥
गावचा जो प्रत्येक घटक । त्यासि ठाऊक असावा माणूस एकेक ।
कोण चुकार, कोण सेवक । चालक कोण ? ॥७६॥
कोण गावाची सेवा करतो ? । कोण प्रतिष्ठेसाठी मिरवितो ? ।
सांगावा प्रसंग येता स्पष्ट तो । गावामाजी ॥७७॥
तेथे नसावी लाज, शरम । त्याने बिघडेल गावाचे काम ।
म्हणोनि सर्वांनी द्यावे त्याचेच नाम । न गोंधळता ॥७८॥
ज्यासि गावाचा जिव्हाळा । जो कार्यज्ञानाचा पुतळा ।
तोचि सुखी करील गाव सगळा । निवडोनि देता ॥७९॥
ऐसे न करता भांडणे माजती । गावाची होईल अनावर स्थिति ।
मग फावेल स्वार्थी जनांप्रति । सज्जन राहती वेगळेचि ॥८०॥
यासाठी उत्तम गुणी निवडावा । ज्याची सर्व करिती वाहवा ।
गावाचा बागडोर त्यासि द्यावा । आपुला पुढारी म्हणोनिया ॥८१॥
नाहितरि गावचे म्हणविती पुढारी । दात बसला सवाई–दिढीवरी आपण ।
होऊनि वाघापरी । गाव मारिती उपवासी ॥८२॥
काही लोक भाषणे करिती । बोलूनि पक्षभेद पाडिती ।
जुळल्यांची तोडूनि मति । भरती करिती झगडयांची ॥८३॥
ऐसा नकोच पुढारी । ज्याने नाही केली कर्तबगारी ।
तो मित्र नव्हे, वैरी । समजतो आम्ही ॥८४॥
ज्याने केले असेल उन्नत ग्राम । अथवा समुदायाचे आदर्श काम ।
तोचि बोलण्याचा अधिकारी उत्तम । समजतो आम्ही ॥८५॥
एरव्ही पैशाचे मिळाले तीन । देती भराभरा भाषण ।
न बसावे कोणाचेहि मन । तयावरि ॥८६॥
ऐसे पुढारीपण जेथे दिसे । गावाने लावूनि न घ्यावे पिसे ।
जो इमानदार सेवक असे । तोचि समजावा गावधनी ॥८७॥

बोलणे एक चालणे एक । लपविणे एक, दाखविणे एक ।
हे गावासि होईल घातक । समजावे श्रोती ॥८८॥
भिडेखातरहि विष खादले । किंवा चोरुनिही सर्पा दूध पाजले ।
वाघाशी सोईरपणहि संपादले । तरी नाश होईल निश्चये ॥८९॥
ऐसे न करावे वर्तन । असतील जे इमानदार सेवकजन ।
तेचि द्यावेत निवडोन । एकमते सर्वांनी ॥९०॥
सर्वास असावी चिंता समाजी । कोण आहे लायक जनांमाजी ।
कोण घेई गावाची काळजी । सर्वकाळ ॥९१॥
तोचि करावा पुढारी । एरव्ही पडो नये कुणाच्याहि आहारी ।
धन वेचतो म्हणोनि गावाधिकारी । करू नये कोणासि ॥९२॥
पुढारीपण सेवेनेच मिळे । हेच बोलावे मिळोनि सगळे ।
तेथे पक्षबाजीचे चाळे । वाढोचि न द्यावे ॥९३॥
नाती, गोती, पक्ष-पंथ । जातपात, गरीब – श्रीमंत ।
देवघेव, भीडमुर्वत । यासाठी मत देऊचि नये ॥९४॥
भवितव्य गाव अथवा राष्ट्राचे । आपुल्या मतावरीच साचे ।
एकेक मत लाख मोलाचे । ओळखावे याचे महिमान ॥९५॥
मत हे दुधारी तलवार । उपयोग न केला बरोबर ।
तरि आपलाचि उलटतो वार । आपणावर शेवटी ॥९६॥
दुर्जन होतील शिरजोर । आपुल्या मताचा मिळता आधार ।
सर्व गावास करितील जर्जर । न देता सत्पात्री मतदान ॥९७॥
मतदान नव्हे करमणूक । निवडणूक नव्हे बाजार-चुणूक ।
निवडणूक ही संधि अचूक । भवितव्याची ॥९८॥
निवडणूक जणु स्वयंवर । ज्या हाती देणे जीवनाचे बागडोर ।
त्यासि लावावी कसोटी सुंदर । सावधपणे ॥९९॥
फोड चोखाया लावोनि जैसे । शिष्य निवडिले रामदासे ।
मृत्यूच्या कसोटीवरि पाहणे तैसे । गुरु गोविंदसिंहाचे ॥१००॥
गडी पळावयासि लागले । कोण थकले, कोण बाद झाले ।
कोणाचे नंबर पुढे आले । सहजचि कळे या रीती ॥१०१॥
तैसेचि आहे निवडणुकीचे । कामचि पाहावे सगळ्यांनी त्यांचे ।
ज्याचे काम अधिक मोलाचे । तोचि निवडावा मुख्य ऐसा ॥१०२॥



ऐसे सकळा पटवोनि द्यावे । तेणे गोंधळ मिटती आघवे ।
कार्यकर्त्यासीच संधि पावे । ऐसे होते यायोगे ॥१०३॥
मग त्यांचेचि म्हणणे ऐकावे । सगळे गाव पुन्हा जमवावे ।
बाष्कळ बोले त्यास दाटोनि द्यावे । गावकऱ्यांनी ॥१०४॥
ऐसे झाले की झाली संघटना । लागली सुरू गाव-सुधारणा ।
झाला मुला, माणसांचा बाग पुन्हा । जिताजागता प्रेमळपणे ॥१०५॥
तेथे नवनवी योजना – फुले । विकसोनि देतील गोड फळे ।
ग्रामराज्याचे स्वप्नहि भले । मूर्त होईल त्या गावी ॥१०६॥
कोणी उडवू लागे धुरळा । तरि तो त्याचेचि जाईल डोळा ।
सुखे नांदेल गाव सगळा । तुकड्या म्हणे ॥१०७॥
इतिश्री ग्रामगीता ग्रंथ । गुरु – शास्त्र – स्वानुभव – संमत ।
कथिला ग्रामराज्याचा निर्वाचन पथ । दहावा अध्याय संपूर्ण ॥१०८॥


।। सद्गुरुनाथ महाराज की जय ।।

## ।। चौपाई ।।

– गुरुघर जन्म तुम्हारा होये । पिछले जातिबरण सब खोये ।।
चार बरण के एको भाई । धर्म खालसा पदवी पाई ।।
– सोऊ धर्म मैं अचल चलाऊँ । भेडों को मैं सिंह बनाऊँ ।।
गौओंसे मैं शेर मराऊँ । भूप गरिबन को करवाऊँ ।।

– श्रीगुरु गोविन्दसिंहजी

# ।। चित्र परिचय ।।



## अ. ११ – श्रीसंत तुकाराम महाराज

आपुले वारकरी भाविक । तेचि वार कर्ते पाईक ।
करोनि दुष्टांसि लाविला धाक । शिवाजीच जणू सर्वहि ।।८९।।

समाजातील अनिष्ठ रुढयाबरोबरच अत्याचारांचा खडसून विरोध करणारे झुंजार संत, शिवाजी महाराज स्फूर्ति घेण्यास नेहमी कीर्तनात येत. 'पाईकाच्या' अभंगातून भक्त आणि वीर यांना एका भूमिकेवर आणून तुकोबा गावात नवशक्ती निर्माण करीत. ''पीडिता हे राष्ट्र पाहूनि जग'' त्यांना असह्य वाटे. आपल्या श्रोत्यांना सैनिक बनवून त्यांनी कीर्तनप्रसंगी आलेला परचक्राचा धुव्वा उलटवला व 'सर्वच शिवाजी' असे वाटायला लावले ही तेजस्वी सात्विकताच ग्रामरक्षणाची गुरुकिल्ली !



• अध्याय अकरावा •

# ग्रामरक्षण

।। श्रीगुरुदेवाय नमः ।।

ईश्वरसेवाचि गाव-सेवा । तो सर्वांच्याचि सुखाचा ठेवा ।
परि काही असुरहि असती गावा । यज्ञभंग करावया ।।१।।
एका सज्जने प्रश्न केला । गावी बाग फुलू लागला ।
परि दुष्ट लाविती आग त्याला । काय उपाय नित्यासाठी ? ।।२।।
आम्ही केली संघटना । निवडोनि आणिले सज्जना ।
परंतु दुर्जनापुढे बनेना । काही केले तरीहि ।।३।।
त्यांना दावा आदर्श जीवन । अथवा प्रचारे द्या पटवून ।
किंवा सेवा रात्रंदिन । करा त्यांची हवी ती ।।४।।
परंतु ते न जुमानिती । उपदेश देता उलटे चिडती ।
कार्यकर्त्यासि हाणूनि पाडिती । पदोपदी अडवोनिया ।।५।।
चांगल्यातूनहि काढिती वाईट । हवा फैलावती रोगट ।
सज्जनांवरि आणिती संकट । कारस्थाने करोनि ।।६।।
कलमकसाई बोलभांड । मुडदेफरास गावगुंड ।
कज्जेदलाल धनाढ्य धेंड । हाती तयांच्या ।।७।।
सत्तेचाहि पाठिंबा सतत । घेवोनि आणिती पेचात ।
बसली लोकांना त्यांची दहशत । सांगा काय करावे? ।।८।।
मित्रा ! जो जो जेथीचा रोग । तेथेचि त्याची औषधि सांग ।
योजकचि पाहिजे कराया उपयोग । कुशलपणाने ।।९।।
सत्य पडताहे कमजोर । म्हणोनीच असत्य होई शिरजोर ।
यास्तव सत्यासि करावे कठोर । सामर्थ्यशाली सेवेसाठी ।।१०।।
सत्याचे बळ वाढेल कैसे? । तेहि सांगतो ऐका शांतसे ।
सज्जनांनी न बसावे आळसे । अथवा हताश होवोनि ।।११।।
लोकांचिया मनी जरी दहशत । तरी तुमच्यासारिखेचि काही त्यात ।
असतील हृदयी तळमळत । चांगले व्हावे म्हणोनि ।।१२।।

ऐसी ज्यांना ज्यांना आवडे सेवा । जे सत्याचा जपती ठेवा ।
त्या लोकांचा करोनि मेळावा । सक्रिय संघटन वाढवावे ॥१३॥
जनतंत्राचा हा काळ । शक्ति लोकाअंगीच सकळ ।
जनतेच्या निश्चयाचे बळ । साम्राज्यासहि नमवू शके ॥१४॥
हत्तीस आवरी गवती दोर । मुंग्याहि सर्पासि करिती जर्जर ।
व्याघ्रसिंहासि फाडिती हुशार । रानकुत्रे संघटोनि ॥१५॥
संघटनेने काय नोहे ? । बिंदू मिळता सिंधुपणा ये ।
गावचा बाग बहरोनि जाय । फुलाफळांनी संघटनेच्या ॥१६॥
ग्रामसुधारणेचा मूलमंत्र । सज्जनांनी व्हावे एकत्र ।
संघटना हेचि शक्तीचे सूत्र । ग्रामराज्य निर्माण करी ॥१७॥
गाव करी ते राव न करी । ऐसे सांगोनि ठेविले चतुरी ।
जरी दाद न घेतील अधिकारी । तरी गाव त्या सुधारू शके ॥१८॥
यासाठीच पाहिजे सशक्त संघटन । जे करी अन्याय – निर्मूलन ।
देवोनिया न्यायदान । करी रक्षण गावाचे ॥१९॥
संघटन गावी मजबूत असावे । आपापले दुःख त्यासि सांगावे ।
कोणावरि अन्याय होऊ न द्यावे । कार्य हे संघटनेचे ॥२०॥
त्यासाठी मिळोनि लोक नेमावे । जे असतील इमानी बरवे ।
त्यागी, निर्भय, चरित्र असावे । उज्ज्वल ज्यांचे ॥२१॥
गावाचे जे पवित्र सेवक । तेचि प्रसंगी होती सैनिक ।
ज्या गावी ऐसे सावध पाईक । तेथे विघ्न न ठाके ॥२२॥
काही अपराध घडता गावात । त्वरीत कळवावी खबरमात ।
सर्वांनी भाग घेवोनि त्यात । ठीक करावे बिघडले ते ॥२३॥
गावाचा प्रत्येक सज्ञान । याचे असावे सहकार्य पूर्ण ।
हाक देता सर्वजण । जमोनि यावेत एकत्र ॥२४॥
एकाने कोणी गुन्हा केला । शहाणपण सांगावे सकळांनी त्याला ।
गुन्हेगार ऐकेनासा झाला । शिक्षा द्यावी गावाने ॥२५॥
जेथे समजदार प्रलोभनी पडला । सोंग करोनि घोरू लागला ।
चिमटे घेवोनीच त्याला । उठविले पाहिजे ॥२६॥
कोळसा साबूने धुवा, उगाळा । परि तो शेवटवरि काळा ।
अग्निसंस्कारी जळता उजाळा । येई त्यालागी ॥२७॥



म्हणोनि बहिष्कार, असहकार । करोनि त्याचे तोडावे आधार ।
नाक दाबता तोंड सत्वर । उघडो लागे ॥२८॥
ऐसी सर्वांनी पाठ पुरवावी । जो कोणी गावास बिघडवी ।
ऐकेनासा होता सत्ता प्रभावी । मुक्त करावा गावातूनि ॥२९॥
उत्तमांचाचि संग्रह बरवा । वाईटाचा निषेध करावा ।
जराहि पनपू न द्यावा । वृक्ष वाईटाचा ॥३०॥
सर्वांनी झटावे यासाठी । करावी लागेल ती आटाआटी ।
प्राण गेला तरी संकष्टी । सहन करावे सेवेस्तव ॥३१॥
ऐसी असावी गावाची तयारी । तरीच गाव बनेल स्वर्गपुरी ।
नलगे सत्ताधीशांची तुतारी । पाठीमागे ॥३२॥
ऐसा होता आचार-विचार । गाव होईल न्यायभांडार ।
जागृत असता सज्जन, चतुर । सेवेसाठी ॥३३॥
ऐसे जे जे गाव वागले । त्या गावाचे भाग्य उघडले ।
नाहीतरि टक्केटोणपे आले । नशिबी त्याच्या ॥३४॥
हे ऐकोनि एक बोलला । म्हणे तुम्ही शांतीचा पुरस्कार केला ।
आणि तुम्हीच ससेमिरा लाविला । दुराचाऱ्यांसाठी ॥३५॥
सज्जन आणि दुर्जन । सर्वांत सारखाचि भगवान ।
एकासि देता दंड धावोन । तेव्हा सेवा कुठे राहे ? ॥३६॥
दया, क्षमा आणि शांति । हीच सात्त्विकाची संपत्ति ।
निष्ठूरपणे दंडावे विरोधकांप्रति । हे सज्जनपण कशाचे? ॥३७॥
ऐका ऐसी विचारसरणी । ऐकोनि भुलू नये कोणी ।
तारतम्यचि ठेवोनि मनी । गाव सुधारावे विचारे ॥३८॥
काय केले म्हणजे होतो सज्जन । याचे आहे मोजमाप जाण ।
हे प्रथमक्षणीच ओळखोन । हुशार व्हावे गावाने ॥३९॥
सेवा द्यावी कोणे ठायी । हे तारतम्य असावे हृदयी ।
याची दृष्टी ज्यास नाही । होतील फजीत ते प्राणी ॥४०॥
ज्यासि करणे चोरबाजार । त्यासहि नोकर पाहिजे इमानदार ।
त्यासि देता सेवा सुंदर । पुण्य लाभेल कोणासि ? ॥४१॥
साधु, संते जनसेवा केली । परि सत्यासाठीच काया झिजविली ।
कधी आसचि नाही ठेविली । राजेरजवाड्यांची ॥४२॥

जगी अनंत राजे झाले । परि सर्वचि नाही पूजिले ।
संत, सज्जनचि देव मानले । हृदय-मंदिरी तयांनी ॥४३॥
म्हणोनि कोणी कोणास सेवा द्यावी । हेचि प्रथम दृष्टि यावी ।
मग सेवेसाठी उडी घ्यावी । हाचि धर्म मानवाचा ॥४४॥
सदैव दया असावी चित्ती । मनास परोपकाराची प्रीति ।
राहू न द्यावी उणीव कोणती । दिसता कोठे ॥४५॥
क्षमा, शांतिमय हृदय । विश्वासुपणाचे वर्तन निर्भय ।
प्राण गेलियाहि निर्दय । न व्हावे आम्ही ॥४६॥
परि जेथे निर्दयपणे हवे । तेथे दगडापेक्षाहि कठिण व्हावे ।
हेहि सांगणे लक्षात घ्यावे । तारतम्याने ॥४७॥
नाहीतरि दया केली । उलट आपुल्यासचि भोवली ।
जिने गावाची नासाडी झाली । नव्हे ती दया ॥४८॥
भिकाऱ्यास भीक दिली । त्याने दारू-गांज्यात उडविली ।
सांगा काय दया घडली । ऐशियापरी ? ॥४९॥
काही चोरटे गावी फिरती । दिवसा साधुवेष घेती ।
रात्रौ तेचि डाका मारिती । वेषभूषा बदलोनि ॥५०॥
ते लोकांनी सहन करावे । साधु म्हणोनि सोडूनि द्यावे ।
ऐसे दयेचे वेडे गोडवे । गाऊ नयेत वीरांनी ॥५१॥
दयाधर्म, दानधर्म । यांचे ओळखावे वर्म ।
वेड्यापरि न करावे कर्म । पोषक आळसा, विकारा ॥५२॥
एरव्ही संसार सोडोनि बुवा झाले । दारोदारी भिक्षेसी लागले ।
सदाचार सर्व बुडविले । ऐसे झाले याच गुणे ॥५३॥
कष्ट नाही करणे अंगी । नाही संग्रहाचे खरे त्यागी ।
वेष घेवोनि फिरती ढोंगी । नाव बुडवाया संतांचे ॥५४॥
यांना दानधर्म द्यावे । तरि सर्व पापांसि स्थान मिळावे ।
म्हणोनि तारतम्य ठेवावे । दानधर्मियाने ॥५५॥
गावी मागती माधुकरी । खुशाल खेळती फिचर जुगारी ।
दारू, गांजा, भांग, पोरी । गुप्त राखती मठामाजी ॥५६॥
ऐशा लोकां दान द्यावे । नाव बुडवावे, बदनाम व्हावे ।
ऐसा धर्म कोणत्या देवे । सांगितला सांगा ? ॥५७॥



दया हे मुख्य धर्मलक्षण । परि दया म्हणजे प्राण्यांचे पालन ।
आणि कंटकांचे निर्दालन । बोलिले संती ॥५८॥
सज्जनाचे संरक्षण । आणि दुर्जनांचे दमन ।
हेचि अवतारांचेहि कार्यलक्षण । न्यायसंगत ॥५९॥
म्हणोनि गावी कोणी अन्याय केला । दुःख दिले कोणा गरीबाला ।
त्याचा प्रतिकारचि पाहिजे झाला । गावामाजी ॥६०॥
नाहीतरि गुंडास फावे । सुटली जैसी स्वैर गाढवे ।
दुष्टासि दया करोनि सोडोनि द्यावे । नव्हे हा धर्म ॥६१॥
अन्याय होता प्रतिकारचि करावा । प्रथम अन्याय समजूनि घ्यावा ।
निश्चित कळता आवाज द्यावा । संघटनेचा ॥६२॥
अन्याय नानातऱ्हेचे असती । काही धनाचे, मानाचे दिसती ।
काहींनी वाढे व्यसन, अनीति । लोकांमाजी ॥६३॥
त्या सर्वांतूनि मार्ग काढावा । गावी दुराचार होऊ न द्यावा ।
हाचि खरा धर्म ओळखावा । विचारवंताने ॥६४॥
न्यायाचा काटेकोरपणा । भिनावा आपुल्या हृदयी जाणा ।
एका बाजूने दयेचा बाणा । दुसऱ्या बाजूने न्यायदंड ॥६५॥
हेचि खरे मानवाचे लेणे । उगीच आहे सोने मिरविणे ।
अंगी वीरता नसता मरणे । चोराहाती ॥६६॥
काही लोक भोळे असती । आपुले मानव्यभूषण खोविती ।
लोक त्यासीच सात्विक म्हणती । वेड्यापरी ॥६७॥
ज्यास करवेना ब्रीदाचे रक्षण । नाही अंगी न्यायाचे भूषण ।
तो कैसा सात्विक जन । म्हणावा आम्ही ? ॥६८॥
जो चोरांनी नागवावा । गुंड लोकांनी फसवोनि द्यावा ।
परस्त्रियेने भोंदवावा । तो सात्विक कैसा ? ॥६९॥
तोंडावरची न उडवी माशी । दचके पाहताचि पोलिसासि ।
न कळे आपुला हक्कहि ज्यासि । सात्विक त्यासि म्हणो नये ॥७०॥
त्यास म्हणावे दुबळा प्राणी । भित्रा, विकासहीन, अज्ञानी ।
ज्यात नाही पुरुषार्थाचे पाणी । रक्षणासाठी ॥७१॥
त्यास कोणीहि उचलोन न्यावे । दारू, गांजादिक पाजोनि द्यावे ।
त्याने भोळा म्हणोनि पिऊनि घ्यावे । वारे भोळा ऐसा ! ॥७२॥

हा तो निबद्धसा पाषाण । उत्तम वागण्याचे नाही ज्ञान ।
गंभीर, शांत म्हणती जन । मुका, मैंद म्हणोनिया ॥७३॥
खरा शांत तोचि नेमाने । जो न फसे कोणाच्या फसविल्याने ।
कधीहि चकाट्या पिटणे ज्याने । पाहिले नाही ॥७४॥
परनिंदा नावडे ज्यासि । पर दुःख न पाहवे डोळ्यांसि ।
धावोनि जाय अडल्या - पडल्यासि । सहकार्य द्याया ॥७५॥
उगीदुगी ऐकता कानी । लगेच जाय तेथोनि उठोनि ।
लोकां सांगे उगीच बोलणी । बोलू नयेत ॥७६॥
कोणाची लपोनि टीका न करी । बोलणे ज्याचे तोंडावरि ।
निर्भय, निर्मळ अंतरी । स्फटिक जैसा ॥७७॥
गंदेपणा मुळीच नावडे । सुजनांचे गातो सदा पवाडे ।
सत्संगतीसि जीव धडपडे । सदैव ज्याचा ॥७८॥
सर्वांशी बंधुत्वाचे वागणे । मन-मिलाफ संपादणे ।
लोकसंग्रह कुशलतेने करणे । जागृतीसाठी ॥७९॥
सुखी अहंकारे न चढावे । संकटी घाबरोनि न जावे ।
न्यायाने वागावे, वागवावे । सर्व जना ॥८०॥
हे ज्यांनी अंगी बाणविले । तेचि शांत, सात्विक बोलिले ।
तयांनीच गावाचे हित झाले । समजतो आम्ही ॥८१॥
याऐवजी दुबळेपण आले । तरि गावचि मग विलया गेले ।
सांभाळिता न जाय सांभाळिले । कोणाकडोनि ॥८२॥
म्हणोनि पाहिजे न्यायनिष्ठूरता । दयेमाजीहि तारतम्यता ।
उन्नती करील तीच सेवा तत्त्वता । हरप्रकारे ॥८३॥
द्वेष न करता दुर्जनदमन । हे त्याच्याहि उन्नतीसचि कारण ।
डॉक्टरे करावे अवयवच्छेदन । ती दयाचि तयाची ॥८४॥
सर्वांभूती परमेश्वर । त्यासि बाधक नसे सत्य व्यवहार ।
करावे संघटनेने गाव सुंदर । ही पूजाचि तयाची ॥८५॥
सर्वांभूती प्रेमभाव । वाढवावा गुणगौरव ।
दूर सारोनि उपद्रव । गावाचे आपुल्या ॥८६॥
'जग तरि आम्हा देव । परि हा निंदितो स्वभाव' ।
म्हणोनि गुंडांसि आणिला खेव । संत तुकारामांनी ॥८७॥



हरिभक्त राहती जेथे । परचक्र यावे कैसे तेथे ? ।
ऐसे म्हणोनि लाविला पणाते । जीव त्यांनी ॥८८॥
आपुले वारकरी, भाविक । तेचि वारकर्ते पाईक ।
करोनि दुष्टांसि लाविला धाक । शिवाजीच जणु सर्वहि ॥८९॥
तीच घेवोनि प्रेरणा । गावी उभारावी न्यायसेना ।
जेणे काही नुरे धिंगाणा । गावी आपुल्या ॥९०॥
दारू, गांजा, भांग, अफीम । जुगार, वेश्यादि वाईट काम ।
यांचे उरू न द्यावे नाम । आपुल्या गावी ॥९१॥
त्यासाठी गावाच्या काही सज्जनांनी । लागावे व्यसन-निर्मूलनी ।
उत्तम गुणांच्या अनेक श्रेणी । वाढवाव्या गावी ॥९२॥
गावचे चार सज्जन मिळोनि । अनिष्ट प्रथा बंद कराव्या त्यांनी ।
ज्याने गावास पावे नुकसानी । न ठेवावे ते ॥९३॥
काही उन्मत्त शेतकरी । टोचती बैलासि तुतारी ।
रक्त काढूनि वासना पुरी । करिती आपुली ॥९४॥
देवाचिया नावाखाली । काही देतात जीव बळी ।
बंद करावी प्रथा असली । भावना सुधारोनि लोकांची ॥९५॥
कोणी घुमारे लुबाडिती । बुवा लोकांस फसविती ।
भ्रमिष्ट मते, व्रते शिकविती । सावध करावे त्याठायी ॥९६॥
परस्परांना मदत करावी । अडीअडचणी ती निभवावी ।
सर्वांकडोनि करोनि घ्यावी । योग्य सेवा ॥९७॥
गावसेवेत आली अडचण । तिला द्यावे अग्रस्थान ।
आपापली जागा-जमीनहि देऊन । सोय करावी सर्वांची ॥९८॥
सर्वांकडोनि ऐसी सेवा नव्हे । तरि गरजूंना सहकार्य द्यावे ।
होईल तेवढे तरी करावे । निष्कपटपणे ॥९९॥
मुलाबाळांचे असता लग्न । सर्वांनी जावे धावोन ।
पडोचि न द्यावे ओझे न्यून । आई - वडिलांसि तयांच्या ॥१००॥
थोडे थोडे सर्वांनी आणावे । वर - वधूंना साहित्य द्यावे ।
भोजनापासोनि उरकवावे । सर्वतोपरी ॥१०१॥
मांडवावरी पाच डहाळे । टाकावे हा धर्म गावकऱ्या कळे ।
तैसेचि निभवावे प्रसंग सगळे । सहकार्याने ॥१०२॥

जैसे जैसे सहकार्य वाढे । तैसे गाव उन्नतीस चढे ।
न पडे विपत्तीचे कोडे । गावी कोणा मानवासि ॥१०३॥
ऐसी सेवा बिंबता जीवनी । काहीच गावी न पडे उणी ।
तरीहि असावा स्वतंत्रपणी । सेवकांचा विभाग ॥१०४॥
सुसज्ज असावेत गावचे तरुण । कोणतेहि संकट येता ऐकून ।
आपुली सर्व कामे सोडून । धाव घ्यावी तयांनी ॥१०५॥
आग लागणे, विहिरीत पडणे । कॉलरा होणे, मूर्च्छा येणे ।
प्रत्येक प्रसंगी धावून जाणे । कर्तव्य त्याचे ॥१०६॥
ऐसी ग्रामसेवेची योजना । जागृत जेथे ग्राम-सेना ।
तेथे स्वर्गीच्या नंदनवना । बहर येई सहजचि ॥१०७॥
ऐसे संघटनांनी गाव । भोगू लागेल दिव्य वैभव ।
ग्रामराज्यचि सुखाची ठेव । तुकड्या म्हणे ॥१०८॥
इतिश्री ग्रामगीता ग्रंथ । गुरु - शास्त्र - स्वानुभव संमत ।
ग्रामरक्षणाचा वर्णिला पथ । अकरावा अध्याय संपूर्ण ॥१०९॥

॥ सद्गुरुनाथ महाराज की जय ॥


## ॥ अभंग ॥

दया तिचे नाव भूतांचे पालन । आणिक निर्दालन कंटकांचे ॥
धर्मनीतीचा हा ऐकावा वेव्हार । निवडले सार-असार ते ॥
पाप त्याचे नाव न विचारिता नीत । भलतेचि उन्मत करी सदा ॥
तुका म्हणे धर्म रक्षावयासाठी । देवासहि आटी जन्म घेणे ॥

**- श्रीसंत तुकाराम महाराज**



# ॥ चित्र परिचय ॥



## अ. १२ - वैराग्यमूर्ति श्रीसंत गाडगे महाराज

रामधूनपूर्वी गाव पूर्ण । व्हावे स्वच्छ, सौंदर्यवान ।
कोणाहि घरी गलिच्छपण । न दिसावे ॥५१॥

२० या शतकाच्या आरंभापासूनच निःस्पृहपणे अनिष्ठ प्रथांच्या उच्चाटनाचे, जनसुधारणेचे व दीनसेवेचे बहुविध कार्य सतत करीत आलेले वऱ्हाडचे सत्पुरुष. 'भुकेल्यांना अन्न, तहानलेल्यांना पाणी, उघड्या-नागड्यांना वस्त्र, निराश्रितांना आधार, गरीब मुला-मुलींचे लग्न व शिक्षणावर भर देत अंधश्रद्धेवर त्यांनी कडाडून प्रहार केले.' मंडळाच्या रामधूनपूर्वीच ग्रामसफाईचा कार्यक्रम त्यांनी सुरु केला. गावात स्वच्छता, पवित्र व सौंदर्य ओतण्याची कला-'रामधून' व तिला संतांचा पाठिंबा ही विशेष गोष्ट !

● अध्याय बारावा ●

# ग्रामशुद्धी

॥ श्रीगुरुदेवाय नमः ॥

एका सज्जने विचारिले । म्हणे ग्रामराज्यात काय ठेविले ? ।
जिकडे तिकडे गोंधळ चाले । अस्ताव्यस्तपणाचा ॥१॥
कागदी पुस्तकात, काव्यात । खेड्याचे वर्णन दिव्य बहुत ।
परि वस्तुस्थिती पाहता तेथ । क्षणभरीहि राहवेना ॥२॥
रस्ते सर्व घाणींनी भरले । आजूबाजूस डबके साचले ।
एकही काम न निभे तेथले । शहराविण ॥३॥
'खेड्याकडे चला' म्हणता । परि एकहि सोय नसे पाहता ।
घरे कसली? हुडेचि तत्त्वता । डुकरखोपडे, खुराडे ॥४॥
नाही कसले मनोरंजन । दंढारी – तमाशावाचून ।
उगेचि कां करावे वर्णन । खेडे उत्तम म्हणोनि ? ॥५॥
मित्रा ! तुझे म्हणणे ऐकले । माझ्या मनी योग्य ते पटले ।
त्याचे कारण तेहि ऐकले । पाहिजे श्रोती ॥६॥
जेव्हा कार्यकर्ते होती आळसी । त्यात उपभोगाची वाढे खुशी ।
तेव्हाच अंतर पडे कार्यासि । गावसेवेच्या ॥७॥
एकदा चुकले तरि चाले । पण नेहमी चुकतचि गेले ।
त्यानेच राज्याचेहि मरण ओढवले । गति काय गावांची ? ॥८॥
कार्यकर्त्यांनीच घेतली निशा । काय पाहता मग गावाची अवदशा ।
सुरू झाला गुंडांचाचि तमाशा । लोक झाले भलतैसे ॥९॥
वतनदार, इजारदार । ग्रामजोशी, वेशकर ।
पूर्वी ज्यांना ज्यांना ग्रामाधिकार । चुकले त्यांच्या हातूनिया ॥१०॥
चुकलियावरीहि कोणीच बघेना । मग लोक काढती वाटा नाना ।
जैसा ज्यास वाटे धिंगाणा । करू लागती हौसेने ॥११॥
कोणी हौसेने घर बांधले । मार्गावरीच ओटे वाढले ।
कोणाचे छप्पर पुढे आले । गाडी काही जाईना ॥१२॥



कोणी घाण नाली सोडूनि दिली । ती सर्व मार्गावरि आली ।
माणसे, ढोरे सारी फसली । घराभोवती बिचाऱ्याच्या ॥१३॥
काहींनी सांडपाणी साचविले । मच्छर, जंतु अति वाढले ।
रोगराईनी बेजार झाले । शेजारी सगळे ॥१४॥
काहींनी सडकेवरि गुरे बांधली । त्यातहि मारकुंडीच निघाली ।
मार्गस्थांची फजिती झाली । सांगता ये ना ॥१५॥
काहींनी दारी दगड ठेविले । जाणाराचे गाडेचि उलटले ।
काही ठोकर लागोनि पडले । अंधारामाजी ॥१६॥
काहींनी टाकला पुंजाणा । केरकैचणी, काच–खिळे नाना ।
बोचती येणाऱ्या–जाणाऱ्यांना । बोलूच नका ॥१७॥
साहेब चाले मोटारींनी । काही जाती जोडे घालोनि ।
गरीबास विचारीना कोणी । पाय त्याचे फुटले तरी ॥१८॥
सडकी फळे, शेंग टरफले । कुजले सोप मार्गीच टाकले ।
आजूबाजूस पाहोनि फेकले । ढोबर त्यावरि माऊलीने ॥१९॥
गावचे मार्ग विष्टेने व्यापले । आड कोने घाणींनी भरले ।
ठायी ठायी उकिरडे साचले । गाव वेढले गोदरींनी ॥२०॥
घराघराचे कुंप सडले । काटे रस्त्यांवरीच पडले ।
फास आणणारासहि न कळले । साफ करावे म्हणोनिया ॥२१॥
गावी खंडाऱ्यात माजले रान । विंचू – सर्प राहती लपोन ।
पडक्या गढीचे हुंडे भयाण । तेथील घाण पुसू नये ॥२२॥
विहिरी कोणी बांधून ठेविल्या । त्या पुन्हा नाही दुरुस्त केल्या ।
धुणाऱ्या घाण करीतचि गेल्या । सडला पाण्यात पाचोळा ॥२३॥
कोणी रस्त्यावर टाकिला गाळ । विहिरी, मोऱ्या उपसोनि ओंगळ ।
टाकोले हीर, फुटके खपरेल । मेलेले उंदीरहि त्यावरी ॥२४॥
श्रीमंतांचे वाढले गोठे । रस्त्यावरीच आले ओटे ।
मार्गीच लाकडे, विटा, गोटे । कोण बोले तयांना ? ॥२५॥
गावातील पंच झोपले ! "काय म्हणावे ? नातलग, मित्र आपले !" ।
म्हणोनि तयांनी डोळे लाविले । गाव झाले डोंगर हे ॥२६॥
ऐसीच विचित्र गावाची स्थिति । हे आले माझ्या अनुभवाप्रति ।
म्हणोनीच वाटे लावावी सुसंगति । गावोगावी आतातरी ॥२७॥

हे सगळेचि दुरुस्त कराया । शहाण्यांनी जावे खेडयांकडे या ।
आदर्श ग्राम हाचि पाया । राष्ट्राचा असे म्हणोनि ॥२८॥
जे जे गावी शहाणे झाले । शक्तियुक्तींनी पुढे निघाले ।
ते सर्व शहराकडे धावले । म्हणोनि माजले रान येथे ॥२९॥
भंगी साफ करिती शहर । तैसे पूर्वी कामदार, महार ।
झाडीत होते गावगल्ली सुंदर । पुढे केवळ पाटलांची ॥३०॥
पवित्र ठेवावा देवाचा मार्ग । हा भाविकांचा जाणोनि ओघ ।
देव मांडिले होते जागोजाग । तेथेहि माजले उकिरडे ॥३१॥
नगरप्रदक्षिणेचि प्रथा । ती प्रिय होती अनेक पंथा ।
तीहि गेली लयाला आता । उरले सगळे करंटेपण ॥३२॥
दिंड्या–मिरवणुकी होत्या मागे । उत्सव, दहीकाल्याच्या प्रसंगे ।
त्यातहि शिरले बेंढगे । नाच, गाणे, दंढारी ॥३३॥
लोक दिंडया–मिरवणुकी काढती । परि त्याचे तत्त्वचि आता न जाणती ।
म्हणोनि वाढली गलिच्छता अति । दारोदारी, घरोघरी ॥३४॥
कधीकाळी करिती भजन । घरोघरी बोलावया जाऊन ।
तुटका वीणा, टाळ दोन । मृदंग गेला कामातूनि ॥३५॥
मग राहिले वाजंत्री, वाजे । त्यातहि ताल, स्वर, अंदाजे ।
कसेतरी लाविती साजे । लग्न, मौंज म्हणोनिया ॥३६॥
कर्णे, शंख, घंट्या, नगारे । एकचि गोंधळ करिती सारे ।
बेताल होता कोठूनि भरे । ताल जीवनी गावाच्या ॥३७॥
ऐसा झाला तालतितंबा । विस्कळित झाल्या कीर्तने, सभा ।
म्हणती 'दया यावी रुक्मिणीवल्लभा' । आपुली शुद्धचि नाही ॥३८॥
गाव–देऊळाची पालखी निघे । जो तो तमाशा म्हणोनि बघे ।
कसली भावना ? खिदळती तुंगे । आयाबाया पाहोनि ॥३९॥
चालतांना शिस्त नाही । जनलोकांची अजीब घाई ।
कोणाचाही पायपोस नाही । पायी कोणाच्या ॥४०॥
कोणी कोणाचे ऐकेना । पुढे धसावयासि करी धिंगाणा ।
याचे शिक्षणचि नाही कोणा । कैसे चालावे मार्गाने ? ॥४१॥
नाही चालणारांसि शिस्त । चालती जैसी जनावरे समस्त ।
माणसाचे चालणेचि स्वस्थ । विसरले लोक ॥४२॥



मार्गी लागती ठोकरा । कितीकांच्या बोटांचा झाला चुरा ।
रेटा बसे मागे–सामोरा । करिता प्रदक्षिणा ही सारी ॥४३॥
सध्याची ऐसी प्रदक्षिणा । ही प्रदक्षिणेची विटंबना ।
मार्गाची घाण साफ होईना । प्रदक्षिणा काय कामाची ? ॥४४॥
म्हणोनीच काढली रामधून । व्हावयासि गावाचे पुनर्निर्माण ।
सेवा–मंडळ संस्थेतून । उदय केला कार्याचा ॥४५॥
मित्रहो ! रामधून नाही आजची । ही आहे परंपरा प्रदक्षिणेची ।
प्रदक्षिणेत योजना होती कार्याची । तीच आहे रामधून ॥४६॥
मी समजतो गावहि शरीर । त्यास राखावे नेहमी पवित्र ।
त्यानेच नांदेल सर्वत्र । आनंद गावी ॥४७॥
जैसे आपण स्नान करावे । तैसे गावहि स्वच्छ ठेवीत जावे ।
सर्वचि लोकांनी झिजूनि घ्यावे । श्रेय गावाच्या उन्नतीचे ॥४८॥
आपण तेवढे स्वच्छ राहावे । भोवती गलिच्छ वातावरणचि पाहावे ।
याने सुमंगलता कधी न पावे । तन, मन होई दूषित ॥४९॥
म्हणोनि स्वच्छ ठेवावे दुकान, घर । नाल्या, मोऱ्या, सडका चौफेर ।
मग रामधूनची फेरी सुंदर । काढावी आबालवृध्दांनी ॥५०॥
रामधूनपूर्वी गाव पूर्ण । व्हावे स्वच्छ, सौंदर्यवान ।
कोणाहि घरी गलिच्छपण । न दिसावे कोठे ॥५१॥
त्यात व्हावयाचि मदत । घ्यावेत सेवाभावियांचे हात ।
ज्यांना सेवा हेचि व्रत । पसंत आहे ॥५२॥
मिळोनि करावी ग्रामसफाई । नाली, मोरी ठायी ठायी ।
हस्ते, परहस्ते साफ सर्वहि । चहूकडे मार्ग ॥५३॥
त्यात जी जी निघेल घाण । ती दूर न्यावी गावापासून ।
अस्ताव्यस्त न देता फेकून । नीट व्यवस्था लावावी ॥५४॥
त्यासाठी करावे खतखड्डे । गावाबाहेर जागी उघडे ।
जनावरांचे मलमूत्र सापडे । तेहि त्यातचि भरावे ॥५५॥
तैसेचि करावे चरसंडास । मळ दिसोचि न द्यावा कोणास ।
आपुल्या मळाची आपणास । व्यवस्था लावणे सोयीचे ॥५६॥
नदीकिनारी वा बोरंगात । शौचासि जाती स्त्रियादि समस्त ।
ती कुचंबणा अणि घाण निश्चित । दूर होईल चरसंडासे ॥५७॥

तेथे बसलिया शौचास । माती झोकावी सावकाश ।
मलमूत्र येवोनि खतरूपास । कारणी लागो म्हणोनिया ॥५८॥
सर्व गावाचि ऐसी रीति । जे जे सांगति करोनि घेती ।
त्यावरीच प्रसन्न राहे क्षिती । खताने तृप्ति होवोनिया ॥५९॥
एरव्ही तो वांढाळ गडी । जो वाटेल तिकडे मळा सांडी ।
ते खतद्रव्यांची करिती नासाडी । वानर जैसे ॥६०॥
अहो ! ही निसर्गाची रचना । समजलीच पाहिजे सर्व जना ।
खाद्यचि होते खत जाणा । खतापासोनि खाद्योत्पत्ति ॥६१॥
आपण जे जे काही खातो । रसरक्तमांस तेणे जमवितो ।
त्यातूनि वाचले ते खत म्हणतो । भूमिवरि घालावया ॥६२॥
त्या खताची झाली जोपासना । तीच फळते काढाया उत्पन्ना ।
खत नसता भूमिची दैना । होऊ लागे ॥६३॥
मूत्रविष्टाहड्डी मिसळली । त्याने भूमीस स्फूर्ति चढली ।
पुन्हा पेरणी करिता उद्‌भवली । प्रचंड कणसे ॥६४॥
परि गाव हे समजेना । याचे ज्ञानचि नुरले कोणा ।
करिती विष्टेचा धिंगाणा । आपणासहित गुरांच्या ॥६५॥
गोवऱ्या करोनि जाळिती । ते महा-लाभास आंचवती ।
'शेणात आहे लक्ष्मीची वसती'। धर्मग्रंथीहि वचन ऐसे ॥६६॥
म्हणोनि सर्व गावाचे मलमूत्र । जमवोनि झाकावे जाणोनि तंत्र ।
त्याने गावाची जमीन सर्वत्र । खतवोनि द्यावी ॥६७॥
याने दूर होईल घाण । थांबेल रोगराईचे नुकसान ।
आणि पिकेल अधिक धान्य । अनेक लाभ एकामाजी ॥६८॥
हे समजाविण्याहि पाहिजे कमेटी । तिने करोनि नाना आटाआटी जनता ।
जागृत करोनि शेवटी । उत्पन्न द्यावे वाढवोनि ॥६९॥
गोखरु, तरोटा, तालीमखाना । ज्यांनी भूमि वेढिली जाणा ।
त्यांचेहि खत कराया सर्वांना । लावोनि पीक वाढवावे ॥७०॥
मुबलक खत, मुबलक पाणी । मुबलक श्रम, मुबलक बी-भरणी ।
मुबलक उत्पन्न गगनासि भेदूनि । दिसावे गावी ॥७१॥
हेचि खरी आहे सेवा । हेचि आवडे देवाधिदेवा ।
उगीच मोठेपणाचा कांगावा । मिरवावा कासयासि ? ॥७२॥



सर्वांनी गाव स्वच्छ करावे । तेणे आरोग्य नांदेल बरवे ।
घाण-खतातूनि नवनवे । वैभव येईल उदयासि ॥७३॥
ग्रामसफाई झालियावरि । रामधून काढावी नाम-गजरी ।
स्वच्छतेसवेच पावित्र्यहि भारी । वातावरणी यावयासि ॥७४॥
प्रातःकाळी सामुदायिक नामगजर । सुखस्वराज्य तो टिकवी सुंदर ।
त्यासाठीच ब्राह्ममुहूर्त, रामप्रहर । वेदहि म्हणे ॥७५॥
यावरि श्रोते विचारती प्रश्न । कैसी प्रदक्षिणेची रामधून? ।
जेणे घडेल ईश्वर-भजन । आरोग्य हेहि संपादे ॥७६॥
रामधूनची ऐका रीति । आधी करा ग्रामशुद्धि ती ।
जेणे स्नान घडे गावाप्रति । आरोग्यदायी ॥७७॥
निघण्यापूर्वी सूर्यनारायण । करावे संडासमार्जन ।
सर्व गावाने मार्ग झाडोन । आनंदभुवन निर्मावे ॥७८॥
जिकडे तिकडे पाणी शिंपावे । मार्ग रांगोळ्यांनी सजवावे ।
ठायी ठायी ठेवोनि द्यावे । फोटो संतां - थोरांचे ॥७९॥
सुंदर बांधावे आम्रतोरण । ठिकठिकाणी शोभवावे मैदान ।
आपुलाल्या श्रमाचे प्रदर्शन । दारादारांत ठेवावे ॥८०॥
मग जमोनि सकळ सेवक-जने । रामधून काढावी गांभीर्याने ।
प्रथम रांग चातुर्याने । सजवावी शोभे ऐसी ॥८१॥
लहान मुले मुलांमाजी । तरुण, युवक तरुणांमाजी ।
वयोवृद्ध सहजासहजी । वृद्धांमाजी योजावे ॥८२॥
स्वतंत्र चालवाव्या महिला, मुली । मार्गी आणावी शोभा चांगली गीते ।
म्हणणारांची योजना केली । पाहिजे मधामधातूनि ॥८३॥
बाजूनी चालवावे सेवक-जन । सेवक गणवेषात परिपूर्ण ।
त्यांनी सांभाळावी सेवकांची लैन । दोन दोन चालवावे ॥८४॥
एकाने धरावी घंटा हाती । दोन ठोके द्यावेत घाटेवरती ।
चालू लागेल ठरलिया पद्धती । रामधून - जागेहूनि ॥८५॥
''रघुपति राघव राजाराम । पतित पावन सीताराम'' ।
म्हणावे गायकाने प्रथम । मग म्हणावे सर्वांनी ॥८६॥
अतिधीराची चाल धरावी । ओळ, शिस्त सांभाळावी ।
मग गीते गायकांनी म्हणावी । राष्ट्र-भक्ति-भावनेची ॥८७॥

काही म्हणावी ग्रामावर । काही म्हणावी भक्तिपर ।
काही म्हणावी निरंतर । चारित्र्यवान करणारी ॥८८॥
चौकांतूनि, दारांतूनि । जात असता शांतपणी ।
जयघोष गर्जवावे भेदूनि । गगन सारे ॥८९॥
गुरुदेवाच्या जयजयकारे । भारतमातेच्या नामोच्चारे ।
साधु, संतांच्या घोषे, उद्गारे । जागृति करावी आनंदे ॥९०॥
मार्गी थोरामोठ्यांचे चित्रप्रदर्शन । वंदावे उभ्यानेचि हात जोडोन ।
थांबू नये मार्गातून । रामधून सोडोनिया ॥९१॥
ऐसी फेरी पूर्ण करावी । गुरुदेव-चौकी स्थिरावोनि घ्यावी ।
आधीच सेवकांनी लैन लावावी । लोकांपुढे येवोनि ॥९२॥
मग तैसेचि लोक उभे करावे । मोकळे मोकळे ओळीत बरवे ।
लहान लहानांत ठेवावे । तरुण, वृद्ध ऐसेचि ॥९३॥
महिलांची अलग रांग । करावी सुंदर यथासांग ।
ऐसा सजवावा लोकसंघ । चौकामाजी वा मैदानी ॥९४॥
मग सूचकाने सूचना द्यावी । जी 'सक्रियपाठी' लिहिली बरवी ।
प्रार्थना, भाषण, प्रणाम योजावी । योजनेपरी ॥९५॥
भाषणी हेच सांगत जावे । जनतेने नीटनेटके राहावे ।
सहकार्याने वागत असावे । गावामाजी ॥९६॥
जेव्हा वाढेल मार्गी घाण । तेव्हा होईल मलीन मन ।
तयायोगे विकास पूर्ण । राहील अडोनि जीवांचा ॥९७॥
सर्वांनी स्वच्छ, शिस्तबद्ध व्हावे । परस्परांशी प्रेम करावे ।
तरीच गाव स्वर्ग व्हावे । सर्वतोपरी ॥९८॥
भाषणानंतर जयघोष करून । मार्गी वळवावे सकळ जन ।
शांतपणे चालाया सांगोन । रामधून संपवावी ॥९९॥
शेवटी जावे सेवक-जने । अतिप्रसन्न होवोनि मने ।
स्वर्ग उतरेल या योजनेने । ग्रामामाजी ॥१००॥
लोकांना मार्गी चालताहि न ये । म्हणोनि काढला हा उपाय ।
गरीब-अमीर-अनपढ सर्व हे । शिकती चालणे यामाजी ॥१०१॥
दोघादोघांच्या करिती रांगा । एकामागूनि एकाची जागा ।
गाव पवित्र करी भजन-गंगा । वाढे संघटना गावाची ॥१०२॥




सहजचि चालणे, बोलणे येते । शिस्तीचे बसणे, उठणे कळते ।
गाणे वाजविणेहि कळो लागते । गावच्या दरबारी ॥१०३॥
घराघरांची होय दुरुस्ती । सौंदर्याची वाढे प्रीति ।
अस्वच्छतेची मिटे प्रवृत्ति । वाढे वृत्ति सहकार्याची ॥१०४॥
'आपण एक' ही वाढे भावना । दिगंती जाई आळसीपणा ।
कोणी न वाटे अधिक-उणा । गुण प्रदर्शना वाव मिळे ॥१०५॥
सर्वांचे सर्वांकरिता वाढे मन । लोक राहती अतिप्रसन्न ।
ऐशी आहे रामधून! । सहकार्याची बोधशाळा ॥१०६॥
ऐशा योजना घेवोनि हाती । करावी खेड्यांची दुरुस्ती ।
तेणे आनंद लाभेल सकळांप्रति । तुकड्या म्हणे ॥१०७॥
इतिश्री ग्रामगीता ग्रंथ । गुरु-शास्त्र-स्वानुभव संमत ।
ग्रामस्नान – रामधून वर्णित । बारावा अध्याय संपूर्ण ॥१०८॥

॥ सद्गुरुनाथ महाराज की जय ॥

**''मायबापहो !'पशु की होत पन्हैया, नरका कछु ना होय ! नर करणी करे तो नर का नारायण होय' हे संताचं म्हणण लक्षात घेऊन करणी करा अन् स्वतः नारायण बना. तुम्ही हात फिरवाल तिथं लक्ष्मी उभी राहील अन् गाव भूवैकुंठ होईल, हे ध्यानात ठेवा.''**

**– श्रीसंत गाडगेबाबा**

## ।। चित्र परिचय ।।



### अ. १३ – योगीराज स्वामी सीतारामदास महाराज

हाती उद्योगाचे साधन । मुखी रामनामाचे चिंतन ।
हाचि धर्म आहे महान । गावकरी लोकांचा ।।१४।।

१८५७ च्या स्वातंत्र्ययुद्धापूर्वीपासूनच भारत पाहात आलेले मंडला-निवासी आदर्श योगीपुरुष, जे निरीच्छ असूनही प्रसंगी स्वतः नांगर वाहून पहाडात शेती पिकवित व सतत आदर्श जीवनाचा पाठ लोकांना देत, आदर्श ग्रामनिर्माण कार्यास अशा संताचाही सहृदय व सक्रिय पाठिंबा आहे !



● अध्याय तेरावा ●

# ग्रामनिर्माणकला

।। श्रीगुरुदेवाय नमः ।।

हात फिरे तेथे लक्ष्मी शिरे । हे सूत्र ध्यानी ठेवोनि खरे ।
आपुले ग्रामचि करावे गोजिरे । शहराहूनि ॥१॥
हे गावीचे लोक विसरले । आळसाद्वारे दुदैव शिरले ।
दैन्य, दारिद्र्य सर्वत्र भरले । गावामाजी ॥२॥
शहरी यंत्रादिके आली । गावची उद्योगकला मेली ।
कुशल माणसे शहरी गेली । उद्योगासाठी ॥३॥
शहरी गेली गावचि बुद्धी । शहरी गेली गावचि समृद्धी ।
कष्टाळू शक्ति, हस्तकलासिध्दी । तेहि गेली ॥४॥
गावी उरली मुख्यतः शेती । ती कशीबशी चालविती ।
विशेष बुद्धी, शक्ति, संपत्ति । याचा ओघ दुसरीकडे ॥५॥
उत्तम शिक्षित, सामर्थ्यवान । ते नोकरीसाठी फिरती वणवण ।
उद्योगधंदे वा शेती कोठून । होईल उन्नती गावची ? ॥६॥
हे सर्व जरि लक्ष पुरविती । तरि छोटे उद्योग आणि शेती ।
निश्चये सर्वांसि पोषिती । बेकार, दीन कोणी नुरे ॥७॥
कारण, गावीच कच्चा माल । ज्यावरि जगता येई खुशाल ।
तो गावी पक्का नोहे म्हणोनि हाल । गावाचे आमुच्या ॥८॥
कच्चा माल मातीच्या भावे । तो पक्का होता चौपटीने घ्यावे ।
मग ग्राम-जन कैसे सुखी व्हावे ? । पिकवोनीहि ते उपाशी ॥९॥
त्यांच्या सुखाचे मुख्य साधन । सर्वतोपरी स्वावलंबन ।
शहरावरि न राहता अवलंबून । काम करावे सर्वांनी ॥१०॥
उत्तम बुद्धीकौशल्यज्ञान । शक्तिसामर्थ्य इकडे योजून ।
गावी वाढवावे स्वावलंबन । आळस झाडून सर्वांचा ॥११॥
जिकडे तिकडे स्वावलंबनप्रेम । घरोघरी चालावे काही काम ।
आपुले करोनि दुसऱ्यासि निष्काम । मदत करावी मानवांनी ॥१२॥

घरी मुलाबाळांनीही राबावे । शेती, कामधंदे हस्ते करावे ।
बायका-पोरासहित सुखी व्हावे । कष्ट करोनिया ॥१३॥
हाती उद्योगाचे साधन । मुखी रामनामाचे चिंतन ।
हाचि धर्म आहे महान । गावकरी लोकांचा ॥१४॥
गावचा एकेक घटक । बनवावा कलावंत - सेवक ।
जो आपुले घर सुरेख । करोनि गाव शोभवी ॥१५॥
कष्ट करणाराचे जीवन । शोभा देते देवाप्रमाण ।
स्वतः स्वावलंबी होऊन । सहकार्य करी जो गावाशी ॥१६॥
पहिले पाऊल घरचा धंदा । दुसरे पाऊल दाराच्या प्रबंधा ।
पुढे ग्रामसफाईच्या छंदा । लावोनि घ्यावे आनंदे ॥१७॥
असे हे कष्टाचे स्वरूप । वाढवीत जावे आपोआप ।
नाना कलांचे देणे रूप । कष्टालागी शिकावे ॥१८॥
कला असे मानवासि भूषण । परि पाहिजे जीवनाचे त्यात स्मरण ।
जगावे सुखसमाधान । धरोनिया अंतरी ॥१९॥
ऐसी असावी सर्व कला । नाहीतरि वाया गेला ।
प्राणी जन्मला आणि मेला । नाहकचि ॥२०॥
कलेनेच माणसाची ओळख । एरव्ही कोण पुसतो आणिक ।
तुम्ही आहात राव की रंक । आता कोणी पुसेना ॥२१॥
जरी असले कोणी धनवान । तरी व्हावे त्यांनी कलापूर्ण ।
यातचि आहे शहाणपण । श्रीमंतांचे ॥२२॥
नाहीतरि घरचे सर्वचि बेताल । समजेना गाणे-वाजवणे समकाल ।
परि गाणारे आणोनि खुशाल । जागरण करविती प्रयासे ॥२३॥
म्हणती आमुचा उत्सव महान । करावे काही नवरात्र म्हणोन ।
यासाठी आणिले गाणारे कलावान । देवापाशी ॥२४॥
आम्हांस काहीच कळेना । म्हणोनि बोलाविले ऐकणारांना ।
त्यांनी ऐकाव्या गाण्याच्या ताना । आम्ही हसावे पाहोनि ॥२५॥
काय करावी ऐसी रीति ? । आपणासि नसे ज्याची मति ।
त्यापेक्षा आपणहि शिकावी कोणती । कला अंगी ॥२६॥
दुसऱ्याचा राजहंस बरवा । आपला असेना कां पारवा ।
परि स्वावलंबी कलेचा रावा । बोलवावा प्रत्येकाने ॥२७॥



अहो ! जीवनाची एकतरी कला । असावी लागते मानवाला ।
तरीच तो 'मानव' शोभला । नाहीतरि कल्ला जीवनाचा ॥२८॥
गोड बोलण्याची कला । नेटके राहण्याची कला ।
अंग - मेहनतीची कला । आवश्यक आहे जीवनासि ॥२९॥
सुंदर लिहिणे अक्षर, ओळी । स्पष्ट वाचणे पुस्तके सगळी ।
जरा न दिसे टाळाटाळी । कोठेहि कलावंताची ॥३०॥
जीवनात यावा सरळपणा । साधा सात्विकतेचा बाणा ।
हृदय - निर्मळतेचा निशाणा । कलावंताचा धर्म हा ॥३१॥
एरव्ही कला सर्वांनाच येते । कलेवाचुनि नाही रिते ।
परि तारतम्य पाहिजे तेथे । लोकांपुढे न्यावया ॥३२॥
कष्ट करोनि आपुल्या हाते । आदर्श करावे घराते ।
असेल जरी झोपडी ते । भासवावी नंदनवन ॥३३॥
माती मिळवोनि घरे बांधली । परि चुन्यापेक्षाहि सुंदरता आली ।
थोडके पैसे लावोनि केली । रचना सगळी घराची ॥३४॥
आपुल्या गावीच विटा केल्या । मडकी - सुरया, ओतल्या, भाजल्या ।
कवेलु - कुंड्यासहित निर्मिल्या । आपुल्या गावी ॥३५॥
लाकडे तासोनि सरळ केली । त्यात सात्विकतेची प्रतिभा भरली ।
गावाच्या सुताराला आली । कला आमुच्या ॥३६॥
गावीच केले हातोडे-खिळे । ऐरणी-कुऱ्हाडी, सापळे-विळे ।
पावडे - कुदळ्या, शिंके आदि सगळे । सामान जीवनाचे ॥३७॥
दगड फोडोनि फाडी केली । सरळ चिरेदार टापोनि छाटली ।
इमारतीस बसविता दिसली । सुंदर सगळी ॥३८॥
फडे, झाडणी, चटई, नेवार । पलंग, पायपूस, मोटसंदोर ।
सुंदर केले डवरे, वखर । नव्या धर्तीचे ॥३९॥
कापूस पिंजोनि सूत कातले । सुंदर वस्त्र, स्वेटर विणले ।
बेरड्या, मुसके, दोर बनविले । जाळे उतारीसहित ॥४०॥
कोणी केली शेतीची रचना । धुरे, बंधारे वाफे नाना ।
पाहता दिसती सरळ लैना । शेतीमाजी ॥४१॥
झाडे दिसती ओळीबद्ध । सरळ, सुंदर, हिरवी शुद्ध ।
घरमालकचि करी खुद्द । काम आपुल्या हातांनी ॥४२॥

घराभोवती बाग केली । सांडपाण्यावरि झाडे वाढली ।
फळाफुलांची रोपे, वेली । भाजीपाला नित्याचा ॥४३॥
घरातूनि बाहेर दिसेना, पाणी । प्रवाह करीतसे आतुनि ।
धूर जातसे धुरांड्यातूनि । गोठ्यात गोमूत्र न साचे ॥४४॥
घरामाजी निर्मळपण । टापटिपीचे वर्तन ।
प्रत्येक वस्तु ठेविल्याचे स्थान । सरळ दिसे पाहताचि ॥४५॥
सर्व वस्तूंची लिहिली नावे । सामान घेता नलगे सांगावे ।
घरी येताचि दिसते बरवे । काय आहे ॥४६॥
दारासमोर जे जे दिसले । ते ते कलेनेचि सुंदर सजले ।
आपुल्याच गावी निर्मिले । कलाकारांनी ॥४७॥
जरा न दिसते उसनी ऐट । परकीयांकडोनि करविला थाट ।
सामान आणले भरमसाट । परदेशींचे ॥४८॥
जे दिसले ते आपुल्याच गावीचे । अथवा प्रांतीचे, देशीचे ।
तेणे कौतुकचि आमुचे । सर्व करिती ॥४९॥
ऐसी घरादारांची सुंदरता । आपणचि आणावी स्वतः ।
कोणीहि डोळे भरोनि पाहता । प्रसन्न होती अंतरी ॥५०॥
ऐसी कला असावी कष्टार्जित । स्वावलंबी उद्योगे उन्नत ।
नखशिखांत ओजहि त्यात । जो जीवन जागवी देशाचे ॥५१॥
कुणाची कला शरीर भूषवी । कुणाची घरी टापटीप दर्शवी ।
कुणाची कला गावचि सजवी । हौसेने आपल्या ॥५२॥
मानवी कला गाव शोभवी । गावाची कला प्रांत जागवी ।
प्रातांची कला देश भूषवी । वैशिष्ट्याने ॥५३॥
ही सर्व कलाकुसरी । मानवासचि साधे बरी ।
परि योजकता असावी अंतरी । कलावंताच्या ॥५४॥
नाहीतरि टोप शिरी विदेशी । आणि खादीपंचा कटीसि ।
मारुतीचे तोंड लंबोदरासि । ऐसे होते ॥५५॥
एकाने दिवाणखाना सुंदर केला । पाहताना आनंद झाला ।
परि शौचकूपचि बिघडला । होता त्याचा ॥५६॥
परिचय घेणारा आला घरी । प्रथमचि चढला शौचगृहाभीतरी ।
आंत पसरली घाणचि सारी । स्वच्छता खरी दिसेना ॥५७॥



मग पाहिले स्वयंपाकघर । कांदे, बटाटे यांचे फोतर ।
चुलीआतचि राख-केर । झाडुहि नव्हता लागला ॥५८॥
पानाचा पीक कोपऱ्यात । कपाटामागे घाण बहुत ।
दुमडूनि बघता सुंदर बिछायत । कचरा, कागद त्याखाली ॥५९॥
म्हणे वा हो कलावंत! । बघा जरा जावोनि आत ।
सारवण झाले नाहीत सात । दिवसापासोनि दिसतसे ॥६०॥
बाकी सगळे केले सुंदर । परि एवढेचि गालबोट त्यावर ।
ऐसे असो नये अंतर । कलेमाजी ॥६१॥
कला असावी सर्वनिपुण । आत, बाहेर निर्मळ पूर्ण ।
हात फिरे तेथे लक्ष्मी धावोन । येते मग ॥६२॥
यापरि कलेने घर सजविले । आपुले जीवन सुंदर केले ।
जरी गाव असेल बिघडले । तरि ते सौंदर्य टिकेना ॥६३॥
काळ्या शरीरावरि कोड । तैसे दिसेल ते एकटे धेंड ।
म्हणोनि गाव करावे आदर्श सुघड । कलांनी आपुल्या ॥६४॥
गावी असावी सेवक-मंडळे । ज्यांना 'मुखी राम, हाती काम' हे कळे ।
अखंड चालविती कामाचे सोहळे । ग्रामसेवेसाठी ॥६५॥
श्रमदानाचे सप्ताह घेवोनि । रस्ते दुरुस्त करावे सर्वांनी ।
शोषक खड्डे, मोऱ्या करोनि । सांडपाणी थांबवावे ॥६६॥
रस्त्यामाजी एकाऱ्या असती । पांदण झाली निमुळती ।
गोखरू, काटे झुडपे वाढती । सर्व व्यवस्था लावावी ॥६७॥
डोब साचते, पडती डेरे । ठीक करावे मार्गी सारे ।
शौचगृहेहि नव्या प्रकारे । निर्मावी सर्वांसाठी ॥६८॥
नदी, तळ्याकाठची स्वच्छता । तेथे पार, घाट आदींची व्यवस्था ।
उत्पादन वाढवाया तत्त्वता । उपयोग घ्यावा जलाचा ॥६९॥
गावातील मार्ग, विहीरी, घरे । सुंदर सजवावी पशूंची कुटीरे ।
ठायी ठायी मुत्रीघरे । नाल्या करणे निर्माण ॥७०॥
सडकांचिया दुतर्फा छान । सर्वांनी करावे वृक्षारोपण ।
ढोले ठेवावे मधामधातून । कचरा त्यात टाकावया ॥७१॥
चहू दिशांनी गाव सुंदर । वारे करोत जीवनसंचार ।
कोठेहि घाण, कोणी घर । पाहताना न दिसावे ॥७२॥

घरे मोडकी असतील कोठे । सर्वांनी जावे तया वाटे ।
मिळोनि करावे चोखटे । 'हाहि आमुचा' म्हणोनिया ॥७३॥
घरे खिडक्यावीण अंधारी । कोंदट, दमट, बसकी सारी ।
गुरांचा गोठा घराभीतरी । ऐसे राहू न द्यावे ॥७४॥
गोटे, ओटे करावे दुरुस्त । कोपरे, खंडारे, गैरशिस्त ।
राहू न द्यावे अस्ताव्यस्त । वाकडेतिकडे ॥७५॥
हे सर्व खणोनि काढावे । दोरीलैन धरोनि नवे ।
मोकळेचाकळे मार्ग करावे । उल्हासवावे जनलोकां ॥७६॥
मार्गी नसावा लाकूडगोटा । साफ दिसाव्या चारी वाटा ।
कोणी अडला असेल करंटा । त्यास वळवावे गावाने ॥७७॥
कुंपकाटी, गवती शाकार । गावी नसावा शक्यतोवर ।
उडवे - हुडे, पुंजा - केर । भलतैसा न राहू द्यावा ॥७८॥
फास, गवतगंजी कडबागूड । भूस उपणणे अथवा खळवाड ।
कुंभार-आवा, अग्निकुंड । सुरक्षित जागा नेमाव्या त्यांच्या ॥७९॥
मेली जनावरे कोठेहि नेली । गावभरी घाण, मांसहाडे आली ।
ऐसे न व्हाया पाहिजे नेमिली । जागा उधडण्या-गाडण्याची ॥८०॥
जेथे तेथे सूचनाफलक । लाविले पाहिजेत मार्गदर्शक ।
शोभवावेत रस्ते, चौक । थोरांचिया नावांनी ॥८१॥
मार्गावरि अंधार पडे । तेथे प्रकाशाची व्यवस्था घडे ।
ऐसे करावे चहूकडे । कार्यकर्त्यांनी ॥८२॥
गावी शाळा निर्माण करावी । कोंडवाड्याचीहि व्यवस्था व्हावी बाजार, ।
गुजरी अवश्य असावी । सोयीसाठी व्यवस्थित ॥८३॥
नाहीतरी गावी बाजार भरला । शिस्त नाही दुकानाला ।
कोणताही माल कोठे ठेवला । झाला सगळा कल्लोळ ॥८४॥
लोक एकमेकांस खेटती । काहीकांचे खिसे कापती ।
नाही समजली चालिरीती । माणुसकीची ॥८५॥
तरुण पाहती भलतीकडे । बोल बोलती वेडेवाकडे ।
चालती इकडे, पाहती तिकडे । तेणे धक्के बसती लोकां ॥८६॥
कोणी मध्येच माल उपणती । खुंट्या गाडती, गाड्या सोडती ।
बकऱ्या-गायी मोकाट फिरती । मध्येच मांडती मिरच्याहि ॥८७॥



लैन नाही दुकानांप्रति । कोणीहि कोठे माल मांडती ।
या सर्वांमुळे होते फजिती । घेणारां आणि देणारांची ॥८८॥
त्यात माशांचा अवघा घोळका । कोणी म्हणेना कोणा ऐका ।
सर्वत्र पैसा कमावण्याचा झोका । चालतसे हौसेने ॥८९॥
कोणी म्हणेल ऐसे कां करतो? । दुकानदार म्हणे आम्ही कर देतो ।
मग आम्हाला कोण काय म्हणतो? । सांगा सांगा ॥९०॥
ऐसे जेथे जेथे होते । दुरुस्त करावे सगळे तेथे ।
प्रेमाने सांगून पाहाता सर्वानुमते । कोणी हट्ट करीना ॥९१॥
आपुले जेव्हा जन न ऐकती । तेव्हा सभाद्वारे करावी दुरुस्ती ।
सांगून पाहावे सरकाराप्रति । दुरुस्त कराया गाव सारे ॥९२॥
मुख्य आपुली असावी समिति । जी सुंदर ठेवील बाजाराप्रति ।
वजने, मापे, माल, जागा, पद्धति । सर्व चोख करावया ॥९३॥
सर्वांच्या पिकांचिया रक्षणा । गावी येऊ न द्याव्या वानरसेना ।
ऐशाहि कराव्या समित्या, संघटना । नाना कार्यास्तव ॥९४॥
सर्वांगीण असावी ग्रामरचना । मनोरंजनासहित पुरवाव्या भावना जेणेकरून ।
ग्रामवासीयांना । आठव ना ये शहराचा ॥९५॥
व्याख्याने, कीर्तने, कलापथक । वादविवाद, पोवाडे, नाटके सात्विक ।
ऐसी नित्य नवनवी करमणूक । गावी चालवावी सर्वांनी ॥९६॥
एक असावा सुंदर बाग । त्यात मनःस्वास्थ्याचेचि असावे अंग ।
प्रसन्नता वाढाया नाना रंग । वृक्ष, वेली, लताकुंज ॥९७॥
त्यात क्रीडांगणे, पाळणे । बालक-युवकांची प्रसन्नविती मने ।
जाती-पातीचे विसरोनि रडगाणे । सहभोजने चालवावी ॥९८॥
गावी विश्रामगृह असावे । ज्यात पाहुणे उत्साही बरवे ।
सर्वांस मुक्तद्वार ठेवावे । उतरविण्यासाठी ॥९९॥
तेथे असावी सुंदर विहीर । पाणी पिण्यासि थंडगार ।
वचने असावी उद्‌बोधक, सुंदर । भिंतीवरि सर्व ॥१००॥
सुंदर करावा आखाडा । मुले बागडती उल्हासे तडतडा ।
आदर्श मल्ल - खेळाडूंचा धडा । गिरवावया ॥१०१॥
सुंदर मुलांची शरीरे । दिसती गुलाब जैसे गोजिरे ।
बागचि फुलले हरेभरे । सुपुत्रांचे ॥१०२॥

सुंदर असावे वाचनालय । नाना ग्रंथ ज्ञानमय ।
करावया सुबुद्धिचा उदय । गाव – लोकी ॥१०३॥
काय चालले जगामाजी । कळावे गावी सहजासहजी ।
म्हणोनि वृत्तपत्रे असावी ताजी । आकाशवाणीहि त्याठायी ॥१०४॥
तैसेचि असावे हस्तलिखित मासिक । अक्षर गावाचे व्हाया सुरेख ।
लेखन चित्रादि कलांचे कौतुक । वाढेल गावी ॥१०५॥
सहज कळावे विचार आणि वृत्त । म्हणोनि फळा असावा चौकात ।
ती जणू ज्ञानेश्वराची भिंत । ज्ञान देई सर्वांसि ॥१०६॥
अक्षरशत्रूंना सामर्थ्य यावे । म्हणोनि प्रौढशिक्षण चालवावे ।
घरा – घरावरि नंबर द्यावे । नामपाटी लावोनिया ॥१०७॥
गुराढोरांची औषधे जाणती । साह्य द्यावे त्या ग्रामीणांप्रति ।
अनुभूत नुकसे लोकगीतादि किती । संग्रह त्यांचा करावा ॥१०८॥
गावाचे आरोग्य असावे उत्तम । सर्व प्राणीमात्रांसि लाभावे क्षेम ।
म्हणोनि चालवावे आरोग्यधाम । गावामाजी ॥१०९॥
आपुल्याच गावची वृक्षवल्ली । कंदमुळे आणोनि औषधे केली ।
निसर्ग – उपचारासहित दिली । पाहिजेत वैद्ये ॥११०॥
चालवावे ऐशा वैद्यांप्रति । सर्पादि विषे उतरविती ।
घाव बुजविती, हाड जुळविती । औषधे ऐसी अनुभवोनि ॥१११॥
जेथे पुरुषांचा दवाखाना । तेथे हवी सूतिकागृहाचीहि योजना ।
दोहोचीहि आवश्यकता ग्राम–जना । भासतसे अत्यंत ॥११२॥
गावचे वैद्य, गावच्या सुईणी । गावे घ्याव्या तयार करोनि ।
नवनवी ज्ञानसाधने देवोनि । सर्वतोपरि ॥११३॥
गावी असावे पोष्टस्थान । त्वरित कळावया वर्तमान ।
परस्परांचा व्यवहार पूर्ण । पत्रोपत्री चालावया ॥११४॥
ऐशा सर्वचि सुखसोयी । लोक करू शकतील निश्चयी ।
स्वावलंबी राहूनि सर्वहि । देतील जेव्हा सहकार्य ॥११५॥
प्रत्येकाचा कितीतरि वेळ । श्रमशक्ति आणि बुद्धिचे बळ ।
व्यर्थ जातसे ते उपयोगी सकळ । लाविता गाव सुखी होई ॥११६॥



ऐसे गाव होता आदर्शपूर्ण । शहराहूनीहि नंदनवन ।
सर्वांचे करील आकर्षण । सुंदर जीवन तुकड्या म्हणे ॥११७॥
इतिश्री ग्रामगीता ग्रंथ । गुरु – शास्त्र – स्वानुभव – संमत ।
स्वावलंबी ग्रामनिर्माणकला–कथित । तेरावा अध्याय संपूर्ण ॥११८॥

॥ सद्गुरुनाथ महाराज की जय ॥

''दुनिया सियार है । जो कुछ होता है, 'हुआ' 'हुआ' कहती जाती है । परन्तु कहने से काम नहीं बनता, करने से ही सब कुछ होता है । श्रम, स्वावलंबन और सहयोग के नींवपर दुनियामें स्वर्ग खडा किया जा सकता है!''

**– श्री स्वामी सीतारामदास महाराज**

# ।। चित्र परिचय ।।



## अ. १४ – श्री चक्रधर स्वामी

अरुणोदयाची सुवर्णप्रभा ! दिसे लावण्याची शोभा !
निसर्ग वाढवी शांती, प्रतिभा ! अलभ्य लाभा पावती योगी !

सातशे वर्षां पूर्वी गुजराथेत जन्मून वऱ्हाडात महानुभाव धर्म स्थापणारे व कटाक्षाने मराठीतूनच धर्मोपदेश करणारे देवतानिरासक, समताप्रेमी व अहिंसाधर्मी महापुरुष. शिष्यांनी लिहून ठेवलेली त्यांची दिनचर्या उत्कृष्ट आहे. प्रात:काळी प्रात:स्मरण, सहल निरूपण करणे, धावण्या–पोहण्याचा व्यायाम घेणे, ''दरे–दरकुटे बुजविती, उंचे टेके असता तिथे समस्थळे करविती'' याप्रमाणे गाव सोयीचे श्रमदान करणे व करविणे असा त्यांच्या क्रम असे. ''प्राणासि आहारु देआवा: इंद्रिया नेदाव: धाए तंव खाईजे: पाहे (उजाडे) तंव निजिजे तैसे नव्हे की ।। तुम्हा शयनीं आसनी भोजनी परमेश्वरू हो आवा: ।'' हाच त्यांचाही उपदेश !



• अध्याय चौदावा •

# ग्राम–आरोग्य

।। श्रीगुरुदेवाय नमः ।।

एक श्रोता महाभाविक । म्हणे गावहि केले ठीक ।
तरी देवाने मारली मेख । ती निघू शकेना ॥१॥
प्रत्यक्ष शहर जरी झाले । तरी देवापुढे ताब न चाले ।
तेथे खेडे शहरापरी केले । तरी काय होते? ॥२॥
देवी–देवतांचा कोप झाला । कॉलरा–पटकीचा झटका आला ।
म्हणजे सुधारूच न शके कोणाला । बाप वैद्याचा ॥३॥
म्हणोनि देवता राहती प्रसन्न । ऐसे करावे पूजन ।
गाव असो की शहर संपन्न । सुखी त्याविण न राहे ॥४॥
मित्रा ! ऐक याचे उत्तर । देव – देवता किंवा परमेश्वर ।
हे कृपेचेचि अवतार । कोपचि नाही त्या ठायी ॥५॥
कोप करती ते दुष्टांवरि । त्यातहि उद्धारभावचि अंतरी ।
तेथे निरपराध्यांस छळती जरी । तरि तया देव न म्हणावे ॥६॥
सर्व लोक लेकरे त्याची । छळणा कां करील कोणाची ? ।
कृति आपुलीच आपणा जाची । शत्रु आपणचि आपुले ॥७॥
चहुबाजूंनी केली घाण । त्यात जंतु झाले निर्माण ।
त्यातूनि रोगाच्या साथी भिन्न भिन्न । वाढ घेती ॥८॥
नाही नेमाचा आचार । शुद्ध नाही आहार – विहार ।
अशुद्ध हवा–पाणी, संहार । करिती जनांचा ॥९॥
काही केव्हा कुठेहि खाणे । कधी झोपणे, कधी जागणे ।
सप्तहि धातु कोपती याने । रोगरूपाने फळा येती ॥१०॥
'हॉटेली खाणे, मसणा जाणे' । ऐसे बोलती शहाणे ।
त्यावरि नाना तिखट व्यसने । आग्यावेताळासारिखी ॥११॥
कशास काही नियम नुरला । कोण रोगी कोठे थुंकला ? ।
कोठे जेवला, संसर्गी आला । गोंधळ झाला सर्वत्र ॥१२॥

त्याने रोगप्रचार झाला । लागट रोग वाढतचि गेला ।
बळी घेतले हजारो लोकांला । वाढोनि साथ ॥१३॥
मग कोणी म्हणे कोपली देवी । कोणी मांत्रिकासि बोलावी ।
बाहेर, भितरचे समजोनि गावी । काढिती आरत्या अंधारी ॥१४॥
कोणी करणी, कौटाळ म्हणती । कोणी पिशाच्चास भारती ।
औषधेहि न देता रोगी मारती । मूर्खपणाने ॥१५॥
भगत, मांत्रिक, अरबाडी, जाणते । घुमारे बघती भाविक कोणते ।
पोटासाठी नाना मते । फैलाविती लोकांमाजी ॥१६॥
करविती नवससायास थोर । देवीपूजेचा जोर सोर ।
रेडे, बकरे, कोंबडे पामर । कापताति अज्ञाने ॥१७॥
देवानेचि केले जीव । तयास कैची मारण्याची हाव? ।
मधले दलाल करिती ठेव । आपुली हौस पुरवावया ॥१८॥
संते देवास केले प्रसन्न । तेव्हा बळी दिले कोण? ।
चोखोबा, श्रीचक्रधर, रामकृष्ण । म्हणती 'प्रसन्न देव भावे' ॥१९॥
देवासि पाहिजे बलिदान । तो पशु आपला भ्रम, अभिमान ।
गावचे गेल्याविण अज्ञान । सुखी जीवन न होई ॥२०॥
गाव असो अथवा शहर । तेथील बिघडले आचारविचार ।
म्हणोनीच रोगराईने बेजार । जाहले सारे जनलोक ॥२१॥
गाव व्हावया निरोगी, सुंदर । सुधारावे लागेल एकेक घर ।
आणि त्याहूनहि घरात राहणार । करावा लागेल आदर्श ॥२२॥
व्यक्ति व्हाया आदर्श सम्यक । पाहिजे दिनचर्याच सात्विक ।
सारे जीवन निरोगी, सुरेख । तरीच होईल गावाचे ॥२३॥
नियमी बांधला एकेक दिन । त्यानेच सुधरे जीवन संपूर्ण ।
गावहि होय आरोग्य संपन्न । सारे प्रसन्न देवी-देव ॥२४॥
नियमाचा मुख्य आधार । मजबूत पाहिजे निर्धार ।
त्यावरीच उत्कर्षाची मदार । ऐहिक आणि आध्यात्मिक ॥२५॥
नाहीतरि मानवाने नियम केले । सर्व जीवन सुरळीत चाले ।
परि एकदा दुर्लक्ष झाले । की चुकतचि जाते ॥२६॥
एकदा रात्रभरि जागला । मग सकाळी उठणेच कशाला? ।
आळसात सर्व दिवस गेला । नियम मोडोनि ॥२७॥



त्यास धाक नाही, काळजी नाही । घरचे लोक बोललेच नाही ।
हा उठला दुसरे दिवशीहि । दहा वाजता दिवसाचे ॥२८॥
काही दिवस अलक्ष्य झाले । उशिरा उठणे अंगवळणी पडले ।
मग बदलेना, काही केले । उपचार जरी ॥२९॥
ऐसे कासया घडू द्यावे । रोज सकाळीच उठावे ।
न उठता घरच्यांनी जागवावे । झोपणारासि निश्चये ॥३०॥
काही म्हणती उशिरा उठणे । हे तो भाग्यवंताची लक्षणे ।
त्यास काय आहे उणे । पोट भराया धनवंता? ॥३१॥
ऐसे समजोनि आळशी केला । अरे ! हा भाग्यवान कसला? ।
निजण्यावरि भाग्यवान ठरला । तरि बीमार महाभागी कां नव्हे? ॥३२॥
तो तर निजलाचि राहतो । झोपूनचि खातो - पितो ।
काय अधिक भाग्यवान म्हणवितो ? । सांगा सांगा ॥३३॥
भाग्यवंताची उलटी व्याख्या । करणे शोभते का शहाण्यासारख्या ? ।
अरे ! सकाळी उठणारासचि सख्या । भाग्यवंत म्हणावे ॥३४॥
श्रमातूनचि उपजे भाग्यसंपत्ती । निजणारे तिची हानि करिती ।
इतरां श्रम अधिक पडती । उत्साह घटे आपलाहि ॥३५॥
झोपी गेला घरचा धनी । सूर्य चालला डोक्यावरोनि ।
उन्ह पडले तरी निजूनि । कड फेरितो झोपेचा ॥३६॥
नोकर-चाकर आळस करिती । म्हणती घरधनीच झोपती ।
मग आपणचि कैशा रीती । काम करावे जावोनि ? ॥३७॥
ऐसा सारा अंधार पडे । वाजती श्वानांचे चौघडे ।
मूलबाळ रडे, ओरडे । झोप काढिती आयाबाया ॥३८॥
घरदार कोठूनि पवित्र? । जागल्यावरीही आळसले गात्र ।
अव्यवस्था माजे सर्वत्र । बद्धकोष्ठता वाढ घे ॥३९॥
यातूनचि वाढती सर्व रोग । वैद्य, डॉक्टरांचा लागला भोग ।
तिकडे बिघडत गेले उद्योग । शिरले दुर्भाग्य त्या घरी ॥४०॥
प्रातःकाळची आरोग्यदायी हवा । सदासर्वदा मानवते जीवा ।
प्रसन्नता देई ऋतु तेधवा । सर्व प्राणीमात्रांसि ॥४१॥
सर्व वने-राने जागी होती । पुष्पे सारी विकास पावती ।
पशुपक्षीहि नेहमी उठती । प्रातःकाळी ॥४२॥

पहाटे दोहता गाय-म्हैस । त्यात अधिकचि सार-अंश ।
पहाट वारा चढवी रक्तास । लाली रोगप्रतिकारक ॥४३॥
म्हणोनि प्रात:काळी उठावे । ब्राह्ममुहूर्ता डोळ्यांनी बघावे ।
उठताच प्रात:स्मरण करावे । आसनस्थानी ॥४४॥
प्रात:स्मरण म्हणजे नविन स्फूर्ति । उगवत्या दिवशी व्हाया प्रगति ।
उत्तम कार्य घडावे पूर्ण गती । म्हणोनि प्रार्थना देवाची ॥४५॥
त्यावेळी जो संकल्प करतो । वाईट न घडो ऐसे चिंतितो ।
तो सुसंस्कारे वाढत जातो । उन्नतिमार्गे वेगाने ॥४६॥
म्हणोनि प्रात:स्मरण करावे । नैसर्गिक उत्साहभरे भरावे ।
मग प्रातर्विधी आटोपावे । नित्यनेम हा अमोलिक ॥४७॥
पहाटेस शौचमुखमार्जन । त्याने वायुदोषांचे होय शमन ।
शरीरी नवा जोम निर्माण । होय निर्मळपण लाभोनि ॥४८॥
सकाळी करावे उष:पान । त्याने अंतरींद्रियांचे शांतवन ।
नंतर करावे शीतजलस्नान । अति प्रसन्न चित्त राहे ॥४९॥
शीतजलस्नानाचे महिमान थोर । तेणे त्वचाशक्ति जागे सुंदर ।
शरीर राहे सदा तरतर । उत्साहाने ॥५०॥
मेंदूचा भाग थंड राहिला । तरीच बुद्धिचा उत्कर्ष झाला ।
ऐसा थोरांना अनुभव आला । कितीतरी ॥५१॥
उष्ण पाण्याने स्नान करणे । म्हणजे बिमारचि तो समजणे ।
ऐसी सवय नेहमी लावणे । हानिकारक देहासि ॥५२॥
स्नानोत्तर अरुणोदयापूर्वी । सामुदायिक ध्यान-उपासना करावी ।
प्रार्थना मंदिर अथवा पडवी । ध्यानास्तव पाहावी निर्मळ ॥५३॥
अरुणोदयाची सुवर्णप्रभा । दिसे लावण्याची शोभा ।
निसर्ग वाढवी शांती, प्रतिभा । अलभ्य लाभा पावती योगी ॥५४॥
जन म्हणती योग्यांनी ध्यान करावे । आपणा कासया उठावे, स्मरावे? ।
हे म्हणणे कदापि नोहे बरवे । कोणाचेहि ॥५५॥
योगी आपली समाधि धरी । साधक सन्मार्गाचा योग करी जीवन- ।
उज्ज्वलतेचा योग संसारी । प्रात:काळी साधतसे ॥५६॥
ध्यानापरीच सहल प्रात:काळची । जरूर करावी सवय रोजचि ।
त्याने देह, मन राहे निर्मल, शुचि । प्राणवायु स्पर्शाने ॥५७॥



कोणी धावती, कोणी चालती । कोणी आसने, सूर्यनमस्कार घालती ।
कोणी गाती, चिंतन करिती । हे दृश्य दिसो प्रभाती ॥५८॥
काही पठण – पाठण करावे । शरीर, मनासि वळण लावावे आयुष्य ।
सुंदर होते आघवे । ऐशा क्रमे ॥५९॥
घरी असो वा आश्रमी । प्रवासी असो वा तीर्थधामी ।
प्रात:काळी नित्यनियमी । अभ्यासक्रम उरकवावा ॥६०॥
घरा-आश्रमाची करावी सफाई । स्वच्छता मार्गी ठायी ठायी ।
गायी, म्हशींचे गोठे सर्वहि । आरशासारखे करावे ॥६१॥
गडी, माणसांनी सहाय्य द्यावे । परि प्रत्येकाने काम करावे ।
आईबाई मिळोनि उरकवावे । काम धंदे चटचट ॥६२॥
कोणीहि बघे अरुणोदयी । संडासंमार्जन, रांगोळी, रई ।
आत बाहेर गलिच्छता नाही । कामे झाली सकळांची ॥६३॥
ऐसे ज्या गावी झाले । समजावे लक्ष्मीचे मन मोहिले ।
आरोग्याचे राज्य आले । तया गावी ॥६४॥
तेथे उदंड आयुष्य वाढते । जेथे प्रात:काळी स्वच्छता होते ।
कोणीहि न दिसे झोपला जेथे । प्राणीमात्र ॥६५॥
म्हणोनि ऐसे नियम करावे । चुकलियाहि चुको न द्यावे ।
पुन:पुन्हा सावरावे । वर्तन आपुले ॥६६॥
ऐसा अभ्यास जडल्यावरी । आरोग्य, भाग्य नांदे संसारी ।
औषधांची गरजचि नुरे शरीरी । वाढे अभ्यंतरी नवे तेज ॥६७॥
पूर्वी प्रात:काळी, माध्यान्हा । आणि सायंकाळी जाणा ।
होती त्रिकाळ संध्या, प्रार्थना । संस्कारास्तव लाविली ॥६८॥
ते सर्वकाळची उचित । म्हणोनि प्रातर्ध्यान नियमित ।
आणि सायंप्रार्थनाहि नेमस्त । करीत जावी सर्वांनी ॥६९॥
निद्रेचिया आदि अंती । दिवस-रात्रीच्या संधीप्रति ।
आणि भोजनसमयी संकल्प होती । ते बनती दृढ संस्कार ॥७०॥
जनी भोजनी हरि आळवणे । गीतापाठादि उच्चारणे ।
सात्विक भाव हृदयी भरणे । शुद्ध करी जीवनासि ॥७१॥
श्रोतियांनी प्रश्न केला । भोजनी आळवावे भगवंताला ।
याचे फळ सांगा आम्हाला । काय कैसे? ॥७२॥

भोजन म्हणजे आहार घेणे । तेथे कशाला देवाचे गाणे ।
हास्यविनोद कां न करणे । उल्हासास्तव ? ॥७३॥
ऐका याचेहि उत्तर । भोजन म्हणजे पिंडसंस्कार ।
यज्ञहि यासि म्हणती थोर । वैश्वानर अग्निमाजी ॥७४॥
भोजनाचे वेळी प्रसन्न । केलिया विचार शुभचिंतन ।
तैसेचि भिनती निर्मळ गुण । अन्नासवे ॥७५॥
पवित्र धूप, सुगंध सात्विक । तेणे वातावरण रोगनाशक ।
रांगोळ्या आदि प्रसन्नकारक । स्वच्छ असावी जागा तरी स्वच्छेतेविणा ॥७६॥
जे भोजन । समजावे ते मलीनपण ।
अग्नि वाढाया हातपाय धुवोन । पुसोनि भोजन करावे ॥७७॥
काही करावे भोजनापूर्वी काम । जेणे मिळे सकळांसि आराम ।
कार्य होतसे सुगम । सर्व जनां मिळोनि ॥७८॥
कोणी आसने, पाट टाकावे । कोणी वाढावे, पाणी ठेवावे ।
कोणी उदबत्ती, धूप लावावे । सुगंधासाठी ॥७९॥
प्रथम बसोनि पाठ म्हणावा । गंभीर सुरे रंग भरावा ।
वाढणे संपता 'शांतिमंत्र' गावा । गांभीर्याने ॥८०॥
मग करावे ब्रह्मार्पण । आदराने करावे अन्नसेवन ।
भोजनीहि श्लोक, मधूर वचन । उल्हासाने बोलावे ॥८१॥
भोजनापूर्वी आचमन । त्याचा उद्देश अग्निदीपन ।
चित्राहूति, जलआवर्तन । समर्पण हाचि भाव त्याचा ॥८२॥
ईश्वरे उपजविले अन्न । ते अन्न ईश्वरी कृपादान ।
ज्यावरि सर्वांचे असे जीवन । त्याचे ऋण आठवावे ॥८३॥
त्याची लेकरे जीवजन । त्यांना आधी लाभावे अन्न ।
यासाठी विश्वदेवाचे संतर्पण । यज्ञमय भोजन या भावे ॥८४॥
भोजन म्हणजे भूमातेचा प्रसाद । समजोनि सुखे घ्यावा आस्वाद ।
ज्यात शेतकऱ्यांचे कष्ट विशद । ते अन्न सेवावे सेवेस्तव ॥८५॥
ऐशा सद्भावे आदरे सेवावे । उत्तम श्लोक भोजनी गावे ।
वेडेवाकुडे न बोलावे । क्रोधा न यावे भोजनसमयी ॥८६॥
हास्यविनोद जरी असला । तरी अश्लीलता न यावी प्रसंगाला उच्छिष्ट ।
कण न पाहिजे टाकला । भोजन-प्रसंगी ॥८७॥



राजस, तामस, सात्विक । भोजनाचे प्रकार अनेक ।
त्यात आपली शक्ति पाहूनि सम्यक । पचेल तैसे करावे ॥८८॥
कोणी सज्जन म्हणती भले । पचनासाठी सर्वचि खाद्य निर्मिले ।
परंतु पचनाचे तारतम्य पाहिले । पाहिजे जुळवोनि ॥८९॥
कोणी खाद्य रोग करी । कोणी खाद्य भोग भरी ।
कोणी खाद्य वाईट संस्कारी । करिते प्राण्या ॥९०॥
काही जीव चुनखडीहि खाती । काही मांस, किडे भक्षिती ।
परंतु त्यांची स्वभाव - प्रकृति । त्याचि परि राहे ॥९१॥
मानवाने काय खावे । म्हणजे मानवपणेचि शोभावे ।
हेचि येथे पाहावे । लागते सज्जनासि ॥९२॥
शुद्ध, सात्विक अन्न घेतले । त्याने सात्विक विचार प्रवर्तले ।
तामस, राजस खाद्य सेविले । तैसे झाले आचरण ॥९३॥
मद्यमांसाहार करिती कोणी । विकारबुद्धी वाढे मनमानी ।
भलतेचि रोग जाती लागोनि । सांसर्गिक आदि ॥९४॥
हे तो निश्चितचि आहे । खाद्ये रसरक्त उत्पन्न होय ।
रक्तापासूनि मांस, मेद, वीर्य । निःसंशय होती शरीरी ॥९५॥
जैसे ज्याचे रक्तरसगुण । तैसे विचार होती स्फुरण ।
क्रूर - शूर, मंद - बुद्धिमान । रक्त मिश्रणे दिसताति ॥९६॥
काही आनुवंशिक गुण येती । रक्तरेताचिया मिश्रस्थिती ।
काही खाण्या-पिण्याचेहि होती । संस्कार अंगी ॥९७॥
काही संगतीने वळण लागे । भूमिपात्रे काही परिणाम जागे काही ।
प्रयत्नशीलतेचे धागे । वळविती जीवा ॥९८॥
हे सर्व जरी खरे असले । तरी मुख्य अंग खाद्यपेयचि झाले ।
कारण त्यानेच बनले - घटले । रक्त-मांस जीवांचे ॥९९॥
उत्तम रक्ताचे असावे शरीर । तरि अन्नहि उत्तमचि खावे सुंदर ।
बाष्कळ खाता मेंदू - इंद्रियांवर । बाष्कळताचि येईल ॥१००॥
मग विषय-वासना नावरे । लागेल बहिरंगाचे वारे ।
झगडती जैसी जनावरे । तैसे अनावर मानवहि ॥१०१॥
ज्यासि क्रूरकर्मचि करणे आहे । त्याने तेचि खावे निःसंशय ।
तैसेचि भोगावेत अपाय । झालिया अंगी ॥१०२॥

ज्यासि मनुष्यपण लाभावे । ऐसे वाटे जीवेभावे ।
त्याने सात्विक अन्नचि सेवावे । सर्वतोपरी ॥१०३॥
एकाने ऐसा प्रश्न केला । सात्विक अन्न कुठले गरीबाला ? ।
त्याने काय करावे बोला । जीवनासाठी ? ॥१०४॥
मित्रहो ! सात्विक अन्नचि सहज मिळते । जे श्रमाने शेतीत पिकते ।
भाजीभाकरी, भातपोळी लाभते । अल्प प्रयासे ॥१०५॥
सूर्यकिरणांनी तयार झाली । कंद, भाज्या फळे बागेत पिकली ।
सत्वांशयुक्त सर्व ती भली । आरोग्यदायी ॥१०६॥
साधे, सहज, ताजे, पावन । तेचि असे सात्विक अन्न ।
नाना विकृतींचे मिष्टान्न । ते सात्विक नव्हे ॥१०७॥
कळणाकोंडाहि सात्विक । ज्या सत्वे जगती गरीब लोक ।
सात्विक म्हणजे शरीरपोषक । आरोग्यदायी सुसंस्कारी ॥१०८॥
तळले, विटले खाऊ नये । आंबट, खारट सेवू नये ।
तैसे अति गोडहि जेवू नये । भोजनी कोणी ॥१०९॥
मिष्टान्न नेहमी सेवू नये । तळण, मसाले खाऊ नये ।
मिरचीवरि सोकावू नये । सर्वांनीच ॥११०॥
स्वच्छ असावे सात्विक अन्न । ताजे, रुचिकर आणि रसपूर्ण ।
पालेभाजी, फळभाजी विभिन्न । स्वादसंपन्न मुळातचि ॥१११॥
उगीच आटवून आटवून रबडी खाणे । वाटून-वाटून पुरण-पोळी करणे ।
तळून तळून भजे-पुऱ्या जेवणे । उन्मत्तांचे भोजन हे ॥११२॥
चाळून, गाळून केला रवा । पिसून, किसून भरला खवा ।
खातांना जीभ करी वाहवा । पोट जाई कामातुनि ॥११३॥
काहींनी खाण्याचीच वाढविली कला । भात खाती टोपला-टोपला ।
वरोनी चिंचपाणी पेला - पेला । भातावरि घेती ॥११४॥
काही लाडू , पेढे खूपचि खाती । रबडी, हलवा तंडोनि घेती ।
पैसे ठरवोनि माप लाविती । खावयाचे ॥११५॥
मग त्याने पचन होईना । सारा शरीराचा होय धिंगाणा ।
नाना रोग जडती, यातना । द्यावयासि ॥११६॥
कोणी स्वादासाठी भोजन करिती । नको असले तरी पोटात कोंबती ।
मग बिमारी घेऊनि उठती । कॉलरा, अपचन, संग्रहणी ॥११७॥




काहींना होते उदर-कुंदी । चाले अपानातून दुर्गंधी ।
लोक हसती 'खाणेपिणे स्वच्छंदी । कां करतो' म्हणोनिया ॥११८॥
प्रकृतीच्या विरुद्ध आहार । नाही काळवेळाचा सुमार ।
आंबट, तेलकट आदि विषम मिश्र । ऐसा आहार विषारी ॥११९॥
काही लोक ऐसेचि खाती । प्रकृति बिघडलिया औषध घेती ।
गरबास कुठली इतकी संपत्ती? । वैद्य होती घरोघरी ॥१२०॥
डॉक्टर म्हणती पथ्यचि नाही । तेणे रोगाचे मूळ तैसेचि राही ।
रोगी पाहती तेच नित्यहि । मृत्यूची घाई झाल्यापरी ॥१२१॥
पहिले खावोनि मस्त व्हावे । मग औषधि घेवोनि पचवावे ।
ऐसे उपद्रव कासयासी करावे । उन्मत्तपणे? ॥१२२॥
उगीच आहे ऐसे खाणे । पचविण्यासाठी चूर्ण घेणे ।
अन्नरसाची नासाडी करणे । कशासाठी? ॥१२३॥
आत वाढत जाता विकृति । धन्वंतरीहि काय करिती? ।
नष्ट करोनि औषधे, संपत्ती । मुखी माती पडतसे ॥१२४॥
परंतु लोक आग्रही पडती । हितचिंतक म्हणोनि खाया देती ।
ते समजावे घातक श्रोती । ठेवावी निश्चिती आहाराची ॥१२५॥
नियमित, सात्विक अन्नचि खावे । साधे, ताजे, भाजीपाले बरवे ।
दूध, दही आपुल्या परी सेवावे । भोजन करावे औषधचि ॥१२६॥
सर्व भोजनि उत्तम भोजन । ज्यात गोघृतदुग्धतक्रपान ।
समजावे अमृताचे सेवन । शरीरासाठी ॥१२७॥
गोदूध नित्य सेवन करिता । कायाकल्पचि होय तत्त्वता ।
शक्ति, चपलता, बुद्धिमत्ता । आरोग्य हाता नित्य राही ॥१२८॥
निरोगी आयुष्य लाभेल बहुत । अल्पमृत्यु अथवा रोगांची साथ ।
हे पाऊल न ठेवतील गावात । तुकड्या म्हणे ॥१२९॥
इतिश्री ग्रामगीता ग्रंथ । गुरु - शास्त्र - स्वानुभव - संमत ।
व्यक्ति-आचारे ग्रामारोग्य वर्णित । चौदावा अध्याय संपूर्ण ॥१३०॥

॥ सद्गुरुनाथ महाराज की जय ॥

"उदयाचा पूजावसर जालेयानंतरे गोसावी । विहरणासि बीजे करितीः निरुपण करितीः।।"
(गद्यपूजा.) जुझवीति धावविति: पोहवीति: दरे दरकुटे बुजवीति:
पाषाण फोडविति: आनंदवीति: श्री चक्रधर ॥ (पद्यपूजा.)

**- श्री चक्रधर स्वामी**

# ॥ चित्र परिचय ॥



## अ. १५ – श्रीगुरु श्रीपाद श्रीवल्लभस्वामी

ज्यांनी त्यागिले सर्वस्वास । करतली भिक्षा तरुतली वास ।
ऐसे निष्काम गुरुहि गोसेवेस । न विसंबती कदापि ॥२०॥

दक्षिण भारतात पीठापूर आणि कुरवपूर येथे वास्तव केलेले कलियुगातील दत्तावतार किंवा एकमुखी दत्त सरस्वती गंगाधरलिखित श्री गुरुचरित्र ग्रंथामध्ये त्यांचे चरित्र समाविष्ट आहे. अत्यंत प्रभावी वैराग्यशील व सर्वज्ञ अशा या महात्म्याने गोमातेस दिलेले महत्त्व समाजास प्रेरक ठरो.



● अध्याय पंधरावा ●

# गोवंश–सुधार

॥ श्रीगुरुदेवाय नमः ॥

एका श्रोतियाने प्रश्न केला । दुधाचा तर दुष्काळचि पडला ।
कुठले ताक – लोणी सकळाला । गोमातेचे ? ॥१॥
दूध देणारे लबाडी करिती । म्हशीच्या दुधात पाणी घालती ।
गायीचे म्हणोन विकती । अधिक भाव घेवोनि ॥२॥
कोठे गायी राहिल्या आता ? । तुरळक दिसती विकता, वाचता ।
वधती चपला – जोड्यांकरिता । वासरेहि करोडो ॥३॥
गोपालांचा देश भारत । आला गायीगुरे पूजीत ।
परंतु गायी झाल्या खात । लक्षचि नाही तयांकडे ॥४॥
त्यातील काही कसाब घेती । काही दुसरीकडे नेती ।
उरल्या त्या कचरा असती । गायी साऱ्या ॥५॥
चारापाणी अति महाग । नाही व्यवस्थेसाठी मार्ग ।
मानवचि अर्धपोटी, मग । गायी कशा पाळाव्या ? ॥६॥
ऐकोनि त्याचे विशद विवरण । म्हणालो तुमचे म्हणणे मान्य ।
परि यात आपुलाचि संपूर्ण । दोष आहे ॥७॥
भारत कृषिप्रधान देश । शेतीसाठी हवा गोवंश ।
गोरसाइतुका नसे सत्वांश । अन्यत्र शुद्ध ॥८॥
म्हणोनि गोवंश सुखी होता । तोवरि नव्हती दरिद्रता ।
नव्हती ऐशी विपुलता । रोगराईची ॥९॥
गोमय गोमूत्र मिळोनि रात्रंदिस । कायम होता भूमीचा कस ।
पेवे भरती गावागावास । धान्याची तेव्हा ॥१०॥
भूमि आणि जनावरे । हीच उत्पतीची कोठारे ।
एकाचि अनेक होती खिल्लारे । जोडधंदा घरोघरी ॥११॥
घरोघरी दूधदुभते । अन्नधान्यासि सहायक ते ।
आबालवृद्ध राहात होते । सशक्त आणि निरोगी ॥१२॥

म्हणोनि गायीगुरा 'गोधन' । ऐसे सत्य नामाभिधान ।
सुखी होता भारत संपूर्ण । गोवंशा सुखवोनिया ॥१३॥
परि पुढे झाले दुर्लक्ष । काही भोवला राज्यपक्ष ।
गायी होऊनि बसल्या भक्ष्य । वाढले दुर्भिक्ष त्यागुणे ॥१४॥
आपण दुधाळ म्हशीकडे गेलो । चहाकॉफी आदि पिऊ लागलो ।
म्हणोनि गायीसमेत मुकलो । सर्वस्वासि ॥१५॥
प्राणी खावोन एकदा तोषला । तो नित्यासाठी त्यास मुकला ।
मग कुठले दुभते, संतान, खतादि त्याला ? । ऐसे केले वेड्यापरी ॥१६॥
गायी विकोनि पोट भरले । मग नित्यासाठी खाईल कुठले? ।
पोट बांधोनि गायीस पोषिले । त्यास लाभले सौख्य पुढे ॥१७॥
'गोरक्षणी स्वरक्षण' । ऐसे पूर्वजांचे कथन ।
म्हणोनिच गायीकरिता प्राण । दिले अनेक शूरांनी ॥१८॥
श्रीकृष्ण आणि शिवशंकर । वसिष्ठ आणि दत्त-दिगंबर ।
दिलीप, शिवाजी गोसेवा - तत्पर । संत अपार गोभक्त ॥१९॥
ज्यांनी त्यागिले सर्वस्वास । करतली भिक्षा, तरुतली वास ।
ऐसे निष्काम गुरुहि गोसेवेस । न विसंबती कदापि ॥२०॥
गायीच्या शरीरात सर्व । कल्पिले जे देवी - देव ।
तयांचा हाचि असे भाव । गाय अधिष्ठान देशाचे ॥२१॥
तिच्या शेणाने पिके शेती । शेती देई सुख, संपत्ती ।
म्हणोनीच शेणामाजी लक्ष्मीची वसती । वर्णिली असे ॥२२॥
गोरसाने आरोग्य शरीरी । मग कोठे राहिला धन्वंतरी? ।
सत्वांश मिळता बुद्धि गोजिरी । सरस्वती ही गोदुग्धी ॥२३॥
उदररोगांचे नाशक । सत्वांश देई गायीचे ताक ।
तुपाने शांत डोळे, मस्तक । चंद्र - सूर्य जणूं नेत्री ॥२४॥
गाय जिवंत आरोग्यधाम! । तिचे पुत्र प्रत्यक्ष परिश्रम ।
राष्ट्र सुखाचा मार्ग सुगम । गोसेवेयोगे ॥२५॥
म्हणोनि सकलांचे कर्तव्य आहे । जेणे गोवंश सुधारणा होय ।
ऐसा करावा काही उपाय । सर्वतोपरी ॥२६॥
कसाब आपुल्या गावातूनि । गायी नेती बघता नयनी ।
दु:ख व्हावे सकलांच्या मनी । परतवाव्या त्या गायी ॥२७॥



ऐसे दलाल हाकोनि द्यावे । अथवा अन्य कामी लावावे ।
परोपरीने सुमार्गी वळवावे । घेते - देते सर्वचि ॥२८॥
विकणारासि समजवावे । एवढ्याने कां श्रीमंती पावे? ।
मरे तो घरी खतमूत घ्यावे । तरी फळे सेवा गायीची ॥२९॥
द्वारी सकाळी गाय हंबरली । गोमूत्र देवोनिया उठली ।
म्हणजे समजावी पवित्रता झाली । जागेमाजी ॥३०॥
ज्याचे घरी शेती आहे । त्याने अवश्यचि पाळावी गाय ।
मळमूत्र सर्व उपयोगी राहे । ऐसी गायमाऊली ती ॥३१॥
गायमाऊली आईसमान । तिची निगा असावी पूर्ण ।
न करावी गोमाशांची खाण । अथवा सापळा हाडांचा ॥३२॥
घालोनि चारा, पेंड, चुरी । गाय करावी हत्तीपरी ।
प्रेमे गोंजारोनि घरोघरी । गाय प्रसन्न ठेवावी ॥३३॥
गावी असावा आदर्श सांड । बैल निपजावया धिप्पाड ।
सुंदर होईल शेतीसि जोड । वाहावया बैलांची ॥३४॥
उत्तम गायी, सुंदर सांड । पाहता आनंद वाटे उदंड ।
दूध पिवोनि मुले प्रचंड । शक्ति दाविती ॥३५॥
तेचि खरे सात्विक सौंदर्य । मुले गोंजारिती वत्स, गाय ।
दूध पिवोनि राहती तन्मय । खेळीमेळी ॥३६॥
गोवंशाचे दूध वाढे । तरीच संतान उन्नतीस चढे ।
खाऊ घालोनि लाडू, पेढे । उगीच पोटे वाढती ॥३७॥
कृत्रिम दूध - लोणी काही । गोरसतुल्य ठरणार नाही ।
नाना रोग वाढती देही । न कळता कृत्रिमतेने ॥३८॥
सर्वथैव यंत्रांनीच काही । शेती सुखकर होणार नाही ।
गावची संपत्ती गावी राही । सुगम तो मार्ग उत्तम ॥३९॥
यासाठी गायीगुरांची जोपासना । घरोघरी ठेवावा गोवत्सठाणा ।
प्रसन्न दिसावे पशू नाना । उत्तम लाभावे दूध, दही ॥४०॥
दुधादह्याची योग्य पूर्ति । व्हावी आपुल्या गावाप्रति ।
घरोघरी गायी वासरे असती । तेचि गाव भाग्यशाली ॥४१॥
जो आपुल्या घरी गाय न ठेवी । तयासाठी गोरक्षणे असावी ।
गरीबांची तेथे सोय व्हावी । उत्तम लाभावा गोरस ॥४२॥

काही ठिकाणी गोरक्षणे करिती । मरतुकड्या गायी जमविती ।
त्यांच्या नावाने पैसे खाती । गायी मारती उपवासी ॥४३॥
ऐसे नको गोरक्षण । जे दुखवी मानवी मन ।
राहावी गायी – सांड पाहोन । प्रसन्न जनता सर्वदा ॥४४॥
गोरक्षणे दहीदुधाची सोय व्हावी । लोकी सुखसंपन्नता यावी ।
कोरडी गो-पूजाच न करावी । घरोघरी अथवा गावी ॥४५॥
उत्तम चारापेंड देऊन । वाढवावे गायीचे वजन ।
आदर्श गायी, वळू ठेवोन । उत्तम गोधन वाढवावे ॥४६॥
गावी सुंदर गायींचा तांडा । चराया गोचरभूमि उदंडा ।
नदी, तळे, विहिराचा आखाडा । भव्य जैसा ॥४७॥
उत्तम ऐसा देवसांड । मुबलक चरावा चारा-बिवड ।
बीजारोपणी दूधकावड । देती गायी ॥४८॥
हेचि खरे गोरक्षण । नाहीतरि कसाबभुवन ।
उगीच गायी वाड्यात कोंडून । गोरक्षण का होई ? ॥४९॥
गायीस नसे चराऊ जमीन । तरि मोकळी पाडावी सरकाराकडोन ।
अथवा गावी करावी अर्पण । जमीनदारांनी ॥५०॥
गोरक्षणाचा व्हावा अभ्यास । नाना प्रयोग सावकाश ।
कैसे पुढे गेले अन्य देश । ती माहिती द्यावी सर्वां ॥५१॥
गोवंशाच्या रोगनिवारणा । गावी ठेवावा दवाखाना ।
लाभ मिळावा सर्वांना । प्रतिबंधकता समजावी ॥५२॥
गावोगावी व्हावी गो-उपासना । गोसेवा, गोदुग्धमंदिर स्थापना ।
रुचि लावावी थोरा, लहाना । गोदुग्धाची परोपरी ॥५३॥
सर्व करावे जे जे करणे । परि सुधारावे सात्विक खाणे ।
त्यावाचोनि सद्‌बुद्धि येणे । कठिणची वाटे ॥५४॥
सात्विक खाद्यपेयाविण काही । गावी आरोग्य येणार नाही ।
उत्तम शक्ति नसता देही । संपत्तिहि कैची ? ॥५५॥
उत्तम दूध, उत्तम सांड । उत्तम शेती, उत्तम बिवड ।
उत्तम कामगार प्रचंड । शक्तिशाली ॥५६॥
ऐसे ज्यांनी गाव केले । तेचि आज प्रतिष्ठा पावले ।
एरव्ही तोरा करोनि मेले । निकामी ते ॥५७॥



निकामियाची व्यर्थ संपत्ती । निकामियाची व्यर्थ शक्ती ।
नाना मार्गे संपोनि अंती । दुःख देई जीवासि ॥५८॥
खूप सत्वमय खावोनि अन्न । मेद घेतला वाढवोन ।
तेथे रोगांची फौज निर्माण । होतसे दुःख द्यावया ॥५९॥
म्हणोनि केले पाहिजे काम । आरोग्यदायी कुणी व्यायाम ।
अंगातुनि निघता घाम । नष्ट होती रोगजंतु ॥६०॥
'व्यायाम आरोग्यदायी मित्र!' । हे ध्यानी ठेवावे सूत्र ।
आळस वैरी मानिला सर्वत्र । सर्वतोपरी ॥६१॥
व्यायामाविण सात्विक भोजन । तेहि मारी विकारी होऊन ।
व्यायामे होय अग्निदीपन । अन्नपचन सहजचि ॥६२॥
व्यायामे जडत्व जाई दुरी । व्यायामे अंगी राहे तरतरी ।
रक्तव्यवस्था उत्तम शरीरी । वाढे विचारी सजीवपण ॥६३॥
व्यायामाने सशक्त स्नायु । व्यायामे मानव होय दीर्घायु ।
व्यायामहीना पित्त, कफ, वायु । जर्जर करिती अत्यंत ॥६४॥
व्यायामे वाढे प्रतिकारशक्ति । स्वावलंबनाची प्रवृत्ती ।
व्यायामे अंगी वाढे स्फूर्ति । कार्य करण्याची ॥६५॥
ऐसा व्यायाम सर्वांकरिता । असे उपयुक्त पाहता ।
ही नव्हे केवळ एकांगी संथा । पहिलवानांची ॥६६॥
कोणी व्यायामामागेच लागले । ते मल्ल-पहिलवान झाले ।
लोकां दिपवोनि सामर्थ्य दाविले । देह – शक्तीचे ॥६७॥
त्यात कोणी बक्षीसासाठी । करिती जीवनाची आटाआटी ।
पैशांसाठी मारापिटी । करिती कोणी ॥६८॥
देह झिजवावा सेवेस्तव । सत्यमार्गे रक्षावे गाव ।
दुर्बळासि उचलावे हेचि वैभव । मल्लविद्येचे ॥६९॥
परि इकडे नाही ध्यान । नष्ट करोनिया मिष्टान्न ।
शक्ति खर्चिती दुष्कर्मी पूर्ण । ऐसे व्यायामी कितीतरी ॥७०॥
कोणाच्या भरदार देहावरी । कपडे मुलायम जरतारी ।
आपुल्याच खाद्य-खुराकीची करी । सर्वदा चिंता ॥७१॥
गावसेवेचे काम आले । तेथे पुढारीपण दिले ।
तरि तोंडचि त्याचे चाले । स्वये न करी एकहि ॥७२॥

कपड्यास न पडावी वळी । म्हणोनि दुरूनिच सांभाळी ।
कामे करिती माणसे सगळी । परी तो जागचा हालेना ॥७३॥
असेल कुस्तीमाजी बरवा । परि जो प्रसंगी कामी न यावा ।
तो मल्ल म्हणोनि गौरवावा । कोणत्या न्याये ? ॥७४॥
तोचि खरा पहिलवान । जो देह-उन्नति साधूनि पूर्ण ।
सेवेसाठी अर्पितो जीवन । हनुमंतापरी ॥७५॥
नुसते दंड, मोंढे, मारणे । कुस्ती जिंकणे, चणे पचविणे ।
थोरां, लहानास तंबी देणे । नव्हती लक्षणे व्यायामाची ॥७६॥
साधाया सेवेचा उपक्रम । कराया जीवनावे काम ।
जो शक्ति दे, तोच व्यायाम । आवश्यक सर्वा ॥७७॥
व्यायाम मंदिरातचि काही । व्यायाम होतो ऐसे नाही ।
उत्पादनासि सहायक होई । तो व्यायाम श्रेष्ठ ऐसा ॥७८॥
हाते घेवोनि दंड मारणे । त्याहूनि उत्तम पाणी ओढणे ।
दळणे, फोडणे, जमीन खोदणे । आरोग्यदायी ॥७९॥
जीवनाचा अमोल वेळ । घालवोनि खेळती तकलादी खेळ ।
त्यापेक्षा परिश्रमाचे फळ । उत्तम सर्वतोपरि ॥८०॥
दळणकांडणादिके उत्तम । मिळे आरोग्यकारी व्यायाम ।
देह विशेष राही कार्यक्षम । ऐसा सत्वांशहि लाभे ॥८१॥
वाचेल बरीचशी संपत्ती । देशात वाढेल श्रमाची शक्ती ।
सर्व कार्याची होईल पूर्ति । गावीच या मार्गाने ॥८२॥
होवोनिया लोकसेवा । आरोग्याचा लाभेल मेवा ।
गावास लाभे सुखाचा ठेवा । अडचण कोठे कशाची? ॥८३॥
आपुली शेती आपुल्या कष्टे । शेणमूत्रादि घालोनि गोमटे ।
करिता ऐसी आदर्श नेटे । उत्पन्नासि वाण नुरे ॥८४॥
आबालवृद्ध, नर, नारी । यासाठी झटतील घरोघरी ।
तरी सर्व सुखे संसारी । लाभतील त्यांना ॥८५॥
लाभेल व्यायामाचे फळ । कामामाजीच सकळ ।
निसर्गचि देईल आरोग्यबळ । सर्व लोका ॥८६॥
वनस्पति आदींचा सहवास । सूर्य-किरणातील सत्वांश ।
शुद्ध हवेतील श्रम सर्वास । अमृतापरी लाभदायी ॥८७॥



मग गाव असो की शहर । तेथे रोगांचा न राहे संचार ।
एक-एक व्यक्ति करील आचार । ऐसा जरी ॥८८॥
व्यसने, आळस, दुराचार । यापासोनि राहिला दूर ।
ऐसा एकेक घटक सुंदर । पाहिजे गावी ॥८९॥
सद्गुण जेथे जेथे दिसती । ते उचलोनि आणावे अनुभवाप्रति ।
यानेच उन्नत होईल व्यक्ति । जीवन सुधारेल गावाचे ॥९०॥
जीवन लाभावे उज्ज्वलतेचे । तरि सर्व कामधाम असावे सोयीचे ।
जे जे कराल ते ते चालावे साचे । त्याच मार्गी ॥९१॥
भोजनस्थानी, निद्रास्थानी । सभास्थानी, उद्योगस्थानी ।
विशेष प्रसंगी, सहजस्थानी । सद्विचारेचि वर्तावे ॥९२॥
संस्कार आणि शुद्धबुद्धता । आरोग्य आणि पवित्रता ।
यावरि लक्ष ठेवोनि सात्विकता । बिंबवावी जीवनी ॥९३॥
याकरिता बोललो काही दिनचर्या । आहारविहारादि कार्या ।
ग्रामस्थांनी अनुभवोनिया । उद्धार करावा जीवनाचा ॥९४॥
ऐसे करावे एकेक कार्य । जेणे गावी नांदेल सात्विक सौंदर्य ।
यातचि स्वर्गीय सुखाचे माधुर्य । तुकड्या म्हणे ॥९५॥
इतिश्री ग्रामगीता ग्रंथ । गुरु-शास्त्र-स्वानुभव संमत ।
गोरस व्यायामसेवन कथित । पंधरावा अध्याय संपूर्ण ॥९६॥


॥ सद्गुरुनाथ महाराज की जय ॥

## ॥ अभंग ॥

देवा ! दुधाची शिदोरी । कां मज न देसी श्रीहरि ।
आळ पुरवी बा मुरारी । दुध पोटभरी मज देई ॥
माता, पिता उपमन्यु । तिथे गरुडपृष्टी वाहवून ।
क्षीरसागरी ठेवी नेऊन । दूध प्राशन सुखे करा ॥

**– श्रीसंत नामदेव महाराज**

## ।। चित्र परिचय ।।



### अ. १६ – भगवान महावीर स्वामी

सम्यक् आचार, सम्यक् विचार । संयमाचा आदर्श थोर ।
साधु, संत, महावीर । जगज्जेते झाले या मार्गे ।।११७।।

अडीच हजार वर्षांपूर्वी झालेले जैनधर्माचे प्रवर्तक नीच–उंच–स्त्री–पुरुष–शूद्र–ब्राम्हणादि भेदभावांचे निवारक व जैन भाषेतून उपदेश करणारे शांतिप्रेरक संत. ''इच्छांना काबूत ठेवा, कोणाला मुद्दाम दुखवू नका, कुसंगती व रात्र–भोजन टाळा, निर्वाहास आवश्यकच वस्तू बाळगा. अधिक संग्रह म्हणजे लोभाचे थैमान, लोभ दुःखमूल व संयम हाच सुखमूल'' यावर विशेष भर देऊन निर्वैर प्रेम व उत्कट संयम यांचे राज्य नांदविण्याचा त्यांनी प्रयत्न केला. हे चित्र म्हणजे या अध्यायातील विचारांचे अत्युच्च शिखर !



● अध्याय सोळावा ●

# वेष–वैभव

।। श्रीगुरुदेवाय नमः ।।

ईश्वरास मान्य जे सत्कार्य । जे सांगोनि गेले संतवर्य ।
ते आचरणे यातचि सौंदर्य । खऱ्या जीवनाचे ।।१।।
सात्विक आहार, सात्विक विहार । सात्विक संगति, व्यवहार ।
सात्विक वाचन – दर्शनादि साचार । प्रिय सज्जनासि ।।२।।
ऐसे सात्विक करणे जीवन । ही नव्हे अंधश्रद्धेची खूण ।
सात्विकता निसर्गनियमास धरून । ऐसा अनुभव जाणत्यांचा सात्विकतेने ।।३।।
आरोग्य लाभे । शांति, सुख दास होऊनि राबे ।
जीवन सर्वप्रकारे शोभे । प्रभावी सौंदर्याने ।।४।।
स्वैराचार, हीन विचार । राजस–तामस आहार विहार ।
दिनचर्येत नाही ताळतंत्र । त्याचे इह–पर सुख नाशे ।।५।।
चहा–चिवडा–चिरुटाचे दास । आपल्या तन, मन, धनाचा नाश ।
करोनि बिघडविती जीवनास । गावाच्याहि ।।६।।
सात्विक, सरळ ठेविता जीवन । ते होय सुंदर आरोग्यपूर्ण ।
सात्विकचि असावी वेषभूषाहि जाण । मानवाची ।।७।।
काही भडक वेषभूषा करिती । कपडयावरि किती कपडे घालती ।
आत लुकडे परि वरोनि शृंगारिती । शरीरे आपुली ।।८।।
तोंडाचे खोडके, दिसती हाडे । छातीची खोली दाखवी लाकडे ।
काय होते घालोनि कपडे । गर्भरेशमीहि ? ।।९।।
उगीच करिती थाटमाट । कपाळी अत्तराचा मळवट ।
पावडर, कंगवा, आरसा, चिरूट । खिशामाजी ।।१०।।
व्यसन तोंडाचे खोडके करी । तेल लाविती वरचेवरी ।
केस फिरवोनि म्हणती साजरी । दिसतो आम्ही ।।११।।
अंग निस्तेज, जीर्ण झाले । खरुज, गजकर्णादिके भरले ।
भारी कपडे घालोनि झाकिले । सौंदर्यासाठी ।।१२।।

कशाचे हे सौंदर्यपण । ज्यातूनि न जाय सूर्यकिरण ।
ब्रह्मचर्याचेहि नाहीच कण । शरीरामाजी ॥१३॥
चालताना पडती आढ्या । बोट लावता खाती तनघड्या ।
बाता करिती बड्याबड्या । आम्ही शौकिन म्हणोनि ॥१४॥
रड्यासारखी निघते वाचा । औषधावाचूनि न होय शौच्या ।
बोटात आंगठ्या हिरकणीच्या । मिरवोनि काय ? ॥१५॥
निस्तेज शृंगारिले प्रेत । की भुजाण उभे केले शेतात ।
एकटाचि विचित्र दिसे चारचौघात । ऐसी नको वेषभूषा ॥१६॥
अथवा भरजरी कपडे घातले । परि ते स्वच्छचि नाही केले ।
सोवळे म्हणवोनि पुनःपुन्हा नेसले । तेच ते पीतांबर ॥१७॥
ऐसी कला कासया करावी । जी हास्यास्पद आणि बाधकहि व्हावी ।
आपुली साधीच राहणी ठेवावी । ऐपतीपरी ॥१८॥
अंगी गुणसौंदर्य भरावे । सुंदर, सात्विक कपडे करावे ।
खादी ग्रामोद्योगाचेचि ल्यावे । लेणे आपुल्यापरी ॥१९॥
नेहमी स्वच्छ धुतलेले असावे । एकचि वस्त्रे अंग झाकावे ।
निसर्गाचे हवा, किरण लागावे । शरीरालागी ॥२०॥
एकावरि एक आच्छादन । ते थंड देशाचे अंधानुकरण ।
शरीरा लागता सूर्यकिरण । औषधिगुण अंगी येती ॥२१॥
सोने, मोती रेशीम-जरी । सौंदर्यप्रसाधने बहुपरी ।
त्या सर्वांहूनि शतपटीने बरी । आरोग्याची टवटवी ॥२२॥
सौंदर्य असावे रक्तशुद्धीचे । ओजपूर्ण ब्रह्मचर्याचे ।
नीटनेटके वागण्याचे । घरी, दारी उत्तम ॥२३॥
कला दाखवावी बळकट स्नायूंची । उंच छातीची, ताठ शरीराची ।
आरोग्याची, बाणेदारपणाची । सर्वांगानी आदर्श ॥२४॥
वेषभूषेची चढाओढ । आज जीवनास झाली अत्यंत जड ।
गरजा, चिंता, रोगांची वाढ । यात कसले मोठेपण ? ॥२५॥
बाह्य वस्तूंचे भडकपण । हे आतल्या उणीवेचे प्रदर्शन ।
महत्वास चढता बाह्य आवरण । मोल घटे मानवतेचे ॥२६॥
मानव मानवतेने शोभावा । गांधीवेष लाजवी वैभवा ।
श्रीकृष्णाचा मोरमुकुट पावा । वेड लावी विश्वाला ॥२७॥



हे जाणोनिया अंतरी । सात्विक व्हावे आहार-विहारी ।
तेणे घर-गाव देशसेवाहि बरी । साधतसे सहजचि ॥२८॥
लोकांपुढे राही आदर्श । समानतेचा उसळे हर्ष ।
ग्रामोद्योगांचाहि उत्कर्ष । आपैसाचि होय गावी ॥२९॥
येथे श्रोता करी शंका सादर । साधी राहणी, उच्च विचार ।
हे जरी ऋषिजीवनाचे सूत्र । तरी ते आज न चाले ॥३०॥
किंमती कपडे, भडक राहणी । छाप पाडिती आज जनी ।
साधा सात्विक राहे पडोनि । मागच्या मागे ॥३१॥
विष्णूचा पीतांबर पाहून । सागरे लक्ष्मी केली अर्पण ।
शंकराची चिरगुटे बघून । दिले हलाहल, तैसे होय ॥३२॥
आज पैसे खर्चता सर्व मिळते । न्याय मिळते, सत्ताहि मिळते ।
कीर्ति, सन्मान, थोरपण मिळते । ऐसा अनुभव सर्वांचा ॥३३॥
मित्रा ! हाचि भ्रमिष्ट अनुभव । लोकांना सांगतो धनचि देव ।
या सूत्रानेचि दुःखे सर्व । आज वाढली जीवनात ॥३४॥
सर्व हेचि चालती समजोनि । जैसी स्पर्धाचि लागली जनी ।
तोरा दावितो एक-एकाहूनि । जाती पतनी अधिकाधिक ॥३५॥
कापसाहूनि सफेद वसने । सोन्याहूनिहि पिवळे दागिने ।
शिखर गाठले कृत्रिमतेने । नित्य नव्या हौसेसाठी ॥३६॥
स्वच्छता आणि पवित्रता । शुद्धता आणि नैसर्गिकता ।
याहूनि प्रिय झाली कृत्रिमता । सुशिक्षितता तीच वाटे ॥३७॥
स्नान न करता फवारा घ्यावा । कपड्यावरि अत्तरांचा शिडकावा ।
मळ साचो परि सुंदर दिसावा । कपडा नवा घडोघडी ॥३८॥
नवी फॅशन थाटमाट । यांची वाढतचि गेली चट ।
शिवता पन्नासाचा कोट । लागे पँटहि तोलाचा ॥३९॥
ह्या गरजा वाढतचि जाती । तेथे न पूरे कुबेर - संपत्ती ।
मग बापुडे कामगार करिती । काय तेथे? ॥४०॥
कोणी खाती लाचलुचपती । कोणी उघडचि डाके देती ।
अन्याय, अत्याचार वाढती । पैशासाठी ॥४१॥
कोणी सरळपणे चालती । ते यामाजी रगडले जाती ।
मग त्यांचीहि भांबावे वृत्ति । वाढे अशांति चहूकडे ॥४२॥

कोणी घरी उपास काढिती । मुलाबाळा दूध न देती ।
परि बाह्य डौल उत्तम ठेविती । मोठेपणा मिरवाया ॥४३॥
कोणी म्हणती यावाचून । न चाले धंदा, न मिळे धन ।
परि हे सर्वांसीच गेले समजोन । वर्म एकमेकांचे ॥४४॥
मग कां अट्टहास करावा? । जाणोनि सन्मार्ग कां न धरावा? ।
परि तो मार्गहि नाही ठावा । वेड लागले धनाचे ॥४५॥
म्हणती पैशांनीच सर्व होते । मोक्ष मिळतो, राज्य मिळते ।
संत मिळती, कीर्ति मिळते । देवाचे होते पूजनहि ॥४६॥
परि हे म्हणणे वेड्यासारखे । पैशांनीच सखे होती पारखे ।
पैशांसाठीच जगी वाखे । घाली नरकी पैसाचि ॥४७॥
पैसा नियमांनी मिळविला । तारतम्याने खर्ची घातला ।
तरीच सौख्य देतो जीवाला । जीवनामाजी ॥४८॥
नाहीतरि पैसा जहर । शांति न लाभू दे क्षणभर ।
माणसासि बनवितो वानर । चंचल चित्त करोनिया ॥४९॥
चिंता लावितो कमावितांना । पशूसारिखे कष्ट नाना ।
जाळतो तनु, मना, जीवना । सर्वकाळ मानवाच्या ॥५०॥
चिंता थोर रक्षणाची । चोरभय, अग्निभयादिकांची ।
लालसा वाढे उपभोगाची । माणूस होय पशु जैसा ॥५१॥
असला दिसला त्यासि पैसा । जीव होतो कासाविसा ।
वाटे खर्च करावा कैसा । झोप त्यासि लागेना ॥५२॥
आला पगार खर्च झाला । सिनेमा, तमाशे पाहण्यात गेला ।
त्यातूनि उरला काही, त्याला । उत्तम मार्ग लागेना ॥५३॥
दारू, गांजादिक पितो । काही पैसा सट्टयात जातो ।
काही विभागणीस लागतो । व्यभिचाराच्या ॥५४॥
काही उन्मादाच्या भरी । झगडा करतां मार्गावरि ।
वकिलांची घरे भरी । 'शाहजोग आम्ही' म्हणावया ॥५५॥
काही खाण्यात आले बाष्कळ । मग उठले पोट, कपाळ ।
डॉक्टर-वैद्यांची झाली धावपळ । पैसा गेला त्यासाठी ॥५६॥
काही दाखवाया मोठेपण । देती पार्टी, बिदागी, दान ।
हसता हसता फसती घेवोन । बेगर्जी वस्तु ॥५७॥



काही लोक कमाई करिती । त्याची त्यांनाच न पुरे पुरती ।
खर्च वाढता कर्ज घेती । धोका भोगती जाणोनिया ॥५८॥
जैसा कर्ज घेवोनि खर्च करी । तैसा कमाईस लक्ष न धरी ।
तेणे संकटे येती घरी, दारी । मग विचारी 'काय करू?' ॥५९॥
पुढे जीवा लागली हळहळ । लोटता न लोटे पुढचा काळ ।
म्हणोनि बुद्धि झाली चंचळ । चोरी, चहाडी करावया ॥६०॥
अक्कल नाही आमदानीची । समज नाही मोजमापाची ।
जीभ चटकली खाण्यापिण्याची । धरला मार्ग चोरीचा ॥६१॥
कलंक लागला घराण्यावरि । आईबापाची बदनामी पुरी ।
पुत्र निघाले ऐसे वैरी । उत्तम कोणी म्हणेना ॥६२॥
हौसेसाठी सोडला धर्म । किळसवाणे करिती उद्यम ।
नानाप्रकारे व्यभिचार कर्म । करिती आणि करविती ॥६३॥
कोणी धनिक राक्षसचि असती । पैसा देवोनि गुलाम करिती ।
पाप करिती, करवोनि घेती । आपणासाठी ॥६४॥
कोणी फसवोनि धन कमाविती । आपणचि उपभोग भोगती ।
त्यांचीहि शेवटी होते फजिती । ऐकिली कीर्ति बहुतांची ॥६५॥
काहींना जवानीचा चढे तोरा । लग्ने करिती दहा-बारा ।
सरला पैसा आणि बोजवारा । कोणी थारा देईना ॥६६॥
मग खाती बायका तोडोनि । म्हणती पैसा आणा कोठोनि ।
काय खावे घरी बसोनि ? । लग्न केले कासया ? ॥६७॥
काही चढले चढविता मनी । विचार दिला सगळा सोडोनि ।
घरे-दारे बसले समर्पोनि । वेश्या ठेवोनि घरामाजी ॥६८॥
हा झाला वानरासमान । लोक न पाहती याचे वदन ।
आप्त हासती दुरून-दुरून । करणी याची पाहोनिया ॥६९॥
काही धनासाठी दत्तक घेती । परि भांडता कवडी न उरे हाती ।
उरली तरि दत्तक-मित्र उडविती । संपत्ति सारी ॥७०॥
कोणी टोलेजंग नवसचि केला । जरि देवा ! पुत्र झाला ।
पुत्राभारंभार देईन तुला । सोने, चांदी म्हणोनिया ॥७१॥
काहींना प्रथमचि मुले झाली । त्यांनी गावोगावी मिठाई वाटली ।
इस्टेट सारी गमाविली । हर्ष होता पोराचा ॥७२॥

जेव्हा पुत्र झाले खंडोखंडी । तेव्हा हात कपाळी देवोनि रडी ।
आता उरली नाही कवडी । भीक मागे लोकांसि ॥७३॥
काही सज्जन यातूनि वाचले । परि घरीच पैसे उधळोनि दिले ।
मुला-मुलींचे लग्न केले । धन खोविले बारुदखानी ॥७४॥
टोलेजंग दिला मंडप । नाही पाहिले मोजमाप ।
पंगती बसल्या आपोआप । लाडू, जिलेबी, बासुंदीच्या ॥७५॥
काही देखीसेखी करू लागले । व्रतबंध संस्कारादि भले ।
होते पैसे सर्व खोविले । वाढदिवशी पुत्राच्या ॥७६॥
काहींनी वडिलांची पुण्यतिथी केली । पुंजी सारी गमाविली ।
शेवटी रोटीही देईल कुठली । नाव घेवोनि वडिलांचे ? ॥७७॥
काही सज्जन यातुनि वाचले । परि घरी सणवारादि केले ।
होते-नव्हते पैसे घातले । दिवाळी-दसरा-होळीमाजी ॥७८॥
काही मानव ऐसे असती । जे वाईट कामी पैसा न घालिती ।
परि प्रतिष्ठेसाठी मरमरती । पैसा देवोनि गाठीचा ॥७९॥
शेतात खटा असोत नव्वद । परि एका हातासाठी करिती फिर्याद ।
सारी इस्टेट होवो बरबाद । परि लढती एका शिवीसाठी ॥८०॥
कोणी नाव व्हावे लोकांतरी । म्हणोनि साहेबास मेजवानी करी ।
नाना पक्वान्ने, नजराणे परोपरी । पाहिजे ते ते पुरवावे ॥८१॥
काहींनी घरेदारेहि विकली । प्रतिष्ठा स्थापावयासि आपुली ।
पुढे भिकारी होवोनि मेली । मुले-बाळे त्यांची ॥८२॥
काही लढले निवडणूक । पैसा गमावोनि झाले खाक ।
नाही उरले लौकिकी नाक । घेतला शोक विकतचा ॥८३॥
काहींनी विकली शेतीभाती । बंगले बांधले सडकेवरती ।
शहरी मौज भोगली, अंती । पोटा अन्न मिळेना ॥८४॥
कोणी व्यापारासाठी घर बांधिले । पैसे त्यातचि संपोनि गेले ।
पुढे खाण्याचे फजिते झाले । व्यापार काही सुचेना ॥८५॥
कोणी देश-विदेश पाहती । नानावस्तुंचा संग्रह करिती ।
शेवटी त्यांचीही झाली फजिती । गोष्टी उरल्या बड्याबड्या ॥८६॥
कोणा साधूची लागली झळ । घरी बुवांची चाले वर्दळ ।
चमत्कार करिती म्हणे सकळ । पैसे उधळी त्यालागी ॥८७॥



करी सेवा, देई दक्षणा । मिष्ठान्ने खाऊ घाली नाना ।
भरजरी वस्त्रपात्रादि दाना । करोनि झाला भिकारी ॥८८॥
मग बुवासीच म्हणे धन सांगा । लागला मागे करोनि त्रागा ।
गाठ पडली ठगा-ठगा । झाला शेवटी निराश ॥८९॥
बुवा दक्षिणेपुरता गोड बोलला । ती संपताच घर विसरला ।
कोण पुसतो धनहिनाला? । नाश झाला शेवटी ॥९०॥
भक्ति चमत्कारादिसाठी । म्हणोनि झाली फजिती मोठी ।
घरदारहि लावोनि नेले पाठी । लुबाडले ढोंगी बुवांनी ॥९१॥
काही तीर्थधामावरि गेले । घरचे डबोले जवळचि आणिले ।
चोरा - गुंडादिकांनी ठोकले । पैसे नेले लुटोनि ॥९२॥
झाले बिचारे केविलवाणी । भीक मागत आले परतोनि ।
ऐशी केली पैशाधेल्यांनी । स्थिती अनेकांची ॥९३॥
सुविचारावाचोनि काही । पैसा सत्कारणी लागत नाही ।
धन वाढता मन वाढत जाई । घटता सवयी न घटती ॥९४॥
जीवनासि आवश्यक धन । सर्व कार्याचे प्रारंभसाधन ।
प्रपंची पदोपदी पाहिजे सुवर्ण । परि विचारधन आधी हवे ॥९५॥
नाहीतरी माणुसकीचे पडे विस्मरण । अंगी वाढती हीन गुण ।
लोक तोंडापुरते म्हणती सज्जन । पाठ फिरवता धिक्कारिती ॥९६॥
शेवटी मनुष्याचा निर्मळ व्यवहार । हाचि ठेवितो हृदयी आदर ।
जो परस्परांच्या हिताचा विचार । आत्मत्वाने चालवी ॥९७॥
मनुष्यधर्म म्हणोनि सर्व करावे । परि भिकारीच न व्हावे ।
जीवन कर्तव्यशील राहावे । ऐसेचि करावे सत्कर्म ॥९८॥
जे टिकेल ते करणे बरे । ज्यासि सज्जन म्हणती साजिरे ।
कंजूषीहि न करणे बरे । उधळपट्टीहि न व्हावी ॥९९॥
ऐपत पाहोनि प्रसंग करावे । प्रसंगी कर्दयु न बनावे ।
परि पैसेहि न उधळावे । भीक लागेल ऐशापरी ॥१००॥
लौकिकासाठी भिकारी न व्हावे । अंथरुण पाहून पाय पसरावे ।
प्रसंग शोभे ऐसे करावे । टिकाऊ परिणाम लक्षूनि ॥१०१॥
मनुष्य भावनेच्या आहारी जातो । तेव्हा तारतम्यचि सोडतो ।
काहीहि विचित्र करीत सुटतो । 'हौसेला मोल नाही' म्हणोनि ॥१०२॥

परिणामांची पर्वा न करिता । व्यर्थचि दाखवितो उदारता ।
घरी धनसंपत्ती नसता । कर्ज काढोनि हौस करी ॥१०३॥
पुढे आपला करोनि नाश । भिकेस लावी मुलाबाळांस ।
नाही कोणाचाचि विकास । ऐसे कासया करावे ? ॥१०४॥
रोज न्यायाने मिळवावे धन । थोडे थोडे करावे जतन ।
काही खर्चावे त्यातून । प्रसंगासाठी संसारी ॥१०५॥
योग्य अतिथींचा करावा आदर । त्यासहि द्यावी भाकरीत भाकर ।
आपुल्यापरीने करावा सत्कार । आलियांचा ॥१०६॥
दुसऱ्याच्या दुःखात दुःखी व्हावे । त्याच्या आनंदी सुख मानावे ।
प्रसंगी आपणासि वगळिता यावे । न्यायी बुद्धीने ॥१०७॥
आपण कमवावे, आपण खावे । परि उरले ते गाव-कार्यी लावावे ।
कमीत कमी खर्चीत जावे । नेटकेपणे ॥१०८॥
कमावणे ती नव्हे श्रीमंती । बचत केली तीच संपत्ती ।
यानेच संपन्न होई व्यक्ति । वाढे श्रीमंती गावाची ॥१०९॥
थोड्याथोड्यातचि अधिक खर्चे । काटकसरीने रोज वाचे ।
थेंबे थेंबे तळे साचे । मग ते मना शांति देई ॥११०॥
तिळातिळातचि तेल पूर्ण । क्षणाक्षणाने बनले जीवन ।
कणाकणाने साचे धन, धान्य । कामी येई प्रसंगी ॥१११॥
अधिक न घ्यावा एकहि घास । तेणे नशिबी न ये उपास ।
थोडा त्रास, अधिक विकास । शेवट गोड याचि मार्गे ॥११२॥
ऐसे वर्तन व्हावे गावी । गरजांची धाव कमी करावी ।
अनासक्ति वाढवावी । प्रत्येकाने अनुक्रमे ॥११३॥
काटकसरीचे करिता वर्तन । अपार वाचेल गावी धन ।
त्याने गाव होईल नंदनवन । सर्वतोपरी ॥११४॥
गावासि सत्ययुग आणावा । त्याच्या सुखे स्वर्ग मानावा ।
आपुल्या इंद्रियांच्या चवा । सोडूनि द्याव्या थोडथोड्या ॥११५॥
मग जाणोनिया आत्मरंग । राहावे नित्यानंदस्वरूपी दंग ।
तेव्हाचि जीव होय अभंग । अमर स्थानी शेवटच्या ॥११६॥
सम्यक आचार, सम्यक विचार । संयमाचा आदर्श थोर ।
साधु-संत, महावीर । जगज्जेते झाले या मार्गे ॥११७॥



शुद्ध आचार-विचारांचे फळ । व्यक्तिसवेचि गाव सोज्ज्वळ ।
गावी सुखे नांदतील सकळ । तुकड्या म्हणे ॥११८॥
इतिश्री ग्रामगीता ग्रंथ । गुरु-शास्त्र-स्वानुभव-संमत ।
कथिली साधी राहणी संयमयुक्त । सोळावा अध्याय संपूर्ण ॥११९॥

॥ सद्गुरुनाथ महाराज की जय ॥

---


**'आत्मैव मे सदा ज्ञाने दर्शने चरणे तथा ।'**

सम्यक् दर्शन, सम्यक् ज्ञान व सम्यक् चारित्र्य यातच माझ्या आत्मरूपाचा प्रकाश साठवला आहे.


**'समता सर्वभूतेषु....तद्धि सामायिकं मतम् ।'**

सर्व प्राण्यांचे ठायी समता धारण करणे हीच खरी शांतिदायी प्रार्थना !

**– भगवान श्री महावीर स्वामी**



# ॥ चित्र परिचय ॥



## अ. १७ – श्रीगुरु नानक देव

धन हे गरिबांचे रक्त । समजोनि वागोत श्रीमंत ।
श्रम ही गावाची दौलत । म्हणोनि व्हावा मान तिचा ।।५४।।

साडेचारशे वर्षांपूर्वी झालेले शिखांचे पहिले धर्मगुरु. गोपालन, दुकानदारी व सरकारी नोकरी जनसेवेत खर्ची घालून सतनामाच्या सतारीवर मानवतेची मधूर भजने गात संपूर्ण भारत, लंका, इराण व अरबस्थानातही ते फिरले. '' जातपात पूछे नही कोय । हरिको भजे सो हरिका होय'' म्हणतात जातिपंथ धर्मभेदांचे निवारण करीत ते मशिदीत नमाज पडले व डाकूंनाही त्यांनी सुधारले. आपली गुरु गादी मुलाऐवजी शिष्यास दिली. रामबाद गावी नगरशासकाचा हुद्देदार श्रीमंत मलकभागो यांच्या यज्ञात भोजन नाकारून शूद्र, गरीब पण भाविक लालोतरखानाकडे जे जेवले. कारण विचारता ते म्हणाले– 'जन्म नव्हे, तर कर्मच प्रधान, धन नव्हे, तर श्रमच श्रेष्ठ.' तुझे अन्न दीनांना दुखवून मिळविलेल्या धनाचे. यात गरिबांचे रक्त आहे आणि यात शुद्ध परिश्रमाचे दूध आहे का, हे पहा!'



• अध्याय सतरावा •

# गरिबी–श्रीमंती

॥ श्रीगुरुदेवाय नमः ॥

श्रोतेजन प्रश्न करिती । आमुच्या गावी आहे संपत्ती ।
परि सुख न मिळे लोकांप्रति । ऐसे झाले ॥१॥
विकास कार्याचा कोठला ? । गावी वाद बळावला ।
धनिक – गरिबांचा लागला ? । वर्ग कलह ॥२॥
समाज या दोहो भागी विभागाला । एक न मानी एकाला ।
परस्परांवरोनि विश्वास गेला । उडोनि त्यांचा ॥३॥
आता काय करावी योजना ? । कोणाची थोरवी पटवावी जना ? कैसेनि ।
होईल ग्रामरचना । सुंदर आमुची ? ॥४॥
ऐका प्रश्न हा महत्त्वाचा । आवश्यकचि निर्णय याचा ।
त्यावाचूनि गावाचा । मूळपायाचि ढासळे ॥५॥
श्रीमंत – गरिबांचा वाद । गावास करील बरबाद ।
म्हणोनि ही दूर करावी ब्याद । जाणत्यांनी ॥६॥
देवाघरी एकचि प्राणी । ना श्रीमंत, ना भिकारी कोणी ।
ही आहे समाजरचनेची उणी । मानवनिर्मित ॥७॥
मूलसिद्धांति भेदचि नाही । हा प्रलोभनांचा खेळ सर्वहि ।
समज येता दोघांसहि । भेद काही दिसेना ॥८॥
खेळाकरिता दोन पक्ष केले । परि खेळ विसरोनि लढू लागले ।
आपसात वैमनस्य आले । अज्ञानाने ॥९॥
एकाकडे आले अधिक कंचे । तो म्हणे माझ्याचि मालकीचे ।
मग खेळणेहि थांबले इतरांचे । एकाचिया लोभामुळे ॥१०॥
ऐसेचि आहे संसाराचे । घरचे आणि समाजाचे ।
तितंबे झाले कुटुंबाचे । अज्ञाने आणि लोभाने ॥११॥
कामाकरिता जाति केली । काम विसरूनि जातचि धरली ।
जन्मजात थोरवी मिरविली । वर्णधर्माच्या नावाने ॥१२॥

ऐसेचि झाले अर्थव्यवस्थेचे । हिस्सेदार सर्वचि धनाचे ।
पण काहीच राहिले मानाचे । बाकी मेले भुकेने ॥१३॥
एक राहिला गरीब गडी । एकाची वाढली श्रीमंती बडी ।
ही सर्व अज्ञानाची बेडी । भोवली सगळ्या ॥१४॥
एकापाशी ठेव ठेवली । त्याने अविचाराने उपभोगिली ।
कुणाची ठेव ही बोलीच गेली । कालांतराने ॥१५॥
देवळामाजी पुजारी ठेवला । तो देऊळचि ग्रासून बसला ।
बायकापोरांसाठीहि केला । उपयोग त्याने देवळाचा ॥१६॥
कोणी तीर्थी सद्‌भक्त झाले । त्यांची देवळावरि सत्ता चाले ।
पुढे व्यापाराचे साधनचि केले । हक्क दावूनि मुलांनी ॥१७॥
एकाकडे दिली खूप जमीन । गावे वसवोनि त्यांना द्याया वाटून ।
परि तोचि बसला गबर होऊन । राबणारासि पिळोनि ॥१८॥
धनासाठी राखणदार आणला । त्याने कमजोर मालक पाहिला ।
आपणचि बळकावून बसला । पैसा शक्तियुक्तीने ॥१९॥
ऐसेचि झाले गरिबी श्रीमंतीचे । कष्ट करणारे झाले दूरचे ।
पैसे घेणारे झाले कायमचे । मालक येथे ॥२०॥
श्रमणारापदरी मोजके माप । उरला गल्ला आपोआप ।
तो स्वये उपभोगणे हे महापाप । परि ठरविला न्याय्य हक्क ॥२१॥
खोट्यासि दिले खरे नाव । पैशांनी पैशांचे वाढले वैभव ।
म्हणती ही पूर्वजांची ठेव । हक्क कुठला श्रमिकांचा ॥२२॥
आता काही केल्या समजेना । कोण पुसतो उपदेश-कीर्तना ? ।
फार तर मुंगियासि साखरकणा । देवोनि म्हणे दान केले ॥२३॥
हजारोंचे जीवन पिळावे । तेणे त्यांच्यात रोग वाढावे ।
मग दवाखाने धर्मार्थ घालावे । धर्मशील म्हणवोनिया ॥२४॥
पाहता आजचा मजूर । न मिळे पोटासि भाकर ।
तैसेचि काम करवी अहोरात्र । वारे मालक धर्मशील ! ॥२५॥
हा तो राहतो महाली शहरी । मुले गाडी नेती सिनेमादारी ।
शिकती व्यभिचार, व्यसने, चोरी । लुटती कारभारी खेडूता ॥२६॥
काहींनी खूप बुद्धि लढविली । संपत्ती अतोनात वाढविली ।
काढोनि कवडीहि नाही दिली । प्राण जाता श्रमिकांचा ॥२७॥



गावातील लोक उपाशी मरे । म्हणती मरती ते मरोत बिचारे ।
आयुष्य सरल्या कोण तारे? । पैसा-दवा सब झूट ! ॥२८॥
ऐसे अधिक धन जमविले । समाजी कामी नाही आले ।
ते चोरचि म्हणावे ठरले । एकलकोंडे, आपगर्जी ॥२९॥
ज्याचेपाशी अधिक जमीन । न देई मजुरा पोट भरून ।
तो कशाचा भाग्यवान? । महाकदर्यु म्हणावा ॥३०॥
भव्य वाडा पडला सुनसान । एकचि पत्नी, एक संतान ।
परि न देई शेजारपण । वा रे भूषण कृपणाचे ! ॥३१॥
कित्येकांचे जनावरी वागणे । सरंजामशाहीने वजन टाकणे ।
धाक दडपणाने काम घेणे । घातक होईल यापुढे ॥३२॥
गरीब सारेच ओरडती । श्रीमंत हे गुंड आहेत म्हणती ।
परि यांची लागली नेत्रपाती । काही केल्या उघडेना ॥३३॥
यासि उपाय करावा काही । त्यासाठी मार्ग दोनचि पाही ।
कायदा अथवा धर्ममार्ग राही । सेवाभावे समज द्याया ॥३४॥
यासहि कोणी न घालती भीक । त्याने पुढे चिडती लोक ।
मग रक्तक्रांतीची ऐकू ये हाक । वाढे धाक मनस्वी ॥३५॥
कोणी घर फोडोनि चोरी करिती । कोणी डाके मारूनि लुटती ।
कोणी भर दिवसा कापिती । मुलाबाळांसहीत ॥३६॥
ही पाळीच कां येऊ द्यावी? । म्हणोनि काही योजना शोधावी ।
गरिब-श्रीमंत दोन्हीही बरवी । राहतील ऐसी ॥३७॥
परस्परांचा विचार घ्यावा । आपला समतोल हिस्सा ठेवावा ।
कोणासहि राग न उद्‌भवावा । ऐसे करावे गावाने ॥३८॥
तुमचा पैसा, आमचे श्रम । तुमची बुद्धि, आमुचा उद्यम ।
एकाचा घोडा, एकाचा सरंजाम । असावा जैसा ॥३९॥
मुळी जीवनाची तैसीच रचना । एकास हात लागती नाना ।
सर्वांमिळोनीच हा आपुल्या स्थाना । बनतो सन्माना घ्यावया ॥४०॥
कोणाचे निभेना वगळूनि ग्राम । प्रत्येकासि प्रत्येकाचे काम ।
काम झालिया पुन्हा श्रम । वाढतो याचा ॥४१॥
सुतार याचे खांब करी । बेलदार याची भिंत उभारी ।
कुंभार याचे कवेलु उतारी । छावणीसाठी ॥४२॥

लोहार खिळे, फासे घडवी । मजूर बांधी घरे-पडवी ।
ऐसे न करिता हा गोसावी । राहता कोठे ? ॥४३॥
चांभार याचे जोडे बनवी । विणकर याला वस्त्रे पुरवी ।
नीटनेटके कपडे शिवी । शिंपी यासाठी ॥४४॥
शेतकरी त्याला पिकवोनि दे । धान्य, मिरची, भाजी, कांदे ।
सर्वांच्या श्रमे घर आनंदे । साजवी हा आपुल्यासाठी ॥४५॥
सर्वांचे हात सर्वांसि लागे । सर्वांस जगविती गुंतले धागे ।
हे समजोनि जो गावी वागे । तोचि खरा बुद्धिमान ॥४६॥
परि यात भाव वाईट शिरला । कोणी न मानीच कोणाला ।
म्हणे पैसे देतो आम्ही सकला । म्हणोनि कामे करिती हे ॥४७॥
खरे महत्त्व आहे परिश्रमाला । परि हा मानतो पैशाला ।
काम न करिता, पैसा असला । तरी काय भागतसे? ॥४८॥
खोदूनि आणिली गोटेमाती । तासली फाडी, रचल्या भिंती ।
तेव्हाच बनली ती संपत्ती । परिश्रमाच्या स्पर्शाने ॥४९॥
रानी असोत लाकडे, काड्या । त्या श्रमाविण न होती गाड्यामाड्या ।
श्रमाविण संपत्ती म्हणजे कवड्या । त्याहि वेचल्या श्रमाने ॥५०॥
खरे याचे तारतम्य ज्ञान । सर्वांनी असावे समजोन ।
वाहावा सर्वांचा योगक्षेम पूर्ण । हाचि धर्म धनिकांचा ॥५१॥
गावी जे जे श्रीमंत असती । तयाचे धन गावचि संपत्ती ।
समजोनि वागावे या रीती । मदत द्यायासि प्रसंगी ॥५२॥
आपणापाशी अधिक असे । शेजाऱ्यासि पुरवावे हर्षे ।
सर्व मिळोनि राहावे सरिसे । गावधर्म म्हणोनिया ॥५३॥
धन हे गरिबांचे रक्त । समजोनि वागोत श्रीमंत ।
श्रम ही गावाची दौलत । म्हणोनि व्हावा मान तिचा ॥५४॥
ऐसे केलिया सकळ जनांनी । वर्गभेद मिटतील गावचे दोन्ही ।
यास बुद्धि द्यावया उपजोनि । साधु, संतांनी काम घ्यावे ॥५५॥
आणि सावध असावे सरकार । नीटनेटका घडवाया व्यवहार जनतेमाजी ।
भराभर । वारे शिरवावे शिक्षणाचे ॥५६॥
लहान मुली-मुलांपासोनि । मिटवावी गरिब-श्रीमंत श्रेणी ।
सर्वांस पाहाया समानपणी । लावावे प्रत्यक्ष कृतीने ॥५७॥



शब्दात नको समसमान । प्रत्यक्ष पाहिजे धन, मान, शिक्षण ।
फूट पाडिती ते द्यावेत हाकोन । गावचे भेदी ॥५८॥
नसतील ऐकत जे जे कोणी । त्यांना कायद्याने घ्यावे आटपोनि ।
मग रचना करावी समानगुणी । इमान जागी ठेवोनिया ॥५९॥
जैसे बापास पुत्र सारिखे । तैसे गरीब, श्रीमंत राजाचे सखे ।
हा भेद मिटविणे काम निके । त्याचेचि असे राजधर्म ॥६०॥
पण जेथे सरकार मिंधे झाला? । तेथे आग लागली प्रजेला ।
मग कोण पुसे कोणाला? । धिंगाणा झाला पहा सर्व ॥६१॥
संत, साधूहि मिंधे झाले । दक्षिणेवरीच मोहूनि गेले ।
मग पर्वताचे कडेचि लोटले । समाजावरि ॥६२॥
जनतेचा मग वालीच नाही । ती चेतता मग आगचि सर्वहि ।
भस्म होईल सगळी मही । हाहाःकारे ॥६३॥
सगळी जनता बंदिस्त केली । अथवा मारोनि टाकली ।
तरी श्रमाविण पैदास कुठली? । कष्टावे लागेल सर्वांसि ॥६४॥
मग हे ऐसे कां होऊ द्यावे? । सकळांनी आधीच जागृत व्हावे आपुल्यापरीने ।
सावरावे । कार्य नीट गावाचे ॥६५॥
उत्तम व्यवहारे धन घ्यावे । उत्तम कार्यासाठी लावीत जावे ।
जेणे परस्परांचे कल्याण व्हावे । तैसेचि करावे व्यवहार ॥६६॥
ऐसा कदर्युपणा नसावा । की ज्याने गावचि व्याजे बुडवावा ।
प्रसंग पडताहि न द्यावा । साथ लोकां ॥६७॥
अविचाराने न उधळावे धन । फसवोनि न घ्यावे गरिबांपासून ।
दोन्ही मार्ग समसमान । ठेवावे देवघेवीचे ॥६८॥
न व्हावा शेवटचा कळस । म्हणोनि सहानुभूतीचा वाढो हव्यास ।
विरोधचि करू नये यास । कोणी कोणा ॥६९॥
सगळ्यांनी मिळोनि वागावे । सर्वांचे समजोनि कार्य करावे ।
श्रीमंत-गरिब दिसोचि न द्यावे । बहिरंग जीवनी ॥७०॥
ते दिसावेत गुणावरि । बुद्धिवरि, कार्यावरि ।
ऐसे असले प्रकार जरी । समताभाव तरी न सोडावा ॥७१॥
याचे समाजासि मिळे शिक्षण । तोचि खरा भाग्याचा दिन ।
त्यासि नाही मग भंग जाण । कल्पकाळी ॥७२॥

समाजात जेव्हा धुरीण वाढती । तेव्हाचि ऐसी होय क्रांति ।
आपोआपचि मिटेल भ्रांति । पक्षभेदांची ॥७३॥
तेचि करितील परिवर्तन । समाजात उत्तम ज्ञानकण ।
पेरूनि करितील परम पावन । भारतमाता ॥७४॥
ऐसी सुबुद्धता सगळयांत यावी । तरी श्रीमंती-गरिबी मिटावी ।
नाहीतरि गति बरवी । नाही आता समाजी ॥७५॥
हे समजणेचि जरूर आहे । काळ याचीच वाट पाहे ।
तो ऐसा थांबलाचि न राहे । स्वारी करील वेगाने ॥७६॥
म्हणोनि माझे एवढेचि सांगणे । वाढवा सामाजिक वृत्तीचे लेणे ।
मिरवा सामुदायिकतेची भूषणे । लोकांमाजी ॥७७॥
नुसते श्रीमंत सहकार्य देती । खर्चूनि लक्षावधि संपत्ती ।
तरी तेवढ्याने ही भेदवृत्ति । जाणार नाही ॥७८॥
ओळखोनि श्रमाची प्रतिष्ठा । त्यांनी दावावी कार्यनिष्ठा ।
श्रमणारांच्या निवारावे कष्टा । स्वतः श्रम करोनिया ॥७९॥
सर्वांनी सर्वांसि पूरक व्हावे । ऐसे धर्माचे सूत्र बरवे ।
हे काय तुम्हासि सांगावे ? । शहाणे जनहो ! ॥८०॥
त्याअभावी बिघडली गाव-स्थिती । कोणी जनावरासम राबती ।
कोणी नाजूक होवोनि फिरती । टोळभैरव ॥८१॥
कोणी म्हणती धनी आम्ही । काय आहे आम्हा कमी? ।
कमाई केली वडिले नामी । घरबसल्याचि आमुच्या ॥८२॥
हे तयांचे महाअज्ञान । कळली नाही त्यांना खूण ।
यापुढे जाईल धन - जमीन । निकष्टिकांची ॥८३॥
न करिता काजकाम । पावेल कोणा जीवा आराम? ।
सर्व धावतील होवोनि बेफाम । निकष्टिकांमागे ॥८४॥
म्हणोनि सांगणे उद्योग शिका । पराधीन राहू नका ।
आपुल्या हक्काचा हा पैका । गोडी चाखा तयाची ॥८५॥
आज निकष्टिकांची चालती । उद्या विचारू नका फजिती ।
म्हणोनि समजोनि घ्यावी युक्ति । उद्योगाची ॥८६॥
सर्व तऱ्हेच्या कलाकुसरी । शिकूनि वागावे शहाण्यापरी ।
पोट भरावयाची उजागरी । तेव्हा लाभे ॥८७॥



हे जंव करितील शिक्षितजन । तेव्हा बंद होतील मजुरांचे वाग्बाण ।
नाहीतरी ते बेईमान । ठरवितील आपणा ॥८८॥
म्हणतील आम्ही कष्ट करावे । तुम्ही आरामात राहावे ।
सांगता 'समानतेने ठेवावे' । कोण म्हणेल पुढारी ? ॥८९॥
सर्वांवरि सारखेच प्रेम । मग सर्वांकरिता एकचि नियम ।
सर्वांनी करावेत परिश्रम । आपापल्यापरींनी ॥९०॥
एकाने करावे काम । दुसऱ्याने करावा आराम ।
हे तो आहे हराम । देश-हिताच्या दृष्टीने ॥९१॥
दुनिया आहे कष्टिकांची । जो जो कसेल शेती त्यांची ।
जो काम करील लक्ष्मी तयाची । दासी व्हावी नियमाने ॥९२॥
ऐसी आहे आजची प्रवृत्ति । पाहिजे हेचि समाजाप्रति ।
त्यात थोरांनी तरी खंती । काय म्हणोनि मानावी ? ॥९३॥
विद्वानाने, शिक्षिताने । महंताने, श्रीमंताने ।
कष्ट कराया मुद्दाम लागणे । हेचि मोठेपणाचे ॥९४॥
तेणे सर्वांस होईल सुकर । कामे करितील जन भराभर ।
लाज जाईल निघोनि पार । वैभवाने निर्मिलेली ॥९५॥
कामात पडले बुद्धिमान । तेणे प्रत्यक्षात येईल ज्ञान ।
शेतीभातीची उन्नति पूर्ण । विकास होईल देशाचा ॥९६॥
एरव्ही उद्योगाविण जे भोगणे । ते मानवासि लाजिरवाणे ।
आळशासि खाणेपिणे । देणे असे महापाप ॥९७॥
श्रमाने अंगी हीनता येते । ऐसे बोलती कोणी एक ते ।
समजावे देशघातकी पुरते । उपद्रवी पापभक्षी ॥९८॥
आपुले करावयासि काम । कां वाटावी लाज, शरम ? ।
उलट गर्व असावा निस्सीम । कामाचा आपुल्या ॥९९॥
जयास जैसी अभ्यासरीति । मानवेल जैसी कार्यपद्धति ।
घेऊनि तेचि शिक्षण सुमति । यावे पुढती तयाने ॥१००॥
कामे सर्वचि मूल्यवान । त्यांची योग्यता समसमान ।
श्रीकृष्णे सिध्द केले उच्छिष्टे काढून । ओढिली ढोरे विठ्ठले ॥१०१॥
कोणाचीच योग्यता कमी नाही । सर्वचि कामे आवश्यक ही ।
म्हणोनि कामाचा बदला सर्वहि । सारखा असे सामान्यतः ॥१०२॥

एक शेतीकामाचा कामगार । एक बेलदार, सुतार, लोहार ।
शिंपी, धोबी, कुंभार, चांभार । सारिखेचि उपयुक्त ॥१०३॥
कोणी भंगी-काम करी । कोणी वैद्य नाम धरी ।
कोणी देवालयी सक्रिय पुजारी । सारिखेची उपयुक्त ॥१०४॥
कोणी बुद्धिवंत पुराण सांगे । कोणी चुकलिया लावी मार्गे ।
जैसी ज्याची योजना निसर्गे । सहजचि केली त्यापरी ॥१०५॥
परि सर्वांना सर्वांचा आदर । ऐसा असावा जगाचा व्यवहार ।
कोण ब्राह्मण, कोण महार ? । कामामाजी सारिखे ॥१०६॥
येथे कामात उच्च-नीचता । कोणे ठरवावी व्यवहारतः ? ।
प्रत्येक काम महत्त्वपूर्णता । आपुल्या स्थानी ठेवितसे ॥१०७॥
आहे सर्वांचीच गरज । सर्वकाळ सहजासहज ।
एक नसता जग-जहाज । अपूर्णता दावितसे ॥१०८॥
दोर घेवोनि साखळीचा । बोझा बांधावा लाकडांचा ।
एक तुटता तार कडीचा । सर्व पडे विस्कटोनि ॥१०९॥
तैसी आहे कामांची गती । काम असावे सर्वांप्रति ।
तरीच जगेल ही क्षिती । सारखेपणी राबता ॥११०॥
ज्याचा असेल जो जो बाणा । तो लावावा देश-कारणा ।
जो असेल ज्या कार्यी शहाणा । तेचि पुरवावे तयाने ॥१११॥
ज्यासि पुरेल जैशापरी । तैसी भरपूर द्यावी सामुग्री ।
श्रम करावे आपापल्यापरी । जैसी बळ, बुद्धि ज्यापाशी ॥११२॥
ऐसे गावी कराल काम । तेणेच पावेल आत्माराम ।
लाभेल संतोषाचे निजधाम । नाहीतरि संकट ना टळे ॥११३॥
अरे ! उठा उठा श्रीमंतांनो ! अधिकाऱ्यांनो ! पंडितांनो ! ।
सुशिक्षितांनो ! साधुजनांनो ! । हाक आली क्रांतीची ॥११४॥
गावा-गावासि जागवा । भेदभाव हा समूळ मिटवा ।
उजळा ग्रामोन्नतीचा दिवा । तुकड्या म्हणे ॥११५॥
इतिश्री ग्रामगीता ग्रंथ । गुरु - शास्त्र - स्वानुभव - संमत ।
श्रम-संपत्ती महत्त्व कथित । सतरावा अध्याय संपूर्ण ॥११६॥


॥ सद्गुरुनाथ महाराज की जय ॥

काहेरे बन खोजन जाई ? पुष्पमध्य जिहुँ गंध बसत हैं,
मुकुरमाँही जिहुँ छाई । सर्वनिवासी सदा अलेपा, तोरे संग समाई ॥

''बाबारे ! कशाला वनात धुंडायला जातोस त्या ईश्वराला ? फुलातील सुगंधाप्रमाणे सर्व जगात व्यापून आरशातील पडछायेप्रमाणे नेहमी निर्लेप असणारा तो प्रभू तुझ्यात नि तुझ्या आजूबाजूस सर्वत्र भरलेला आहे, याचीच भक्ती कर !'' – श्रीगुरु नानकदेव



# ॥ चित्र परिचय ॥



## अ. १८ – श्रीसंत गोरा कुंभार

श्रीसंत गोरा राबे अंगे । देवहि माती तुडवू लागे ।
तेथे श्रीमंत आळसे वागे । हे महापाप ॥२७॥

थापटीने नामदेवाचा कच्चेपणा दाखविणारा, अज्ञानी गाढवांना वळविणारा, आपल्या चाकाच्या गतीतच ''भ्रामयान् सर्वभूतानि यंत्रारुढानि मायया'' या गीतासूत्राचे मर्म जाणून आपल्या ग्रामीण कलेने मातीला सत्पात्राचे रूप देणारा व त्यातच 'एकपणे एक, एकाचे अनेक' हे तत्त्व अनुभवणारा सहाशे वर्षापूर्वीचा एक कर्मयोगी संत. ''म्हणे गोरा कुंभार जीवन्मुक्त होणे । जग हे करणे शहाणे बापा'' ही जीवनदृष्टी ठेवून अशा संतांनी ग्रामोद्योगही केले.

• अध्याय अठरावा •

# श्रम–संपत्ती

॥ श्रीगुरुदेवाय नमः ॥

एक श्रोता प्रश्न विचारी । आम्ही ऐकिले गीतेमाझारी ।
कर्ममय असे सृष्टि सारी । न करताहि कर्म घडे ॥१॥
सर्वांसचि लागले कर्म । कर्म हाचि देहाचा धर्म ।
तेथे काम करावे मुद्दाम । हे बोलणे विपरीत ॥२॥
आपण म्हणता परिश्रम करा । तेणे पोषण होईल अहंकारा ।
सहज चालेल तोचि बरा । व्यवहार लोकी ॥३॥
ही श्रोतियांची शंका । भ्रमवित आली नित्य लोकां ।
परि ही नव्हे गीतेची भूमिका । निर्भेळ ऐसी ॥४॥
कर्ममय विश्व आहे । कोण रिकामा बसला राहे ? ।
प्रत्येकजण करीतचि जाय । काहीतरि कर्म ॥५॥
परि त्या कर्मांचे अनेक प्रकार । काही शुद्ध, निषिद्ध, मिश्र ।
काही विधियुक्त, काही पवित्र । निष्काम कर्म ॥६॥
काही देहेंद्रियांसाठी । काही निपजती मनाच्या पोटी ।
काही विवेकबुद्धिने गोमटी । निपजती कर्मे ॥७॥
काही कर्मे स्वतःकरिता । काही कुटुंबाचिया हिता ।
काही कर्मे गावलोकांकरिता । सेवाधर्मरूप ॥८॥
आपल्या देहाचे करणे काम । हा कसला आला महाधर्म? ।
हे आहे नित्यकर्म । सहजचि घडणारे ॥९॥
तैसेचि प्रसंगविशेषे काही । करणे सणोत्सवादि सर्वहि ।
त्यातहि विशेष ऐसे नाही । नैमित्तिक कर्मे ॥१०॥
नित्यनैमित्तिक कर्मे सहज । ती करणे आवश्यक काज ।
न करिता विस्कटेल समाज । परि करणे नव्हे महाधर्म ॥११॥
तैसेचि पोटासाठी करणे काम । हे नव्हेत पुण्य–परिश्रम ।
उरल्या वेळी जे सेवाकर्म । त्यासि धर्म बोलती ॥१२॥



तेचि माणुसकीचे कर्म । जे दुसऱ्यांसाठी केले श्रम ।
एरव्ही पशुपक्षीहि करिती उद्यम । आपुलाले ॥१३॥
निषिद्ध आणि सकामकर्म । तैसेचि त्यागुनि अहं–मम ।
जगासाठी करावेत श्रम । ईश्वरार्पण बुद्धिने ॥१४॥
हेचि गीतेची शिकवणूक । वारंवार निश्चयात्मक ।
जेणे सर्वेश्वराचे पूजन सम्यक । तेचि कर्म गीतामान्य ॥१५॥
एरव्ही कामाविण कोणी नाही । हे मजसीहि कळे निःसंशयी ।
परि त्यासि काम आज न म्हणो काही । जे न उत्पादन वाढवी ॥१६॥
जनतारूप जनार्दनाची । ज्यात सेवा न होई साची ।
त्यास गीताप्रिय कर्माची । पदवी आम्ही न देऊ ॥१७॥
आज भरपूर उत्पादन । हेचि जनसेवेचे साधन ।
त्यासाठी झटेल जो–जो जन । गीता कळली तयासि ॥१८॥
मंदिरी बैसोनि नाक दाबावे । त्यापेक्षा मार्गीचे काटे उचलावे ।
दुःखितासि प्रेमे पाणी पाजावे । हे श्रेष्ठ तीर्थस्नानाहूनि ॥१९॥
एक हात खोदावी जमीन । हे पूजनाहूनि पूजन ।
परिणाम शेकडो व्याख्यानांहून । अधिक तयाचा ॥२०॥
श्रमिकास जेणे लाभेल अन्न । ते कर्म श्रेष्ठ यज्ञाहून ।
एरव्ही गीतेचे नाव सांगून । भलते समर्थन करू नये ॥२१॥
एक नौजवान आळसे निजला । म्हणे हेहि पाहिजे शरीराला ।
म्हणोनि तो सारखाचि झोपला । फक्त उठला भोजनासि ॥२२॥
भोजन झाल्यावरि पुन्हा पडला । कैसा आवडेल घरच्या लोकाला? ।
कोणी थट्टामस्करी करू लागला । म्हणे हेहि कामचि आहे की ॥२३॥
एक सावकारीचे घाशी लिखाण । एक झगड्याचे चालवी प्रकरण ।
कोणी उपद्रव करी हाती धरोन । लोक हरप्रकारे ॥२४॥
असले काम जरी बंद पडले । तरी माझ्या मते काही न अडले ।
परि निर्वाहाचे उत्पादनचि शांतले । कैसे चालेल जीवन ? ॥२५॥
म्हणोनि सर्वांनी काम करावे । ग्रामाचे धन वाढवावे ।
येथे गरीब–श्रीमंत न पाहावे । कामासाठी ॥२६॥
श्रीसंत गोरा राबे अंगे । देवहि माती तुडवू लागे ।
तेथे श्रीमंत आळसे वागे । हे महापाप ॥२७॥

यावरि बोले एक श्रोता । नाही गरीब मजुरासीच काम पाहता ।
बेकारांचा वाढतो जत्था । तेथे श्रीमंता काम कोठे ? ॥२८॥
श्रोतयाची ही विचारसरणी । आहे भ्रमाची पोसणी ।
सारा देश दीन-दरिद्री, अज्ञानी । तेथे काम न दिसे तया ॥२९॥
पुनःपुन्हा जन्मा यावे । मातृभूमीसि सुखी करावे ।
ऐसे थोर म्हणती जीवेभावे । तेथे काम न दिसे तया ॥३०॥
देशात कामांचा उभा डोंगर । दारिद्र्य, दुःखाचा वाहतो पूर ।
अर्धनग्न, अर्धपोटी लोक अपार । त्यांचे दुःख कां न दिसे? ॥३१॥
येथे विश्रांतीसि नाही वेळ । निरंतर कार्यकर्ते प्रबळ ।
पाहिजेत ठायी ठायी सकळ । काम ऐसे देशापुढे ॥३२॥
परि ज्यांना होणे आहे साहेब । लोकांवरि कसावया रुबाब ।
न कष्टता इच्छिती आराम खूब । तेचि राहती बेकार ॥३३॥
शिक्षणाचा द्यावा उपयोग । करोनि प्रचार आणि प्रयोग ।
तव ते स्वतःचि बनती रोग । समाजाच्या जीवनी ॥३४॥
एका बाजूने शिक्षित-श्रीमंतांचे । तैसेचि झाले मजूर-गरिबांचे ।
शिथिलता, आळस दोघांचे । घरी थाटला दिसताहे ॥३५॥
जेव्हा पोटासि भूक लागे । तेव्हाचि घरोघरी काम मागे ।
नाहीतरि आळस घेवोनि संगे । खुशाल पडे झोपडीमाजी ॥३६॥
सकाळी आठ वाजता काम पूर्ण । दहा वाजता उठे घरातून ।
नाही कामावरि मन । चुथडा करी कामाचा ॥३७॥
म्हणे श्रीमंतासि काय झाले ? । ते काय भिकेसि लागले ? ।
काय होते काम न केले । तरी आमुचे नुकसान ? ॥३८॥
कामासाठी हात उचलेना । तोंडी सारखा वाचाळपणा ।
मजूरी न देता धिंगाणा । घालितसे लोकांपाशी ॥३९॥
ऐसे करणे आहे चुकीचे । पैसे कसून घ्यावेत कामाचे ।
परि कामचुकार होणे आमुचे । ब्रीद नव्हे सर्वथा ॥४०॥
मजूर सकाळी पाहिजे उठला । नित्यविधिकर्मातून निपटला ।
घरकाम करोनि निघाला । पाहिजे तत्काळ कामासि ॥४१॥
जेव्हा कामाची वाजेल घंटा । मजूर चालला चारी वाटा ।
उद्योगांचा चालला सपाटा । ऐसे व्हावे ॥४२॥



मजुरावरीच आहे उत्पादन । उत्पादनचि मुख्य ग्रामाचे धन ।
तयामाजी करणे कुचरपण । वेडेपणाचे ॥४३॥
मजूर इकडे कार्यनिष्ठा न जाणे । श्रीमंत तिकडे आळशी बने ।
म्हणोनि झाले कंटाळवाणे । जीवन आता देशाचे ॥४४॥
उत्पादनाची गति खुंटली । उपभोगाची भावना वाढली ।
काय करील भूमाता भली । मशागत नसता जमीनीची? ॥४५॥
यासि सर्वचि असती जबाबदार । शक्ति, संपत्ती, विचार, प्रचार ।
हे एकहि नाही ताळ्यावर । म्हणोनि ग्राम ओसाडले ॥४६॥
श्रीमंता आपुले न वाटे काम । गरीबा उत्पादनाचे नाही प्रेम ।
शिक्षिता हीन वाटती परिश्रम । यानेच आली शिथिलता ॥४७॥
ऐसे न व्हावे आता पुढती । सर्वांनी सुधारावयास पाहिजे मति ।
म्हणोनि आहे माझी विनंति । सकळांप्रति आग्रहाची ॥४८॥
जे जे ज्याचेनि काम बने । त्याने ते सेवा म्हणोनि साधणे ।
आपुलेहि बरे करणे । गावासि होणे भूषणावह ॥४९॥
जो जो पोटापाण्याचे काम न करी । उत्पादनासि ना सुधारी ।
त्यास विरोध करावा, विचारी । माणसाने गावाच्या ॥५०॥
श्रमनिष्ठेचा करावा प्रचार । सर्वांस आपुलकी वाटे पुरेपूर ।
ऐसी व्यवस्था करावी सुंदर । गावचे उत्पादन वाढवोनि ॥५१॥
गावचे वाढवाया उत्पन्न । गावी कराया नवनिर्माण ।
काय करावे ऐसा प्रश्न । वारंवार ऐकू येई ॥५२॥
त्यास उपाय हाचि प्रथम । कामगार करिती जे श्रम ।
त्यांची शक्ति वाचे, तिला काम । द्यावे सहायक दुसरेहि ॥५३॥
आणि इतरांचा वेळ कितीतरी । जाई व्यर्थचि गावी घरी ।
कामी लाविता तो निर्धारी । काया पालटेल गावाची ॥५४॥
कच्ची सामुग्री गावाच्या भागी । ती पुरेपूर आणावी उपयोगी ।
शोध करोनि नाना प्रयोगी । माती करावी सोन्यासम ॥५५॥
अन्य देशींच्या तरुणांसि वेड । नित्य नवे संशोधन प्रचंड ।
तैसी धुंद चढावी अखंड । गावच्या शिक्षित तरुणा ॥५६॥
गावचे कलावंत निपुण । त्यांना द्यावे उत्तेजन ।
नवनव्या वस्तु कराव्या निर्माण । उपयोगाच्या जीवनासि ॥५७॥

उद्योगे, यंत्रेहि निर्मावी । परदेशा भीक न मागावी ।
आपणचि करोनि भोगावी । वैभवे सारी ॥५८॥
चरखा-टकळी पासूनि उद्योग । अन्न, धान्यादिकांचे प्रयोग ।
घरेदारे सर्व सुयोग । आपणचि निर्मावे ॥५९॥
प्रत्येक घरी जोडधंदा । सर्व स्त्री-पुरुष याचि छंदा ।
दूर करावया आपदा । जीवनाच्या लागावे ॥६०॥
कोणी पिशव्या, कोणी नवारी । कोणी खादी विणतो घरी ।
कोणी चपला चामडियाच्या करी । मेल्या जनावरांच्या ॥६१॥
कोणी चटया, कोणी आसने । कोणी खुर्च्या, कोणी खेळणे ।
कोणी बादल्या, पलंग, गोणे । साबणहि घरी करी ॥६२॥
कोणी सुंदर मडके घडवी । कुंड्या, फुल-पात्रे बरवी ।
कोणी कवेलु मजबूत दावी । करोनिया सुंदरसे ॥६३॥
कोणी सुंदर विटा करी । कोणी फाडी फोडी बरी ।
सर्व हे आपापल्या परी । घरोघरी कार्यरत ॥६४॥
कोणी बैलांचा साज करी । कोणी रंग शोधी परोपरी ।
प्रत्येकजण काहीतरी । करितचि आहे ॥६५॥
ऐसे हे सर्व गाव । जोडधंद्यांनी भरीव ।
जराही नाही उणीव । कोणेपरी कोठे ॥६६॥
ऐसी असावी कलाकुसरी । उद्योगधंदे घरोघरी ।
जराहि न दिसेल बेकारी । वाढली कोठे ॥६७॥
त्यासचि म्हणावी सुंदर कला । एरव्ही अवकळेची धर्मशाळा ।
उसने आणोनि सजविला । आपुला नवरदेव ॥६८॥
जो जो धंदा गावी नसला । प्रोत्साहन मिळावे त्या कार्याला ।
परि तो पाहिजे योग्य ठरला । गावाच्यासाठी ॥६९॥
गावचे उद्योग मागासले । त्यास शिक्षणाने पुन्हा उजळीले ।
ऐसे असावे सुधारले । गाव आमुचे ॥७०॥
नसतील त्या वस्तु निर्माव्या । येत नसता शिकोनि घ्याव्या ।
घरोघरी त्याच दिसाव्या । गावच्या वस्तु ॥७१॥
आपुल्या गावी जे जे होते । आपणचि वस्तु वापरावी ते ।
तेणे गावाचे धन गावीच राहते । शक्ति वाढते गावाची ॥७२॥



चांभार गावी उपाशी मरे । जोड्यासाठी शिक्षित शहरी फिरे ।
केवढी गावची कदर करणारे । बुद्धिमंत हे ! ॥७३॥
गावी विणकर फुटाणे फाकती । यासि हवी मलमलची धोती ।
वा रे यांची देशभक्ति ! । गाव मारिती शौकासाठी ॥७४॥
कोणी म्हणती आमुचा पैसा । आम्ही खर्चू हवा तैसा ।
गाव-द्रोही समजावा ऐसा । आपस्वार्थी मानव ॥७५॥
गावचे कलावान मागासले । म्हणोनि न पाहिजे उपाशी मारिले ।
बाह्य वस्तूंनी आपणचि सजले । भूषण नव्हे, दूषण ते ॥७६॥
देशात एकटा ताजमहाल । त्यावरूनि न ठरे देशाचा हाल ।
घरोघरी लोक जरी कंगाल । तरि ते मोजमाप कशाचे? ॥७७॥
गावी एक कुस्तीगीर महान । आणि बाकीचे लकडी पहेलवान ।
तरी ते गाव शरीरबलाने पूर्ण । म्हणता न ये कधीहि ॥७८॥
मोजके थोरपुरुष होऊनि जाती । इतरांची पातळी न येचि वरती ।
तव ती समाजाची प्रगति । कैसी म्हणावी जाणत्याने? ॥७९॥
यासाठी प्रत्येक घटक सज्ञान । पाहिजे निरोगी, उद्योगी संपन्न ।
तरीच ते गाव आदर्शाचे भूषण । मिरवू शके ॥८०॥
म्हणोनि प्रत्येकाने आपुल्या गावी । ग्रामीण वस्तूंना चालना द्यावी ।
त्यात सुधारणाहि घडवावी । उन्नति व्हाया कलावंतांची ॥८१॥
ऐसे सर्वचि उद्योगधंदे । चालवावेत गावीच आनंदे ।
नांदावेत सकळ लोक स्वच्छंदे । सुख समाधानाने ॥८२॥
गावी असावे वस्तुप्रदर्शन । आपुल्याच गावी झाले निर्माण ।
बी-बियाणे, शेती-उद्योग-सामान । तयामाजी ठेवावे ॥८३॥
खेळणी, लेणी, जीवनोद्यमे । लाकडी, लोहारी, बेलदारी कामे ।
कुंभारी, विणकरी, उत्तम चर्मे । असावी तेथे ॥८४॥
असावे सुंदर एक घर । त्यामाजी वस्तु विविध, सुंदर ।
आम्हीच निर्मिलेल्यांचा भर । असावा तेथे ॥८५॥
गावी जे माल-धन निर्माण होते । बघावया लोकांनी यावे तेथे ।
योग्य किंमती देवानि ते । घ्यावे सामान तयांनी ॥८६॥
गावी असावी उद्योग-समिती । जी सतत करील उद्योग-उन्नति ।
गावाचे आर्थिक जीवन हाती । घेवोनि लावील सोय जी ॥८७॥

गावाचिया धनिकांकडोनि । संपत्तीचा वाटा मिळवोनि ।
सर्वांच्या हितासाठी रात्रंदिनी । उपयोग करावा तयाचा ॥८८॥
काही असती जमीनदार । तेचि गावचे अर्थभांडार ।
त्यांना सर्व कारभार । सोपवाया लावावा मजूरांवरि ॥८९॥
किंवा धनिक जरी ना वळे । शेतकरी–मजुरांच्याचि बळे ।
'थेंबे थेंबे साचवावे तळे' । त्यांच्या अल्प ठेवींचे ॥९०॥
त्यातूनि निर्माण करावा वस्तुसंग्रह । सर्वांना उपयोगी भांडारगृह ।
सर्वांमिळोनी चालवावे निःसंदेह । दुकान सर्व वस्तूंचे ॥९१॥
त्यात असावी सर्वांची मालकी । हुशार किसानांची ठेवावी चालकी ।
सर्वांच्या अनुमतीने व्यापार–एकी । करावी गावी ॥९२॥
एक असावे धान्यभांडार । चालावया गावचे व्यवहार ।
त्यात असावे सर्व जनतेचे शेअर । सोयीसारखे ॥९३॥
प्रसंगी त्यातूनचि धान्य न्यावे । सर्वांमिळोनि कर ठरवावे ।
प्रसंगी सर्वांनी वाटून घ्यावे । उत्तम रीति ॥९४॥
त्यातूनचि करावी गावाची सेवा । उणीव पडेल ज्या कष्टी जीवा ।
अथवा ग्राम सुधारणेस लावावा । वाढवा त्याचा ॥९५॥
गावी चालते सवाई–दिढी । त्यास याने बसेल अढी ।
ग्रामनिधीची उघडता पेढी । थंडावेल व्यापारी – सावकारी ॥९६॥
गावी आवश्यक तेलघाणी । शुद्ध तेलादिकांची निशाणी ।
गावची कामे सर्व मिळोनि । गावीच करावी उपयुक्तशी ॥९७॥
उद्योगहीनांना उद्योग द्यावे । कामे देवोनि सुखी करावे ।
आपणासमान पाहिजे बरवे । केले त्यासि सुखवस्तु ॥९८॥
ज्याने ज्याने काम करावे । त्याने हक्काने पोटभरी खावे ।
लागेल तेवढे मागावे । हे तो आहे प्रामाणिक ॥९९॥
जयास न मिळे कामधाम । त्याने समितीस सुचवावे नाम ।
ग्रामसेवाधिकारी उद्यम । देईल त्यासि ॥१००॥
काम देणे कर्तव्यचि त्याचे । जमा असतील फंड गावाचे ।
त्यातूनि पुरवावे मोल कामाचे । उपयोगी ऐशा ॥१०१॥
मजूरा मजुरी पूर्ण द्यावी । जेणे मुलेबाळे सुखे जगवी ।
तैसीच उत्पन्ने वाढवोनि घ्यावी । गावामाजी ॥१०२॥



याने सर्वांस मिळेल सुख । मिटेल जीवनाची भूक ।
ग्रामराज्य होईल सुरेख । आर्थिकतेने समृद्ध ॥१०३॥
यास्तव श्रीमंत, शिक्षित, हुद्देदार । कलावंत, शेतकरी, कामगार ।
सर्वांनी मिळोनि ग्रामोद्धार । करावा ग्रामोद्योगांनी ॥१०४॥
शहराकडे चालला प्रवाह । तो थांबवावा निःसंदेह ।
सर्वांचा गावीच होईल निर्वाह । ऐसी योजना करावी ॥१०५॥
खेडेचि शहराचे जनक । शहर भोक्ते, खेडे उत्पादक ।
शहराकडे न जाता लोक । धावावे उलट खेड्यांकडे ॥१०६॥
ऐसी करावी ग्रामसेवा । हेचि कर्म आवडे देवा ।
संशय काही मनी न धरावा । तुकड्या म्हणे ॥१०७॥
इतिश्री ग्रामगीता ग्रंथ । गुरु – शास्त्र – स्वानुभव – संमत ।
ग्रामोद्योगांचा कथिला तत्त्वार्थ । अठरावा अध्याय संपूर्ण ॥१०८॥


॥ सद्गुरुनाथ महाराज की जय ॥

## अभंग - वचने

केशवाचे ध्यान धरोनि अंतरी । मृतिकेमाझारी नाचतसे ॥
म्हणे गोराकुंभार कोणी नाही दुजे । विश्वरूप तुझे नामदेवा ॥

**– श्रीसंत गोरा कुंभार**

## ॥ चित्र परिचय ॥



### अ. १९ – पूज्य श्री साने गुरुजी

या कोवळ्या कळ्यांमाजी । लपले ज्ञानेश्वर, रवीन्द्र, शिवाजी ।
विकसता प्रकटतील समाजी । शेकडो महापुरुष ॥७६॥

नाना आपत्तींना तोंड देत स्त्रिया, मुले, अस्पृश्य, कामगार यांना सुखी व सुसंस्कृत करण्यासाठी मातेच्या हृदयाने झटणारे, एम.ए. पर्यंत शिकून आपल्या जीवनाचा एकेक क्षण देशसेवाकार्यी लावणारे व जगातील दुःख–विषमता निवारण्यासाठी प्राणाहुती देणारे वात्सल्यमूर्ति संत. भारत–पुत्रांचे वाङ्मय रूपाने अमर असे आदर्श शिक्षक.



• अध्याय एकोणविसावा •

# जीवन–शिक्षण

॥ श्रीगुरुदेवाय नमः ॥

श्रोतियाने केला प्रश्न । खेडे शहराहूनि महान ।
ऐसे म्हणतो आपण जन । परि एक खूण न विसरावी ॥१॥
शहरात आहे उच्च शिक्षण । ते खेड्यात पावेल कोण? ।
कोणी आला जरी शिकोन । तरी येथे होतो गावंढळ ॥२॥
'नगरामाजी नागरचि होईजे' । यासाठी शहरचि विद्यार्थ्या पाहिजे ।
खेड्यामाजी 'नांगरचि वाहिजे' । ऐसे होते ॥३॥
ऐका ऐसी जयांची भावना । लक्ष द्यावे त्यांनी या वचना ।
येथे शिक्षणाची मूळ कल्पना । तीच चुकली आपुली ॥४॥
दिखाऊ कपडे, कोरडी ऐट । नोकरपेशी थाटमाट ।
हे शिक्षणाचे नव्हे उद्दिष्ट । ध्यानी घ्यावे नीट हे आधी ॥५॥
अजब ऐसी शिक्षणाची प्रथा । जेथे कामी न ये बापाची संथा ।
बाप करी शेतीची व्यवस्था । मुलगा मागे नोकरी ॥६॥
व्हावे मोठे बाबूसाहेब । काम जुजबी, पैसा खूब ।
मोठी पदवी, दिखाऊ ढब । ही उच्चता म्हणोचि नये ॥७॥
हे सर्व मागील विसरोन । मुला–मुलींना द्यावे शिक्षण ।
जेणे गावाचे वाढेल भूषण । सर्वतोपरी ॥८॥
नुसते नको उच्च शिक्षण । हे तो गेले मागील युगी लपोन ।
आता व्हावा कष्टिक, बलवान । सुपुत्र भारताचा ॥९॥
शिक्षणातचि जीवनाचे काम । दोन्हींची सांगड व्हावी उत्तम ।
चिंता नसावी भोजनासाठी दाम । मागण्याची भीक जैसी ॥१०॥
मुलात एखादा तरी असावा गुण । ज्याने पोट भरेल त्यात निपुण ।
न ये संसारामाजी अडचण । कोणत्याहि परी ॥११॥
जीवनाच्या गरजा संपूर्ण । निर्वाहाचे एकेक साधन ।
संबंधित विषयांचे समग्र ज्ञान । यांचा अंतर्भाव शिक्षणी ॥१२॥

नदी, तलाव आणि विहिरी । यात पोहणे नानापरी ।
आपत्ति येता धावोनि तारी । ऐसे शिक्षण असावे ॥१३॥
गावी भोजनाचे असती प्रसंग । स्वयंपाक करता यावा यथासांग ।
हेहि कला शिकवावी सप्रयोग । मुला-मुलींसि ॥१४॥
असले शिक्षण वाटते साधारण । परि याचे जीवनात अग्रस्थान ।
नाहीतरि जगावे जनावरासमान । होईल स्वयंपाक न येता ॥१५॥
मुलगी बहु शिकली शाळेमाझारी । परि स्वयंपाक करता न ये घरी ।
काय करावी विद्याचातुरी ? । कामाविण लंगडी ती ॥१६॥
अशिक्षित स्वयंपाक करोनि खाई । सुशिक्षित चणे फाकीत राही ।
दोरास घालता न ये वंधाहि । जेथे तेथे पराधीन ॥१७॥
मुलास पंगत वाढता न ये । घरचे पाणी भरता न ये ।
आपुल्याच तोऱ्यामध्ये राहे । तरि ते व्यर्थ ज्ञान त्याचे ॥१८॥
घरी ज्याची उणीव पडे । मुलगा धावोनि पुरवी कोडे ।
धडाडीने कर्म करण्या धडपडे । तरीच शिक्षण कामाचे ॥१९॥
विद्येअंगी व्हावा विनय । विद्या करी स्वतंत्र, निर्भय ।
शिक्षणाने वाढावा निश्चय । जीवन - जय करावया ॥२०॥
याचसाठी शिक्षण घेणे । की जीवन जगता यावे सुंदरपणे ।
दुबळेपण घेतले आंदणे । शिक्षण त्यासि म्हणो नये ॥२१॥
गावावर आली गुंडांची धाड । विद्यार्थी दारे लाविती धडाधड ।
वाडवडिलांच्या अब्रुची धिंड । काय शिक्षण कामाचे? ॥२२॥
म्हणोनि पाहिजेत बलवान मुले । कुस्ती, मल्लखांब खेळणारे भले ।
धडाडीने प्रतिकारार्थ धजले । तरी शिक्षण उपयोगी ॥२३॥
ऋषिकालीन ऐसी प्रथा । शिक्षणात होती जीवन-संथा ।
याकरिता आश्रमांची व्यवस्था । होती पूर्वी ॥२४॥
धनुर्विद्या, मल्लविद्या । आयुर्वेद आणि शस्त्रास्त्रविद्या ।
उत्तमोत्तम चौदा विद्या । शिकवीत होते आचार्य ॥२५॥
चित्रकला, चर्मकला । रांगोळ्यांचीहि उत्तम कला ।
बुरडकाम, कुंभारकामादि सकला । चौसष्ट कला नानापरी ॥२६॥
संगीतशास्त्र, स्वयंपाकशास्त्र । गृहस्थापनेचे सुंदर तंत्र ।
अश्वपरीक्षा, रत्नपरीक्षादि समग्र । जीवनविद्या शिक्षणी ॥२७॥



ऐसी प्रथा पूर्वी होती । आता उच्च ज्ञान घेवोनि येती ।
परि गावची न सुधारवे शेती । गावच्या उपलब्ध साधनांनी ॥२८॥
शिक्षण झाले वैभवस्थानी । मग गावचे जीवन न बसे मनी ।
उच्च ज्ञान आणावे साध्या जीवनी । कैसे तेहि कळेना ॥२९॥
त्यापेक्षा उच्च ज्ञानाची विद्यालये । गावीच आणावी निश्चये ।
जी ग्रामजीवन सजवितील चातुर्ये । शिकवोनि जना ॥३०॥
मुलांना शिकवाव्या नाना कला । चापल्य, ध्येयनिष्ठादि सकला ।
गावचि सांभाळू शकेल आपुला । ऐसे द्यावे शिक्षण ॥३१॥
गावासि कैसे आदर्श करावे । याचेचि शिक्षण प्रामुख्याने द्यावे ।
सक्रियतेने करावयासि लावावे । विद्यार्जनी ॥३२॥
सहकार्याची प्रबल भावना । हेचि शिक्षणाचे मुख्य सूत्र जाणा ।
सहकार्यावाचोनि शिक्षणा । महत्त्व नाही ॥३३॥
व्हावे परस्परांशी पूरक । हेचि आहे शिक्षणाचे कौतुक ।
व्यक्तिनिष्ठतेने भयाण दु:ख । मानव-जीवनी ॥३४॥
जनसेवेचे प्रमाणपत्र । त्यासि महत्त्व यावे सर्वत्र ।
उद्याचे राष्ट्र, आजचे कन्या-पुत्र । समजोनि त्यांना सुधारावे ॥३५॥
गावचे सर्वांत मुख्य पुत्रधन । त्यांचे संरक्षावे चरित्रधन ।
तेणे गावाचे वाढेल महिमान । चारित्र्यापरि उज्ज्वल ॥३६॥
आपणासि वाटे जैसे गाव व्हावे । तैसेचि बालकांना शिकवावे ।
शहाणे करोनि सोडावे । विद्याशिक्षणे सर्वचि ॥३७॥
बाळपणीच शिक्षण होई । वय झालिया त्रास जाई ।
वळविल्याहि न वळती काही । इंद्रिये त्यांची ॥३८॥
मग तो राही आंगठाछाप । कोणीहि त्याला द्यावी थाप ।
आयुष्यभरी कष्ट-संताप । भोगीतसे आंधळ्यापरी ॥३९॥
त्यासि बंद उन्नतीची द्वारे । आयुष्य जाय हमालीत सारे ।
किसान परि कळेना गोजिरे । शेतीचेहि नवे ज्ञान ॥४०॥
नाही अवजारांत सुधारणा । सुधारू न शके पिके नाना ।
घाण्याच्या बैलापरी धिंगाणा । जीवनाचा त्याच्या ॥४१॥
वडिलाने मुलगा नाही शिकविला । तोहि पापांचा भागीदार झाला ।
जैसे जन्म देणे कर्तव्य त्याला । तैसेचि शिक्षण देणे अगत्याचे ॥४२॥

जरि आपुल्याने व्यवस्था नव्हे ? । तरि देशोद्धारक संस्थेसि सोपवावे ।
परि मुलास पतित न ठेवावे । अशिक्षितपणे कधीहि ॥४३॥
आईबापांनी अंगावरि । मुले ठेवू नयेत निरंतरी ।
सोपवावी बालकांच्या विद्यामंदिरी । रक्षक असतील जे त्यांना ॥४४॥
जन्म देण्याचे काम मातापित्याचे । शिक्षणाचे काम विद्यागुरुचे ।
तेथे आसक्तीने पुत्रधन देशाचे । बिघडवू नये लाडवोनि ॥४५॥
आईबापांचा प्रेमळ चाळा । पुरवी लहान मुलांचा आळा ।
मुलगा होतो ठोंब्या-भोपळा । अतिलाडाने निकामी ॥४६॥
हे तो विद्यागुरु साहेना । अथवा शिक्षिका चालू देईना ।
मुलास वळवावे कैसे त्यांना । माहीत असते मानसशास्त्र ॥४७॥
म्हणोनि सर्व गावाने मिळून । काढावे शिशुसंगोपन ।
बाई-बुवास शिक्षण देऊन । नेमावे त्या कार्यासि ॥४८॥
असावे गावीच विद्याभुवन । बालोद्यान शिशुसंगोपन ।
मुले बाळपणीच त्यात ठेवोन । वळण द्यावे साजेसे ॥४९॥
आईबापास फुरसत नाही । कामास जाता अडचण येई ।
मुलाबाळांची आबाळ होई । हे सर्व मिटे विद्याश्रमे ॥५०॥
याचेचि त्यांना असावे शिक्षण । कैसे करावे बालसंगोपन ।
आपले काम द्यावे नेमून । मुला-मुलींना कैशापरी ॥५१॥
कोठेहि मुलांना लहानपणी । व्यसने लागू न द्यावी कोणी ।
लागताचि घ्यावी झाडणी । शिक्षका-पालकांची ॥५२॥
नाहीतरि एककल्ली । शिक्षण घेवोनि वृत्ति केली ।
आपण फसोनि दुसऱ्यांची फसविली । मुलेबाळे, ऐसे न हो ॥५३॥
म्हणे मी शिक्षणकार्यी लागलो । पवित्र गुरुजी मुलांचा झालो ।
परि व्यसनांचा अवतार बनलो । म्हणोनि मना धिक्कारीना ॥५४॥
मुलांस म्हणे सद्वर्तनी राहा । आपण बिडी पिण्यात वाजवी दहा ।
मग उष्णतेने बोलतो पाहा । साजरा रेलगाडीपरी ॥५५॥
ओळखोनि गावाची जबाबदारी । शिक्षक जिव्हाळ्याने काम करी ।
तरीच गाव होय स्वर्गपुरी । न पडे जरूरी कोणाची ॥५६॥
घरी, दारी उत्तम पाठ मिळे । जे जे पाहिजे ते ते कळे ।
तरीच गुरुजनांचा आशीर्वाद फळे । काम केल्या विकासाचे ॥५७॥



जीवन-विकासाचे शिक्षण । गावीच असावे सर्वसंपन्न ।
आपुल्याचि ग्रामरचनेचे आयोजन । शोभवाया शिकवावे ॥५८॥
पाठशाळा असावी सुंदर । जेथे मुली-मुलें होती साक्षर ।
काम करावयासि तत्पर । शिकती जेथे प्रत्यक्ष ॥५९॥
सुंदर गाणे, बोलणे, वागणे । टापटिपीने घरी राहणे ।
आपुले काम आपण करणे । शिकवावे तयां ॥६०॥
ऐसे करिता होईल प्रगति । मुले उत्तम विद्यार्थी बनती ।
थोर-थोर उद्योगधंदेहि शिकती । पुढे पुढे ॥६१॥
विद्यार्थी कार्याने सुरुवात करी । त्यातचि गणितशास्त्रादि सावरी ।
नाहीतरी वाचनपठणचि परोपरी । काही करवेना अंगाने ॥६२॥
म्हणोनि अभ्यासाबरोबरी । सक्रिय करू द्यावी तयारी ।
मुलगा सर्व कामे करी । जीवनाची आपुल्या ॥६३॥
तो पुढे ज्यात दिसे निष्णात । त्या विद्येचा घेवू द्यावा अंत ।
होऊ द्यावे अभ्यासे संशोधनात । गर्क त्याला ॥६४॥
ऐसे जीवन आणि शिक्षण । याचे साधावे गठबंधन ।
प्रथमपासूनचि सर्वांगीण । शिक्षण द्यावे तारतम्ये ॥६५॥
जीवनाचे प्रत्येक अंग । शिकवावा महत्त्वपूर्ण उद्योग ।
काम करावयाची चांग । लाज नसावी विद्यार्थ्या ॥६६॥
मुलगा वरोनि दिसे शिक्षित । काम करताहि दिसे निष्णात ।
कामाची लाजचि नाही ज्यात । जन्मास आली ॥६७॥
करितो शेताचे निंदण । उपणणे, उतारी, नांगरण ।
शेण काढावयासहि उत्सुक मन । दिसे जयाचे ॥६८॥
सर्वतऱ्हेचा उद्योगधंदा । कराया लागला मुलगा छंदा ।
वाढला अभिमान गावचा बंदा । तयार झाला म्हणोनिया ॥६९॥
ऐसी घ्यावी गावे काळजी । मुलांच्या अज्ञानपणामाजी ।
तरीच गावाचा उत्कर्ष सहजी । होईल तेणे ॥७०॥
अवधी धरला अठरा वर्षांचा । पांग फेडील हजारो पिढ्यांचा ।
नमुना बनेल उत्तम गावाचा । विद्यार्जने ॥७१॥
जीवनाचे उज्ज्वल अंग । मुले शिकतील होवोनि दंग ।
वाढेल गावाचा रागरंग । म्हणाल तैसा ॥७२॥

आजचे सान सान बाल । उद्या तरुण कार्यकर्ते होतील ।
गावाचा पांग फेडतील । उत्तमोत्तम गुणांनी ॥७३॥
म्हणोनि म्हणतो बालधन । ठेवा गावकऱ्यांनो! जपून ।
कोण सांगेल निघतील रत्न । किती गावी ॥७४॥
ईश्वराचे जन्म देणे । आई-बापास निमित्त करणे ।
विद्यागुरुचे शिकवणे । भाग्य बने गावाचे ॥७५॥
या कोवळ्या कळ्यांमाजी । लपले ज्ञानेश्वर, रवींद्र, शिवाजी ।
विकसता प्रकटतील समाजी । शेकडो महापुरुष ॥७६॥
कितीक होतील सेवाभावी । कित्येक चतुर कलावैभवी ।
उद्योगधंद्यांनी रंगवी । ग्रामासि आपुल्या ॥७७॥
कित्येक निर्मितील यंत्रागार । कित्येक होतील इतिहासकार ।
कित्येक होतील सल्लाचतुर । गावी आपुल्या ॥७८॥
कित्येक होतील न्यायाधीश । कित्येक काव्यसृष्टीचे ईश ।
कित्येक पिकवितील शेतीस । नवनव्या शोधांनी ॥७९॥
कित्येक होतील राजकारणी । कित्येक होतील तत्त्वज्ञानी ।
कित्येक देतील भूषण मिळवोनि । क्रीडांगणी गावासाठी ॥८०॥
कित्येक संत-उपदेशक । कित्येक वीर-संरक्षक ।
कित्येक व्यापारनिपुण, सेवक । हरकामी ऐसे ॥८१॥
ऐसा हा साजेल गाव-संच । सर्व गुणांचा आदर्श उच्च ।
कोणी न दिसेल जीव नीच । आपुल्या गावी संस्कारे ॥८२॥
गावचे राज्य गावचि करी । कोणाचीच न चाले हुशारी ।
आमुचे आम्हीच सर्वतोपरी । नांदू गावी ॥८३॥
प्रेमे सर्वचि करू सेवा । जेणे सर्व गावासि लाभ बरवा ।
मग ऐसा कोण उरेल ठेवा । जो न लाभे खेड्यामाजी? ॥८४॥
खेड्यात उपजले ज्ञानेश्वरादि । काय उणी त्यांची बळबुद्धि? ।
श्रीकृष्ण आणि महात्मा गांधी । हालवी सूत्रे खेड्यातूनि ॥८५॥
म्हणोनि मित्रहो ! ऐका निश्चिती । गावीच मुलांचे शिक्षण घ्या हाती ।
पांग फिटेल जन्मजाती । सुखी होतील सकळ जन ॥८६॥
कोणी म्हणती जातचि मूर्ख । मुले कैसी निघतील चलाख? ।
काही जाती मुळातचि देख । हुशार असती शिक्षणी ॥८७॥



ही कल्पनाही चूक असे । भेद मुळामाजी नसे ।
तो परंपरागुणे भासे । वातावरणाच्या योगे ॥८८॥
एकाचा बाप न्यायाधिकारी । काका करतो प्रोफेसरी ।
मामा कथा, कीर्तन करी । मग तो हुशार कां नोहे ? ॥८९॥
भोवती बुद्धिवंतांचा मेळावा । खावया सत्वशील मेवा ।
घरी, दारी सहवास बरवा । त्याची उन्नति सहजचि ॥९०॥
बाप गुराखी आणतो मोळी । चुलता विकतो बांगड्या- चोळी ।
मामा सरकारी नोकरी सांभाळी । परि तो शिपाई-चपराशी ॥९१॥
खावयासि कळणाकोंडा । संगतीस ढोरांचा तांडा ।
परि तो अभ्यासे पुढे जाय थोडा । तरी कौतुक कां न करावे ? ॥९२॥
त्याला सहवास उत्तम द्यावा । दर्जा जीवनाचा वाढवावा ।
त्याने समाज होईल नवा । ज्ञानवंतांचा निर्माण ॥९३॥
हे होण्यास पाहिजे शिक्षण । शिक्षणाशिवाय व्यर्थचि भाषण ।
हे कळेल तेव्हाचि जन । सुशिक्षित होतील ॥९४॥
नाहीतरि पूर्वजांनी मूर्खपण केले । ते मुलाबाळांस भोगणे आले ।
लौकरि सुधारेना एकदा चुकले । दोष चाले कुळी साऱ्या ॥९५॥
घराण्यात एकाने पाप करावे । पिढीजात पुढेहि तेचि भोवे ।
ऐसे चालू आहे हे स्वभावे । लोकांमाजी ॥९६॥
मागील कलंक धुण्यासाठी । पुढे घडावे पुण्य गाठी ।
तरीच सुटते बदनामी पाठी । लागलेली सारी ॥९७॥
एकाने सद्गुण आचरिले । नाव त्याचे दिगंतरी गेले ।
पुढे पुत्र वांढाळ झाले । तरी कीर्ति मुरेना ॥९८॥
खपती सारे मागील नावे । जो तो म्हणे वडिलांस बघावे ।
कीर्तीवंत झाले पूर्वज बरवे । घराण्यामाजी ॥९९॥
परि त्याहूनि घडले पाप अधिक । नावाचा वाजा झाला आणिक ।
मग न विचारी मागील कौतुक । 'काय झाले' कोणीहि ॥१००॥
चाले तीच परंपरा । जोवरि विशेष न घडे पुत्रपौत्रां ।
ऐसीच आहे नामयात्रा । इहलोकीची ॥१०१॥
एक एकवीस कुळे उद्धरितो । एक बेचाळीस कुळे बदनाम करतो ।
सारांश, विशेष घडल्यावरीच होतो । पालट नावा ॥१०२॥

रावण पवित्र ब्रह्मकुळीचा । राक्षस ठरे वंशचि त्याचा ।
विश्वामित्र राजर्षीचा । ब्रह्मर्षि होय विशेषत्वे ॥१०३॥
ऐसा विशेष कृतीचा महिमा । जाणोनि करावे परिश्रमा ।
उद्धरावे आपल्या कुळा, ग्रामा । शिक्षण देवोनि नेटाने ॥१०४॥
गोरगरिबांची मुले असती । ज्यासि नाही शिक्षणाची शक्ति ।
त्यासि सरकार वा जनपदाहाती । देवोनि शिक्षण पुरवावे ॥१०५॥
असतील भिकाऱ्यांची मुले । शिक्षण देवोनि करावे चांगले ।
पुण्य लाभेल, पांग फेडले । त्यांचे म्हणोनि गावासि ॥१०६॥
असोत गरीब किंवा धनिक । मुलांस विद्या शिकवाव्या अनेक ।
गावाने संपत्ती पुरवावी अधिक । याच मार्गी ॥१०७॥
यातचि वेचावे खूप धन । करावे पूर्वजांचिया नावाने दान ।
विद्यालये झालिया पवित्र, संपन्न । गाव होईल स्वर्गपुरी ॥१०८॥
आदर्श होतील विद्यार्थीगण । गावाचे पालटेल जीवन ।
कोठेच न उरेल गावंढळपण । टिकाऊ परिवर्तन या मार्गे ॥१०९॥
विद्यामोले ऐसे चढता । येईल भाग्य गावाचे हाता ।
तुकड्यादास म्हणे तत्त्वता । विसरू नका हा मूळ मंत्र ॥११०॥
इतिश्री ग्रामगीता ग्रंथ । गुरु - शास्त्र - स्वानुभव - संमत ।
कथिला सर्वोन्नतीचा विद्यार्जनपथ । एकोणविसावा अध्याय संपूर्ण ॥१११॥


॥ सद्‌गुरुनाथ महाराज की जय ॥

''मुलं म्हणजे देवाघरची फुलं, ती पवित्र आहेत नि पवित्रच राहिली पाहिजेत. त्यांना गरिबी-श्रीमंतीच्या वादाची झळ, पंथ-पक्षांचा वारा, अनितीची जळमट नाही लागू देता कामा नये. तरच इथं देवाचं राज्य येईल ! देशाचा उज्ज्वल भविष्यकाल त्यांच्या रुपानंच साकार होईल !''

**- पूज्य साने गुरुजी**



# ॥ चित्र परिचय ॥



## अ. २० - श्री मंजुळादेवी

याच गुणे 'मातृदेवो भव' । वेदाने आरंभीच गेला गौरव ।
नररत्नांची खाण अपूर्व । मातृजाति म्हणोनिया ॥८॥

सहनशील, कष्टाळू, धर्मप्रिय, सहृदय व पतिपरायण अशी आदर्शगृहिणी व राष्ट्रसंताची भक्तिमती आदर्श माता, जिने मदालसेप्रमाणे भजने गाऊन माणिक अर्थात श्रीतुकडोजी महाराजांना पाळण्यात झुलविले. राष्ट्रमाता जिजाबाईची तेजस्वी शिकवण शिवाजीरूपाने फळास आली व जनाबाई श्रम करीत राहूनच देवप्रिय संत झाली, ही चित्रेही महिलांना मार्गदर्शक ठरोत.

• अध्याय विसावा •

# महिलोन्नती

॥ श्रीगुरुदेवाय नमः ॥

ग्रामोन्नतिचा पाया शिक्षण । उद्याचे राष्ट्र, आजचे संतान ।
यासाठी आदर्श पाहिजेत गुरुजन । राष्ट्रनिर्माते ॥१॥
विद्यागुरुहूनि थोर । आदर्श मातेचे उपकार ।
गर्भापासोनि तिचे संस्कार । बालकांवरि ॥२॥
'जिच्या हाती पाळण्याची दोरी । तीच जगाते उद्धरी' ।
ऐसी वर्णिली मातेची थोरी । शेकडो गुरुहूनिहि ॥३॥
मातेच्या स्वभावे पुत्राची घडण । त्यास उज्वल ठेवी तिचे वर्तन ।
स्त्रीच्या तेजावरीच पुरुषाचे मोठेपण । ऐसे आहे ॥४॥
म्हणती जरी 'बाप तैसा लेक' । परि माऊलीचे महत्त्व अधिक ।
मातृशक्तीनेचि वाढती सकळीक । मुले चारित्र्याने ॥५॥
पुरुष सर्व काही करी । परि बांधला राहे घराबाहेरी ।
सर्व विचार घेवोनि आचरी । तरीच शांति त्यासहि लाभे ॥६॥
उत्तम महिला हेचि करी । आपुले घर ब्रीदासह सावरी ।
मूलबाळ आदर्श करी । वरी प्रेमळपण सर्वांशी ॥७॥
याच गुणे 'मातृदेवो भव' । वेदाने आरंभीच केला गौरव ।
नररत्नांची खाण अपूर्व । मातृजाति म्हणोनिया ॥८॥
प्रल्हादाची कयाधु आई । छत्रपतींची जिजाबाई ।
कौसल्या, देवकी आदि सर्वही । वंदिल्या ग्रंथी ॥९॥
काही पुराणी सांगितली दीक्षा । करावी स्त्रीजातीची उपेक्षा ।
ती होती साधनाची शिक्षा । सर्वतोपरी ॥१०॥
वियोगाने वैराग्य दृढ करावे । मन इंद्रिय सुखातूनि परतवावे ।
म्हणोनि विषयप्रवृत्तीचे गोडवे । निषेधिले त्यात ॥११॥
वैराग्यात न कथिले दोषविरोधा । नसली साधनात आपदा ।
कीर्तीत नसली काही निंदा । तरि पूर्ण नोहे साधन ॥१२॥



म्हणोनि इंद्रिये-विषय-दोषदर्शन । देहाचे नश्वरत्व, ओंगळपण ।
हे वैराग्यार्थ केले कथन । व्यक्तिनिंदा नव्हे ती ॥१३॥
जेथे जेथे मन मोहूनि धावे । तेथूनि त्यास परतवोनि लावावे ।
लहान मुलापरी सांगावे । छीः छीः ऐसे म्हणोनि ॥१४॥
हे पुरुषास कथिले स्त्रियेसाठी । तोचि भाव पुरुषाविषयी तिचे पोटी ।
तेथे कवणाची तुच्छता मोठी? । छीः छीः विषयांसि शास्त्र म्हणे ॥१५॥
परि छीः छीः नेहमीच म्हटले । तरि पालनपोषणचि बिघडले ।
संसारचक्रचि थांबोनि गेले । त्यातूनहि फुटती हीन मार्ग ॥१६॥
म्हणोनि विधीने सेवन उचित बोलिले । महिलेविण विश्व न चाले काय ।
होते पुरुषाने केले? । अभद्र झाले घर सारे ॥१७॥
घरचा उत्तम कामधंदा । हे महिलेचेचि लक्षण सदा ।
आलिया-गेलियासि आपदा । महिला असता न वाटे ॥१८॥
खस्ता सोसूनि परिचर्या । प्रेमळपणे बारीक कार्या ।
करू जाणती उत्तम भार्या । न कंटाळता काळजीने ॥१९॥
पुरुष-हृदया ना कळे जेवढे । स्त्रियेचे समजणे तितुके गाढे ।
तियेच्या भावना-गंगेचे पवाडे । वर्णिले न जाती माझ्याने सर्वांगीण ॥२०॥
एकतानता । तिजसीच घडे एकात्मता ।
जे जे ठरवील ते सर्वथा । करोनि सोडील माऊली ती ॥२१॥
जगात असती नाना जीव । सकळांस जाहीर त्यांचा भाव ।
परि मायाळुपणाचा गौरव । माऊलीसरिसा नाही ॥२२॥
देवाने निर्मिली ही क्षिति । तिचे उदरी खाणी किती? ।
परि माऊली जैसी प्रेमळ दीप्ति । कोठेच नाही ॥२३॥
माऊलीचे स्वभावकर्म । तोचि जगी म्हणविला मानवधर्म ।
माऊलीचे उत्कट प्रेम । म्हणोनीच देव प्रिय लोकां ॥२४॥
संती माऊलीचे रूप धरिले । तरीच ते देवपणासि पावले ।
नाना साधने करोनि फिरले । त्यांना न गवसले देवरूप ॥२५॥
ते हे स्वतःसिद्ध माऊलीपण । स्त्रियेअंगी सहजचि घडण ।
त्याचा विकास करावया पूर्ण । उत्तम शिक्षण पाहिजे ॥२६॥
स्त्री-दक्षता विचित्रचि आहे । तेथे माणसाचे लक्षचि न जाय ।
तेवढे शिक्षण मुलाबाळांस ये । तरीच सोय संसाराची ॥२७॥

पुरुष आहे पिंडवर्णी । स्त्री आहे दक्ष कारुणी ।
दोघांचे स्वभाव मिळताक्षणी । होय मेदिनी वैकुंठचि ॥२८॥
उत्तम पुरुषासवे उत्तम नारी । तरी त्यांचा संसार स्वर्गापरि ।
पुरुषाहूनि काकणभरि । महिला वरीच राहतसे ॥२९॥
जेव्हा पुरुष होय चिंतातुर । तेव्हा घरची लक्ष्मी सांगे विचार ।
हे मी पाहिले घरी अपार । प्रसंग येता जाण्याचे ॥३०॥
निरीक्षोनि जी जी घरे पाहिली । तेथे सरसता अनुभवा आली ।
चातुर्य-लक्षणे अधिक दिसली । महिलांमाजी ॥३१॥
मानवी स्वभावांचे अनुमान । प्रसंग पाहोनि अवधान ।
पुढील काळाचे अनुसंधान । स्त्रियांचे ठायी ॥३२॥
स्त्रीलाच भक्ति, स्त्रीलाच ज्ञान । तिलाच संयम, शहाणपण ।
तिच्यानेच हालती वाटे संपूर्ण । संसारचक्रे ॥३३॥
म्हणजे पुरुषाचे काहीच नाही । ऐसे म्हणणे नोहे काही ।
सहज स्वभावाची रचनाचि ही । विशद करोनि सांगितली ॥३४॥
हे सर्व जरी सांगितले । तरी त्यात भावनेनेचि रंग भरले ।
कारण, मी नाही अनुभवले । सुख, दुःख संसाराचे ॥३५॥
माझा संसार विश्व आहे । सर्व स्त्री-पुरुष, बाप-माय ।
व्यवहारदृष्टीने समजून काय । पाहिजे ते ते बोललो ॥३६॥
परि यातूनि एकचि घ्यावे । स्त्रियेसि कोठे अव्हेरावे ।
कोठे माऊली म्हणोनि पाय धरावे । ओळखावे हे तारतम्ये ॥३७॥
कोठे वागवावे मित्रभावे । कोठे देवी म्हणोनि पुजावे ।
कोठे वैरिणीसारखे बघावे । स्थलकालपात्रभेदाने ॥३८॥
हे ज्या पुरुषांना नाही कळले । ते जरी रानीवनी पळाले ।
तरी काय होते केले । सोंग ऐसे वरपंगी? ॥३९॥
ते जिकडे जातील तिकडे । स्त्रीचि आहे मागे-पुढे ।
अंतरी-बाहेरी प्रकृतीचे वेढे । जीवापाडे पडले हे ॥४०॥
केवळ आपुल्या वृत्तीकरिता । केली स्त्रीनिंदा तत्त्वता ।
तेथे माऊलीपणाचिया माथा । दोष देता पाप लागे ॥४१॥
म्हणोनि वैराग्ये स्त्री अव्हेरिली । त्यांनी विवेके साधना केली ।
त्यापुढे त्यांनीच संबोधिली, वंदिली । माऊली तीस म्हणोनि ॥४२॥



परि हे एकांगीपणे नोळखती । स्त्रियांची अनास्था करिती ।
यानेच झाली घोर दुर्गति । समाज-जीवनाची ॥४३॥
हीन – दुबळे केले स्त्री-समाजा । तैसीच पुढे वाढली प्रजा ।
म्हणती स्त्रीजात तेवढी पशूच समजा । पाशवी झाले जग सारे ॥४४॥
कोणी भोग वस्तु समजोनि भली । सजवोनि ठेविली नुसती बाहुली ।
त्याने घरोघरी शिरला कली । अबला बनली मायभूमि ॥४५॥
म्हणती स्त्री ही गुलामचि असते । तिला हक्क नाहीत उद्धरायापुरते ।
हे म्हणणे शोभेना शहाण्याते । स्वार्थांधतेचे ॥४६॥
म्हणती स्त्री ही कार्यात धोंड । म्हणोनि तिच्या प्रगतीत पाडावा खंड ।
ऐशापरी जाणोनि वाढविती दगड । मार्गी आपुल्या ॥४७॥
वास्तविक दोन्ही संस्कारे जन्मती । आपुल्या प्रयत्नेच उन्नती होती ।
शेवटी उद्धारहि तिच्याच हाती । असे तियेचा ॥४८॥
काय देवे देवता भिन्न केल्या? । ऋषि पत्न्या नव्हत्या सांभाळिल्या? ।
काय महिलांत साध्वी नाही झाल्या? । पाहा पुराणी मागच्या ॥४९॥
काय स्त्रियांनी नाही लिहिले वेद? । काय नाही केला ब्रम्हवाद? ।
नाना विद्याकला-भेद । यात प्रवीण कितीतरी! ॥५०॥
काय स्त्रियांनी युद्ध नाही केले ? । पति, पुत्रा नाही प्रोत्साहन दिले? ।
काय स्त्रियांनी प्राण नाही अर्पिले । ब्रीदासाठी? ॥५१॥
हजारो स्त्रिया फुलांहूनि नाजुक । ब्रीदासाठी जाहल्या राख ।
त्यांचे करावे तेवढे कौतुक । थोडेचि आहे ॥५२॥
स्त्रियेसारिखी मोहिनी नाही । स्त्रियेसारिखी वैरागिणी नाही ।
स्त्रियेसारिखी मुलायम नाही । आणि कठोर रणचंडिका ॥५३॥
परि तिचे लक्ष कोणीकडे न्यावे । काय संस्कार तिच्यात भरावे? ।
काय शिकवोनि तयार करावे? । हे आहे संगती हाती ॥५४॥
संगति विषयासक्तीची असली । तरि वेडीबावरी स्त्री बनली ।
तिच्यात वैराग्यउर्मि भरली । तरि न गवसे गुंडासहि ॥५५॥
प्राण देईल आपुल्या हाते । परि भ्रष्ट न होईल लोभे-भये ते ।
ऐसे विचारचि पाहिजे तेथे । बिंबविले धीरपुरुषे ॥५६॥
त्यासाठी तिला तैसेचि ठेवावे । सुसंगति द्यावी आणि शिकवावे ।
नातेगोते सर्व तैसेचि राखावे । स्त्रीचेप्रति ॥५७॥

अगदी मूलवयापासोनि । उत्तम चालीरीतींची राहणी ।
कार्यी चपल, सावध जीवनी । शिक्षण देवोनि करावी ॥५८॥
काही मुली शक्ति-शिक्षण घेती । मुलांपेक्षाहि धीट असती ।
नाही गुंडांचीहि छाती । हात घालील त्यांचेवरि ॥५९॥
तेथे कासयासि पडदा? । परावलंबनाची आपदा ।
आत्मसामर्थ्यानेच सदा । स्त्रिया मर्दिती असुरांना ॥६०॥
परि इकडे करोनि दुर्लक्ष । आपुला राखोनि वर पक्ष ।
लोक स्त्रियांचे जीवन रुक्ष । करोनि ठेविती स्वार्थाने ॥६१॥
काही लग्न होता गुंतविती घरी । नसे बोलण्याचीहि उजागरी ।
'चूल आणि मूल' हीच चाकरी । सांगती तिज ॥६२॥
काही घरातचि कोंडून ठेविती । बिचारीला जगचि नसे जन्मजाती ।
जरा दिसली सूर्याप्रति । मारूनि करिती सरळ तिला ॥६३॥
मुलीने सदा लपोनि राहावे । मुलाने गावी रागरंग पाहावे ।
ऐसे हे दुष्ट-रिवाज ठेवावे । न वाटती आम्हा ॥६४॥
अरे ! तुझ्याहून ती उत्तम वागते । समाजी उत्तम भाषण देते ।
तुलाहि शहाणपण शिकवू जाणते । मग ती मागे कशाने ? ॥६५॥
ऐसे असता दाबून ठेवावे । आजच्या युगी शोभा न पावे ।
जेथे समान हक्क असती बरवे । वर-वधूंना ॥६६॥
ईश्वरानेचि निर्मिले हे सूत्र । दोन्ही ठेवावेत समान पवित्र ।
मुलांनीच काय केले सर्वत्र । राहाया पुढे जगामाजि? ॥६७॥
वेगळे नियम प्रतिष्ठेसंबंधी । विधवा होता विवाह-बंदी ।
निर्वाहाचीहि नाही संधि । ही भेदबुद्धि कशासाठी? ॥६८॥
काही स्त्रिया विधवा होती । केश काढूनि विद्रूप करिती ।
त्याने कैसी साधे संन्यासवृत्ति । मला नसे ठावे हे ॥६९॥
आपुला झाकोनि दुबळेपणा । करावी दुसऱ्यांची विटंबना ।
हा तो आहे दुष्टपणा । अमानुष जैसा ॥७०॥
संन्यास घेणे असेल विधवेला । तरि वनी आश्रमी ठेवावे तिला ।
सेवाशिबिरी अभ्यास केला । पाहिजे तिने स्वइच्छे ॥७१॥
आपण खावे, ल्यावे साजिरे । तिला जन्मवरि दुःखांचे भारे ।
त्याहूनि तिचे मरणे बरे । होते पति-चितेमाजी ॥७२॥



तिने वृत्तीने राहावे उदास । करावा परमार्थाचा अभ्यास ।
विद्रूप करूनि आपणास । काय फायदा समजेना ॥७३॥
विधवेसि मानावे अभद्र । मुलगी जन्मता ती दळभद्र ।
वय वाढता समजावी क्षुद्र । हा तो दुष्टपणा समाजाचा ॥७४॥
जैसा पुरुष राहे ब्रह्मचारी । तैसी स्त्रीहि असू शकते कुमारी ।
अधिकाराची उणीव सारी । घालविली पाहिजे ॥७५॥
स्त्रीजातीस संतति नियमन-बेडी । परि पुरुषास काही नाही बेरडी ।
हे म्हणणे नव्हे अविचारी खोडी । वाटते मज ॥७६॥
नियमन असावे ते सर्वांसि । अभ्यास द्यावा तो दोघांसि ।
विशाल करावे विचारशक्तीसि । देशक्लेश समजावोनि ॥७७॥
समाजी जो पुरुषासि आदर । तैसाचि महिलांशी असावा व्यवहार ।
किंबहुना अधिक त्यांचा विचार । झाला पाहिजे समाजी ॥७८॥
येथेच समाजाचे चुकले । एकास उचलोनि दुसऱ्यास दाबले ।
याचे कटुफळ भोगणे आले । कितीतरी स्थानी ॥७९॥
परि लक्ष नाही आज तिकडे । नाहीत मुलीबाळींना उत्तम धडे ।
कुरण वाढू द्यावे ढोरांसाठी पुढे । तैसे झाले समाजाचे ॥८०॥
यास पाहिजे आता वळविले । ठिकठिकाणी शिक्षण दिले ।
मुली-महिलांचे जीवन जागविले । तरीच जगेल गावराज्य ॥८१॥
शहाण्यांनी हे विसरू नये । गावी सर्वांची करावी सोय ।
जेणे पुरुषांचे तैसेचि स्त्रियांचे होय । उत्थान आता ॥८२॥
तरीच ग्राम शोभू लागे । पुरुष-नारी दोन्ही विभागे ।
जेणे स्वर्गचि उतरेल कार्यायोगे । विकासाच्या ॥८३॥
महिलांच्या आंतरिक गुणांचा विकास । करील ऐसे शिक्षण खास ।
जरि दिले जाईल त्यास । तरीच भावी जग पालटे ॥८४॥
महिलांचे उच्चत्तम शिक्षण । शिक्षणात असावे जीवनाचे स्थान ।
जीवनात असावे स्वारस्य पूर्ण । शांति, दयादि भावनांचे ॥८५॥
समाजविकास ज्यास आवडे । त्याने शिकवावे मुलींना धडे ।
लिहिता-वाचता येईल एवढे । तरी शिक्षण आवश्यक ॥८६॥
तैसीच शिकवावी टापटीप । गाणे, बोलणे, वागणे अनुरूप ।
घर पाहताचि कळावे आपोआप । कैसी येथील महिला ते ॥८७॥

मुलीबाळीस उत्तम ठेवणे । हे तो मातापित्याचे कर्तव्य प्रमुखपणे ।
त्यानेच राष्ट्राचे फेडील पारणे । घर संताने आपुलिया ॥८८॥
मी पाहिले मुले फार शिकती । यंत्रविद, कारागीर होती ।
परि मुलींसाठी योजना अति । मंद आहे शिक्षणाची ॥८९॥
ऐसे समाजी न व्हावे । मुलांपरीच मुलींना शिकवावे ।
त्यांचे स्थानमान नेहमी असावे । सहकारितेचे ॥९०॥
मुलांस विविध उच्च ज्ञान द्यावे । तैसेचि मुलींनाहि शिकवावे ।
हेळसांड करू नये हे जाणावे । समाजाने ॥९१॥
परि स्वतंत्र असावे मुलींचे शिक्षण । स्त्री–पुरुषांचे उद्योगहि भिन्न ।
जेथे होते दोघांचे मिलन । प्रसंग कठिण ओढवती ॥९२॥
विचारे जे जे काही होते । त्यात योजनाबद्धता राहते ।
अविचाराने जाता मोहपंथे । धोका मागुते पावती ॥९३॥
म्हणोनि समजोनि शिक्षण द्यावे । दोन्ही रथचक्रांसारखे करावे ।
शक्तियुक्तींनी भरावे । गाव सारे आपुले ॥९४॥
परंतु नेहमी भयभीत करावे । प्रत्येकाचे स्थान भिन्न ठेवावे ।
मग स्वभावास वळण कोणी द्यावे । संसर्ग येता ? ॥९५॥
स्त्री–पुरुषांच्या विकृत कल्पना । भ्रमविती परस्परांच्या मना ।
यासाठी वाढवावा बंधु–भगिनीपणा । योग्य संबंधे ॥९६॥
शिक्षणात अशीच करावी व्यवस्था । न होईल परस्परांची अनास्था ।
या दृष्टिने शिकवोनि समस्ता । वळण द्यावे नैतिकतेचे ॥९७॥
दोघांनाहि आपुले ब्रीद कळे । तरीच सगळा अनर्थ टळे ।
एरव्ही पिंजऱ्यात जरी वेगळे । तरी गोंधळे वृत्ति त्यांची ॥९८॥
म्हणोनि सहशिक्षणहि नाही वाउगे । जरि नैतिक भाव राहती जागे ।
शिक्षणी जागृत ठेवणे सर्वांगे । काम नेत्या, वडिलांचे ॥९९॥
शिक्षणी सांभाळोनि तनु, मन । करावे मुलीबाळीस विद्वान ।
अंगी असावे शौर्य पूर्ण । ब्रीद आपुले रक्षाया ॥१००॥
जेव्हा पुरुष पावतो पतना । त्यास स्त्रीप्रकृति सहन होईना ।
तेव्हा महिलांत असावी संघटना । त्यांची सुधारणा करावया ॥१०१॥
जैसी मुलांची संघटित सेना । तैसी स्त्रियांची असावी संघटना ।
आपुल्या सुखदुःखाच्या भावना । प्रकटवाव्या सभा–संमेलनी ॥१०२॥



पुरुषांचे जैसे स्फूर्तिस्थान । तैसेचि असावे महिलांचे उन्नतिभुवन ।
त्यात सभा, प्रार्थना, कथाकीर्तन । उपक्रम पूर्ण महिलांचे ॥१०३॥
दूर सारोनि जातीय आदि भाव । जमवोनि महिलासमुदाय सर्व ।
तिळगुळ, हळदीकुंकू, शारदोत्सव । सहभोजनादि करावे ॥१०४॥
उत्सव साध्वी पतिव्रतांचे । जयंति–पुण्यतिथी पर्व तयांचे ।
वाचनालयादिक महिला विभागाचे । जेथे तेथे आवश्यक ॥१०५॥
स्त्रियांचे स्वतंत्र मेळे– समुदाय । त्यांच्या उन्नतीचा कला–गौरव ।
प्रतिकाराचीहि त्यांना जाणीव । अवश्य असावी ॥१०६॥
माझे म्हणणे श्रोतयाते । जे जे सुख असेल पुरुषांते ।
महिलांसीहि असावे अभिन्नपणे ते । स्वातंत्र्य सुखसाधन ॥१०७॥
सर्व सोयी पुरुषाकरिता । स्त्रियांसाठी सर्व व्यथा ।
हे कोण बोलते शास्त्र आता? । द्यावे हाता झुगारोनि ॥१०८॥
पुरुष उन्नतीस चढला । परि काहीच न कळे महिलेला ।
तरि तो गावचि एककल्ली झाला । नशिबी आला ऱ्हास, त्रास ॥१०९॥
म्हणोनि रथाची दोन्ही चाके । मजबूत करावी कातोनि सारखे ।
तरीच संसारगाडी सुखे । सुखावेल ग्रामजीवनाची ॥११०॥
आदर्श ऐसे मातापिता । जन्म देतील आदर्श सुता ।
ते वैकुंठ बनवितील भारता । तुकड्या म्हणे ॥१११॥
इतिश्री ग्रामगीता ग्रंथ । गुरु – शास्त्र – स्वानुभव – संमत ।
ग्रामोद्धार कथिला महिलोन्नतीत । विसावा अध्याय संपूर्ण ॥११२॥


॥ सद्गुरुनाथ महाराज की जय ॥

## अभंग

दळू, कांडू, खेळू । सर्व पाप, ताप जाळू ॥
सर्व जीवांमध्ये पाहू । एक आम्ही होऊनि राहू ॥
जनी म्हणे ब्रह्म होऊ । ऐसे सर्वांघटी पाहू ॥

**– श्रीसंत जनाबाई**

## ।। चित्र परिचय ।।



### अ. २१ – श्रीसंत एकनाथ महाराज

स्त्री पुरुष ही दोन चाकें । जरि परस्पर सहायके ।
तरीच संसार रथ चाले कौतुके । ग्राम होई आदर्श ।।३।।

वैवाहिक जीवनाचा आदर्श म्हणजे चारशे वर्षांपूर्वीचा संत एकनाथांचा संसार ! पूर्ववयात धर्मज्ञान संपादून, तपश्चर्या व देशभ्रमण करून गृहस्थ झालेले, हिशेबात पैची चूक न होऊ देणारे व प्रसंगी गुरुचे कपडे घालून युद्धात चमकणारे, तहानलेल्या गाढवास तीर्थजल पाजणारे व अस्पृश्याचे घरी भोजनही करणारे संत एकनाथ त्यांची पत्नी गिरिजाबाई देखील तितक्याच सहृदयतेने श्राद्धाचे अन्न अस्पृश्यांना जेवू घालीत होती व निष्ठेने सामाजिक आघात सोशीत होती.



● अध्याय एकविसावा ●

# वैवाहिक जीवन

।। श्रीगुरुदेवाय नमः ।।

ईश्वराच्या इच्छेचे पूरक । समाजाचे दोनचि घटक ।
पुरुष आणि महिला देख । सृष्टिचक्र चालविती ।।१।।
चालावा जगाचा प्रवाह । व्हावा निसर्गगुणांचा निर्वाह ।
यासाठीच योजिला विवाह । धर्मज्ञांनी तयांचा ।।२।।
स्त्री-पुरुष ही दोन चाके । जरी परस्पर सहायके ।
तरीच संसार-रथ चाले कौतुके । ग्राम होई आदर्श ।।३।।
परि याची हेळसांड झाली । विवाहाची रुढीच बनली ।
मग यातूनचि उदया आली । हजारो दुःखे समाजाची ।।४।।
पुरुषार्थासाठी वैवाहिक जीवन । विवाह समाजस्थैर्याचे साधन ।
परि वाढोनि अज्ञान, प्रलोभन । झाली धुळधाण समाजाची ।।५।।
कितीतरी मुली असती सुंदर । परि हुंड्यासाठी राहती कुवार ।
तैसाचि मुलांचा व्यवहार । जातीत भासे कित्येक ।।६।।
ऐसी वाईट पडली प्रथा । तेणे व्यभिचार वाढले सर्वथा ।
हे महापाप असे माथा । समाजाच्या ।।७।।
कुणाचे पिते लग्न करोनि देती । घराणे, पैसा, प्रतिष्ठा बघती ।
विवाहाआधी न पुसती । दोघांसहि ।।८।।
भिन्न स्वभावांचे प्राणी । जमवोनी आणावेत दुसऱ्यांनी ।
कैसी रुचेल जिंदगानी । दोघांसहि? ।।९।।
वडिलांचा मान राखावा । म्हणोनि कां संसार नागवावा? ।
ऐसा तरी हेतु कां धरावा । वरिष्ठांनी? ।।१०।।
विवाहाआधी परस्पराने । पाहावे दोघांनीहि निश्चयाने? ।
विचारस्वातंत्र्य दोघांसहि देणे । अगत्याचे? ।।११।।
वडिलांनी पाहावी एक खूण । लग्न करिती काय आंधळे होऊन ।
पश्चातापाचे कारण । न पडावे म्हणोनिया ।।१२।।

एरव्ही दोघांच्याही मते । लग्न जुळवूनि आणावे सु-मते ।
नांदोत दोघेही एकसुते । संसार सुखी करावया ॥१३॥
जुळता दोघांचेहि विचार । विकास पावेल कारभार ।
दोघांची उत्साहशक्ति अपार । कार्य करील सेवेचे ॥१४॥
उत्तम राहणे, उत्तम बोलणे । उत्तम सौंदर्य, सात्विक लेणे ।
घरामाजी शोभून उठती तेणे । देवता जणु समविचारे ॥१५॥
विचाराविण जे जे करणे । ते सर्वचि होते लाजिरवाणे ।
ऐसेचि मागील गाऱ्हाणे । ऐकतो आम्ही ॥१६॥
भोगासाठी लग्न केले । आंधळेपणी संसार चाले ।
वर्ष लोटताचि गोंधळले । दोन्ही प्राणी ॥१७॥
एक एकाशी बोलेना । संशय वाढले दोन्हीजणा ।
कशाचा संसार?, यमयातना । वाटे पतिपत्नीसि ॥१८॥
विषय-विकारे लग्न केले । पूर्वीच परस्परांसि नाही ओळखले ।
तेणे सर्वचि वाया गेले । जीवन दोघांचे ॥१९॥
केवळ भोगासाठी लग्न । हे तो दिसे विचित्रपण ।
काय होते पशु जमवोन । एके ठायी ? ॥२०॥
मानवांचे एक होणे । स्वर्गसुखहि त्यांना ठेंगणे ।
त्यांच्या संयोगे उत्कर्ष पावणे । लावण्यासि ॥२१॥
श्वानांचिया पशुत्वसंयोगे । जन्मती जीव कर्मभोगे ।
टाकिली जाती सर्व मार्गे । श्वान-पिली ॥२२॥
तैसे नोहे मानवांचे । त्यांचे राहणे जबाबदारीचे ।
एक संतानहि थोर कामाचे । दिगंतरी ॥२३॥
देशी पाहिजे सर्वचि धन । रानधन, लेणी आदि मानधन ।
द्रव्यधन, खाणी आणि गोधन । सर्व काही ॥२४॥
सर्व धनांमाजी सुपुत्रधन । वाढवी राष्ट्राचे गौरवस्थान ।
म्हणोनिच वधू-वरांनी शोधून । लग्न करावे विचारे ॥२५॥
नाहीतरि मरतुकडे पुत्र व्हावे । तेणे घराणे बुडोनि जावे ।
देशासहि कलंकित करावे । न होवो ऐसे ॥२६॥
उत्तम बीजासि उत्तम जमीन । तेणे वृक्ष वाढतो भेदूनि गगन ।
ऐसेचि असावे संतान । बलभीमासारखे ॥२७॥



ऐसे संतान घराणे शोभवी । एकवीस कुळांचे नाव जागवी ।
स्वकर्तव्याने चमकवी । देश आपुला ॥२८॥
परि पुत्रांचीहि असावी मर्यादा । देशी न वाढावी आपदा ।
शरीरसंरक्षणाची ही संपदा । गमावू नये संसारी ॥२९॥
निरोगी रक्त, उत्तम गुण । सुस्वभावी ऐसे संतान ।
हे नाही सर्वस्वी अवलंबून । जाति-कुळ-गोत्रावरि ॥३०॥
दोघे प्राणी उपवर असती । भिन्न जाती लग्न करू म्हणती ।
विचारे करिता, त्यासि संमति । अवश्य द्यावी ॥३१॥
गुण गुणाकडे धाव घेतो । आपण शास्त्रीपुराणीहि ऐकतो ।
मिश्र विवाहाने बिघाड होतो । म्हणणे व्यर्थ ॥३२॥
मिश्र विवाह ऐसा नसावा । इच्छा नसता बळी पाडावा ।
विचार करण्यास अवकाश द्यावा । प्रसन्न चित्ते ॥३३॥
विचारे 'जीवनाच्या संग्रामी । हाचि विवाह करू आम्ही' ।
म्हणती दोन्ही विवेकी प्रेमी । आड कोणी कां यावे ? ॥३४॥
मागे गुणविवाह बहुत झाले । श्रीकृष्णे, अर्जुनादिके केले ।
समाजी अनेक प्रयोग घडले । विवाहांचे भिन्न भिन्न ॥३५॥
गुणसाम्याचे मिश्र विवाह । वीरश्रीच्या कसोटीचे विवाह ।
राष्ट्रातील भेद मिटविण्याचे विवाह । नाना जमातींमधूनि ॥३६॥
ऐसे अनेक तात्त्विक विवाह । त्यांत काही राक्षसविवाह ।
बळजबरीने बांधले देह । अनेक हेतूंसाठी ॥३७॥
ऐशा गोष्टीस मात्र जपावे । बाळपणीहि लग्न नसावे ।
समजूतदारीने करूनि द्यावे । लग्नप्रसंग ॥३८॥
काही पित्यांची असते हौस । मुलीचे वय तीन वर्ष ।
अथवा असता तीन मास । करिती लग्न ॥३९॥
वयात येती वधु-वर । माहीत नसतो मानवी व्यवहार ।
बळी पडती रूढीसि पामर । दोन्ही प्राणी ॥४०॥
पुढे एक एकाशी न मिळे । सर्प-मुंगुसापरी सगळे ।
पंचायती-नोटिसांचे सोहळे । जीवन गारद यातचि ॥४१॥
काही मुली विधवा होती । बालवयीच पति वारती ।
पुढे त्यांची होते फजिती । लग्नावाचोनि ॥४२॥

रुढि सांगते लग्न न करावे । मन बावरे, कोणी आवरावे? ।
चोरूनि पापाचरणी व्हावे । तरि ते दुःखदायी ॥४३॥
ऐशा ज्या ज्या वाईट रीती । झुगारोनि द्याव्या हातोहाती ।
करावी पुन्हा नवीन निर्मिती । समाजनियमांची ॥४४॥
ज्या विधवेस वाटे लग्न करावे । तिने वडिलधाऱ्यांसि सांगावे ।
त्यांनी सहृदयपणे लग्न योजावे । जीवनधर्म म्हणोनिया ॥४५॥
ज्या विधवेची इच्छा नाही । तिला छळू नये कोणी कदाहि ।
ती सती, संन्यासिनी समजोनि देही । राखावी समाजाने ॥४६॥
ऐसेचि हे घडू द्यावे । मानवांच्या प्रकृति-स्वभावे ।
तरीच मानव म्हणविणे बरवे । शोभा देते ॥४७॥
काहींचे वडील लग्न करोनि देती । मनास वाटेल तो हुंडा घेती ।
जोड-विजोड काही न पाहाती । धनापायी ॥४८॥
वृध्द वा रोगी असोनि वर । वधू देती बालिका सुंदर ।
धनासाठी दुर्व्यवहार । परोपरीचे ॥४९॥
मुला-मुलींचा घेवोनि पैसा । जीवनात वाढविती निराशा ।
मोलाने का प्रेम-फासा । पडे गळी कोणाच्या ? ॥५०॥
बालक-बालिकेसि वाचा नसते । तोंड फोडोनि बोले ना ते ।
परि हे कसाब म्हणावेत पुरते । जे विजोड लग्न योजिती ॥५१॥
ऐशा असतील ज्या वेड्या रीती । त्या काढोनि टाकाव्या प्रवृत्ती ।
जीवनाचे प्रेम चित्ती । तेचि धन समजावे ॥५२॥
ज्याने मुला- मुलींचे पैसे घेतले । त्यासि समाजाने पाहिजे निषेधिले ।
तरीच हे दुराग्रह मोडले । जातील आता ॥५३॥
नाहीतरी हुंड्यापांड्यासाठी । जीवन होईल मसणवटी ।
अनेक मुले-मुली करिती शेवटी । आत्मघात ॥५४॥
कित्येक हात धरोनि जाती । समाजजीवनी कालविती माती ।
परि लोभ न सोडवे शहाणियांप्रति । पैशांचा अजूनि ॥५५॥
हे गावाने दुरुस्त नाही केले । तोवरि पापांचे डोंगर वाढले ।
सगळे गावचि भागीदार झाले । समजावे त्यांचे ॥५६॥
काही घरी मुली उपवर । मुलेहि लग्नासाठी तयार ।
तेथे आट्यासाट्याचा व्यवहार । करिती कोणी ॥५७॥



मुला-मुलींची नसता जोड । आपुलिया सोयीसाठी उघड ।
लाविती मानेवरि जोखड । मायबाप ॥५८॥
मग तेथे भांडाभांडी । मुलगी माहेरीच न धाडी ।
अथवा टाकोनि करिती नासाडी । जीवनाची तिच्या ॥५९॥
काही आपल्या मानाकरिता । मुलींच्या दैवी आणिती व्यथा ।
ऐशा वाढल्या वाईट प्रथा । कितीतरी गावी ॥६०॥
काही जातीत ठेविती पडदा । जणू कोंडवाड्याचाचि धंदा ।
त्याने लग्न झालियाहि आपदा । येते केव्हा ॥६१॥
मुलगी पडद्याने बघितली नव्हती । आता कळले तिरळी होती ।
काही म्हणती लग्नाप्रति । मागे घ्यावे काडीमोडीने ॥६२॥
पडद्याचिया प्रस्थामुळे । शहाणे तेहि होती खुळे ।
गर्दीत पति चुकता गोंधळे । पडे बापडी गुंडाहाती ॥६३॥
दुर्जन बुरख्याआड लपविती । ऐशा स्त्रिया नेल्या किती ।
अजूनहि नेत्र न उघडती । समाजाचे ॥६४॥
पडदापद्धती बहुपरी भोवे । थोरांपुढे कधी न यावे ।
पति-शुश्रूषाहि अंतरल्या या भावे । कितीतरी मुली ॥६५॥
ऐशा विचित्र काही प्रथा । मोडोनि टाकाव्या समाजी व्यथा ।
लावू नये दोष माथा । कोणा एकाच्याचि ॥६६॥
काही मायबाप पोरा चढविती । पुरुषे कैसेहि वागावे म्हणती ।
मुलीस गांजिती, मार देवविती । ऐसी वृत्ति आसुरी ॥६७॥
काही मायबाप मुलीचे कैवारी । 'हूँ' म्हणता जावोनि पडती द्वारी ।
ऐसे कु-शिक्षण नानापरी । दुःख संसारी वाढवी ॥६८॥
काही पति-पत्नीचे संघटन । परि आड येई थोरांचा मान ।
काडीमोड, विरोध अथवा भांडण । करी वैराण जीवन त्यांचे ॥६९॥
काही लपवालपवी करिती । मुली नांदायासि न धाडती ।
काही मुलींना ओढूनि नेती । तमाशा करिती जीवनाचा ॥७०॥
काही लग्नाआधी लपविती उणीव । त्याची पुढे होता जाणीव ।
जन्मभरि भोगावा लागे उपद्रव । सकळांसि मग ॥७१॥
काही बढाई दाविती खोटी । काही रुसती आंदणासाठी ।
सोय न पाहता करिती कष्टी । परस्परांसि सोयरे ॥७२॥

कोणास दागिन्यांची हाव । सद्‌गुणांचा न कळे भाव ।
त्यास फसवी नकली वैभव । जीवन गारद मुलींचे ॥७३॥
मुली-मुलांचा लग्नबाजार । शिक्षण, सौंदर्य, नोकरीवर ।
भाव न्यूनाधिक ठरविती साचार । जीवनमूल्ये न जाणता ॥७४॥
काही लग्नांचे दलाल । उधळीत जाती रंग-गुलाल ।
मुला-मुलींचे जीवन हलाल । करिती स्वार्थास्तव ॥७५॥
काही मुलींना खपवू पाहाती । ध्यानी न घेता नीति-अनीति ।
ऐसी लाचार केली स्थिती । नाना रूढ्यांनी ॥७६॥
ज्योतिषासि देऊन-घेऊन । मनासारिखे काढविती गुण ।
प्रसंगी नावहि सांगती बदलून । दंभ दारुण वाढला ॥७७॥
आकाशातील पाहती ग्रह । इकडे स्वभावी वेगळे दुराग्रह ।
जीवनात वाढे जयांनी द्रोह । ऐसे त्यांना न दिसती ॥७८॥
म्हणती वधू-वर सुलक्षण । जुळले त्यांचे छत्तीस-गुण ।
इकडे छत्तीसी अथवा खडाष्टक पूर्ण । करी जीवन बरबाद ॥७९॥
वधू-वरांचे उत्तम गुण । हेचि परस्परांचे महाभूषण ।
त्यावाचोनि विवाह केला वैभवपूर्ण । तरि तो सर्व अमंगल ॥८०॥
काही ठिकाणी विवाह करिती । वेड्यासारखा पैसा उधळती ।
उपयोग नाही ऐसी रीति । कासयास आचरावी ? ॥८१॥
लग्नाचे अपार सोहळे । विहीण - व्याही - मामे सगळे ।
वऱ्हाडांचे गोंधळ सावळे । यासि विवाह म्हणो नये ॥८२॥
अस्ताव्यस्त तारांबळ । उधळपट्टी आणि धावपळ ।
यासि म्हणावे कार्य अमंगळ । खर्च निष्फळ पैशांचा ॥८३॥
लग्नाकरिता कर्ज करावे । जन्मभरि व्याज भरीत जावे ।
लग्नासाठी कफल्लक व्हावे । कोण्या देवे सांगितले ? ॥८४॥
चार-पाच दिवस लग्न । लग्नात होती नाना विघ्न ।
मोठेपणाचे विडंबन । कासयासि करावे ? ॥८५॥
असोत अडी-अडचणी किती । साधिलीच पाहिजे तिथी ।
ऐसी कां ठेवावी प्रवृत्ति । रुढिबद्ध? ॥८६॥
प्रसन्न हवा, पाणी, ऋतू । हाचि विवाहाचा मुहूर्त ।
बाकीचे झंझट फालतू । समजतो आम्ही ॥८७॥



दिवस पाहावा सुंदर । हवा, पाणी सोयीस्कर ।
सर्वांस होईल सुखकर । म्हणोनिया ॥८८॥
खर्च नको भव्य मंडपाचा । देखावा असावा निसर्गाचा ।
अथवा सभामंडप मंदिराचा । योजावा या कार्यासि ॥८९॥
वेळ, पैसा आणि श्रम । वाचवावेत करोनि नेम ।
गुणांस द्यावे महत्त्व परम । जाति - धन - भ्रम सोडोनि ॥९०॥
सुंदर करावे सभास्थान । बैसवावे साजेलसे जन ।
वर-वधूंना समोर बसवून । सूचना द्यावी सूचके ॥९१॥
द्यावा वर-वधूंचा परिचय । प्रकट करावा सत्कार्य-निश्चय ।
मग साधावे कार्य मंगलमय । मंगलाष्टके म्हणोनिया ॥९२॥
मंगलाष्टकी विवाह-उद्देश । सज्जने करावा उचित उपदेश ।
येऊ न द्यावा नाटकी अंश । अपवित्र त्यात ॥९३॥
सभा असावी आदरपूर्ण । देऊ नये धुम्रपान ।
धर्मसंस्कार वाटावे लग्न । अग्निदेवते स्मरोनिया ॥९४॥
वडील जनांचे आशीष घ्यावे । सर्वांशी प्रेमादरे वागावे ।
गोड बोलोनि उरकवावे । लग्नप्रसंग ॥९५॥
वर-वधूंना ग्रामीण खादी । असो जुनी वा नवी साधी ।
ऐशा वस्त्रीच लग्नाक्षदी । पडाव्या शिरी उभयतांच्या ॥९६॥
कपडे असती ते घालावे । नसता धुवोनि स्वच्छ करावे ।
अहेरादि नको लग्नप्रसंगी यावे । सर्व जने आदरे ॥९७॥
लग्ननिमित्त भेटीच देणे । तरि उभयतांचा संसार सुरू व्हावा तेणे ।
अथवा गावाचे फिटावे उणे । ऐसी योजना करावी ॥९८॥
सारांश, लग्नाचा प्रसंग । विचाराने करावा यथासांग ।
समजोनि परिस्थिती, वेळप्रसंग । सर्व काही ॥९९॥
ऐसा हा मंगल प्रसंग । देशाचे भूषवी अंग ।
समाजजीवन करील अभंग । वाढेल कीर्ति गावाची ॥१००॥
विवाहाचा जो संस्कार । त्याचे महत्त्व सर्वांत थोर ।
त्या पायावरीच समाजमंदिर । म्हणोनि सुंदर करा यासि ॥१०१॥
यासाठीच वधू - वरासंबंधी बोललो । नवनिर्माण ओघाने पुढे चाललो ।
सांगोनि एकदा मुक्त झालो । सुख-दुःख समाजाचे ॥१०२॥

स्त्री-पुरुष ही दोन चाके । परस्पर पोषक होता निके ।
गाव नांदेल स्वर्गीय सुखे । तुकड्या म्हणे ।।१०३।।
इतिश्री ग्रामगीता ग्रंथ । गुरु - शास्त्र - स्वानुभव - संमत ।
विवाहसंस्कारे ग्रामोद्धार कथित । एकविसावा अध्याय संपूर्ण ।।१०४।।

।। सद्गुरुनाथ महाराज की जय ।।

## अभंग

स्त्री टाकोनि फकीर झाला । परि भिक्षा मागता जन्म गेला ।।
तैसी नोहे परमार्थ – रहाटी । शुद्ध मन किजे पोटी ।।
परद्रव्य, परनारी । यांचा विटाळ मने धरी ।।
सर्वाभूती नांदे एक देव । वाउगा का वाढावा अहंभाव ?
दृढ धरी सेवाभाव । एका जनार्दनी मागे ठाव ।।

**– श्रीसंत एकनाथ महाराज**



# ।। चित्र परिचय ।।



## अ. २२ – श्रीसंत कबीरदासजी

जन्मभरि सूत विणोन । प्रकट देखिला जनी जनार्दन ।
त्या भक्त–कबिराचे महिमान । गंगेतील पाषाण जाणती कैसे ? ।।८८।।

साडेपाचशे वर्षापूर्वी काशीच्या लहर तलावाजवळ एका मुसलमानास सापडलेले लेकरू. स्वामी रामानंदाचे शिष्यत्व पत्करून या निरक्षर पण महाज्ञानी पुरुषाने जातिधर्मातीत मानवधर्माचा प्रचार सुमारे सव्वाशे वर्ष देशी व विदेशीहि प्रभावी भजनांद्वारे केला. हिंदु–मुसलमांच्या कर्मकांडी रुढ्या झाडून सर्वांना सत्यमार्ग दाखविला. सूतकताई व विणकामही ते करीत. काशीत मेल्याने मुक्ति व मगहरस्थानी नर्कगती मिळते, या पंड्यांच्या रूढ कल्पनेला उडवून लावण्यासाठी ते शेवटी काशीतून मुद्दाम मगहर येथे जाऊन समाधिस्थ झाले. ''कहे कबीर सुनो मेरे संतो, भरम पडो मत कोई । जस काशी तस मगहर ऊसर, हृदय राम सत होई ।।'' हेच सद्गतीचे रहस्य !

● अध्याय बाविसावा ●

# अंत्य-संस्कार

॥ श्रीगुरुदेवाय नमः ॥

विवाहादि संस्कार आवश्यक । परि खर्च न व्हावा अधिक ।
त्यांचे स्वरूप जाणोनि तात्त्विक । आचरावे सर्वदा ॥१॥
ओटीफळे, मौजीबंधन । जावळे उतरणे तीर्थी जाऊन ।
वास्तु, बारसे, वाढदिवस जाण । अवडंबर नको तेथे ॥२॥
तैसेचि मृत्युसंस्काराचे । स्तोम नसावे अंत्यविधीचे ।
जेणे मृताचिया नावे सजीवांचे । दुःखी होय जीवन ॥३॥
मृत्युसंस्काराचा ऐका खुलासा । लोक मृत्युसि समजती भलतिसा ।
मी म्हणतो मृत्युजैसा । उत्तम नाही कोणीहि ॥४॥
जैसी नदी सागरासि मिळे । सोडोनि भेदभाव कष्टबळे ।
तिचे कार्यचि होते सगळे । मिळण्यासाठी सागरी ॥५॥
वाहत राही आपुल्या रंगे । लोक शांत होती सहज संगे ।
तिच्या पाण्यासि घेवोनि निजांगे । तृप्ती पावती जीवनी ॥६॥
परि तिजसि महत्त्व सागराचे । तैसेचि आहे मानवाचे ।
मोहपाश तुटता आसक्तीचे । धाव घेई निजरूपी ॥७॥
परि कार्याची जी वासना राहते । तीच जीवासी साथ देते ।
तिचेचि आविष्करण पुन्हा होते । पुढच्या जन्मी ॥८॥
शरीर मात्र नष्ट झाले । परि संस्कार वासनेअंगी भरले ।
पुन्हा जन्म घेता प्रगटले । ऐसे होते ॥९॥
ज्याने याच जन्मी मोह मिटविले । उत्तम संस्कार प्राप्त केले ।
त्याचे पारणेचि फिटले । जन्ममरणाचे ॥१०॥
परि ऐसे क्वचितचि होती । अढळ परमधाम पावती ।
येर ते प्राणी येती-जाती । आसक्तियोगे ॥११॥
आसक्तीने इंद्रियी बांधला । मना येई तसा करू लागला ।
तो जनलोकांसहि आवडला । स्वार्थ त्यांनाहि म्हणोनि ॥१२॥



जन्मला, वाढला, मोठा झाला । अवस्था अनेक त्या देहाला ।
षड्ऋतूंनी फळाफुला आला । जीर्ण झाला वृक्ष जैसा ॥१३॥
त्याची विकृति शिगेस लागली । शरीरगात्रे विस्कळूनि गेली ।
मग वाट पाहे आपुली । मूळच्या घराची ॥१४॥
त्यास मोहपाशे बांधू पाहाती । औषधे वाटेल तैसी देती ।
'वाचवा वाचवा' कळवळोनि म्हणती । कामी येईल म्हणोनि ॥१५॥
मरणोन्मुखासि जीवन द्यावे । पुनरपि उत्तम बनवावे ।
हे मानवाचे कर्तव्यहि बरवे । समजो आम्ही ॥१६॥
परि प्रयत्न करोनि नाही जगला । शेवटी शरीर सोडोनि गेला ।
समजावा देवाच्या स्वरूपी मिळाला । प्राणी आपुल्या ॥१७॥
मग ईश्वरास करावी प्रार्थना । त्यास शांति लाभो देवसदना ।
आमुच्या सुख-दुःखाच्या भावना । न बाधोत तयां ॥१८॥
येथे रडण्याचे नाही काम । आपणासहि तेच धाम ।
पाहावे लागेल परम । झाल्या उपशम देहाचा ॥१९॥
म्हणूनि मृत्युनंतर रोदन । हे आहे अज्ञानाचे प्रदर्शन ।
कासया दावावे सर्व समजोन । उदास होवोनि मानसी? ॥२०॥
हे ज्याचे त्यासचि प्राप्त होते । मग रडावे कासयासि लागते? ।
काही करोनि तरी दाखवावे ते । कीर्तीसाठी ॥२१॥
आपण उरले ते कर्तव्य करावे । तेणे त्याचे नाव भूषवावे ।
आपल्या कुळात गौरव पावोनि जावे । तेणे भूषण वडिलांसि ॥२२॥
असो ! ऐसा प्राणी निवर्तला । सर्वां मिळोनि न्यावे त्याला ।
पाहो नये जात-परजात भला । कोण होता? ॥२३॥
सन्मान द्यावा जाणाऱ्याप्रति । अभद्र ऐसी नको अर्थी ।
गंभीरपणे जावे सांगाती । आत्मीयतेने ॥२४॥
सर्वांनी प्रसंग नीट करावा । हातभार लावोनि द्यावा ।
आपुलाहि संस्कार आठवावा । उत्तम होईल म्हणोनि ॥२५॥
मृत्यूहि सुमंगल समजावा । स्मशानयात्रेस सहयोग द्यावा ।
दिंडी-घोषे मार्ग सुधारावा । जाणाराचा ॥२६॥
अभद्र, विद्रूप, किळसवाणी । न ठेवावी रीत कुणी ।
श्रद्धांजलीच्या भाषणी । भूषवावे प्रसंगी ॥२७॥

स्मशानी असावी सुव्यवस्था । पाऊस काळासाठीहि तत्त्वता ।
संस्कार मंडप सर्वांकरिता । पवित्रता वातावरणी ॥२८॥
मृत शरीराचे करोनि दहन । पवित्र करावे वातावरण ।
गावी लावोनि ठेवावे सामान । योग्य ठायी ॥२९॥
मृत शरीरास पीतांबर । घरी नसल्यास विका घर ।
दु:ख भोगा जन्मभर । ऐसे कोणी न करावे ॥३०॥
असेल तैसेचि वागावे । जुनेहि वस्त्र स्वच्छ करावे ।
खुशाल अंगी बांधोनि न्यावे । मृताचिया गरिबांनी ॥३१॥
नवेचि वस्त्र पाहिजे आणिले । ऐसे शास्त्राने जरी सांगितले ।
तरी आमुच्या घरचे कैसे चाले । नाही ठाऊके शास्त्रासि ॥३२॥
तुपावाचोनि नको भोजन । हे शास्त्रवचन पाळतो कोण? ।
मग मृतासीच तूप चोळाया जाण । शास्त्रवचन कां सांगावे? ॥३३॥
मृत्यु झाला एकाचिया घरी । खावयास नाही एक दिवस ज्वारी ।
सुतक धरोनि कैसियापरी । बसावे तेणे? ॥३४॥
एक दिवस खाली गेला । तरी उपास पडती गरिबाला ।
त्याने दहा दिवस उपास भला । कैसा करावा सांगा तुम्ही ॥३५॥
म्हणोनि प्रेत नेवोनि कार्य उरकले । घरी येवोनि स्नान केले ।
मृत्युस्थळ पवित्र करोनि ठेविले । आटोपले मृत्युसंस्कार ॥३६॥
मग त्याने खुशाल कामासि जावे । मोलमजुरी करीत राहावे ।
उत्तम विचारांचे करावे । मनन, ध्यान एकांती ॥३७॥
सुतक धरण्याची प्रथा लाविली । ही तर शोकवृत्तीच दाविली ।
आड येतील ती काढून टाकिली । पाहिजेत ऐसी बंधने ॥३८॥
याचा मूळ उद्देश ऐसा होता । मृत-देहाचा संसर्ग घडता ।
रोगजंतु चढती शुश्रुषा करिता । म्हणोनि दूर राहावे ॥३९॥
परि बाप शंभर कोसांवरि मेला । मुलगा सुतक पाळी मुंबईला ।
हा विपर्यास पाहिजे दूर केला । मूळ चित्ती धरोनि ॥४०॥
गोमूत्र शिंपडणे, निंब खाणे । प्रेतासि अग्निसंस्कार देणे ।
सुतक, अस्पर्शता पाळणे । आरोग्यासाठी सर्व हे ॥४१॥
म्हणोनि शुद्ध जलाने स्नान करावे । शुद्ध कपडे परिधान करावे ।
असेल ते वस्त्र, पात्र धुवावे । रोगियाचे ॥४२॥



हे करणे आहे आवश्यक । यासीच बोलती सुतक ।
परि दहा दिवस करावा शोक । हे तो मना पटेना ॥४३॥
शोकवार्ता सकळांसि कळावी । म्हणोनि एकदा पत्रे टाकावी ।
यापरि सुधारणा करावी । समाजाची ॥४४॥
विचारांची दृढता व्हावी । म्हणोनि सद्ग्रंथांची कास धरावी ।
परि सहा मासवरी रडभूक करावी । पाहुण्यासवे कासया? ॥४५॥
विवेके सावरोनि भावना । करावी तेराव्या दिवशी प्रार्थना ।
सर्व लोकांसह जाणा । भजनानंद चाखावा ॥४६॥
सांगावी स्मृति म्हणोनि कहाणी । असेल तरि दान देवोनी ।
सेवा करावी त्या निमित्तानी । नसल्यास मनी खेद नको ॥४७॥
मोकळेपणी नमन करावे । 'मी उत्तम वागेन' संकल्पावे ।
सेवेचे कार्य चालवावे । गतात्म्याचिया प्रीत्यर्थ ॥४८॥
परि पाहावी आपुली परिस्थिती । जित्यांची होऊ नये फजिती ।
कोणी दान-दक्षिणेत दिवाळे काढती । ऐसे नको ॥४९॥
कोणी रूढिबंधनात पडती । मृतासाठी कर्ज काढती ।
त्याचे नावे पंगती उठविती । जातभाई जमवोनि ॥५०॥
बुवा, पंच अथवा ब्राह्मण । यासि धन देती भूर्दंड म्हणोन ।
कोणी घेती गोड जेवण । कमर मोडे गरिबाची ॥५१॥
कोणी घरी धनाढ्य असती । परि पुत्राअभावी नर्काची भीती ।
म्हणोनि मरतेवेळी दत्तक घेती । होय फजिती राहिल्यांची ॥५२॥
दत्तक करी उधळेपणा । किंवा पूर येई भांडणा ।
अपव्ययाची वाट लागे धना । तेणे नर्क चुके कैसा? ॥५३॥
जीव स्वकर्माची फळे भोगतो । त्यासि कोण कैसा तारितो? ।
सत्कीर्तीनेच स्वर्ग मिळतो । पुत्रपौत्रे कदा नोहे ॥५४॥
स्वर्ग अथवा मुक्ति काही । सद्गति वेगळी अन्य नाही ।
मन:प्रवृत्ति सत्याकडे जाई । हीच उद्धारगति जीवाची ॥५५॥
यासाठी धन असल्या मालकीचे । करावे कार्य गावसोयीचे ।
विहीर, शाळा, छात्रालयादी कोणचे । सत्कार्य भावे ॥५६॥
अथवा बांधवावा एखादा मार्ग । जेणे जनतेचे चुकती कष्टभोग ।
आसक्ति सोडण्यानेच स्वर्ग । लाभेल त्यासि ॥५७॥

किंवा त्याचे जे नातलग । त्यांनी सत्कार्याचा आणावा योग ।
उत्तम कार्यी करावा उपयोग । धनाचा त्याच्या ॥५८॥
तयायोगे जी होईल कीर्ति । तिलाच सज्जन स्वर्ग म्हणती ।
लोक हृदये गुण वाखाणती । याविण स्वर्ग असेना ॥५९॥
ज्याची पसरेल अपकीर्ति । त्यासि कैसी मिळेल मुक्ति? ।
लोक मृत्यूवरीहि वाखाणती । ऐसे व्हावे जीवन ॥६०॥
याचसाठी उत्तम शिकावे । उत्तम राहावे, वागावे ।
सर्वांस उत्तम करोनि सोडावे । कीर्तीसाठी ॥६१॥
कीर्ति तोचि स्वर्ग खरा । अपकीर्ति नरकाचा पसारा ।
याच जगी यांचा व्याप सारा । पाहती प्राणी ॥६२॥
एरव्ही स्वर्गस्थळीहि गेला । तरी कुकर्मे, दुःखचि देवेंद्राला ।
नव्याण्णव यज्ञे करोनि झाला । सर्प नहुष अहंकारे ॥६३॥
म्हणोनि कार्यातचि स्वर्ग-नर्क । सकाम ग्रंथाचे फोल कौतुक ।
मिथ्या कल्पनात भुलले लोक । स्वार्थियांच्या ॥६४॥
म्हणती कावळ्याने पिंड नेला । तरीच तो स्वर्गाला गेला ।
नाहीतरि आत्मा अटकला । त्याचा कोठे ॥६५॥
हे म्हणणे कसेसेचि वाटते । पिंडाचे नाही महत्त्व येथे ।
महत्त्वाचे असे काय केले ते । जन्मा येवोनि मानवाच्या ॥६६॥
मेल्यावरि दहा दिवस भ्रमतो । जीव पिंड देता स्वर्गी जातो ।
नाहीतरि तो नर्की पडतो । ऐसे म्हणणे व्यर्थ असे ॥६७॥
त्याने केले असेल उत्तम कर्म । तरीच पावेल उत्तम धाम ।
नाहीतरि पुन्हा अधम । योनीत जाणे स्वाभाविक ॥६८॥
प्राणी आपुल्याच कर्म-स्वभावे । भोगी उत्तम-अधम फळ बरवे ।
हे पिंडदानाने बदलोनि जावे । ऐसे नाही ॥६९॥
ज्याने सुकृतचि नाही केले । त्याचे कितीहि पिंड उचलले ।
म्हणोनि काय उन्नत झाले । जीवन त्याचे ? ॥७०॥
भिक्षुकाघरी दिली गाय । तिचे शेपूट धरोनि काय ।
वैतरणी नदी तरोनि जाय । गेलेला जीव ? ॥७१॥
हा तो आहे कर्मठ सोहळा । सग्यासोयऱ्यांचा विरंगुळा ।
पुत्रपौत्रांचा पुरवावया लळा । दिला निर्वाळा समाधाना ॥७२॥



टीका न करणे मृत्युग्रंथाची । तीहि असे साधना भावना तृप्तीची ।
परि यातचि सार्थकता जीवाची । ऐसे आम्ही मानू ना ॥७३॥
मृत्यु पावे त्याचे नाव राहावे । म्हणोनि समाजसेवेस काही द्यावे ।
त्याच्या सद्गुणाचे गोडवे गावे । आपणहि तैसे व्हावया ॥७४॥
खरा पिंड आपणचि उचलावा । कर्तव्य करोनि जीव भूषवावा ।
त्यानेच पावेल कीर्ति जीवा । उज्ज्वल साची ॥७५॥
नाहीतरि मेला की रडावे । जिवंतपणी लक्ष न द्यावे ।
ऐसे ढोंग कासयासि करावे । समाजाने? ॥७६॥
जिवंत असता रोटी ना दे । मेलियावरि वाजवी वाद्ये ।
कावळयासि पिंड, इतरां दक्षणा दे । म्हणोनि साधे काय त्याने? ॥७७॥
श्राध्दासाठी धन उधळावे । लोकलाजेस्तव मरावे ।
ऐसे कासया करावे । मूर्खपणे? ॥७८॥
गेला जीव न राहे थांबून । वर्षमासाअंती घ्यावया भोजन ।
आपुले घेवोनि पाप, पुण्य । फळ भोगाया पुन्हा जन्मे ॥७९॥
जीव पुन्हा जीवनी यावा । काही सत्संगतीस लागावा ।
मागील केलेला दोष चुकावा । म्हणोनि करावा सुसंकल्प ॥८०॥
किंवा त्याचे गुणवैभव । श्रद्धने आठवावे सर्व ।
हेचि श्राद्ध असे अपूर्व । श्रध्दांजलीरूप ॥८१॥
त्याची कीर्ति राहावी लोकी । म्हणोनि करावी दान, पुण्ये निकी ।
आपुल्याच गावी कौतुकी । स्मरण राहील म्हणोनि ॥८२॥
जो कोणी ज्या रोगे मेला । तैसा होऊ नये इतराला ।
म्हणोनि गावी औषधालयाला । मदत द्यावी त्यानिमित्ते ॥८३॥
परि हे जनासि न कळे धर्मगुज । जाती तीर्थी करोनि कर्ज ।
त्याने फावते व्यापारा सहज । तीर्थीयांच्या ॥८४॥
काही सज्जन तीर्थासी जाती । अस्थि-राख भरोनि नेती ।
म्हणे गंगोदके नाहीशी होती । पापे त्यांची ॥८५॥
'काश्यां तु मरणान्मुक्ति' । ऐसी लोकी वाढली भ्रांति ।
गंगाजळी किडेहि मरती । तरि ते काय मुक्त झाले ? ॥८६॥
काशीवासी भक्त कबीर । समाधीसि निवडती गाव मगहर ।
ज्यास लोक म्हणती नर्कद्वार । तीच उद्धारभूमी झाली ॥८७॥

जन्मभरि सूत विणोन । प्रकट देखिला जनी जनार्दन ।
त्या भक्त-कबिराचे महिमान । गंगेतील पाषाण जाणती कैसे? ॥८८॥
जन्मभरि दोषकृत्ये केली । त्यावेळी नाही गंगेत ठरविली ।
आता हाडे टाकोनि झाली । सद्गति म्हणे जीवाची ॥८९॥
हे सांगणारे आणि करणारे । यांना पोटापाण्याचे भरले वारे ।
म्हणोनि मेल्यावरि करिती सारे । जिवंतपणी न सांगती ॥९०॥
अहो ! ज्यात मनचि नसते । ते करोनीहि वाया जाते ।
मग देह, मन दोन्ही नाहीत जेथे । तेथे काय घडवावे ? ॥९१॥
परि पंडे, पुजारी सांगती गौरवे । तुमच्या वडिला स्वर्गी पाठवावे ।
तरि बोला दक्षणा काय द्याल भावे । आम्हांलागी ? ॥९२॥
बिचारा भोळाभाळा शेतकरी । मजूर अथवा भाविक व्यवहारी ।
म्हणे कर्ज करोनि देतो पुरी । दक्षणा तुम्हा ॥९३॥
परि आमचे वाडवडील । स्वर्गाला कधी पाठवाल? ।
म्हणूनि रडतो टेकवूनि भाल । पंड्यापुढे ॥९४॥
ऐशा अंधश्रद्धेसि वाढवोनि । धूर्त घेती स्वार्थ साधूनि ।
हे महापाप असे जनी । निकष्टिकांचे ॥९५॥
वास्तविक ऐसी वेळ आली । त्यास पाहिजे संधी साधली ।
सांगावी पंड्या, भिक्षुकांनी भली । युक्ति त्यासी ॥९६॥
''तुझे पितर स्वर्गात जावे । ऐसे घेतले तुझ्या जीवे ।
तरि त्यास संकल्प लागती करावे । गंगेमाजी ॥९७॥
मी पितर स्वर्गी जाण्यासाठी । संकल्प करितो जीवे-पोटी ।
दारू, गांजा, भांग आदि ओठी । नाही लावणार जन्मभरि ॥९८॥
नाही करणार दुर्व्यवहार । नाही फसविणार दीन, पामर ।
देईन सर्वांसि सहकार । सत्सेवेसाठी'' ॥९९॥
ऐसे जरी पंड्यांनी करविले । तरि त्यांचेहि उदर भरले ।
आणि लोकांचेहि कल्याण झाले । ऐसे होय ॥१००॥
परि पंड्याचि व्यसनी, दुराचारी । फुकट लुटाया खटपट करी ।
तरि तो कैसेनि उद्धरी । समाजासि ? ॥१०१॥
म्हणोनि आंधळा कर्मठपणा । हा वाढवूच न द्यावा कोणा ।
गावगंगा म्हणोनि जाणा । तिलाच सर्व अर्पावे ॥१०२॥



गावचा तलाव अथवा नदी । सुंदर पाहावी विहीर आदि ।
स्नान करोनि साधावी शद्धि । प्रभूला आठव द्यावा त्याचा ॥१०३॥
त्याचे निमित्ताने करावे सत्कार्य । कासया बघावे तीर्थ बाह्य? ।
देव सर्वांठायीच आहे । सदासर्वकाळ ॥१०४॥
म्हणोनि हे साधन बदलावे । गावीच सर्व काही करावे ।
जे जे करणे असेल सद्भावे । वळण द्यावे हे सर्वा ॥१०५॥
कोणी प्रेताची समाधी करिती । उगीच जागा गुंतवोनि धरिती ।
ऐसे करिता सारीच क्षिती । गुंतूनि जाईल त्यायोगे ॥१०६॥
मेला त्याची एक समाधि । जन्मला त्याच्या घरांची गर्दी ।
मग उरेल काय भूमि कधी । जगण्यासाठी इतरांना ? ॥१०७॥
जिवंत मानवा नाही घर । कष्टाळूंना नाही वावर ।
तेथे समाधीचे अवडंबर । मृतासाठी कासयासी ? ॥१०८॥
म्हणोनि सरळचि ऐसे करावे । मृतदेहाचे लोभी न व्हावे ।
पंचतत्त्वाशी त्यास मिळवावे । अग्नि-संस्कार देवोनि ॥१०९॥
स्मरण म्हणोनि घरी वा गावी । योग्यशी तसबीर लावावी ।
वेळोवळी आठवण करावी । सद्गुणी पुरुष म्हणोनि ॥११०॥
कुणाचीहि समाधि करोनि ठेवणे । ही तव आसक्तीची लक्षणे ।
समाधि करोनि काय होणे-जाणे । सांगा मज ॥१११॥
समाधि करोनि दर्शन होते । तेचि चित्र पाहोनि मनात येते ।
मनात येण्याचेचि महत्त्व येथे । सर्वांत मुख्य ॥११२॥
वाटल्यास उत्तम स्थान करावे । ज्यात लोकशिक्षण चालेल बरवे ।
स्मरणार्थ म्हणोनि अर्पोनि द्यावे । गावलोकांसि ॥११३॥
ऐसी आहे सहज स्थिति । त्यासि कासया करावी विकृती? ।
जेणे समाज राहे सुस्थिती । तीच महती वाढवावी ॥११४॥
मानव असो वा पशु-पक्षी । न कराव्या त्यांच्या समाधि साक्षी ।
जिवंत समाज ठेवोनि लक्षी । करावे कार्य सुस्थितीचे ॥११५॥
त्यादृष्टिनेचि भिन्न संस्कार । भिन्न वेळांचे महत्त्व थोर ।
लक्षुनि करावे सर्वांनी सुंदर । साजे तैसे ग्रामराज्या ॥११६॥

मृत्यु असो वा जन्मादि उत्सव । यांचा नुसता नको गौरव ।
गावाचे वाढवावे वैभव । बचत करोनि, तुकड्या म्हणे ॥११७॥
इतिश्री ग्रामगीता ग्रंथ । गुरु – शास्त्र – स्वानुभव – संमत ।
कथिला अंत्यसंस्कार उचित । बाविसावा अध्याय संपूर्ण ॥११८॥

॥ सद्‌गुरुनाथ महाराज की जय ॥



**पाप पून दोउ जनमसंगाती और न चले कोई ॥**

पाप, पुण्य दोघेच जन्माचे साथी आहेत. शेवटी त्याचे शिवाय काहीही बरोबर येणार नाही.


**वहाँ न दोजख, भिस्त मुकामा ।**
**यहाँ ही राम, यही रहमाना ॥**

तिकडे कुठेही नर्क किंवा स्वर्गलोक नाही. इथे, याच लोकी राम आहे, देवलोक आहे.

**– श्रीसंत कबीर महाराज**



# ॥ चित्र परिचय ॥



## अ. २३ – श्री. लोकमान्य टिळक

पूर्वी घरोघरी गणेशोत्सव । नाना रूढ्यांचे उपद्रव ।
लोकमान्यांनी आणिले महत्त्व । राष्ट्रीय रूपे तयासि ॥८९॥

स्वातंत्र्याच्या चळवळीची व राष्ट्रीय शिक्षणाची प्राणज्योति, स्वराज्याच्या जन्मसिद्ध हक्काची सजीव सिंहगर्जना, अष्टपैलू बुद्धिशाली संशोधक, तेल्यातांबोळ्यांचेहि पुढारी व तुरुंगात 'गीतारहस्य' लिहिणारे महाज्ञानी. अशा या सत्पुरुषाने रूढ गणेशोत्सवाला राष्ट्रीय रूप दिले, शिवाजी–उत्सव प्रभावीपणे सुरू केला आणि सर्वच उत्सवांना राष्ट्राचे ज्ञानझरे व स्फूर्तिकेंद्रे बनविण्याची दृष्टी दिली.

● अध्याय तेविसावा ●

# सणोत्सव

॥ श्रीगुरुदेवाय नमः ॥

श्रोतियांनी प्रश्न केला । आपण विवाह आणि मृत्युसंस्कार कथिला ।
तो आमुच्याहि मनी वाटला । उत्तम ऐसा ॥१॥
परि जन्मादि उत्सव बरवे । आनंद लाभे सणोत्सवे ।
तेणे ग्रामजीवन चेतना पावे । विरंगुळा हाचि सर्वांसि ॥२॥
तयासि आपण गौण ठरविले । याचे कारण पाहिजे बोलिले ।
तरि आता उत्तर ऐकले । पाहिजे श्रोती ॥३॥
आजचे करू जाता सणवार । दिवस न पुरती वर्षभर ।
त्यात जयंत्या-पुण्यतिथ्या येती फार । वाढदिवस निराळे ॥४॥
हे सर्वचि पाहिजे केले । तरि कामधंदे सर्व गेले ।
एवढेच करोनि सर्व भागले । होईल कैसे ? ॥५॥
म्हणोनि त्यात सान, थोर निवडावे । तारतम्याने करीत जावे ।
प्रसंगमान पाहोनि वर्तावे । सर्व काळ ॥६॥
जे जे करावे ते समजोन । सांगता यावे त्याचे कारण ।
उगीच लाडू-पेढे खाया जयंतिदिन । पाळू नये ॥७॥
पूर्वजांनी जो हेतू योजिला । तो पाहिजे समजोनि घेतला ।
त्याचि उद्देशाप्रमाणे झाला । पाहिजे सणवार ॥८॥
भारतवर्षाची चालीरीति । अत्यंत योजनाबद्ध होती ।
त्याने सहज चाले सुस्थिति । समाजाची ॥९॥
तेचि पुन्हा उजळावे । म्हणोनि बोलिलो सहजभावे ।
तत्त्वता उत्सवासि गौणत्व द्यावे । ऐसे नाही ॥१०॥
उत्सवप्रिय मानवाचा स्वभाव । सणवार, मुहूर्ताचा त्यासि गौरव ।
विशेष कार्यासाठी धाव । नेहमी त्याची ॥११॥
विशेष काही कार्य व्हावे । ऐसे घेतले त्याच्या जीवे ।
न घे आढेवेढे, मनोभावे । खर्च करी मनमाने ॥१२॥



ऐसे उत्सवाचे नाव घेवोनि । धन व्यर्थ उधळू नये कोणी ।
ते लागावे सत्कारणी । बोलिलो म्हणोनि बचत करा ॥१३॥
नाहीतरि घरी दिवाळी केली । दिवाळे निघावयाची सोय झाली ।
जनता हसेल गावातली । 'हौसी नटराज' म्हणोनि ॥१४॥
तैसी होऊ न द्यावी फजिती । बसावे तरि सर्वांचे पंगती ।
परि होऊ न द्यावी जीवनाची माती । कधीहि आपुल्या ॥१५॥
एके दिवशी सण केला । ते भोगणे आले दुसऱ्या दिवसाला ।
ऐसा कोणीच नाही सांगितला । गृहस्थ-धर्म ॥१६॥
पुढेहि आहेत सणवार । समजोनि करावा विचार ।
प्रसंग येती पुढे थोर । त्यासहि देणे सहकार्य ॥१७॥
काही प्रसंगमानासाठी । पैसा ठेविला पाहिजे गाठी ।
सण येताचि उठाउठी । खर्चू नये सर्व शक्ति ॥१८॥
कोणीहि करिता सणोत्सव । पाहावी आपुली आधी उणीव ।
मग पुढे टाकावा पाय रेखीव । हर्षासाठी ॥१९॥
चारजणांसि मिळवावे । आनंदी आनंद करीत राहावे ।
त्यातूनि नेहमीचे धडे घ्यावे । वागण्यासाठी ॥२०॥
वाढविता यावे जीवनज्ञान । कधीहि न वाढावेत दुर्गुण ।
मग करावे निर्भय मन । प्रसंगासाठी ॥२१॥
काही सण घरी करावे । काही सार्वजनिक जागी ठरवावे ।
सर्वांमिळोनि उचलीत जावे । ओझे काही ॥२२॥
उत्सवाच्या निमित्ताने । सुंदर करावी सहभोजने ।
बंधुप्रेम वाढेल जेणे । आचरावे तैसेचि ॥२३॥
घरोघरच्या शिदोऱ्या आणून । अथवा स्वयंपाक सर्वांमिळून ।
तेणे प्रेमानंद ये उचंबळून । एकत्र खाता ॥२४॥
असला नसला प्रसादचि द्यावा । प्रसंग गोड करोनि घ्यावा ।
परि खाण्यातचि वेळ न जावा । समाजाचा ॥२५॥
सुंदर करावे कथा, कीर्तन । दिंड्या, खेळ, मनोरंजन ।
परि लागावी उत्तम चालचलन । समाजासि ॥२६॥
खरा उत्सव रोजचे कर्म । विचारे सांभाळावा धर्म ।
परि नैमित्तिक सणांचेही वर्म । जाणोनिया आचरावे ॥२७॥

दत्तजयंति, रामनवमी । हनुमानजयंति, गोकुळाष्टमी ।
शिवरात्रि, आषाढी, ऋषिपंचमी । विविध कार्यांनी पाळावी ॥२८॥
वटसावित्री, शारदोत्सव । रक्षाबंधन, संक्रांतिपर्व ।
गौरीपूजनादि महिलांचे उत्सव । सामुदायिक करावे ॥२९॥
उद्योगदिन, स्नेहसंमेलन । बलोत्कर्ष आणि प्रार्थनादिन ।
गीताजयंती, बुद्धिविकासदिन । पंचमहोत्सव आवश्यक ॥३०॥
सर्व जाती-जमाती मिळून । हळदकुंकू, तिळगुळ, सुवर्णदान ।
चढाओढी, ग्रामशुद्धी, रामधून । भाषणे आदि करावी ॥३१॥
तैसाचि आला पोळा सण । हाहि आहे महत्त्वपूर्ण ।
यात ठेवावे बैलांचे प्रदर्शन । शेती-सामानासहित ॥३२॥
उत्तम रांगेत बैल ठेवावा । साजेल तैसा अंगी भूषवावा ।
त्यात ज्याची सफल सेवा । त्याचा गौरव त्या दिवशी ॥३३॥
कोणी जोडी उत्तम ठेवली । कोण बैलास खुराक घाली ।
इनामे द्यावी त्यांस भली । सर्व गावकऱ्यांनी ॥३४॥
कोणाचे उत्तम शेतीसाधन । कोणी ठेवले नोकर प्रसन्न ।
त्याचे वाढवावे उच्च स्थान । पोळ्याचिया शुभदिनी ॥३५॥
घरोघरी जोडी फिरवावी । मिरवीत मिरवीत घरी न्यावी ।
इनामपोळी माणसांना द्यावी । प्रसन्न ठेवावी वृत्ति त्यांची ॥३६॥
काही पाडवा जुगार खेळती । ही आहे समाजाची अधोगती ।
काही लोक जिंकोनि जाती । काही हरती वस्त्रेहि ॥३७॥
ऐसी रीति बंद करावी । हवी तर दंगलेहि भरवावी ।
कामगारांसि इनामे द्यावी । काटक, चपल म्हणोनिया ॥३८॥
ऐसाचि आहे दशहरा दिन । विजयादशमी उत्साहपूर्ण ।
त्याने वाढे स्नेहसंघटन । उत्तम गावी ॥३९॥
सगळ्यांनी मिळोनि मिरवित जावे । थोरपुरुषांचे गोडवे गावे ।
पूर्वऋषीचे कौतुक करावे । गौरवावे राष्ट्रासि ॥४०॥
ते दिनी उत्तम संकल्प करावा । 'आपुले ते सर्वांचे' हा बोध घ्यावा ।
मतभेद समूळचि विसरावा । सोने देवानि एकमेकां ॥४१॥
पुढे वितंडणेचि नसावे । सकळांनी सकळांसि वंदावे ।
परस्परांचे आशीष घ्यावे । बंधु-बंधु म्हणोनि ॥४२॥



मिरवीत मिरवीत यावे घरी । संत, देवासि वंदोनी अंतरी ।
वाडवडिलांचे वरदहस्त शिरी । धारण करावे कौतुकाने ॥४३॥
नवीन कार्यसंकल्प करावा । मग वर्षभरि तो टिकवावा ।
ऐसा सोहळा सगळ्यांनी साधावा । एकात्मतेने ॥४४॥
दिवाळीचा सण आला । सर्वांनीच पाहिजे केला ।
परि पाहावा कोण राहिला । भुकेला घरी ॥४५॥
त्यास आमंत्रित करावे । गोडधोड भोजन द्यावे ।
परस्परांनी मिळून चालवावे । वैभव सर्वांचे ॥४६॥
गावाचे एकचि असावे लक्ष्मीपूजन । प्रचंड मंडपी करोनि स्थान ।
सर्वांस द्यावे फराळ, भोजन । सर्वांमिळोनि ॥४७॥
आनंद उसळावा घरोघरी । सुखी गायी, वासरे, नर, नारी ।
भाऊ-बहिणींचे परोपरी । नाते वाढे ऐसे व्हावे ॥४८॥
बंधुभाव, भगिनीपण । हे नाते ओसरले समाजातून ।
ते वाढाया नव्या पीढीत पूर्ण । योजना भाऊबीजेची ॥४९॥
तैसेचि भरवावे गो-प्रदर्शन । कोणत्या गायी दुधाळ पूर्ण ।
कोणता वळू गुणसंपन्न । उंचपुरा पाहावा ॥५०॥
तो सगळ्यांनी गौरवावा । सर्वांमिळोनि इनाम द्यावा ।
गायी गुरांचा महिमा पटवावा । सर्व जना ॥५१॥
आपापली गाय प्रभावी । पुढे करावयासि सांगावी ।
पुढची गुढी उभारावी । इनाम देऊ म्हणोनि ॥५२॥
तैसेचि वाढवावे खताचे महिमान । नर्कासुरास निमित्त करून ।
शेणखतादिकांचे वर्णन । विशद करून सांगावे ॥५३॥
याच खतामुताच्या संयोगे । शेती उत्तम राहोनि पिके ।
म्हणोनि सर्वांनी योग्य खळगे । करोनि खत सांभाळावे ॥५४॥
शेतीमाजीच शेणादि जावे । तरीच भूमिमाता पावे ।
हे घरोघरी सांगावे । हाचि खरा दिवाळसण ॥५५॥
गावी ज्याने लक्ष्मी नांदे । लोक जगतील आनंदे ।
ऐशा प्रयत्नांनीच साधे । खरी दिवाळी ॥५६॥
बारा महिन्यांनी दिवाळी आली । घरेदारे स्वच्छ झाली ।
भिंत – ओसरी सारवोनि ठेविली । रंगरंगोटी लावोनि ॥५७॥

दुसरे दिवशी सडा नाही । झाडझूड तीहि नाही ।
घाण पसरली सर्वहि । जिकडे तिकडे ॥५८॥
ऐसी करिता दसरा, दिवाळी । अवदशाचि येई कपाळी ।
त्यापेक्षा रोज सकाळी । उठणे हाचि दिवाळसण ॥५९॥
सण म्हणोनि करावे अभ्यंगस्नान । नाहीतरि फासावे वंगण ।
हे कोठचे शहाणपण । शिकलो आम्ही? ॥६०॥
रोजचि थोडे करीत जावे । स्नान, ध्यान पाठादि बरवे ।
श्रम करोनि सौंदर्य वाढवावे । घरी, दारी ॥६१॥
दिवाळीचे निमित्त करोनि । स्वच्छता पवित्रता शिकावी सर्वांनी ।
उकिरडाहि नीट करोनि । दिवा लावावा स्वच्छतेचा ॥६२॥
नेहमी स्वच्छ ठेवावे घर । श्रम करावेत अंगभर ।
हाचि खरा सणवार । नित्य सुंदर वर्तणूक ॥६३॥
जो नेहमीच स्वच्छता करी । त्याने उत्सव पाळले सर्वतोपरी ।
उत्तम जेवावी भाजी–भाकरी । देवादिकां अर्पोनि ॥६४॥
ऐसे व्रत जो सांभाळी । त्याची खरी दसरा, दिवाळी ।
नाहीतरि समजा होळी । आपुल्या साऱ्या जीवनाची ॥६५॥
होळीचा आला शिमगा सण । त्यात मोठी मारहाण ।
लोक इभ्रत, मान सोडोन । पळती मार्गी वेडेसे ॥६६॥
हा वाढला विचित्रपणा । ऐसा नोहे शिमगा जाणा ।
त्यातहि आहे तात्त्विकपणा । घेण्यासारिखा समाजा ॥६७॥
याच दिवशी प्रल्हादाची छळणा । केली होती होळीने जाणा ।
परि दु:ख न झाले प्रल्हादप्राणा । हरिभक्त म्हणोनि ॥६८॥
शेवटी छळणारेचि जळले । हे गावासि कौतुक झाले ।
म्हणोनि जन ओरडले । उपहास त्यांचा करोनि ॥६९॥
त्याच दिवशी शंकराने । काम जाळिला तिसऱ्या नयने ।
म्हणोनि कामास धिक्कारिले भूतसेनेने । हलकल्लोळ करोनि ॥७०॥
त्याच दिवशी सज्जनांनी । वार्षिक यज्ञाची केली आखणी ।
संपूर्ण गाव साफ करोनि । द्यावे पेटवोनि कैचण ते ॥७१॥
त्याच्या प्रकाशी सर्वांनी जमावे । आपले दुष्कृत्य निवेदावे ।
पुढे तैसे न करण्याचे योजावे । अनुतापाने ॥७२॥



हे मनोधैर्य कमी पडले । म्हणोनिया दुसरे जन ओरडले ।
गावाचे पाप धुवोनि काढले । ऐसियापरी ॥७३॥
पुढे याचा विपर्यास झाला । शिवीगाळ देती परस्पराला ।
पोथ्याहि सांगती 'अभद्र बोला' । मूळ त्याचे न जाणता ॥७४॥
म्हणती कोणी वर्षातून । शिव्यासाठीच एक दिन ।
परि सज्जनासि याचे काय कारण ? । ये उत्तेजन दुर्जना ॥७५॥
या सणी मुख्य धुलिवंदन । जे ग्रामसफाईचे प्राचीन चिन्ह ।
अस्पृश्यांनाहि स्पर्शावे म्हणून । सांगितले ग्रंथी त्या दिवशी ॥७६॥
आधी सार्वजनिक अग्निपूजन । त्यात वाईट वृत्तीचे दहन ।
मग राख न्यावी उकिरडी पूर्ण । करावे स्नान समुदाये ॥७७॥
ऐसा ग्रामसेवेचा आनंद । त्याने परस्परां लाविला सुगंध ।
प्रसन्नता दाखवाया विशद । योजिला प्रसंग रंजनाचा ॥७८॥
ठिकठिकाणी गाणे, वाजवणे । रंग–गुलाल आदि उधळणे ।
प्रसन्न ठेवावया मानवी मने । शिमगा सण योजिला ॥७९॥
राजेरजवाड्याचिया दरबारी । त्यास रूप आले शृंगारी ।
श्रीकृष्णाचिया नावे रंगपिचकारी । उडविण्याचे ॥८०॥
गावी वेगळाचि विपर्यास झाला । ग्रामशुद्धीचा उद्देश गेला ।
नाली–मोरींचा उडवोनि मैला । दु:ख देती जनतेसि ॥८१॥
कुणाची लाकडे चोरूनि नेती । घरच्या वस्तूहि होळीत टाकती ।
गाडी–घोड्यांचे सामान जाळती । खाट नेती स्मशानी ॥८२॥
या सणाने होते सणसण । गाव दिसू लागते भणभण ।
ऐसा हा प्रसंग वाईट म्हणोन । करिती टीका धीर प्राणी ॥८३॥
परि यासि वळण लावावे । ऐसे वेडेपण होऊ न द्यावे ।
त्यात सौंदर्य, पावित्र्य भरावे । गाणे, वाजवणे ठेवोनि ॥८४॥
होळीनिमित्त जमवोनि नर–नारी । घ्याव्या कवायती मोहल्ल्यावरि ।
ग्रामसुधारक नाटिका बरी । मनोरंजनासि योजावी ॥८५॥
होळी म्हणजे ग्रामशुद्धिदिन । तैसेचि मातृदिन, बालकदिन ।
श्रमिकदिन, मानवतादिन । स्वातंत्र्यदिनादि कितीतरी ॥८६॥
तैसेचि अनेक लहान सण । सर्वांत असावे तत्त्वानुसंधान ।
उदरपूर्तीचे दिखाऊ साधन । ऐसे झाले तरि व्यर्थ ॥८७॥

प्रगतीसाठी सणवार करावे । काही सण एकेठायीच घडवावे ।
सर्वांमिळोनि आचरावे । सहकार्याने ॥८८॥
पूर्वी घरोघरी गणेशोत्सव । नाना रुढ्यांचे उपद्रव ।
लोकमान्यांनी आणिले महत्त्व । राष्ट्रीय रूपे तयासि ॥८९॥
गावाचा एकचि गणपती । सर्वांसाठी कार्यक्रम होती ।
जेणे वाढेल राष्ट्रीय वृत्ति । ऐसी असावी धारणा ॥९०॥
तोचि उत्तम सण, उत्सव दिन । जो राष्ट्रीय वृत्तीने पूर्ण ।
हेचि घडावया महाकारण । संती बोधिले समाजा ॥९१॥
जनता असते उत्सवप्रिय । म्हणोनि त्या मार्गेचि लावावी सोय ।
राष्ट्रीय-भावना जागे निर्भय । तोचि करावा उत्सव ॥९२॥
विशेष-निमित्ते संघटित व्हावे । सर्वांमिळोनि कार्य करावे ।
जेणे बोझ न पडावा जीवे । कोणावरि ॥९३॥
नाहीतरि आपुले मनोरंजन । त्यासाठी जावे दुसऱ्यांचे प्राण ।
ऐसे करील जो उत्सव, सण । तो तो हीन या लोकी ॥९४॥
परका सुखी, आपणहि सुखी । तत्पर परस्परांचे कौतुकी ।
वागणूक सर्वांची सारखी । सर्वांसाठी असावी ॥९५॥
ही मानव्यबुद्धि उपजावया । गावोगावी बदलावी उत्सवप्रक्रिया ।
जेणे धडा मिळे लोकांसि या । नेहमी वागणुकीसाठी ॥९६॥
सकल धर्मामाजी सणवार । याचसाठी केले सान, थोर ।
जेणे मनुष्याची कदर । मनुष्य करील सर्वदा ॥९७॥
सामुदायिकता वाढे सर्वत्र । हेचि सणावारांचे मूळ सूत्र ।
सामुदायिकपणाचा प्रकार । तोचि खरा उत्सव ॥९८॥
ज्या दिवशी गाव झाले एक । तोचि उत्सवदिन अलौकिक ।
ओळखू न येती राव, रंक । उत्सवामाजी ॥९९॥
ज्यासि नाही त्यासी देणे । जो बिघडला त्या सरळ करणे ।
आप्त समजोनि उचलोनि घेणे । पडला त्या सर्वतोपरी ॥१००॥
हेचि खरे औदार्य आहे । गावाच्या सुखात उत्सव पाहे ।
तेणे सदा सणवार राहे । आपुल्या गावी ॥१०१॥
पूर्वी गावी बारा बलुते । अठरापगड जातींचे जत्थे ।
परस्परांवरि अवलंबून होते । सहकारी जीवन ॥१०२॥



कोळी जाळे घेवोनि येई । सोनार जिवती लावोनि देई ।
न्हावी, धोबी, गोवळी नेई । धान्यादिक सणावारी ॥१०३॥
परि तो आता नुरला कायदा । उत्सवास येणे हा नव्हे फायदा ।
सणवार सांगणे हा नव्हे धंदा । कोणाच्याहि पोटाचा ॥१०४॥
ही आहे निर्मळ सेवा । उजळावया अंतरीचा दिवा ।
पोट भरण्याचा प्रश्न उत्सवा । आणोचि नये ॥१०५॥
सकळांनी कामधाम करावे । उरल्या वेळी सणवार सांगावे ।
मंडपादि करण्यास लागावे । सेवाभावे सर्वांनी ॥१०६॥
ऐसे सांगणे हे निराळे । परि तया निमित्ताने भुलवावे भोळे ।
तेणे घोटाळोनि लोक सगळे । नास्तिक जैसे बोलती ॥१०७॥
श्रम-विभागणी होती पूर्वी । त्यातूनि ही वाढली स्वार्थचवी ।
त्याच कामी लागेल भिक्षुक, गोसावी । नाव बुडवावया पूर्वजांचे ॥१०८॥
जो कोणी एवढेचि करी । त्यासि गावाने द्यावी चाकरी ।
उदर भरण्याची व्यवस्था पुरी । परिश्रमाने सर्व काळ ॥१०९॥
बेकारी न ठेवावी ग्रामाप्रति । उधळपट्टी न करावी कोणे रीती ।
उत्सवाने उत्तम गति । लागे तैसेचि करावे ॥११०॥
उत्तम गति तोचि उत्सव । एरव्ही मोले घेतले उपद्रव ।
तैसे न व्हाया करावे गाव । संघटित आणि क्रियाशील ॥१११॥
साधावा कार्याचा उत्साह । तोचि उत्सव निःसंदेह ।
तुकड्या म्हणे गावी प्रवाह । वाहू द्या शांति, सुखाचा ॥११२॥
इतिश्री ग्रामगीता ग्रंथ । गुरु – शास्त्र – स्वानुभव – संमत ।
कथिला सणोत्सवांचा मुख्यार्थ । तेविसावा अध्याय संपूर्ण ॥११३॥

॥ सद्‌गुरुनाथ महाराज की जय ॥

"धार्मिक उत्सव म्हणजे गौरवाचे जीवन प्राप्त करून देणाऱ्या गोष्टी शिकण्याच्या शाळाच ! आमची धर्मबुद्धी जागृत, नैतिक व राजकीय मनोवृत्ती जोमाची व राष्ट्रीयत्वाची ज्योत नेहमी प्रकाश देणारी राहावी. म्हणूनच उत्सवांची योजना करण्यात आली आहे."

**– लोकमान्य टिळक**

# ॥ चित्र परिचय ॥



## अ. २४ – श्रीमत् स्वामी दयानंद सरस्वती

स्वामी दयानंद महाराज । तैसा त्यांचा आर्य समाज ।
यांनीहि केले झटूनि काज । सुधारणचे यात्रिकांच्या ।।७९ ।।

लग्नप्रसंगी पळून जाऊन तपस्येनंतर प्राणांतिक संकटांना तोड देत जगाला रूढिरहित आर्य धर्माचे ज्ञान देणारा महात्मा. 'जोवर परस्परांचे एकमत, एक हानिलाभ, एक सुखदुःख न मानाल तोवर प्रगती दुर्लभ' ही जाणीव देत त्यांनी कर्मावडंबर, पंथभेद, धर्मांतर पडदा–पद्धती आदिचे खंडन केले, 'सत्यार्थप्रकाश' उजळला. आर्य समाज व परोपकारी सभा स्थापिली, शुद्धिसंघटन केले. अनेक तीर्थी फिरून गंगा–काशी मूर्ती–माळा यांचे महत्व उडवून मानवसेवा शिकविली. त्यांच्या आर्य समाजानेही विद्यालये, अनाथालये, दवाखाने, विधवाश्रम, गुरुकुल वगैरे चालवून लोकसेवेचे व यात्राशुद्धीचे बरेच कार्य केले.



● अध्याय चोविसावा ●

# यात्रा–मेळे

॥ श्रीगुरुदेवाय नमः ॥

श्रोतियाने केला प्रश्न । गावी संप्रदाय असती भिन्न ।
वेगवेगळे त्यांचे एकूण । देव–धर्म, उत्सवादि ॥१॥
ते सार्वजनिक उत्सवीहि येती । तरी आपणासि वेगळे समजती ।
आपापली भिन्न मानूनि संस्कृति । चालती सर्व ॥२॥
त्यांचे फड निरनिराळे । साजविती भिन्न देवळे ।
कोठे प्रतिमापूजेचे सोहळे । कोणी मूर्तिविरोधक ॥३॥
कित्येकांची तीर्थी धाव । ते इतरांसही देती उठाव ।
इकडे ओस पडले गाव । तरी पर्वा नाही ॥४॥
या सर्वांची मते वेगळी । भिन्न त्यांची संतमंडळी ।
एक एकाचि करिती टवाळी । आपआपुल्या गोटांत ॥५॥
वेगवेगळ्या शिष्यशाखा । वेगवेगळे गुरू देखा ।
कोणी न मिळती एक – एका । करिती उत्सव आपुले ॥६॥
खरे–खोटे ज्ञान काही । अंध रूढ्या शिकविती पाही ।
गट पडले भिन्न भाविकांचेहि । मिरविती द्वाही आपुलाली ॥७॥
हे जोवरी एक न होती । तोवरी संघटनेची फजिती ।
यासि उपाय करावा कोणे रीती । तेचि आम्हा सांगावे ॥८॥
श्रोतियांचा प्रश्न मार्मिक । उत्तर ऐका आवश्यक ।
गावापासोनि विश्वापर्यंत देख । जरूरी याची ॥९॥
भिन्न भिन्न झाले गट । वेगवेगळे पडले तट ।
आकुंचित मते शिकविती रोगट । समाजासि ॥१०॥
अंध–श्रद्धेस आणोनि पूर । लोकी रूजविती मिथ्याचार ।
त्यांच्या उत्सवांचे प्रकार । विचित्रचि असती ॥११॥
अपार धनाची धुळधाणी । अनिष्ट प्रथांची पेरणी ।
फुटीर वृत्ति वाढेल जनी । ऐसी करणी कितीकांची ॥१२॥

कित्येक बुवा वेषधारी । जगती ऐशा गटांवरि ।
खरे ज्ञान न देती स्वार्थभरी । जनतेलागी ॥१३॥
ऐसे हे जोवरि चाले । तोवरि गाव भ्रमी बुडाले ।
सुधारणेच्या मार्गी आले । दरी-दरकुटे ॥१४॥
यासाठी एकची उपाय । आपण न ठेवावे अलग ठाय ।
त्यांच्यात जावे मिळोनि निर्भय । समुदाय साधाया ॥१५॥
असो कोणाचा कोणता पंथ । असो कोणीहि बुवा, महंत ।
सर्वा आपुलेहि मानोनि सतत । जावे मिळोनि सर्वांशी ॥१६॥
पंच महोत्सवचि आपुले । येर ते तुच्छ मानता चुकले ।
आपण अलग पडता कसले । साधेल ऐक्य ? ॥१७॥
म्हणोनि निर्वाळा सांगतो । जेव्हा संतजयंति, पुण्यदिन येतो ।
तेव्हा सगळयांमिळोनि करावा तो । सार्वजनिक स्थानी ॥१८॥
मग तो असो कोण्या पंथाचा । वेगळी न ठेवावी वाचा ।
संत, सज्जन सखा विश्वाचा । म्हणोनिया ॥१९॥
सर्वची पंथांचे उत्सव । ज्यात दिसेल सत्यगौरव ।
त्यातूनि विशालतेचे भाव । भरावे लोकी ॥२०॥
एकलकोंडे राहू नये । घरीच उत्सव करू नये ।
सर्वांचे सहकार्य घ्यावे । हेचि मर्म संघटनेचे ॥२१॥
उत्सवाचा व्हावा परिणाम । म्हणोनि प्रभावी ठेवावे कार्यक्रम ।
थोरांचे भाषण, भजन उत्तम । करावे तेथे ॥२२॥
करिता संतांचा गुणगौरव । सांगू नये चमत्कारलाघव ।
पाडावा उत्तम वागणुकीचा प्रभाव । समाजावरि ॥२३॥
संत ज्ञानेश्वर, तुकाराम । नामदेव, सावता, चोखा अनुपम ।
एकनाथ, दामाजी, भागवतोत्तम । वर्णावे लोकी ॥२४॥
सजन कसाई, रविदास चांभार । सेना, संताजी, गोराकुंभार कृष्णदयार्णव, ।
वामन, श्रीधर । संतकवीहि ॥२५॥
रामदास, तुलसीदास । केशवदास, कबीरदास ।
सुंदरदास, विष्णुदास । सूरदासादि ॥२६॥
शंकराचार्य, रामानुजाचार्य । मध्वाचार्य, वल्लभाचार्य ।
राधास्वामी, बसवाचार्य । रमणमहर्षि, श्रीचक्रधर ॥२७॥



शहादत्त, गोरखनाथ । गोविंदनाथ, दयाळनाथ ।
नरसी मेहता, रामतीर्थ । श्रीसमर्थ आडकोजी ॥२८॥
महात्मा मंसूर, महंमद । कँवरराम, शेख फरीद ।
झरतुष्ट्र आणि गौतमबुद्ध । विवेकानंद प्रभावी ॥२९॥
गुरु गोविंदसिंह, नानकदेव । महाचैतन्य, गौरांगदेव ।
रामकृष्ण परमहंसदेव । जैन महावीर स्वामी ॥३०॥
महात्मा येशू, टॉलस्टॉय । मार्क्स, सॉक्रेटीस निर्भय ।
महात्मा गांधी, राममोहन राय । दयानंदादि महाज्ञानी ॥३१॥
भक्त मीराबाई, मुक्ताबाई । कान्होपात्रा, जनाबाई ।
रंगनायकी, बहिणाबाई । ॲनी बेझंट, निवेदिता ॥३२॥
ऐसे जे जे योग्य प्रभावे । त्यांचे चारित्र्य समजोनि द्यावे ।
त्यांनी समाजकार्या गौरवे । काय दाविले जनतेसि ॥३३॥
ऐसियांची पुण्यतिथी आदि करावी । सर्वांची प्रार्थना घ्यावी ।
उत्तम वक्त्यांची चरित्रे बोलावी । परिणाम होईल त्या शब्दी ॥३४॥
त्यांची विशालता समजोनि द्यावी । समान भावना अनुसरवावी ।
समाजानेहि तैशीच करावी । प्रगति आपुली म्हणोनि ॥३५॥
संत देहांनी भिन्न असती । परि ध्येय, धोरणाने अभिन्न स्थिति ।
साधने जरी नाना दिसती । तरी सिध्दांतमति सारिखी ॥३६॥
ऐसे सांगता अभ्यासे वर्णून । भिन्न संप्रदायांचे होईल मिलन ।
होईल बुवाबाजीचेहि खंडन । सर्वतोपरी ॥३७॥
नाहीतरि पंथांचे पडती गट । सहकार्याचा भंगे तट ।
पोटभरू दांभिकांचे पोट । चालतसे तयावरि ॥३८॥
आपापल्या भाविक जना । भुलविती उत्सवादिकी नाना ।
अंधश्रद्धेने होय धिंगाणा । ग्रामजीवनाचा ॥३९॥
म्हणोनि आणावे मैदानावरी । आकुंचितपण सारोनि दुरी ।
मग सत्यचि बोलेल वैखरी । सर्वामुखी मंगल ॥४०॥
गावी येवोत संत कोणी । बोध करवावा प्रार्थनी ।
अथवा सार्वजनिक स्थानी । सर्वांसाठी उत्सवादिकी ॥४१॥
तेथे न सांगवेल भाकडकथा । न पाळवेल अनिष्ट प्रथा ।
मार्ग लाभेल आईता । लोका सत्य ज्ञानाचा ॥४२॥

ज्ञानाचिया भूमिकेवरि । फारशा भेदासि न उरे उरी ।
मिळते-जुळते बोल बहुपरी । निघती सर्वांचे ॥४३॥
तेणे निरसेल भेद-कल्पना । तात्त्विकताचि कळेल जना ।
पंथबाजीच्या उच्चाटना । उपाय हा अमोलिक ॥४४॥
जेथे लोक समभावनेने बैसले । तेथे यथार्थचि चर्चा चाले ।
देव - संत - धर्म - ऐक्य साधे भले । हळुहळू तेणे ॥४५॥
म्हणोनि ऐसे वारंवार । प्रसंग आणावे गावी सुंदर ।
साधु, सज्जन जुळवावे अपार । भिन्न भिन्न पंथांचे ॥४६॥
ऐक्यदृष्टीने संतोत्सव । करावे उत्साहे गावोगाव ।
जेणे तीर्थाचा गौरव । लाभेल गावा ॥४७॥
तीर्थी निर्मळ साधुवृंद । तेथे तत्त्व चिंतनानुवाद ।
जनांस होईल तत्त्वबोध । म्हणुनीच महत्त्व तीर्थाचे ॥४८॥
एरव्ही 'तीर्थी धोंडापाणी । देव रोकडा सज्जनी' ।
ऐसीच वदली संतवाणी । गर्जोनिया ॥४९॥
तैसे आज मार्गदर्शन । जया तीर्थी न होय पूर्ण ।
तेथे धाव घेवोनि कोण । लाभ या जना? ॥५०॥
यात्रेस जावे तरि सेवेसाठी । विचारस्फूर्ति आणाया गाठी ।
तेणे गाव करावे उठाउठी । यात्रारूप आपुले ॥५१॥
परंतु यात्रा करिती चारो धाम । लोकां मागती न करिती काम ।
यात न घडे पुण्य कर्म । वाउगा भ्रम, अहंकार ॥५२॥
गावी उपाशी ठेवोनि बाळा । जावे कासया कुंभमेळा? ।
देव गावी थोडा, तीर्थी निराळा । ऐसे नाही ॥५३॥
परि लोक सती पडाया जाती । पंड्यादिकांच्या जाळी गुंतती ।
मेंढरापरी धावोनि मरती । रूढीमागे ॥५४॥
पंढरीपासून सहा कोसावरि । सांवता राहिला जन्मभरि ।
देव मिळविला न करिता वारी । गावीच त्याने ॥५५॥
जनता-जनार्दनाच्या सेवेचे । काम करिता इमाने साचे ।
गावीच पुण्य पंढरीचे । धाव घेई आपैसे ॥५६॥
वसती जेथे ऐसे संत, सेवक । ते गावचि तीर्थ होय सुरेख ।
स्फूर्ति घेवोनि जाती लोक । कराया गावे भू-वैकुंठ ॥५७॥



जेथे प्रेम आणि पावित्र्य । त्यासीच नाम तीर्थक्षेत्र ।
कासया जावे गोंधळ विचित्र । बघाया तीर्थी ? ॥५८॥
गावचे सार्वजनिक स्थान । तेचि समजावे तीर्थ महान ।
तेथेचि लागावे तन-मन-धन । दानशूरांचे ॥५९॥
तीर्थी कोणी खर्च न करावा । आधी गावमार्ग सुधारावा ।
तरीच तीर्थाचा पुण्य ठेवा । गावी मिळेल सेवेने ॥६०॥
वाचवूनि ग्राम-संपत्ती । गावाची पवित्र घडवावी मूर्ति ।
मग न जाताहि क्षेत्री, तीर्थी । पुण्य लाभे ग्रामोद्धारे ॥६१॥
सप्ताह, एक्के, यज्ञ, उत्सव । यासाठी वर्गणी होते ती सर्व ।
काही वर्षे सुधाराया गाव । याच कामी लावावी ॥६२॥
जयंति असो वा पुण्यतिथी । सप्ताह असो वा हवने, पंगती ।
पाहावी गावाची, राष्ट्राची स्थिति । तैसेचि करावे पुण्यकर्म ॥६३॥
सर्व पंथीयांनी मिळावे । सर्वांच्या हिताचे कार्य उभारावे ।
हेकटपणे भरी न भरावे । भलतियाचि ॥६४॥
नाहीतरि महानुभाव पळे रानी । देवीभक्त सज्ज होती बलिदानी ।
कोणी द्रव्य उधळती शिगर रचोनि । एकलकोंडे ॥६५॥
कोणी वर्गणी गोळा करून । देवीसि देती पशूंची दावण ।
परि रोग न जाती ग्रामसफाईविण । ऐसे उत्सव केलियाने ॥६६॥
कोणी गावच्या यात्रेमाजी । नाना अनिष्ट कामकाजी ।
पैसा उधळोनि पेरती समाजी । जहरचि जैसे ॥६७॥
त्यासाठी करावी यात्रा-कमेटी । यात्रा-मेळा-उत्सव-पर्वणी-हाटी ।
करावया सुधारणा उठाउठी । राष्ट्रीयतेच्या ॥६८॥
ग्रामोन्नतीची आयोजने करावी । शक्ति-बुद्धिने राष्ट्रीयता भरावी ।
आपुल्या गावाची कीर्ति जावी । दिगंतरी तीर्थाऐसी ॥६९॥
गावी अथवा गावाजवळी । यात्रा-मेळा असे ज्या काळी ।
तेथे सेवा करावी सगळी । स्वयंसेवक होऊनि ॥७०॥
तैसेचि आपुल्या गावचे वैशिष्ट्य । ते जगापुढे मांडाया स्पष्ट ।
प्रदर्शन, संमेलन, यात्रादि इष्ट । सुरू करणे आपुल्या गावी ॥७१॥
सुंदर मार्ग सरळ, निर्मळ । स्वच्छ, आरोग्यदायी जळ ।
ग्रामरचनेतील आदर्श सकळ । वर्तावेत तेथे ॥७२॥

शौचकूप, मुत्र्या चहूबाजूंनी । नाना वस्तूंच्या ठेवाव्या श्रेणी ।
जेणे देश चढे उच्च स्थानी । वैभवाच्या ॥७३॥
नाना मनोरंजने चालवावी । परि व्यसने, तमाशे येऊ न द्यावी ।
लोकांस हळूहळू लावीत जावी । रुचि राष्ट्रीयतेची ॥७४॥
उद्योगाच्या सुंदर कला । वाद्यकलादि व्यवहारकला ।
माणुसकीच्या आचारकला । योजाव्या तेथे ॥७५॥
माणसाने मार्गी कैसे चालावे । कैसे बसावे, कैसे बोलावे ? ।
आपुले वर्तन कैसे ठेवावे । घरात आणि समुदायांत ॥७६॥
याचा सुंदर पाठ द्यावा । सर्वांचे ऐक्य शिकवावे गावा ।
यात्रा–उत्सवे संचार व्हावा । नवतेजाचा सर्वांमाजी ॥७७॥
अनिष्ट प्रथा बंद कराया । सेवके झिजवावी काया ।
यात्राशुद्धीच्या नाना उपाया । अवलंबावे ॥७८॥
स्वामी दयानंद महाराज । तैसा त्यांचा आर्य समाज ।
यांनीहि केले झटूनि काज । सुधारणेचे यात्रिकांच्या ॥७९॥
गाडगेबाबा वैराग्यमूर्ति । तैसीच सेवा–मंडळ–समिती ।
यात्राशुद्धीसाठी उत्तम रीती । प्रयत्नशील सर्वदा ॥८०॥
त्या प्रकारे गावचे सज्जन । मिळवोनि करावे यात्रा–नियोजन ।
यात्रा म्हणता 'या, तरा' ही खूण । पटावी लोकां ॥८१॥
प्रचंड समुदाय जमवावा । उत्तम सदुपदेश करावा ।
संत–नेत्यांनी लौकिक वाढवावा । लोक–जीवनाचा ॥८२॥
हजारो लोक जरी जमले । तरी आरोग्य जराहि नाही भंगले ।
लोक सहजपणे आले–गेले । ऐसी व्हावी व्यवस्था ॥८३॥
गेले ऐकोनि कथा – कीर्तन । घेतले जीवनाचे सामान ।
भेटले परस्परांशी आदरे पूर्ण । देवाण–घेवाण उत्तम ॥८४॥
याची असावी रूपरेषा । कराव्या नाना समित्या ऐशा ।
जनतेमाजी सुधारणा आपैशा । घडोनि यावया ॥८५॥
नाना प्रदर्शने उपयुक्त । नाना चढाओढीहि त्यात ।
तैसेचि लोकशिक्षणाचे समस्त । कार्यक्रम योजावे ॥८६॥
यात्रादिकांच्या निमित्ताने । घ्यावी भिन्न पंथीयांचीहि संमेलने ।
संत–विद्वानांची ठेवावी भाषणे । निर्भेळ विचारांची ॥८७॥
न दुखविता कोणाचा भाव । त्यांच्या सत्तत्त्वांचा करावा गौरव ।
समारोप करावा लक्षूनि एकत्व । मूळचे सत्य ॥८८॥




तेथे भिन्नपण विरोनि जाय । दांभिकतेचा न चले उपाय ।
विचित्रपणे वेगळा राहे । वाहोनि जाय प्रवाही तो ॥८९॥
हिरा आणि काचवटी । कळो लागेल खरी, खोटी ।
जाहीरपणे विचार–कसोटी । लागता ऐसी ॥९०॥
कोण संत, कोण अ–संत । काय मिथ्या, काय सत्य ।
ते जाणोनि धरितील पंथ । समन्वयाचा सर्व जन ॥९१॥
हत्ती दिसो लागता सगळा । मग कोणीहि एकांगी आंधळा ।
भूलवू न शके वेगवेगळा । भागचि हत्ती म्हणवोनि ॥९२॥
ज्या संत–देवांच्या नावावरि । पंथ वाढले परोपरी ।
त्यांचे सत्य संदेश घरोघरी । पोहोचताचि सर्व साधे ॥९३॥
जैसा गुरुगोविंदसिंहानी । 'ग्रंथसाहेब' रचिला जनी ।
भिन्न संतांची एकत्र वाणी । झाली संघटनी पोषक ॥९४॥
महिपतींनी संत–चरित्र । मांडोनि सद्भावे एकत्र ।
भाविक जनी ओविले सूत्र । एकपणाचे जयापरी ॥९५॥
ज्ञानेश्वरादि संती केला । पंढरपुरी गोपालकाला ।
सर्व पंथांच्या संताचा झेला । गुंफियेला ज्या भावे ॥९६॥
तैसे संतांचे संमेलन । आणि सर्व संत–स्मृतिदिन ।
पाळता गावी जन–ऐक्य पूर्ण । सहजचि साधतसे ॥९७॥
सर्व नद्या सागरी मिळोन । पावती महान तीर्थपण ।
तैसे सर्व पंथ ऐक्य साधून । करिती गावा तीर्थरूप ॥९८॥
कोणत्याहि संतांचा करावा उत्सव । परि चमत्कारांचा नको गौरव ।
द्यावा कर्तव्यमार्गासि उठाव । त्यांच्या जीवना स्मरोनि ॥९९॥
ऐसे कार्योत्सव चालता गावी । तीच भू–पंढरी समजावी ।
जेथे नर, नारी प्रसन्न बरवी । दु:खी कोणी असेना ॥१००॥
ऐसे न करिता आपुल्या गावी । तीर्थे घडली जरी आघवी ।
तरी मुक्ति न पावे जीवी । तुकड्या म्हणे ॥१०१॥
इतिश्री ग्रामगीता ग्रंथ । गुरु–शास्त्र–स्वानुभव–संमत ।
यात्रा–मेळ्यांचा शुद्ध संकेत । चोविसावा अध्याय संपूर्ण ॥१०२॥

॥ सद्गुरुनाथ महाराज की जय ॥

''जो लागों को ऐसी भाषा में उपदेश देता है जिसे साधारण समाज नही समझ सकता, उसका बडप्पन खेद का विषय है । उठो जागो ! देश का उपकार करो ! मतमतान्तरोंके आडम्बरको मिटाओ और सद्धर्मका प्रकाश फैलावो !''

– स्वामी दयानंद सरस्वती

## ॥ चित्र परिचय ॥



### अ. २५ – श्रीमत् आद्य शंकराचार्य

शंकराचार्ये देव-पंचायतन । मांडोनि साधिले भक्तसंघटन ।
इष्टदेवासह इतरांचे पूजन । कुठले स्थान विरोधासि ? ॥११०॥

अल्पवयात असामान्य प्रतिभेने व तपस्तेजाने भारताला प्रभावीत करून तत्त्वज्ञान-प्रचार आणि संस्कृतिप्रचारासाठी भारताच्या चारही दिशांना मठ स्थापिले. भिन्न भिन्न देवतांच्या उपासकांची भांडणे मिटवून एकी घडविण्याकरिता त्या वेळच्या प्रमुख पाच पंथांच्या देवांचे 'पंचायतन' निश्चित केले. अर्थात आपला उपास्यदेव मध्ये व बाकीचे आजूबाजूस मांडून पूजा करण्याची तसेच प्राण्याचे बलिदान करण्याऐवजी उडीद, कोहळे वगैरे बली देण्याची प्रथा पाडली, यात्राशुद्धी केली.



● अध्याय पंचविसावा ●

# देव–देवळे

॥ श्रीगुरुदेवाय नमः ॥

विचारांनी असती उदार । साधु, संत थोर थोर ।
तेथे नाही भेद-संचार । कोण्याहि प्रकारे ॥१॥
परंतु त्यांचे पंथानुयायी । आपुलालीच लाविती घाई ।
भिन्न भिन्न त्यांचे देवहि । एक न मिळती एकासी ॥२॥
वेगळे देव, वेगळा धर्म । वेगळाले त्यांचे उपासनाकर्म ।
सांगा होईल कैसा संगम । भावनांचा त्यांच्या ? ॥३॥
संतांचे घेतले संमेलन । तेवढ्यापुरते झाले मिलन ।
परंतु नित्याच्या उपासनेने । वाढे अंतर सर्व जनी ॥४॥
ज्याचा विशेष बोलबाला । जेथे संपत्तीचा पेल झाला ।
लोक भजती त्याचि दैवताला । कोणी दुजाला कवटाळिती ॥५॥
यासि नित्यासाठी उपाय । सांगा सहजप्रभावी काय ? ।
जेणे संस्कारचि होतील एकमय । आत्मीयतेचे ॥६॥
श्रोतियांचा प्रश्न मार्मिक । गाव – हितासि आवश्यक ।
संतांऐसेचि देवांचे ऐक्य । साधले पाहिजे ॥७॥
आपापले धर्म – कर्म – देव । भिन्न समजती मानव ।
तेणे असोनि एकचि गाव । झाले भाव वेगळे ॥८॥
आपुलाले चिन्ह ठेवावे । त्यावरोनि संप्रदाय ओळखावे ।
म्हणोनि मांडिले दुकान बरवे । आपापले या पंथांनी ॥९॥
एक म्हणे राम मोठा । दुसरा म्हणे कृष्ण मोठा ।
तिसरा म्हणे शंकरचि मोठा । सर्वांहूनि आमुचा ॥१०॥
कोणी म्हणती देवी मोठ्या । कोणी पूजिती मानविणी नरोट्या ।
कोणी म्हसोबा-बहिरम-सोट्या । थोर म्हणोनि तंडती ॥११॥
कोणी म्हणती हरि, हर । कोणी वंदिती नाल्याहैदर ।
कोणी पूजिती सर्प, व्याघ्र । कोंबडी-बकरी देवोनि ॥१२॥

काही सोनियाचे देव करिती । वेळ पडल्या विकोनि खाती ।
ऐसी आहे देवाची फजिती । पूजकांमागे ॥१३॥
काही देवासि बलिदान देती । देवीच्या मिसे मांस खाती ।
तीर्थ म्हणोनि मद्य पिती । पिसाळलेले ॥१४॥
देव देऊळी दगडाचा । देवपाट करिती सोनियाचा ।
धाक पडे चोरट्यांचा । म्हणोनि पहारे देऊळी ॥१५॥
आपापल्या हौसेचे शृंगार । चढवोनि देती देवावर ।
मग शृंगारावरीच टपती नेत्र । देव काही दिसेना ॥१६॥
एक म्हणती गळा सुंदर माळ । एक म्हणती रत्नमुकुट झळाळ ।
एक म्हणती सोनियाची प्रभावळ । देवाभवती शोभली ॥१७॥
एक म्हणती सुवर्ण-सिंहासन । एक म्हणती भरजरी शालू पूर्ण ।
एक म्हणती केशर, कस्तुरीलेपन । कंठी नवरत्न देवाच्या ॥१८॥
काही म्हणती देव उठला । आता बसला, आता जेवला ।
विश्रांति आता करू लागला । विडा घेवोनि एकांती ॥१९॥
देवासि झोपवा मखमलीवरि । दारे लावूनि घ्या बाहेरि ।
पाउले न चुरता कोमल करी । झोप त्यांना लागेना ॥२०॥
सारांश, आपणासि जे आवडे । तेचि देवादिकांसि पुरवावे लाडे ।
मगचि देवाचि प्रसन्नता घडे । ऐसे काही मानिती ॥२१॥
मग ते असोत दुर्गुण, सद्गुण । याचा विचार करतो कोण? ।
अंधश्रध्देच्या प्रवाही लागून । तैसेचि चालती पुढे पुढे ॥२२॥
पदसेवन, अर्चन, वंदन । दास्य, सख्य, आत्मनिवेदन ।
यांचा बहिरंग अर्थ घेवोन । भक्ति करिती सोंगाऐसी ॥२३॥
कोणी विरहभक्तीत रंगती । कोणी संगभक्ति अवलंबिती ।
कोणी आत्मभक्तीची करिती स्तुति । वाटेल तैसी ॥२४॥
कोणी अल्ला बडा की राम बडा । हेचि वितंडिता धरिती नरडा ।
फोडिताति कडाकडा । मूर्ति हाती धरोनिया ॥२५॥
येशूभक्त निंदा करी । म्हणे हिंदूंचा देव व्यभिचारी ।
सोळा हजार करी नारी । कसला देव ? ॥२६॥
करावयाचे ते कोणी न करी । भांडणे करिती घरोघरी ।
वा रे ! मूर्तिपूजेची थोरी । कळली लोकां ॥२७॥



देवाकरिता करोनि भांडणे । कोर्ट-कचेरीमाजी जाणे ।
'सत्य बोलतो' म्हणोनि शपथ घेणे । देवादिकांची ॥२८॥
ऐसे ज्याने त्याने असत्य केले । म्हणोनि जन नास्तिक झाले ।
म्हणती काय होते देव पूजिले । कितीहि तरी ? ॥२९॥
समजण्याची दृष्टीच गेली । म्हणे देवाची प्रतिष्ठा काय उरली ? ।
वरि बैसोनि लघवी केली । उंदिराने ॥३०॥
उलट कोणी म्हणे देव जागृत । भाव धरिल्या पावे त्वरित ।
मी म्हणेन भाव तेचि दैवत । कां न म्हणावे ? ॥३१॥
एके ठिकाणी देव जागृत । बाकी ठिकाणी काय भूत ? ।
कैसी झाली समजूत । उलटी आमची ! ॥३२॥
लोकी जो हा दुजाभाव झाला । तो पुजारी-पंडेगिरीने केला ।
शास्त्रेहि लावोनि आधाराला । समाज नेला अधोगती ॥३३॥
यासीच म्हणविले देवपूजन । पुजारी सांगतील जे जे कथून ।
भाविक ठेवानि बुद्धि गहाण । करिती, कळे देव कैसा? ॥३४॥
जैसी ज्याची भावना । तैसाचि देव त्याचा जाणा ।
तेथे भावनेसि प्रमुखपणा । सहजचि येतो ॥३५॥
आणखी एक मुख्य खूण । ज्या संताने केले देवस्थान ।
त्याच्या थोरपणावर मोठेपण । मानिले लोकी देवाचे ॥३६॥
सज्जनाने दगड पूजिला । इतरांना तो मोठा देव झाला ।
वाढला त्याचा लौकिक भला । यात्रा भरली त्यापरी ॥३७॥
पंढरीसि ज्ञानदेव न जाता । संतांचा मेळा न भरता ।
कोण तेथीचा देव पूजिता ? । सांगा मज ॥३८॥
देव सर्वाठायी सारखा । परि संगतीने भासे प्रिय सखा ।
उत्तम असोनीहि होतो पारखा । लोभी, लबाड पुजाऱ्यामुळे ॥३९॥
ऐसे झाले आम्हामाजी । म्हणोनि भावना वाढली दुजी ।
चुकली देवभजनाची अर्जी । वाढली मर्जी धनाची ॥४०॥
जे धनसंपन्न देवस्थान । त्यासी आले मोठेपण ।
उपासनेसाठी खर्चावे धन । देव प्रसन्न म्हणती तेणे ॥४१॥
परि देव मोठा नव्हे शृंगाराने । देव मोठा नव्हे भव्य देवळाने ।
देव मोठा नव्हे घंटे वाजविल्याने । अहोरात्र ॥४२॥

देव मोठा नव्हे नंदादीपाने । देव मोठा नव्हे होमहवनाने ।
देव मोठा नव्हे साळुंकेने । पर्वताएवढ्या ॥४३॥
देव मोठा नव्हे निसर्गशोभेने । देव मोठा नव्हे महायात्रेने ।
देव मोठा नव्हे वैभव प्रतिष्ठेने । पूजकांच्या ॥४४॥
देव मोठा भावनेने । भावनेच्या उच्चतेने ।
अंतरीच्या उपासनेने । सर्वांसि सारिखा ॥४५॥
मग तो असो कोणीहि देव । तेथे वाया भेदभाव ।
एकाचि चैतन्याचे ओतीव । अलंकार ते ॥४६॥
देव एक असोनि अनंत झाला । नाना रूपे धरोनि नटला ।
परि तो पाहता एकचि दिसला । कार्यरूपाने ॥४७॥
हरि, हरा भेद नाही । एक एकाचे हृदयी ।
राम, रहीम एकचि पाही । देवी - देवहि एकात्मक ॥४८॥
धनुर्धारी झाला राम । मुरली धरता मेघश्याम ।
कटी कर ठेविता सगुण ब्रह्म । विठ्ठल म्हणवी ॥४९॥
सर्व देव एकचि असती । भिन्न साधना करोनि स्मरती ।
भिन्न रूपे धरिली किती । परि तत्त्वतः एकी तयांची ॥५०॥
एकचि व्याप्ति, एकचि दीप्ति । प्रसंगे नाना रूपे धरिती ।
एकाच ध्येयासाठी लाविती । प्राणपणी देव सर्व ॥५१॥
कोणा सज्जना दुःख न व्हावे । कोणी दीन, भुकेले न राहावे ।
यासाठी प्राण समर्पावे । प्रसंग पडता ॥५२॥
ऐसे ज्यांनी अंगे केले । त्याच कारणी धारातीर्थी पडले ।
ते सर्व देव-देवता झाले । मृत्युलोकी ॥५३॥
सज्जनांचे परित्राण । कंटकांचे निर्दालन ।
सत्य, न्याय, सद्‌गुणांचे रक्षण । कार्य हे सर्व देवांचे ॥५४॥
ऐसे असता वितंडणे । देवा-देवांचि करावी भांडणे ।
आपुल्या हौसेसाठी कां बुडविणे । चरित्रदेवतांचे ? ॥५५॥
सज्जने टाळावी ही वृत्ति । आदर द्यावा सर्वांप्रति ।
भिन्न न ठेवावे कोणी पंथी । एकचि असती म्हणोनिया ॥५६॥
सर्वांना मंदिराचे मूळ तत्त्व । आणि उपासनेचे महत्त्व ।
समजावोनि द्यावे देवत्व । कवण्या कार्यी असे ते ॥५७॥



तेणे निरसू लागेल भेद-कल्पना । आकळेल यथार्थ उपासना ।
साधेल आपापल्या देवस्थाना । मूळतत्त्वी सार्थक ॥५८॥
यावरि एकाने केला प्रश्न । देवस्थानांचे मूळ तत्त्व कोण ? ।
ही मंदिरेचि भिन्न-भिन्न । झाली कारण पंथभेदा ॥५९॥
यांच्यावरोनि फिरवावा ट्रॅक्टर । म्हणजे सर्वचि होतील एकाकार ।
काय मंदिरावाचूनि पडेल अंतर । भक्तीत काही ? ॥६०॥
याचे ऐका समाधान । ऐक्य न साधे भावना दुखवून ।
त्यासाठी मंदिराचे तत्त्वज्ञान । उजळणे हेचि उचित ॥६१॥
सुंदर, निसर्गरम्य स्थान । तेथेहि साधे देवाचे भजन ।
मठ, मंदिर नसताहि मोहून । मन पाही देवाकडे ॥६२॥
परि समाधिस्थाने, मठ, मंदिरे । देव-देवळे, देव्हारे ।
यांच्या स्थानप्रभावे स्फुरे । सद्‌भाव मनी सकळांच्या ॥६३॥
म्हणोनि संती घातला पाया । लोकी चारित्र्यनीति वाढाया ।
अभ्यासियांसि एकांत छाया । मंदिरायोगे ॥६४॥
पुरुष व्यवहारी भांबावती । कोठे पुत्र, पौत्रांमाजी कलह होती ।
क्षणभरीहि न मिळे शांति । विचारासाठी ॥६५॥
ऐशा वेळी उपासनास्थळी जावे । महापुरुषांचे स्मरण करावे ।
त्यांचे धारिष्ट्य चिंतोनि घ्यावे । समाधान ॥६६॥
वेळोवेळी विसरे वृत्ति । विचारांचा आठव मंदिरे देती ।
सत्‌कर्तव्य-भावना जागविती । स्थळे ऐसी ॥६७॥
वार्षिकोत्सव, पुण्यतिथी । चातुर्मास्य आणि जयंती ।
सामुदायिकपणे होती । मंदिरस्थानी ॥६८॥
सामुदायिकतेचे साधन । गावाच्या आनंदाचे स्थान ।
पावित्र्याचा उगम पूर्ण । स्थानी ऐशा ॥६९॥
मंदिरे म्हणजे पाठशाळा । चाले शिक्षणाचा सोहळा ।
झाला निधी सर्व गोळा । याच कार्यी लावावा ॥७०॥
जागवावी गाव-संस्कृति । वाढवावी सर्वांत प्रीति, नीति ।
यांची केंद्रे म्हणोनि होती । मठ, मंदिरे सर्वहि ॥७१॥
सर्वांभूती प्रेमभाव । वाढवावा गुणगौरव ।
यासाठीच गावोगाव । मंदिरे केली निर्माण ॥७२॥

ऐसी उच्च धरोनि भावना । झाली मंदिरांची स्थापना ।
परि आज तयांचि रचना । विपरीत दिसे ॥७३॥
मंदिरे, क्षेत्रे दुकाने झाली । पूजा, कमाई करू लागली ।
दक्षणा-पात्रे पुढे आली । पोटासाठी ॥७४॥
मंदिरी बांधती म्हशी - गायी । घाण दिसे ठायी ठायी ।
कसली पूजा, धूपदीपहि? । सारा धुव्वा तंबाखूचा ! ॥७५॥
पुजारी खेळती चौसरी । वेश्यादिकांचे गाणे मंदिरी ।
होती तमाशे-दंढारी । परोपरी देवळांमाजी ॥७६॥
मंदिराचा भव्य वाडा । झाला गुंडांचा आखाडा ।
धाक पडे घालाया मोडा । सज्जनासि ॥७७॥
स्त्रिया बापड्या मंदिरी जाती । अंधानुकरणे ऐकती पोथी ।
सर्व लक्ष रंजनाप्रति । स्थिरत्त्वे कोणी ऐकेना ॥७८॥
पदोपदी भांडणे होती । भोळ्या भक्तांची फजिती ।
धनासाठी ओढाताण करती । पंडे, पुजारी ॥७९॥
ऐशा स्थितीला बसाया आळा । सर्व लोकांनी करावा निर्वाळा ।
मंदिराचा निधी सगळा । समाज-कार्या लावावा ॥८०॥
पुजारी असतील बेढंगे । सांगोनियाहि सरळ न वागे ।
ते बदलावे संघटनेयोगे । सर्व गाव मिळोनि ॥८१॥
पुन्हा सुधारावी मंदिर - योजना । सुरू करावे लोकशिक्षणा ।
गांभीर्य आणावे तया स्थाना । सद्विचार वाढावया ॥८२॥
नवे मंदिर न बांधावे । जुने ते स्वच्छ, सुंदर करावे ।
आहे त्यासचि लावावे । पुन्हा सत्कार्यी ॥८३॥
सावरोनि गलिच्छ पसारा । निर्मळ करावे देवद्वारा ।
प्रसन्न फुले, झाडे, वारा । शांति द्याया उपासका ॥८४॥
उघडावी त्यात वाचनालये । औषधालये, योगविद्यालये ।
उपासनेचि ठेवोनि सोय । सर्वांकरिता ॥८५॥
आपुले आपुले देऊळीच जावे । इतरांनी दुरुनीच पाहावे ।
देव बाटेल ऐसे बरळावे । हे तो असे वेडेपण ॥८६॥
एकाचा देव दुसऱ्यासि शिवे । तरि पाप वाढेल गाडे पेवे ।
म्हणोनि ज्याचे देव त्यानेच पुजावे । म्हणती, न मानावे येरांनी ॥८७॥




हे तो म्हणणे सांप्रदायिकांचे । अल्पज्ञानी व्यापारियांचे ।
माझ्या मते हे विकासाचे । धोरण नव्हे ॥८८॥
ऐसे करणे सोडोनि द्यावे । असतील त्या देवळां निर्मळ ठेवावे ।
सर्व लोकांसि खुले असावे । दर्शनासाठी स्थान ते ॥८९॥
देव असे पतितपावन । तो न पळे पतिताला भिऊन ।
सर्वचि त्याची लेकरे समान । तयालागी ॥९०॥
देवास नाही जात-पात । देव भक्ताचाचि जातिवंत ।
तेथे नसावा अ-भक्तांचा पंथ । देवळामाजी ॥९१॥
देव महार, मांग, चांभार । देव भंगी, लभाणी, वडर ।
देव माळी, ब्राह्मण, कुंभार । सर्व जाती ॥९२॥
देव क्षत्रिय, वैश्य, गोवळी । देवे सृष्टि व्यापली सगळी ।
देवचि देव भूमंडळी । संचला आहे ॥९३॥
म्हणोनि असावे सर्वांचे मंदिर । ब्राह्मण असो वा महार ।
शुध्द करील जो आचार । त्यासि अधिकार मंदिराचा ॥९४॥
देवळाचे पंच गाव । गावचा प्रत्येक मानव ।
मानवांचा वाढेल गौरव । प्रचार व्हावा ऐसाचि ॥९५॥
सर्वांनी एक वेळ ठरवावी । मिळोनिया प्रार्थना करावी ।
प्रार्थनी, उत्सवी भाषणे द्यावी । योग्य ऐसी ॥९६॥
प्रत्येकाला बोलता यावे । सर्वांनी हे अभ्यासावे ।
आपुले सुख, दुःखहि मांडावे । भाषणायोगे ॥९७॥
तैसीच ठेवावी प्रवचने । राष्ट्रीय-वृत्ती वाढे जेणे ।
माणसासि माणसाने । पूरक व्हावे म्हणोनिया ॥९८॥
प्रमाणे द्यावी ऋषिजनांची । आठवण मागच्या इतिहासाची ।
तैसीच बांधावी धारणा पुढची । भाषणायोगे ॥९९॥
कीर्तन, उत्सव, प्रवचन । नुसते नसावे मनोरंजन ।
गावकऱ्यांचे उजळेल जीवन । ऐसे कार्यक्रम करावे ॥१००॥
ऐसे हे मंदिर सजवावे । उपद्रवी लोक बाहेर करावे ।
सत्कीर्ति, सुबुद्धीने भरावे । देवस्थानांसि ॥१०१॥
मानवता-विकासाचे केन्द्र । सात्विक संपत्तीचे आगर ।
ऐसे ठेवावे गावी मंदिर । ग्राम-संस्कृति राखाया ॥१०२॥

शुध्द प्रेम वाढावया । मंदिरांची उपासना या।
उपासनेसि सक्रियता द्याया । लागा सर्व गावकरी ॥१०३॥
नका पाहू पंथ-भेद । नका उकरू नसते वाद।
मंदिरादिकांचा हेतु हाचि शुद्ध । जवळ यावा मानव ॥१०४॥
म्हणोनीच देवाची मध्यस्थी । एरव्ही देवाचीच सर्व क्षिती।
परि जाणिवेने जन लाभ घेती । एरव्ही नाडती प्राणी सारे ॥१०५॥
ती जाणीव द्याया देवस्थान । साधु, संती केले निर्माण।
तेथे शिकावे 'जनी जनार्दन' । हेचि सूत्र ॥१०६॥
कोणत्याही देऊळी जावे । तेथे आपुले उपास्यचि पाहावे।
सर्व रूपी अवलोकावे । एक तत्त्व, हीच निष्ठा ॥१०७॥
सर्व देवांसि आदरावे । जेथे सात्विक पूजेचे गोडवे।
दिव्य गुणकर्मानेचि देवत्व पावे । प्रत्येक व्यक्ति ॥१०८॥
तेथे भेद का मानावा ? । कोणीहि भजो कोणत्या देवा।
'भावचि देव' कळता ठेवा । एकचि लाभे सर्वांसि ॥१०९॥
शंकराचार्ये देव-पंचायतन । मांडोनि साधिले भक्तसंघटन।
इष्टदेवांसह इतरांचे पूजन । कुठले स्थान विरोधासि? ॥११०॥
विरोध देवांचा तर काय । परि जीवांचाहि येथे न साहे।
सर्व जीवी देवचि आहे । म्हणोनि प्रेम द्यावे तयां ॥१११॥
सुखी-समृद्ध करावे गावा । यासाठीच मंदिर-निधी योजावा।
ही सेवाचि आवडे देवा । आपुलिया जीवांची ॥११२॥
जीवांचिया सेवेचे तत्त्व । तैसेच कार्याचे महत्त्व।
आणि स्वरूपाचे दिव्यत्व । सर्वचि देवांचे समान ॥११३॥
ऐसी समान धारणा मनी । धरोनि वागता सर्वांनी।
मठ, मंदिरे, पंथभेद कोणी । आड न येती विकासाच्या ॥११४॥
ऐक्य वाढवाया कारण । होईल प्रत्येक देवस्थान।
करिता शुद्ध तत्त्वे पुनरुज्जीवन । तुकड्या म्हणे ॥११५॥
इतिश्री ग्रामगीता ग्रंथ । गुरु-शास्त्र-स्वानुभव-संमत।
मंदिर-मर्म-कथिले येथ । पंचविसावा अध्याय संपूर्ण ॥११६॥

॥ सद्‌गुरुनाथ महाराज की जय ॥



# ॥ चित्र परिचय ॥



## अ. २६ – स्वामी रामकृष्ण परमहंस

सर्वचि पंथांचे भक्तिप्रकार । तत्त्व साधता असती सार ।
हा आचरोनि दाविला समन्वय सुंदर । रामकृष्ण परमहंसे ॥८०॥

दक्षिणेश्वर (कलकत्ता) येथील मंदिरात मूर्तिपूजा करू लागलेले व अखेर स्वतःच पूज्य बनलेले महापुरुष आर्य देवतांचाच नव्हे तर येशूचा देखील साक्षात्कार करुन त्यांनी उपासनातत्व सिद्ध केले व सर्वांच्या उपासनांना महत्त्व देऊन सर्वधर्मसमन्वय साधला.

● अध्याय सव्विसावा ●

# मूर्ती–उपासना

॥ श्रीगुरुदेवाय नमः ॥

ईश्वर सर्वाठायी व्यापला । तो पंथी नाही विभागला ।
मग उणे–अधिक कोणाला । कां म्हणावे ? ॥१॥
ऐसे ऐकोनि निरूपण । एक श्रोता करी प्रश्न ।
देव विशाल, व्यापक, पूर्ण । मग कां समर्थन मूर्तीचे ? ॥२॥
असो कोणाहि धर्माची खूण । परि मूर्ति मानवांनी केली निर्माण ।
तिथे कोठले देवपण ? । तिचे पूजन कशाला ? ॥३॥
देव कुणाची पूजा नेघे । त्यास नको हे वाउगे ।
स्वये बोलला भक्तासंगे । 'मज हवे शुद्ध प्रेम' ॥४॥
याचे ऐकावे उत्तर । प्रेम निर्मावे एका मूर्तीवर ।
तेचि क्रमाने करावे विश्वाकार । हाच हेतू पूजनाचा ॥५॥
देवाची स्मरणमूर्ति बघता । त्याचे जीवनकार्य ध्यानी आणता ।
शक्ति येते मनासि तत्त्वता । मानसिक संयोगे ॥६॥
मनासि लावावया चिंतन । लागावया मार्गाचे आकर्षण ।
नेमिले असे प्रतिमापूजन । साधु, संती ॥७॥
मनास पाहिजे काही आधार । म्हणोनि आरंभी मानिले साकार ।
देवे व्यापिले चराचर । तेथे मूर्ति तद्रुपचि ॥८॥
परि जो सिद्धांताचा पुरस्कर्ता झाला । त्यासहि जन देव बोलला ।
त्याचीहि प्रतिमा पुजू लागला । भोळेपणाने ॥९॥
जरि पूजिली व्यक्ति मूर्ति । तरी चुकले मी न म्हणे चित्ती ।
परि सिद्धांत वाउगे राखिती । हे तो आहे अज्ञानपण ॥१०॥
सुखासाठी आखिली दिशा । रेखिला घराचा नकाशा ।
परि लाभली शेवटी निराशा । नकाशाचि राखता ॥११॥
घर राहाया नाही मिळाले । नकाशे नकाशेच राहिले ।
तेणे समाधान भंगले । जाणीव होता पुढे पुढे ॥१२॥



तैसेचि झाले मूर्तिपूजेचे । जे जे पंथ दिसती आजचे ।
तेथील साधक मूर्तिपूजेपुढचे । काहीच नेणे ॥१३॥
तो मूर्ति धरोनिच बसला । मूर्खचि समजतो पुढचियाला ।
म्हणतो भ्रष्टाचार झाला । मूर्तिपूजेवाचोनि ॥१४॥
त्यासि कळला नाही धर्म । मूर्तिपूजेचे काय वर्म ।
उगीच वाढवूनि घेतला भ्रम । बिचाऱ्याने अंतरी ॥१५॥
घरी देवाचा कट्टर पुजारी । असत्य करीत असे बाजारी ।
व्यवहार करिता झाला वैरी । ज्याचा त्याचा ॥१६॥
देवळामाजी कान धरी । नाक धरोनि प्राणायाम करी ।
बाहेर येता शिवी दे, कावरी । ज्यासि त्यासि ॥१७॥
देवाद्वारी हवन करी । बाहेर भिकाऱ्यासी मारी ।
पोटा न दे चून–भाकरी । उपाशियाच्या कधीहि ॥१८॥
आमचा देव सत्यचि बोले । परि आम्ही पाहिजे खोटे केले ।
ऐसे असोनि भक्त झाले । म्हणतो आम्ही ॥१९॥
स्वये म्हणवी रामभक्त । नाही 'एकपत्नीव्रत' ।
नित्य पूजितो हनुमंत । व्यसने झाला प्रेता ऐसा ॥२०॥
देव–दुर्जनांसि संहारी । कष्ट करितो भक्तां घरी ।
भक्त बघा हा व्यभिचारी । आळसे घरी झोपतसे ॥२१॥
देव म्हणे 'मी सर्वत्र । दीन, रंक माझे पुत्र' ।
उपासक त्यासि दिवस–रात्र । पिळोनि चैन भोगितसे ॥२२॥
'प्रभु आमुचा पतितपावन' । म्हणोनि कंठरवे करी गायन ।
मानवांसि अस्पृश्य, हीन । मानून डौल मिरवितो ॥२३॥
देवाचिया मूर्तिसाठी । सोने, हिरे बैसवी मुकुटी ।
न दे श्रमिकासि लंगोटी । मंदिर बांधता मेला तरी ॥२४॥
कसले हे देवपूजन ? । मूर्तिपूजेचे विडंबन ।
केवढे शिरले आहे अज्ञान । आपणामाजी ! ॥२५॥
देऊळामाजी करी भजन । बाहेर येता खोटे भाषण ।
ऐशा पुजाऱ्या पुसेल कोण ? । सांगा तरी ॥२६॥
म्हणोनि हे वाईट विसरावे । पूजेने पूज्यासि ओळखीत जावे ।
अभ्यासाने पाऊल टाकावे । पुढे पुढे ॥२७॥

जैसी ज्याची भावना । त्याने तैसीच मानावी देवता मना ।
परि न चुकावी उपासना । सत्कर्माची ॥२८॥
मूर्तिपूजेचा अर्थ एक । आपण मूर्तिच व्हावे सम्यक ।
म्हणजे करावी तैसी वागणूक । अभ्यासाने ॥२९॥
जयाची मूर्ति उपासावी । तयाची चरित्रकथा वाचावी ।
पुढे कामेहि करीत जावी । आपणही तैसी ॥३०॥
काय केले माझिया देवे । मजसी मुळीच नाही ठावे ।
फक्त मूर्तीच धरोनि बसावे । हे वेडेपणाचे ॥३१॥
ऐसी असावी उपासना । उपासनी वाढवावे कर्तव्यगुणा ।
कर्तव्यपूर्तीने मोठेपणा । अंगी घ्यावा मिळवोनि ॥३२॥
संकटे येता कार्यामाझारी । चिंतनी घ्यावे चारित्र्य अंतरी ।
अभ्यासाचे तेज वृत्तिवरि । वाढवावे सर्वकाळ ॥३३॥
चुकलिया संता विचारावे । पुढे कार्य करावयासि धजावे ।
आपुल्यापरीने सुख देत जावे । जीवालागी ॥३४॥
यासाठीच मूतिस्थापना । ठायी ठायी केली जाणा ।
आठवण राहावी साधकांना । म्हणोनिया ॥३५॥
पदोपदी ही पवित्र वृत्ति । म्हणोनि स्थळोस्थळी स्थापिली मूर्ती ।
वृक्ष, पशु, पक्षी, ठरविल्या विभूति । सद्‌भावासाठी ॥३६॥
मनोभावे मूर्तीसि पुजावे । श्रवण, कथन स्मरणादि करावे ।
मूर्तीप्रमाणे सत्कर्म घडावे । आपुलिया अंगे ॥३७॥
सर्व सोडोनि भिन्न भावना । हृदयी धरावी उपासना ।
जेणे प्रसन्नता येई मना । तेचि उत्तम समजावे ॥३८॥
मन जेथे समाधान पावे । तेथूनि शक्तीचे तेज घ्यावे ।
मग कार्यासी लागावे । सद्‌गुणी ऐशा ॥३९॥
सद्‌भावे करावे पूजन । विनम्र करोनिया देह, मन ।
निर्मळ असावे वातावरण । ध्यान धराया देवाचे ॥४०॥
येथे मानसिक पूजेचेच महत्त्व । विचार-सामर्थ्य हे मूळ तत्त्व ।
तेणेचि पावे ईश्वरत्व । जीवालागी प्रयत्ने ॥४१॥
जीवासि मूळ तत्त्व कळावे । सर्वांभूती आत्मरूप समजावे ।
ऐसेचि पूजनाचे गोडवे । वर्णिले संती ॥४२॥



संती बोलिले हरिनाम घ्यावे । हेहि वाटे साधन बरवे ।
परि अर्थ समजोनि जपावे । तरीच सार्थक जीवाचे ॥४३॥
नाम ईश्वराची शब्दमूर्ति । 'मुखी नाम, हाती मोक्ष' म्हणती ।
यज्ञाहूनि थोर जपाची महती । ठाऊक हे सर्वा ॥४४॥
परि कासयासि जपावे नाम? । साधावयाचे ते कोण काम? ।
या ध्येय ज्ञानावाचोनि सर्व कर्म । निरर्थक ॥४५॥
कितीतरी जन नाम घेती । माळा-मणी ओढीत राहती ।
परि क्षणहि त्यांची मति । रामी न रंगे ॥४६॥
मुखे नाम उच्चारिती । व्यवहार अधोगामी करिती ।
पापे करोनि शपथ घेती । देव, धर्माची ॥४७॥
कसले हे नाम जपणे? । स्वार्थे विश्वासघात करणे ।
आशा, तृष्णा न सोडणे । इंद्रियविषयांची ॥४८॥
येथे तारतम्यचि पाहिजे । नाम, जपी, व्रतस्थ होईजे ।
तरी जीवास सुखाचे साजे । स्थान जीवनी ॥४९॥
मुखी नामाचे चिंतन । हाती सेवाकार्य पूर्ण ।
करील चारित्र्य संपादन । तोचि भक्त ॥५०॥
नामे शक्ति येते अंगी । संकटे निवारण्याची प्रसंगी ।
परि पुरुषार्थ असावा जंगी । तरीच फळे ॥५१॥
दुराचार, सज्जन-विरोध । ऐसे दोष आणिती बाध ।
काया-वाचा-मने टाळिले अपराध । तरीच फळे ॥५२॥
मग ते नाम मंदिरी जपावे । अथवा शेतीमाजी घ्यावे ।
चालता, बोलताहि गावे । तरी तो यज्ञ ॥५३॥
मुख्य नामाचे अधिष्ठान । कर्तव्य करावे संपादन ।
हेचि साधावया संतजन । नामजप सांगती ॥५४॥
जे पुरुषार्थ सोडोनि जपती नाम । त्यासि कैसा पावे आराम? ।
हे तो झाले आंधळे काम । देवाद्वारी ॥५५॥
आमुचा राम कामे करी । आम्ही मागावी भाकरी ।
होवोनि फिरावे भिकारी । ही भक्ति कैची? ॥५६॥
रामे असुरांसि मर्दावे । आम्ही पूजापात्र अवलंबावे ।
निर्बल होवोनि शरण जावे । ही भक्ति कैची? ॥५७॥

भक्त म्हणजे विभक्त नव्हे । एकरूपचि होवोनि जावे ।
देवे लोकांचे दुःख हरावे । आम्ही कां करावे देव–देव? ॥५८॥
ऐसा जप जयाने केला । तो शेवटी मूर्खचि राहिला ।
बोल देवोनिया देवाला । काय होते? ॥५९॥
पापक्षालनासि नाम घ्यावे । पुढती पाप करीतचि जावे ।
ऐसे कोण वदले बरवे? । सांगा मज ॥६०॥
ऐसी आहे ज्यांची स्थिती । त्यांसी नामजपी म्हणती ।
मी म्हणेन कलंक लाविती । नामादिकासि ते ॥६१॥
याहूनि न जपे तो पुरवला । उत्तम राहणी ठेवी जो भला ।
दुःख न देईच कोणाला । कोण्या प्रसंगी ॥६२॥
व्यवहार करीतसे कष्टून । जोडोनिया उद्योगे धन ।
सदा राहतो प्रसन्न । खेळीमेळी प्रेमभावे ॥६३॥
असेल ते गरजूंना देणे । कोणा उत्तम–वाईट न म्हणे ।
आपणा ऐसे सर्वांचे जाणे । सुख, दुःख सज्जन ॥६४॥
हेचि शिकावयासाठी । नाम, जप सांगितला उठाउठी ।
सदा राहणी गोमटी । प्रेमळपणाची सर्वांशी ॥६५॥
प्रथम नाम, दुजे चिंतन । तिजे निश्चयी लावावे मन ।
मग होवोनि सत्कार्यप्रवण । समाजसेवा साधावी ॥६६॥
ऐसे सत्कर्म जरी नाचरवे । सद्‌गुण विसरोनि नामहि गावे ।
तरी ते पूर्णतेस न पावे । आत्मोन्नतीच्या ॥६७॥
म्हणोनि संताचिया वचना । निरीक्षोनि ठेवावी धारणा ।
तरीच ग्रंथी कथिल्या त्या खुणा । पावती रामनामाच्या ॥६८॥
देव बोलला–'कामे करा । निर्भय होवोनि देशी विचरा' ।
सकळ देवाचाचि पसारा । सेवाभाव साधा ॥६९॥
जनता ज्याला देवरूप कळली । त्याचीच भक्ति देवा पावली ।
साक्षात्कारे वृत्ति वळली । विश्वात्मभावी ॥७०॥
ते साधाया बोलिले नाम । लाभावया जीवास आराम ।
तुटावया अज्ञान, भ्रम । दुःखमूळ जो ॥७१॥
आपण तरूनि जग तारावे । शक्ति, युक्तीने विश्व भरावे ।
नामे लोकांसि जागवावे । ऐसा आदेश संतांचा ॥७२॥



संतमुकुटमणि तुकाराम । त्यांनी अभंग कथिले अति सुगम ।
मार्ग केला व्यवहारक्षम । भोळयाभाळया जनांसाठी ॥७३॥
अत्यंत साधी गर्जली वाणी । गेली वेदादिकांस भेदोनि ।
भ्रमचि निवारिला तत्क्षणी । अज्ञानी जडजीवांचा ॥७४॥
हजारो मुखातूनि गरजला । 'वेदांत आम्हासीच कळला' ।
'ज्याने पंढरीराज वंदिला । सर्व पावला शास्त्रगुह्य' ॥७५॥
म्हणे 'नको ब्रह्मज्ञानादि भाव । आत्मस्थितीचा गौरव ।
आम्ही भक्त, तू चहूकडे देव । ऐसे करी आम्हासि' ॥७६॥
'कोठोनि आणावी विद्वता? । सेवेचे काम आमुच्या हाता ।
नाम गाऊ कष्ट करिता । पंढरीनाथा पावाया' ॥७७॥
प्रभूने ऐकली त्यांची सेवा । संकटी आला ऐकोनि धावा ।
त्याच्या शब्देहि लोक तरावा । ऐसा केला चमत्कार ॥७८॥
ऐसे झाले संत अनेक । मूर्तिभक्त बहु नामधारक ।
जे सेव्यचि झाले असोनि सेवक । हनुमंतापरि ॥७९॥
सर्वचि पंथाचे भक्तिप्रकार । तत्त्व साधता असती सार ।
हा आचरोनि दाविला समन्वय सुंदर । रामकृष्ण परमहंसे ॥८०॥
नाम जपोनि मूर्ति पूजिता । देवचि झाले देवा भजता ।
पुजू लागले विश्वा समस्ता । स्त्री–पुरुष–भेद विसरोनि ॥८१॥
मुर्तिपूजा जप, तप काही । तत्त्व साधता बाधक नाही ।
हे सिद्धचि केले अनुभवे पाही । संतजनांनी ॥८२॥
उत्तम भाकरी करिता यावी । म्हणोनि मुलीने मातीची करावी ।
तैसी अमूर्त देवाचा मार्ग दावी । मूर्तिपूजा ही ॥८३॥
देव आहे मूळचा अंतरी । त्याची साधना करावी लागे बाहेरी ।
ओळख पटता विचारे पुरी । भिन्नपणा राहीना ॥८४॥
सत्कर्माचे ज्ञान झाले । सत्कर्म करणे अंगी आले ।
मूर्तिपूजेचे साधन संपले । साधकाचे ॥८५॥
राहिले जीवनात तैसे वागणे । देव भजता देवचि होणे ।
देव होण्याचि कारणे । अनुभवोनिया ॥८६॥
माझा देव दयावंत । पुरवी हीन, दीनांचे मनोगत ।
मजसी पाहिजे निष्ठावंत । तेचि केले ॥८७॥

ऐसा जप चाले अंतरी । हाती व्यवस्थेची चाकरी ।
लागला रंग याचिपरी । अहोरात्री देहाला ॥८८॥
आता परोपकारचि उरला । देव अंतरी-बाहेरी भरला ।
पाहणेचि नाही दुसऱ्या कोणाला । कोणे ठायी ॥८९॥
विसरोनि गेले व्यक्तिपण । झाले कार्यरूपचि आपण ।
ऐसे होता देवपण । अंगी आले धावोनि ॥९०॥
नाना विरोधकांस तोंड दिले । नाना कष्ट सहन केले ।
शेवटी सर्वांनी ठरविले । हेचि खरे म्हणोनि ॥९१॥
पूर्वी मूर्तीस शृंगार करी । तैसेचि मानवासि शृंगारी ।
'कष्ट नसो कोणा तिळभरी । गावी माझ्या' म्हणोनि ॥९२॥
हीच खरी देवपूजा । याविण नाही मार्ग दुजा ।
संत, देव बोलिले माझ्या । हृदयामाजी येवोनि ॥९३॥
देव जैसा जैसा आकळला । तैसा देह-अहंकार मावळला ।
लवणकण सागरी मिळाला । सागर झाला एकत्वे ॥९४॥
यापरी पुढची आहे पायरी । जैसी वृत्ति धरोनि चढाल वरी ।
तैसा जीव ब्रह्म होवोनि अंतरी । अनुभव घेई आपणचि ॥९५॥
म्हणे मीचि सर्व आता झालो । विश्वी विश्वाकार होवोनि ठेलो ।
सर्वचि कार्ये करू लागलो । आपणाचि साठी ॥९६॥
माझ्याविरहीत कोणी नुरला । अणुरेणूंमाजी मीचि संचला ।
ऐसा अनुभव येता झाला । पूर्ण योगी ॥९७॥
प्रथम पाहिली देऊळी मूर्ति । पुढे पाहिले जीवजनांप्रति ।
पूर्णता होता सर्वत्र व्याप्ति । आपुल्याचि रूपाची ॥९८॥
ऐसी लाभावया आनंद-ठेव । पूजावयासि मांडिला देव ।
द्रष्टा-दृश्य दर्शनभाव । एकतत्त्वी दिसावया ॥९९॥
हाचि धरोनि निर्धार । केलिया नवविध पूजा-प्रकार ।
पावेल सर्वोत्तम सार । ईश्वर-भक्तीचा ॥१००॥
एरव्ही कितीहि पूजिली मूर्ति । तरी वाढचि घेईल भ्रांति ।
न मिळेल कदाकाळी शांति । जनमनासि ॥१०१॥
नसता वाढेल अहंकार । 'आमची प्रतिमा अधिक थोर' ।
न मिटेल पंथद्वेष साचार । व्यापक ईश्वर जाणल्याविण ॥१०२॥




म्हणोनि प्रतिमा धरोनीच न बसावे । पायरीने वाढत जावे ।
क्रियाशीलपणे विश्वी पाहावे । विश्वंभरासि ॥१०३॥
सर्व लोकचि आमुचा ईश्वर । सर्व गावचि आमुचे मंदिर ।
सेवा करणे निरंतर । पूजा आमुची ॥१०४॥
प्रामाणिकतेने करणे काम । हेचि आमुचे ईश्वरनाम ।
सर्व जीवमात्रासी ऐक्यप्रेम । धर्म हा आमुचा ॥१०५॥
हाची दृढ धरिता निर्धार । परमार्थ याहूनि नाही थोर ।
किंबहुना हाचि परमार्थ-सार । अनुभवियांचा ॥१०६॥
अंगीकारोनि या तत्त्वासि । एक करावे सर्व भक्तांसि ।
लावावे पूजाया ग्राममंदिरासि । तुकड्या म्हणे ॥१०७॥
इतिश्री ग्रामगीता ग्रंथ । गुरु-शास्त्र-स्वानुभव-संमत ।
पूजन, स्मरण-रहस्य कथित । सव्विसावा अध्याय संपूर्ण ॥१०८॥

॥ सद्गुरुनाथ महाराज की जय ॥

"अरे ! तुम्हा उपासकांपेक्षा ही कुत्री तरी फार बरी ! कारण आपला घरमालक कोणत्याही पोषाखात नटून समोर आला, तरी त्यांना त्याच्या मूळ स्वरूपाचा विसर होत नाही. पण तुमच्या परमेश्वराने जरा रूप पालटले की तुम्हाला दुसरेपणा वाटतो व त्याच्या वेगवेगळया नावारूपांवरून तुम्ही भांडत सुटता; याला काय भक्ती म्हणायची ?"

**– स्वामी रामकृष्ण परमहंस**

## ॥ चित्र परिचय ॥



### अ. २७ – प्रेममूर्ति प्रभु येशू ख्रिस्त

येशू-ख्रिस्ताने प्रार्थना केली । सर्वांसाठी शांति मागितली ।
सहनशक्तीची देवता पावली । तयालागी ॥८९॥

पॅलेस्टाईन देशात दोन हजार वर्षांपूर्वी जन्मून ख्रिस्त धर्माची स्थापना करणारा, पाप्यांची शुद्धी, रोग्यांची दुरुस्ती आणि भेदभावांचे उच्चाटन यासाठी देह झिजविणारा प्रेममूर्ती महात्मा. आपल्या शिष्यांसह आत्मशुद्धी व विश्वशांतीसाठी सामुहिक प्रार्थना करणाऱ्या या अहिंसा मूर्तीने स्वतःला खिळे ठोकून मारणारांच्या सुखासाठी प्रार्थना केली.



● अध्याय सत्ताविसावा ●

# सामुदायिक प्रार्थना

॥ श्रीगुरुदेवाय नमः ॥

मूर्तिपूजा, नाम, जप । यांची मूळ तत्त्वे उज्ज्वलरूप ।
परंतु त्यांचा विपर्यास खूप । जाहला लोकी ॥१॥
देवी-देव दिसती जिकडे तिकडे । सांदी-बिंदींचे गोटे,खडे ।
कोणी न बघती तयांकडे । आवडीने ॥२॥
नेमकी प्रभावशाली मूर्ति । जी बघताचि देई स्फूर्ति ।
होईल तात्त्विकतेची पूर्ति । ऐसी दिसे क्वचितचि ॥३॥
तेथेही भाविकतेचा अतिरेक । जेणे बुद्धिमान होती नास्तिक ।
म्हणती हा गोंधळ असे घातक । भक्तीच्या नावे ॥४॥
मूर्ती जयाचे स्मारक । त्याच्या गुणकर्माची नाही भूक ।
मूर्तीच देव ठरवोनि लोक । करिती अति वेडेचार ॥५॥
कोठे काकडआरती, शेजारती । चाले पंचपदी, पूजा, पोथी ।
नाही शिस्त, गांभीर्य, शांति । सात्विक वृत्ति स्फुरेचि ना ॥६॥
एक जाती, एक येती । मध्येच वाकडे उभे राहती ।
फुले, अक्षता कशाहि फेकती । मंत्रपुष्पांजलीच्या ॥७॥
नगारा जातो एकीकडे । टाळ-घंट्यांचा गोंधळ उडे ।
टाळया कसल्या, गारपीट पडे । ऐसेचि वाटे ॥८॥
असल्या बाजाराने काही । उपासनातत्त्व साधत नाही ।
तेथे शिस्त, शांति, सात्विकता येई । तरीच लाभ सर्वांसि ॥९॥
याचसाठी सामुदायिक प्रार्थना । हा मार्ग दाविला जना ।
हीच आजची उपासना । सर्वांचिया हिताची ॥१०॥
श्रोति विचारिला होता प्रश्न । पंथ-भेद मिटाया उपाय कोण ? ।
कैसे राहिल ग्रामजीवन । एकजुटीचे ? ॥११॥
नाना पंथ असती गावी । भिन्न देव-पूजक, वैष्णव, गोसावी ।
नाना जाती-जमाती एकत्वी । कैशापरि वागतील? ॥१२॥

त्यासीही सामुदायिक प्रार्थना । हाचि उपाय असे जाणा ।
जे धर्म-पंथ-संत-देव नाना । एकासनी विराजती ॥१३॥
हा झरा राहील नित्य शुद्ध । तरि गाव होईल सदा सुबुद्ध ।
आणि सामुदायिकतेने समृद्ध । सर्व प्रकारे ॥१४॥
यावरि श्रोती प्रश्न केला । कैसे करावे सामुदायिक प्रार्थनेला ? ।
जेणे सामुदायिकता गावाला । प्राप्त होय ॥१५॥
सद्भावे गावातील जन । करोनिया एक मन ।
कैसे करतील कार्य पूर्ण । सामुदायिक प्रार्थनेचे? ॥१६॥
प्रार्थनी कोणता देव योजावा । जो सर्वांसीच मान्य बरवा? ।
गावाचा जेणे समन्वय व्हावा । कैसा ठेवावा पाठ तेथे? ॥१७॥
मित्रा ! ऐकिले तुझे प्रश्न । तू बोललासि विचार करून ।
वेगवेगळेपणाची आहे अडचण । गावोगावी सर्वांच्या ॥१८॥
वस्तुतः छोटी देव-देवळे । वगळोनि सर्वांनी एके वेळे ।
एकाच देऊळी जमावे भावबळे । प्रशांत ऐशा ॥१९॥
विसरोनि आपुला वेगळेपणा । करावी तेथे उपासना ।
परि हे न ये बहुतांच्या मना । म्हणती आमुचे तेचि थोर ॥२०॥
अनेक मंदिरे, अनेक देवता । विचारे लोकां न पटे एकता ।
त्यांतूनि एक निवडाल कोणता । प्रश्नचि पडे ॥२१॥
हाचि प्रश्न संतांपुढती । पूर्वीहि होता जव पंथ लढती ।
म्हणोनिच विठ्ठल ब्रह्ममूर्ति । ठेविली त्यांनी सर्वांपुढे ॥२२॥
सर्व पंथाच्या संतसज्जनी । केली एकी तये स्थानी ।
ज्ञान प्रेमज्योति पेटविली भुवनी । महाराष्ट्राच्या ॥२३॥
बंगाली तामस भक्तिप्रथा । सुधाराया उजळिली कृष्णकथा ।
चैतन्य-प्रभूने भाविका-पंडिता । विविध पंथा एक केले ॥२४॥
धकाधकीचा काळ पाहिला । संती उपास्यात बदल केला ।
तुलसीदासे, रामदासे दाविला । राम कोदंडधारी ॥२५॥
यापरी देश-कालप्रसंगे । संघटनकेंद्र निवडावे लागे ।
आजच्या काळी जुळवाया धागे । कोणते रूप निवडावे ? ॥२६॥
याचा मागे मी विचार केला । अधिकाधिक अनुभव घेतला ।
शेवटी निश्चयाने निवडला । गुरुदेव माझा ॥२७॥



मी जरी 'गुरुदेव माझा' म्हटला । तरी तो नव्हे माझाचि भला ।
तो सर्व प्राणिमात्रांचा झाला । कल्याणकारी ॥२८॥
त्यास नाही पंथ, पक्ष । सर्व देशी तो सर्वसाक्ष ।
सर्व देवादिकांचा अध्यक्ष । सद्गुरुराजा! ॥२९॥
त्यासि सर्वचि मानव सखे । देश-विदेशींचे एकसारखे ।
नाही धर्म भिन्न त्याचे निके । एकचि सत्य सर्वांमाजी ॥३०॥
जैसा आत्मा नाही भिन्न झाला । तैसाचि गुरुदेव संचला ।
कोणी आकाशाचा तुकडा पाडिला । ऐसे नाही ॥३१॥
सत्य सर्वांचेचि सत्य असते । असत्य ते असत्यचि होते ।
तैसेचि गुरुदेव सर्वांचे ते । एकचि राहती सर्वस्वी ॥३२॥
वैदिक असो वा त्याहूनि इतर । सर्वचि पंथी गुरुदेवाचा आदर ।
इस्लाम, ख्रिस्तादि धर्मीहि थोर । गुरुदेव-भक्ति ॥३३॥
पंथ-प्रचारक गुरू वेगळे । त्यात असते द्वैताचे काळे ।
स्वतंत्र, अनुभवी गुरू निराळे । ते पावती ज्ञानयोगे ॥३४॥
गुरु हाडामांसाचा नोहे । गुरू नव्हे जाति-संप्रदाय ।
गुरु शुद्ध ज्ञानतत्त्वचि आहे । अनुभवियांचे ॥३५॥
हे ज्ञान ज्यासि लाभले । ज्याचे मन विश्वाकार झाले ।
पंथ-पक्ष-धर्म संपले । ज्याच्या ठायी सर्वचि ॥३६॥
तो सर्वांचा झाला सखा । मानवमात्रांचा पाठीराखा ।
कोणत्याही भाषेने पारखा । तरी पावे तयासि ॥३७॥
करी सद्भावना उत्पन्न । दीन-दुःखितांचे पालन ।
मलीन मार्गाचे करी खंडण । काया-वाचा-मनाने ॥३८॥
म्हणोनीच थोरांनी कथिले । गुरुचि ब्रह्मा-विष्णु झाले ।
महेश्वरहि गुरुचि बोलिले । याच सामर्थ्ये ॥३९॥
गुरुचि साक्षात् ब्रह्म कथिला । सर्वांत व्यापोनि गुरुचि उरला ।
ऐसा देव म्हणोनि प्रार्थिला । गुरुदेव माझा ॥४०॥
महापुरुष वेगळाले । परी गुरुत्वी मिळोनि गुरुचि झाले ।
व्यक्तिपण, धर्मपणहि मुराले । गुरू-स्वरूपी ॥४१॥
त्याचे पूजन गंधाने नोहे । त्याचे मंदिर विशाल आहे ।
विशालतेला मर्यादा राहे । परि गुरू त्याहुनि अमर्याद ॥४२॥

भूमंडळ ज्याचे क्षेत्र पूर्ण । सर्व पृथ्वी जयाचे आसन ।
चंद्र-सूर्य नंदादीप जाण । गुरुदेवाचे ॥४३॥
त्यातचि धर्म-पंथ सामावती । तोचि वेष्टिला सर्वांभवती ।
त्याचेवाचूनि नाही रिती । जागा कोणी ॥४४॥
त्याचे ज्ञान झालिया जीवा । कोठे द्वेष-कलह-हेवा? ।
सुख, शांतिचा लाभे विसावा । सर्वाठायी ॥४५॥
म्हणोनि हेचि व्हावया ज्ञान । विशाल मने रचिले साधन ।
सामुदायिक प्रार्थनेचे स्थान । सामुदायिकपणास्तव ॥४६॥
तेथे सामुदायिक देव कल्पावा । पुढे कार्यातचि अनुभवीत जावा ।
मग विश्वाकार पाहावा । गुरुदेव माझा ॥४७॥
हे झाले गुरुदेवाचे वर्णन । आता ऐका प्रार्थना-साधन ।
गाव व्हावया उन्नत पूर्ण । तैसेचि स्थान शोधावे ॥४८॥
विशाल मंदिर वा गुरुदेव चौक । जेथे बसतील जन सकळीक ।
महिला, पुरुष, मुले भाविक । सद्भावाने सायंकाळी ॥४९॥
प्रथम अधिकारी सेवकाने । घेवोनि हातामाजी झाडणे ।
त्वरित करावे मैदान निर्मळवाणे । प्रार्थनेसाठी ॥५०॥
येता प्रत्येक गुरुवार । जाऊनि फिरावे घरोघर ।
बोलवावी प्रार्थना-स्थानी सत्वर । जनता सारी ॥५१॥
आई-बाई सकळ सज्जन । मुले-बाळे, वृद्ध-तरुण ।
देवोनिया निमंत्रण । बोलवावे प्रार्थनेसि ॥५२॥
गावी सर्वांसि निरोप द्यावा । परस्परे समाज सारा जुळवावा ।
येतांना घोंगडी, गोणपाट आणावा । आपापला म्हणोनि ॥५३॥
सकळांनी करावी बिछायत । सर्वांना रांगेत बैसवावे शांत ।
सद्भावना वाढे सकळांच्या मनात । प्रार्थनेची ॥५४॥
सात्विक असावे वातावरण । अति शांत ऐसे गंभीरपण ।
सर्वांनी करावे बंद संभाषण । तया स्थानी ॥५५॥
आधी पुढे मांडावे अधिष्ठान । त्यावरि आच्छादावे सुंदर आसन ।
आपुल्याच गावी केलेले पूर्ण । कलाकुसरीने खादीचे ॥५६॥
वरि ठेवावा तकिया साजिरा । जैसा कोणी बसतोच आसनी बरा ।
दिसावा ऐसा मोहक पसारा । सात्विकतेचा ॥५७॥



जवळचि बसावे सूचक, गायक । तिसरे भाषण देणारे भाविक ।
दुसऱ्या बाजूने पुजारी, पाठक । नामधून म्हणावया ॥५८॥
ऐसा प्रार्थनेचा संच झाला । चहुबाजुंनी सेवकगण बसला ।
पाठीमागे संरक्षक दिसला । उभा तेथे ॥५९॥
तयाचे काम शांतता राखणे । भोवताली गलबला थांबवणे ।
सर्वांना शिस्तीमाजी बसवणे । हळुवारपणे ॥६०॥
जे कोणी येतील मागाहून । त्यांना बसवावे क्रमाने पूर्ण ।
मग करावे घंटीवादन । दोनचि ठोके ॥६१॥
उभा राही अधिष्ठानापुढे पुजारी । लावी शांतिने धूपदीपिका बरी ।
मग सूचक उभा राहतो सामोरी । सूचना द्याया प्रार्थनेची ॥६२॥
सर्वांमिळोनि पाठ करवी । एकस्वरे शांतता भरवी ।
ऐसी प्रार्थना लावील चवी । अंतःकरण मोहावया ॥६३॥
सहज लागेल तिकडे ध्यान । ऐसे चालावे प्रार्थनी गायन ।
पुढे होईल नामस्मरण । गुरुदेवाचे ॥६४॥
ज्यात असेल कुणीहि नाम । निवारोनि भेद, भ्रम ।
सर्व धर्मी भाव सम । राखावया सर्वांचा ॥६५॥
हे संपता भाषणासाठी । देईल सूचक सूचना ओठी ।
मग भाषणाधिकारी शेवटी । देईल भाषण सद्भावे ॥६६॥
''आपण सर्व एकचि आहो । मग भिन्नपणा कासया पाहो? ।
सर्वांशी सहकार्य करा हो! । कुटुंबापरी ॥६७॥
मानव विश्वकुटुंबाचा घटक । ऐसे समजोनि वर्तावे सम्यक ।
शक्ति द्यावया प्रार्थावी भाक । शक्तिवंतापुढे ॥६८॥
सर्व संत एकचि असती । सर्व देव एकचि निश्चिती ।
सर्वांचे संदेश ऐकता पावती । एकचि तत्त्व सर्वहि ॥६९॥
म्हणोनि सर्वांनी सहकार्य करावे । जैसे ज्याकडोनि बनेल बरवे ।
संसारा स्वर्गासमान बनवावे । आपुल्यापरी ॥७०॥
हेचि सांगावे प्रार्थनेवरि । यातचि आहे सेवा ईश्वरी ।
याहूनि भिन्न नाही कुसरी । परमार्थाची ॥७१॥
हे भाषण झालिया पूर्ण । मग शांतिपाठ सर्वांनी करोन ।
करावे एकनिष्ठेने नमन । एकाच पद्धतीने ॥७२॥

सूचकाने सूचना द्यावी । सर्व मंडळी उभी करावी ।
जयघोषे दुमदुमवावी । ऊर्वि अवघी ॥७३॥
गुरुदेवाचा जयजयकार । त्यात ये सर्व देव-नमस्कार ।
ऐसे प्रार्थनेचे तत्त्व सुंदर । बोलिलो तुम्हां ॥७४॥
चौकी प्रार्थना संपल्यावरि । आपापली घोंगडी, पासोडी बरी ।
उचलूनि न्यावी आपुल्या घरी । सेवा पुरी करोनिया ॥७५॥
येथे प्रार्थनापाठ नाही बोलिला । तो विषय अन्य ग्रंथी आला ।
म्हणोनि येथे नाही विवरिला । पाहावा 'सक्रियपाठी' ॥७६॥
मित्र हो ! ऐका माझे वचन । जरि व्हावे वाटे गावाचे कल्याण ।
तरि सामुदायिक प्रार्थना-साधन । सोडू नका कधीहि ॥७७॥
एवढे अनुभवे सांगोनि ठेवतो । प्रार्थनाच मी गावाचे धन समजतो ।
यानेच स्वर्ग, मोक्षहि पावतो । समाज आपुला ॥७८॥
आमचा देव समाजी वसतो । समाजाकरिता सर्व करतो ।
सर्वांत व्यापूनि राहतो । प्रार्थनेच्या आसनी ॥७९॥
तो भेटतो जनकार्यांनी । आम्ही केली प्रार्थना म्हणोनि ।
भरली भावना आत्मा ओतोनि । प्रार्थनी या ॥८०॥
आपण होता प्रश्न पुसला । म्हणोनि ऐसा विस्तार केला ।
प्रार्थनी तल्लीन होताचि देव कळला । विशाल स्वरूपी ॥८१॥
त्या मूलतत्त्वाचा जो अनुभव । ज्ञानगम्य विश्वात्मक देव ।
तोचि मानिला गुरुदेव । प्रार्थनी आम्ही ॥८२॥
त्या गुरुदेवाच्या अधिष्ठानावरि । मूर्तिच हवी असेल जरी ।
कल्पावी आपापल्या इच्छेपरी । कोणत्याही देवाची ॥८३॥
देव गुरुदेवात सामावले । भक्त तेवढे प्रार्थनी एक झाले ।
मानवतेचे मंदिर उघडले । विश्वामाजी या रूपे ॥८४॥
एकाचि प्रार्थना अनेका मिळाया । अनेकांची प्रार्थना अनंत कळाया ।
अनंत तत्त्वी एकत्त्व पावावया । प्रार्थना आहे ॥८५॥
हे समजोनिच हा मार्ग धरिला । आदर द्याया भिन्न धर्म, पंथाला ।
पूज्य मानावया सर्व संताला । प्रार्थनेमाजी ॥८६॥
यासाठी व्यापक प्रार्थना मांडली । उपासकांची वेली गुंफली ।
कळावया सर्व धर्माची खोली । मूळ रूपे ॥८७॥



वेद-उपनिषदांची प्रार्थना । 'सुख हो सर्वचि प्राणिजना' ।
सर्वांची उन्नति हीच धारणा । प्रार्थनेमाजी ऋषींची ॥८८॥
येशू ख्रिस्ताने प्रार्थना केली । सर्वांसाठी शांति मागितली ।
सहनशक्तीची देवता पावली । तयालागी ॥८९॥
महंमदाने केली प्रार्थना । विखुरला इस्लाम कराया शहाणा ।
संघटित केले त्याने स्वजना । तया काळी ॥९०॥
पावित्र्य शिकविले झरतुष्ट्राने । संयम शिकविला महावीराने ।
अहिंसक संघ वाढविला बुद्धाने । प्रार्थनेद्वारे ॥९१॥
संतांचे नामसंकीर्तन । ते सामुदायिक प्रार्थनेचेचि रूप जाण ।
सर्व देव-स्मरणे करोनि संघटन । दिले ज्ञान सर्व जना ॥९२॥
कलियुगी भक्ति-महिमान । भजन आणि संकीर्तन ।
यज्ञात श्रेष्ठ नामजप यज्ञ । प्रार्थनेत आले ते सारे ॥९३॥
मूर्ति उपासना आणि ध्यान । नवविधा भक्तीचा सार पूर्ण ।
प्रार्थनी सर्वचि साधे साधन । सर्व जनांसि ॥९४॥
शिस्त, शांति, गांभिर्यादि गुण । उठण्या-बसण्या-बोलण्याचे ज्ञान ।
लाभे मानव्याचे शिक्षण । प्रार्थनेमाजी ॥९५॥
प्रार्थना मानव्यशिक्षणाची शाळा । ग्रामसंस्कृतिचा मुख्य जिव्हाळा ।
भेद-कल्पना जाती रसातळा । प्रार्थनेच्या मुशीमाजी ॥९६॥
'सर्वचि आपण बंधुजन' । हा भाव वाढ घे मनोमन ।
गावाची स्वर्गीयता असे अवलंबून । याचवरि ॥९७॥
सकळांस कळाया ही संस्कृति । उपदेश द्यावा प्रार्थने अंती ।
ही नित्य ठेवावी चालीरीति । गावी आपुल्या ॥९८॥
ही प्रार्थना गावी राही जागती । तरि जिवंत राहील गावसंस्कृति ।
सामुदायिकतेची दीपज्योति । प्रकाशेल सर्व काळ ॥९९॥
विश्वी होऊ शकेल शांतता । तेथे गावाची कोण कथा? ।
सामुदायिक प्रार्थनाच करील एकता । नित्यासाठी, तुकडया म्हणे ॥१००॥
इतिश्री ग्रामगीता ग्रंथ । गुरु-शास्त्र-स्वानुभव-संमत ।
कथिली प्रार्थना ग्रामोद्धारार्थ । सत्ताविसावा अध्याय संपूर्ण ॥१०१॥

॥ सद्‌गुरुनाथ महाराज की जय ॥

तो परमपिता परमेश्वर एक आहे, आपण सर्व त्याची लेकरे आहोत. आपणापेक्षा कोणालाही कमी लेखू नका, आपणावर कसोटीचा प्रसंग येऊ नये म्हणून उठा, त्याची प्रार्थना करा. तुम्ही सर्वांना प्रेम द्याल तरच ईश्वराच्या प्रेमास पात्र व्हाल!''

**– प्रभू येशू ख्रिस्त**

## ॥ चित्र परिचय ॥



### अ. २८ – श्रीसंत साईबाबा

जगी नांदावी सुखशांति । सर्वांनी आचरावी बंधुप्रीति ।
यासाठीच झटले असती । महापुरुष अभेदत्वे ॥७९॥

ब्राह्मणकुळी जन्मून फकीरास अर्पण झालेले व १९० या शतकारंभी शिरडी येथे प्रसिद्धीस आलेले महान तपस्वी संत. "मी सर्वव्यापी आहे, माझ्या भक्तांनी मला सर्वात पहावे" या धारणेचा उपदेश आपल्याकडे येणाऱ्या इस्लाम, हिंदु, पारशी, ख्रिस्ती, जैन आदि सर्वच धर्माच्या भक्तांना करून या विश्वधर्मी महात्म्याने सर्वांच्याच सुखासाठी आपली शक्ति–सर्वस्व वेचिले.



● अध्याय अठ्ठाविसावा ●

# प्रार्थना व विश्वधर्म

॥ श्रीगुरुदेवाय नमः ॥

सर्व धर्मांचा समन्वय । विश्वशांतीचा उपाय ।
लोकसुधारणेचे विद्यालय । 'सामुदायिक प्रार्थना' ॥१॥
ऐसे झाले प्रतिपादन । परि आमचा ऐका प्रश्न ।
सर्वधर्मांची प्रार्थनापद्धती भिन्न । ते होतील एक कैसे? ॥२॥
कैसा रुचेल एक पाठ? । प्रत्येकाची वेगळीच वाट ।
कैसे बसतील एकवट । भक्त भिन्न देवांचे ? ॥३॥
दुसऱ्या धर्मियांमाजी बसता । झाली वाटे धर्मभ्रष्टता ।
यासाठी उपाय सांगा कोणता । सामुदायिकतेसि ? ॥४॥
श्रोतियांचा ऐकोनि प्रश्न । संक्षेपे करितो उपाय कथन ।
लोकां पटवावे तत्त्वज्ञान । सद्धर्माचे नानापरी ॥५॥
जगी दिसती विभिन्न धर्म । परि सर्वांचे एकचि वर्म ।
विश्वधारणेचा मार्ग उत्तम । सद्धर्म तोचि ॥६॥
व्हावी विश्वाची उत्तम धारणा । शांति लाभावी सर्व जना ।
या एकाच उद्देशाने प्रयत्न नाना । केले धर्मप्रवर्तकांनी ॥७॥
'सर्व विश्व आर्य करीन । तिन्ही लोक आनंदे भरीन' ।
हे संत, ऋषींचे विशाल बंधुपण । नव्हते स्वार्थासाठी ॥८॥
लोक प्रतिमापूजक नसावे । त्यांनी एका ईश्वरासि प्रार्थावे ।
हा महंमदाचा उपदेश, नव्हे । एकाच देशासाठी ॥९॥
येशू ख्रिस्ताने प्रेमपाठ दिला । प्राणहि पणास लाविला ।
तेथे अन्य मानव नाही वगळला । कळपातूनि देवाच्या ॥१०॥
बुद्ध आणि महावीर । श्रीकृष्ण आणि झरतुष्ट्र ।
यांनाही सर्वांचीच फिकीर । विश्व सुखी होवो म्हणोनि ॥११॥
त्या त्या देश, धर्माच्या संती । हीच व्यापक धरोनि वृत्ति ।
विशाल मानवसमाजाप्रति । सेवा दिली आपुली ॥१२॥

अन्य देशांचे आणि भाषांचे । झालेले आणि होणारे साचे ।
थोर पुरुष गौरविले त्यांनी वाचे । आपुल्या ग्रंथी ॥१३॥
धर्मभ्रष्टतेची कल्पना । ही मान्यचि नव्हती धर्माचार्यांना ।
सर्व विश्वाचीच त्यांना । काळजी होती समान ॥१४॥
सर्व विश्वाचा एकचि देव । त्याची मुले सर्वचि जीव ।
जरी वेगवेगळे दिले नाव । तरी भाव हाचि त्यांचा ॥१५॥
हिंदूंचा देव हिंदुत्व धरी । मुसलमानांचा मुस्लिम करी ।
ख्रिश्चनांचा ख्रिस्त्यांनाचि तारी । ऐसे म्हणणे आकुंचित ॥१६॥
सर्वात उच्च ऐसी भावना । जगच्चालकाचे कल्पना ।
तेथे कैचा उरे भिन्नपणा? । आप-पर कोण? ॥१७॥
भिन्न मार्ग-मार्गी असती । परि देव नाही भिन्नस्थिती ।
मूळ धर्माचाहि नाही गति । भिन्नत्वाची ॥१८॥
सर्वचि म्हणती जगत सारे । केले आमुच्या ईश्वरे ।
धर्माचा आदेश श्रेष्ठाद्वारे । दिला आम्हां ॥१९॥
ऐसे सर्वाधिपति ईश्वर । काय जगी असती शंभर ? ।
एकचि जगच्चालक परमेश्वर । तोचि सर्वांचा ॥२०॥
अल्ला, गॉड, अर्हंत, देव । अहूरमज्द, निर्वाण, शिव ।
परमेश्वरासि ठेवा नाव । एक गुरुदेव तोचि माझा ॥२१॥
जगासि सुखी, उन्नत करावे । हेचि त्या जगन्नियंत्या रुचावे ।
मग धर्माचे रूप याहूनि असावे । भिन्न कैसे ? ॥२२॥
आपणा ऐसे सर्वांचे सुख, दुःख । जाणोनि वागावे उपकारक ।
सर्व धर्मी हाचि आदेश एक । दुमदुमताहे ॥२३॥
याचा करू जाता विचार । सर्व पंथ, धर्म, भक्ति-प्रकार ।
एकतत्त्वी कळती साचार । भेद भक्तांनी कां घ्यावा? ॥२४॥
ज्याची बुद्धि अल्पबल । ते घरात करिती घरकुल ।
परि हे विश्व एकचि दल । मानवांचे ॥२५॥
एकचि भूमि सर्वांकरिता । एकचि हवा-पाणी, सुख-व्यथा ।
पंचभूतांचीच सर्वथा । शरीरे सर्वांची ॥२६॥
एकचि जीवनाचे मूळ । एकचि शेवटचे स्थळ ।
एकचि सेवाधर्म निर्मळ । नाना रूपीं ॥२७॥



सर्वांच्या नेत्री एकचि ज्योति । सर्वांच्या अंगी एकचि शक्ति ।
सर्वांठायी एकाचीच व्याप्ति । तेथे भिन्न कोण आले ? ॥२८॥
मुस्लीम, ख्रिस्ती जमात काही । आकाशातून आली नाही त्यांचेपूर्वीहि ।
होती मही । मानवांनी नटलेली ॥२९॥
एकाचे जग देवाने केले । आणि एकासि भूतांनी जीवन दिले ।
ऐसे मानता जग वेगळाले । दिसेना पंथ, धर्मांचे ॥३०॥
धर्मात नाही हिंदु-मुसलमान । धर्मात नाही पारशी-ख्रिश्चन ।
धर्मात नाही शिख-जैन । पाहता मुळी ॥३१॥
लोक धर्माची व्याख्याच विसरले । धर्मे हिंदु-मुसलमान झाले ।
मूळचे मानवपणहि आपुले । हरविले त्यांनी ॥३२॥
देश, भाषेचे बुरखे घातले । हवा, पाण्याने रिवाज बदलले ।
त्या बहिरंगासीच धर्म म्हणो लागले । अल्पज्ञानी ॥३३॥
देशाचारी राहणी झाली । हवापाण्यापरी विशेषता आली ।
उत्पादनापरी आरंभिली । भोजन व्यवस्था ॥३४॥
म्हणोनि काय मानवत्वहि बदलले ? । सत्य सिद्धांतीहि अंतर पडले? ।
पाप दुःखहि उचित वाटले । उलटे कोणा? ॥३५॥
हे म्हणणे मला आवडेना । मी एकचि मानतो सर्वांना ।
आधी मानवता सर्वांचा बाणा । पंथ-भेदांना स्थान मग ॥३६॥
भिन्न राहणी, भिन्न उपासना । म्हणोनि का पारखा मानवपणा? ।
जरी भिन्न पद्धतींनी केली प्रार्थना । तरी काय झाले? ॥३७॥
एकाचि सागराची वाफ । होऊनि आली पाणीरूप ।
थेंब कामे करोनि खूप । जातील शेवटी एका स्थळी ॥३८॥
तैसेचि आहे मानवांचे । मानव कोणत्याहि धर्माचे ।
परंतु समाजरचनेसाठी त्यांचे । महत्त्व सारिखे ॥३९॥
आदि-अंती सर्वचि एक । मध्ये समाजसेवेचे कौतुक ।
त्यांचेहि मूल्य समान देख । मानवधर्म-दृष्टिने ॥४०॥
धर्म सांगे पुजारी व्हावे । धर्मचि सांगे भंगी व्हावे ।
धर्म म्हणतो गावे - नाचावे । सर्वांसाठी ॥४१॥
ऐसे वेगवेगळे कर्म केले । तरी परकेपण नाही ठेविले ।
सर्व मिळोनि एक झाले । तोचि धर्म ॥४२॥

धर्मामाजी सर्व येते । परंतु तारतम्य पाहिजे तेथे ।
मानवाशी होय विद्रोह ते । न करावे, धर्म म्हणे ॥४३॥
धर्माची आखणी मानवता । मानवतेसाठी करावी व्यवस्था ।
कोठेहि होता अव्यवस्था । धावोनि जावे ॥४४॥
ही व्यवस्था जेव्हा अपुरी पडली । तेव्हाचि गटवृत्ति निर्माण झाली ।
व्यक्तित्वाची प्रलोभने वाढली । भिन्न मार्गांनी ॥४५॥
विश्वाचे ऐसे झाले तुकडे । कोणीहि गेला कोणीकडे ।
नाव, रूप धरोनि वेडेवाकडे । फुटला धर्म ॥४६॥
देशकालादिकासि बघून । केली साधने निर्माण ।
त्या फांद्यांनाचि धर्मवृक्ष मानून । आखणी झाली गटांची ॥४७॥
म्हणोनि पडले विभिन्न नाम । हिंदु-मुसलमान-ख्रिश्चन धर्म ।
जैन-शिख-महानुभाव-ब्राह्म । नामे धर्मामाजी ॥४८॥
अजोनि खुंटली नाही संख्या । जेवढे पंथ, संप्रदाय-व्याख्या ।
सर्वांसीच धर्मनामआख्या । पुढे लागे ॥४९॥
घराघराचा अलग धर्म । धर्म एकेक व्यवहारकर्म ।
'आपले जगणे' हेचि सत्याचे वर्म । ऐसा भ्रम जाहला ॥५०॥
ऐसी जंव वाढली प्रथा । तव झाली सर्वांसीच व्यथा ।
मग म्हणती विरोधी धर्म, पंथा । केले पाहिजे शासन ॥५१॥
हे आवराया निर्मिली सत्ता । साम, दाम, दंड, भेद-प्रथा ।
हा राजधर्महि लावण्यासि व्यवस्था । मानवांची ॥५२॥
जे धर्ममार्गी संघटित झाले । त्यांनी न्यायसत्र आरंभिले ।
आपापल्यापरींनी केले । स्थापन राज्य ॥५३॥
राज्य केले धर्मासाठी । परि उपभोगचि लागला पाठी ।
लागली अहंतेची आटाआटी । आसक्तीमुळे ॥५४॥
मग धर्मचि वगळूनि गेला । राजकारण धर्म झाला ।
त्यासाठी गलबला वाढला । सर्व देशी ॥५५॥
विसरोनि सेवाधर्माचे अधिष्ठान । राज्य करावे हेचि मोठेपण ।
राबवावे मानवाने मानवा पूर्ण । ऐसे झाले ॥५६॥
मग मानवाच्या सुखासाठी । मानव द्यावेत बळी संकटी ।
पडली ऐसीच राहाटी । लोकांमाजी ॥५७॥



गेले प्रेमाचे समजावणे । लागले तलवारीस धार देणे ।
जो करील हिंसा अधिकतेने । तो विजयी ठरला धर्मवान ॥५८॥
सत्ताबळ, संख्याबळ । त्यावरि धर्म ठरला प्रबळ ।
तेथे सत्याचे फुटले कपाळ । शक्तियोगे ठरता धर्म ॥५९॥
मग धर्मचि झाले हतियार । धर्माकरिता युद्ध, संहार ।
धर्मयुद्धाचे बंड थोर । वाढले लोकी ॥६०॥
सत्य, त्याग, सेवेसि कोणी पुसेना । आपुलीच मते मिरविती नाना ।
ऐसा हा झाला धिंगाणा । पृथ्वीवरि ॥६१॥
बिघडोनि गेली धर्माची रीति । ती सुधारावया अपुरी शक्ती ।
म्हणोनि देवादिकांनाहि हाती । शस्त्रे धरावी लागली ॥६२॥
ते धर्मयुद्ध न्यायाचे होते । उन्मत्तता मुळीच नसे जेथे ।
'बळी तो कान पिळी' हे तेथे । लावणे हा अधर्म ॥६३॥
न्यायदानात द्वेष, पाप नसते । परि जेव्हा आसक्ति देशाची घेरते ।
तेव्हा माणसाची बुद्धि जाते । विनाशाप्रति ॥६४॥
मग युद्ध राष्ट्राची अरेरावी । घमेंड कुटिलतेच्या उठाठेवी ।
अधर्म तो जरि असे युद्धचवी । कोणाचीहि अन्यायी ॥६५॥
माणूस माणसासि मारी । अपराध नसता दमन करी ।
ते युद्धहि परि दुराचारी । बोलिले शास्त्री धर्मांचेहि ॥६६॥
हा न्याय जेव्हा सकळांना कळे । तेव्हा थांबे युद्धाचे वारे सगळे ।
मानवसमाज माणुसकीशी मिळे । न्यायदेवतेपुढे ॥६७॥
जे युद्धांचे तेचि लहान झगड्यांचे । तैसेचि कुटुंबामधील कलहांचे ।
हे सारे प्रदर्शन अज्ञानाचे । वेगळाल्यापरी ॥६८॥
धर्म, पंथ आणि पक्ष, देश । यांच्या नशेचा अभिनिवेश ।
धर्मवेडे करोनि मानवास । न्यायमार्गे जाऊ नेदी ॥६९॥
जेव्हा मुसलमान राज्य करी । तेव्हा देवळे पाडोनि मशिदी उभारी ।
आपण शहाणे म्हणोनि वाजवी भेरी । लौकिकामाजी ॥७०॥
त्यांची सत्ता विलया गेली । तेव्हा हिंदूने मसजिद पाडली ।
आपलीशी करोनि सोडली । दुसऱ्या पंथी ॥७१॥
जेव्हा ख्रिश्चनाचे बंड आले । तेव्हा त्याने चर्च वाढविले ।
आपुले जाळे पसरोनि दिले । मनमाने त्यांनी ॥७२॥

रागद्वेषांचे समाधान । अभिलाषापूर्तीचे साधन ।
म्हणोनि केले युद्ध वा दमन । सूडबुद्धिने ॥७३॥
हा तो नव्हे धर्मविचार । हा आहे शक्तीचा व्यवहार ।
धर्मात मान्य नाहीच संहार । निरपराध मानवांचा ॥७४॥
धर्मात आहे सुव्यवस्था । शांति, बुद्धि, न्यायप्रियता ।
अहिंसेने समजाविता । होतो धर्म श्रेष्ठ ऐसा ॥७५॥
मानव मानवासाठी कष्टतो । दुसऱ्याच्या सुखी सुखावे, श्रेष्ठ तो ।
परि मानवास मानव संहारतो । अधर्म याहूनि कोणता ? ॥७६॥
हेचि जयांना अंतरी कळले । तेचि महामानव समजले गेले ।
मग कोणतेहि पंथ, धर्म जरी असले । सर्व चांगले आम्हांलागी ॥७७॥
सर्वचि धर्म, पंथांचे देव । धर्मप्रवर्तक महामानव ।
यांचा ऐसाचि असे भाव । व्हावे मानव सर्व सुखी ॥७८॥
जगी नांदावी सुखशांति । सर्वांनी आचरावी बंधुप्रिती ।
यासाठीच झटले असती । महापुरुष अभेदत्वे ॥७९॥
धरोनि हाचि विशाल हेत । कालानुसार काढिले पंथ ।
केला उपदेश, लिहिले ग्रंथ । परोपरी त्यांनी ॥८०॥
याचसाठी आजवरि झाली । कुराणे, पुराणे, धर्ममतेहि भली ।
परि अजूनिहि नाही आकळली । खोली याची सर्वांना ॥८१॥
पूर्वीपासूनि प्रयत्न झाले । न कळणारांनी विरोधिले ।
अजूनिहि प्रयत्न चालले । याचि मार्गाचे ॥८२॥
आम्ही आहोत प्रयत्नवादी । देवादिकांचे विशाल संवादी ।
जगासि तैसी लाभो सद्बुद्धि । म्हणोनि प्रार्थना आरंभिली ॥८३॥
यात नवीन नाही गोविले । पूर्वीच्या धर्माचे हद्गत भले ।
तेचि एकत्र करोनि ठेविले । वेगळ्या स्वरूपे ॥८४॥
सर्वचि थोरांचे थोर विचार । सर्वांच्या पद्धतींचा सार ।
करोनि ठेविला गुच्छाकार । समाजापुढे ॥८५॥
ज्यात परस्परांचे समाधान । जेणे सकलांचे सुंदर जीवन ।
तेचि साधावया अनुसंधान । प्रार्थना केली ॥८६॥
समन्वयकारी प्रार्थनापाठ । ही नव्हे पोलादी चौकट ।
येथे प्रत्येकासि वाव असे स्पष्ट । आपुले गोवाया ॥८७॥



तात्त्विकता कुठूनहि घ्यावी । आपुलीच 'एक टांग' नसावी ।
सर्वांच्या समाधानाची ठेवावी । सहनशील बुद्धि ॥८८॥
ऐसी प्रार्थनाच शांति-प्रभावी । शांतीसाठी विशालता हवी ।
विशालतेसाठी सोय व्हावी । परस्परांची ॥८९॥
परस्परांच्या हृदयासि स्पर्शता । जवळ येईल आत्मीयता ।
तेणेचि विश्वासि प्रेमे जिंकता । होईल प्राप्ति सुखशांतीची ॥९०॥
धर्म-पंथ-देशांचे भांडण । न मिटे ऐक्य-प्रेमाविण ।
ते प्रेम साधाया प्रार्थनेसमान । पातळी नाही उत्तम ॥९१॥
सर्वचि धर्मी प्रार्थनातत्त्व । सात्त्विकतेतचि टिकाऊ एकत्व ।
याचे जाणोनिया महत्त्व । आणावे सर्वां एकेठायी ॥९२॥
परस्परांचा संबंध नव्हता । म्हणोनि पद्धतीत बदल होता ।
त्यास आता जवळ आणता । पाप कैसे? ॥९३॥
सर्व विश्वाची एकचि प्रार्थना । सर्व विश्वाचा एकचि बाणा ।
सर्व विश्वातचि एकपणा । कां न यावा? ॥९४॥
न येण्याचे एकचि कारण । आकुंचित आमुचे ज्ञान ।
म्हणोनि आपापल्या परीने मंडण । केले असे धर्माचेहि ॥९५॥
देवापासूनि एक होती । तेचि विशाल मन करिती ।
अल्प ज्ञानियापाशी फजिती । मानवधर्माची ॥९६॥
ते समजती भ्रष्टाकार । इतर तुच्छ, आपण थोर ।
त्यांना स्वतःचाहि धर्म-विचार । कळला नाही ॥९७॥
प्रार्थनी सर्वांनी फड मांडावे । प्रार्थना संपताचि वितंडावे ।
ते प्रार्थी नव्हेत पेंढारी म्हणावे । स्वार्थी ऐसे ॥९८॥
लोक स्वार्थांनी दुरावले । आपसांत लढू लागले ।
ते उपासनेने जवळ आले । होईल ऐसे ॥९९॥
त्यासाठी त्यांना ज्ञान द्यावे । धर्मसमानत्व शिकवावे ।
न पटे तोवरि प्रार्थनेसि लावावे । स्वधर्माच्याचि ॥१००॥
भिन्न धर्मांनी भिन्न प्रार्थना केली । परि प्रार्थनातत्वे प्रतिपादिली ।
तरी आदरभावना सर्वत्र वाढली । होईल ऐसे ॥१०१॥
याने तयार होईल भूमिका । प्रत्येक धर्म आपणासारिखा ।
तेणे विश्व शांतिसुखा । पावेल एक होऊनि ॥१०२॥

म्हणोनि धरिली ही साधना । साधा सामुदायिक प्रार्थना।
सामुदायिक होण्याचीच धारणा । आरंभिली सात्त्विक ॥१०३॥
ईश्वराची जी मनोकामना । एकापासोनि अनेकपणा।
अनेकान्तरी एकत्व भावना । उपभोगावी याद्वारे ॥१०४॥
सर्वांनी चहूंकडोनि यत्न करावे । आपल्यापरीने जवळ यावे।
सिद्धांताचे गोडवे गावे । म्हणजे वेळ न लागे ॥१०५॥
सिद्धांतरूप तत्त्वज्ञान । लोकांमाजी रुजविल्याविण।
न होय पंथद्वेषादिकांचे उच्चाटन । नेहमी करिता ॥१०६॥
सामुदायिक प्रार्थनारूपे । हे तत्त्व रुजविणे असे सोपे।
म्हणोनि लागा खटाटोपे । कार्यासि या गावोगाव ॥१०७॥
गावोगावी धर्म-समभाव । मग आपैसेचि सुखावे विश्व।
पृथ्वीसि लाभेल स्वर्ग-गौरव । तुकड्या म्हणे ॥१०८॥
इतिश्री ग्रामगीता ग्रंथ । गुरु-शास्त्र-स्वानुभव-संमत।
धर्म-समन्वय कथिला येथ । अठ्ठाविसावा अध्याय संपूर्ण ॥१०९॥


॥ सद्‌गुरुनाथ महाराज की जय ॥

''संत हे भेदाभेद पाळीत नाहीत. आपल्यामध्ये भेदाची भिंत आहे. तिनेच आपल्याला वेगळे केले आहे. तुम्हीही ती पाडून टाका. फातिहा काय नि रामनाम काय, मशीद काय, द्वारकामाई (वृन्दावन) काय नि पारशांची धुनि काय, सर्वांच्या अंतर्यामी एकच आहे.''

**– श्रीसंत साईबाबा**



## ॥ चित्र परिचय ॥



## अ. २९ – श्रीसंत चोखामेळा महाराज

संत चोखोबांचे सारे घर । झाले भक्तीचे मंदिर ।
उपेक्षिल्या समाजी देवत्व थोर । देता संस्कार प्रकटे ते ॥९४॥

सहाशे वर्षांपूर्वी अस्पृश्य जातीत जन्मून मेलेली ढोरे ओढण्याचे व ''हाती घेवोनि खराटा । झाडीत प्रदक्षिणेच्या वाटा'' असे ग्रामसफाईचे काम करून विठ्ठलमय झालेले संत-भक्त नामदेवसारख्यांच्या प्रेमाची पाखर मिळताच जनाबाई, चोखोबा यासारखी दलित समाजातील लोक कसे चमकून गेले ! नामदेवाच्या कुटुंबातील चौदाही जणांनी जसे अभंग लिहिले तसेच चोखोबांची पत्नी सोयरा, बहीण निर्मळा, पुत्र कर्ममेळा व जावई बंका यांचेही अभंग प्रसिद्ध आहेत. त्यांचे सारे घर जणू मंदिर बनले होते !

• अध्याय एकोणतिसावा •

# दलित-सेवा

॥ श्रीगुरुदेवाय नमः ॥

श्रोति शंका विचारिली । आपण सर्व धर्मी समानता केली ।
परंतु 'परधर्म भयावह' बोली । गर्जविली गीतेने ॥१॥
स्वधर्मी मरण्यातहि श्रेय । परि परधर्मी आहे भय ।
मग सर्व धर्मांचा समन्वय । करिता कैसा? ॥२॥
ऐका ग्रंथीचा दाखला । 'परधर्म भयावह' जरी ठरला ।
तरी त्याचा अर्थ पाहिजे जाणला । श्रोतियांनी ॥३॥
हिंदु, बुद्ध, मुसलमान । ख्रिस्ती, पारशी अथवा जैन ।
ऐसे नव्हते नामाभिधान । धर्मासि तेव्हा ॥४॥
भिन्न धर्माचा जन्महि नव्हता । मग परधर्म कां सांगे गीता? ।
तेथे कर्तव्याचीच भिन्नता । ध्यानी तियेच्या ॥५॥
एकाची प्रकृति ज्या कार्याची । ज्या गुणांची स्वभावेचि ।
त्यासि गुणकर्मे दुसऱ्याची । साधता केवि? ॥६॥
कोणात शक्ति, कोणात युक्ति । कोणात ज्ञान, सेवावृत्ति ।
साधे त्याचि साधने करावे भक्ति । जनता-जनार्दनाची ॥७॥
त्याने आपुल्या प्रकृतिपरी । करावी राष्ट्राची चाकरी ।
दुसऱ्याचे कर्तव्य घेता शिरी । विनाश त्याचा ॥८॥
म्हणोनि परधर्म भयावह । ऐसे कथिले निःसंदेह ।
तुपात नोहे मत्स्याचा निर्वाह । पाण्याहूनि उत्तम जरी ॥९॥
स्वधर्म म्हणजे आत्मधर्म । आत्म्याचा स्वभाव सत्य, ज्ञान, प्रेम ।
यासाठीच करणे जीवनाचा होम । श्रेयस्कर हे सर्वां ॥१०॥
असत्य, अज्ञान, भेद-वैर । अन्याय, अत्याचार, दुराचार ।
हा अनात्मधर्म दुःखकर । परधर्म हा भयावह ॥११॥
आत्मवश ते ते सुख । परवश, परतंत्र ते दुःख ।
ऐसेहि धर्मग्रंथी अनेक । कथिले थोरांनी ॥१२॥



परधर्म म्हणजे विकारांधता । स्वधर्म म्हणजे न्यायसिध्दता ।
हे समजण्याचे तत्त्वे हाता । दिले तयांनी ॥१३॥
आपुला म्हणोनि हृदयी धरावा । परका म्हणोनि दूर लोटावा ।
ऐसा ऋषिमुनींचा गवगवा । कोठेचि नाही ॥१४॥
मुसलमान म्हणता मारावा । ख्रिश्चन म्हणता हाकूनि द्यावा ।
आपला पापीही छातीशी धरावा । हा नव्हे अर्थ स्वधर्माचा ॥१५॥
कोणी म्हणती आम्ही हिंदु । मुसलमानांचा अतिविरोधू ।
ख्रिश्चनांसी कधि न वंदू । भाऊ म्हणोनि आपुला ॥१६॥
मी म्हणतो वंदन गुणासि आहे । जातिधर्मावरि काय? ।
हिंदु उघड पाप करिताहे । त्यासि मान कां द्यावा? ॥१७॥
मुसलमानाचे उत्तम वर्तन । तरी ते निंद्य मुसलमान म्हणोन ।
हे कोणी दिले न्यायदान? । सांगा सांगा श्रोतेहो ! ॥१८॥
ख्रिश्चन दूरदेशाहूनि आला । सेवा करता करता मेला ।
त्याने जरि धर्म नाही बिघडविला । तुमचा काही ॥१९॥
तरि त्यासि तुम्ही अव्हेरावा । हे म्हणणे नाही पसंत जीवा ।
तो आपुलाचि म्हणोनि राखावा । बंधुसखा ॥२०॥
जो कोणी सत्य सिद्धांती । ज्याची विश्वव्यापी प्रीति, मति ।
तो असो कोणत्याही धर्म, जमाती । समजावा चित्ती आपुलाचि ॥२१॥
धर्म माणुसकिसि म्हणती । माणुसकी न्यायावरि शोधिती ।
न्याय कोणाच्याहि प्रति । एकचि राहतो सर्वदा ॥२२॥
परि ही दृष्टि मंद झाली । आप-पर भावना बळावली ।
तेणे धर्म, पंथांत फूट पडली । आत्मीयता दिसेना ॥२३॥
मूळतत्त्वे विलया गेली । महंती-बुवागिरी वाढली ।
सांप्रदायिक वृत्ति फोफावली । अज्ञानयोगे ॥२४॥
ऐसा प्रकार होत आला । म्हणोनि खरा धर्म मातीत मिळाला ।
आता उठणेचि त्या धर्माला । कठीण झाले ॥२५॥
गुणकर्माचा लोप झाला । स्वधर्म-परधर्म ठरेल कोठला? ।
गोंधळोनि समाज गेला । गर्तेमाजी भेदभ्रमे ॥२६॥
'विष्णुमय जग' हाच स्वधर्म । ऐसे संती कथिले वर्म ।
तरीहि आमुचा न जाय भेदभ्रम । अमंगळ ऐसा ॥२७॥

'मानव' हेचि आपुले नाम । मग स्वधर्म म्हणजे 'मानवधर्म' ।
हे तरी ध्यानी घ्या सत्य वर्म । साध्या बोली ॥२८॥

आपण आहोत मानव । मानव्याचा वाढवावा गौरव ।
सुखी राहावेत आबालवृद्ध सर्व । हेचि कार्य आपुले ॥२९॥

मज मान्य धर्म, न्याय, नीति । शुद्ध चारित्र्य, प्रेमस्फूर्ति ।
करी जो समाजाची धारणास्थिति । समान भावे ॥३०॥

हे जोवरि वर्म नेणे । तोवरि धर्म जो कोणी म्हणे ।
ती अपूर्णतेची धर्मलक्षणे । समजो आम्ही ॥३१॥

मग घ्या कोणत्याहि ग्रंथाचे वचन । परि वर्म याहूनि नाही भिन्न ।
मानवता हीच आहे खूण । सर्वधर्मसमन्वयाची ॥३२॥

ज्या ज्या धर्मी मानवता । ते सर्व धर्म एकचि तत्त्वता ।
यासि विरुद्ध नाही गीता । समतावादी कृष्णाची ॥३३॥

कृष्ण म्हणे 'समं हि ब्रह्म' । समता हाचि ईश्वरी धर्म ।
समदर्शी तोचि पंडित उत्तम । योगाचे मर्म समत्वचि ॥३४॥

सर्वठायी वासुदेव । ऐसा भाव नव्हे अनुभव ।
दुर्लभ तो महात्मा, देव । बोलूनि गेला गीतेमाजी ॥३५॥

सर्व धर्म सोडोनिया । शरण जावे एका देवराया ।
सर्वव्यापक जाणोनि तया । हेचि वर्म उद्धाराचे ॥३६॥

सर्वांविषयी समभाव । सर्वांभूती वासुदेव ।
हे जाणे तोचि खरा मानव । सत्य धर्म हाचि त्याचा ॥३७॥

या दृष्टीने करी जे जे काही । ती सर्वेश्वराची पूजाच होई ।
जेथे आप-पर भेद नाही । समन्वयी चित्त आले ॥३८॥

मग तो असो कोणत्या जातीचा । पंथांचा वा धर्म, जमातीचा ।
तो खरा स्वधर्मी सखाचि आमुचा । मानू आम्ही ॥३९॥

यावरि श्रोती विचारिले । आपण सर्व धर्मी समत्व कथिले ।
परि याचे फायदे घेतले । कुटिल जनांनी आजवरि ॥४०॥

कोणी युद्ध करोनि लोकां जिंकिले । बळेचि आपुले धर्मी ओढिले ।
कोणी प्रलोभनांनी मोहविले । वाटे का हे योग्य तुम्हा ? ॥४१॥

काही दूरदेशींचे लोक येती । सेवा करोनि प्रवेश मिळविती ।
भोळिया जना नागविती । धर्मांतरा करवोनिया ॥४२॥



वाढवोनि आपुले संख्याबळ । करावी सत्तेसाठी चळवळ ।
ऐसा डाव साधती सकळ । विधर्मी हे सेवेतूनि ॥४३॥

सर्वधर्मी समभाव । म्हणता धर्मांतरासि मिळे वाव ।
येणे बुडेल राष्ट्राची नाव । सांगा उपाव यासि काही ॥४४॥

यावरि ऐकावे उत्तर । धर्म-समभाव आणि धर्मांतर ।
ह्या गोष्टीत असे बहु अंतर । एक खरोखर नव्हे हे ॥४५॥

धर्मांतराचा करिता विचार । ज्ञात्याचेचि योग्य धर्मांतर ।
परि ज्यासि कळले सारासार । त्यासि धर्मांतर कशासाठी? ॥४६॥

ज्यासि कळले धर्मसमत्व । त्यासी बाह्य भेदांचे नुरे महत्त्व ।
मग तो स्वधर्मीच आचरील तत्त्व । पाहिजे ते ते ॥४७॥

न करील कोणावरि आक्रमण । न होईल कोणाच्या आधीन ।
लोभे, भये परधर्मग्रहण । हे अध:पतन वाटे तया ॥४८॥

दुसऱ्या धर्मांसि युद्धे छळिले । त्यासि धर्मसेवा नाम दिले ।
हे महापातक असे बोलिले । यापूर्वीहि निश्चयाने ॥४९॥

तैसाचि जो समाज अज्ञानी । त्यासि विधर्मी नेले मोहवूनि ।
त्यायोगेहि उन्नति कोठूनि? । ते तो सोंग बहुरुप्याचे ॥५०॥

मानवी स्वभाव प्रेमाचा भुकेला । काही गरजांमुळे वश झाला ।
तरी त्याचा फायदा असला । घेऊ नये दुसऱ्यांनी ॥५१॥

कोणीहि सेवा करायासि यावे । परि धर्मांतर मोहाने करवावे ।
आपले जनगण वाढवावे । हे तो दुष्ट राजकारण ॥५२॥

धर्म-वर्मे एकचि असती । परि हे राजकारण त्यात गोविती ।
संख्याबल वाढवोनि करिती । परस्परांचा वैरभाव ॥५३॥

धर्मप्रचाराचे नावाखाली । राज्यसाधना आतूनि घाली ।
त्याचि जातचि समजावी भ्रष्ट झाली । धर्मातूनि ॥५४॥

तो नव्हे कोणत्याही धर्माचा । स्वार्थ साधनेची धर्म त्याचा ।
अव्हेरूनि द्यावा, जिवाभावाचा । असला तरी ॥५५॥

तैसाचि न ओळखता स्वत्व । दुसऱ्यांचे मानोनि महत्त्व ।
उगीच परधर्मी घे धाव । नाही ठाव त्यासि कोठे ॥५६॥

समजोनि तत्त्व सर्वांत मिळावे । परि पोटाकरिता धर्मा न सोडावे ।
आत्ममार्ग न समजताचि करावे । कासयासि हे सारे ? ॥५७॥

ऐसे जेथे जेथे झाले । त्यांना कलंकचि लागले ।
पाहतांना आजहि दिसले । अनुभवियांसि ॥५८॥
येथे आपणहि आहो कारण । याचे असू द्यावे स्मरण ।
खऱ्या धर्माचे सक्रिय ज्ञान । कोण देतो दीन जनां ? ॥५९॥
लोक धर्म-धर्म ओरडती । प्रसंग पडल्या कामी न येती ।
संग्रह असोनि चित्त पाहती । आपुलियांचे ॥६०॥
धर्माचा बाळगती अभिमान । परि धर्मबांधवा नाही स्थान ।
कुत्र्यामांजराइतुकाहि मान । न देती तया धर्मलंड ॥६१॥
मानवाचा स्पर्शहि पाप । मानुनि त्यासि करिती दुःखरूप ।
विधर्मी जाता मानिती बाप । त्यासीच मग ॥६२॥
दीन-दलितांची तहानभूक । दीन-दलितांचे सुख-दुःख ।
काहीच नेणती अभिमानी मूर्ख । स्वधर्मघोक चालविती ॥६३॥
सर्वांठायी म्हणती ब्रह्म । परि भ्रमासारिखे करिती कर्म ।
ऐसे नाही धर्माचे वर्म । बोलिले संती कोठेहि ॥६४॥
परि हे शिकवाया उपदेशक कुठले? । कोण लोकांस समजावी भले? ।
हे तो सर्वचि लागले । पोटा-पाण्यासि धर्मनावे ॥६५॥
पोटपुजाऱ्यांनी केला प्रचार । आपुल्या लाभाचा व्यवहार ।
मानवांमाजी पाडले अंतर । व्यक्तिसुखासाठी ॥६६॥
हे सर्व अडाणपण । जोवरि जाणार नाही मानवांतून ।
तोवरि जगाची उन्नति पूर्ण । होणे कठिण समजावे ॥६७॥
त्यासाठी एकचि करावे । आपापले धर्मक्षेत्र सुधारावे ।
सकळांसीच सकळांचे द्यावे । तत्त्वज्ञान समजावोनि ॥६८॥
हे ज्या धर्मास, जातीस फावे । तेणेचि सुखसोहळे बघावे ।
यासाठी अनेक प्रयत्न करावे । जाणत्या जनांनी ॥६९॥
काहींनी करावा आदिवासी-सुधार । जावोनि रानी खेडयांवर ।
पाहावे गरीब लोकांचे कुटीर । कैसे आहे ॥७०॥
गरीब, जंगली आदिवासी जाती । झाडपालेचि नेसोनि राहती ।
झाडाखालीच असते वसती । कित्येकांची ॥७१॥
त्यांसि बोलणे, चालणे समजेना । भिवोनि पळती बघताचि आपणा ।
प्रेम लावोनि तया कुटुंबांना । करावे आपण आपलेसे ॥७२॥



त्यांना औषधपाणी पुरवावे । लिहिणे, वाचणेहि शिकवावे ।
उत्सवी, सहभोजनी मिसळावे । कार्यकर्त्यांनी ॥७३॥
जनी, भोजनी, मंदिरी । अस्पृश्यतेचीहि न उरावी उरी ।
स्थान-मान सर्वतोपरी । एक करावे सर्वांचे ॥७४॥
स्वच्छ राहणी निर्व्यसनी । शिकवावी स्वये त्यात मिसळोनि ।
तुच्छ न मानावे दुरोनि । उणीव दावोनि परभारे ॥७५॥
दूर कराव्या अडी-अडचणी । सुविचारांची करावी पेरणी ।
सर्वचि समाज समानगुणी । करावा नाना प्रयत्ने ॥७६॥
आजवरि यांची केली उपेक्षा । प्रायश्चित म्हणोनि सेवादीक्षा ।
घेवोनि त्यांची वाढवावी कक्षा । संधि देवोनि सद्भावे ॥७७॥
जे कोणी असती अडले-नडले । रंजले-गांजले, रोगे पिडले ।
त्यांसाठी पाहिजे धाम निर्मिले । सुख, शांतिचे, आरोग्याचे ॥७८॥
क्षय अथवा कुष्ठरोग । हे न मानिता दैवाचे भोग ।
त्यांच्या निवारण्याचे प्रयोग । केले पाहिजे गावोगावी ॥७९॥
भंगलेल्या मानवीमूर्ति । यांच्या सेवेतचि ईश्वरभक्ति ।
आर्तांसी दिल्यावाचूनि शांति । मागता मुक्ति मिळे कैसी? ॥८०॥
जीवनातूनि जे जे उठले । त्यासि सहृदयपणे पाहिजे भेटले ।
अनाथांचिया सुखास्तव झटले । तेचि आवडले देव, धर्मा ॥८१॥
अंध, पंगु, मूक, बधीर । अशक्त, अपंग, निराधार ।
या ईश्वरी चित्रा रंगविती सुंदर । ते ते थोर धर्मशील ॥८२॥
विधर्मी लोक हे कार्य करिती । म्हणोनि जनांची जडते प्रीति ।
किळस, आळस, आमुच्या चित्ती । अधोगती आमुची ही ॥८३॥
सोडोनिया ऐसा स्वभाव । आपण सेवेसि अर्पावा जीव-भाव ।
दलित समाजा मानोनि देव । सेवा करावी हाचि धर्म ॥८४॥
हाचि धर्म संती आचरिला । जनी जनार्दन ओळखिला ।
निर्लोभ प्रेमे सजविला । विश्व-बगीचा ॥८५॥
धर्मावतार रामकृष्ण । जटेने झाडी अस्पृश्यांचे अंगण ।
एकनाथे केले भोजन । कडे मिरवोनि बाळ त्यांचे ॥८६॥
चैतन्य महाप्रभूने हृदयी । आलिंगिले दलित, रोगीहि ।
गांधी, येशूने तोषविले कुष्ठदेही । सेवा करोनि ॥८७॥

विधवा, अनाथ–अपंग–सेवा । पैगंबरे मानिला पुण्य ठेवा ।
जातिभेदाचा झुगारिला गवगवा । बुद्ध गौतमाने ॥८८॥
श्रीरामे शबरीची खादली बोरे । गुहका आलिंगिले प्रेमभरे ।
मित्र केली आदिवासी वानरे । अहिल्येसि उद्धरिले ॥८९॥
श्रीकृष्ण गोवळ्यांत नांदला । स्त्री–शूद्रांचा कैवारी झाला ।
जांबवतीशी विवाह केला । आदिवासी जमातीच्या ॥९०॥
भीष्माचिया वडिलाने । वरिले कोळियांच्या कन्ये ।
ऐसी शेकडो प्रमाणे । सापडती पूर्व ग्रंथी ॥९१॥
सीता, शकुंतला, कर्ण, कबीर । ऐसे अनाथ कन्या, पुत्र ।
समाजे सांभाळिता झाले थोर । तैसेचि अपार ऋषिजन ॥९२॥
ज्ञानदेव, नामदेवादि संती । आलिंगिले दलित समाजाप्रति ।
किती प्रगटल्या भक्तमूर्ति । मागासलेल्यात त्याकाळी ॥९३॥
संत चोखोबाचे सारे घर । झाले भक्तीचे मंदिर ।
उपेक्षिल्या समाजी देवत्व थोर । देता संस्कार प्रगटे ते ॥९४॥
सजन कसाई, रविदास चांभार । दादू पिंजारी, गोरा कुंभार ।
कान्होपात्रा, जनी, बंका महार । उदया अपार आले ऐसे ॥९५॥
तैसेचि आजहि उदया येती । घरोघरी नामांकित पुरुष–युवती ।
त्यासाठी केली पाहिजे उन्नति । गांजलेल्या समाजांची ॥९६॥
महात्मा गांधी, ज्योतिबा फुले । यांनी मर्म हे ओळखले ।
दलितोन्नतीचे कार्य केले । कर्तव्य आपुले तेचि असे ॥९७॥
मानवे मानवा समान समजणे । परस्परां उन्नत करणे ।
संसारासि या आनंदे भरणे । हीच खरी धर्मसेवा ॥९८॥
कोणी कोणास त्रासवू नये । कोणी कोणास फसवू नये ।
कोणी कोणास दुरावू नये । आपुले म्हणावे सगळेचि ॥९९॥
पाहाव्या त्यांच्या सुखसोयी । वागणूक सर्वांशी ठेवावी न्यायी ।
भेदभावना समूळ जाई । जीवन ऐसे निर्मावे ॥१००॥
मग त्यांचा विश्वास जडे । त्यांना आपला स्वभाव आवडे ।
वळेल तुम्ही म्हणाल तिकडे । मन तयांचे ॥१०१॥
हेचि आहे धर्मसेवा । करावी आपण धरोनि सद्भावा ।
मागासल्या सर्वचि बांधवा । बंधु समजोनि शिकवावे ॥१०२॥



पडित रान हे उठवावे । फुलां–फळांनी बहरू द्यावे ।
आहारी जाऊच न द्यावे । कोणाचिया कोणा ॥१०३॥
परि अन्य धर्मांशी वितंडावे । कोणी कोणाचे दोष मांडावे ।
हे स्वार्थबुद्धीचे वणवे । चेतवू नयेत सेवकांनी ॥१०४॥
आपुला पिता जरी वंद्य । तरी इतरांचा तो न होय निंद्य ।
हेचि धर्माचे सूत्र आद्य । सर्व धर्मी समभावनेचे ॥१०५॥
ही दृष्टी सर्वांसीच द्यावी । समाजी मानवता वाढवावी ।
म्हणजे धर्म–भेदांची भ्रांति गावी । उरणार नाही ॥१०६॥
साधनांमाजी उत्तम साधन । संस्कारे तयार करावे मन ।
सेवामार्गे मनी घुसोन । सर्व लोकांच्या ॥१०७॥
कलापथक, प्रवचन, कीर्तन । तुंबड्या, पोवाडे, पुराण ।
नाटकादि प्रत्येक साधन । याच कार्यी योजावे ॥१०८॥
जे जे ज्यासि असेल ठावे । ते ते समाजा शिकवीत जावे ।
जीवजनास फायदे द्यावे । मानवधर्म म्हणोनि ॥१०९॥
खरा धर्म जाणतील लोक । तरि अनेकांतहि पाहतील एक ।
मग न गडेल परकीयांची मेख । स्वार्थभावनेची ॥११०॥
यासाठी भजन–संकीर्तन । उत्तम लोकशिक्षणाचे साधन ।
प्रपंच–परमार्थ, धर्म–ज्ञान । शिकवावे संपूर्ण त्यातूनि ॥१११॥
आपुल्या गावचा कोणी प्राणी । मुळीच न ठेवावा अज्ञानी ।
हीच खरी गावाची बाणी । पुरवा झटूनि सेवकांनो ! ॥११२॥
हेलावता सद्धर्माचा सागर । धर्मनद्या होतील एकाकार ।
मग कोठे धर्म, धर्मांतर? । द्या संस्कार ऐसे सर्वां ॥११३॥
भ्रामक रुढ्यांच्या कल्पनांतून । वर येऊ द्या धर्मनिधान ।
त्यासाठी योजावे भजनादि साधन । जागवा जन तुकड्या म्हणे ॥११४॥
इतिश्री ग्रामगीता ग्रंथ । गुरु–शास्त्र–स्वानुभव–संमत ।
दलित–सेवा कथिली येथ । एकोणतिसावा अध्याय संपूर्ण ॥११५॥

॥ सद्गुरुनाथ महाराज की जय ॥

**अभंग**

का हो केशीराजा ! दुजे पै धरिता ? हे तो आश्चर्यता वाटे मज ॥
एकासि आसन, एकासि वसन । एक तेचि नग्न फिरताति ॥
एकासि कदान्न, एकासि मिष्टान्न । एका न मिळे कोरान्न मागताहि ॥
एकासि वैभव, राजाची पदवी । एक गावोगावी भीक मागे ॥
हाचि न्याय तुमचे दिसतो की घरी । चोखा म्हणे हरि ! कर्म माझे ॥

**– श्रीसंत चोखामेळा महाराज**

## ।। चित्र परिचय ।।



### अ. ३० – भक्तिमती मीराबाई

कृष्णरंगी रंगली मीरा । राज्यवैभव वाटे कचरा ।
छंद लागला घराघरा । तिच्या प्रभावे भक्तीचा ।।६४।।

चारशे वर्षांपूर्वी मारवाडातील जहागिरदाराचे घरी जन्मून चितोडची राणी झालेली मीरा लौकरच विधवा झाली व ''भावभगत भूषण सजे शीलसंतोष सिंगार । ओढी चूनर प्रेमकी गिरधरजी भरतार'' म्हणत सर्वस्वाचा त्याग करून तिने आपल्या बाळपणीच भजनाची तारी हातात घेतली, चितोडच्या राजाने मरणांतिक पीडा दिल्यामुळे भजन न सोडता तिने राजमहाल सोडला व भारतभ्रमण केले. तिच्या हृदयस्पर्शी भजनांचे सूर भारतभर निनादले व आजही ते लाखोंच्या हृदयास प्रेम जागवीत आहेत.



● अध्याय तिसावा ●

# भजन–प्रभाव

।। श्रीगुरुदेवाय नमः ।।

एक श्रोता करी प्रश्न । भजनी देवाचे गुणगान ।
तयासि बनविता प्रचाराचे साधन । पावित्र्य मग कैसे उरे ? ।।१।।
भजनासि हे ऐसे वळण । देवोनि चुकविता आपण ।
साध्या गोष्टीहि शिकविता त्यातून । हे तो न पटे धार्मिकां ।।२।।
याचे ऐकावे उत्तर । धर्म म्हणजे धारणा सुंदर ।
त्यात सर्वचि अंगाचा विचार । जीवनाच्या ।।३।।
कलियुगी भजन, किर्तन, भक्ति । यामाजी बोलिली विशेष शक्ति ।
ती नव्हे एकांगी संत उक्ति । केवळ मुक्ति मिळवाया ।।४।।
आमुचे संपूर्णचि जीवन । सुधारू शके कीर्तन, भजन ।
वेद, शास्त्र, स्मृति संपूर्ण । याच काजा जन्मल्या ।।५।।
समाजरचना, गावरचना । विवाहादि संस्कार, राज्ययोजना ।
औषधि, शेती, कलादि नाना । वेद, स्मृतीत वर्णिल्या ।।६।।
पुरातन संस्कृत वेदकाळ । त्यातूनि जन्मला पुराणकाळ ।
पुढे प्राकृत जना कळावया सरळ । संत–भजने अवतरली ।।७।।
साधु, संती लिहिले नामभजन । भावभक्ति हृदयी धरुन ।
बोध कळावया जनतेलागून । सहजासहजी सर्वचि ।।८।।
काही वेदांतरूपके कथिली । काही वैराग्यभावे बोलिली ।
काही सलगीची भजने केली । साधु, संती विनोदे ।।९।।
काही रचिले भजन, भारूड । बहुरुपी, गोंधळी, जोहार, गारुड ।
पाईक, मातंग, गावगुंड । रूपके समाज–जीवनाची ।।१०।।
काही केले लीला–लाघव । गौळणी, गोपाळ, देवी–देव ।
समाज–सुधारणेचा गौरव । वर्णिला काही ।।११।।
जैसा प्रसंग आला सामोरी । तैसीच भजने केली बहुपरी ।
हे कळावया वर्म, अपुरी । बुद्धि झाली लोकांची ।।१२।।

वाईट भावना नाशावया । लोकी कर्तव्यशीलता यावया ।
समाज सुस्थितीत नांदावया । भजने केली संतांनी ॥१३॥
सौरी विराण्याहि गाऊनि । लोकांवरि पाडिली मोहिनी ।
बिघडल्या जना आपुलेसे करोनि । जागृत केले समाजा ॥१४॥
गाऊनि, नाचूनि नाना रीती । भावभक्ति भरोनि गीती ।
त्यातूनि केली जनजागृति । शहाणे केले संतांनी ॥१५॥
संत तुकाराम, नामदेव । शेख महंमद, ज्ञानदेव ।
चैतन्य प्रभु, नानकदेव । जना, मीरा, मुक्ताबाई ॥१६॥
कबीर, तुलसीदास, रामानंद । सूरदास, दादू, ब्रह्मानंद ।
नरसी, देवनाथ, परमानंद । संत झाले असंख्य ॥१७॥
ऐसे कितीतरी संत झाले । ज्यांनी अभंगभजनादि कथिले ।
कित्येक जन उद्धरोनि गेले । नामभजने तयांच्या ॥१८॥
ज्यांची ऐकता भजन-वाणी । जाय गगनमंडळ भेदोनि ।
झाले, आहेत, होतील अजूनि । संत-सज्जन यापरी ॥१९॥
म्हणोनि बोलिलो सकळ लोकां । 'भजन-मार्ग सोडू नका' ।
परि भजनी तारतम्य शिका । म्हणायचे हेचि असे ॥२०॥
राम झाले, कृष्ण झाले । संत, पुढारी, सर्वचि झाले ।
परि आज काय पाहिजे केले । हेचि कथिले तयांनी ॥२१॥
जगाची नित्य बदलती गति । आज कोणती, उद्या कोणती ।
कोणते बोल कोणाप्रति । सांगावे, कधी कळावे हे ॥२२॥
मुडदा स्मशानी चालला । तेथे काय करावे शृंगार रसाला ।
पाहिजे वैराग्यभाव वाढविला । भजन-मार्गे ॥२३॥
भजनी लग्नकार्यासि बोलाविला । त्याने स्मशानीचा रस वर्णिला ।
लोक म्हणतील 'काढा याला । काय बरळतो या स्थानी ?' ॥२४॥
तैसेचि देऊळी केले भजन । गायिले स्त्रीसौंदर्य शृंगारपूर्ण ।
जन पाहतील हसून । वेड्यापरी समजोनिया ॥२५॥
रणांगणी भजनी नेला । वीरांस म्हणे-सोडा शत्रूला ।
काय करिता मिथ्या गलबला । ऐसे बोलिल्या कोण ऐके ? ॥२६॥
हे सर्व जयाने जाणावे । तेणेचि भजनभाव वर्णावे ।
शहाणे करूनि सोडावे । भोळे जन सर्व ॥२७॥



समाज झाला रुढिबद्ध । तेथे सांगावे सिद्धांत शुद्ध ।
समाजकार्यहि करावे विशद । वेळ पडेल त्यापरी ॥२८॥
प्रसंग पाहोनि उपदेशावे । सत्य तत्त्व ते न सोडावे ।
सत्यचि गोड करोनि सांगावे । वेळकाळादि पाहोनि ॥२९॥
ऐसेचि समजोनि संतजने । केले ग्रंथ, गीते, भजने ।
तैसेचि आज पाहिजे नव्याने । वर्णिले सारे ॥३०॥
सर्व पंथांचा समन्वय । सर्व जातींचा मेळ होय ।
ऐशाचि भजनांनी लागेल सोय । आमुच्या गावाची ॥३१॥
हे जरी मागे संतांनी कथिले । परि आज पाहिजे पुढे वर्णिले ।
वर्णन करणारेच भ्रमात पडले । मग ते मेले जनलोक ॥३२॥
कोणी ब्रह्मज्ञानाची भजने गाती । अर्थाविणेचि वाचता, म्हणती ।
उगीच दंभ अंगी आणती । आपण ज्ञानी म्हणोनिया ॥३३॥
घेऊनि संतांचे पाठांतर । आपणचि बनती महात्मा सुंदर ।
निभवाया पोटाचा व्यवहार । आयुष्यभरी ॥३४॥
कोणी गौळणीत रंगोनि नाचती । वेष धरोनि दंढार करती ।
अर्थ सोडोनि मजा मारिती । विषयांध भावे ॥३५॥
ऐसी ऐकता कृष्णलीला । जनमनी भाव वेगळा झाला ।
वाटे हा तमाशाचि बनविला । देवादिकांचा ॥३६॥
कोणी रागरागिणी गाती । शब्द तोडोनि अर्थाची माती ।
पाहिजे तसे बनवोनि घेती । शब्द भजनाचे ॥३७॥
कोणी पाठांतर खूप करिती । ताल-बेताल करोनि गाती ।
चीड येते ऐकता चित्ती । अर्थ-अनर्थ सगळाचि ॥३८॥
काही गाती अति सुंदर । ताल कुशल, आलाप मधुर ।
तेथे अर्थाचा नसे अंकुर । भजनभाव जागेना ॥३९॥
कोणी भजन करावया आधी । गांजा-तंबाकूची पाहती संधि ।
चहा, प्रसादाविण न होय गर्दी । भजनकऱ्यांची ॥४०॥
काही म्हणती आमुचे भजन वेगळे । ते तुम्हांसि कैसे कळे? ।
त्यासि पाहिजे गुरुदेव-हस्तकमळे । डोक्यावरि ॥४१॥
काही सांप्रदायिक भजनी असती । ते आपुलीच शेखी मिरविती ।
माळ-तंबुरीसाठी भांडती । शत्रू जैसे जन्मांतरीचे ॥४२॥

काही खंजरीसाठी रागे भरती । काही स्पर्धेने पुढे येती ।
परि समाधान नाही चित्ती । तिळभरी कोणाचिया ॥४३॥
काही म्हणती दुसऱ्या संतांचे । भजन नका बोलू मंडपी आमुचे ।
आमुचे भजन संप्रदायाचे । आमुच्याचसाठी ॥४४॥
मित्रहो ! आता ऐसे करणे । सोडोनि द्यावे जीवेप्राणे ।
कोणत्याहि संतांची सद्वचने । म्हणावी प्रेम धरोनि ॥४५॥
ज्या भजनाचा अर्थ न कळे । ते भजन न म्हणावे आपुल्या बळे ।
ज्याने समाजात परिणाम सगळे । व्यर्थ होती ॥४६॥
भजने करावी गाव-जागृति । हृदय जागृति, कार्यजागृति ।
सर्वांनी लागावे सत्कार्याप्रति । ऐसे लोकां सांगावे ॥४७॥
भजन म्हणणाराचि आळसी । काय सांगेल जनतेसि? ।
करोनि घेईल आपुली हसी । ऐसे कोणी न करावे ॥४८॥
जे जे करावे ते समजोनि । पाऊल न टाकावे विचारावाचोनि ।
विचारचि नेतो मोक्षभुवनी । ऐसी साक्ष थोरांची ॥४९॥
विचाराविण देवभक्ति केली । तेथेहि दिसे फजिती झाली ।
लोक म्हणती लोभे फैलाविली । देवपूजा दांभिकाने ॥५०॥
रात्रभरि केले भजन । पडला खाटली बिमार होऊन ।
मग कोठले नामस्मरण? । 'अरे बापा' ओरडतो ॥५१॥
अभ्यासावाचूनि उपास केला । दोन दिवसा पित्त, वात उमळला ।
मग सहा महिने खातचि गेला । दवापाणी, मोसंबी ॥५२॥
ऐसे कासयासि करावे? । तारतम्य सोडोनि द्यावे ।
मग तो भोग भोगीत राहावे । आयुष्यभरी ? ॥५३॥
मनुष्याने बुद्धि वापरावी । अनुभवियांची सल्ला घ्यावी ।
अति सर्वत्रचि वर्जावी । अभ्यासे करावी आत्मोन्नती ॥५४॥
समाजी जेणे हानि घडे । ते सुधारावयाचे पोवाडे ।
वाजवावे संतांचे चौघडे । विचाराने गर्जोनि ॥५५॥
त्यांचेहि करूनि अनंत प्रकार । रुचिभेदाचा जाणूनि व्यवहार ।
परि मूळचे सिद्धांत थोर । सोडू नेदू कोणासि ॥५६॥
आधुनिक बसवू चाली । जेणे लक्ष वेधेल आमुच्या बोली ।
परि दाखवू संतांनी केली । तेचि वाणी या काळी ॥५७॥



भजनांचे असोत अनंत प्रकार । मागचे, पुढचे काही विचार ।
परि संतांचे काव्य अति थोर । उमटोनि निघे बाहेरी ॥५८॥
परि संतांचि भजने दुकान थोर । तेथे अमोलिक वस्तु अपार ।
त्यातूनि निवडोनि सारासार । देऊ पात्र पाहोनि ॥५९॥
संतभजनी देवभक्तीच नाही । जीवनाचे सर्व दृष्टांतहि ।
प्रसंगी शिव्या देवोनीहि । समजाविले त्यांनी ॥६०॥
मीराबाईची प्रेमभजने । सूरदासाची लीलाकवने ।
तैसीच गोस्वामींची जीवनदर्शने । उपदेश गाणे कबीराचे ॥६१॥
ते सर्वचि प्रिय देवा । जेणे घडे जीवांची सेवा ।
हे जाणोनि समाज जागवावा । भजनप्रचारे या काळी ॥६२॥
काहींनी राममंत्र सांगितला । त्यातूनि समाज जागविला ।
काहींनी दत्तमंत्र शिकविला । लोक केले सेवाभावी ॥६३॥
कृष्णरंगी रंगली मीरा । राज्यवैभव वाटे कचरा ।
छंद लागला घरा-घरा । तिच्या प्रभावे भक्तीचा ॥६४॥
चैतन्याची गर्जता वाणी । अनिष्ट रुढ्या गेल्या पळोनि ।
पावन झाली श्रीकृष्ण-भजनी । बंगाल भूमी त्या काळी ॥६५॥
कबीर, नानकदेवादिकांनी । भजने केली विदेशी फिरूनि ।
विवेकानंद-रामतीर्थांनी । केले प्रभावित जग जैसे ॥६६॥
ऐसे अनेकमार्गी झाले । परि ते आज अपुरेच पडले ।
देशापुरतेहि नाही व्यापले । समाजा सुमार्गी लावाया ॥६७॥
त्यांची पडली आज उणी । मानव राहिले मागासल्यापणी ।
याची कराया भरपाई अजूनि । प्रचारक पाहिजे सेवाभावी ॥६८॥
तोचि उत्तम प्रचारक । ओळखे वेळ, प्रसंग सम्यक ।
मार्ग सांगतो लायक । लोकां हाक देवोनिया ॥६९॥
म्हणे आमुचे काही नव्हे । संती कथिले जैसे बरवे ।
तेचि विशद करोनि सांगावे । हाचि धर्म भजनियांचा ॥७०॥
भजनासनी भजनी बैसला । जनलोकांच्या दृष्टीस आला ।
पाहती लोक सद्भावे त्याला । गंभीर दिसला पाहिजे तो ॥७१॥
साधी राहणी, सात्विक लेणी । विनम्र हावभाव-निशाणी ।
शुद्ध बोल, प्रेमळ वाणी । पाहिजे भजनी लोकांची ॥७२॥

कपाळावरि आठया पडल्या । वेड्या वाकड्या बाहुल्या फिरल्या ।
हेकडे तोंड, मुद्रा फाकल्या । ऐसे कधी न व्हावे ॥७३॥
मनात असावा नितांत आदर । वृत्तीत असावा भाविक गहिवर ।
रोमांच उठावेत अंगावर । भजनियांच्या ॥७४॥
असावी कोमल, रसाळ वाणी । उच्चारिता जावी हृदय भेदोनि ।
जागृत व्हावे ऐकताच प्राणी । लागावे ध्यानी सुजनांच्या ॥७५॥
भजने म्हणावी सरळ, सात्विक । गोड आवाज, ओजस्वी रसिक ।
तालबद्ध, मधुर निःशंक । अर्थपूर्ण निर्भयपणे ॥७६॥
ऐशाचि पावन प्रचारासाठी । संती केली आटाआटी ।
जना कळावी ओठाओठी । भाषा त्यांची म्हणोनि ॥७७॥
आमुचा देशचि भाविक भक्त । त्याचा विश्‍वास भजनासक्त ।
देव, धर्म म्हणताचि चढते रक्त । अंगी त्याच्या ॥७८॥
हिरण्यकश्यपूसि नामाची चीड । परि नारदाचिया भजनी ओढ ।
ऐसेचि आहे भजनाचे गूढ । नागहि होई शांत तेथे ॥७९॥
म्हणोनि भजनाचे महत्त्व । भाषणासि येते गौणत्व ।
हे समजोनि संतांनी तत्त्व । भजन केले प्रेमाने ॥८०॥
भाषणात भरले समाजकारण । धर्मकारण, राजकारण ।
लोककारण, विज्ञानकारण । रुक्ष वाटे ते सर्वां ॥८१॥
लोक समजती भजनाची भावना । अर्थ सांगता सुगंध सुवर्णा ।
चमत्कारे बदलावा जमाना । तैसे होते भजनाने ॥८२॥
भजनाची वाजली खंजरी । थाप पडली मृदंगावरि ।
झाली जनता वेडी, बावरी । ऐकाया भजनासि ॥८३॥
लोक पाहती चातकावाणी । कधी निघेल दुसरी वाणी ।
ऐसा समाज जाता मोहूनि । गाव होई जागृत ॥८४॥
आपुल्या गावी व्हावे भजन । तेणे जागृत होती वृद्ध-तरुण ।
स्त्रिया, मुली, सकळ सज्जन । कार्य करिती ग्रामाचे ॥८५॥
प्रत्येकाच्या तोंडी गीते । 'आपुले गावचि सुधारू पुरते ।
हेचि सांगितले भगवंते । ग्रंथामाजी' म्हणती सारे ॥८६॥
गुराखी, ढोरकी, शेत-मजूर । दुकानदार, शिंपी, सुतार, लोहार ।
दळणी, कांडणी घरोघर । गाती भजने उल्हासे ॥८७॥



म्हणती – 'या रे सगळ्यांनी ! या । एकेक काम हाती घ्या ।
गावची सुधारणा करू या । आपुल्यापरी' ॥८८॥
हेचि स्फूर्ति जागवाया संती । केली भजनमालिकेचि प्रगति ।
समाधान लाभावया लोकांप्रति । सेवागुणे सुसंस्कारे ॥८९॥
आज सेवेची नोकरी झाली । भजनावरीच जिंदगी चालविली ।
याने साधनांची किंमतचि उडाली । जाहला तो पोटधर्म ॥९०॥
वीणा, चिपळ्या झाल्या भिकारी । पोटास्तव फिरती दारोदारी ।
त्या मागची संत-तपस्या सारी । लुप्त झाली वाटे जणू ॥९१॥
यासि फिरूनि दुरुस्त करावे । सुसंस्कारे लोक भरावे ।
घरोघरी रोपटे पेरावे । सेवावृत्तीचे ॥९२॥
एक सेवक सेवेसि लागला । हजारो लोकांसि मार्ग दिसला ।
मानवजातीचा पांग फेडला । ऐसे व्हावे निश्‍चये ॥९३॥
हनुमंत जेव्हा भावनेने चेतला । राममंत्र घेवोनि निघाला ।
कार्य सिद्धचि करोनि आला । उल्हासे श्रीरामाचे ॥९४॥
तैसेचि आपण आज करावे । भजनादि साधना सुधारावे ।
गावोगावीच्या लोकी भरावे । बंधुप्रेम त्या द्वारे ॥९५॥
सर्वांभूती प्रेमभाव । यातूनचि सेवेचा उद्‌भव ।
चारित्र्याचा वाढे गौरव । संस्कार होता भजनांचे ॥९६॥
भजनांची चालता परंपरा । जना मिळे सत्प्रवृत्तींचा झरा ।
लोकशिक्षणाचा यापरी दुसरा । उपाय नाही सात्विक ॥९७॥
म्हणोनि विनवितो गावकऱ्यांनो ! । तरुण मुलांनो ! वृद्ध जनांनो ! ।
सगळेचि प्रेमळ गीते म्हणो । करा ऐसा प्रचार ॥९८॥
वाणी रंगू द्या हरिनामाची । चटक लागू द्या सत्कर्माची ।
चीड येऊ द्यावी दुर्व्यसनांची । सर्व जना या द्वारे ॥९९॥
जतन करा गावसंस्कृत । होऊ द्या भजने जनजागृति ।
जनता-विद्यापीठ हे निश्‍चिती । तुकड्या म्हणे ॥१००॥
इतिश्री ग्रामगीता ग्रंथ । गुरु-शास्त्र-स्वानुभाव-संमत ।
भजन-साधना ग्रामहितार्थ । तिसावा अध्याय संपूर्ण ॥१०१॥


॥ सद्‌गुरुनाथ महाराज की जय ॥

**भजन**

हरि नाम बिना नर ऐसा है । दीपक बिन मंदिर जैसा है ॥
जैसे शशि बिन रजनी सोई है । जैसे बिना लौन की रसोई है ॥
जल बिना सरोवर जैसा है । हरि नाम बिना नर ऐसा है ॥
बिन गुरु का चेला जैसा है । हरि नाम बिना नर ऐसा है ॥
मीराबाई कहे हरि से मिलना । जहाँ जन्म मरण की नही कलना ॥

– श्रीसंत मीराबाई

## ॥ चित्र परिचय ॥



### अ. ३१ – श्रीसंत चैतन्य महाप्रभू

उणे दिसे ते पूर्ण करी । जगाचा तोल बोधे सावरी ।
परंतु केल्याचा स्पर्शचि नसे अंतरी । चमत्कारी संत ऐसे ॥१०२॥

साडेचारशे वर्षांपूर्वी बंगालातील तामस शक्तीउपासना, अहंकारी संन्यास व कोरडा शास्त्र–विवाद यांचे जागी कृष्णभक्तीची प्रेमरसधारा वाहविणारा, पठाणांना व दलित जनानांही प्रेमदान करणारा विशालहृदयी महात्मा. अरण्य हे कुंजवन व सागर यमुना वाटून प्रेमोन्मादाने त्यांनी समुद्रात देखील उडी घेतली होती. भक्ती, ज्ञान, आचार–सर्वच दृष्टींनी आदर्श संत.



● अध्याय एकतिसावा ●

# संत–चमत्कार

॥ श्रीगुरुदेवाय नमः ॥

ईश्वर–भजनाचा करिता प्रचार । होईल आमुचा उद्धार ।
परंतु जगासि ताराया अपार । सामर्थ्य पाहिजे अंगी ते ॥१॥
ते कार्य संतचि करू जाणे । जे देवचि झाले जीवेप्राणे ।
येरागबाळांनी केली भजने । तरी काय होते ? ॥२॥
रामनामे तरले पाषाण । परि ते लिहिणारेहि तैसेचि पूर्ण ।
इतरांनी खडा टाकताहि बुडोन । जाईल आता ॥३॥
निर्जीव चालविली भिंत । केले सोन्याचे पर्वत ।
विषासहि बनविले अमृत । तेचि खरे शक्तिशाली ॥४॥
रेड्यामुखी वदविले वेद । डोही कोरडे ठेवले कागद ।
ऐसे थोर संत प्रसिद्ध । विश्व–तारक ॥५॥
तेचि आपुल्या भजने, वचने । जगासि उद्धरितील दयेने ।
आमुच्या भजनाचे तुणतुणे । फुकेच सारे ॥६॥
संत मायबाप कृपाळ । 'आपणासारिखे करिती तत्काळ' ।
कृपा करिता न लागे वेळ । पतितहि तारावया ॥७॥
त्यांचा मंत्र पडता कानी । होय पातकांची हानी ।
जडजीवहि जाती उद्धरोनि । अन्य भजनी हे करू न शके ॥८॥
ऐसा श्रोतियांचा विचार । म्हणे संत करितील चमत्कार ।
तरीच तरेल हा संसार । साधन येर वाउगे ॥९॥
याचे उत्तर ऐका श्रोते ! । संत जरि चमत्कारे तारिते ।
तरि कोणीच न उरते । आजवरि बद्ध जनी ॥१०॥
कारण संत अपार झाले । ज्यांची देवावरीहि सत्ता चाले ।
त्या संतांनी सर्वचि आपुले । कां न तारिले दयेने ? ॥११॥
संतांसि 'सर्वांचेच बरे व्हावे' । ऐसे वाटे जीवेभावे ।
परि ज्यांनी कर्तव्य करावे । तेचि होती अधिकारी ॥१२॥

जनी कर्तव्य न करिता । संत लाभ न देती आइता ।
नुसता त्यांचा मंत्र घेता । मोक्ष होतो, म्हणू नये ॥१३॥
संत आपणासारिखे करिती । परिसे सोने केले लोहाप्रति ।
परंतु खापर सोने नोहे निश्चिती । जाणावे हे तारतम्य ॥१४॥
उद्धार करणे हे संतांचे कर्म । परि त्यात आहे निराळे वर्म ।
समजोनि घ्यावा शिष्यधर्म । कोणता आपुला ॥१५॥
संत जे ज्या कोणा सांगती । तैसेचि जरि ते जन वागती ।
त्यांचाचि उद्धार होतो जगती । ऐसे आहे ॥१६॥
उद्धार संत न करिती । मार्ग सांगती जनांप्रति ।
त्यांच्या बोधवचने प्रगति । केली पाहिजे साधके ॥१७॥
चोरासि वाटे चतुर निघावे । विषयी म्हणे शौकीन व्हावे ।
तैसेचि साधुसि वाटे सज्जन बनावे । लोक आपुले ॥१८॥
सर्वचि करिती आपुला प्रचार । तैसाचि साधूचा व्यवहार ।
कोणता उत्तम, कोण अपवित्र । मार्ग जाणावा साधके ॥१९॥
मागे कोणत्या मार्गे जन गेले? । कोणाच्या प्रचारे कल्याण झाले? ।
कोण जीवनासि पुढारिले । कीर्तिरूपे? ॥२०॥
एक गेला जुगारापायी । एक मेला बुडोनि विषयी ।
एक झाला चोर अन्यायी। गावगुंड ॥२१॥
एक संतापाशी गेला । तोच सन्मार्गी लागोनि तरला ।
तयाचा उत्तम प्रचार झाला । सर्व लोकी ॥२२॥
ऐसी आहे संताची संगती । आपण ऐकिल्या होते गति ।
पण कर्तव्य केल्यासचि उन्नति । दिसो लागे ॥२३॥
संत म्हणती सत्य बोलावे । आपण नेमके खोटे करावे ।
बोल शेवटी संतांवरि ठेवावे । कोण्या न्यायाने ? ॥२४॥
संतांनी सांगावे दुर्गुण सोडा । आपण पापांनी भरावा गाडा ।
कासया सांगावा संत-पोवाडा । 'उद्धार होतो' म्हणोनि ? ॥२५॥
ज्याने संत-वचन पाळावे । आपुले दुर्गुण आवरावे ।
त्यानेच कृपापात्र व्हावे । संताठायी ॥२६॥
कृपा हा संताचा स्वभाव । वेगळी नाही कृपेची ठेव ।
करावयासि देव-घेव । प्रयत्नाविण ॥२७॥



एकचि आहे विशेष खूण । संतांच्या वाणीत प्रेमळपण ।
मनासि लागे आकर्षण । सत्कर्माचे ॥२८॥
त्यांची वागणूक पाहोन । प्रसन्न होते पाहणाराचे मन ।
तैसेचि कर्म करावे आपण । वाटे लोकां ॥२९॥
परि ज्याचे वाईट संस्कार । वृत्ती असे बहिरंग फार ।
त्यासि बोध होणे अति दुर्धर । समजा लोकी ॥३०॥
वृत्ति उत्तम कार्यी वळे । त्यावरि संतांचा बोध मिळे ।
निश्चय होता भाग्य उजळे । थोरपणाने ॥३१॥
मनुष्य दुःखाने होरपळला । विचारे वैराग्यभावी वळला ।
त्यावरि गुरुचा बोध उजळला । मार्ग कळला भाग्याचा ॥३२॥
कोणी समजोनी पाऊल टाकले । आपुले सत्कर्मातचि आहे भले ।
त्याने संतांचे चरण धरिले । तेहि तरले भाग्यशाली ॥३३॥
ऐसे ज्याने साधन केले । संत-वचनासि प्रतिपाळिले ।
त्याचे कौतुक कितीहि वानिले । तरी ते अपुरे ॥३४॥
संतांचा शुद्ध संकल्प । त्यासि कळला, प्रगटला दीप ।
धरोनि निश्चयाचा प्रताप । उन्नत झाला सत्शिष्य ॥३५॥
शेतीची जमीन झाली उत्तम । त्यावरी बी पडले सक्षम ।
वाढले कुटुंबियांचेहि प्रेम । वाढता पीक ॥३६॥
तैसेचि साधकाचे होते । प्रथम शुद्धाचरण, शुद्ध चित्ते ।
वरी संत-बोध होता तिथे । पीक वाढे भक्तीचे ॥३७॥
ऐसे ज्याने सिंचन केले । अंकुर फुटले, वाढो लागले ।
अनुभवाचे फळ आले । संतकृपा कटाक्षे ॥३८॥
परंतु ऐसी सांडोनि रीति । उगीच बुवांच्या पाया पडती ।
त्यानेच सर्व होते, समजती । अंतरी लोक आपुल्या ॥३९॥
पाया पडल्याने सर्व होते । मग काम कासया करावे ते? ।
पोटासि मिळेल आइते । मोक्ष लाभेल बुवापायी ॥४०॥
चुकीची ही धारणा अति । ऐसी नव्हती याची रीति ।
नम्र व्हावे सर्वांभूती । ऐसा सिद्धांत आहे याचा ॥४१॥
सर्वांनी सर्वांसि नम्र व्हावे । आपुले हितगुज विचारावे ।
थोरांनी लहानासि सांगावे । कर्तव्य म्हणोनि ॥४२॥

परि लाखो लोकांनी पायावरि पडावे । थोर सांगती ते न करावे ।
हे अजबचि घेतले स्वभावे । भाविकांच्या ॥४३॥
ही प्रथाचि बंद करावी । श्रवणी रुचि वाढवावी ।
मनन करोनि आचरावी । वाणी संत-थोरांची ॥४४॥
यानेच संतपण वाढ घेई । संत-संगे संतचि होई ।
परि 'संत' म्हणता संसार सोडूनि जाई । ऐसे नव्हे ॥४५॥
संसारी असोनि संत असती । व्यवहारी राहोनि आदर्श होती ।
बुवा न म्हणविताहि अधिकार ठेविती । सद्‌गुरुचा ॥४६॥
ऐसे आहे संतपण । ते मिळे सत्संगे करोनि साधन ।
नसे अंगी विचित्रपण । कोणतेहि तयांच्या ॥४७॥
पावडीमाजी पाय ठेविता । दावा म्हणे ब्रह्मसत्ता ।
त्या जयत्पाल राजासि तारिले तत्त्वता । शेवटी ग्रंथचि बोधूनि ॥४८॥
करोनिया चमत्कार । संत न करिती उद्धार ।
हाचि मनी राखा निर्धार । बोधचि सार तयांचा ॥४९॥
चमत्काराच्या भरी भरोनि । झाली अनेकांची धुळधाणी ।
संत-चमत्कार यापुढे कोणी । नका वर्णू, सज्जन हो ! ॥५०॥
यावरि श्रोता प्रश्न करी । काय संत नव्हती चमत्कारी ? ।
आम्ही प्रत्यक्ष पाहिले तरी । कां न लोकां सांगावे ? ॥५१॥
एकाने नालीतील घाण फेकली । ती अत्तर-सुगंधे घमघमाटली ।
एकाने मुठीमधूनी काढली । खडीसाखर प्रत्यक्ष ॥५२॥
एकाने कटोरीतून पंगती वाढल्या । श्रोतिया नेत्री धारा काढल्या ।
एकाने घड्याळीच बंद केल्या । सर्व गावाच्या ॥५३॥
मित्रा ! त्वां पाहिले साच । परि हा आभास मिथ्याच ।
संतांचे हे लक्षण नव्हेच । कोणत्याही, कदाकाळी ॥५४॥
हे सर्व संतांघरचे क्षुद्र खेळ । कोणी मानितील यास सबळ ।
तरि ते मुकतील प्रांजळ । सेवाव्रत महत्त्वाचे ॥५५॥
लटिके अदृश्य ते आणावे । काही लोकांस जेवू घालावे ।
आणि आणिले तेथे खळगे पाडावे । हे दिसे, त्या नवल कैसे? ॥५६॥
कोणी कीर्तिस्तव दान करी । पैसे मिळवोनि काळ्या बाजारी ।
तैसे दुसरीकडोनि आणोनि भरी । वस्तु अदृश्य ॥५७॥



एकाचे खिसे कापावे । दुसऱ्यास म्हणे दान घ्यावे ।
तैसेच चमत्कारलाघव आघवे । समजावे हे ॥५८॥
कोणी गुरुची सेवा करी । जीवन वाही चमत्कारावरि ।
अडक्याचे साधन साधूनि झुगारी । आयुष्यरत्न ॥५९॥
पैसा देवोनि नावेतूनि जावे । तेथे तपाने पाण्यावरि चालावे ।
शेवटी अहंकारे भ्रष्ट व्हावे । यात थोरवी कशाची ? ॥६०॥
परि हे जनांसि कळेना । संतांपासूनि इच्छा नाना ।
करिती, देवोनि दान-दक्षिणा । लोभासाठी ॥६१॥
लोकांचिया या ओळखोनि भावा । अनेक दांभिक येती गावा ।
लुटती जनांसि ढोंगी बुवा । मागे लावोनिया ॥६२॥
ही बुवाबाजी भुलवी जना । भ्रष्ट करी ग्रामजीवना ।
फसवोनि भोळ्या-बापड्यांना । भलत्या छंदा लाविती ॥६३॥
काही देती शेती-धन । मग पाहती मागे फिरोन ।
हे तव आहे वेडेपण । आपुल्या स्वार्थांधतेचे ॥६४॥
काही वर्गणी करोनि गोळा । गावी करिती भक्ति-सोहळा ।
भिकारी करोनि स्त्रिया-बाळा । ठेविती कोणी ॥६५॥
प्रयत्नांचा मार्ग सोडिती । अल्पायासे लाभ इच्छिती ।
चमत्कारांच्या थापेत जाती । गारुडियांच्या ॥६६॥
लोक चमत्कारावरि भुलती । मागाहूनि पश्चात्ताप करिती ।
काही भुरळ पाडली म्हणती । आम्हावरि ॥६७॥
वास्तविक संत नव्हे जादुगार । करावया चमत्कार ।
हा तो चालत आहे व्यवहार । पोटभऱ्यांचा ॥६८॥
चमत्कार तेथे नमस्कार । तेणे जादुगिरीस चढे पूर ।
खऱ्या संतास ओळखीना नर । चमत्कारा अभावी ॥६९॥
याच भ्रांतीने भुलोनि । 'संत आले गावी, भुवनी ।
परि पाप न गेले धुवोनि' । म्हणती जन यापरी ॥७०॥
कोणी म्हणती घेतले दर्शन । परि न झाले रोग-निवारण ।
कोणी म्हणती नाही संतान । दिले संतांनी आम्हासि ॥७१॥
कोणी म्हणती मंत्र घेतला । परि उद्धारचि नाही झाला ।
दुःखचि जाळी अजूनि मनाला । अहोरात्र आमुच्या ॥७२॥

कोणी म्हणती घेतले दर्शन । परि नाहि मिळाले आम्हां धन ।
कोणी म्हणती नोकरी लावून । द्यावी संती आम्हांसि ॥७३॥
कोणी म्हणती मुलगी वाढली । संताने सोयरीक नाही जुळवली ।
कोणी म्हणती पायवणी घेतली । परि ताप न गेला आमुचा ॥७४॥
कोणी म्हणती गेलो दर्शनासि । परि आठ दिवसांचा आहे उपाशी ।
सट्टा नाही दिला आम्हासि । साधु, संताने एकहि ॥७५॥
कोणी म्हणे दर्शन घेतले । परि चोर तुरुंगातूनि नाही सुटले ।
चोरी केली म्हणोनि काय झाले? । दर्शन घेता मुक्त व्हावे ॥७६॥
कोणी म्हणती संत घरी आले । आमुचे पाहिजे भाग्य उघडले ।
कर्तव्य न करिताहि राज्य भेटले । पाहिजे आम्हा ॥७७॥
कर्तव्य करिता सर्व होते । मग संतदर्शन काय करावे ते? ।
संताने कर्महीनासि द्यावे आइते । आणूनिया ॥७८॥
तुम्ही म्हणता संत दयाळ । आमुचे वेडे झाले बाळ ।
त्याने कृपा करोनि तत्काळ । बरे करावे ॥७९॥
आम्ही जरी असलो पापी । त्याने संकल्प करावा सुखरूपी ।
आम्हास न कळता उपद्व्यापी । मिटवाव्या तेणे ॥८०॥
संताने मंत्र देता क्षणी । आम्हासि न्यावे उद्धरोनि ।
पाहू नये अधिकार पडताळोनि । आमुचा त्याने ॥८१॥
तरीच त्यास संत म्हणावे । नाहीतरि त्या ढोंगी गणावे ।
आम्ही बोलतो हे चूक मानावे । कोण्या कारणे? ॥८२॥
ऐसे जनांचे म्हणणे चाले । परि सांगा ऐसे कोठे झाले? ।
कोणत्या संताने केले । सुखी, समृद्ध सर्वांलागी? ॥८३॥
याचा विचार न करिती । चमत्कारासाठी मरमरती ।
काय संतापाशी आहे भेदवृत्ति । इतरां शांति न द्याया? ॥८४॥
साधु, संतचि मूल देती । तरि कां वांझ जगी राहती? ।
संत धन, वैभव अर्पिती । तरी भिकारी न दिसावे ॥८५॥
संत बिमारी बसविती । मग बुवांचेही कां प्राण जाती? ।
जगी कोणीच ना मरती । ऐसे कां होऊ नये? ॥८६॥
संतांचा मंत्र कानी पडे । उघडती मोक्षाची कवाडे ।
मग ऐसे कां न घडे । सर्व लोकी सर्रास? ॥८७॥



त्यांच्या संकल्पेचि सर्व होते । तरि दुःखी कोणीहि न राहते ।
काय तुम्हांविषयीच दुजाभाव ते । करिते काही? ॥८८॥
जरी म्हणाल आमुच्या नशिबी नाही । तरि प्रारब्धहि प्रधान होई ।
मग संत-चमत्काराची राही । महिमा कोठे? ॥८९॥
संत आपुल्यापरि झटोनि । सौख्य देती सर्व जनी ।
सफलता त्यांच्या कार्यी बहुगुणी । परि तो नव्हे चमत्कार ॥९०॥
संतांच्या शुद्ध हृदयातूनि । अनुभवा येई, निघाली वाणी ।
परि त्याचीहि कल्पना त्यांनी । केली नाही चमत्कारे ॥९१॥
मुंगीसि हत्तीचे ओझे जैसे । वाटे नवलाचे भलतिसे ।
परि ते सहज घडे शक्तिविकासे । संतकार्य तैसे वाटे जना ॥९२॥
त्यासि चमत्कार मानलिया । लोक विसरती कर्तव्यपाया ।
भजो लागती सकामपणे तया । आंधळ्या भावे निष्क्रिय ॥९३॥
म्हणोनि महत्व नको चमत्कारा । शोधावी सत्कार्य-परंपरा ।
ज्ञान आणि कार्यस्फूर्तीचा झरा । घ्यावा संत-जीवनातूनि ॥९४॥
वस्तुतः मार्गदर्शनचि कार्य संतांचे । पुत्र, धन देणे नव्हे साचे ।
बिमारी बसविणे हे वैद्याचे । काम आहे सर्वथा ॥९५॥
संत अज्ञानरोगाचे वैद्य । जीवनविकासाचे सर्वाद्य ।
शुद्ध कर्मांनी असती वंद्य । तिन्ही लोकी ॥९६॥
त्यांचा एकचि चमत्कार । अल्पज्ञ जीव केला विश्वाकार ।
सर्वांभूती देखिला ईश्वर । ठायी ठायी याच डोळा ॥९७॥
त्यांचे तेवढे करणे जाणणे । या चमत्कारापुढे आकाश ठेंगणे ।
तेथे कोण पुसतो तुणतुणे । क्षुद्र सिद्धिचे, वाजताहि ? ॥९८॥
संत सेवेचे अवतार । सर्वांभूती नम्र, सत्य व्यवहार ।
तयांसि देवहि मानी थोर । अन्य चमत्कार कासया? ॥९९॥
साधूचा सरळ प्रेमळपणा । हा या जगी चमत्कारचि जाणा ।
त्याने 'अन्यहि मीच' म्हणावे आपणा । हा चमत्कार केवढा! ॥१००॥
अहो ! सर्वांत मोठा चमत्कार । तो मानी 'विश्वचि माझे घर' ।
त्यासाठी कष्टतो अहोरात्र । जीवे, फार उल्हासे ॥१०१॥
उणे दिसे ते पूर्ण करी । जगाचा तोल बोधे सावरी ।
परंतु केल्याचा स्पर्शचि नसे अंतरी । चमत्कारी संत ऐसे ॥१०२॥

मात्र संतचि सर्वकाही करी । आणि कर्तव्यचि नाही माणसावरि ।
ऐसी संताचि एकांगी थोरी । गाती, ते नोहे उचित ॥१०३॥
ऐसे गावी होऊ न द्यावे । जनांसि सत्य ज्ञान कळावे ।
खऱ्या संतासि ओळखावे । कर्तव्यासाठी ॥१०४॥
संतांचे विचित्र व्यवहार । तैसेचि त्यांचे चमत्कार ।
हे वगळोनि दावावा सत्य सार । ग्रामीण जनांसि ॥१०५॥
आपुला आपण उद्धार करावा । संत-देवांचा सहारा घ्यावा ।
हाचि संत-ग्रंथांचा गवगवा । चित्ती धरावा सर्वांनी ॥१०६॥
यातचि गावाचे कल्याण । निघोनि जाईल दुबळेपण ।
कर्तव्य आपुले जाणतील जन । तुकड्या म्हणे, करा ऐसे ॥१०७॥
इतिश्री ग्रामगीता ग्रंथ । गुरु-शास्त्र-स्वानुभव-संमत ।
संत-सामर्थ्य कथिले येथ । एकतिसावा अध्याय संपूर्ण ॥१०८॥


॥ सद्‌गुरुनाथ महाराज की जय ॥

''साधुसंतांचा स्वभाव लोककल्याणकारी असतो. त्यांचे सर्व आचरण जगहितासाठीच होत असते. श्रीकृष्ण-संकीर्तन हेच विश्वाला शांती देण्याचे साधन त्यांनी अवलंबिलेले असते. तणापेक्षाही स्वतःला तुच्छ समजून ते जगाची सेवा करीत असतात.''

**– श्रीसंत चैतन्य महाप्रभू**



# ॥ चित्र परिचय ॥



## अ. ३२ – श्री रमण महर्षी

सर्वांसि समत्वाकडे न्यावे । एकत्व व्यवहारी नांदवावे ।
अवघे विश्वचि ब्रह्मसुखी डोलावे । वाटे तया संता ॥७५॥

मद्रासमधील अरुणाचल पर्वती नुकतेच होऊन गेलेले उच्च कोटीचे महापुरुष! शब्दाशब्दातून अंतर्मुख करणारे ज्ञान त्यांनी प्रत्येकास दिले. एकेठिकाणी राहून आपल्या आदर्श प्रभावाने त्यांनी विशाल समाजात चैतन्य ओतले. निर्विवाद संतस्वरूप !

● अध्याय बत्तिसावा ●

# संत-स्वरूप

॥ श्रीगुरुदेवाय नमः ॥

श्रोता सद्भावे करी प्रश्न । चमत्कार नव्हे संत-खूण ।
मग संतांची ओळखण । समजावी कोण्या प्रकारे ? ॥१॥
साधु दिसती जेथे, तेथे । कैसे जाणावे खरे-खोटे ते ? ।
त्यांचे तात्विक रूप कोणते? । सांगावे आम्हा ॥२॥
श्रोतियांचा ऐकोनि प्रश्न । करोनि सकळांसि नमन ।
कथितो संतांची ओळखण । ग्रामहितासाठी ॥३॥
श्रोतियांत साधु नसे बैसला । म्हणता लागेल काळे तोंडाला ।
म्हणोनि प्रथमचि नमस्कार केला । ग्राम-श्रोतेजना मी ॥४॥
साधु सर्वत्रचि आहे । साधुत्वाविण स्थिर काय राहे? ।
जे असेल ते विलया जाय । साधुत्व नसता ॥५॥
सति आणि साधुवृत्ति । ही गावाची महासंपत्ती ।
साधुत्वाविण कोणे रीती । टिकेल जीवन जगाचे? ॥६॥
सर्व परस्परां खाऊ बघती । त्यांना सांभाळी संतवृत्ति ।
आघात सोसूनि देई शांति । सर्व जना अन्य कोण? ॥७॥
दया, क्षमा, शांति, विवेक । यांचे केंद्रस्थान साधु देख ।
प्रत्येक कार्यी आवश्यक । पुरुष ऐसा सर्व हिता ॥८॥
परि तयाची ओळखण । बहिरंगावरोनि करील कोण? ।
संत ओळखावा वृत्तीवरून । अथवा सद्गुण पाहोनिया ॥९॥
नाहीतरि ओळखता न ये । नाना सांप्रदायिक संत दिसताहे ।
नाना रंगांनी सजला राहे । वरोनिया संत कोणी ॥१०॥
कोणी भगवीच वस्त्रे घालिती । कोण काळा रंग पसंत करिती ।
कोणी पांढरे फटफटीत वापरती । वस्त्र अंगी ॥११॥
कोणी माथा भार ठेवती । कोणी माळा, टिळे लाविती ।
कोणी लंगोटीच परिधान करिती । नारळाची ॥१२॥



कोणी अंगासि फासती भस्म । कोणी धुनी लावूनी घेती नाम ।
कोणी साधिती पंचाग्निकर्म । बहिरंगाने ॥१३॥
चिरकुट, चिंध्या अंगा बांधती । घोंगडी, भोपळेच कोणी मिरविती ।
कोणी ओंजळीनेच पाणी पिती । सर्व काळ ॥१४॥
कोणी अखंड उभे राहती । कोणी दिवसभरी पहारा देती ।
कोणी गुप्तची वावरती । लोकांमाजी ॥१५॥
कोणी एकाने समाधी साधली । खळगा करोनि मान पुरविली ।
चोवीस तासांनी काढली । शेवटी घेतली शिफारस ॥१६॥
कोणी म्हणवी दीन सेवक । कोणी अवतार म्हणवी अलौकिक ।
योगीराज म्हणवोनि वाजवी शंख । ऐसे अनेक खरे-खोटे ॥१७॥
नाना मतांचे नाना संत । नाना संतांचे नाना पंथ ।
कोण निवडावा उत्तम त्यात । वेषादिकांनी कळेना ॥१८॥
म्हणुनी संतांच्या ऊणेखुणे । कोणी न पावे बहिरंगाने ।
त्यास पाहिजे सहवास करणे । अथवा ओळखणे कार्यावर ॥१९॥
कार्य कधी दांभिकहि करी । आतले न जाणवे लौकरी ।
ज्ञानध्यानहि बोले वैखरी । ओळखू ये ना सहजी तो ॥२०॥
त्याला कारण आपलाहि स्वभाव । भिन्न प्रकृतींचे भिन्न भाव ।
परि बाह्य वेषावरि संत-असंत गौरव । देता, नोहे हिताचे ॥२१॥
बाह्य सत्कार्य, सदाचार ज्ञान । यांसि मानिले श्रद्धास्थान ।
तेणे मात्र अधःपतन । नव्हे आपुले सद्भावे ॥२२॥
उत्तम गुण, सदाचरण । अभेदवृत्ति, विशाल ज्ञान ।
हे दिसे तोवरिच तेथे गुरुपण । मानिता कोणी फसेना ॥२३॥
मानव्याचा उत्तम आदर्श । नाही विषाद, नाही हर्ष ।
सरळ विवेक, सत्कार्य-संतोष । संतापाशी पाहावा ॥२४॥
ज्याचे गेले संकुचितपण । झाले विशाल अंतःकरण ।
ज्याचा व्यवहार आदर्श पूर्ण । त्यासिच नम्र असावे ॥२५॥
एरव्ही संत म्हणता हात जोडावे । जवळ जाता निरखित जावे ।
ऐसे करिता फजीत न व्हावे । लागेल कधी ॥२६॥
आसक्तीने लोभी न व्हावे । मुमुक्षुत्व अंगी बाणवावे ।
म्हणजे ऐशातैशा गुरुसि न फावे । भुरळ घालणे ॥२७॥

जो स्वये उत्तम शिष्य झाला । त्यासि गुरुहि लाभे भला ।
परि सात्विकतेचाचि आदर केला । पाहिजे निश्चये ॥२८॥
अहो ! सत्वशील तोचि साधु भला । जो रिकामा कधीच न पाहिला ।
तो काम करिताचि ओळखला । पाहिजे सत्य ॥२९॥
समजा, तो जेथे उभा असे । काही कराया स्मरे उल्हासे ।
तो जेथे बैसला दिसे । तेथे लोक तैसे बसावे म्हणोनि ॥३०॥
जेथे तो सभास्थानी जाये । लोकांचे जोडे रांगेत ठेविताहे ।
अथवा लोकां बैसवी नीट उपाये । समाज–सौंदर्य कळावया ॥३१॥
तो जेथे भोजनास बैसे । उणे पडोचि न देतसे ।
उणे दिसता कामी लागतसे । व्यवस्थेच्या आपणचि ॥३२॥
तो जेथे जेथे काम करी । ते ग्राम बनवी स्वर्गपुरी ।
त्याची सेवा महाक्रांतिकारी । ग्रामोद्धारक ॥३३॥
बोले तैसा चाले उत्तम । लोकसंग्रही त्याचे प्रेम ।
आपणचि करी आपुले काम । नवरदेव न होता ॥३४॥
जगणे परिश्रमावाचून । हे नव्हे संतांचे लक्षण ।
झटुनि करावे लोक–कल्याण । निष्कामपणे ॥३५॥
आपुल्या देही अनासक्त । परि हीनदीनांचा झाला भक्त ।
अहोरात्र सेवानुरक्त । नम्र भावे, संत तो ॥३६॥
जनता तयासि वाटे देव । सेवेत नाही लपंडाव ।
परि अधिकार तैसी देई ठेव । उपदेशाची सर्व जना ॥३७॥
मूर्खांसि करावे शहाणे । हेचि त्याचे नेहमी पाहणे ।
जड, अज्ञानासि बोध देणे । कामचि संताचे ॥३८॥
हा तो संतांचा सहज स्वभाव । न पाहावा भेद–भाव ।
बोध करावा सदैव । सत्कर्माचा सर्वांसि ॥३९॥
ओज असे तयाचिया वाणी । सहज बोलता घेई वेधोनि ।
नम्र होती, ऐकता प्राणी । संत–वचना ॥४०॥
संतांचे सदा प्रेमळ बोल । वाक्य – बोध अति विशाल ।
कर्तव्य तत्परता प्रबल । संतांपाशी ॥४१॥
संत–वचनांचा महाप्रताप । ऐकता श्रवणी, होय अनुताप ।
दुष्ट वृत्ति आपोआप । निरसोनि जाय सत्संगे ॥४२॥



संतांची नजर कृपेने पडे । त्यासि तीर्थाटन ठायीच घडे ।
संत प्रसन्नतेचे धडे । पदोपदी देताति ॥४३॥
संत मातेहूनि मायावी । संत वैभव असोनि गोसावी ।
राज्य करोनि फकीरी दावी । आपुल्या अंगी ॥४४॥
संत सत्तेविण राज्य करी । धनावाचूनि वैभव भरी ।
स्त्री–पुत्र नसताहि संसारी । विश्वव्यापी ॥४५॥
संत गंगेहूनि पवित्र । शीतल, निर्मल सूर्य–चंद्र ।
संत कल्पतरुहूनी थोर । मोक्षदानी ॥४६॥
संत–हृदये असती कोवळे । दया द्रवोनि हृदय उफाळे ।
मनुष्य–कल्याणाचे निर्वाळे । संतांपाशी ॥४७॥
संतहृदय जरी दयाळ । कठिण काळाचेहि काळ ।
न्याय, नीतीने अति निर्मळ । निर्भय वृत्ति ॥४८॥
संतांपाशी एकचि धर्म । सकल जीवांचे कल्याणकर्म ।
'मानवता हाचि मुख्य धर्म' । सर्व काळ ॥४९॥
संतांस नाही जात–परजात । विश्वकुटुंब संतांचे गोत ।
जे जे भेटतील ते आप्त । सुहृद त्यांचे ॥५०॥
कोणा कधीही न होवो दुःख । संतुष्ट राहावेत सकळीक ।
असोत राव अथवा रंक । समान त्यांना ॥५१॥
विश्वसुखे संत संतोषे । जनदुःखे दुःखी भासे ।
सदा सत्कर्मी उल्हासे । लागती संत ॥५२॥
संतांचा तो मूळ स्वभाव । सर्वांत वाढवावा प्रेमभाव ।
करावा सज्जनांचा गौरव । कौतुकाने ॥५३॥
कोठे सज्जनांवरि नाराजी । कोठे दुर्जनांसीहि पूजी ।
परि ध्येय एकचि, समाजी । वाढ करणे उत्तमाची ॥५४॥
दुर्जनांवरीहि प्रेम करावे । दुर्जनतेसि निवारावे ।
सज्जन करोनि सोडावे । प्रेमबळे ॥५५॥
आपुले अंगहि अर्पोनि । उणे करावे पूर्ण जनी ।
शांति दे चंदनापरी झिजोनि । संत तोचि ॥५६॥
अंध रूढ्यांचे उच्चाटन । मानवधर्माचे संस्थापन ।
यासाठी करी प्राणहि अर्पण । प्रसंगी संत ॥५७॥

ऐसे सुंदर बहिरंग । याहूनि थोर अंतरंग ।
संपादिल्या संत-संग । फिटे पांग जीवाचा ॥५८॥
संत-संगति ज्यास लाभली । त्याची दुर्दशाच पळाली ।
कर्तव्य-फळे उमगू लागली । जीवनाची ॥५९॥
संतांचिया सहज संगती । सद्‌बोधाची फळे लाभती ।
प्रवृत्ति ते होय निवृत्ति । अंतरंगी ॥६०॥
अंतरंग आणि बहिरंग । उन्नत करील सर्व अंग ।
ऐसा आहे संत-संग । सर्वोदयकर्ता ॥६१॥
उज्ज्वल संतांचे जीवन । भक्तिभाव – वैराग्यपूर्ण ।
आत्मानात्मविवेक ज्ञान । संतांपाशी ॥६२॥
आत्मशक्ति, कर्मशक्ति । ज्ञानशक्ति, प्रेमशक्ति ।
सात्विक कला, प्रमाणशक्ति । वास करी संतांठायी ॥६३॥
मानसिक शक्तीचे सागर । संत करितील जो निर्धार ।
निश्चये होईल तो व्यवहार । सर्वांगपूर्ण ॥६४॥
परि प्रत्येक साधु सर्वोदयी नव्हे । काही तत्त्वी अपूर्णता राहे ।
त्यातहि अधिकार भेद आहे । अवस्थापरत्वे ॥६५॥
जीवलोक आणि देवकोटी । परलोक तैसी परात्परकोटी ।
चढती, वाढती संत-सृष्टि । परि केंद्रबिंदु एकचि ॥६६॥
जो ऐहिक दृष्टीने जन । मानी सेव्य, एक समजोन ।
करितो सेवा रात्रंदिन । मानिती धन्य लोक तया ॥६७॥
परि त्यास नाही खंती, महंती । राग, द्वेष नाही कोणाप्रति ।
मान-अपमानहि न ये चित्ति । कार्यीच वृत्ति समाधानी ॥६८॥
हा जीवसृष्टीचा साधुसंत । ईशसृष्टीचा साधूहि तद्वत ।
तो 'देव-देवी' म्हणोनीच ओळखीत । जनलोकां भक्तिभावे ॥६९॥
न मानी देश, वेष, धर्म, पंथ । नाठवे नीच-उंच जातपात ।
देवाचे कुटुंब मानी जग समस्त । व्यवहार उन्नत तयाचा ॥७०॥
ओळखी एकाच स्थानावरूनि । त्यास न दिसे राव, रंक कोणी ।
राजा-प्रजा भेद न मानी । साधु देवकोटीचा ॥७१॥
ज्याने परसृष्टी अनुभवली । त्यास परमात्मता साधली ।
आप-पर बोलीच निघोनि गेली । एकात्मता झाली सर्वभूती ॥७२॥



अखिल ब्रह्मांडी जे जे दिसे रुप । ते ते झाले ब्रह्मस्वरुप ।
जन मिथ्या भ्रमे सोशिती ताप । तो निवारी नानापरी ॥७३॥
स्वप्न मिथ्या परि ओसणे कोणी । त्यास जागवी हालवोनि ।
तैसा दयाळुपणे करी जनी । सर्व सुखकार्य ॥७४॥
सर्वांसि समत्वाकडे न्यावे । एकत्व व्यवहारी नांदवावे ।
अवघे विश्वचि ब्रह्मसुखी डोलावे । वाटे तया संता ॥७५॥
परात्पर स्थिती विश्वचि नाही । सर्व स्वानंद कोंदला पाही ।
त्याची राहणीच सहजी ब्रह्ममयी । सहज बोलहि वेदोत्तम ॥७६॥
ऐसे असती भिन्न प्रकार । साधु, संतांचे विविध संसार ।
तेथे आम्ही पडतो पामर । जाणावयासि ॥७७॥
म्हणोनि संतांच्या अगम्य खुणा । संतचि जाणतील संत-जना ।
परि आपुल्या जाणिवेने त्यांना । ओळखित जावे ॥७८॥
जितके संतरूप जाणे आपण । तितके अंगी येईल संतपण ।
गंगेसि मिळता गंगाचि होऊन । राही नाला ॥७९॥
गंगा नेहमी झुळझुळ वाहे । परि पाणी घ्यावयासि जो जाये ।
त्याच्या पात्राइतुकेचि राहे । पाणी जवळी ॥८०॥
गंगा जरी मोठी असली । तरी घरी कैसी न्यावी भली? ।
ज्याने नेण्याची व्यवस्था केली । प्राप्त झाली शांति तयासि ॥८१॥
तैसे संत सदा कृपाळू । दयाळू, स्नेहाळू, प्रेमळ, मायाळू ।
जीव, जनांचे नित्य कनवाळू । सुसंकल्पी ॥८२॥
उकलोनि दाविती ग्रंथ-वर्म । आपुल्या अनुभवे नाशिती भ्रम ।
सकळां दाविती वाट सुगम । संत, मार्ग झाडोनिया ॥८३॥
त्यांसि शरण लागे जावे । बोलता वचन, श्रवणी भरावे ।
भरले तैसेचि करावे । निश्चयाने जीवनात ॥८४॥
मग जीवन होय उन्नत । हाचि उद्धाराचा पथ ।
संत दाविती मार्ग सतत । जड जीवासी सद्‌भावे ॥८५॥
तयांचा बोध ऐकता स्वभावे । जड जीवही उद्धरोनि जावे ।
या मार्गेचि सर्व सुख पावे । जनतेलागी ॥८६॥
संत जनतेशी समरस होती । म्हणोनीच जडली त्यांवरि भक्ति ।
संत चालती, बोलती मूर्ति । भगवंताची ॥८७॥

मित्रहो ! जे जे देवाने केले । तेचि संतांनी हाती धरले ।
प्रचाराद्वारे गाजविले । देव-वाक्यां सर्वत्र ॥८८॥
ईश्वरी अवताराचे कार्य । तेच संतांचे अंगी चातुर्य ।
सर्वांठायी आणोनी माधुर्य । वळण देती जनाला ॥८९॥
विसरोनि आपुले मोठेपण । वाढविती सत्याचे महिमान ।
न जाती प्रतिष्ठा, वैभव भुलोन । आडमार्गे कधीहि ॥९०॥
जुनीच साधने घेवोनि हाती । करिती जनांची जागृति ।
समयानुरूप स्वरूप देती । सर्व उत्तम प्रथांसि ॥९१॥
असो दगडाचाहि उत्सव । परि त्यात भरोनि दिव्य भाव ।
त्या द्वारे उन्नत करिती मानव । साधु, संत ॥९२॥
सर्व संस्था, पक्ष, पंथ । यांच्यामध्ये जे जे उचित ।
त्यासि करिती प्रोत्साहित । संतजन समभावे ॥९३॥
जनांचिया चाली चालती । जनांचिया बोली बोलती ।
परि आपुले उद्दिष्ट घालती । कुशलपणे त्यामाजी ॥९४॥
सर्वांस वाटती आपुल्यासारखे । नव्हती कोणासि पारखे ।
आबालवृद्धांसि करिती कौतुके । आकर्षीत प्रेमाने ॥९५॥
सर्वांपासूनी पुढेच असती । परि दूर न वाटे कोणाप्रति ।
तेणे करू लागती प्रगति । लोक निराश न होता ॥९६॥
लहान मुलासि शिकवावे । त्यासाठी पांडित्य दूर ठेवावे ।
तैसे वर्तती स्वभावे । साधु, संत जनांसाठी ॥९७॥
आंधळ्याचे होती नेत्र । चैतन्य ओतिती सर्वत्र ।
घुसती होऊनि ऐक्यसूत्र । संत विरोधा-अंतरी ॥९८॥
सर्व मानवांसि उन्नत करावे । सर्वत्र समाधान पोचवावे ।
प्रत्येकाने प्रत्येकास व्हावे । पूरक, ऐसे उपदेशिती ॥९९॥
मेघवर्षावासारिखा उपदेश । तेथे नाही गुरू-शिष्य ।
आत्मवत् पाहती सर्वांस । संत, सज्जन ॥१००॥
त्यांचा उपदेश म्हणजे अमृत । शांति लाभे होता प्राप्त ।
विविध तापे जीव जे तप्त । होती तृप्त सत्संगे ॥१०१॥
म्हणोनि ग्रंथी वर्णिले सकळ । संत उद्धरील आपुले कूळ ।
ऐसेचि नव्हे, प्रेमाचा सुकाळ । करील गावी ॥१०२॥




जयां गावी वसेल संत । तेथे पुण्य करील पापांचा अंत ।
उद्धरोनि जाय प्रांतचा प्रांत । दुःखे होत देशोधडी ॥१०३॥
संत करिती आपणासमान । संत - संगे संतपण ।
प्रयत्ने उन्नत होय जीवन । संत - बोध लाभता ॥१०४॥
ऐसा संतांचा महिमा । आवडतो पुरुषोत्तमा ।
सर्व जीवांच्या येतो कामा । मायबाप म्हणोनिया ॥१०५॥
ऐसे क्रियाशील संतजन । त्यांचीच गावी असावी चलन ।
तरीच उद्धरेल गाव पूर्ण । नांदती सद्‌गुण, तुकड्या म्हणे ॥१०६॥
इतिश्री ग्रामगीता ग्रंथ । गुरु-शास्त्र-स्वानुभव-संमत ।
सत्संग कथिला ग्रामोद्धारार्थ । बत्तिसावा अध्याय संपूर्ण ॥१०७॥

॥ सद्‌गुरुनाथ महाराज की जय ॥

“सत्स्वरूप आत्म्याचे ज्ञान तोच खरा सत्संग, तीच खरी सिद्धी! दुसऱ्या सिद्धी स्वप्नवत् होत. तुमच्या आत पाहा, स्वतःला जाणा. एक देहासमोर दुसरा देह लावविण्याचे कारण काय? कोण गुरू व कोण शिष्य? विचाराने स्वतःच आत्मसाक्षात्कार करून घ्या!”

**– श्रीसंत रमण महर्षी**

# ।। चित्र परिचय ।।



## अ. ३३ – गोस्वामी तुलसीदासजी

तुलसीदास आधी आसक्त । ते वैराग्ये झाले महाभक्त ।
रामकथा गावोनि तारिले जगत । म्हणोनि वाल्मीकि – अवतार ।।४०।।

सामान्य माणसाहूनही अधिक स्त्रीलंपट पुरुष. मनात आणले तर अवतारी ठरू शकतो, याचे हे प्रत्यक्ष उदाहरण! गोस्वामी तुलसीदासांनी 'रामचरितमानस' लिहून मुसलमानी आक्रमणाने पिचलेल्या गावागावांना व्यक्तिधर्म, राष्ट्रधर्म व मानवधर्म शिकविला, सत्यपरित्राण व दुष्टदमन करण्याची तेजस्वी ज्योती विस्कळलेल्या समाजात जागविली. त्यांचे अवतारकार्य चिरस्मरणीय आहे.



● अध्याय तेहतिसावा ●

# अवतारकार्य

।। श्रीगुरुदेवाय नमः ।।

श्रोतियांनी केला प्रश्न । संत – संगे मिळे संतपण ।
ऐसे झाले निरूपण । हे तो जीवा पटेना ।।१।।
संत देवाचे अवतार । आम्ही गावचे गवार ।
कैसे त्यांच्या बरोबर । व्हावे आम्ही?, अशक्य हे ! ।।२।।
याचे ऐका समाधान । जग झाले ईश्वरापासोन ।
'नर तोचि नारायण । दाविली खूण संतांनी ।।३।।
जन्मासि आला तोचि अवतार । अवतार सर्वचि प्राणिमात्र ।
त्या अवताराचे अनंत प्रकार । प्रकट होती सत्कर्मे ।।४।।
कोणी आपुले पोटचि भरी । कोणी कुटुंबाचे पोषण करी ।
कोणी गावाची काळजी निवारी । आपुल्यापरी ।।५।।
कोणी होती प्रांतव्यापी । प्रांताकरिता कष्टी – तपी ।
जनांकरिता वाट सोपी । करोनि द्याया हौसेने ।।६।।
हे अवतार साधारण । यापुढे विशेष अवताराचे लक्षण ।
जो मिरवी देशाचे भूषण । शरीरी स्वये ।।७।।
''माझा देशचि माझे घर । देश दुःखी जणु माझेचि शरीर ।
त्यासाठी मी निरंतर । कष्टी होईन सांभाळाया'' ।।८।।
ऐसे ज्याने मनी धरिले । किंबहुना कार्ये अनुभवा आले ।
अनेक आपत्तींनी उजळले । सत्कार्य ज्याचे ।।९।।
त्यासि म्हणावा अवतार । जो करी सज्जन-चिंता निरंतर ।
दुष्ट बुद्धीचा तिरस्कार । सदा जयासि सक्रिय ।।१०।।
जगाचे उद्दिष्ट आहे सत्य । तिकडे जग करावे प्रवृत्त ।
ऐसे ज्याचे ज्याचे कृत्य । तोचि अवतार निश्चये ।।११।।
षड्गुण ऐश्वर्याच्या प्रमाणात । अंश, पूर्ण आदी प्रकार त्यात ।
ज्ञानी कर्तबगार निरासक्त । उदार, श्री-यश संपन्न ।।१२।।

या अवताराचे पंथ दोन । एक हृदयपरिवर्तन, दुसरा दमन ।
एक क्रांति करी सशस्त्र पूर्ण । दुसरा भावभक्तीने वळवी ॥१३॥
धर्मनीति सेवामार्गे गवसिली । त्यासि संत-अवतार संज्ञा लाभली ।
साम, दाम, दंड, भेदाने क्रांती केली । त्यासि म्हणती देवावतार ॥१४॥
देव - अवतार नित्य नसती । महाप्रसंगी पुढे येती ।
संत - अवतार नेहमी चालती । लोकी सुनीती वाढवाया ॥१५॥
काही अवतारांची महिमा । विश्वव्यापक त्यांचा आत्मा ।
प्रगट करण्या मानवतेची सीमा । प्रचार त्यांचा ॥१६॥
ज्यांचा जैसा अधिकार । त्यांचा चाले तैसा व्यवहार ।
मार्ग एकचि, परि मागे-समोर । पाय अनुभवे पडताति ॥१७॥
कोणी भक्ति शिकवोनि सुधारी । मंत्र शिकवोनि जनता तारी ।
कोणी ज्ञानमार्ग सांगोनि समर्थ करी । मानवता लोकी ॥१८॥
अखेर मानवांची उन्नती करणे । तया राष्ट्रधर्म, निजधर्म शिकविणे ।
हेचि संतांचे असते लेणे । सर्वतोपरी ॥१९॥
वाउगा संकल्पचि नाही उठला । स्फुरला तो अनुभवचि ठरला ।
त्या दिव्य-दृष्टीच्या पुरुषाला । संत-अवतार म्हणो आम्ही ॥२०॥
कोणी कुटुंबासि त्रस्त करी । कोणी गावाचे होती वैरी ।
कोणी देशात उपद्रव करी । पाखांड पंथी ॥२१॥
जो देशद्रोही, धर्मद्रोही ठरला । प्रेमाने सांगता न समजला ।
सर्व प्राण्यांना त्रास झाला । ज्याच्यायोगे ॥२२॥
काही केल्या न सुधारे । शिरले क्रूर वृत्तीचे वारे ।
सज्जनांचे मनहि थरारे । ज्याच्या धाके ॥२३॥
त्याची झाली परिसीमा । तेव्हा देवावतार येतो कामा ।
पाठवावयासि विरामा । देहा त्याच्या निरुपाये ॥२४॥
ते दुर्जन, राक्षस-अवतार । जे जनतेसि दुःख देती फार ।
त्यांना दंड द्याया देव-अवतार । प्रकट होती ॥२५॥
ऐसे हे नेहमीच चालते । जैसे जन्म-मरण-रहाट फिरते ।
तैसेचि संत-देव येताति ते । भूमीवरी ॥२६॥
राक्षसी आणि देववृत्ति । रूपांतरे खेळते जगती ।
संत देव स्थापू पाहती । शांति, प्रेम, शक्तीने ॥२७॥



येथे श्रोत्यांनी प्रश्न केला । जरी दुष्ट तोचि राक्षस ठरला ।
तरि त्याने वरदहस्त कैसा मिळविला । देवतांचा? ॥२८॥
काय ठावे नव्हते त्याचे गुण? । कां दिले शक्तीचे वरदान? ।
आम्हा न कळे हे पुरण । कैसे आहे सांगा की? ॥२९॥
याचे ऐकावे उत्तर । हा राक्षसहि आधी भक्त फार ।
त्याच्या तपानेचि देवता निरंतर । प्रसन्न त्यासि ॥३०॥
त्याचिया गुणकर्मे मिळाले वरदान । ते सहन न झाले मागाहून ।
त्याचा दुरुपयोग दारुण । केला त्याने मनमाने ॥३१॥
प्रथम हाती आली सत्ता । मग भुलला तो भगवंता ।
लागला उपभोगाच्या पंथा । नीतीप्रवृत्ति सोडोनि ॥३२॥
त्याची राखती संत मर्जी । तव तो अधिकचि चढे समाजी ।
जनते मनी वाढताहि नाराजी । पर्वा न करी अहंकारे ॥३३॥
भरावया पापांचा रांजण । त्यासि देती प्रोत्साहन ।
जेणे त्वरित होय निकाल पूर्ण । पंख फुटलिया उधकोपरी ॥३४॥
कितीहि साधु, संत समजाविती । परि न वळे त्याची मति ।
म्हणोनि देवावताराहाती । कार्य आले तयाचे ॥३५॥
देव-अवतार समजाविती । नाना योजना करूनि पाहती ।
शेवटी शस्त्र धारण करिती । दुष्टासाठी ॥३६॥
त्याच्या मोक्षाने सुटती जन । मुक्त होती दुःखापासून ।
म्हणोनि करावा लागे प्रयत्न । अवतारासि निर्वाणीचा ॥३७॥
ऐसे ज्याने ज्याने केले । दुःख जगाचे निवारिले ।
ते सर्व अवतारचि ठरले । पुराणे झाली तयांची ॥३८॥
तैसे कोणी करी अजून । त्यांची गुणकर्मे पाहून ।
पूर्वीच्या थोरांचे अवतार, जन । मानिती तया ॥३९॥
तुलसीदास आधी आसक्त । ते वैराग्ये झाले महाभक्त ।
रामकथा गावोनि तारिले जगत । म्हणोनि वाल्मीकि-अवतार ॥४०॥
कोणी भिन्न देवां अवतार मानिती । हेही आहे आपुलीच भक्ति ।
पुढे पुढे कळेल तयाप्रति । पायऱ्या अवतार-कार्याच्या ॥४१॥
कोणा म्हसोबा, खंडोबा मान्य । कोणी शक्ति-अवताराचे करी पूजन ।
कोणी अवतार राम-कृष्ण । म्हणती महाविष्णूचे ॥४२॥

कोणी दश अवतार मानिती । कोणी गुरुनानक-परंपरा वानिती ।
कोणी तीर्थंकरचि अवतार म्हणती । कोणी गणती चोवीस ॥४३॥
कोणी बुद्ध-अवतार पूजती । कोणी दत्त-अवतारा भजती ।
कोणी येशू ईश-पुत्रावतार समजती । जगती झाला ॥४४॥
कोणी म्हणे महंमद प्रेषित-अवतार । कोणी म्हणे संत अंशावतार ।
लोक मानिती अनंत प्रकार । किती सांगो ? ॥४५॥
याचे एकचि कारण । जो जो उन्नतीसि लागला न्यूनपूर्ण ।
तोचि अवतार मानिला वेगळा समजोन । सज्जनांनी ॥४६॥
कोणी ब्रह्मा-विष्णु-हर । यांसि मानिती खरे अवतार ।
कोणी म्हणती देवचि भूमीवर । कधी नाही प्रकट झाला ॥४७॥
देव आहे आत्मशक्ति । तो देह धारण न करी कल्पान्ती ।
त्यासि जाणणे यातचि उन्नति । मानवाची ॥४८॥
ऐसी भिन्न लोकांची भिन्न मते । सत्य सर्वांतचि उणेपूरे ते ।
परि संगति कैसी लावावी याते । विसरोनि गेले ॥४९॥
जे जे पुरुष थोर झाले । त्यासि अवतारचि संबोधिले ।
ज्यांचे ज्यांना चारित्र्य पटले । त्यांनी मानले त्यालागी ॥५०॥
'जुने ते सोने' विशेष ठरले । येथे कोणाचेचि नाही चुकले ।
परि ज्यांनी सत्य अनुभवले । तेचि पावले देव-पदा ॥५१॥
कोणी म्हणती देवता अयोनिसंभव । अवतार करी चमत्कारचि सर्व ।
हे म्हणणे आहे अर्थगौरव । भाविकपणाचा ॥५२॥
गर्भ, नर्क, वैकुंठपुरी । याचे महत्त्व काय देवाअंतरी ? ।
हे पाहोनि भीति-मोह धरी । तरि तो देव कैसेनि ? ॥५३॥
देवास वैकुंठ, गर्भ सारिखे । येणे - जाणे स्वाभाविके ।
सुख-दुःखे एकाचि कौतुके । राहती तयापुढे ॥५४॥
योनीद्वारे जरी प्रकटला । तरी दुःख न वाटे त्याच्या हृदयाला ।
म्हणोनीच तो अयोनि-संभव मानिला । ज्ञानियांनी ॥५५॥
एरव्ही जन्म-मरण सकला सारिखे । सहनशक्ति, अधिकार-भेद राखे ।
जैसे जयाचे स्थान-मान देखे । तैसे निके नाम तया ॥५६॥
सर्व अवतार मानवीच असती । परि अधिकारा ऐसे कार्य करिती ।
त्यांची धारणा जीवन्मुक्ति । तैसीच असते सर्वदा ॥५७॥



अनेक जन्मांची संस्कार-संगति । घेवोनि येताति सांगाती ।
उद्धराया जड जीवांप्रति । मार्ग दाविती अवतार ॥५८॥
परि मानवीच कार्य करणे । मानवी मार्गानेचि येणे-जाणे ।
मानवांच्या भूषणापरी मिरविणे । अवताराचे ॥५९॥
मानवे सर्व प्राणिमात्रा सुखवावे । सर्व कार्य सुरळीत चालवावे ।
एक असोनि अनंत व्हावे । उल्हास हाचि अंतरी ॥६०॥
हे समजोनि जो वर्तला । तोचि अवतार शेवटी ठरला ।
ज्याने पृथ्वीचा संबंध जोडला । एकसूत्री प्रयत्ने ॥६१॥
ज्यांनी सर्व विश्व सूत्रात गोविले । सन्मार्ग मानवमात्राला शिकविले ।
तेचि थोर अवतार झाले । पुढेहि होतील निश्चये ॥६२॥
म्हणोनि अवतार हा उन्नतिवाद । अधिकार तैसा प्रकटे विशद ।
विश्वात्मभावे स्वयंपूर्ण सिद्ध । अवतार आम्ही मानतो ॥६३॥
तोचि सर्वांसि एक करी । एक करोनि अनेकत्वी वावरी ।
त्यासीच पावली पूर्णता खरी । विश्वात्म्याची ॥६४॥
एवढी विशाल ज्याची धारणा । एवढा कार्याचा व्याप जाणा ।
विश्वाचिया मतभेदांना । मिटवू शके जो ॥६५॥
तोचि शेवटचा अवतार । महामानव, विकासकेंद्र ।
आपण तयाचे अंश, अंकूर । मानवधर्मी ॥६६॥
निश्चय व्हाया श्रोतियाजना । अवतार म्हणजे अतिमानव जाणा ।
मानवाची पूर्णता म्हणा । अवतारकार्य ॥६७॥
देवतांची करावी उपासना । उपासकासीच ये अवतारपणा ।
ऐसाचि आहे अवताराचा बाणा । आजवरीचा ॥६८॥
यात एकचि तारतम्य पाहावे । मानवा कोणाचेनि सुख पावे? ।
कोण समाजकार्य करी बरवे । जनमानस रंगवोनि? ॥६९॥
तोचि समजावा महाभला । जो जनहितार्थी लागला ।
दैवी शक्तीचा सागर भरला । अंगी ज्याच्या ॥७०॥
अवतारासि सामर्थ्य पाहिजे । आत्मबल प्रखर तयासि साजे ।
बोलिजे तैसेचि कार्य कीजे । अवतार तो या जनी ॥७१॥
ऐशा शांति-अवतारांची कीर्ति । मानवासि संत सांगती ।
देव-अवतार प्रकट होती । क्रांति कराया देशामाजी ॥७२॥

शांति-अवतार, क्रांति-अवतार । या दोघांचे कार्य भिन्न सर्वत्र ।
एक करी सद्‌बोध मात्र । एक करी निर्णय ॥७३॥
दोघांचीहि आहे जरूरी । म्हणोनि ही योजना मानिली चतुरी ।
आपणहि व्हावे अवतारी । त्याचिया ऐसे निर्धारे ॥७४॥
नाहीतरि अत्र ना परत्र । हेहि म्हणता ये अवतार-वैचित्र्य ।
परंतु अवतार तो अवतार कार्य । करावयासि ॥७५॥
मानव धर्मासि उजळोन । दुष्कृतिनाश, सज्जन रक्षण ।
करणे हेचि अवतार लक्षण । सर्वमान्य सेवात्मक ॥७६॥
ज्यांनी जगाची सेवा केली । त्यासीच अवतार पदवी लाभली ।
त्यावाचूनि अवतार बोली । ही तो आपुल्या भावनेची ॥७७॥
सेवे एवढे महत्त्व नाही । ज्ञान, ध्यान, वैराग्यासहि ।
ह्या सर्व साधनी सफलता ही । सेवेनेचि होतसे ॥७८॥
देव-देवता जगी आली । जपे-तपे करू लागली ।
परि पूर्णता नाही झाली । सेवा नाही तोवरि ॥७९॥
जेव्हा सेवाकार्य प्रकट केले । अनंत जीव संतुष्ट झाले ।
तेव्हाचि अवतार तया मानिले । भूलोकी या ॥८०॥
रामचंद्रे राज्य त्यागिले । रावणा संहारुनि सज्जन रक्षिले ।
म्हणोनिच अवतार ठरले । सर्वतोमुखी ॥८१॥
श्रीकृष्णे कंस मर्दिला । दुर्योधनाचा नाश घडविला ।
सुख देवोनि गोर-गरिबाला । मगचि ठरला अवतार तो ॥८२॥
ऐसे सेवाकार्य केले ज्याने । त्यासीच जन अवतार म्हणे ।
त्या कार्यलीला आठविती जीवेप्राणे । सर्वतोपरी ॥८३॥
आठवती तेहि अवतार होती । तैसी करिता सेवाकृति ।
परि कोरडी सहानुभूती । ही तो नव्हे उद्धारक ॥८४॥
ज्यांनी सेवाकार्यासि जीवन दिले । स्वानंदी बुडोनि जगा तारिले ।
तेचि संत, अवतार झाले । कर्तव्यशील मानव ॥८५॥
साधु, संते सेवा केली । अनंत हृदये संतोषविली ।
व्यवहार - उपासनेने दाविली । शिडी मोक्षमार्गाची ॥८६॥
साधुसंते सेवा केली । जीवासि ब्रह्मप्राप्तीची ओळख दिली ।
तैसी सेवा पाहिजे घडली । आपणासही ॥८७॥
एक संत जन्मास आला । त्याने प्रांतचा प्रांत कीर्तीने व्यापला ।
परि कां जनसुधारणेला । अपुरा पडला व्याप त्याचा ? ॥८८॥
याचे कारण आम्ही लोक । संदेश ऐकताना डोळेझाक ।
नमस्कार करावयाचे कौतुक । आमुच्यापाशी ॥८९॥



लोक करिती त्यांचा उत्सव । गाती मनोभावे गौरव ।
परंतु तैसा सेवाभाव । अंगी न आणिती आपुल्या ॥९०॥
देव घेतील अवतार । म्हणोनि वाट पाहती, उतराया भार ।
हा दुबळेपणाचा विचार । शिरला थोर, या लोकी ॥९१॥
अरे ! हे सर्व आता विसरावे । संती सांगितले तेचि करावे ।
मानवाने मानवा सुधारावे । याहूनि पुण्य कोणते ? ॥९२॥
हे पवित्र अवतारकार्य । आपणचि होऊनिया निर्भय ।
कां न करावे टाकोनि पाय ? । लाभेल जय निश्चयाने ॥९३॥
कोणी रोगराईने मरे । त्यास कोण पुसतो सांगा बरे ? ।
परि सेवा करिता प्राण अंतरे । लोक श्रद्धाभरे कीर्ती गाती ॥९४॥
म्हणोनि बोललो सेवक बना । ओळखा मानव म्हणोनि आपणा ।
घेवोनि अवतार-तत्त्वांच्या खुणा । उजळा भुवना कीर्तीने ॥९५॥
नका अज्ञानामाजी दडू । नका बायका-पोरांसाठी रडू ।
नका स्वार्थासाठी अडू । निघा मानव-सेवा साधाया ॥९६॥
जो आपुल्या स्वार्थासि मुकला । विश्व-स्वार्थ मानितो आपुला ।
तोचि अवतार कार्यी लागला । मानतो आम्ही ॥९७॥
यासाठी करा आपुली उन्नति । सेवा देवोनि गावाप्रति ।
गावापासोनि विश्वाप्रति । पोहचोनि जावे ॥९८॥
आपली समज वाढवावी । पैस तेवढी कामे करावी ।
म्हणजे लाभेल अवतारपदवी । क्रमाने आपणा ॥९९॥
सेवेतचि आहे देवभक्ति । कार्य करण्यातचि राष्ट्रशक्ति ।
यानेच मिळे शेवटी मुक्ति । अवतारदीप्ति अंगी येई ॥१००॥
कोणालाहि न वाटावे अवघड । कैसे अवतार कार्य प्रचंड? ।
पावता न ये ऐसे उदंड । नाहीच काही, ग्रामजन हो! ॥१०१॥
तैसे भयचि वगळावे । म्हणोनि बोलिलो साध्या भावे ।
तुकड्या म्हणे - समजोनि घ्यावे । तारतम्याने मर्म याचे ॥१०२॥
इतिश्री ग्रामगीता ग्रंथ । गुरु-शास्त्र-स्वानुभव-संमत ।
कथिला अवतारकार्याचा पथ । तेहतिसावा अध्याय संपूर्ण ॥१०३॥

॥ सद्‌गुरुनाथ महाराज की जय ॥

दुष्ट उदय जग आरति हेतु । जया प्रसिद्ध अधम ग्रह केतू ॥
संत उदय संतत सुखकारी । विश्व सुखद जिमी इंदुतमारी ॥
जब जब होई धरम की हानी । बाढहि असुर अधम, अभिमानी ॥
तब तब प्रभु धरि विविध सरीरा । हरहि कृपानिधी सज्जनपीरा ॥

**- गोस्वामी तुलसीदास**

## ॥ चित्र परिचय ॥



### अ. ३४ – श्रीसंत गुलाबराव महाराज

संत गुलाबराव बालांध । त्यांचे जिव्हाग्री शास्त्र–वेद ।
हे पूर्वजन्मिचे संचितचि सिद्ध । नव्हे प्रारब्ध फुकाचे ॥२२॥

२० व्या शतकात विदर्भात झालेले बालांध व निरक्षर संत. जे सर्व विषयांवर सप्रणाम व सूक्ष्मतम चर्चा करून महापंडितांनाहि नवी दृष्टी देत असत. संस्कृत, हिंदी व मराठीत त्यांनी अमोल ग्रंथसंपत्ति निर्माण केली. त्यांचे उदाहरण म्हणजे पूर्वजन्मी साध्य केलेल्या संस्कारांचे प्रत्यक्ष प्रमाण.



● अध्याय चौतिसावा ●

# प्रारब्धवाद

॥ श्रीगुरुदेवाय नमः ॥

जीव ईश्वराचा अंश । तो जितुका करी आपुला विकास ।
तितुका उच्च अवतारपदास । याच लोकी जातसे ॥१॥
करिता सेवाप्रयत्न थोर । जीव होई देवावतार ।
आपण आपुला करी उद्धार । शांति देई जगासहि ॥२॥
सोडूनि दुबळा निराशावाद । साधावा सत्य अवतार–बोध ।
म्हणोनि केले असे विशद । अवतारतत्त्व हे सारे ॥३॥
लोक करू लागतील सत्कार्य । तरि गावी नांदेल सर्व ऐश्वर्य ।
त्यासाठी वाढविले पाहिजे मनोधैर्य । सर्व लोकी ॥४॥
परि श्रोते बोलती त्यावरि वाचे । अहो! भाग्यचि हीन आमुचे ।
म्हणोनि आमुच्याने कोणते । सत्कार्य नोहे ॥५॥
मनात असते काही करावे । परि वेळचि जरा ना फावे ।
सांगा यास काय करावे । आम्ही तरी? ॥६॥
मित्र हो ! ज्यासि जयाचि आवड । त्यासाठी त्या मिळे सवड ।
कोणी न ये इच्छे आड । प्रयत्न करिता ॥७॥
गरजेपोटी जन्मे युक्ति । प्रसंग आणिता वाढे शक्ति ।
प्रयत्न पेरता फळे येती । आवडी ऐसी ॥८॥
श्रोते म्हणती कितीहि प्रयत्न केले ? । तरि काय सर्वचि राजे झाले? ।
यास पाहिजे भाग्य उघडले । आम्हा वाटे ॥९॥
इच्छेत जरी राज्य जडले । तरी रोजचेचि कार्य नडले ।
तेथे उदंड मनात आले । तरी काय होते ? ॥१०॥
इच्छेप्रमाणे सर्वचि घडते । तरि काय भिकारी बनावे वाटते ? ।
इच्छा करणारे कितीतरी येथे । फिरती बेकार सडकेने ? ॥११॥
कोणास सहजमार्गी चालता । धनाचा हांडा सापडे आइता ।
त्यांना बघा, इच्छा न करिता । मिळाले धन ॥१२॥

कोणी दरिद्र्याच्या घरी जन्मले । मेंढ्या-बकऱ्या चारू लागले ।
अचानकचि भाग्य उघडले । गेले दत्तक राजवाडी ॥१३॥
ऐसे कोण्या उपाये होते? । हेचि विचारावे वाटे आपणाते ।
प्रयत्न केल्यानेच फळ येते! । हे तो येथे शोभेना ॥१४॥
गावी आमुच्या एक सज्जन । अति कुशल प्रयत्नवान ।
नाना कलांनी निपुण । परि पोटाचेहि भागेना ॥१५॥
सांगा याहूनि काय करावे? । इच्छेने फल कैसे पावे ? ।
कोण्या परीने योजावे । कार्य आम्ही आपुले ? ॥१६॥
मित्र हो ! तुमचे सर्व म्हणणे । ऐकले मी जीवेप्राणे ।
म्हणोनीच आपल्या परीने । देतो उत्तर तुम्हासि ॥१७॥
भाग्याचा हा प्रारब्धवाद । उन्नतीचा करी विरोध ।
गावोगावच्या जीवनासि बाध । आणला याने ॥१८॥
ही दुबळी निराशा घालवून । केलाच पाहिजे प्रयत्न ।
तरीच भाग्य येईल जाण । उदया आपुले ॥१९॥
एरव्ही हे भाग्य कोणी देईना । प्रयत्नाशिवाय भोग येईना ।
त्यासि प्रयत्नचि प्रधान जाणा । लागे केव्हाचा तरी ॥२०॥
काही संस्कार असती पूर्वीचे । काही प्रयत्न या जन्मीचे ।
मिळोनि येई फळ भाग्याचे । उदया लोकी ॥२१॥
संत गुलाबराव बालांध । त्यांच्या जिव्हाग्री शास्त्र, वेद ।
हे पूर्वजन्मीचे संचितचि सिद्ध । नव्हे प्रारब्ध फुकाचे ॥२२॥
काही पूर्वसंस्कारगति । काही करणी, काही संगति ।
काही संकल्प, इच्छाशक्ति । योग्य काळी येती भाग्यफळे ॥२३॥
पाहणाऱ्यास अचानक दिसती । याचे भाग्य उघडले म्हणती ।
धन, वैभव लाभता ठरविती । भाग्यवंत लोकी ॥२४॥
येथे एक प्रश्न उठतो । भाग्यवंत कोण असतो ? ।
ऐका त्याचेही सांगतो । उत्तर आता ॥२५॥
असेल कोणी धनवंत । परि तो नव्हे भाग्यवंत ।
भाग्य असे सुख, संतोषात । अवडंबरात ते नाही ॥२६॥
भाग्यवंत त्यासचि म्हणावे । ज्याने ईश्वरास समर्पण व्हावे ।
अनन्यगतीने राहावे । शरण देवासि ॥२७॥



आणि सत्कार्यी असावे तत्पर । सर्व सोडोनि दुर्व्यवहार ।
सहजकर्मे मिळे पोटभाकर । त्यातचि सुखे नांदावे ॥२८॥
आपणासीच सुख व्हावे । आणि दुसरे ते ओसरूनि जावे ।
ऐसे कधी न मानी जीवे । तोचि भाग्यवंत म्हणावा ॥२९॥
काही चोरी करोनि भाग्यवंत होती । सर्व लोक तुच्छभावे हसती ।
म्हणती भाग्यवंताची गति । त्वरित पडेल दृष्टीला ॥३०॥
मग पाप आणोनि पाडी संकटा । धन, भाग्य जाते भलतिया वाटा ।
पुन्हा राहतो करंटा । कैसा भाग्यवान म्हणावा ? ॥३१॥
कुणाचे भाग्य रात्रीतून येते । जुगारी कधी द्रव्य लाभते ।
दुसऱ्या दिनी पुन्हा धाव घेते । दरिद्रपण त्याच वाटे ॥३२॥
हा आहे पापाचा आविष्कार । नव्हे नव्हे हे भाग्य थोर ।
भाग्य तेचि निरंतर । लोक कीर्ति गाती मागेहि ॥३३॥
भाग्यवंत धनाने नव्हे । भाग्य सत्तेसीहि न म्हणावे ।
भाग्य सत्कार्यानेच पावे । जीवालागी ॥३४॥
भाग्यवंत, श्रीमंत न होय । ऐसे माझे म्हणणे नोहे ।
परि उत्तम व्यवहारी धनिक राहे । तोचि खरा भाग्यवंत ॥३५॥
एकाची श्रीमंती दुसऱ्या भूषवी । एकाची श्रीमंती रक्तचि शोषवी ।
त्यास कैसी द्यावी पदवी । भाग्यवंताची? ॥३६॥
माती धरिता सोने होते । चालत्या काळी भाग्यचि ते ।
परि अहंकारे व्यसने मुकले सेवेते । झाली शेवटी दुर्दशा ॥३७॥
म्हणोनि म्हणतो प्रयत्न करा । आपापले जीवन सुधारा ।
भाग्यहीन म्हणण्याचा प्रसंग सारा । टाळा मागे ॥३८॥
भाग्याकरिता संकल्प करावे । दृढनिश्चया वाढवीत जावे ।
तैसेचि प्रयत्न करीत राहावे । आळस सांडोनि ॥३९॥
जेवढा करावा उच्च विचार । तेवढाचि उच्च ठेवावा व्यवहार ।
त्यानेच पावते भाग्य थोर । सकळ योजना साधता ॥४०॥
केल्यानेच भाग्य फळते । केल्यानेच स्वर्गसुख मिळते ।
केल्यानेच सर्व काही होते । मानवाचे ॥४१॥
माणूस बसता, भाग्य झोपते । चालता, पुढेचि घेई झेप ते ।
प्रयत्नांचेचि रूपांतर होते । भाग्यामाजी निश्चयाने ॥४२॥

ऐसे बोलले ऋषिजन । संत, कवीश्वर, अवतार महान ।
धर्मग्रंथ हेचि प्रमाण । बोलले लोकी ॥४३॥
ज्याचे अचानक भाग्य उघडले । त्याचे सुकृत साचत आले ।
म्हणोनीच एकाएकी लाभले । भूषण तया ॥४४॥
जरि त्याने केलेचि नसते । तरि ते आज कैसे लाभते? ।
देवाने द्वैतभाव केला येथे । ऐसे म्हणणे शोभेना ॥४५॥
एकाएकीच भाग्य लाभते । म्हणोनि धुंडाळाल, कोठे कोणते? ।
तरि आहे हेहि जाते । मनुष्यपण हातचे ॥४६॥
तुम्ही म्हणाल मग काय करावे ? । आपणहि आता प्रयत्नशील व्हावे ।
प्रबल इच्छेसि वाढवावे । सद्‌भाग्याच्या ॥४७॥
काळ असेल प्रतिकूल । तरि हळू पडेल पाऊल ।
परि सत्कार्य वाया न जाईल । केले ते ते ॥४८॥
तीव्र इच्छेने कार्य केले । ते आज जरी नाही फळले ।
तरी अचानकचि भाग्य उघडले । वाटेल ऐसे, फळ येता ॥४९॥
श्रोते साशंक झाले हृदयी । प्रयत्न इच्छिले फळ देई ।
ऐसे कथिले जे जे काही । म्हणती अजुनीहि पटेना ॥५०॥
प्रयत्ने साधती सर्व उपाय । ऐसा केला जरी निश्चय ।
तरी कां उपाय करिता अपाय । अनुभवा येती? ॥५१॥
सर्वचि जगण्याचे करिती प्रयत्न । कोणास वाटे घडावे मरण? ।
येथे पूर्वी तरी केले साधन । मरणाचे कोणी? ॥५२॥
लोक जगण्याचाचि प्रयत्न करिती । वैद्य, डॉक्टर बोलाविती ।
तरी काय होते त्यांची स्थिति । प्राण जाती कितीकांचे ॥५३॥
कोणी बिमार राहे वर्षोगणती । काय बिचाऱ्याची फजिती ।
नाही करणाराची संगति । अंतकाळी हाल त्याचे ॥५४॥
त्याने काय बिमार पडावे इच्छिले । म्हणोनि देवाने तसे केले? ।
यात काय प्रयत्न नाही झाले । त्याच्या हाते स्वहिताचे? ॥५५॥
तैसेचि कोणी मरण इच्छिती । परि मृत्यु न ये वर्षोगणती ।
सांगा यात मानवी इच्छेला किती । मान्यता आहे? ॥५६॥
आम्ही म्हणतो सूत्रधार हरी । त्याच्या हाती दैवाची दोरी ।
मानव बाहुली कळसूत्री । इच्छा प्रयत्न फोल त्यांचे ॥५७॥



मित्रांनो ! सुंदर तुमचे प्रश्न । यात मज न वाटे विचित्रपण ।
हे तो आहे सहज अज्ञान । रुजले लोकी ॥५८॥
सुखासाठी करिती धडपड । दुःखी देव घालिती आड ।
मूळ न शोधिता, बोलती बोजड । सिद्धांतवाक्ये ॥५९॥
आम्ही पाषाण फेकला वरि । तो चुकोनि पडला मस्तकावरि ।
येथे गुरुत्वाकर्षण काय करी? । आपुल्याकडोनि? ॥६०॥
वाफ्यात मिरची-उस लाविले । तिखट-गोड फळ नशिबी आले ।
येथे पाण्याने काय केले? । दिले फळ जैसे तैसे ॥६१॥
देवशक्ति ऐसी सर्वत्र । परि ती स्वये न चालवी सूत्र ।
कर्मे फळती पवित्रापवित्र । आपुलीच आपणा ॥६२॥
देवाचेच हे असते करणे । तरि लोक कां निर्मिता केविलवाणे? ।
कशासि लाविता अल्पकाळी मरणे । जीवप्राण्यासि? ॥६३॥
हे तो आहे आपुल्याच आधीन । जन्मा येणे आणि मरण ।
यात शंका घेण्याचे कारण । मुळीच नाही ॥६४॥
आपणचि इच्छा करितो । म्हणोनिया जन्माला येतो ।
यात कोणी कशाला पाठवितो । दुनियेवरी ? ॥६५॥
तैसेचि आहे मरणाचे । आम्ही कारण व्हावे बिघडविण्याचे ।
जेव्हा असह्य होय भोगणे साचे । तेव्हा म्हणावे 'वाचवा' ॥६६॥
चोर चोरीसाठी गेला । आधी विचार नाही केला ।
संकटी सापडता म्हणे-'बोला । कैसे केले देवाने?' ॥६७॥
कितीकांचे दुखवावे मन? । हिरावूनिया आणावे धन ।
मग भोग येता दैवावरून । बोल द्यावा देवासि ॥६८॥
माणसाला मरावे ऐसे न वाटे । परि मरणा-ऐसे केले ओखटे ।
पुढे आसक्तीने म्हणे-'मोठे । देवा संकट ओढवले' ॥६९॥
मरणा ऐसे करावे आचरण । सोडोनिया तारतम्यज्ञान ।
मग भोग येता म्हणावे-'नको मरण' । कैसे कोण मानील ? ॥७०॥
हे म्हणणे काही इच्छा नोहे । इच्छेसाठी मार्ग आहे ।
तो वेळेवरीच करता न ये । त्यासि पाहिजे अभ्यास ॥७१॥
जन्मणेहि इच्छेने होते । परि त्यासि गर्भधारणा लागते ।
अंतरीचे प्रकट करावया तेथे । वेळ लागे तैसाच ॥७२॥

अग्नि देवोनि लोखंड तापवावे । आणि लगेच म्हणे थंड व्हावे ।
ऐसे कैसे घडेल स्वभावे । एकाएकी ? ॥७३॥
जीव कर्म करिता स्वतंत्र । त्याचा भोग भोगता परतंत्र ।
केले त्याचे फळ येणार । इच्छेचाचि परिपाक तो ॥७४॥
सर्वांसचि वाटे कधी न मरावे । सर्वांसचि वाटे राजे व्हावे ।
परि इच्छा क्रियामार्गे न धावे । अचूकतेने तीव्रपणे ॥७५॥
तेणे भोगावा लागे नको तो भोग । जो पूर्वी घडला कार्यभाग ।
इच्छेने व्यसनी होता झाला क्षयरोग । जगणे मग साधेना ॥७६॥
म्हणोनि सांगतो जे जे होते । ते इच्छाबळेच प्रत्यया येते ।
यासि कर्महि पाहिजे इच्छेपुरते । तरीच साधते कार्य पुढे ॥७७॥
एक इच्छा असते चंचल । तीत होतो नेहमी बदल ।
एक इच्छा असे निश्चल । जी कर्म करोनीच प्रकट होय ॥७८॥
कधी इच्छा इच्छेने प्रकट नोहे । ती कर्मानेच दिसो पाहे ।
नाही म्हणोनिया काय होय? । प्रत्यक्ष दिसे कार्यावरि ॥७९॥
बादशहा 'मी गरीब' बोलला । तरी ओळखती लोकचि त्याला ।
तो लपल्याने न जाय लपला । ढगाआड सूर्य जैसा ॥८०॥
तैसी इच्छा परिपाकासि आली । आता वृत्ति फळासि भ्याली ।
मग ऐनवेळी दुजी इच्छा केली । न टळे फळ मृत्यूचे ॥८१॥
कित्येकांची प्रमाणे दिसती । मृत्यु आपणचि प्रकट करिती ।
दिवस, क्षण, वेळा सांगती । येणाऱ्या फळाची ॥८२॥
त्यांची आसक्ति देहातूनि सुटली । म्हणोनि स्थिति प्रकट झाली ।
कित्येकांनी दुसऱ्यांचीहि कथिली । परिपक्व फळे ॥८३॥
विचारी पुरुष जे जाणते । फळ भोगाया होती सज्ज ते ।
आधीच वृत्ति अविचारपंथे । जाऊ न देती ॥८४॥
अविचारी ते कुमार्गे जाती । फळ भोगता तळमळती ।
अति होता भलतीच घेती । विकृति मनी वेड्याऐसी ॥८५॥
आसक्तिकांची विकृति वाढली । देहबद्ध वृत्ति भांबावली ।
दुःख न सोसूनि धाव घाली । इच्छा त्यांची मृत्यूकडे ॥८६॥
मागील कुकर्म असह्य झाले । म्हणोनि जीव द्याया धावले ।
आता मृत्यु येईल तरीच भले । वाटे तयांसि ॥८७॥
खरोखर मरणे एक स्वप्न । शरीरपरिवर्तनाचे विरामस्थान ।
परि केलेल्या पाप, पुण्याचे निवारण । तेणे नव्हे ॥८८॥
जैसा कपडा अंगीचा बदलावा । नवीन अंगावरि ओढोनि घ्यावा ।
तैसाचि जीव मरणी समजावा । शरीर बदली इच्छेने ॥८९॥



कधी ती इच्छा प्रकट ना कळे । प्रकट इच्छा त्वरित ना फळे ।
येथेचि विचारीहि गोंधळे । निवाडा करिता ॥९०॥
इच्छेने घेतले तलम वस्त्र । मग ते टिको म्हणे वर्ष सहस्त्र ।
ऐशा इच्छा होवोत मिश्र । परि भोगणे लागे आधीचे ॥९१॥
एकदा इच्छेने बसला घोड्यावरि । चाबुक मारता हौस पुरी ।
मग घाबरोनि म्हणे-देवा ! आवरी । सत्वरी आता' ॥९२॥
एकदा हातूनि गेला बाण । मग इच्छेऐसा न ये परतून ।
पहिले इच्छाकर्म गतिमान । भोगावेचि लागे ॥९३॥
नुसती इच्छा उपयोगी नाही । ती संस्कार बनूनि कर्मपण घेई ।
नवी इच्छाहि याच क्रमे येई । फळासि पुढे ॥९४॥
मन, बुद्धि, चित्त, अहंकार । पाचवे अंतःकरण आधार ।
यात दृढ होय इच्छासंस्कार । चाले व्यवहार त्यायोगे ॥९५॥
यांचे पालटतील संस्कार । तरीच सुखाचा होय व्यापार ।
एरव्ही इच्छा क्षणभंगुर । उपयोगा नये तत्काळ ॥९६॥
इच्छासंस्कार, कर्तव्यसंस्कार । यांचा संग्रह पूर्वापार ।
तेचि संचित असे थोर । पापपुण्यरूप ॥९७॥
त्यातून जे भोगायासि आले । तेचि प्रारब्ध बोलले ।
ते भोगणे प्राप्तचि झाले । न चुके सहजी ॥९८॥
ते भोगता केली नवी धडपड । इच्छा आणि यत्न प्रचंड ।
ते क्रियमाण देई संचिता जोड । लाभेल पुढे फळ त्याचे ॥९९॥
ऐसे चालले रहाटचक्र । या नाव जीवनाचा व्यापार ।
जन्म-मरण, सुख-दुःख, व्यवहार । खेळ इच्छा-प्रयत्नाचा ॥१००॥
हे जाणोनि प्रयत्नासि लागा । याविण भाग्याचा भ्रम वाउगा ।
संत उपदेश देती जगा । क्रियमाण सुधारा म्हणोनि ॥१०१॥
क्रियेवीण मार्गचि नाही । कर्तव्य नरा देवपद देई ।
तुकड्या म्हणे, बना निश्चयी । प्रयत्नवादी ॥१०२॥
इतिश्रीग्रामगीता ग्रंथ । गुरु-शास्त्र-स्वानुभव-संमत ।
प्रारब्ध-विचार कथिला येथ । चौतिसावा अध्याय संपूर्ण ॥१०३॥

॥ सद्गुरुनाथ महाराज की जय ॥

''भक्तीत मनुष्य प्रेमळ बनत असला तरी तो नेभळा व दैववादी होतो, असे म्हणणाराला भक्तीचा परिचयच नाही, असे मी म्हणतो''

''मनुष्य विचाराने देव आहे व शरीराने पशू. विचाराचा शरीरावर ताबा ठेवणे हेच खरे मनुष्यत्व !''

**– श्रीसंत गुलाबराव महाराज**

## ॥ चित्र परिचय ॥



### अ. ३५ – श्रीसंत सूरदास महाराज

वेश्यागामी बिल्वमंगल । यत्ने झाला सूरदास निर्मल ।
आपणासह महीमंडळ । केले पावन भजनाने ॥९२॥

स्वामी वल्लभाचार्यांचे प्रमुख शिष्य व प्रसिद्ध भक्त सूरदास. यांचे पूर्णनांव बिल्वमंगल असून ते चिंतामणी वेश्येच्या नादाने धुंद झाले होते. पुढे पश्चात्तापाने डोळे फोडून घेवून ते भजनानंदी मग्न झाले व कृष्णकथा वर्णून ग्रामजीवनात सात्विक रस ओतला. बद्धाला सिद्ध करण्याची शक्ती प्रयत्नातच.



● अध्याय पस्तिसावा ●

# प्रयत्न–प्रभाव

॥ श्रीगुरुदेवाय नमः ॥

मागील अध्यायी निरूपण । इच्छा-प्रयत्ने गुंफले जीवन ।
हानि, लाभ, जन्म-मरण । त्यावाचून नसे काही ॥१॥
आजची असो वा पूर्वीची । आपुलीच इच्छा बऱ्यावाईटाची ।
आपणा सुख दे अथवा जाची । हे निर्विवाद ॥२॥
जे झाले ते होऊनि गेले । आता पुढे पाहिजे सुधारले ।
इच्छा-कर्तव्ये लाभती फळे । सर्व काही ॥३॥
यावरि श्रोत्याने प्रश्न केला । आपण इच्छा-कर्तव्याला मान दिला ।
परि अचानक मृत्यु घडती त्याला । कोणती इच्छा सांगाना ? ॥४॥
कोणी अकस्मातचि मेले । थोडेहि बिमार नाही पडले ।
छातीमाजी कळ आली वाटले । तैसेचि गेले मृत्युमुखी ॥५॥
कोणी एकाएकी विहिरीत पडला । अथवा रानी व्याघ्राने भक्षिला ।
तो काय त्या प्रसंगाला । इच्छित होता त्यापूर्वी ? ॥६॥
कोणास मार्गात मारोनि टाकिती । कोणी ठोकर लागता मरती ।
त्यांची काय ती इच्छा होती? । अथवा कर्तव्य ? ॥७॥
अहो ! ही देवा-दैवाची लीला । ठावी असोनि आपणाला ।
आम्हासि लावाया कार्याला । सांगता भलते ॥८॥
मित्रा ! ऐसा न धरी भ्रम । सत्यचि आहे कथिले ते वर्म ।
इच्छा-प्रयत्नेचि देव-काल-कर्म । देती फळे ॥९॥
मी तर आधीच सांगितले । अचानक कर्तृत्व नाही दिसले ।
परि पूर्वी तेचि कार्य असेल घडले । आघाताचे ॥१०॥
करतेवेळी कळले नाही । प्रसंग येता वाटले काही ।
परि दैवावरि भार देवोनि राही । मोकळा बिचारा ॥११॥
जैसे, धन संग्रही न करता । तरि चोर कासयासि मारता? ।
पाहोनिया वाट चालता । तरि ठोकर कैसी लागती ? ॥१२॥

देह, स्थान, संग निवडोनि । आधीच घेता उत्तमपणी ।
आहार-विहार करिता समजोनि । तरि दुःखी होता कैसा तो? ॥१३॥
अविवेक, क्रूरता, गर्व बेहोशी । लागली मृत्युच्या मार्गासि ।
निमित्त केले व्याघ्रादिकांसि । परि तो प्रयत्न आपुलाचि ॥१४॥
आणि अचानक दिसे घडले । ते तरी देहावरीच पडले ।
जन्मचि न घेता कोठले । संकट त्यासि? ॥१५॥
जन्म हाचि इच्छेचा खेळ । जगी अनेक इच्छांचा मेळ ।
तेथे संघर्ष असे अटळ । सुखदुःख फळ कर्माचे ॥१६॥
येथे दैव मारते, देव मारितो । काय म्हणून आम्ही म्हणतो? ।
आम्ही काय कुणाचे खातो? । सांगा मज ॥१७॥
देवदैव आपुल्याने करी । तरि दोष लागेल देवावरि ।
तैसी नाहीच देवाची कामगिरी । दुःख देणे मानवांसि ॥१८॥
आपणचि मार्ग चुकतो । इच्छेने, संगतीने वाया जातो ।
मग 'कैसे झाले'? म्हणतो । एकाएकी फळ येता ॥१९॥
तेथे जबाबदार धरती दैव । अथवा म्हणतो देवाची माव ।
नाहीतरि ग्रहगोलांचा प्रभाव । समजती शुभाशुभ ॥२०॥
कोणी करिती ग्रहशांति । वाचती पोथी, गिऱ्हे बांधती ।
परंतु दुराग्रह बसला चित्ती । तो न काढिती भ्रांतीचा ॥२१॥
नक्षत्रांचा सृष्टीवरि प्रभाव । परि ते निमित्तमात्रचि सर्व ।
आपुल्याचि शुभाशुभ कर्माची ठेव । फळा येई त्या त्या वेळी ॥२२॥
आपण बरे-वाईट बी पेरले । ते त्या त्या ऋतूंत उदया आले ।
येथे काळाने काय केले? । साह्य दिले उदय होण्या ॥२३॥
परि नारळीस न येती रुई-फळे । पेरिले तेचि उगवते बळे ।
त्यासि फक्त साह्यचि दिले जळे । तैसा देव साह्यकारी ॥२४॥
तो स्वतः काही न करी । ज्याचे त्यास देई निर्धारी ।
'प्राप्त काळ घडी' सारी । निमित्तमात्र करोनि ॥२५॥
काळ चाले आपुल्या गती । ईश्वर व्यापक समस्थिती ।
कर्मे आपचि फळा येती । सृष्टिनियमे आपुली ॥२६॥
कर्म करावयाची स्वतंत्रता । ही जीवाहाती महान सत्ता ।
आपुल्या दैवाचा विधाता । आपणचि आहे ॥२७॥



ग्रहगोलांचा अनिष्ट प्रभाव । न पडावा म्हणोनि शोधिले उपाव ।
यातहि कर्तबगार मानव । सिद्धचि असे ॥२८॥
उपासनेद्वारे मानसिक शक्ति । वाढता दुःखीहि सुखाची प्राप्ति ।
ही ईश्वरी कृपाहि असे हाती । जीवाच्याचि ॥२९॥
मित्रा ! हे विसरू नको आता । आपणचि सर्व कर्ताहर्ता ।
यात देव-दैवाची वार्ता । आपणचि केली ॥३०॥
ऐसे धरून राहा जीवी । शुद्ध कर्मे करीत जावी ।
तरीच गति पावे बरवी । पुढे पुढे ॥३१॥
असो निसर्ग वा योगायोग । असो प्रारब्धाचाहि भोग ।
उत्तम प्रयत्ने त्यांचाहि ओघ । वळविता येई ॥३२॥
तैसी नसती जरि शक्यता । जीव सर्वस्वी पराधीन असता ।
तरि शास्त्र कोण देते हाता । नाना उपाय सांगोनि ? ॥३३॥
'धर्मे वाग, सत्य वद' । ऐसा कां सांगता वेद ? ।
सारेचि होतील विधिनिषेध । अनाठायी मग ॥३४॥
पडोनि दैवादिकांच्या प्रवाही । जीव अधिकचि बुडेल डोही ।
निघायासि मार्गचि नाही । उरला मग, ऐसे होता ॥३५॥
परंतु मिथ्या हा विचार । जीवास असे कर्मस्वातंत्र्य ।
प्रयत्न करता होतो उद्धार । आपुला शत्रुमित्र आपणचि ॥३६॥
वाईट चिंतिता वाईट होते । जे जे साधू ते साधते ।
मग कां न घ्यावे थोरपण येथे । सद्गुण सारे शिकोनि? ॥३७॥
यावरि श्रोता म्हणे ऐका । माझी अजूनि आहे शंका ।
जगी धडपडती सर्वचि सुखा । परि एक एका न मिळे ॥३८॥
'बरे करताहि ब्रह्महत्या!' । लागे कित्येकांच्या माथा ।
कित्येका जन्मभरि टाळ कुटता । ताल तोहि न साधे ॥३९॥
याचे काय आहे कारण? । काय नाही केला प्रयत्न ? ।
उलट सुखी असती पापे करून । कित्येक लोक ॥४०॥
याचे ऐका समाधान । लोक दिसती भिन्न भिन्न ।
परि त्यासि कारण त्यांचेच प्रयत्न । वेगळाले ॥४१॥
भिन्न संस्कारे भरले लोक । म्हणोनि न मिळती एकासि एक ।
कोणी जन्मताचि गुणी सुरेख । ताल न जन्मी साधे कोणा ॥४२॥

संस्कारचि हे नाना तऱ्हांचे । काही गायनाचे, काही विद्वत्तेचे ।
काही चित्रकलेचे, धाडसाचे । चातुर्याचे कित्येक ॥४३॥
काही धनाचे, काही मानाचे । काही अध्यात्म आणि भक्तीचे ।
काही असती कार्यशक्तीचे । संस्कार नाना ॥४४॥
ज्या प्राण्याने जो यत्न केला । तो संस्कार त्याच्या वाट्यासि आला ।
म्हणोनि सर्वचि सर्वांला । येता दिसेना ॥४५॥
एकास मिळे संपत्ती । परि अक्कल नाही त्यासि पुरती ।
एकास विद्वता दिसे अति । परि खाया पुरेना ॥४६॥
एक अतीच धाडसी दिसतो । परि बुद्धीने शून्यचि भासतो ।
म्हणोनि जीवनात तो ठरतो । वेडा अथवा गुंड जैसा ॥४७॥
एक शब्दसृष्टि उभी करितो । एक गायने जग डोलवितो ।
एक अद्‌भुत वाद्ये वाजवितो । लहानपणी ॥४८॥
एक ध्यान करण्यात प्रवीण । एका भक्तीचेचि अवधान ।
एकास विश्वज्ञान, आत्मज्ञान । लहानपणी ॥४९॥
याचे एकचि कारण । ज्याने जे कर्तव्य केले समजोन ।
तेचि त्याचे संस्कार पूर्ण । पावले तया पूर्वीचे ॥५०॥
इच्छा-संस्कार, कर्तव्य-संस्कार । यांचेच हे रूपांतर ।
ज्याने केला जो व्यवहार । तोच फळला यत्ने त्यासि ॥५१॥
प्रयत्नशील त्यासीच म्हणावे । इच्छेत तेच चिंतनी असावे ।
हातांनी कार्य तेचि घडावे । सर्व काळ ॥५२॥
मनी वसे ते ध्यानी दिसे । ध्यानी ठसे तेचि स्थानी भासे ।
तैसेचि कर्तव्य इच्छाउल्हासे । उमटो लागे जीवनी ॥५३॥
या सर्वांचा मेळ झाला । तरीच यश प्रयत्नाला ।
नाहीतरि अवघा गलबला । एक मिळेना एकाशी ॥५४॥
याचा अनुक्रम ऐसा आहे । प्रथम मनी संकल्प राहे ।
संकल्प दृढ होता निश्चय । सत्कार्यांचे रूप घेई ॥५५॥
कुणाचे संकल्प अवधी न लाविती । त्यांची तैसीच असते प्रकृति ।
काही संस्कार मागील असती । काही लाभती माता-पित्याचे ॥५६॥
ऐसे संग्रहित होत जाती । त्यांची पुढे पुढे होई प्रगति ।
तैसी तैसी लाभे गति । बऱ्या-वाईट फळांची ॥५७॥



पूर्वी केले उत्तम यत्न । म्हणोनि हाती आले रत्न ।
वाईट वर्तनाने पतन । फळा येईल आपैसे ॥५८॥
पूर्वीची कमाई भोगली । पुढे सुकृत-जोड नाही केली ।
त्यासी भोगावी लागली । राज्याअंती नर्कगति ॥५९॥
पूर्वी काही पुण्य घडले । म्हणोनि सुख वाट्यासि आले ।
परि पाप करता येतील घाले । निश्चयाने यापुढती ॥६०॥
पुण्यवंता आज कष्ट । याचे कारण आहे स्पष्ट ।
एका संस्कारे तो पुण्यनिष्ठ । परि दुसरा फळला दुःखरूपे ॥६१॥
प्रयत्न सर्वांगीण, आदर्श । सर्वचि संस्कारांचा उत्कर्ष ।
ऐसे न होय म्हणोनि पुरुष । विचित्र फळे भोगिती ॥६२॥
तुकाराम आणि एकनाथ । दोघे सारखेचि अधिकारी संत ।
परि एका त्रास, एक धनवंत । फळे ही भिन्न संस्कारे ॥६३॥
सकाळी उठण्याचे फळ निराळे । अभ्यासाचे फळचि वेगळे ।
उत्तम राहणीचे फळ आगळे । झाकविता झाकेना ॥६४॥
चित्तशुद्धीचे वेगळे फळ । दानादिकांचे भिन्न सकळ ।
ज्ञान-साधनांचे फळ प्रांजळ । नाही मेळ एक-एका ॥६५॥
उत्तम कार्या फळ उत्तम । परि दुसरे एक वाईट कर्म ।
म्हणोनि फळ लाभे अधम । मागे-पुढे याचे त्याचे ॥६६॥
कल्याणकर्म केले जेवढे । ते कधीतरी फळेल मागे-पुढे ।
हा सिद्धांत व्यर्थ न घडे । कदाकाळी ॥६७॥
म्हणोनि उपकार नाही फळले । पुण्य करिता अपकार झाले ।
हे म्हणणेचि नाही शोभले । शहाण्या जना ॥६८॥
फळ वेगळेचि आज दिसते । परि आले कैसे, धुंडिता ते ।
सहज कळेल, प्रयत्नचि होते । मागे केले ॥६९॥
उपकार, पुण्य संग्रही पडले । अपकाररूपे पूर्वपाप फळले ।
ऐसा मिश्र व्यवहार चाले । ओळखू ये ना ॥७०॥
कोणत्या कर्माचे कोणते फळ? । हे जाणता ये ना तत्काळ ।
तेणे चित्ती होय गोंधळ । वाढू लागे कुशंका ॥७१॥
प्रत्येक कर्माचे वेगळे फळ । परि जाणताचि लावी मोल सकळ ।
प्रयत्ने-फळांची गुंतवळ । उकलेना सहजपणे ॥७२॥

उत्तम गाण्याचे फळ खाद्य नाहे । परि त्याहूनि त्यात सुख आहे ।
हे कैसे कळेल? जोवरि रुचि न ये । गायनाची ॥७३॥
उपकार-सेवेत आत्म-समाधान । हे फळचि असे महान ।
तेथे कां इच्छावे बक्षीस अन्य । सज्जनांनी? ॥७४॥
आपुले प्रयत्नचि सरस करावे । केले, तरी करीतचि राहावे ।
थोडे उणे होऊ न द्यावे । प्रयत्नांमध्ये ॥७५॥
क्षण एक चुको न द्यावे । प्रयत्नासि दूरदृष्टीने जपावे ।
प्रयत्नहि सर्वांगीण व्हावे । सर्व सुखे भोगावया ॥७६॥
एरव्ही प्रयत्नाशिवाय कोणीच नाही । प्रयत्न होती सर्वदाहि ।
परि दुःखचि देती प्रयत्न काही । जीव, जना ॥७७॥
काही प्रयत्न नावलौकिका नेती । काही प्रयत्ने होय फजिती ।
काही प्रयत्न प्राणचि घेती । आपुले आणि परक्यांचे ॥७८॥
म्हणोनि प्रयत्न करावे चांगले । कर्त्या सज्जना पाहिजे पुसले ।
लोभ, प्रतिष्ठेसि जे नाही भाळले । तेचि खरे प्रयत्नशील ॥७९॥
काही प्रयत्न उलटे घडती । त्यांची फळे मरणतुल्य येती ।
काही प्रयत्न प्रांजळ होती । तेणे पावती उत्तम जन्म ॥८०॥
मरणासीहि प्रयत्नचि कारण । जन्मण्यासहि प्रयत्नचि प्रमाण ।
भोग-सुख-दुःखांचे निधान । प्रयत्नचि ॥८१॥
काही प्रयत्न योजनारूप होती । त्यांनी कीर्तिफळे लाभती ।
काही प्रयत्नी शिकस्त करिती । मुक्ति पावती साक्षात्कारे ॥८२॥
काही प्रयत्न संचिती पडती । प्रारब्ध भोगता जे जे घडती ।
नाही मुळीच उपभोगाची वृत्ति । त्यांचे प्रयत्न कळसाचे ॥८३॥
त्यांचे प्रयत्न शुभ-प्रारब्ध झाले । दोन्ही मिळोनि देवपणासि आले ।
आपण आपणात मिळाले । साक्षात्कारे आत्मत्वे ॥८४॥
मित्रा ! म्हणोनि प्रयत्नशील व्हावे । प्रारब्धाचे थोरपण न मानावे ।
कर्तव्याने चमकून उठावे । भूमंडळी उत्साहे ॥८५॥
अमका प्रारब्धे श्रीमंत झाला । अमका पुण्य करिता दैवे गिळिला ।
अमका 'देव देव' म्हणता तरला । प्रयत्नाविण ॥८६॥
हे तो म्हणणे अज्ञानाचे । पुन्हा करू नको उच्चार वाचे ।
सुप्रयत्नासि फळ सौख्याचे । निश्चये आहे ॥८७॥




दुसऱ्याचे फळ पाहोनि झुरावे । आपण काहीच न करावे ।
हे तो लक्षण आहे बरवे । अधोगतीचे आपुल्या ॥८८॥
आमुचे पूर्व सुकृत नाही बळी । म्हणोनि हात ठेवावा कपाळी ।
हे तो आमुच्याने कधी काळी । घडोचि नये ॥८९॥
नाही तेचि आता कमावू । आहे ते ते अधिक वाढवू ।
इच्छा फलद्रूप करोनि घेऊ । हाचि करावा निर्धार ॥९०॥
याच निर्धारे वाल्या कोळी । पुण्यश्लोक झाला भूमंडळी ।
संत, योगी, वीर, बळी । गाजले मानव-इतिहासी ॥९१॥
वेश्यागामी बिल्वमंगल । यत्ने झाला सूरदास निर्मल ।
आपणासह महीमंडल । केले पावन भजनाने ॥९२॥
हेचि शिकावे सत्संगतीने । यानेचि मानव होती शहाणे ।
भाग्य उजळेल सूर्याप्रमाणे । उद्योगशील झालिया ॥९३॥
प्रत्येक उद्योगा फळ पावे । शेतकऱ्यासि हितगुज पुसावे ।
प्रयत्ने एक बीज लावावे । फळ पावावे कणसापरी ॥९४॥
प्रयत्नाविण स्वयंपाक झाला । प्रयत्नाविण घास मुखी गेला ।
प्रारब्धानेच व्यवहार चालला । ऐसे कोण सांगो शके? ॥९५॥
पटवावया प्रारब्धवाद । त्यासहि लागे प्रयत्न सिध्द ।
विमान, दूरध्वनि आदि शोध । लाविले काय प्रारब्धे? ॥९६॥
उघड आहे प्रयत्नाची थोरी । प्रयत्नापुढे प्रारब्ध ताण करी ।
हे म्हणणेचि अपुरे सर्वतोपरी । दूरदृष्टीने पाहता ॥९७॥
मुख्य असे प्रयत्नचि केवळ । प्रारब्ध हेहि प्रयत्नाचे फळ ।
वृक्षावाचोनि झाले फळ, मूळ । कोण म्हणे? ॥९८॥
प्रयत्न सोडोनि प्रारब्ध धरले । तरि ते प्राणी दोघांतूनि गेले ।
नाही प्रयत्नहि पूर्ण केले । प्रारब्ध पळाले दूरदेशी ॥९९॥
कोणी एक झाड लावले । दिवसेंदिवस सुकतचि गेले ।
त्यांचेकडे दुर्लक्ष केले । कोणी एकी ॥१००॥
लोक म्हणती आयुष्य सरले । कोणी म्हणती किड्यांनी ग्रासले ।
कोणी म्हणती त्याचे प्रारब्ध आले । मरणस्थानी ॥१०१॥
कोणी म्हणती येथे झाड जगेना । कोणी म्हणती चुकू द्या यातना ।
कोणी म्हणती काय आपणा । हाती आहे? ॥१०२॥
अरे ! हे सर्वचि आहे खरे । परि प्रयत्न करोनि पाहा बरे ।
झाड जगते की ऐसेचि मरे । प्रयत्न केलिया? ॥१०३॥
म्हणोनि त्यास खत घातले । तारतम्य ठेवोनि सांभाळिले ।
पाणी देवोनि वाचविले । मूळ, डाळ सर्वचि ॥१०४॥

पुढे पुढे झाड फुलले । पुष्पीफळी बहरोनि आले ।
प्रयत्न केल्यानेचि झाले । आहे ना हे प्रत्यक्ष ? ॥१०५॥
कलमे करोनि नानापरी । फुले आणिली बहुप्रकारी ।
हात ठेविता कपाळावरि । ऐसे कधी होईल कां ? ॥१०६॥
तैसेचि मानवाचे जीवन । उन्नत व्हावया हवा प्रयत्न ।
अपमृत्यु आदि धोके दारुण । टळती संशोधन केलिया ॥१०७॥
मानव-सृष्टीहूनि थोर । तो ईश्वराचा अंशावतार ।
अचूक प्रयत्न, दैवी हत्यार । निर्मू शके प्रतिसृष्टि ॥१०८॥
म्हणोनि सांगतो प्रयत्न करा । विचारशक्ति प्रयत्नात भरा ।
शिका शिकवा, प्रयत्न सारा । व्यापू द्या गावोगावी ॥१०९॥
ज्या ज्या राष्ट्रांनी ऐसे केले । त्यांचे वैभव शिगेसि गेले ।
जीवनमान आदि वाढले । इच्छेसारिखे तयांचे ॥११०॥
प्रारब्धवादी शिथिल झाला । प्रयत्नवादी चेतना पावला ।
शोध करीत पुढे गेला । दिगंतरी ॥१११॥
केले मंगळावरि उड्डाण । चढला हिमगिरिशिखरी पूर्ण ।
शोधिले अग्निअस्त्र, अणुअस्त्र, महान । हैड्रोजनादि ॥११२॥
ऐकती करोडो मैलांवरून । परस्परांचे गायन-भाषण ।
विश्व हे आटोक्यात आणून । घर केले राहण्याचे ॥११३॥
प्रयत्नांची शिकस्त झाली । अजूनिहि जागा आहे उरली ।
धाव कधीच नाही संपली । प्रयत्नशीलांची ॥११४॥
प्रयत्ने देवपण पावला भक्त । प्रयत्ने योगी झाला जीवन्मुक्त ।
प्रयत्ने बद्ध झाला निरासक्त । विषयांमाजी ॥११५॥
प्रयत्ने गाव झाला आदर्श । प्रयत्ने सुखी होय स्वदेश ।
प्रयत्ने विश्वशांतीचे सायास । सफल होती ॥११६॥
यासाठी प्रयत्न करावे आपण । मिरवावे देवाचे थोरपण ।
अंगा येईल अहंकार म्हणोन । देव मध्यस्थी घालावा ॥११७॥
प्रयत्ने राज्य समृद्ध करावे । प्रयत्ने भूमंडळ डोलवावे ।
प्रयत्नेचि दासपण शोभवावे । कार्यप्रभावे ॥११८॥
प्रयत्ने मानव होई उन्नत । गावचि नव्हे, हालवी दिक्प्रांत ।
ही अनुभवाची मात । विसरू नका, तुकड्या म्हणे ॥११९॥
इतिश्री ग्रामगीता ग्रंथ । गुरु-शास्त्र-स्वानुभव-संमत ।
कथिला प्रयत्नवाद समर्थ । पस्तिसावा अध्याय संपूर्ण ॥१२०॥

॥ सद्गुरुनाथ महाराज की जय ॥



# ॥ चित्र परिचय ॥



## अ. ३६ – योगीराज श्री. अरविंदबाबू

सर्व होते केले असता । सर्व मिळते धरिता हाता ।
अभ्यासे तव ब्रम्हसत्ता । पावती योगी ॥८॥

उच्च शिक्षण घेऊन व उत्कट राजकारण करून योगानुभवाचाही उच्चांक गाठणारे. पांदेचरी आश्रमातून हे बंगालचे ऋषी विश्वाला खरी जीवन दृष्टी देऊन जीवन-कला उपदेशून गेले आहेत.

● अध्याय छत्तिसावा ●

# जीवन–कला

।। श्रीगुरुदेवाय नमः ।।

ईश्वर–अंश सर्व जीव । यत्न तोचि जाणावा देव ।
ऐसे वदती संत, ग्रंथ, मानव । सर्वचि नित्य ॥१॥
परंतु पाहता जगाकडे । दिसती प्रकृति–भेदाचे पोवाडे ।
व्यक्ति तितक्या प्रकृतीचे पाढे । ठायी ठायी ॥२॥
वाटे ही निसर्गाचीच रचना । तेथे ठाव नाही प्रयत्ना ।
ऐसी धारणा बसली मना । श्रोतियांच्या ॥३॥
म्हणोनि करू निरूपण । ऐका ऐका श्रोतेजन! ।
प्रकृति ठायी ठायी दिसे भिन्न । परि ती स्वतंत्र म्हणो नये ॥४॥
प्रकृति पुरुषाच्या आधीन । त्याच्या इशारे करी नर्तन ।
बहु होण्याचा संकल्प पूर्ण । तीच भिन्न प्रकृति ही ॥५॥
परम पुरुष जो परमात्मा । त्याच्या शक्तीसि नाही सीमा ।
मानव त्याचीच प्रतिमा । अंशरूपे निश्चये ॥६॥
म्हणोनि जीवात सामर्थ्य अनंत । अभ्यासाने प्रकटे निवांत ।
नलगे आत्मशक्तीचा अंत । कोणासहि ॥७॥
सर्व होते केले असता । सर्व मिळते धरिता हाता ।
अभ्यासे तव ब्रह्मसत्ता । पावती योगी ॥८॥
आणि अभ्यासाच्याचि बळे । भिन्न मार्गी वाढले जीव सगळे ।
जैसी श्रद्धा, तैसी फळे । श्रद्धामय पुरुष म्हणोनि ॥९॥
जैसी श्रद्धा, जैसा संकल्प । जैसा यत्न, पुण्य पापरुप ।
तैसाचि जीव होई आपोआप । अभ्यासाने तयार ॥१०॥
नैसर्गिक दिसे प्रकृति–भेद । ती पूर्व अभ्यासानेच सिद्ध ।
मुळी एक परि कलांनी विविध । जाहले जीव ॥११॥
पूर्वजन्मीची अभ्यासकला । तैसा या जन्मीचा यत्न आपुला ।
यांनीच भिन्नत्व आणिले जीवाला । नानापरी ॥१२॥



आपुली आपणा कला फळली । म्हणोनि प्रकृति भिन्न झाली ।
येथे निसर्गावरि बोली । देवोचि नये ॥१३॥
देवाने निर्मिली ही क्षिती । जिच्या पोटी अनंत जीव होती ।
न करवे तयांची गणती । गणित–मार्गाने ॥१४॥
निसर्गतः लाभले सारखे जीवन । परि कलेने भरले भिन्नपण ।
एक–एकाशी मिळते गुण । क्वचितचि आढळती ॥१५॥
एकचि वस्तु विश्वी संचली । परि प्रकृतिगुणे भिन्न भासली ।
रचना, बोली निराळी झाली । कला केली जीवांनी ॥१६॥
प्रत्येक जीवचि अवतार पाही । परि कोठे काही, कोठे काही ।
एक आहे, एक नाही । ऐसे वैशिष्टय़ सर्वत्र ॥१७॥
प्रत्येक जीव आपुल्यापरी । कलापूर्णतेने खेळे भूमीवरि ।
एक–एकाची स्वभाव–कुसरी । दुसरा पाहता दिसेना ॥१८॥
सृष्टीत खेळती जे जीव । पाहा तयांचे लीलालाघव ।
अंग–अंग अभिनव । नाना तऱ्हा तयांच्या ॥१९॥
नाना कला, नाना रंग । नाना स्वभाव, नाना उद्योग ।
नाना वस्त्रे, भूषणे, उपभोग । भोगणारे निर्मिले ॥२०॥
निसर्ग नानापरी नटला । तो भिन्न जीवांच्या वाट्यासि आला ।
प्रकृतीकडोनि साथ मिळाला । जीवाचिया कलेऐसा ॥२१॥
जीवांत नखशिखांत भरली कला । गुणावगुणांचा मेळ झाला ।
इंद्रिये भोगती वस्तूला । आपुलाल्या भिन्न भावे ॥२२॥
जीव आपणचि संकल्प करी । कल्पोनि आरोप वस्तूवरि ।
मग तदाकार होवोनि व्यवहारी । राग, द्वेष पाहतसे ॥२३॥
ईश्वरनिर्मित एकचि सृष्टि । परि पाहणाराची भिन्न दृष्टि ।
आपुल्या भावे सुखी–कष्टी । होय व्यष्टी–समष्टीने ॥२४॥
ईश्वरनिर्मित स्त्री–रूप सत्ता । ती कुणाची माता, कुणाची कांता ।
आपुल्या भावे सुख–दुःख–भिन्नता । भोगी जीव ॥२५॥
एकाच निसर्गसृष्टीवरि । जीव आपापली सृष्टी करी ।
तैसेचि सुख–दुःख भिन्न अंतरी । अनुभवा येई ॥२६॥
राग, द्वेषादि दृढ विकार । ऐकिले, भोगिले त्यांचे संस्कार ।
हे घेवोनि जन्मती पुन्हा नर । आपापल्या कलेसह ॥२७॥

पूर्व अभ्यास, प्रयत्न, संकल्प । त्यापरी लाभे वेगळे रूप ।
जीवांच्या अनंत कलांचा गोफ । ती ही सृष्टि ॥२८॥
'बहु व्हावे' हा ईश्वरी संकल्प । जीवाद्वारे घेई रूप ।
म्हणोनि दुजियांची ओढ आपोआप । जीवाअंगी ॥२९॥
एका जीवाचा भिन्न संकल्प । दुसऱ्या जीवाचा निराळा व्याप ।
परि प्रबल शक्तीचा कार्यकलाप । ओढोनि नेतो दुसऱ्यासि ॥३०॥
एकाहूनि दुसरा कलाधिकारी । अधिक टाकी मोहनी समाजावरि ।
आपुले मंत्र साजवी मधुरी । वाणी–वीणा वाजवोनि ॥३१॥
कोणी कल्पिली गायनकला । वाद्यकला, चित्रकला, तंतुकला ।
शब्दकला, नृत्य, शृंगारकला । मोहावया अन्य जीवांसि ॥३२॥
राहणे कला, पाहणे कला । बोलणे कला, हसणे कला ।
सर्वांमाजी सौंदर्य–कला । ओतप्रोत दर्शवी ॥३३॥
कुणाचे मंजुळ बोल गोजिरवाणे । कुणाचे व्याघ्रापरी गर्जणे ।
रणकर्कशता जीवी बाणे । कलंक–शोभा कोणाची ॥३४॥
कुणास पाहोनि मोह वाटे । कुणास पाहता येती काटे ।
कुणाचे देखता मुखवटे । छाती फाटे धीरांची ॥३५॥
कुणाची गंभीर मुद्रा सजली । वैराग्य येते, दृष्टीच पडली ।
कुणाकडे पाहता वृत्ति गेली । विषय–वाटेने ॥३६॥
कुणास पाहता चीड दाटे । कुणाचा संग सोडता न सुटे ।
जीवभाव ओवाळावा वाटे । चरणी तयाच्या ॥३७॥
हा सर्व निसर्गचमत्कार नोहे । प्रत्येक कलेचे सामर्थ्य आहे ।
प्रयत्नशील मानवचि राहे । परि देव म्हणती तयासि ॥३८॥
कृष्णाचाचि मामा कंस । परि एक देव, एक राक्षस ।
मुळी पाहता, एकचि वंश । परि भेद केला कलांनी ॥३९॥
कला मानवासि देव बनविते । परि अवकळा नसावी जरा तेथे ।
पूर्णताहि कलेनेच येते । रमता अंगी आत्मबोध ॥४०॥
अवकळेने छी:थू: होते । कला येता देवत्व लाभते ।
जैसा प्रयत्न करावा तयाते । फळ येते याच देही ॥४१॥
विश्वामित्रे केली कला । राजर्षीचा ब्रह्मर्षि झाला ।
ब्रह्मवंशीय रावण राक्षस ठरला । मेला आपुल्या कलेने ॥४२॥



रावणे कला संपादिली । देव–देवता प्रसन्न केली ।
आपुली शक्ति वाढवोनि घेतली । कलाकुसरीने ॥४३॥
परि ती पचविता नाही आली । उपभोगाची भावना झाली ।
म्हणोनि कला अवकळा पावली । अहंकारे ॥४४॥
कुंभकर्णे सुखमार्ग धरिला । आहार निद्रेची वाढविली कला ।
क्रूरपणाचा खेळचि झाला । नाश पावला सर्वांसह ॥४५॥
तोचि बिभीषण कला शिकला । रामनामी रंगोनि गेला ।
राम धावोनि घरी आला । सौख्य दिले अंतर्बाह्य ॥४६॥
दिले लंकेचे राज्य हाती । परि नाही उपभोगाची प्रीति ।
म्हणोनीच आजवरि कीर्ति । अमर तया सज्जनाची ॥४७॥
कलेचे ऐसे तीन प्रकार । राजस, तामस, सात्विक सुंदर ।
जो जयासि सजवी चतुर । तो ओळखावा त्या गुणाचा ॥४८॥
या सकळांमाजी जीवन–कला । सात्विकतेचा प्रवाह भरला ।
मोहवूनि प्रेमाने सकला । कीर्तिमार्ग दावी भूलोकी ॥४९॥
एरव्ही सर्वांतचि आहे कला । एक चातुर्ये खाय एकाला ।
मोठा खातो लहानाला । नियम ऐसा जीवनी ॥५०॥
परि हा नियम मानवी नाही । पशु–पक्ष्यांना शोभे सर्वकाही ।
अंडज, जारज, उद्भिज, स्वेदजहि । याच मार्गी ॥५१॥
याच मार्गे मानव गेला । तेणे जगी हाहा:कार झाला ।
'बळी तो कान पिळी' या बोला । जीवन–कला म्हणो नये ॥५२॥
सामुदायिक वृत्तीविण । जगी टिकले प्राणी कोण? ।
जगावे, जगवावे, जीव, जन । हीच खरी जीवन–कला ॥५३॥
हेच वैशिष्ट्य मानवाचे । जगी सौख्य नांदवी साचे ।
त्याविण साऱ्या प्रगतीचे । मंदिर मिळे धुळीमाजी ॥५४॥
म्हणोनि सर्व जीवांची कला वेगळी । जगावे दुसरे घेवोनि बळी ।
परि मानवांची कला निराळी । उन्नत करी दुर्बलांहि ॥५५॥
पशु, पक्ष्यांचे नर्तन, गायन । मानव सर्वांतचि झाला निपुण ।
परि तयाचे मानवपण । असे भिन्न सर्वांहूनि ॥५६॥
तो कातिणीपरी काती, विणी । कोकिळेपरी गाई गाणी ।
मत्स्यापरी तरे जीवनी । उडे गगनी पक्ष्यांपरी ॥५७॥

मधमाशीपरी संचय करी । मुंग्यासारिखे किल्ले उभारी ।
रंग बदली सरडयापरी । नृत्य करी मोराऐसे ॥५८॥
फुलपाखरांचे धरी वेष । चिमण्यांपरी घरटयांची हौस ।
ऐशा सर्वचि कला साधती त्यास । परि त्याचि कला निराळी ॥५९॥
तो राहतो नीटनेटका । वाया न धाडी आपुला पैका ।
सर्वां सांभाळितो सारखा । आपुल्यापरी ॥६०॥
मनुष्य स्वभावेचि भिन्न पडतो । तो सर्वांसीच सांभाळितो ।
मर्यादेने वागत जातो । सद्धर्माच्या ॥६१॥
विवेक–बद्धीने चालतो । पडलेल्यासि उचलोनि घेतो ।
दुसऱ्याचिया हितास्तव जातो । बळी प्रसंगी ॥६२॥
देतो सर्वांसि आपुला हिस्सा । गावी न यावी म्हणोनि अवदसा ।
त्याचे कुटुंब गावचि सहसा । वाटे तया ॥६३॥
आपण जे जे काही करावे । त्याने इतरांसि दुःख न व्हावे ।
अहर्निशी ऐसेचि वर्तावे । आवडे तया ॥६४॥
दूरदृष्टीचा विचार धावे । कार्यकारण तयासि ठावे ।
व्यक्तिऐसे विश्व सुखी व्हावे । म्हणोनि करी कष्ट नाना ॥६५॥
ऐसे करण्यासि जे जे चुकले । ते मानवचि नव्हते भले ।
मानवदेही जन्मासि आले । परि राहिले पशूचि ते ॥६६॥
जे जे असेल माझ्याघरी । सगळ्या सुख लाभावे तयाचि परी ।
ऐसी चिंता नित्य करी । तोचि धन्य मानव ॥६७॥
तो आपुली कलाकुसरी । सर्वांचिया जीवनी भरी ।
शोषण, पतन कुणाचे न करी । आपुल्या कलेने ॥६८॥
'कलेकरिता कला' न ठेवी । जीवनासि कला भूषवी ।
आपण सजवूनि, दुसऱ्या दाखवी । मनुष्यपण गोड शब्दे ॥६९॥
लोभासाठी गोड बोलणे । ही जरी कला घेतली कोणे ।
तरि ते जाणावे दुःखदवाणे । प्रेमळपण दिसे जरी ॥७०॥
कोणी विषयासाठी नटला, थटला । तोंडा रंग फासोनि फिरला ।
तरी अंतरीच्या काळिमेला । बघती जन तयाच्या ॥७१॥
कोणी शिकला चातुर्यकला । साहित्य, अभिनय मोही जगाला ।
परि तेणे स्वार्थापायी घातला । समाज पतनी ॥७२॥



कोणी नृत्य, गायन नटविले । चित्रादि कलांना शृंगारिले ।
म्हणती आम्ही मानवा केले । उन्नत ऐसा कलांनी ॥७३॥
परि पाहता अनुभव आला । मानव शूद्र वृत्तींनी घेरला ।
याचे कारण बाजार झाला । स्वार्थापायी कलांचा ॥७४॥
प्रत्येक कलाकौशल्यामागे । सद्‌गुणांची असती अंगे ।
परि तेवढेच विसरती जन संयोगे । घेती त्यातूनि वाईट ॥७५॥
याचे कारण एक आहे । समजदार प्रलोभनी दंग राहे ।
तेथे उपायचि होती अपाय । रंगविले किती तरी ॥७६॥
परि ती कला नव्हे करंटेपण । तो शृंगार नव्हे ते मरण ।
मधुर बोलणेहि जहरासमान । वाटे कळता अंतरीचे ॥७७॥
अंतरीचे दिसती डोहाळे । क्षणोक्षणी वरि उफाळे ।
काय होते बोलोनि प्रेमळे । कलाकुसरीचे ? ॥७८॥
हा दंभ विसरायाची कला । जो कोणी साधकजन शिकला ।
त्यासीच लोक मानिती भला । सद्‌भावाने ॥७९॥
त्याची प्रत्येक कला निर्मळ । अनुपाने विषहि दे अमृतफळ ।
मानवतेचे वाढवी बळ । तीच कला महाथोर ॥८०॥
मुख्य कलेची सांगता । असावी लागते तारतम्यता ।
सदा सावध असावा माथा । उन्नतीसाठी सर्वांच्या ॥८१॥
मग कला मागे धावती । न कळत्या खुणा कळो येती ।
जीवन–कला पाववी सुमति । सर्वांगीण उद्धाराची ॥८२॥
कुणाचे बिघडले, सुधारावे । कुणाचे भांडण तोडोनि द्यावे ।
कुणासाठी योजनाबद्ध व्हावे । मार्ग सांगावया ॥८३॥
हीच खरी कला शिकावी । यानेच जीव तरतील भवी ।
मरणावरीही कीर्ति राहावी । कलाकाराची ॥८४॥
एरव्ही चौदा विद्या, चौसष्ट कला । काय करावे शिकोनि गलबला? ।
जो दुसऱ्याच्या कामी न आला । व्यर्थ मेला अभिमानाने ॥८५॥
कमीतकमी गरजांत राहिला । अधिकांत अधिक उपकार केला ।
समाजाशी समरस झाला । तोचि खरा कलावंत! ॥८६॥
ही जीवन–कला ज्यांना गवसली । त्यांची मानवता विकास पावली ।
'मानवी देव' पदवी लाभली । सात्विक कलावंतासि ॥८७॥

जो ही ऐसी कला चुकला । तो गावी जगण्यासचि मुकला ।
सर्व संसार फाटका झाला । सहकार्याविण बिचाऱ्याचा ॥८८॥
म्हणोनि बोललो मुख्य कला । मानवतेने सजविणे विश्वाला ।
सर्व मिळोनि संसार केला । पाहिजे हा स्वर्गापरी ॥८९॥
आपुले आपुले सर्व करा । सर्वांच्या सुखाचाहि मार्ग धरा ।
सर्वांत आपुल्याहि सुखाचा झरा । दिसो लागे ॥९०॥
सर्व कलांहूनि श्रेष्ठ कला । सर्वांत समरसता लाभावी जीवाला ।
दृष्टीसि जो जैसा दिसला । आनंद वाटला पाहिजे मना ॥९१॥
मनचि न व्हावे वेगळे । जे दिसते ते सुंदरचि सगळे ।
हे कळावया आत्मबळे । पाहिजे कला बोधाची ॥९२॥
आत्म्याची ओळखी ही कला । साधूनि विश्वाशी समरस झाला ।
तोचि कसोटीला लागला । शेवटी पूर्णत्वाच्या ॥९३॥
पूर्णत्वी दुःखी–दोषादि काही नाही । परि ही कला विरळाचि घेई ।
दुःख–दोष निवारूनि जना पाही । तोहि थोर कलावंत ॥९४॥
ज्यासि आहे जगाचे भान । त्यावरि जगाची जबाबदारी पूर्ण ।
त्याने केलेचि पाहिजे दुःख निवारण । समाजाचे स्व–कलेने ॥९५॥
म्हणोनि ऐका, करा उल्हासे । मानवमात्र सुखी व्हावे ऐसे ।
उणीव दिसता सहकार्य हर्षे । नेहमी करा सर्वांशी ॥९६॥
सर्वांशी सर्वांचा सहकार । हाचि आहे मार्ग थोर ।
गावी ये स्वर्गीयता सुंदर । याच कलेने निश्चयेसि ॥९७॥
ही मानव्याची जीवन–कला । गावी शिकवा सर्वांला ।
मग उणे न पडे कोणाला । कधी काही ॥९८॥
योगियांची जीवन–कळा । सत्रावीचा अमृतसोहळा ।
तैसी सुखी अमर करील मानवकुळा । कला ही गावी ॥९९॥
गाव होईल आरोग्यवंत । ज्ञानवंत, सद्‌भाग्यवंत ।
सहकार्यावरीच जग जिवंत । विचारे पाहता ॥१००॥
हजार साधनांहूनि अमोल । एक सहकार्यवृत्ति निर्मल ।
ही गावी फोफावू द्या अमरवेल । नाना प्रयत्ने ॥१०१॥
याने मानवाअंगीची शक्ति । प्रकट होईल महादीप्ति ।
सेवा करील निसर्ग–प्रकृति । सर्व जीवांची ॥१०२॥




जीव ईश्वराचे अंश । त्यांचे गावचि कां राक्षस ? ।
जिकडे तिकडे सुख–संतोष । नांदेल या प्रयत्नांनी ॥१०३॥
म्हणोनि शिका मानव्य–कला । आत्मविकास साधा आपुला ।
आता पुरे हा गलबला । दैववादाचा ॥१०४॥
अनुभवे सांगतो तुम्हाप्रति । करू म्हणाल ते साधेल निश्चिती ।
करा करा आत्मोन्नति । तुकड्या म्हणे ॥१०५॥
इतिश्री ग्रामगीता ग्रंथ । गुरु–शास्त्र–स्वानुभव–संमत ।
जीवन–कला कथिली उन्नत । छत्तिसावा अध्याय संपूर्ण ॥१०६॥

॥ सद्‌गुरुनाथ महाराज की जय ॥

"जेव्हा आम्ही व्यक्तिभावाच्या पलिकडे जाऊ तेव्हाच वास्तविक 'मनुष्य' होऊ. त्यासाठी मनुष्यांना सहाय्य करा पण त्यांना त्यांच्या शक्तीपासून वंचित करू नका. त्यांना पथप्रदर्शन करा, शिक्षण द्या, पण त्यांची कर्तृत्वशक्ती व मौलिकता मारली जाणार नाही इकडे लक्ष असू द्या, त्यांना आपलेसे करा पण बदल्यात त्यांच्या आतील पूर्ण दिव्यत्व त्यांना प्रदान करा. हे सर्व करू शकेल तोच खरा नेता, खरा कलावंत व खरा गुरू !"

– योगीराज श्री. अरविंदबाबू

## ॥ चित्र परिचय ॥



### अ. ३७ – श्री समर्थ आडकोजी महाराज

बहिरंग बोध नाही केला । स्वयेचि श्रद्धाभावे घेतला ।
अहंकार न हो म्हणोनि पूजिला । सद्‌गुरुराजा ॥७२॥

विदर्भातील वरखेड क्षेत्री ''नखांच्या चुंबळी बोटावरी'' (ज्ञाने.) असे हे विदेही संत शतायुषी होऊन १९२१ साली समाधिस्थ झाले. ''गुरोस्तु मौनं व्याख्यानम्'' याप्रमाणे उपयोग न करताच ते राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचे आत्मोपदेशक गुरू होऊन गेले.



अध्याय सदतिसावा

# आत्मानुभव

॥ श्रीगुरुदेवाय नमः ॥

'अनुभव' ऐसा शब्द ऐकला । त्यावरि श्रोत्यांनी प्रश्न पुसला ।
आत्मानुभवाचा मार्ग सांगितला । पाहिजे आम्हां ॥१॥
केले प्रयत्न तुम्ही कोण ? । कैसे गेले तुमचे जीवन? ।
खरी आत्मानुभवाची खूण । काय आहे? ॥२॥
मित्रांनो ! ऐका सावकाश । प्रत्येक जीव देवाचा अंश ।
आपुल्या कर्तव्ये पद त्यास । प्राप्त होय हवे ते ॥३॥
करणी करिता विवेके पूर्ण । नरचि होय नारायण ।
प्रारब्ध आणि परिस्थिति जाण । वाट देई तयासि ॥४॥
ज्यासि करू आवडे उन्नति । निसर्ग होई ग्रंथ त्याप्रति ।
साधन होई एकेक वृत्ति । जाणत्यासि ॥५॥
आधि पाहिजे सुसंस्कार । पुढे जाण्याचा निर्धार ।
संत, ग्रंथ काय? अवघाचि संसार । सहायक होई तयासि ॥६॥
बुडते जग त्यासि जागवी । संकटे स्फूर्ति देती नवी ।
आघातातूनि हितचि भावी । साधक तो ॥७॥
मनी आत्मोन्नतीची तळमळ । त्यासि वाट देती सकळ ।
आपुले आपणातचि बळ । पाहिजे आधी ॥८॥
सत्य संकल्पाचा निश्चय । लावी जीवनासि सोय ।
वाट चालता निर्भय । मुक्काम पावे ठायीच ॥९॥
अपुल्या अंगी प्रकाश भरला । तो पाषाणचि हिरा ठरला ।
खाणीत शोधूनि आणिती त्याला । प्रयत्ने जन ॥१०॥
मृगनाभीची कस्तुरी । ती स्थान पावे राज-शिरी ।
कमळ चढे देवावरि । चिखली जन्मूनि स्वगुणांनी ॥११॥
हाचि अनुभव प्रमाण । यत्नाअंगीच देवपण ।
हे संत, ग्रंथांचे सत्यचि कथन । जाणावे श्रोती ॥१२॥

तुम्ही विचारिले माझे जीवन । म्हणोनि करितो थोडे कथन ।
जनांसह आपण जनार्दन । हीच खूण अनुभवाची ॥१३॥
हीच अनुभवावयासाठी । सर्व कराव्या आटाआटी ।
ऐसेचि प्रत्यया येई शेवटी । साधकाच्या ॥१४॥
देवत्वाची ज्योत दीप्तिमान । परि आवरण पडले मलीन ।
ते साफ करावयासीच प्रयत्न । म्हणती साधन त्यालागी ॥१५॥
ऐसी साधने निमित्तमात्र । स्वरूप एकचि असे सर्वत्र ।
ते अनुभव आणी वृत्ति पवित्र । हेच सूत्र उन्नतीचे ॥१६॥
या उन्नतिमार्गी जो लागला । विवेके अंतरी जागला ।
तो स्वये उद्धरोनि गेला । तारक झाला जनांसि ॥१७॥
हे प्रयत्नांचे शुद्ध महिमान । ऐकोनि मीहि केले साधन ।
ते कळाया करितो वर्णन । थोडकेपण आयुष्याचे ॥१८॥
लहान ऐशा गावामाजी । मागासलेल्या जनसमाजी ।
उपासाचीच लाभे रोजी । ऐशा ठायी जन्मलो ॥१९॥
घरी दारिद्र्याचे वरदान । परि भावभक्तिची नसे वाण ।
ऐकता सुसंस्कारांचे गान । सोशीत कष्ट, वाढलो ॥२०॥
अंतरी जिज्ञासा असे खूप । ती धरी हूडपणाचे रूप ।
अल्लडपणे साहोनि ताप । सर्वांमाजी वावरलो ॥२१॥
ऐकिले श्रवणी थोडे कीर्तन । त्यावेळी होते आर्तपण ।
धृवप्रल्हादाचे आख्यान । मना वाटे ऐकावे ॥२२॥
काही ऐकली संतचर्चा । काही कथा ऐकिल्या पुराणींच्या ।
काही वाढविल्या भावना मनाच्या । वैराग्ययोगे ॥२३॥
झाली परिस्थितीही कारण । धरावया एकांती मुद्राध्यान ।
ते सर्व केलिया कथन । वेळ पुरेना वर्षाचा ॥२४॥
महत्त्वाचे सांगावे वाटते । साधकाला मिळेल आइते ।
आत्मानात्म-विचार येथे । श्रोते ऐकती म्हणोनि ॥२५॥
काही संगतीचे लाभले फळ । आले आत्मचिंतनासि बळ ।
देव-दर्शनाची खळबळ । झाली हृदयी दृढ ऐसी ॥२६॥
पुढे कल्पना सरसावली । धृवानेच कां तपस्या केली ? ।
आपणासहि कां न घडली । पाहिजे तैसी ? ॥२७॥



काय करावे वाटे मनी? । कैसे ध्यान करावे नेत्र लावोनि? ।
कोणा विचारावे, समाधानी । वृत्ति व्हाया जीवाची? ॥२८॥
मग बळेचि रानी जावे । वृक्षाखाली ध्यान धरावे ।
कधी मूर्तिपूजनचि करावे । मंदिरामाजी ॥२९॥
कधी रेणुकांची करावी मूर्ति । वन-पुष्प-पत्रे पूजावी ती ।
भजन करावे अहोराती । तन्मय चित्त करोनिया ॥३०॥
ऐसा वाढला प्रेमनिश्चय । मानसिक संकल्पांचा समुच्चय ।
धरिली ध्यान-मुद्रेची सोय । एकांतामाजी ॥३१॥
परि झाले नाही समाधान । चित्त उडे मधून मधून ।
तशातचि करावे कीर्तन । तळमळोनि ॥३२॥
आपणचि मना समजवावे । आपणचि समाधान मानावे ।
गावे, नाचावे, बोलत जावे । आपल्याशीच एकांती ॥३३॥
परि प्रारब्धभोग आडवा पडे । विषयांकडे वृत्ति ओढे ।
कधी दुष्परिणाम घडे । देह-धारणेने ॥३४॥
म्हणोनि निघालो घर सोडून । बावळट ऐसा वेष घेऊन ।
कधी कधी विसरो देहभान । चिंतेत देवदर्शनाच्या ॥३५॥
राहिलो वनी, घोर रानी । रानवट लोकी, धनिकां-भुवनी ।
अनेक अनुभव आले जीवनी । स्फुरले मनी सद्भाव ॥३६॥
काही योगाचे साधन । थोडे अध्यात्म-वाचन ।
विशेष विश्वनिरीक्षण । केले मनन सर्व काळ ॥३७॥
भजन, सप्ताह, यज्ञयाग । महोत्सव, व्रते, महाप्रसंग ।
नाना कार्ये, साधन, प्रयोग । असंख्य केले ॥३८॥
केले बहुत पर्यटन । वनभ्रमण, तीर्थाटन ।
पाहिले सर्व प्रांत फिरून । आयुष्यात ॥३९॥
नाना मंदिरे, देवालये । संस्था, आश्रम, वाचनालये ।
दरी, कंदरी होऊनि निर्भय । पाहिली स्थाने ॥४०॥
भेट घेतली वरिष्ठांची । पाहिली भिन्नता रीतिरिवाजांची ।
रुचि घेतली खाण्यापिण्याची । देशी-भेषी ॥४१॥
पाहिले अखाडे साधुजनांचे । गोसाव्यांचे, संन्याशांचे ।
वैराग्यांचे, महानुभावांचे । वारकऱ्यांसहित ॥४२॥

प्रवास केला बैलगाडीचा । घोडे, टांगे हत्ती-अंबारीचा ।
सायकल, मोटार, विमानाचा । सर्व काही ॥४३॥
पाहिले सागर, भव्य स्थाने । सातपुडा, सह्याद्रि, विंध्यादि राने ।
हिमालयासहित अति उंचपणे । गगनभेदी ॥४४॥
निसर्गाची दृश्ये अपूर्व । मानवकृत चमत्कार-वैभव ।
सुख-साधने, ज्ञान-साधने सर्व । पाहिली लोकी ॥४५॥
हे सर्व काही पाहूनि पूर्ण । नाहीच झाले शांत मन ।
शेवटी घ्यावा लागला अनुभव जाण । आपणामाजी ॥४६॥
बहिर्मुख दृष्टीने पाहता । समाधान न लागे हाता ।
हीच असे अनात्मता । दुःखदायी सर्वांसि ॥४७॥
विश्व कोण? मी कोण? । याचे मुळात एकपण ।
ते जाणता विचारे पूर्ण । अंतर्मुख वृत्ति होय ॥४८॥
एकचि तत्त्व चैतन्यघन । सागरी बर्फ-तुकड्यासमान ।
त्यावरि सजले विविधपण । हीच खूण अनुभवाची ॥४९॥
मीच आहे सकळास कारण । माझ्याच आत्म्याचे हे विशालपण ।
ओळखी होता कळले पूर्ण । अद्वैतपण सर्वांचे ॥५०॥
मग मुरली पाहण्याची हौस । निवांत झालो सावकाश ।
जे जे दिसे या दृष्टीस । ते ते भासे आपणचि ॥५१॥
वाटे सर्वचि येथे आमचे । भिन्न कोण निवडायाचे? ।
हर्ष न समाये, मनाचे । मोठेपणी आतलाचि ॥५२॥
मुंगी आणि ऐरावत । अणुरेणु आणि मेरू पर्वत ।
सर्व माझेचि संकल्प मूर्त । कळो आले ॥५३॥
अजूनि कितीतरी आत्मा थोर ! । न चाले मोजमाप अनिवार ।
अनंत ब्रह्मांडे विश्वाकार । संचले असती ॥५४॥
माया, ईश्वर, ब्रह्म, सृष्टि । सर्व आत्मरूपाचिया पोटी ।
पोट, पाठहि नाही शेवटी । तेचि तत्त्व मी ॥५५॥
ब्रह्म म्हणती सर्वात मोठे । परि ही भाषा परकी वाटे ।
अनुभव घेता वेगळे न भेटे । ब्रह्मपण आटे आपणात ॥५६॥
प्रथम गाव, मंदिर मोठे वाटले । मग तीर्थाटन मोठे झाले ।
आणि पुढे निसर्गरूप दिसू लागले । मोठे मोठे ॥५७॥



परि त्याच्या मुळाचा अनुभव घेता । मोठा कळलाच नाही कोणता ।
हा आत्म्याचा विलासचि तत्त्वता । अनुभवा आला ॥५८॥
मोठा तो पंचतत्त्वादि भेदोनि । लहान तोचि अणुरेणुहूनि ।
पाहता पाहणे दुरी सारोनि । कळला एकपणी जवळचि तो ॥५९॥
तेथेचि झाले पूर्ण साधन । मग दिसो लागले एकचिपण ।
सुख-दुःख आणि जन्म-मरण । सारिखेचि ॥६०॥
भिकारी आणि धनवान । हे तो संकुचित भावे दोन ।
विकास होता न राहती भिन्न । होती समान, उन्नत ॥६१॥
नाही जाति, पंथादि भेद । आप-परभाव हर्ष, खेद ।
प्रकट होई सच्चिदानंद । सर्व ठायी, सम रुपे ॥६२॥
जन्मणे, मरणे झाला खेळ । सुख-दुःख सर्व झाले शीतळ ।
संकटे येता वाटे प्रेमळ । प्रवाह आला ॥६३॥
आता विषादचि नाही उरला । विचार विस्तार‌रूपे व्यापला ।
जे जे करणे असेल निसर्गाला । रूचि वाटे तयाची ॥६४॥
यासीच खरा बोलती प्रारब्धवाद । ज्यातूनि आसक्तीचा उच्छेद ।
इच्छेविरहीत आनंद । सर्वासाठी निर्विषय ॥६५॥
नाही शृंगार सौंदर्याचा । नाही पाल्हाळ काव्य-कलांचा ।
जे असेल जैसे, तयाचा । आनंद वाटे चित्तासि ॥६६॥
हे सर्व कासयाने झाले? । यासाठी काय साधन केले? ।
कासयाने द्वैतपण मुरले । आपणामाजी? ॥६७॥
हे आठवता भान येते । साक्षित्वरूपे पाहता कळते ।
अंतरंगी विचारिता, वळते । कार्य, मर्म, सर्व काही ॥६८॥
बुध्दीसि स्वातंत्र्य दिले । जैसे जे दिसले, ते विचारिले ।
त्यापरी कार्यसंबंध जोडले । आत्मत्व आले देहभावा ॥६९॥
आपण तैसे सकळ जन । मग कासया मानावे भिन्नपण? ।
ऐसे होता झाले समाधान । ज्ञानमार्ग सर्व काही ॥७०॥
ऐसा जीवेचि मंत्र धरिला । न कळे कोणी वरदहस्त ठेविला ।
परि सद्भावे मी नमस्कारिला । आडकोजी गुरुस्थानी ॥७१॥
बहिरंग बोध नाही केला । स्वयेचि श्रद्धा भावे घेतला ।
अहंकार न हो म्हणोनि पूजिला । सद्गुरुराजा ॥७२॥

परि अंतरी कळले मर्म । गुरु-शिष्यपण आहे भ्रम ।
आहे एकचि वस्तु अगम्य । दोघांमाजी ॥७३॥
हे कळावयासि संगति लागे । संगतियोगे भावना जागे ।
भावना जागता अंतरंगे । दिसे मुळीचे आत्मरूप ॥७४॥
मग जे जे मागे पाहिले । ते ते सर्व सहज झाले ।
स्वाभाविकपणचि अंगी आले । स्वरूपानुभवे ॥७५॥
स्वरूप म्हणजे अखंड स्थिती । जी आत्म्याची सहज गति ।
नाही कृति, ना विकृति । स्वरूपामाजी ॥७६॥
अखंड प्रेम, अगाध ज्ञान । अबाधित सत्य, आनंद पूर्ण ।
हेच स्वरूपाचे लक्षण । अवीट, अभिन्न अक्षय जे ॥७७॥
परि हे प्रथम कळले नव्हते । म्हणोनि धुंडिले स्थानमानाते ।
नवल तोवरि वाटले होते । न लक्षिता स्वरूप स्थिति ॥७८॥
जैसी जैसी जाणीव वाढली । तैसी शक्ति व्यापक झाली ।
पुढे वाटली पर्वतावलि । गोवरी जैसी ॥७९॥
राजाही वाटला घरचा गडी । सुचवावयाची झाली तातडी ।
संसार झाला आपुला सवंगडी । याचि गुणे ॥८०॥
आपुला आनंद पैसावला । सुखवू पाहे दुःखिताला ।
निद्रेत कोणी ओसणला । तरी ये दया त्याची जैसी ॥८१॥
परकेपणाची दृष्टीच गेली । वासना भावनेत विरू लागली ।
दुसऱ्यांची सुख-दुःखे झाली । आपणाऐसि सहजचि ॥८२॥
मग माघारली पूजा-मंदिरे । दिसू लागली जिवंत शरीरे ।
यानेच दिसे सर्वांचे बरे । देवकृपा व्हावयासि ॥८३॥
जिकडे जिकडे उणीव भासे । तिकडे तिकडे मन उल्हासे ।
धावोनि करी आपणा ऐसे । एकचि अंग समजोनि ॥८४॥
जव अंतरी आत्मा कळला । तव आपल्यातचि विश्व पाहो लागला ।
जैसा दिव्य-दृष्टीचा प्रकाश गवसला । अर्जुनालागी ॥८५॥
मग अनंत उदरे, अनंत हस्त । दिशा व्यापूनिया समस्त ।
दिसे विराटरूप महासमर्थ । ठायीच्या ठायी ॥८६॥
ही दृष्टि सर्वांसचि आहे । परि विचारे उघडील तोचि पाहे ।
तो अनुभवमार्ग सांगती लवलाहे । संत, सज्जन ॥८७॥
जैसे आकाशाचे तुकडे नोहे । ते घटोपाधीमुळेचि भासती पाहे ।
तैसा जीव अल्पज्ञ, वेगळा न राहे । अनुभव घेता ॥८८॥



नुरे जीवाचे जीवपण । दारिद्र्य, दुःख, रंकपण ।
आनंदाचे शिखरपूर्ण । प्राप्त होई निश्चये ॥८९॥
मग प्रारब्ध तयाचा खेळ । प्रयत्न लीलारूप केवळ ।
आत्मरूपे विश्व सकळ । अनुभवा ये एकपणे ॥९०॥
जीव आपुली वारी व्यथा । तैसाचि सुखवी जगा समस्ता ।
उरला उपकारापुरता । सर्वांचिया आत्मभावे ॥९१॥
त्यासि नाही उरली कामना । निष्काम कर्म त्याचा बाणा ।
मग बाधक होईल कोणा । कैशापरी संसारी ? ॥९२॥
तो जे करी ते ईश्वर-पूजन । बोलेल तेचि वेद-वचन ।
त्याच्या शब्दे आंदोलन । करिती जन सद्भावे ॥९३॥
सत्तेविण त्याची सत्ता । क्रांतीहूनि सेवेची महत्ता ।
इशारा होता मालमत्ता । लोक लाविती सत्कार्यी ॥९४॥
त्याच्या संदेशाचे बळ । गावी करी प्रेमाचा सुकाळ ।
सुखी होती लोक सकळ । गावोगावींचे ॥९५॥
त्याच्या ज्ञाने भारले अज्ञजन । ते ज्ञानियांसि देतील शिकवण ।
झुंजती काळाशी दारुण । स्त्रिया-मुलेही ॥९६॥
हे आत्मविकासाचे बळ । मानवी प्रयत्नाचेचि फळ ।
देव होवोनि करील, सकळ । लोकचि देव ॥९७॥
मित्रा! ऐसा अभ्यास करी । धरोनि मार्ग-बोध अंतरी ।
मग दिसेल याच शरीरी । तो श्रीहरि व्यापला ॥९८॥
लाभता अनुभवाची खूण । जनता होईल जनार्दन ।
गावी ऐसा एकटाहि जाण । उन्नत करील गाव सारे ॥९९॥
तो प्रलोभनी कोठे फसेना । राग, द्वेषेहि गोंधळेना ।
त्याच्या सहवासेचि ग्रामजीवना । अमृत लाभे ॥१००॥
ऐसा सेवकचि पाया जगाचा । गावचा रत्ननिधिच तो साचा ।
अभ्यास करा सक्रिय अध्यात्माचा । याचसाठी ॥१०१॥
प्रयत्ने मानव होई देव । प्रयत्ने स्वर्गतुल्य होई गाव ।
संतांच्याहि अभेदभक्तीचे वैभव । ग्रामसेवा-प्रयत्नी ॥१०२॥
ऐसे लोक निर्माण करावे । तरीच उदया ये जग नवे ।
नांदेल ग्राम, विश्व वैभवे । सर्व काळ, तुकड्या म्हणे ॥१०३॥
इतिश्री ग्रामगीता ग्रंथ । गुरु-शास्त्र-स्वानुभव-संमत ।
स्वानुभवे कथिला अध्यात्मपथ । सदतिसावा अध्याय संपूर्ण ॥१०४॥

॥ सद्गुरुनाथ महाराज की जय ॥

## ।। चित्र परिचय ।।



### अ. ३८ – श्री संत नामदेव महाराज

हाती घेवोनि तूपवाटी । नामदेव लागे श्वानापाठी ।
संतोषवी जगी जगजेठी । कपडे शिवोनि ।।३०।।

आपल्या हिंदी-मराठी भजनकीर्तनांनी महाराष्ट्रातच नव्हे तर पंजाबातही भक्तीचा पूर वाहविणारे संत नामदेव हे आधी विठ्ठल मूर्तीस नैवेद्य देत, परंतु श्रीगुरु खेचरांनी व्यापक दृष्टी दिल्यानंतर ते 'सर्वाभूती भगवंत' पाहू लागले, पोळी घेऊन जाणाऱ्या कुत्र्याला तूप देण्यास ते धावू लागले. ''रात्रीमाजी शिवी, दिसामाजी शिवी । वृत्ति सदाशिवी मग्न राहे'' याप्रमाणे गावसेवेसाठी रात्रंदिवस शिवणकामही करीत राहिले. त्यांनी विभिन्न जाती-पंथाच्या भक्तांचे जणू एक कुटुंबच बनविले होते.



• अध्याय अडतिसावा •

# ग्राम–कुटुंब

।। श्रीगुरुदेवाय नमः ।।

श्रोते आत्मबोधी रंगले । म्हणती हेचि पाहिजे कथिले ।
साधु, संती हेचि सांगितले । सर्व जनांसि ।।१।।
धन्य धन्य आत्मबोध । ऐकता होय ब्रह्मानंद ।
येथे गावसेवेची ब्याद । कासयासि सांगावी ? ।।२।।
ऐसी श्रोत्यांची धारणा । ऐका आता समाधाना ।
एकाग्र करोनिया मना । सर्व जन हो ! ।।३।।
माझ्या जीवीचे मनोगत । मी सांगतो आता सत्य ।
ग्रामगीतेचा मतितार्थ । यातचि आहे सर्वहि ।।४।।
माझाच नव्हे, हा विचार । सर्व संत, ग्रंथाचा सार ।
महात्म्यांची तळमळ-अपार । तेच वर्म कथितो मी ।।५।।
आपण त्यांचे वाचता ग्रंथ । आत्मबोध ऐकता सतत ।
परंतु त्यांचे काय हृद्‌गत? । दुर्लक्ष झाले तयाकडे ।।६।।
जगी ज्यांनी घेतला स्वानुभव । ज्यांनी जाणले मूळ तत्त्व ।
त्या सर्वांचा एकचि भाव । व्हावेत सर्व लोक सुखी ।।७।।
अवघाचि संसार व्हावा सुखी । मंगलता निघो सर्वांमुखी ।
खळ, दुर्जनांचीहि दृष्टि निकी । व्हावी सर्वथा ।।८।।
मित्रता नांदावी सर्व जनी । उणीव न दिसावी कोठे कोणी ।
जी जी इच्छा करिती प्राणी । व्हावी पूर्ण, ती न्याये ।।९।।
नको कोठेहि द्वेष, वैर । न उरो कोठे हाहाःकार ।
दंभ, मत्सर, अत्याचार । अनाचार न राहो ।।१०।।
लया जावो जगाचा भेद । परस्पर-पोषक होवोत वाद ।
नांदो आनंदीआनंद । सगळीकडे सर्वदा ।।११।।
हीच तळमळ रात्रंदिनी । सारखी होती तयांचे मनी ।
जगी जे झाले थोर कोणी । महापुरुष कोठेहि ।।१२।।

त्यांनी कथिले आत्मज्ञान । तेहि सुखी कराया जन ।
आत्मवत जाणावे सर्वांसि म्हणोन । प्रत्येकाने ॥१३॥
त्यांनी वर्णिले ईश्वर-भजन । तेहि शुद्ध व्हावया मन ।
पाहावी देवाची लेकरे समान । म्हणोनिया ॥१४॥
त्यांनी कथिले त्याग, वैराग्य । तेहि जग न मानता भोग्य ।
निष्काम सेवेने पावावे भाग्य । याचसाठी ॥१५॥
भूत-दया, परोपकार । दान-धर्म, यज्ञादि अपार ।
याद्वारे दुःखितांसि आणावे वर । अधिक ते ते देवोनि ॥१६॥
करावी समाजी समानता । म्हणोनीच ही साधने तत्त्वता ।
तीर्थादि द्वारे सामुदायिकता । शिकविली साधु, संतांनी ॥१७॥
एकमेकांमुखी काला द्यावा । समान भावे भात खावा ।
सोने वाटोनि स्नेह वाढवावा । ऐशा प्रथा किती तरी ॥१८॥
सर्वांमाजी एकचि भाव । आकुंचित न व्हावा मानव ।
सामुदायिक वृत्तीने करावे सर्व । विश्वचि सुखी ॥१९॥
सर्व मिळोनि एकत्वे राहावे । सर्वांनी सर्वांस चालवावे ।
सर्वभूत हिती रत व्हावे । ऐसेचि वचन गीतेचे ॥२०॥
वेदापासूनि हाच घोष । समान सुखे नांदावा मानव-वंश ।
सर्व धर्मांचा हाच उद्देश । जिव्हाळ्याचा ॥२१॥
परंतु हे सारे पडले पचनी । मानव राहिला मागासलेपणी ।
करमणूक झाली संत-वाणी । उच्च ज्ञानाची ॥२२॥
एकएकाचे घेवोनि शब्द । करिती चर्चा, वितंडवाद ।
जीवनी उतरायाचा बोध । त्यासि नाही ठाव कोठे ॥२३॥
संतांनी कथिले ब्रह्मज्ञान । विशाल व्हाया मानवी मन ।
सर्वांनी राहाया समान । परस्पर-सहकार्ये ॥२४॥
परि ते राहिले नुसते मुखी । स्वार्थाचीच वाढली शेखी ।
आपुला शेजारी मरो दुःखी । नाही चिंता आज कोणा ॥२५॥
चर्चेसाठी तत्त्वज्ञान । आणि चैनीसाठी जीवन ।
ऐसे घेतले भिन्नपण । मानवांनी वाउगे ॥२६॥
तेणे संत, ऋषींचा हेतु । ग्रासूनि गेला राहू, केतू ।
राम गेला बांधूनि सेतु । गोटे राहिले जैसे-तैसे ॥२७॥



त्यांना सांगावी संत-कहाणी । हाडे दिली दधीचींनी ।
जनसेवेसाठी ऋषि, मुनि । रात्रंदिवस कष्टले ॥२८॥
दामाजींनी सुखविले जना । त्यातचि तृप्ति नारायणा ।
संत दादू करी पिंजणा । सेवाभावे ॥२९॥
हाती घेवोनि तूप-वाटी । नामदेव लागे श्वानापाठी ।
संतोषवी जगी जगजेठी । कपडे शिवोनी ॥३०॥
सांवतोबांनी शेत पिकविले । चोखोबांनी गाव झाडले ।
लोकसेवेचे महत्त्व कथिले । सर्व संतांनी ॥३१॥
कबीरांनी विणले शेले । जाति, धर्मादि भेद निरसले ।
हे सर्व जरी सांगितले । तरी जाण न ये त्यांसि ॥३२॥
ते म्हणती हे साधूंकरिता । आम्ही प्रापंचिक सर्वथा ।
आम्हा पाप्यांसि त्या कथा । ऐकल्याने पुण्य लाभे ॥३३॥
आम्ही सकळांसाठी जन्मलो । सर्व मिळोनि राहाया आलो ।
परस्परांशी पाहिजे पूरक झालो । हे न कळे तया ॥३४॥
तेणे ग्राम झाले कुग्राम । नाही परस्परांशी निर्मळ प्रेम ।
सर्वांचे स्वार्थ वाढले बेफाम । आपुल्याचि व्यक्तित्वाचे ॥३५॥
एक लाडू करोनि खातो । तेथेचि दुजा उपाशी राहतो ।
हे आम्ही गावोगावी पाहतो । मानती भूषण ते त्यासि ॥३६॥
एक हौसेने महाल करी । दुजास राहे घर कौलारी ।
तिजास कुडाचीहि झोपडी बरी । पाहता दिसेना ॥३७॥
एकास नाही जराही वाव । एकास उधळपट्टीची हाव ।
एक बसोनि भोगी वैभव । कष्ट करोनि दुःखी एक ॥३८॥
सदा एक-दुसऱ्यासि जळती । एक-दुजाचे वाभाडे काढिती ।
किंवा नशिबावरि हात ठेविती । हाक देती देवासि ॥३९॥
कैसा होईल यांचा मिलाफ? । कशाने फळेल संत-संकल्प ।
कैसियाने होईल विश्वरूप । सुखी हे सारे? ॥४०॥
यासाठी अनेक महात्मे झटले । परि जगाचे दुःख नाही मिटले ।
उपदेश त्यांचे नाही उतरले । लोकजीवनी म्हणोनिया ॥४१॥
यासाठी शोधिला पाहिजे उपाय । जेणे जगी सुख, शांति राहे ।
महापुरुषांचे समाधान होय । विचारू तैसे ॥४२॥

ऐसे संकल्प उठता । लागलो कराया विचार तत्त्वता ।
सापडला मार्ग निर्मळ हाता । ग्रामकुटुंब योजनेचा ॥४३॥
उपदेश सुधारी काही लोकां । परि समाज-रचना देई धोका ।
तेणे आणता न ये अनेका । प्रत्यक्षात संत-बोध ॥४४॥
म्हणोनि समाज-रचना बदलावी । संत बोधावरि मांडणी करावी ।
ब्रह्मज्ञानासि सक्रियता द्यावी । समत्व आणोनि जीवनी ॥४५॥
देव एक असोनि अनंत झाला । नाना रूपे धरोनि नटला ।
परि तो पाहता एकचि दिसला । तैसे व्हावे जनलोकी ॥४६॥
एकाचे सुख-दु:ख सर्वांसि । सर्वांचा उपयोग एकासि ।
घटकासि आणि विश्वासि । सांगड व्हावी सर्वथा ॥४७॥
सर्व विश्वचि माझे घर । ऐसे बोलिले संत ज्ञानेश्वर ।
त्यांचे प्रात्यक्षिक हे सुंदर । करावे ग्राम आपुले ॥४८॥
गावाची करावी आदर्श व्यवस्था । म्हणोनि कथिली ग्रामगीता ।
ग्रामापासोनि पुढे वाढता । विश्वव्यापी व्हावे ॥४९॥
जेथे गावाचाच न कळे धर्म । तेथे विश्वधर्माचे कैचे वर्म? ।
हेचि कळावया साधन सुगम । धरिले गावाचे ॥५०॥
मनुष्य ग्रामाचा संरक्षक । ग्राम देशासि पोषक ।
देश विश्वाचा घटक । ऐसे व्हावे यथार्थ ॥५१॥
मनुष्याचे सर्वस्व ग्राम आहे । त्याविण त्याला अस्तित्व नोहे ।
ग्राम सर्वांगपूर्ण राहे । तरीच वैभव मानवाचे ॥५२॥
गावी एकाने माडी बांधली । सर्व घरे मोडूनि पडली ।
याने आमुची कीर्ति वाढली । हे समजणे वेडेपणाचे ॥५३॥
खरा स्वार्थ तोचि करी । ज्याचा व्यवहार समाजा उद्धरी ।
नाही भिन्नत्वाची उरी । जयामाजी ॥५४॥
नाहीतरि उलट घडे । ऐसे चालत आले पोवाडे ।
श्रीमंत - गरीब हे आकडे । पुसले पाहिजेत या पुढती ॥५५॥
आपुला स्वार्थचि धरिला उरी । पर्वा इतरांची न केली जरी ।
तेणे आपणासहि शांति संसारी । न साधेल कधी ॥५६॥
म्हणोनि ज्यासि दूरदृष्टि आली । त्याने हीच ठेवावी बोली ।
देवाने ही दुनिया निर्मिली । सकळांसाठी ॥५७॥



हीच खरी विकासाची वाणी । जाणेल, तोचि खरा ज्ञानी ।
अभ्यास करावा सर्व लोकांनी । आता तरी ॥५८॥
हा अभ्यास नको शाब्दिक । बौद्धिक अथवा केवळ तात्त्विक ।
जीवनचि करा सामुदायिक । ग्राम-जन हो! ॥५९॥
त्यानेच साधेल संत-उद्देश । ईश्वरी संकल्प येईल फळास ।
व्यवहारी लाभेल ब्रह्मरस । सर्व गावासि ॥६०॥
यावरि श्रोती विचारिले । आपण सामुदायिकत्व सुचविले ।
परि त्याचे स्वरूप कळले । नाही आम्हां ॥६१॥
तेचि ऐका सविस्तर । परमार्थमय हा व्यवहार ।
जेणे गावी वैकुंठपूर । नांदू लागे सहजचि ॥६२॥
शक्ति, बुद्धि, सत्ता, धन । आज ज्याच्या जे स्वाधीन ।
तो त्या त्या साधने स्वार्थ साधून । लुटतो गावा ॥६३॥
पाहती आपापल्या पुरते । लाभ इच्छिती आइते ।
इतर मेलियाची तेथे । पर्वा नाही कोणासि ॥६४॥
हे आकुंचितपण बाधक । पोसाया आपुले कुटुंबीय लोक ।
इतरांसि मागाया लाविती भीक । नाना मार्गे ॥६५॥
म्हणोनि स्वरूप द्यावे सामुदायिक । सर्व गावचि कुटुंब एक ।
श्रमती, खाती सर्वचि लोक । ऐसे दृश्य दिसावे ॥६६॥
गावी जेवढी शक्ति, बुद्धि । तो सर्व गावाचाचि निधी ।
ऐसे होता आधि, व्याधि । नष्ट होतील सर्वचि ॥६७॥
आज मजुरा नाही शास्त्रीय ज्ञान । शास्त्रज्ञाअंगी श्रमाची वाण ।
तेणे वाढले कैसे उत्पन्न । गावाचे आमुच्या ? ॥६८॥
श्रम करितील सर्व मिळून । तरि पिकू लागेल बरड जमीन ।
मार्ग काढतील बुद्धिमान । नव्या नव्या शोधांनी ॥६९॥
सामुदायिक प्रयत्नांनी । सामर्थ्य वाढेल कणोकणी ।
जेथे नसे घोटभर पाणी । तेथे सरिता वाहू लागे ! ॥७०॥
स्वच्छ पाण्याचे भरेल तळे । विहिरी, जागोजागी मळे ।
नदीचे प्रवाह होतील सगळे । शेतीसाठी उपयोगी ॥७१॥
नदी सागरी मिळावी । तिची अपार शक्ति व्यर्थचि जावी ।
ऐसी ईश्वरी इच्छाचि नसावी । उपयोगी यावी सर्वांच्या ॥७२॥

तैसीच मानवी शक्ति, बुद्धि । स्वार्थीच वाया न जावी कधी ।
गावी नांदवाव्या ऋद्धि, सिद्धी । नाना प्रयत्ने ॥७३॥
आमुचे गावचि आमुचे घर । सर्व व्यवहार सगळयांवर ।
सर्वांचा सर्वांठायी हातभार । असलाचि पाहिजे ॥७४॥
बुद्धि-काम, देह-परिश्रम । कला-काम, कौशल्य उद्यम ।
ज्याचे असेल जे जे कर्म । ते ते वाहावे समाजा ॥७५॥
कोणी द्यावा आपुला धंदा । कोणी द्यावी सर्व संपदा ।
कोणी नोकरीचा पगार सर्वदा । समर्पावा या योजनेसि ॥७६॥
त्यांत असावे चांभार-कुंभार । त्यात असावे सुतार-बेलदार ।
शिक्षक, शिंपी, लोहार, कलाकार । दाई, सेविका सर्वचि ॥७७॥
शेत्ती उत्तम कसणारे । शेतीची योजना जमविणारे ।
वैद्य, कोष्टी, विणणारे । कापड, साड्या संतरंज्या ॥७८॥
अजूनीहि जे गावी असती । त्यांची पाहिजे अधिक भरती ।
त्या सर्वांची शक्ति, युक्ति । संघटित व्हावी गाव-सेवे ॥७९॥
धन द्यावे धनवानांनी । भूमि द्यावी जमीनदारांनी ।
श्रम द्यावेत मजुरांनी । सर्वतोपरी आपुले ॥८०॥
बुध्दि द्यावी बुद्धिवंतांनी । कला द्यावी कलावंतांनी ।
सेवा करावी वैद्य, डॉक्टरांनी । आळसी कोणी नसावे ॥८१॥
सर्व लोकांनी झीज सोसावी । गावसोयीसाठी जागाहि द्यावी ।
गरिबांची घरे दुरुस्त करावी । गाव-खर्चाने ॥८२॥
देवळांच्या जमिनी, पडीत खंडारे । वाटोनि द्यावे गरिबां सारे ।
व्यवस्था ठेवावी उत्तम प्रकारे । सर्वांच्याच जीवनाची ॥८३॥
सर्वांनी समयदान करावे । घरे, रस्तेहि सजवोनि द्यावे ।
गाव नंदनवन बनवावे । सामुदायिक कष्टांनी ॥८४॥
कोणी नसावा गावी उपाशी । उद्योग द्यावे सकळ जनांसि ।
भीक मागण्याची प्रथा जराशी । नसावी गावी आमुच्या ॥८५॥
असो पुजारी वा पंडित । कामे करील जो उचित ।
तोचि राहील या गावात । सर्वानुमते सांगावे ॥८६॥
सर्वांनी सारखेच काम करावे । आपुलाल्या कलेने बरवे ।
कष्टाविण कुणाला पोसावे । ऐसे नाही ॥८७॥
कष्ट करोनि वृद्ध झाला । काम बदलोनि द्यावे त्याला ।
अथवा कोणी बिमार पडला । तरीच पोसावे सर्वांनी ॥८८॥
असो साधु, भक्त, विद्वान । त्यांनीही न खावे कष्टाविण ।
उलट आदर्श दावावा झटून । सर्व लोकांसि ॥८९॥



मुखे भजावे गोविंदा । हाते करावा कामधंदा ।
प्रेम ठेवावे सदासर्वदा । सर्वेश्वराठायी ॥९०॥
आपुलाले काम करावे । सर्व लोकांनी इमानदार व्हावे ।
घेणे-देणे सर्वचि करावे । प्रांजळ बुद्धि धरोनि ॥९१॥
जैसा गोरा कुंभार मडकी करी । नित्य उच्चारी- हरि हरि' ।
परि मडकियात बैमानी धरी । ऐसे कल्पांती घडेना ॥९२॥
जनाबाई संत झाली । परी गोवऱ्या वेचणे नाही भुलली ।
तैसीच चोखोबाने भक्ति केली । ढोरे ओढता ग्रामाची ॥९३॥
खरा नाथ भक्तिवान । देई मागासल्यांना ज्ञान ।
खाऊ घाली पितरांचे अन्न । कष्टकर्त्या दीन जना ॥९४॥
एका पैचा न चुको हिशेब । म्हणोनि जागे नसोनि लोभ ।
संतोषला पद्मनाभ । पाणी पाजता गाढवासि ॥९५॥
हीच त्यांची खरी भक्ति । स्वये बोलला जगत्पति ।
नाचे सांवत्याच्या मळ्याप्रति । नेटके काम बघोनि ॥९६॥
ऐसे घडले पाहिजे साचे । काम करोनि ग्रामाचे ।
त्यात ठेवावे भक्ति-रसाचे । हृदय आपुले ॥९७॥
जे जे गावी भिन्न उद्योग । त्यांचा जुळवावा संयोग ।
ठराविक जागी नाना प्रयोग । चालवावे गावात ॥९८॥
आपल्या कामाचा ठरला वेळ । सर्वांनी झटावे लावोनि बळ ।
चिंता करू नये वेडगळ । भलतियाची ॥९९॥
जो जो असे आपुला धंदा । तल्लीन राहावे कामातचि सदा ।
ठरल्या वेळी व्यवसाय बंधा । सोडूनि द्यावे सर्वांनी ॥१००॥
नियमित वेळी काम करावे । नियमितपणे खेळ खेळावे ।
नियमित समयी प्रार्थने जावे । सर्व मिळोनि ॥१०१॥
एरव्ही सामुदायिक जीवन । हेचि प्रार्थना असे महान ।
गावासाठी कष्टावे पूर्ण । सेवाभावाने ॥१०२॥
काय नाही आपल्या गावी । याची चौकशी असावी ।
नसेल ती साजवावी । पुष्पवाटिका ग्रामासि ॥१०३॥
गाव-जीवनासि जे आवश्यक । त्याची मागावी न लगे भीक ।
ऐसे सर्वांनी श्रमोनि करावे ठीक । जीवन सारे ॥१०४॥
कोणी गावास्तव जोडे शिवी । कोणी कपडे शिवोनि पाठवी ।
कोणी लोखंडी कामेहि बरवी । पाठवी वस्तु - भांडारी ॥१०५॥
कोणी कपडा विणूनि आणावा । कोणी नवारी, दोर द्यावा ।
लाकडी कामे करोनि बरवा । आणतो कोणी ॥१०६॥

कोणी महिनोगणती शेती करी । हंगाम होता आणी दरबारी ।
प्रत्येक ऋतूची तुरी - बाजरी । तांदुळ आदि सामुग्री ॥१०७॥
धान्य उपजवावे सर्वतोपरी । जे जे लागे गावी, घरी ।
दुसरीकडोनि न घ्यावी माधुकरी । हेचि उत्तम ॥१०८॥
जे जे आपुल्या गावी होते । आपणचि वापरावे सामान ते ।
उरलेले विकावे भोवते । भिन्न गावी ॥१०९॥
सर्व गावाचे एक दुकान । सर्वांच्या सहकार्याचे प्रदर्शन ।
फायदा झालियाचे धन । सर्वांच्याचि मालकीचे ॥११०॥
सर्वचि धन हे सर्वांचे । हे उद्योगहि सकळिकांचे ।
हे भुवन प्रत्येकाचे । ग्रामचि आहे ॥१११॥
म्हणोनि सर्व एकत्र करावे । ज्याचे काम त्याला द्यावे ।
उणे असता अधिक मागावे । जास्त द्यावे खजिन्यामाजी ॥११२॥
अहो ! पैशांचे तोंड काळे । सर्व आपुल्याच गावी मिळे ।
न मिळता प्रयत्नबळे । तैसे करू ग्राम आमुचे ॥११३॥
आमुच्या गावींचे सर्व धन । ग्रामवासियांचे सुख-स्थान ।
आम्ही सर्वचि मिळोनि । करू स्वर्ग गावासि ॥११४॥
याहीवरि उणे पडे । तरि मागू देश-पित्याकडे ।
पूर्ण कराया पोवाडे । गावाचे आमुच्या ॥११५॥
ग्रामी जरि अधिक उरे । तरि देऊ परगावी संतोषभरे ।
यात तिळभरि अंतर न शिरे । कल्पांतीहि ॥११६॥
आधी ग्राम असावे सुखी । कोणी न व्हावे कोणाशी पारखी ।
सर्व कामे गावीच निकी । करू आम्ही ॥११७॥
याच दृष्टीला धरोनि नामी । व्याप्ति करू विश्वाची आम्ही ।
लावावया मानवता कामी । सकळिकांची ॥११८॥
ज्या ज्या मार्गे ऐसे घडे । तोचि धर्म, तेचि ज्ञान रोकडे ।
तुकडया म्हणे, समाधान जोडे । सकळ जनांसि ॥११९॥
इतिश्री ग्रामगीता ग्रंथ । गुरु-शास्त्र-स्वानुभव-संमत ।
सामुदायिक जीवन कथित । अडतिसावा अध्याय संपूर्ण ॥१२०॥

॥ सद्‌गुरुनाथ महाराज की जय ॥


## ॥ दोहा ॥

एकतत्व एकाकार सर्व देशी । एकत्व नेमेसि सकल जनी ॥
अवघे संतजन आमुचे सांगाती । जेवू एकापांति सरिसे आम्ही ॥

**- श्रीसंत नामदेव महाराज**



# ॥ चित्र परिचय ॥



## अ. ३९ - पूज्य महात्मा गांधी

ग्रामराज्यचि रामराज्य । स्वावलंबन हेचि स्वराज्य ।
बोलिले महात्मा विश्वपूज्य । विकास त्यांचा सुंदर हा ॥१२५॥

बॅरिस्टर होऊन देशविदेशांतील लोकदुःख निवारण्यासाठी आमरण झटलेले, दलितांचे कैवारी, स्वातंत्र्याचे जनक, सत्याग्रहाचे प्रणेते विश्वधर्मी युगपुरुष ! १८९६ मध्येच चंपारण्यात ग्रामकुटुंबाचा पाया घातला, ग्रामराज्य हे रामराज्य झाले तरच स्वराज्याचे सुराज्य होईल, हे जाणून आदर्श ग्रामनिर्मितीचा पुरस्कार त्यांनी प्रथम केला. या अध्यायातील भूमिका त्याहून पुढची.

● अध्याय एकोणचाळीसावा ●

# भू–वैकुंठ

॥ श्रीगुरुदेवाय नमः ॥

सर्व जनांचे समाधान । याहूनि स्वर्ग नाही महान ।
नांदती द्वेष–मत्सराविण । बंधुभावे सर्व जेथे ॥१॥
गरीब–श्रीमंत कोणी नाही । नाही दारिद्र्य, रोगराई ।
उंच–नीच कामे सर्वहि । करिती लोक प्रेमभरे ॥२॥
पक्ष नाही, पंथ नाही । जातिभेद, विरोध काही ।
एका कुटुंबापरी राही । गाव आपुले आनंदे ॥३॥
ऐसे व्हावे कोठे तरी । त्यासीच आम्ही म्हणतो वैकुंठपुरी ।
जेथे नाही भावनाच दुसरी । परकेपणाची ॥४॥
ग्रंथी स्वर्ग–वैकुंठ–वर्णन । वाचता तल्लीन होते मन ।
त्यात वर्णिले हेचि गुण । ते कां आपण न घ्यावे? ॥५॥
सत्ययुगाची ऐकावी कथा । परि आपुली न सोडावी प्रथा ।
याने समाजाच्या व्यथा । चुकतील कैशा? ॥६॥
वैकुंठीचा प्रेमानंद । सत्ययुगाचा समतावाद ।
आपुल्या गावी करावा सिद्ध । हेचि कर्तव्य सर्वांचे ॥७॥
देवाने जगी अवतार घ्यावा । ऐसे कां वाटते जीवा? ।
त्रास, अन्याय, अनाचार नसावा । कोठेहि लोकी ॥८॥
जरि हे आपणासि आवडे । तरि आपणचि व्हावे कराया पुढे ।
न करिताचि देवा–नावे ओरडे । ते सर्व वाया ॥९॥
सर्वचि भगवंताचे सखे । देवाचिया न्यायाने सारिखे ।
मग व्यवहारीच पारखे । कां ठेवावे? ॥१०॥
देवांचा न्याय जगी आणावा । तरीच मिटे दुःख–गवगवा ।
यासि टाळील, तो जाणावा । भक्त कैसा? ॥११॥
जे एकास, तेचि सकळांस । हेचि सत्य जीवनाचे रहस्य ।
सर्वांच्या सुख–दुःखी समरस । भावना राहती सकळांच्या ॥१२॥



उणा – अधिक गुणांपाशी । नको जाति वा धनापाशी ।
अधिकार समानचि सर्वांसि । जीवनाचा ॥१३॥
सर्वांनी करावे शक्तिभर काम । अधिकारपरत्वे उपक्रम ।
सर्वांसि मिळावे सौख्य सम । गरजांप्रमाणे जरूर त्या ॥१४॥
ऐसीच सर्वांची योजना करावी । पूर्ण वर्ष चिंताचि नसावी ।
अन्न, वस्त्र, धंद्यांची बरवी । योजना व्हावी सर्वांमिळोनि ॥१५॥
वर्षाचे बजेट ठरवावे । माणसी लागेल ते योजावे ।
अन्न, वस्त्र, अलंकार बरवे । सर्वांलागी घरदार ॥१६॥
वेगळा नफा, वेगळी संपत्ती । वेगळे वैभव, वेगळी महती ।
वेगळे चोचले कोणाप्रति । उरोचि न द्यावे ॥१७॥
एकचि वस्त्र, एकचि अलंकार । एकचि आदर, एकचि शृंगार ।
एकचि भोजन, एकचि अधिकार । आपुलाल्या कामाचा ॥१८॥
सर्वांना सारखाच सणवार । सर्वांचे एकचि मेजवानी–प्रकार ।
एरव्ही न मिळो खानपान इतर । भिन्न कोणा ॥१९॥
सणावारी कोणी वारला । तरि गोडधड नसावे गावाला ।
तो दिवस सोडोनि पाहिजे नेमला । दुजा सर्वांनी ॥२०॥
सर्वांची उठण्याची एक वेळा । घरकाम करण्या हुरूप आगळा ।
सफाई, ध्यान, प्रार्थना सगळा । कार्यक्रम सामुदायिक ॥२१॥
सर्वांस ठेवावे सारखे । राहणी, खाणे, कपडे नेटके ।
सर्वांच्या मुलांस शिक्षण निके । योग्यता–भेद बघोनि ॥२२॥
शिक्षणाची एकचि शाळा । राहणीचा एकचि सोहळा ।
प्रेमाचा सर्वभावे लळा । जेथे तेथे सर्वांशी ॥२३॥
समान व्यवस्था आरोग्याची । सारखीच उन्नति स्त्री–पुरुषांची ।
एकाची, ती सर्वचि गावाची । जबाबदारी ॥२४॥
जैसे कोणी येती पाहुणे । ते त्या आदर्श गावाचेचि म्हणे ।
वाटू न द्यावेत आपुलाले कोणे । ऐसेहि होते ॥२५॥
परि त्यासि आहे मर्यादा । तेवढाचि नसावा धंदा ।
पाहुण्यांची वेळ, सीमा सर्वदा । निश्चितचि असावी ॥२६॥
एरव्ही करावा पत्रव्यवहार । जेव्हा नसेल काम जरूर ।
दिवस घालवू नयेत भराभर । पाहुणेबाजीतचि ॥२७॥

तैसेचि लग्नादि उत्सव । त्यासि झटावे गावाने सर्व ।
परंतु नेहमीच धावाधाव । न व्हावी तीहि ॥२८॥
गावच्या मुला–मुलींचे लग्न । 'सामुदायिक पद्धतचि प्रमाण' ।
तेथे तिथि–मुहूर्ताचे कारण । काहीच नाही ॥२९॥
असोत लग्ने दहा–पन्नास । गावची शंभरहि त्या वर्षास ।
एकाच वेळी सावकाश । उरकवावी एके जागी ॥३०॥
गावी असावे विवाह–स्थान । भांडीकुंडी, बिछायत पूर्ण ।
सर्वांसाठी ठेवावी जमवोन । गावातर्फे ॥३१॥
पवित्र, विशाल, सुंदर स्थान । जेथे प्रसन्न राही मन ।
सर्व वरांनी एकचि ठिकाण । पसंत करावे लग्नासि ॥३२॥
प्रसन्न वेळ आणि सज्जन । तोचि मुहूर्त सुखसंपन्न ।
प्रसन्न हवा, पाणी पाहोन । कार्य करावे सर्वांनी ॥३३॥
गावाचे सर्व जमोनि मित्र । सहकार्य करावे सर्वत्र ।
बसवोनि वधु–वरांना एकत्र । अर्पावे लग्नकार्य ॥३४॥
लग्नादिकासाठी कोणा । उडवू न द्यावे गावच्या धना ।
कराव्या ग्रामोद्धार–योजना । सर्वांमिळोनि ॥३५॥
सर्वांनी आपले सर्वस्व द्यावे । आदर्श गावाचे बनोनि राहावे ।
कोणीहि वेगळे न व्हावे । ऐसी घ्यावी दक्षता ॥३६॥
जरी सर्वांनी संसारी असावे । तरि संततिनियमन सांभाळावे ।
तीन पुत्रांवरि पुत्र व्हावे । ऐसे इच्छू नये कोणी ॥३७॥
पुत्र तान्हेपणी वाढला । दुसऱ्या दुधावरि लागला ।
की आईपासोनि सोडला । पाहिजेचि तो ॥३८॥
गावाने करावे शिशुसंगोपन । म्हाताऱ्या, प्रेमळ बायांकडोन ।
जयाचेनि काम भिन्न । होत नाही कष्टाचे ॥३९॥
संपत्ति आणि संतति । सगळी गावाची ठेव निश्चिती ।
वाढवोनि साधावी उन्नति । योग्य मार्गे गावाची ॥४०॥
आपुल्या गावाचे सुखदुःख । सकळांसीच कळावे निःशंक ।
येता परस्परांची हाक । धावोनि जावे जिव्हाळ्याने ॥४१॥
ज्याची कोणास जरूर पडे । त्यास त्याने बोलवावे निर्भिडे ।
कोणीहि घेऊ नयेत आढेवेढे । आपुले अडथळे सांगोनि ॥४२॥



कामाचे महत्त्व पाहोनि । हाकेस त्वरित जावे धावोनि ।
तोहि येईल तैसाचि समजोनि । कामास माझ्या ॥४३॥
जैसे आपण कोणाचे करावे । तैसेचि आपुल्या वाट्यास यावे ।
ऐसेचि आहे स्वरूप बरवे । सहकार्याचे मानवांच्या ॥४४॥
म्हणोनि संकटी धावोनि जावे । सर्वांनी कष्ट वाटूनि घ्यावे ।
जेणे करूनि सर्वांस वाटावे । कुटुंब माझे विश्वव्यापी ॥४५॥
जीव जगी जन्मासि आला । ऐसेचि सहकार्य द्यावयाला ।
अज्ञानी प्राणी सेवेसि मुकला । त्यास करावे सावधान ॥४६॥
कोणास नाही उद्योगधंदा । कोण लागला भलतिया छंदा ।
पाहावी निरीक्षोनि आपदा । दूर कराया गावाची ॥४७॥
कोण कोणाशी वितंडतो । कोण कोणाला छळीत बसतो ।
कोण स्वार्थासाठी दंडतो । पाहणे काम आमुचे ॥४८॥
व्यसनाधीन कोण राहे? । कोण जुगारी बसलाहे? ।
चिंतातुर कोण, कां आहे । पाहणे काम आमुचे ॥४९॥
कोणी स्त्रियांना जाच करिती । कोणी आई–बापा कष्ट देती ।
कोणी मुलीच न पाठविती । कोणी नेती पळवोनि ॥५०॥
हे सर्व दोष सारावया । जबाबदार आम्हीच तया ।
गावचे रहिवासी म्हणोनिया । काळजी असो आम्हासि ॥५१॥
आमुचे करणे आमुचे नव्हे । त्या जामीन सर्व गाव आहे ।
हे समजोनि करावे होय–नोहे । सर्व काही सर्वांनी ॥५२॥
आम्ही गावी दारू प्यालो । म्हणजे 'दारूडे लोक' झालो ।
तेणे 'दारूबाज गाव' नाव चालो । ऐसे होते ॥५३॥
मग सांगा सर्व दारूबाज । होता, कैसे चालेल राज्य? ।
म्हणोनि व्यसनादिकांचे बीज । येऊ न द्यावे शिवेआत ॥५४॥
कोणी गावी तमाशा करी । मनोरंजनाचा प्रचार विषारी ।
तेणे मुले नाचती दारोदारी । नाचे जैसे ॥५५॥
नृत्यकलेच्या नावाखाली । विषयांध भावना पसरली ।
ऐसी नको सुधारणा–भली । आमुच्या गावी ॥५६॥
ही कला नव्हे, विडंबन । पैसे लुटायाचे स्थान ।
ऐसे नाटक, पथक, गायन । असो न द्यावे ॥५७॥

असेल ज्यात जनहित । त्यासीच राहावे सहमत ।
वाढू न द्यावा वाईट पंथ । कोणताहि गावी ॥५८॥
उत्तम कार्यासि जे निघाले । रामधून, भजन, कलापथक चाले ।
व्यायाम, खेळ, मनोरंजन भले । सर्व काही ॥५९॥
कोठेचि नाही कुटिलता । तमाशे-दंडारींची हीनता ।
विचारल्याविण पुढारी येता । भय वाटावे तयासि ॥६०॥
परका कार्यक्रमासि घुसे । विचारल्याविण मुख्यासि सहसे ।
कधीहि घडणार नाही ऐसे । गावी आमुच्या ॥६१॥
गावाच्या बुद्धीची उच्च पातळी । लोकां कळावी तत्त्वे सगळी ।
भाषणे चालावी वेळोवेळी । ग्रामोन्नतीची यासाठी ॥६२॥
आपण कोणी भिन्न आहो । ऐसी स्वप्नीहि भावना न येवो ।
यासाठी ज्ञानपाठ जागता राहो । गावी आमुच्या ॥६३॥
आमुच्या गावी प्रार्थना-मंदिर । जेथे सर्व धर्मांचा आदर ।
विश्वातील जे असतील थोर । ते आम्हांसि देवतुल्य ॥६४॥
त्याच मंदिरी थोरांची जयंति । उत्सव आणि संत-पुण्यतिथी ।
जागती राहे सामुदायिक वृत्ति । बौद्धिक-बळे ॥६५॥
साधु – देवतांची जयंति । पुण्यतिथी आदि उत्सव किती ।
इच्छा असेल ती सत्कृति । करावी गावी ॥६६॥
पण सर्वांचे असावे मन पवित्र । गावाने होऊनि एकत्र ।
सामुदायिकचि सर्वत्र । उत्सव करावे ॥६७॥
गावाचा उत्सव तो सर्वांचा । त्यात हर्ष अति आदर्शाचा ।
तेथे आपापल्या मनाचा । तोल नसावा विपरीत ॥६८॥
नाहीतरि वाढे सांप्रदायिकता । जातीयता, व्यक्तिनिष्ठता ।
तेणे गावाचे तुकडे होता । वेळ न लागे ॥६९॥
म्हणोनि भेदचि नको काही । सर्वांमनी उत्साह राही ।
एक कुटुंब ऐसे सर्वहि । ग्राम आमुचे प्रेमळ ॥७०॥
आपुले प्रेमचि अमोल संपत । आपुले श्रमचि महान दौलत ।
आपुले सहकार्यचि खरी इज्जत । समजावोनि द्यावे सर्वांसि ॥७१॥
गावी तेचि सर्वांनी करावे । कीर्ति-स्फूर्तिने गाव भरावे ।
घराघरांत शांति, सुख पावे । जनता जेणे ॥७२॥



कोणी एक मागे पडला । त्यास दुसऱ्याने सांभाळिला ।
ऐसे करिताच गाव झाला । सर्वगुणी संपन्न तो ॥७३॥
गावात नाही झगडा, तंटा । कोणी नाही बोलणार उफराटा ।
सरळ, सालस स्वभाव चोखटा । प्राणियांचा दिसावा ॥७४॥
जरी मत भिन्न झाले । तरी पाहिजे गावातचि मिटविले ।
आपुल्या गावाविण नाही उरले । कोर्ट-कचेरी काम कोठे ॥७५॥
गावचा झगडा गावीच मिटे । निवडणुकीचे काम नव्हे खोटे ।
लंद-फंद गावात नाही कोठे । ऐसे ग्राम सुंदर हे ॥७६॥
ऐसे सांगाया वाटावा अभिमान । तेचि खरे गावाचे भूषण ।
गावातील सर्व लोक सज्जन । परस्परांवरि अति मोह ॥७७॥
यात कोणी उनाड दिसला । त्यासि उपदेश द्यावा चांगला ।
एवढे करोनि नाही वागला । तरि तो झाला बहिरंग ॥७८॥
ज्याने गावात धिंगाणा घातला । तो गाव घातकीच ठरला ।
त्यास पाहिजे सरळ केला । शांति-प्रयत्न करोनि ॥७९॥
मग सर्वांनी मिळोनि ठरवावे । याचे पुढे काय करावे? ।
निरुपाय होता पाठवावे । निर्णय करोनि परगावी ॥८०॥
मग त्यास न मिळे सामान । अथवा त्याचे असलेले धन ।
त्याने पळावे जीव घेवोन । आपुला कोठे ॥८१॥
ऐसे बळकटपण जंव नाही । तव आदर्श गाव तमाशाच राही ।
त्यात स्थिरताच येणार नाही । काही केल्या ॥८२॥
यावरि श्रोता प्रश्न करी । गावात अडचणी नानापरी ।
सर्व लोक जमोनि कोठवरि । सोडवतील सर्वचि त्या? ॥८३॥
सर्वचि पाहती कारभार । तरि केव्हा करावे काम इतर? ।
याने ग्रामजीवन स्थिर । होईल कैसे सांगाना? ॥८४॥
ऐका याचे समाधान । करावी एक समिती निर्माण ।
सर्वांनी आपुले प्रतिनिधी म्हणून । नेमावे काही कारभारी ॥८५॥
ज्यांनी आपुले सर्वस्व द्यावे । तेचि समितीचे घटक बरवे ।
तन, मन, धन समर्पावे । ग्रामासाठी जयांनी ॥८६॥
त्या सर्वांना सभासद करावे । त्यांतून पाचजण निवडावे ।
सर्वांनी प्रांजळ मने पाहावे । इमानदार, न्यायनिष्ठ ॥८७॥
सर्वांचे मालधन एक करावे । सभासदांचे मोजमाप घ्यावे ।
मग सर्वांचेचि जीवन बनवावे । एकसारिखे ॥८८॥

सर्वांना भरपूर कामे द्यावी । उत्पन्नाची व्यवस्था लावावी ।
सर्व व्यवहार–उपाधि पाहावी । त्याच पंचांनी ॥८९॥
सर्वांनी आपापले काम करावे । विकणे, घेणे पंचांनी पाहावे ।
आणि उद्योगासि सामान पुरवावे । पंचांनीच ॥९०॥
गावाकरिता मार्ग जोडावा । गावाकरिता व्यापार पुढे न्यावा ।
हरतऱ्हेचा संबंध आणावा । सुखी कराया गाव हे ॥९१॥
गावातून जे द्रव्य जावे । माल, मनुष्यबळ, सामान बरवे ।
ते प्रथम पूर्ण निरक्षोनि घ्यावे । गावासाठी पंचांनी ॥९२॥
सर्वचि योजना पंचांवरती । कोणाचेचि नाही इतरांहाती ।
इतर निश्चित राहती । करावया प्रगति अधिकाअधिक ॥९३॥
एकदा येथे अनन्य झाले । ते व्यापार चिंतेपासूनि सुटले ।
नि:स्पृह भगवत्प्रेमी झाले । काम आपुले करोनि ॥९४॥
पंच म्हणजे परमेश्वरदूत । सर्वांची चिंता करी निश्चित ।
याविषयी कोणाचे दुमत । असूचि नये ॥९५॥
तयांनी सर्व काळजी घ्यावी । गावची जनता सुखी ठेवावी ।
निर्णय देताचि ऐकावी । हाक जनतेने पंचांची ॥९६॥
ग्रामी जनता असेल मोठी । परि ती पंचांपुढे धाकुटी ।
सदा तत्पर सेवेसाठी । प्राण–पणा लावोनि ॥९७॥
पंच बोलले ते वेदप्रमाण । हीच गावधर्माची खूण ।
यातचि ग्रामाचे आदर्शपण । आमुच्या मते ॥९८॥
आमुचे गाव एक कुटुंब । पंच तयाचा मूळ स्तंभ ।
सर्वांवरि न्यायाचा दाब । हाचि कळस विकासाचा ॥९९॥
नसता कोणाचेहि शासन । न्यायाने वागती सत्ययुगी जन ।
त्याचेचि रूपांतर पंचायतन । लोकशाही, लोकतंत्र ॥१००॥
या योजनेचे एकचि मरण । तेहि देतो लक्षात आणोन ।
पंच म्हणोनि निवडाल गौण । तरि ये धोका जीवनासि ॥१०१॥
सेवाहीनांची पंचायत । ती गावास करील पंचाईत ।
लोकशाही म्हणजे लोकांचे मनोगत । सिंहासनी चढावे ॥१०२॥
लोकशाही म्हणजे लोकांचे हित । लोकांकडूनि व्हावे हातोहात ।
सर्व मालक म्हणोनि सत्य । जबाबदारी ओळखावी ॥१०३॥
तीच म्हणावी लोकशाही । जेथे कोणी कामचुकार नाही ।
सेवातत्पर सर्व उत्साही । न्यायी जन ॥१०४॥




लोकशाहीत जो सत्ताधारी । तो मालक नव्हेचि निर्धारी ।
लोकसेवेचा कारभारी । जबाबदारी ही त्याची ॥१०५॥
सर्व लोक कार्यतत्पर । त्याहूनि विशेष जो धुरंधर ।
तोचि ग्रामाधिकारी खरोखर । पंच वा नेता ॥१०६॥
पंच तो असे आमुच्यातील । अधिक कामकर्ता, आचारशील ।
ज्यासि संडास–सफाईचेहि नवल । नसे काही ॥१०७॥
अधिक सुरळीत काम करील । नेमाने, निष्ठेने राहील ।
तोचि अधिकारी होईल । या गुणांनी गावाचा ॥१०८॥
येथे महत्त्व सद्‌गुणांचे । धाडसाचे, स्वार्थत्यागाचे ।
तेचि पुढारी होती गावाचे । जे गावास देव मानती ॥१०९॥
ज्याने गावचि देव मानिला । सेवाकार्याचा मंत्र जपला ।
त्याचाचि असावा बोलबाला । गावामाजी आपुल्या ॥११०॥
तोचि पंच अतिसात्विक । गाव मानी जगन्नायक ।
एक सेवाचि महापूजा देख । इतर नाही त्यासि भक्ति ॥१११॥
त्याला नाही दुसरा धर्म । त्याला नाही दुसरे कर्म ।
एक सेवाचि त्याचा उपक्रम । सर्व काळ गावलोकी ॥११२॥
त्याचे सर्वस्व आमच्याकरिता । म्हणोनीच तो आमुचा पिता ।
जेथे जाति, धर्म, पंथ मता । महत्त्व नाही ॥११३॥
तोचि पंच निवडावा । श्रद्धा–विचारे ओळखावा ।
गटबाजीचा होऊ न द्यावा । तमाशा कोठे ॥११४॥
करावे सकळांच्या हिताचे । तेथे व्यक्तित्वचि नको आमुचे ।
जो करि सर्वांहूनि हित लोकांचे । तोचि नेता मानावा ॥११५॥
सज्जनांचे असावे पंचमंडळ । जे गावा चालवी सर्वकाळ ।
आपुले कुटुंबचि गाव सकळ । मानावे त्यांनी ॥११६॥
परस्परांना घेऊनि चालावे । परस्परांचे हृदय एक व्हावे ।
कोठे उणे पडता, आपणचि समजावे । उणे असो ॥११७॥
आपुल्या व्यक्ति–कुटुंबाकरिता । न व्हावी गावाची अव्यवस्था ।
ऐसी दृष्टि असावी समस्ता । कार्यकर्त्यांसि ॥११८॥
अन्याये पीडा न होवो कोणास । न व्हावा मुंगीलाहि त्रास ।
याची जाणीव असावी प्रमुखास । सर्व काळ ॥११९॥
सार्वजनिक वस्तु घरी उपभोगणे । आप्तजनांसि सवलती देणे ।
हे टाकूनि करावी चोखपणे । तत्परतेने जनसेवा ॥१२०॥

आपुला दुराग्रह दूर सारावा । बहूजनांचा मागोवा घ्यावा।
शक्य तो कारभार चालावा । एकमताने गावाचा ॥१२१॥
पाचामुखी परमेश्वर । परि नको सत्तेचा अहंकार।
नियम पाळता वाटावे सुखकर । ठरलियावरि ॥१२२॥
सर्वांनी सर्वांसाठी झटावे । सर्वांच्याहितात स्वहित पाहावे।
थोरांनी याचे धडे दाखवावे । आचरोनि निश्चयाने ॥१२३॥
यातचि आहे मोठेपण । ग्रामजीवन होई स्वयंपूर्ण।
हीच आहे खरी खूण । आदर्श ग्रामराज्याची ॥१२४॥
ग्रामराज्यचि रामराज्य । स्वावलंबन हेचि स्वराज्य।
बोलिले महात्मा विश्वपूज्य । विकास त्याचा सुंदर हा ॥१२५॥
आमचे ग्रामचि एक राज्य । सर्वांचे माहेर अविभाज्य।
ऐसे आदर्श होती जे जे । नाते आमुचे त्यांच्याशी ॥१२६॥
दुसरे गाव शत्रू नोहे । परि आमुचा संबंध कामी राहे।
सहकार्य देती पंच निश्चये । चांगुलपण वाढवाया ॥१२७॥
पंच–मंडळ निष्ठेने राही । ते ते गाव भूवैकुंठ होई।
त्याच्या प्रभावे पवित्र मही । आपोआप होतसे ॥१२८॥
ऐसे जंव गाव साधले । तव ते प्रांतातप्रमुख झाले।
ऐसे प्रांत प्रभावी ठरले । तरीच ते भूषण देशासि ॥१२९॥
देश ऐसा उन्नत होय । तोचि विश्वाचा घटक शांतिमय।
एरव्ही जो स्वार्थ पुढे घे पाय । घातक होय विश्वासि ॥१३०॥
म्हणोनि ऐका लक्ष लावून । स्वर्ग कराया जगी निर्माण।
करा कुटुंब समर्पण । सामुदायिक तत्त्वासि ॥१३१॥
घ्या वाचून, करा तातडी । मग मनन करोनि आवडी।
घाला या आदर्श योजनेत उडी । आपुले सर्वस्व देवोनि ॥१३२॥
श्रोतेहो ! ऐकिले काय या वचना? । मग वेळ कासयासि पुन्हा? ।
आजचि तन, मन, धन समर्पाना । या कार्यासि ॥१३३॥
यानेच थोरांची इच्छा सफळ । सार्थकी लागे ज्ञान, भक्ति सकळ।
मिटेल अंतर्बाह्य तळमळ । तुकड्या म्हणे सर्वांची ॥१३४॥
इतिश्री ग्रामगीता ग्रंथ । गुरु–शास्त्र–स्वानुभव–संमत।
आदर्श ग्रामराज्य कथित । एकोणचाळिसावा अध्याय संपूर्ण ॥१३५॥

॥ सद्‌गुरुनाथ महाराज की जय ॥



# ॥ चित्र परिचय ॥



## अ. ४० – स्वामी विवेकानंद

स्वामी विवेकानंदादि संती । जुन्या नव्यांची वाराया भ्रांति ।
ज्ञानदीप उजळले आपुल्या ग्रंथी । नाना भाषांमधूनि ॥४६॥

ग्रॅज्युएट होऊन व सर्व धर्मांचे सखोल अध्ययन करून श्रीगुरु रामकृष्ण परमहंसांच्या प्रेरणेने त्यांनी अमेरिकेतील विश्व धर्म परिषदेत आपल्या भाषणाने जगाला दिपविले. भ्रामक पोथ्यांना झुगारून व शुद्ध सनातन तत्त्वे नव्या शास्त्रीय दृष्टीने मांडून, त्यांनी आपल्या भाषणांनी, ग्रंथांनी व आदर्शाने सनातन्यांना कार्यप्रवण, नवशिक्षितांना विचार प्रवृत्त केले.

● अध्याय चाळिसावा ●

# ग्रंथाध्ययन

॥ श्रीगुरुदेवाय नमः ॥

श्रोता आनंदे करी प्रश्न । आपण सांगितले आदर्श जीवन ।
परंतु कथा, कहाण्या, आत्मज्ञान । इतर ग्रंथी ॥१॥
गावोगावी ग्रंथ लाविती । त्याहूनि आपुली वेगळीच पोथी ।
आमुच्या उद्धारासाठी कोणती? । निवडावी सांगा ॥२॥
गाव व्हावया वैकुंठपूर । काय कामी न येती ग्रंथ इतर? ।
कोणत्या उपाये होतील संस्कार । दृढ गावाचे? ॥३॥
याचे उत्तर ऐका आता । वेगळी नोहे ग्रामगीता ।
येथे नाही अन्य सद्ग्रंथा । विरोध काही ॥४॥
सर्व उपनिषदादि गायी । दोहूनि केली गीतामाई ।
तैसेचि संत-ग्रंथ सर्वहि । साररूपे या ग्रंथी ॥५॥
सर्वांभूती भगवद्भाव । हा संतश्रेष्ठांचा अनुभव ।
त्या तत्त्वाचीच उठाठेव । या ग्रामगीतेमाजी ॥६॥
गीतेचे विश्वरूपदर्शन । वेदाचे विराट पुरुष-वर्णन ।
संतांच्या विश्वात्मक देवाची खूण । लाभे येथे सक्रिय ॥७॥
अनेक ग्रंथांतील वर्णने । अनेक तीर्थांतील दर्शने ।
अनेक कथा, कीर्तनांतील उदाहरणे । तीहि याचसाठी ॥८॥
लोक भुलले सहकार्य देणे । झाले स्वार्थांध विकृत जिणे ।
आपुल्यासाठी फजीत करणे । लोकांसहि सुरू झाले ॥९॥
हे कोण्या रीती निघोनि जाय । याचाच शोध आणि उपाय ।
करावया, महापुरुषांनी सोय । अनुभव घेवोनि लाविली ॥१०॥
वाट चालता त्यांच्या पाउली । बोल बोलता त्यांच्या बोली ।
जीवन-सफलता होय आपुली । सर्वतोपरी निश्चये ॥११॥
यासाठी ग्रंथ-पोथी वाचावी । जनता सगळी जागृत करावी ।
गावे संस्कारांनी भरावी । सहकार्याच्या या मार्गे ॥१२॥



मानवतेची जागवाया शिकवण । गावी असावे कथा, कीर्तन ।
पोथी-पुराणांचे वाचन । हेचि शिकविण्या गावासि ॥१३॥
नाना दृष्टांत, कथा अनंत । सांगोनि मानवा करणे उन्नत ।
याचसाठी ग्रामगीतेचेहि गीत । गायिले आम्ही ॥१४॥
नको उगीच अवडंबर । आपुले जीवन करावे सुंदर ।
गावी फुलवावे सुखाचे अंकुर । हेचि कर्तव्य मानवाचे ॥१५॥
मनुष्य निरोगी, सात्विक बनावा । त्यास व्यसनांचा उपद्रव नसावा ।
त्याचा व्यवहार त्रासदायी न व्हावा । कोणासहि ॥१६॥
हेचि शिकणे असते पोथीतूनि । भजनांतूनी, कीर्तनांतूनि ।
याचसाठी ही साधने योजूनि । ठेविली संती ॥१७॥
साधनात साधन समाज-रचना । मुख्य दृष्टि राष्ट्रीय जाणा ।
साधुनि मानवतेच्या अनुसंधाना । जन लावावे सुमार्गी ॥१८॥
त्यासाठी तात्त्विकता दावावी । वरकड उपांगे समजावोनि द्यावी ।
आवश्यक ती साधने लावावी । आपुल्या गावी ग्रंथादि ॥१९॥
ग्रंथ ओविबद्धचि असावे । हेहि म्हणणे सोडोनि द्यावे ।
सहज कळेल तेचि उत्तम समजावे । गद्य – पद्य ॥२०॥
काही ग्रंथ ऐतिहासिक । काही चरित्रे, काही तात्त्विक ।
काही अभंग, पुराणे सम्यक । पठणी ठेवावी ॥२१॥
उगीच भरले चमत्कार । पूजापातीचा डोंगर ।
जीवनाचे काहीच सार । नसेल ते काय कामी ? ॥२२॥
प्रसादासाठी पोथी लाविली । चमत्कार ऐकता वेळ गेली ।
आपुली बुद्धि गहाण पडली । ऐसे न व्हावे यापुढे ॥२३॥
रूपकात्मक पूर्वीचे ग्रंथ । जनसाधारण भुलले तेथ ।
काढू लागले उलटा अर्थ । विश्वास सहसा बसेना ॥२४॥
पदोपदी ऐसे उदाहरण । ग्रंथ वाचूनि बिघडे मन ।
अर्थ न लागता वेडावून । जाती जन भाविकहि ॥२५॥
मी 'हरिविजय' ग्रंथ ऐकला । कथिले, नारद नारदी झाला ।
साठ पुत्र देवोनि गेला । एके रात्री ॥२६॥
ग्रंथ ऐकिला 'पांडवप्रताप' । थोरथोरांचे, कथिले पाप ।
व्यभिचाराचे लागले माप । आपोआप जेथे तेथे ॥२७॥

कुणाचा जन्म कानातून । कोणी जन्मला तोंडातून ।
कोणी झाले घागरीमधून । ऐसेहि ग्रंथी ऐकियले ॥२८॥
शिंपीतून कोणी जन्मास आला । कोणी जटेतूनचि जन्मला ।
कोणी लघवी करिता उद्धरोनि गेला । शिवलिंगावरि ॥२९॥
कोणी प्रसाद टाकोनि जात । म्हणोनि नाव बुडे पाण्यात ।
प्रसाद घेताचि वरि येत । जैसीच्या तैसी ॥३०॥
कोणी पृथ्वी घेवोनि पळाला । सागराइतुकी लघवी कुणाला कुणाच्या ।
नाकी गर्दभ चरला । झोपी जाता ॥३१॥
ऐसे ग्रंथी चमत्कार । कान धरोनि सांगा अपार ।
परि मन न माने क्षणभर । काय करावे त्यालागी ? ॥३२॥
हे जरि ऐसेचि ठेविले । तरि अर्थ सांगणारे पाहिजेत भले ।
त्यांनी तर स्वर्गासहि नाचविले । दोन बोटांवरि ॥३३॥
म्हणती जन हो ! ऐसेचि आहे । येथे संशय धरूचि नये ।
नाहीतरि पाप निरय । भोगणे पडे सर्वांसि ॥३४॥
मानव करावया आदर्श । हाचि काढिला परामर्श ।
सर्व चमत्कारांचा सारांश । ग्रंथराज ठरविला ॥३५॥
जो ऐकेल भावना धरोनि । तयास स्वर्ग, मुक्ति लाभे क्षणी ।
ऐसे सांगोनि स्त्री-पुरुष-जनी । समाज केला पांगळा ॥३६॥
विचारे संशयासी जागा वाढली । समाधान-वृत्ति भंगली ।
नाही कोणी समजावोनि दिली । रोचक, रूपक वाणी ती ॥३७॥
पुराणिक म्हणती-''उगेचि ऐकावे । 'होय' म्हणूनि नम्र व्हावे ।
तरीच जीवा उद्धार पावे । संशयात्मे विनाशती'' ॥३८॥
हे साधु, संतांनी जाणले । म्हणोनि विवेकग्रंथ निर्माण केले ।
त्यात हे संशयचि फेडले । बहुजन समाजाचे ॥३९॥
भाविक जनांसि लावावया वळण । आकळावया सकळ ज्ञान ।
संत-महंतांनी उपकार-ऋण । केले असे आम्हावरि ॥४०॥
संस्कृतातूनि काढूनि सार । सुलभ केले प्राकृत ग्रंथ-भांडार ।
जनसाधारणासीहि कळावे सविस्तर । उध्दार मार्ग म्हणोनिया ॥४१॥
पुरातन संस्कृत ऋषि-बोली । त्यातूनि बहुविध भाषा जन्मली ।
तैसीच मराठीहि वाढविली । संत-कविराजे ॥४२॥



संत ज्ञानदेव, मुकुंदराज । चक्रधर, नाथादि हंसराज ।
यांनीच सुलभ केले सहज । ज्ञान प्राकृत ग्रंथांतरी ॥४३॥
समर्थ रामदासादि झाले । मुक्तेश्वर, मोरोपंतादि भले ।
गीत, अभंग गाथे लिहिले । महाराष्ट्र-ग्रंथकर्त्यांनी ॥४४॥
महाराष्ट्री संत-कवि-परंपरा । तैसाचि चरित्रग्रंथांचा पसारा ।
वळणी लावावया समाज सारा । ग्रंथ लिहिले बहुतांनी ॥४५॥
स्वामी विवेकानंदादि संती । जुन्या-नव्यांची वाराया भ्रांति ।
ज्ञानदीप उजळले आपुल्या ग्रंथी । नाना भाषांमधूनि ॥४६॥
त्या सर्वांतूनि शोधूनि घ्यावे । जे तात्त्विक बोध-ग्रंथ स्वभावे ।
कर्मठतेच्या भरी न भरावे । अथवा शुष्क पांडित्याच्या ॥४७॥
आपली पात्रता ओळखोन । समाजाची पातळी लक्षून ।
आदर्शाचे सुलभ होय ज्ञान । ऐसेचि ग्रंथ वाचावे ॥४८॥
ग्रंथ वाचताहि तारतम्य ठेवावे । कोणत्या ग्रंथातून काय घ्यावे ।
काय सोडावे, काय आचरावे । उन्नतीसाठी आपुल्या ॥४९॥
बोलके ज्ञान सांगण्यासाठी । ग्रंथ वाचले उठाउठी ।
तेणे आत्मघात होतो शेवटी । शांति तिळभरी लाभेना ॥५०॥
सखोल अध्यात्माचे ग्रंथ । त्यासाठी बुद्धिहि पाहिजे समर्थ ।
आणि उमगला पाहिजे कर्तव्यपथ । अर्जुनापरी ॥५१॥
एरव्ही हजारो ग्रंथ वाचले । त्यांतील मर्मचि नाही कळले ।
तरि ते वाचणे वाउगेचि गेले । वेड्यापरी ॥५२॥
वेडा बोलूनि फार गेला । परि त्याचा अर्थचि नाही उमगला ।
म्हणोनीच तो वेडा ठरला । लोकांमाजी ॥५३॥
बोलेल जे काही वाचेने । तारतम्य ठेवोनि विवेकाने ।
वर्तेल तैसाचि जीवेप्राणे । त्यासचि म्हणती मानव ॥५४॥
जो फार बोलूनि जातो । परि एकावरि न निश्चित राहतो ।
त्यासचि वेडा आम्ही म्हणतो । आपुल्या विचारे ॥५५॥
लोकी हाचि घुसला वेडेपणा । त्याने धर्माचा केला धिंगाणा ।
माणूस दिसला भाविक, शहाणा । तरी तो पाहता वेडाचि ॥५६॥
मज भेटला ऐसा एक सज्जन । म्हणे-''ऐकाल काय माझे कथन? ।
मी केले ग्रंथवाचन । बारा वर्षे ज्ञानात्मक ॥५७॥

ब्रह्मसूत्रे, उपनिषदे, पुराण । वाचले भागवत, अध्यात्मरामायण ।
तरीहि ब्रम्हज्योतीसि अजून । देखिले नाही ॥५८॥
आता किती पारायणे करावी । जेणे कळेल ब्रह्मचवी? ।
सांगाल काय खूण बरवी । विशद करोनिया?'' ॥५९॥
मी तयाशी विनोद केला । म्हणालो, कसे पावाल परमार्थाला? ।
त्यासाठी पाहिजे खल केला । सद्ग्रंथाचा ॥६०॥
ग्रंथ टाकावे बारीक खलून । चूर्ण सकाळी घ्यावे दुधातून ।
अथवा पाण्याचेहि अनुपान । चालेल शिळ्या ॥६१॥
त्या गृहस्थाने घरी जाऊन । ग्रंथ फाडले दणादण ।
खल घातला चूर्णप्रमाण । बाह्यबुद्धि तयाची ॥६२॥
सकाळी येवोनि विचारी । ''किती दिवस घ्यावे तरी? ।
सांगाल काय, कैशापरी । घेत जावे घोळूनि हे?'' ॥६३॥
मी म्हणालो ''वारे बुद्धि ! । अंधानुकरणा धावे आधी ।
तारतम्य नसता सांगा कधी । अनुभवा येईल वाचका? ॥६४॥
अरे ! तुज हेहि नाही कळले? । ग्रंथ फाडोनि चूर्ण केले ।
याने का ज्ञान अनुभवले । जाईल बाबा? ॥६५॥
तो म्हणाला,''आम्हासि काय ? । कोणी सांगेल तैसा करावा उपाय ।
ऐसीच पारायणे केली, सवय । रोज रोज लावूनिया'' ॥६६॥
कळले नाही ब्रह्मसूत्र । उपनिषद, पंचीकरण, विचारसागर ।
वाचले मुखे भराभर । सविस्तर टीकाग्रंथ ॥६७॥
आता कुठवरि पाठ करावे ? । मने धरिले आपणास विचारावे ।
शंका धरोनि आलो जीवे । आपणापाशी ॥६८॥
आपण सांगितले चूर्ण करा । तैसेचि केले जाऊनि घरा ।
आलो पुढलिया विचारा । घेण्यासाठी ॥६९॥
कुणीकडे तोंड करावे पिण्यात? । सांगाल तैसे घेऊ सतत ।
मी म्हणालो, वारे श्रद्धावंत ! । अंधानुकरणी लोक हे ! ॥७०॥
बाबा ! मीच खरा चुकलो । तुझ्याशी विनोद करोनि ठकलो ।
पाहावयासि होतो लागलो । बुद्धि तुझी ॥७१॥
एवढे ग्रंथराज वाचोन । किती आले तारतम्यज्ञान ? ।
याचे समजले मज धोरण । तुझ्या कृतीवरोनि ॥७२॥



कर्मठ, अंधानुकरणी बुद्धि । त्यासि ब्रह्मज्ञान नको आधी ।
शुध्दता, अंतर्मुखता साधी । लागेना अवधि तया मग ॥७३॥
म्हणोनि सांगतो खरे, ऐक । ग्रंथी वाचावे चारित्र्य सम्यक ।
राहणी कळेल ज्यात उद्बोधक । रोजच्या व्यवहाराची ॥७४॥
कधी उठावे, कधी झोपावे? । कैसे स्नान, ध्यान करावे? ।
कोणते कर्म आचरावे । पुण्यश्लोक व्हावया? ॥७५॥
कोणत्या भावे उद्योग करावा? । कोणाचा उपदेश ऐकावा? ।
किती घ्यावा, किती सोडावा । विचार-बळ? ॥७६॥
हेचि पठण आधी करावे । मग कर्तव्य-तत्पर व्हावे ।
पुढे पुढे अनुभवीत जावे । ज्ञान-पुढील मार्गाचे ॥७७॥
ऐसे अनुक्रमे ग्रंथ वाचावे । तरीच ज्ञान संपादावे ।
एरव्ही पारायणे करीत मरावे । काय होते तयाने ? ॥७८॥
शास्त्रप्रचीति, गुरुप्रचीति । मगचि होते आत्मप्रचीति ।
या म्हणण्यासीच आहे निश्चिती । अनुभवाअंती ॥७९॥
संती कथिले शास्त्रपठन । ते सद्ग्रंथासि उद्देशून ।
परि अधिकार परत्वेचि वाचन । सफल जीवन करीतसे ॥८०॥
एरव्ही ग्रंथ-भांडार बहुत । नाना विद्वानांचे बहु मत ।
कोणते निवडावे समजोनि त्यात । आपणासाठी ? ॥८१॥
नाना अधिकाराचे नाना ग्रंथ । अधिकारपरत्वे असती संमत ।
आपला कोणता मार्ग त्यात । निवडोनि घ्यावा ? ॥८२॥
हे तो समजणे आपल्या आधीन । कळावी अधिकारपात्रता पूर्ण ।
हेहि समजण्याचे ज्ञान । ग्रंथीच आहे दाविले ॥८३॥
मूर्ख, पढतमूर्ख, विवेकी, शुद्ध । बद्ध, मुमुक्षु, साधक सिद्ध ।
ग्रंथीच दाविला पात्रता-भेद । उन्नतिमार्गासहित ॥८४॥
आपणासि कोण रोग जडला । निश्चित कळावा ज्याचा त्याला ।
त्याचि रोगाचा उपाय केला । पाहिजे आधी ॥८५॥
परि जो आपणासि ओळखू नेणे । त्यासि सहाय्य लागे देणे ।
त्यासाठी पाहिजे साक्ष घेणे । संत - सज्जनांची ॥८६॥
नाहीतरि ग्रंथी सर्वचि विषय । कोणी उपाय, कोणी अपाय ।
अवस्था-भेदे हे सर्व होय । साधक-बाधक ॥८७॥

यासाठी हवी सत्-संगति । ज्यासि नाही सूक्ष्म मति ।
कुणी आपुल्याच विचारे चढती । आत्मानुभूति पावावया ॥८८॥
कोणी संस्कारचि घेवोनि आला । कोणी येथे शिकोनि रंगला ।
कोणास काहीच न कळे बोध भला । संतानुभवाचा ॥८९॥
म्हणोनि ग्रंथ वाचावे त्याने । मन लावोनि अर्थ समजणे ।
हे अनुभवियांकडोनि निवडणे । आपुल्यांसाठी ॥९०॥
ग्रंथाचे भरले महाभांडार । त्यातूनि निवडती निवडणार ।
सार तेवढे देती साधकांसमोर । संत-सज्जन ॥९१॥
मुळात सारचि संतांची वाणी । जनासि तारी मार्ग दावूनि ।
'ग्रंथ ही शब्दमूर्तीच ज्ञान-खाणी!' । दिव्य संतांची ॥९२॥
परि तयांचा लाविता अर्थ । सामान्य बुध्दि पडे भ्रमात ।
काल बदलोनि होतो अनर्थ । तारतम्य न कळता ॥९३॥
यासाठी देशकालानुसार । ग्रंथांचे उकलोनि दावावे अंतर ।
ऐसा असतो अधिकार । पुढील संतांचा ॥९४॥
साधु, संत अनुभवाचे सागर । त्यांना कळतो पुढील व्यवहार ।
जीवांचा कैसा होय उद्धार । काय करावे त्यालागी? ॥९५॥
कोणास काय साधन द्यावे । हे त्यांसीच कळे स्वभावे ।
म्हणोनि गुरुप्रचीतीस घ्यावे । बोललो आम्ही ॥९६॥
कोणते ग्रंथ कोणी वाचावे । संती कथियले ते बरवे ।
सदाचार, नित्यनेम घ्यावे । वाचोनि आधी ॥९७॥
झोपावे, उठावे ठरल्या वेळी । आपुली कामे करावी सगळी ।
कोणा दुःख न व्हावे भूमंडळी । आपणासाठी ॥९८॥
आपुले कर्म संपवोनि सगळे । जो दुसऱ्याच्या सेवेसी वळे ।
तोचि चढे कार्य-बळे । लौकिकासी आणि उन्नतीसी ॥९९॥
ऐसे विचार जया ग्रंथी । तेचि प्रथम वाचावी पोथी ।
ठेवोनि लक्ष मुख्य अर्थी । जीवा उन्नतिपदा न्याया ॥१००॥
जयास व्यवहार समजला पूर्ण । सक्रिय कळले साधना-ज्ञान ।
तेणेच ब्रह्म कोण, आत्मा कोण? । समजावे हे ग्रंथपठणी ॥१०१॥
समजोनि घ्यावे पंचीकरण । आत्म-अनात्म, ब्रह्मविवरण ।
कळल्यावरि नेघे मन । मिथ्या भ्रांतिविषयी आशा ॥१०२॥



मगचि खरे श्रवण, मनन । निदिध्यास वाढेल मनापासून ।
तेणे साक्षात्काराची खूण । कळेल ठायी आपुल्या ॥१०३॥
साक्षात्कार ब्रह्मज्योति । होईल आत्मानंदाची प्राप्ति ।
आत्मरंगे विलीन वृत्ति । ब्रह्मामाजी होतसे ॥१०४॥
जयाची दृष्टि ऊर्ध्व झाली । विषयांतूनि उन्मनीत गेली ।
त्याची समाधि सुखे डोलली । अखंडाकार ॥१०५॥
देव भक्त नाही दुजे । कळले अनुभवाने सहजे ।
विश्वी विश्वाकार होईजे । ऐसे झाले मग तेथे ॥१०६॥
ग्रंथ-वाक्याने वृत्ति चढली । गुरु-बोधाने अनुभवी वळली ।
आत्मरूचीने तदाकार झाली । अखंड जैसी ॥१०७॥
मग कशाचे ग्रंथ वाचन? । जे जे करील, तेचि समाधान ।
जे बोलेल, तेचि ग्रंथ-ज्ञान । होईल स्वये ॥१०८॥
हर्ष नाही जन्म घेता । दुःख नाही मृत्यु होता ।
अंगी बाणे स्थितप्रज्ञता । कैवल्यरूप तयाच्या ॥१०९॥
याचि पूर्ण सुखासाठी । ग्रंथ वाचणे उठाउठी ।
जीवनाची पूर्णता शेवटी । यातचि आहे ॥११०॥
ही आत्मप्रचीति पावावयासि । हाचि मार्ग आहे साधकासि ।
प्रथम सद्ग्रंथ - अवलोकनासि । केले पाहिजे ॥१११॥
एरव्ही जो पूर्वीचा उमगला । त्यास नकोचि हा गलबला ।
तो सरळचि आत्मप्रचीतीसि गेला । समाधाने ॥११२॥
आत्मप्रचीति म्हणजे दिव्यदृष्टी । ज्यात व्यष्टी, समष्टि आणि परमेष्टि ।
आपणचि अनुभवतो उठाउठी । अगणित रूपे एकपणे ॥११३॥
असो देव, संत, मानव । पापी, पुण्यवान सर्व ।
मूळ रूपाचा घेता अनुभव । चैतन्यघन विश्वचि! ॥११४॥
ऐसा अनुभव ज्याने घेतला । तो विश्वाच्या उपयोगा आला ।
त्याचा व्यवहार व्यापक झाला । सकळांसाठी ॥११५॥
याचि भावे जनसाधारणासि । ग्रंथ द्यावेत वाचावयासि ।
त्यानेच लागेल मार्ग त्यासि । विश्वरूप-दर्शनाचा ॥११६॥
परंतु ज्यासि व्यवहार पात्रता नाही । त्यांनी करावी अध्यात्म-घाई ।
हे तो होईल अनाठायी । ग्रंथ पठन एकांगी ॥११७॥

शुद्धाचरण मागाहूनि वाचले । पहिले वेदांतपठन केले ।
वळणीचे पाणी वरि चढविले । होईल ऐसे ॥११८॥
शब्दे म्हणतील 'सर्व ब्रह्म' । मना आले ते करितील कर्म ।
नास्तिकतेहूनि महाभ्रम । माजेल लोकी शब्दज्ञाने ॥११९॥
गावी दुःखाची पेटली आग । तो म्हणेल–'सच्चिदानंद जग' ।
हे सर्व बहरूप्याचे सोंग । वाटेल जना वेड्यापरि ॥१२०॥
यास्तव गाव होईल शुद्ध । प्रेम, ज्ञान, सत्य, आनंद ।
सर्वांस लाभेल ऐसे सुबुद्ध । ग्रंथ, गावी लावावे ॥१२१॥
होईल जीवनाची उन्नति । ज्ञान–विज्ञानाची प्रगति ।
ऐसीच असावी ग्रंथ–संपत्ति । गावोगावी ॥१२२॥
सर्वांस कळावे कर्तव्य आपुले । कैसे होईल सर्वांचे भले ।
तन, मन, धने, फळे–फुले । विश्व हे कैसे कळावे ॥१२३॥
आम्ही रहिवासी सर्वचि मूळचे । विश्वरचना हे नाटक आमुचे ।
आपुल्या परीने रंगविणे साचे । आहे आम्हा ॥१२४॥
ऐसे जाणोनि स्वरूपासि । वर्ते तो जिंकी या खेळासि ।
तुकड्या म्हणे, हेचि कळावयासि । कथिली असे ग्रामगीता ॥१२५॥
इतिश्री ग्रामगीता ग्रंथ । गुरु–शास्त्र–स्वानुभव–संमत ।
ग्रंथपठनाचा कथिला भावार्थ । चाळिसावा अध्याय संपूर्ण ॥१२६॥


॥ सद्‌गुरुनाथ महाराज की जय ॥

''सर्वत्र समतेचे तत्त्व आपल्या ग्रंथात आहे, पण व्यवहारात मात्र भेदांचे साम्राज्य पसरले आहे, हे आता बदललेच पाहिजे. आमच्या देशात हजारो निष्ठावान व त्यागी साधु आहेत, जे गावोगावी धर्मशिक्षण देत फिरत असतात. त्यांनी इकडे लक्ष पुरविले व व्यवस्थितपणे ऐहिक विषयांचे भूगोल, गणितादी आवश्यक गोष्टींचेही शिक्षण लोकांस दिले तर अल्पावधीतच भारताचा उद्धार होईल ! त्यासाठी आपली जबाबदारी ओळखून सर्वांशी मिळण्याची वृत्ती मात्र त्यांनी अंगिकारली पाहिजे!''

– स्वामी विवेकानंद



## ॥ चित्र परिचय ॥



## अ. ४१ – श्रीगुरु ज्ञानेश्वर महाराज

श्री ज्ञानराज गुरुमाऊली । त्यांच्या कृपादृष्टीची साउली ।
परंपरेने फळासी आली । ग्रामगीता – स्वरूपाने ॥१०४॥

१७ व्या शतकात मराठी समाजात विश्वप्रेमी व सेवाकर्मी अशा वैष्णव धर्माचा पाया घालणारा 'ज्ञानियांचा राजा !' 'ज्ञानेश्वरी' सारखे समर्थ ग्रंथ लिहून, भारतभ्रमण करून व संतसंमेलन घेऊन या पोरक्या पोराने राष्ट्रात नवचैतन्य निर्माण केले. सामान्य समाजाला लोकभाषेतून उच्च ज्ञान दिले आणि सर्वांची 'माऊली' ठरून अवघ्या २१ वर्षाच्या वयात जिवंत समाधी घेतली. मच्छेंद्रनाथांच्या मालिकेतील या दिव्य पुरुषांची परंपरा श्रीसंत तुकडोजी महाराजापर्यंत येऊन थडकली आहे. म्हणूनच 'अवघाचि संसार सुखाचा करीन । आनंदे भरीन तिन्ही लोक'' अशी प्रतिज्ञा करणाऱ्या या आद्य गुरुमाऊलीचे चित्र मुद्दाम या फलश्रुतीच्या अध्यायावर देण्यात आले आहे.

## अध्याय एकेचाळिसावा

# ग्रंथ–महिमा

॥ श्रीगुरुदेवाय नमः ॥

ईश्वरे व्यापिले हे विश्व । म्हणोनि जगचि आम्हा देव ।
विश्वाचा मूळ घटक गाव । ग्रामगीता त्यासाठी ॥१॥
यात ग्रामाचा जयजयकार । सर्व तीर्थक्षेत्रांचे ग्रामचि माहेर ।
ग्राम हा विश्वाचा पाया सुंदर । ग्राम नसता प्रलयचि ॥२॥
ग्राम म्हणजे देवमंदिर । मानव देवमूर्ति सुंदर ।
सर्वांची सेवा सम प्रकार । तीच पूजा आमुची ॥३॥
ग्रामगीता शाब्दिक सेवा । परि दृढ करी संस्कारांचा ठेवा ।
तेणे ईश्वरी–राज्य गावा । नांदेल सदासर्वकाळ ॥४॥
ग्रामगीता दुःखासि नाशवी । ग्रामगीता मृत्यूसि हसवी ।
ग्रामगीता सहकारी तत्त्व वाढवी । मानवधर्मा फुलवाया ॥५॥
चाळीस दिवस म्हणजे मंडळ । ऐसी अनुष्ठाने प्रांजळ ।
करिता गाव सुधारेल सकळ । संस्कारे ग्रामगीतेच्या ॥६॥
म्हणोनि चातुर्मास्यादि निमित्ता । मंदिरी, पारी बैठकीत बसता ।
वाचावी हर्षभरे ग्रामगीता । रंग रंगणी आणोनिया ॥७॥
परि ऐसी नसावी भावना । अर्थहीन करिता पारायणा ।
ना कळे तरी पुण्यराशी नाना । जमा होतील आमुच्या ॥८॥
माझ्या मते हे अज्ञान । दूर सारोनि करावे वाचन ।
आधी शिकावे अर्थज्ञान । ग्रंथपठण करितांना ॥९॥
प्रथम हीच महत्त्वाची खूण । ग्रंथवाचनाचे कळावे ज्ञान ।
आपुले वाचन आपणा समजून । बोध व्हावा उत्तम ॥१०॥
असेल मित्रमंडळी बसली । त्यांनाही समजावी आपुली बोली ।
नाहीतरि वाचन, पठणे केली । कोणा न कळले तरि काय ? ॥११॥
काय वाचतो याचे ज्ञान । नाही वाचकासीच झाले पूर्ण ।
श्रोते पळती उगेच उठोन । अर्थ काय वाचनासि ? ॥१२॥



कोठे थांबावे वाचकांनी? । कोठे वाचावे जोर देवोनि? ।
कोठे रंगवावे गंभीरपणी? । कळले पाहिजे वाचकां ॥१३॥
ऐसे जव कळलेच नाही । केली पारायणे सर्वहि ।
लक्ष नसे अर्थप्रवाही । तरी ते व्यर्थ वाचन ॥१४॥
वाचतानाचि बोध होतो । अंगी स्फुरणभाव उठतो ।
कर्म करावयासि वळतो । जीव जैसा अंतरी ॥१५॥
ऐसे वाचन आधी शिकावे । तरी ग्रंथपठण करावे ।
मग आपणासि ओळखीत जावे । अधिकारपरत्वे वाचके ॥१६॥
वाचक असावा आचारशील । तरीच श्रोत्यांवरि परिणाम करील ।
नाहीतरि होईल टिंगल । जनतेमाजी तयाची ॥१७॥
मुखाने ग्रंथ वाचावे । घरी विपरीत आचरावे ।
तैसेचि बाहेरि गोडवे । गाती लोक थट्टेने ॥१८॥
मुखे वाचतो 'सत्य बोलावे' । परि सत्य करणेचि नाही ठावे ।
म्हणे– 'मज सत्यवान म्हणावे' । कैसे म्हणतील ग्रामवासी? ॥१९॥
मी तो धनावरचा सर्प बरवा । परि मला 'उदार दाता' गौरवा ।
ऐसे कोण मानील आपुल्या गावा? । सांगा सांगा ॥२०॥
रंजल्यासि न दे पाणी । म्हणे– 'मज म्हणा दानशूर राणी' ।
ऐकेलचि का ऐसे कोणी? । किती वाजविले चौघडे तरी? ॥२१॥
पान, तंबाखू खावोनि आला । प्रवचनी, कीर्तनी, शाळेत बसला ।
हसती श्रोते, विद्यार्थी त्याला । 'व्यसने सोडा' बोलता ॥२२॥
एक पंडित जेवणासि बैसला । आरंभ शांतिपाठासि केला ।
परि जरा वाढण्यासि उशीर झाला । मारले त्याने बाईलेसि ॥२३॥
ती म्हणे, वाहवा ऐसी शांति । उत्तम मंत्राची फलश्रुति ! ।
तोंडाने पति दिव्य बोलती । आचरण करिती क्रूराचे ॥२४॥
ऐसे न व्हावे आतातरी । असोत वाचक, वक्ते, शिक्षक भारी ।
आहे सर्वांवरीच जबाबदारी । आधी आत्मशुद्धीची ॥२५॥
उपदेशक वाचक आचारशील । असले, तरीच भाव फळेल ।
श्रोत्यांचे हृदय–परिवर्तन होईल । लागवेगेसि ॥२६॥
वक्ता असेल सरळ, सात्विक । तरीच श्रोते बनतील भाविक ।
जनलोक करितील कौतुक । बघोनि दोघांसि ॥२७॥

म्हणोनि हेचि वरिष्ठांनी करावे । जैसे सांगावे तैसचि वागावे ।
तरीच होईल त्यांच्या प्रभावे । कल्याण ग्रामजीवनाचे ॥२८॥
येथे श्रोत्यांनी विचारिले । आपण अर्थासि, वर्तनासि महत्त्व दिले ।
परि कित्येक ग्रंथी सांगितले । पारायणचि फलदायी ॥२९॥
कोणी म्हणती ग्रंथाचे पारायण । करिता मिळेल पुत्र, धन ।
होईल भाग्याचा उदय पूर्ण । पारायणे ग्रंथाच्या ॥३०॥
कोणी म्हणती मंत्रचि जपा । हजारोंनि करा संकल्पा ।
म्हणती, सांगतो मार्ग हा सोपा । ज्ञान मिळेल न वाचता ॥३१॥
कोणी म्हणती अनुष्ठान करा । वाचा भागवत–गीता–ब्रह्मसूत्रा ।
मोक्ष चालत येईल घरा । कानी पडता शब्दचि ॥३२॥
कोणी म्हणती ग्रंथ ज्या घरी । तेथे न ये काळाची फेरी ।
याचा मेळ कोणेपरी । बसेल सांगा? ॥३३॥
याचे उत्तर ऐका सज्जन । फलश्रुति ही रोचक पूर्ण ।
ग्रंथ–प्रचार व्हावा म्हणून । दिले प्रलोभन दावूनि ॥३४॥
त्यात एक आहे उत्तमहि । लोक ठेविती ग्रंथ संग्रही ।
त्यापासूनि लाभ घेई । कोणी तरी थोडा–बहू ॥३५॥
कानी पडो एकचि वचन । परि त्यात असे महापुण्य ।
हेहि ओढ लागावी म्हणून । कथिले असे थोरांनी ॥३६॥
नुसत्या पारायणाचे महत्त्व । त्यातहि हेचि आहे तत्त्व ।
कधीतरी येईल आचरणी सर्व । संस्कार होता ॥३७॥
कराया सांगितले जप–अनुष्ठान । तेहि शुद्ध कराया जीवन ।
क्रमाने तितुके दिवस तरि मन । शुद्धाचरणी लागाया ॥३८॥
म्हणोनि मी या सकला मानितो । परि जपणारे एकांगी समजतो ।
तेणेचि लाभ न हाता येतो । बहुतेकांच्या ॥३९॥
घोड्यासि पाणी दाखवावे । म्हणतां तेचि धरिले जीवे ।
पाणी पाजणे नाही ठावे । तैसे झाले लोकांचे ॥४०॥
ऐसेचि नाना ग्रंथ वाचले । परि तैसे मुळीच नाही वर्तले ।
कोण्या तोंडाने मागावे भले । फळ तयांसि ? ॥४१॥
काही ग्रंथांतहि अवास्तवपणा । हे न राहावे सांगितल्याविणा ।
त्यांनी श्रद्धेचा होतो धिंगाणा । फल न येता हातामाजी ॥४२॥



ग्रंथी अपार फलश्रुति कथिली । परि अनुभवासि नाही आली ।
हजारो लोकांनी आम्हा सांगितली । कर्मकहाणी ॥४३॥
ग्रंथी सुखाची फलश्रुति । म्हणोनि वाचती सकाम पोथी ।
आळसी, भोळे ओढवोनि घेती । अधिक आपत्ति दानादिके ॥४४॥
कोणी कोणास साधन सांगती । 'सोने देवोनि करा म्हणे समाप्ति' ।
घरोघरी व्रत–वैकल्ये आचरती । भुलती बायाबापडया ॥४५॥
व्रतांची वाचती कहाणी–पोथी । दान–उद्यापन करा म्हणती ।
नाहीतरि होईल अधोगति । धाक देती जनतेसि ॥४६॥
काही उदरनिमित्तासाठी । पोथ्या वाचती उठाउठी ।
सोन्याचे करोनि ग्रंथ शेवटी । अर्पा म्हणती देवासि ॥४७॥
लोकहि असती आसक्त बावरे । काहीहि सांगोत सांगणारे ।
धावोनिया करिती बिचारे । व्रतसाधने वेड्यापरी ॥४८॥
फळ न लाभता मग चिडती । म्हणती 'काय चाटावे ग्रंथाप्रति? ।
रोज वाचावे ग्रंथ किती? । तरीहि पुत्र होईना' ॥४९॥
पति–पत्नी आरोग्याने वागेना । नवस करिती दगडोबासि नाना ।
काय होईल बाप हो ! सांगाना । ऐशा रीती? ॥५०॥
घाला उंबरीसि प्रदक्षिणा । परि सुधारु नका आचरणा ।
भोजन करा जडान्न पुन्हा । रोगी व्हाया वेळ कैचा? ॥५१॥
कलकत्याच्या गाडीत बसावे । आणि म्हणे– 'देवा ! पंढरीसि न्यावे' ।
ऐशा प्रार्थनेसि फळ यावे । कोण्या प्रकारे? ॥५२॥
एकाने चोरी केली ग्रामाप्रति । म्हणती त्यास आली साडेसाती ।
ती जावया वाची शनीची पोथी । चोरी काही सोडीना ॥५३॥
शेवटी पोलिसाहाती सापडला । गुन्हा त्याचा साक्षीत आला ।
तो पुसतो आपुल्या गुरूला । 'साधन सांगा सुटण्याचे' ॥५४॥
गुरुहि होता लाचलुचपती । म्हणे–'वाच शनीदेवाची पोथी' ।
शिवलीलामृताचा अध्याय चित्ती । सद्‌भावाने आठवी ॥५५॥
लावी देवीचे पुराण । करी नेटाने सत्यनारायण ।
आम्हासि देई सुवर्णदान । मुक्त होशील लवकरचि तू ॥५६॥
त्याने तैसेचि सर्व केले । ग्रंथ साधन करोनि वाचले ।
बुवा–ब्राह्मणा धन उधळले । दंड काही चुकेना ॥५७॥

शेवटी पडला कैदेमाजी । म्हणे– दाखवा तो गुरू पाजी ।
त्याने केली फजिती माझी । धन तेहि गमावले ॥५८॥
वाचली नेमधर्माने पोथी । परि जेल न चुके मजप्रति ।
काय करावी देवपूजा ती? । ग्रंथ जाळावे अग्निवरि ?'' ॥५९॥
बिचारा चोरी करणे सोडीना । पण गुरुसि मागे साधना ।
काय करिती गुरु, ग्रंथ नाना? । वाचणारा लबाड हा ॥६०॥
ऐसे जन्मभरी साधन केले । तरी मूर्ख ते मूर्खचि राहिले ।
याने सांगणारांचेहि पतन झाले । फिके पडले साधन त्यांचे ॥६१॥
ऐसे कासयासि करावे? । सत्य तेचि शोधूनि आचरावे ।
आपण बुडावे, दुसऱ्या नर्की न्यावे । ऐसे न करावे स्वार्थभरे ॥६२॥
सांगणाराने तर्कशुद्ध सांगावे । करणाराने सत्यचि करावे ।
तेव्हाचि फळ अनुभवास यावे । होते ऐसे ॥६३॥
हीच मुख्य घेवोनि धारणा । झाली ग्रामगीतेची रचना ।
हा ग्रंथ पुरवी सर्व कामना । कैसा? ते ऐका ॥६४॥
हा आहे प्रखर शब्दबाण । जाय वाचकांचे हृदय भेदून ।
जैसी मूर्ति घडे टाकी लागून । तैसे वाचनबोधे होतसे ॥६५॥
ग्रामगीता नव्हे पारायणासि । वाचता वाट दावी जनांसि ।
समूळ बदलवी जीवनासि । मनी घेता अर्थ तिचा ॥६६॥
ही नव्हे फुले टाकण्यासाठी । ही ग्रामाची उद्धारदृष्टि ।
आजच्या युगाची संजीवनी बुटी । मानतो आम्ही ग्रामगीता ॥६७॥
कोणी दुःखाने होरपळला । कोणी संसारतापे तापला ।
कोणी असहाय्यपणे संकटी पडला । त्यासि धीर दे ग्रामगीता ॥६८॥
कोणी अन्याये लोकां त्रासवी । त्यासि ग्रामगीता मार्गी लावी ।
देवत्व सर्वांचे जागवी । दिव्य व्हाया जग सारे ॥६९॥
याने संस्कार बनतील उत्तम । मनुष्य होईल चारित्र्यक्षम ।
सुख, शांति लाभेल करिता उद्यम । सांगितले जे या ग्रंथी ॥७०॥
अल्पबुद्धि जाईल विलया । वाचता ज्ञान होईल तया ।
खरा धर्म अंगी ये सखया । जीवन उज्ज्वल होताचि ॥७१॥
प्रेम आजवरि होते एकटे । ग्रंथ–चिंतने वाढेल चोखटे ।
सर्वांभूती दयाभाव प्रकटे । ऐसी फलश्रुति ग्रंथाची ॥७२॥



द्वेषबद्धिचे अज्ञान । ग्रंथ वाचता जाईल पळोन ।
सत्कार्य कराया धावे मन । करिता अनुष्ठान सक्रिय ॥७३॥
ग्रामगीता वाचूनि करी चिंतन । त्यास होईल आत्मज्ञान ।
दिव्य दृष्टीची संत–खूण । कळे त्यासि आचरता ॥७४॥
ग्रामगीता ग्रंथ वाचला । तैसाचि गावी वर्तू लागला ।
त्यासि शत्रुचि नाही उरला । ग्रामामाजी कोणीहि ॥७५॥
सामुदायिक वाढली वृत्ति । सारे गाव त्याचि संपत्ति ।
ग्रामगीता घडवी मूर्ति । ऐशा आदर्श मानवाची ॥७६॥
ग्रामगीतेतील उद्योगचिंतन । जो कोणी करील मन लावून ।
त्याचे घरी धन, धान्य । भरपूर येईल समजावे ॥७७॥
आरोग्याचा वाचील धडा । आणि घेईल हाती फडा ।
रोगराईचा होईल निवाडा । तत्क्षणी त्याच्या ॥७८॥
कार्यास लागता तत्क्षणी । फलश्रुतीसि आरंभ होय झणी ।
चरित्र सुधरे ग्रंथ ऐकोनि । लक्षात घेता अर्थ त्याचा ॥७९॥
एकांती बैसोनि वाचली गीता । अर्थ समजोनि मनन करिता ।
जीवनी उतरे आदर्शता । घरादारांसहितहि ॥८०॥
ऐसे घर आदर्श झाले । कीर्ति–स्फूर्तीनि गावी चमकले ।
मग लोक सारे तैसेचि वर्तले । दिसती जनी ॥८१॥
हा केवढा लाभ झाला । सर्व लोकांना स्वर्ग जणू लाभला ! ।
आपुला गाव आदर्श केला । ग्रामगीता वाचूनिया ॥८२॥
ग्रामगीतेचे फळ नव्हे एकट्यासि । एकासहित आहे ग्रामासि ।
उद्धरतील गाववासी । वाचूनि वर्तता ग्रामगीता ॥८३॥
एक एक साधन वाचता । आणि मग तैसेचि वर्तता ।
केवढे लाभ येतील हाता । सांगता न ये ॥८४॥
ग्रामगीतेतील संस्कार–रचना । उपासनेची तत्त्वयोजना ।
ग्राम–रक्षण, ग्राम–सुधारणा । ग्राम–रचना आदर्श ॥८५॥
नाना कलांची उन्नति । शेती–सुधारणा, श्रम–संपत्ति ।
समजूनि घेता विद्या–महती । विकास होई जीवनाचा ॥८६॥
सामुदायिक प्रार्थनेचि प्रथा । रामधून, संत–उत्सव व्यवस्था ।
साधनसंपदा ऐकता, वर्तता । शांति लाभे सर्वांसि ॥८७॥

गायी – गुरांची वाचता सेवा । करिता तैसेचि आपुल्या गावां ।
दही–दुधाचा दुष्काळ पाहावा । न लागे कधी ॥८८॥
विवाहादि सर्व संस्कार । समाजी होती सुखकर ।
मागासल्यांची सुधारणा, उद्धार । करील राष्ट्राचा ॥८९॥
स्त्रिया–मुले होतील आदर्शपूर्ण । हा ग्रंथ घरी होता पठन ।
ग्राम होईल वैकुंठभुवन । वाचता, वर्तता ग्रामगीता ॥९०॥
भिकारी, बेकारी गावी राहीना । सत्तेचि बंधने नुरतील कोणा ।
सर्वचि शिकतील शहाणपणा । ग्रामगीता वाचूनिया ॥९१॥
आरोग्यसंपन्न होतील जन । नाही गावी तंटा, भांडण ।
अन्याय व्यसने कारस्थान । जातील लया द्वेषादी ॥९२॥
गावी वाढेल संघटना । बळ लाभेल सकळांच्या मना ।
नांदेल विश्वकुटुंबाची रचना । आपुल्या गावी ॥९३॥
ग्राम नांदेल स्वर्गापरी । सुखी होतील नर–नारी ।
परमार्थाच्या खुलतील घरोघरी । आनंद–लहरा ॥९४॥
जी जी इच्छा कराल मनी । ती ग्रामदेवता देईल पुरवूनि ।
यात संदेहचि नाही माझिया मनी । उरला श्रोते, वक्तेहो ! ॥९५॥
येथे नाही अंधश्रद्धा । प्रत्यक्ष अनुभव मिळे सर्वदा ।
जे जे शब्द निघती ते गोविंदा । प्रिय समजावे निश्चयेसि ॥९६॥
मी पंडित नोहे आपुल्या ठायी । सांगावया पंडिताई ।
ईश्वराचीच प्रेरणा ही । प्रकट झाली ग्रंथाद्वारे ॥९७॥
माझिया बालरूप वृत्तीतूनि । स्फूरला तो गुरुदेव चक्रपाणी ।
चंद्रभागेतिरी उमटली वाणी । केली ऐकोनि लिपिबद्ध ॥९८॥
जैसे जडजीवाने वेद बोलावे । पंगूने हिमगिरीस ओलांडावे ।
तैसेचि दासाकडोनि घ्यावे । गीताकथन, मानतो मी ॥९९॥
म्हणोनि पुनःपुन्हा प्रार्थितो । माझा आवाज नव्हे सत्य तो ।
या शरीराचा शंख वाजवितो । ध्वनी काढतो भगवंत ॥१००॥
भगवद्‌गीतेचे हे सक्रिय रूप । प्रकट झाले आपोआप ।
अर्जुनासम व्हावे महाप्रताप । सर्व ग्रामीण म्हणोनि ॥१०१॥
गीता बोधिली अर्जुनाला । ग्रामगीता ही सर्व ग्रामाला ।
राहू नये कोणी मागासला । म्हणोनि बोलला देव माझा ॥१०२॥



मी तो केवळ बालकापरी । संतांचे आशीर्वाद घेतले शिरी ।
म्हणोनीच प्रकटली धीट वैखरी । देहबासरीमधूनिया ॥१०३॥
श्रीज्ञानराज गुरुमाऊली । त्यांच्या कृपादृष्टीची साउली ।
परंपरेने फळासी आली । ग्रामगीता स्वरूपाने ॥१०४॥
ग्रामगीतेत ज्यांची नावे, चित्रण । त्या सर्व संताचेचि सहवरदान ।
ऐसे मी मानतो विश्वासे पूर्ण । फळेल निधान ग्रामगीता ॥१०५॥
ग्रामगीता माझे हृदय । त्यात बसले सद्‌गुरुराय ।
बोध त्यांचा प्रकाशमय । दिपवोनि सोडील ग्रामासि ॥१०६॥
शब्दरचना गावंढळ । हे मी समजतो मनी प्रांजळ ।
दोष तो तो माझा सकळ । गुण तो तो थोरांचा ॥१०७॥
वालुकापात्री गंगाजळ । ते पापनाशक, मधुर निर्मळ ।
तैसे वाचक, श्रोते केवळ । शुद्ध घेवोत समजोनि ॥१०८॥
आमचे गावचि मागासले । तेथे जाड शब्द जरि योजिले ।
ग्रामीण म्हणतील नाही कळले । सांगा अर्थ पंडितहो ! ॥१०९॥
घरोघरी पंडित कुठले? । आहेत तेहि विकृत झाले ।
पोटा–पाण्यासि लागले । नोकरी धरिली धनिकांची ॥११०॥
जे जे कोणी उरले उत्तम । त्यांनाहि काही रुढिभ्रम ।
ते म्हणतील हा उपक्रम । वेदबाह्य, अधार्मिक ॥१११॥
क्वचित असती विद्वत्‌रत्न । सर्वचि याती–यातीमधून ।
त्यांना आहे हा ग्रंथ प्रमाण । मानतो मी अंतःकरणे ॥११२॥
ऐसियासीच पंडित मानावे । जे असतील सात्विक संत स्वभावे ।
त्यांचे पिसाट शब्दचि ऐकावे । सुधारिती जे ग्रामासि ॥११३॥
धुंडाळू नयेत पंडित कोणी । वाचक निवडावा गावातूनि ।
आचारशील, सात्विक, इमानी । सुबुद्ध, प्रेमळ कार्यकर्ता ॥११४॥
जो ग्रंथहि प्रेमे वाचतो । नांगर धराया शेतीतहि जातो ।
वेळ पडल्या सेवा करितो । गावलोकांची पाहिजे ती ॥११५॥
ऐसा असेल, कोण्याहि जातीचा । धर्म, पंथ, देश–विदेशीचा ।
तरी तो चालेल, ग्रामोन्नतीचा । जिव्हाळा जया ॥११६॥
पंडितांनी वाचू नये । ऐसे माझे म्हणणे नोहे ।
परि काम न अडावे त्याशिवाय । नको निष्क्रिय वाद कोणी ॥११७॥

पंडित, पुराणिक, विद्वान । यांनीहि अवश्य करावे वाचन ।
समाजाचे जबाबदार म्हणोन । यथार्थ ज्ञान द्यावे सर्वां ॥११८॥
ग्रामी विचारी शिक्षकजन । त्यांनी वाचावी ग्रामगीता पूर्ण ।
सकळांस द्यावी समजावोन । लहान–थोरां जमवोनि ॥११९॥
जमवोनि श्रोते वृद्ध–तरुण–बाल । मुली–तरुणी–माता सकल ।
मागासल्यांसहि लावावी चाल । उन्नतीची हळूहळू ॥१२०॥
जे जे नारी, नर साक्षर असती । त्यांना माझी नम–विनंति ।
वाचा ग्रामगीता, अर्थसंगति । समजावोनि द्या निरक्षरा ॥१२१॥
जो समजोनि हा ग्रंथ न वाचे । ग्राम मागासावे असे मत ज्याचे ।
तो मार्ग धरील अधोगतीचे । पाप न चुके तयालागी ॥१२२॥
पाप म्हणजे बिघाड करणे । पाप म्हणजे कुमार्ग धरणे ।
पाप म्हणजे बळीच राहणे । गरीब प्राण्यां पिळोनि ॥१२३॥
ऐसे नसावे वाचकाचे । जे ज्ञान मिळेल ग्रामगीतेचे ।
तैसेचि वर्तता, वर्तविता पुढचे । दोष जळती, बाधक जे ॥१२४॥
ग्रामगीता ग्रंथ वाचोन । कोणी घेऊ नयेत पैसे आपण ।
ग्रामासीच लाभाया महत्त्व, पूर्ण । धन वेचावे वक्त्याने ॥१२५॥
ग्रामगीता ग्रंथ सुंदर । निर्मावया गावाचे चारित्र्य ।
प्रचार करावा सर्वत्र । होऊनि पवित्र आपणहि ॥१२६॥
जे कोणी माझे स्नेही प्रेमळ । त्यांनी करावा ग्रंथाचा सुकाळ ।
घरोघरी चालवावा प्रचार निर्मळ । ग्रामगीता–वाचनाचा ॥१२७॥
ग्रामात खेळावी ग्रामगीता । सर्वांस पाठ असावी सूत्रे तत्त्वता ।
प्रमाण द्यावे कोणाचे न चुकता । सर्व आपुले म्हणोनिया ॥१२८॥
ज्याचे हाती हा ग्रंथ पडला । अचानक मधूनि उघडला ।
वाचताचि समजावा उपदेश केला । ग्रामदेवतेने मजलागी ॥१२९॥
मग तयाचा न घडो अपमान । विचार करावा तारतम्य जाणून ।
कळत नसता घ्यावी पटवोन । ओवी जाणत्यापासोनि ॥१३०॥
उत्तम उपदेश हाती लाभला । समजावा शुभदिन आज उदेला ।
तैसेचि वर्तावे समजोनि बोला । ग्रामगीतेचिया ॥१३१॥
प्रथम ऐकावे हे गीतावचन । आचरणासि दृढ करावे मन ।
मग संकल्पावे कार्याचे साधन । ग्राम स्वर्ग करावया ॥१३२॥



प्रथम श्रद्धेने वाचन करावे । अर्थ सर्व लक्षात घ्यावे ।
उठता, बसता, कार्यास लागावे । ग्रामाच्या आपुल्या ॥१३३॥
यातचि माझे समाधान । सुधारेल ग्रामाचे जीवन ।
पाखंड जाईल वितळोन । मतलबियांचे ॥१३४॥
संपोनि जातील भेद–वाद । नांदेल गावी प्रेम शुद्ध ।
लाभेल आनंदीआनंद । सर्व जना सर्वभावे ॥१३५॥
मानवातील असुरत्व पशुत्व । संपोनि उजळेल देवत्व ।
जीवनी संचरेल शुध्द तत्त्व । निरूढ ऐसे सर्वांच्या ॥१३६॥
निसर्ग साह्य दे वेळच्या वेळी । वृक्ष, वेली बहरती फुली–फळी ।
जलपूर्ण होतील नद्या, तळी । आपुली मर्यादा न सोडता ॥१३७॥
आरोग्य होईल सर्वांचे भूषण । लोपेल दारिद्र्य, उणीव, अज्ञान ।
कोणीच न राहतील हीन, दीन । खळ, दुर्जन कोठेहि ॥१३८॥
समानतेची समाजरचना । शांति देईल जीवजना ।
प्रगतीची नवी नवी प्रेरणा । करील भुवना उन्नत ॥१३९॥
शोषण अथवा शासन । याचे गळोनि पडेल बंधन ।
नाही शत्रूंचे आक्रमण । स्वयंपूर्ण गाव होता ॥१४०॥
दास होतील त्रिविध ताप । नुरेल वैताग, वैर, पाप ।
गाव झालिया स्वर्गरूप । शांति लाभेल विश्वासि ॥१४१॥
स्वर्गीचे अमर हेचि इच्छिती । हेचि संत, ऋषींच्या चित्ती ।
ऐसिया गावी लाभता वस्ती । कासया जाती वनांतरा ? ॥१४२॥
सांडोनिया आत्मस्थितिभाव । संत–सज्जनांचे समुदाव ।
ऐसिया गावा देतील वैभव । आपल्या जीवन्मुक्तीचे ॥१४३॥
त्यांच्या बोधे धर्म, नीती । त्यांच्या सहवासे सेवा, भक्ति ।
त्यांच्या प्रभावे शांति, शक्ती । राहील जागती सर्व काळ ॥१४४॥
ऐसी ग्रामगीतेची फलश्रुती । ज्यात संतविभूतिंची संकल्पपूर्ति ।
देवचि गेला बोलूनि चित्ती । वरदवाणी सज्जनहो! ॥१४५॥
उभा विश्वाचिया विटेवर । सद्‌गुरु विठ्ठल सर्वेश्वर! ।
त्याच्या कृपेचाचि विस्तार । तुकड्या म्हणे ग्रामगीता ॥१४६॥
इतिश्री ग्रामगीता ग्रंथ । गुरु–शास्त्र–स्वानुभव–संमत ।
लाभ घेवोत नित्य ग्रामस्थ । म्हणोनि अर्पिला विश्वरूपा ॥१४७॥

॥ सद्‌गुरुनाथ महाराज की जय ॥

---- समाप्त ----

## • राष्ट्रसंतांची आरती •

(चाल – आरती ज्ञानराजा...)

आरती राष्ट्रसंता ! जगद्‌गुरू कृपावंता ।
रोमरोमी विश्वचिंता, योगियांच्या महंता ।।धृ।।
ध्वज तू कळसावरी, सर्वात्मक गुरूदेवा ।
डोलले धर्म सारे, कैसी अपूर्व ती सेवा ।।१।।
धावत्या पाऊलांनी, लाखो गावींच्या शिला ।
चैतन्ये उठविल्या, धन्य तुझी दिव्य लीला ।।२।।
पाषाण अस्त्र केले, धर्मा दिली नवकांती ।
कैवल्य माणिकाची, जिंकी काळासिही शांती ।।३।।
गर्जली ग्रामगीता, वेधी विश्वची खंजरी ।
समुदाय जीवनाचा, स्वर्ग फुलाया भूवरी ।।४।।
समन्वय महाज्योती, तुकडोजी ब्रम्हमूर्ती ।
गुरूदास लीन पायी, द्यावी आपुली स्फूर्ती ।।५।।

–सुदामजी सावरकर

## • राष्ट्रवंदना •

तन–मन–धन से सदा सुखी हो, भारत देश हमारा ।
सभी धर्म अरु पंथ–पक्ष को, दिलसे रहे पियारा ।।
विजयी हो विजयी हो, विजयी हो, भारत देश हमारा ।।टेक।।
निर्भय हो यह देशकी माता, मंगल कीर्ती कराने ।
सत्य–शील, अरु निर्मल मन से, वीरोंको उपजाने ।।
सद्‌गुणी हो यह देशकी जनता, जीवन सुख सजवाने ।
रंक–राव–पंडित–भिखारी, सबको सुख दिलवाने ।।
विजयी हो, विजयी हो, विजयी हो, भारत देश हमारा ।।२।।
स्पृश्यास्पृश्य हटे यह सारा, देश कलंक मिटाने ।
सबके मन कर्तव्य–शील हो, धन उद्योग बढाने ।।
सबका हो विश्वास प्रभुपर, अपनी शक्ति बढाने ।
ब्रम्हचर्य, अध्यात्म, दैविगुण, घर–घरमें प्रगटाने ।।
सारा भारत रहे सिपाही, शत्रु को दहशाने ।
तुकड्यादास कहे स्फूर्ति हो, सबको भक्ति कराने ।।
विजयी हो, विजयी हो, विजयी हो, भारत देश हमारा ।।२।।

– राष्ट्रसंत श्री तुकडोजी महाराज



## शब्द-परिचय

(अ)

अखंडस्थिती – नित्य टिकणारी मूळ अवस्था
अखंडाकार – नेहमीकरीता पूर्ण
अखिल – संपूर्ण, सगळें
अगणित – बेसुमार, खूप
अगत्याने – जरूर, मुद्दाम, अवश्य
अगम्य – न कळणारे, शिरता न येण्यासारखें
अगाजा – गाजावाजा, धुमाकूळ
अगाध – अपार, अथांग, बेहद
अग्रस्थान – विशेष म्हत्त्व, मुख्य जागा
अग्रसर – पूढे धजणारा, पुढारी, उच्च
अग्निदीपन – पचनशक्ती व भूक वाढवणें
अचूक – बिनचूक, नेमका, बरोबर
अर्चन – पूजा
अजब–अजीब – नवलासारखे, विचित्र
अर्जी – प्रार्थना, आवड
अटळ – न टळणारा
अट्टाहास – हट्ट, जबरदस्तीचा प्रयत्न
अढळ – न ढळणारा, पक्का
अढी – अडथळा, आळा
अणूअस्त्र – ॲटम बॉंब
अणुरेणू – बारीकात बारीक कण
अतिमानव – माणसांपेक्षा श्रेष्ठ मनुष्य
अतिरेक – प्रमाणाबाहेर वागणूक
अतोनात – फारच फार
अत्याचार – बदमाशी, अन्याय, कहर
अत्युच्च – फारच थोर, उंच
अर्थ – भाव, मतलब, पैसा, लाभ
अर्थगौरव – अतिशयोक्ती, जास्तीचे महत्त्व देणे
अर्थव्यवस्था – धनाबाबतची योजना, पैशांचा उचित व्यवहार
अर्थहीन – व्यर्थ, अर्थ न जाणता
अर्थी – तिरडी (प्रेत नेण्याची)
अद्‌भूत – चमत्कारीक, नवलाचें
अदंभ – सरळपणा, ढोंग नसणे
अद्वैत – एकपण
अदृश्य – न दिसणारी वस्तू
अधम – नीच, हलक्या दर्जाचा
अध:पतन–अध:पात – घसरगुंडी, नाश, भ्रष्टता
अध्ययन – अभ्यास
अध्यक्ष – साक्षीभूत, मुख्य, अधिष्ठान
अध्यापक – शिक्षक
अध्यात्मभाव – आत्म्यासंबंधीची अवस्था
अधिकारपरत्वे – पात्रता पाहून
अधिष्ठान – आधारत्व, प्रार्थनेचे आसन
अधोगामी – खाली जाणार, हीन दर्जाचा
अर्धपोटी – अर्धा उपाशी
अर्धनग्न – पुरेसे वस्त्र अंगावर नसणारा
अनर्थ – संकट, घोटाळा, अन्याय
अनधिकारी – अपात्र, अयोग्य
अनन्य – एकजीव, सर्वस्वी अर्पण
अनन्यगती – एकनिष्ठा, एकपणा
अनवस्थाप्रसंग – गोंधळ, बेबंदशाही
अनाठायी – व्यर्थ, बेकाम, नको तेथे
अनाचार – गैर वागणूक
अनात्मता – आत्मा वगळून पाहणे, जडपणा, अज्ञान
अनात्मधर्म – जडाचे गूण
अनास्था – बेपर्वाई, हेळसांड
अनावर – बेफ़ाम, आवरता न येणार
अनासक्ती – वासना–मोह सोडणे
अनिवार – जबरदस्त, फार मोठे, अढळ
अनिवार्य – करणे भाग, टाळणे कठीण
अनिष्ठ – वाईट, नुकसानकारक
अन्य – दुसरे
अन्यत्र – दुसरे ठिकाणी, कोठेही
अनुकरणप्रीय – दुसऱ्यासारखे वागण्याची आवड असणारे
अनुकरण – दुसऱ्याची नक्कल करणे
अनुताप – पश्चाताप, वैराग्य
अनुपम – उपमा देता येत नाही असे
अनुभूत – अनूभव घेतलेले
अनुमान – अंदाज, तर्क
अनुरूप – साजेसे, पाहिजे तसे
अनुष्ठान – ठरावीक दिवसांचे साधे तप
अनुसरविणे – तसे वागायला लावणे

अनुसंधान – ध्यान, आठवण, जाणीव, निशाणा, धोरण

अनेकांतरी – पुष्कळांच्या मध्ये

अनंत – खूप, थाक न लागणारे, नष्ट न होणारे, ईश्वर

अपकार – नाश करणे, वाईट परिणाम

अपमृत्यू – अचानक मध्येच मरणें

अपव्यय – फालतू खर्च

अपरिग्रह – संग्रह न करणे

अपप्रचार – खोटा प्रचार, निंदा

अपाय – नुकसान, बाधा

अपूर्व – विशेष प्रकारचे, नवीनच

अपेक्षा – इच्छा

अपंग – दुखी, हातपायादी अंगे नसणारा

अबला – दुबळी, बळ नसलेली (स्त्री)

अबाधित – सदा कायम राहणारे

अभद्र – ओंगळ, विद्रूप, वाईट, अशुभ

अभयादी – निर्भयपणा वगैरे

अभावी – नसतांना, नसल्यामुळे

अभिनय – हावभाव, बतावणी

अभिनव – नवें व नवलाचे

अभिन्न – एक

अभिन्नपणे– अभेदत्वे – सारखे, एकपणाने, आपुलकीने

अभिनिवेश – अभिमान, धुंदी

अभिलाषा – इच्छा

अभेदभक्ति – देव–भक्त एक झाल्यावरची भक्ती, जगच देव समजून भक्ती

अभंग – न भंगणारा, अखंड, टिकाऊ

अभ्यंगस्नान – तेल मर्दून आंघोळ

अभ्यंतरी – आंत

अभ्यास – सवय, साधन, प्रयत्न

अमर्याद – व्यापक, हद्द नसलेला, बेफाम

अमर – न मरणारे, देवलोक

अमृत – अमर व सुखी करणारे तत्व

अमानुष – राक्षसी, माणसात न शोभणारे

अमूतं – निराकार, न दिसणारा

अमूप – पुष्कळ, फार

अमोलीक – किंमतवान

अमंगल – अपवित्र, दुखःकारक

अयोनिसंभव – आईच्या गर्भातून न जन्मणारा

अरबाडी – मांत्रीक, छू–छा करणारा

अरत्र ना परत्र – इहलोक ना परलोक

अरी – शत्रू, वैरी

अरूणोदय – पहाटेचे लाल आभाळ

अल्प – थोडे, लहान, कोते

अल्पबल – कमताकत

अल्पमृत्यू – थोड्या आयुष्यात मरणे

अल्पज्ञ– अल्पबुद्धी – कोत्या दृष्टीचा, थोडे जाणणारा

अल्पायासे – कमी प्रयत्नांनी

अलभ्य लाभ – मिळण्यास कठीण असा लाभ मिळणे

अलक्ष – दुर्लक्ष, हेळसांड, लक्षात न येणारा

अलौकिक – लोकावेगळा, सर्वात उत्तम

अलंकार – दागिने

अवकळा – दुर्दशा, गोंधळ, वाईट कला

अवडंबर – गाजावाजा, देखावा, पसारा

अवतरणे –उतरणे, प्राप्त होणे, जन्मणें

अवदशा – वाईट स्थिती

अवधान – लक्ष, जाणीव, चाणाक्षपणा

अवधी – वेळ, उशीर, फुरसत (सावधगिरी)

अवयवच्छेदन – हातपाय वगैरे देहाचे भाग कापणे (ऑपरेशन)

अवलंब – आधार, आसरा घेणे

अवलंबने – धरणे, भरवश्यावर राहणे (आधार घेणे)

अवलोकन – पाहणे

अवस्थापरत्वे – साधन व्यवस्थेतील फरकाप्रमाणे

अवस्थाभेद – पात्रतेचा फरक

अवास्तवपणा – नसत्या गोष्टी फुगवून सांगणे, अतिशयोक्ती

अविवेक – अविचारीपणा

अविभाज्य – एकसारखे, अलग भाग नसलेले, एकच एक

अविट – न विटणारे, विट न येणारे

अव्यंग – पूर्ण, निरोगी, निर्दोष

अव्हेरणे – झिडकारणे, दूर सारणे



अशक्य – न घडणारे

अश्लील – फाजील, वैषयीक, छचोर

अश्व – घोडा

असभ्य – उद्धट, जंगली, वाईट

असहकार – कोणतीही मदत न देणे

असह्य – सहन करणे कठीण

असहाय्य – निरुपाय झाला असा, निराधार

असाध्य – दुरुस्त न होणारे, न साधणारा

असंख्य – मोजता न येणारे

असंग्रह – साठा न करणे

असंत – ढोंगी, संत नसलेला, असत्य

अस्ताव्यस्तपणा – गैरशिस्त, अव्यवस्था, गोंधळ, चुथडा

अस्तित्व – असणे, जिवंतपणा, ठावठिकाण

अस्तेय – चोरी न करणे

अस्थि – हाडे

अस्थिपंजर – हाडांचा सापळा, रोडका

अस्पर्शता – हात न लावणे

अस्पृश्य – महार चांभार आदि जाती

अहर्निशी – रात्रंदिवस

अर्हंत – जैनांनी ठेवलेले देवांचे नाव

अहूरमज्द – पारशांनी ठेवलेले देवांचे नाव

अहिंसा – कोणास न दुखवणे

अहोरात्र – रात्रंदिवस

अहंता–अहंकार – अभिमान, कर्तेपणा

अहं–मम – मी व माझेपणा, अभिमान व आसक्ति

अक्षय – क्षीण वा नष्ट न होणारे, नित्यरूप

अक्षरशत्रू – अडाणी, अक्षरओळख नसलेले

(आ)

आइता – आपोआप, सहज मिळणारा

आकळणे – मिळणे, लक्षात घेणे, समजणे

आकर्षण – ओढ, ओढून, घेण्याची–मोहित करण्याची शक्ती, प्रेम

आक्रमण – हल्ला, जबरदस्ती

आकाशवाणी – रेडियो, बिन तारी तारायंत्र

आकुंचित – कोता, लहान मनाचा, मर्यादित, स्वतःपूरताच विचार करणे

आख्या – पदवी

आख्यान – कथानक

आगर – मूळ घर, खाण, भांडार

आगळा – भरपूर, वेगळ्या प्रकारचा, श्रेष्ठ

आघवा – सगळा, पूर्ण

आघात – धक्का, घाव, नुकसान

आचरण–आचार – वागणूक

आचवणें – पारखें होणे, मुकणें

आचार्य – गुरू, विद्येत प्रवीण, धर्माचे मुख्य

आच्छादणे – झाकणे, पसरविणे

आच्छादन – झाकण, वस्त्रांचे थर

आटाआटी – खटपट, त्रास

आटेसाटे – एकमेकांच्या घरीच मुली लग्नाने देणे

आटोक्यात – कबजात

आडंबर – ढोंग, पसारा, खोटा बडेबाज

आंतरीक – हृदयांतील

आर्त – दुःखी, देवासाठी तळमळणारा, तहानलेला

आत्म – आपला, आत्म्याविषयी, आपण

आत्म–अनात्म – जड व चेतनतत्व, आपण व माया

आत्मचंद्र – आत्मा हाच शांती व ज्ञानप्रकाश देणारा चंद्र

आत्मधर्म – आत्म्याचे स्वभावगुण

आत्मनिवेदन – स्वतःला अर्पून देणे

आत्मसेवा – आत्म्याचा विकास करण्याची सेवा

आत्मरंग – स्वरूपाचा आनंद, आत्मज्ञान

आत्मवत – आपल्यासारखे

आत्मवश – आपल्या ताब्यात

आत्मविकसन – आतल्या शक्तीचा विकास

आत्मशुद्धी – स्वतःला सुधारणे, मनाची सफाई

आत्मस्थितीभाव – आत्मरूपाची समाधी

आत्मसंतोष – स्वतःचे मनाचे समाधान

आत्मसात – अंगी बानविणे, स्वाधीन

आत्मा – आपण, जिवाचे खरे स्वरूप, हृदय, जिव्हाळा

आत्मानुभव–आत्मानुभूती – आत्मरूपाचा किंवा स्वतःचा अनुभव

आत्माराम – आत्मा हाच देव, परमात्मा

आत्मीयता – आपूलकी

आत्मोन्नती – स्वतःचा आतून विकास, उच्चता

आदर्श – उत्तम नमुना, नमुनेदार

आदरणे – सम्मान देणे
आदी – सुरूवात, मुळचे, वगैरे
आदीवासी – पूर्वीपासूनचे रहीवासी, मागासलेले
आदेश – निरोप, आज्ञा, उपदेश
आद्य – पहिले, मुख्य
आंदणे घेणे– नेहमीकरीता मागे लावून घेणे
आंदोलन – चळवळ, क्रांती
आधीव्याधी – मनाचे व शरीराचेदुखःरोग
आधुनीक – चालू काळातील, अलीकडचे
आध्यात्मीक – आत्म्याविषयीचे, ईश्वरीय, स्वतःपासून होणारे
आनुवंशिक – वंशपरंपरेने येणारे
आपगर्जी– आपस्वार्थी – स्वतःच्याच फायद्यात गुंग
आपत्ती – संकट, दुखः
आपैसा – सहज, आपोआप
आब्रम्हशूद्र – ब्राम्हणापासून शुद्रापर्यंत सर्व
आबाल – गैरसोय, हेळसांड
आभास – वाटणे, भास होणे
आम्रतर – आंब्याचे झाड
आमंत्रित – बोलावणे, आवतण दिलेला
आमिष – लालूच, मांसाचा तुकडा
आमोद – सुगंध
आर्य – उच्च आचारविचारांचे
आयोजन – योजना, व्यवस्था, कार्य
आराधना – भक्ती, प्रार्थना
आरोग्य – निरोगीपणा, रोगराई न येणे
आरोप – वस्तूवर वेगळीच कल्पना करणे
आलख – अलक्ष परमात्मा
आलाप – गाण्याची तान घेणे
आवरण – गवसणी, झाकण, वेढा
आविष्करण–आविष्कार – जन्म, प्रकट, होणे, शोध, फळ
आशीश – आशीर्वाद
आसक्ति – अति मोह, सकाम प्रेम
आसक्त–आसक्तिक – लोभमोहात पडलेले
आस्तिक – देवधर्म मानणारा
आस्वाद – गोडी, चव, अनुभव
आहार – खाणेपिणे
आहारी – कबजात, भिडत
आळी – हट्ट, मोडा, अडथळा, बंधन

(इ – ई)

इजारदार – पूर्वीचे गावाचे अधिकारी
इंद्रियदमन–निग्रह–जय – इंद्रिये ताब्यात ठेवणे
इंद्रियविषयदोषदर्शन – इंद्रिये व त्यांचे विषय याचे वाईट स्वरूप दाखविणे
इभ्रत – इज्जत, मानप्रतिष्ठा
इस्लाम – मुसलमान, शांती व पवित्रता राखणारा
इष्ट – योग्य, फायदेशीर
इष्ट देव – उपास्यमुर्ती, आवडेल तो देव
इह–पर – सांसारीक व परमार्थीक, या जन्मी व मेल्यानंतर
ईश्वरार्पण – देवाला वाहून देणे
ईशपुत्रावतार – देवाच्या मुलाचा अवतार
ईषणा – स्त्रीपूत्रधनादिकांबाबत नैसर्गीक वासना
ईर्षा – हिरस, हेवा

(उ – ऊ)

उक्ति – वचन, बोल
उमग – झरा, जन्म
उग्र – भीती वाटण्यासारखे
उगीदुगी – निंदा, चहाडी
उच्चतम – वरच्यात वरचे, श्रेष्ठ
उच्चता – वरिष्ठता, सुधारणा, उत्तमपणा
उच्चाटन – नाश, उपटून फेकणे
उचंबळणे – उसळणे, भरून येणे
उच्छिष्ट – उष्टे
उच्छेदन – नाश
उजडे – उजाड, खुले
उजागरी – हक्क, वाव, मोकळीक
उज्वल – उजळ, तेजस्वी, पवित्र, उच्च
उठाउठी – झटपट, एकदम, उठल्यासुठल्या
उठाठेव – खटपट
उड्डाण – उडी, उडणे
उणे–उणी–उणीव – कमतरता, कमजोरी, दोष
उत्कर्ष – वाढ, उन्नती, भरभराट
उत्कट – कमालीचे, जोरदार, अती
उत्तेजित – उत्साही, तयार
उत्थान – उठावणी, जागृती, उन्नती



उत्पादन – उत्पन्न, पिक, माल
उत्सवप्रिय – उत्सवाची हौस असणारा
उदय – उगवणे, प्रकट होणे, पुढे येणे
उदरकुंदी – पोटफुगी, मलबद्धता
उदरपुर्ती – पोट भरणे
उदारचरीत – मोठ्या मनाचा, दयेने वागणारा
उद्गार – विचाराचे वा भावनेचे बोल
उद्बोधक – जागृत करणारे, बोध देणारे
उद्भव – जन्म, उत्पन्न होणे
उद्भिज – जमीनीतून जन्मणारे
उदेला – उगवला, वर आला
उदंड – भरपूर, फार मोठे
उद्यम – उदिमधंदा, प्रयत्न, उपाय
उद्यापन – व्रत उजळणे, समाप्ती
उद्दिष्ट – ध्येय, हेतू
उद्योगहीन – धंदा नसलेला, रिकामा
उधळणे – फेकणे, फालतू खर्च करणे
उद्धरण–उद्धार – कल्याण, वरची धारणा
उन्नतीवाद – वर चढण्याची विचारसरणी
उन्मत्त – अविचारी, माजलेला, धुंद
उन्मनी – मन स्वरूपी लीन होणे
उन्माद – नशा, धुंदी, चढेलपणा
उन्मुख – वळलेला, तयार, उत्सूक
उपक्रम – नवे कार्य, साधन, सुरवात
उपकारक – पोषक, फायदेशीर
उपचार – उपाय, औषधीयोजना, सेवा
उपजणे – उत्पन्न होणे
उपजत – मुळचीच, जन्मापासून
उपद्व्याप – भानगड
उपद्रव – जाच, तकलीफ
उपनयन – विद्येचे व्रत, मौज
उपनिषदे – आत्मज्ञानाचे संस्कृत ग्रंथ
उपभोग – सुखचैन, भोगणे, फायदा घेणे, स्वार्थ
उपयुक्त – उपयोगी, फायदेशीर
उपराम – वैराग्यशाली, रमून जाणे
उपलब्ध –मिळण्यासारखे, तयार, प्रकट
उपशम – शांती, समाप्ती
उपहास – थट्टा, टिंगल
उपांगे – इतर बाजू, साधारण अंगे
उपाधी – भानगड, जबाबदारी, व्याप
उपासना – भक्ति, साधनमार्ग, मनाने देवाजवळ राहणे
उपास्य – आवडता देव
उपेक्षा – टाळाटाळ, हेळसांड
उपेक्षिला समाज – दूर ठेवलेल्या जाती
उबगणे – कंटाळणे
उभयता – दोघे, पतिपत्नी
उमजणे–उमगणे – कळणे, जाणणे
उमगला – जाणता, ज्ञानी
उरी – वाव, जागा, बाकी
उष्ण – गरम, ऊन
उषःपान – पहाटेस नेमाने पाणी पिणे
ऊनखून – मर्म, खरें तत्त्व
ऊर्ध्व – वर, उच्च
ऊर्मि – उकळी, इच्छा, जोश, प्रवृत्ती
उर्वि – पृथ्वी, जमीन

(ए – ऐ)

एकत्व – एकपणा, समानता, ईश्वराचे मुळरूप
एकतत्वी – एकाच तत्वाचे
एकतानता – एकाच गोष्टीत गढून जाणे
एकनिष्ठा – एकावरच विश्वास, पक्की श्रद्धा
एकवट – एके ठिकाणी
एकसुताने – एका मते, प्रेम
एकाग्र – स्थिर एकतान
एकात्मक – मुळात एकच
एकात्मता – एकमय होणे, समानता
एकासनी – एकाच अधिष्ठानावर
एनिबेझंट – (थी–ऑसफी) पंथ स्थापणारी पाश्चात्य संत महिला
ऐक्यप्रेम – एकपणाचे, एकीचे प्रेम
ऐक्यसुत्र – एकत्र करणारा धागा
ऐतिहासीक – मागे झालेल्या महत्त्वाच्या गोष्टीचे
ऐरावत – सर्वात मोठा हत्ती
ऐश्वर्य – वैभव, ईश्वरपणा, श्री–यश औदार्य–ज्ञान–वैराग्य–दिव्यत्व हे अवतारी पुरुषाचे षडगुण
ऐहीक – या जगातील, व्यवहारीक

(ओ – औ)

ओखटे – वाईट
ओज – मुळचे तेज, सहज प्रभाव

ओजस्वी – परिणाम करणारे, भारदस्त
ओठाओठी – तोंडोतोंडी, बोलता–बोलता
ओढ – आवड, धाव
ओढवणे – अंगावर घेणे
ओतप्रोत – भरपूर, ठासून
ओसरून जाणे – कमी होणे, कंगाल होणे, घसरणे
ओसणणे – झोपेत बरळणे
औदार्य – उदारपणा, दयाळूपणा
औदासीन्य – उदासपणा

(अं)

अंकुर – कोंब
अंकी – मांडीवर
अंगे – भाग, पैलू (बाजू), स्वतः
अंडज – अंड्यातून जन्मणारे प्राणी
अंत – नाश, थांग, शेवट
अंतर्ज्योती – विचारशक्ती, आत्मा
अंतर्बाह्य – आंत–बाहेर, पूर्णपणे
अंतर्भाव – गणना, सामील करणे
अंतर्मुखता– वृत्ती विचाराने आत बळणे, आत्म्याकडे धाव, तत्त्वाचे ज्ञान
अंतरंग – मन, आंतले स्वरूप, तात्त्विकता, आत्मस्वरूपासंबंधी
अंतरींद्रीये – शरीराचे आंतील भाग
अंतरीक्ष – आकाश
अंत्यविधी – मरणानंतरचे क्रियाक्रम
अंतिम – शेवटचे, अति उच्च
अंधपंगु – आंधळे, लंगडे
अंधानुकरण – विचार न करता दुसऱ्यासारखे करीत सुटणे
अंश – कण, तुकडे, भाग
अंशावतार – देवावताराचे षड्गुण ऐश्वर्य थोड्या प्रमाणात ज्यात प्रकट आहे असा

(ऋ)

ऋण – उपकार, कर्ज
ऋणत्रय – देव, ऋषिसंत व पिता यांचे ऋण
ऋतू – वातावरण, काळवेळ, मोसम, वर्षाचे सहाभाग (वसंतादी)
ऋषिकालीन – ऋषींच्या वेळची
ऋषिबोली – मुळ संस्कृत भाषा

(क)

कज्जेदलाल – भांडणे विकत घेऊन चालवणारे
कटी – कमर
कटुफळ – वाईट परिणाम
कर्तुत्व – कार्य, कर्तबगारी, कर्तेपणा
कर्ता हर्ता – तयार करणारा व नष्ट करणारा
कदर्यू – कंजुष
कथन – सांगणे
कथीत – सांगितलेले
कर्दम – चिखल
कदा, कदापी – केव्हाही, कधीच
कनवाळू – दयावंत
कनीष्ट – कमी दर्जाचा
कर्म – काम, कार्य, कर्तव्य
कर्मकहाणी – दुःखाची कथा
कर्मठता – कर्मकांडावर, अतिरेकी श्रद्धा, तत्त्व सोडून कर्माचा हट्ट
कर्मभ्रष्ट – कर्तव्यास चुकलेला
कर्ममय – कर्मानी बनलेली, कार्यरूप
कर्मस्वतंत्र्य – प्रयत्न करण्याची स्वतंत्र्य शक्ती
करतळी – हातावर
कर्महीन – काम न करणारा, दुर्दैवी
करणी – कर्तव्य, वागणूक, प्रयत्न
करंटेपण – दारिद्र्य, आळसीपणा, दुर्दैव
कलमकसाई – लेखणीने खोट्याचे खरे करून नाडविणारे
कला, कलाकुसरी – करामत, कारागिरी, चातूर्य, मोह पाडणारे काम
कलाकार, कलाधिकारी – कलावान, कलावंत
कल्पकाळ – चारयुगे संपेपर्यंत
कल्पांती – कधीही
कल्पावा – मानावा, मनाने उभा करावा
कल्याणकारी – हित करणारा, फायद्याचे
कलंकशोभा – डागही शोभून दिसणे (चंद्र)
कवळ – घास
कविश्वर – श्रेष्ठ कवि
कष्टार्जित – प्रयत्नांनी मिळविलेली
कस – शक्ति, कसोटी, किंमत
कळस – शेवट, सर्वात, उंच ठिकाण



कक्षा – वर्ग, हद्द, दर्जा, पायरी
काज – काम, उद्देश
काजवा – आग्या
काम – कार्य, भोगवासना, इच्छा, मदन
कामना – इच्छा
कामवृत्ति – भोगाची वासना
कार्यकलाप – पुष्कळ कामांचा समुदाय
कार्यक्षम – काम करण्याची पूर्ण शक्ति असलेला
काया – शरीर, कांती (रंगरूप)
कायाकल्प – शरीराचा उत्तम पालट नवी जीवनशक्ति देण्याची किमया
कारण – कार्याचे मुळ, आधारभूत, महत्त्व, गरज, बाब, साधन, योग्य काम
कालानूसार – वेळप्रसंगाला धरून
काव्यसृष्टी ईश – मोठे कवि
काश्या तू मरणान्मुक्ति – काशीत मेल्याने मुक्ति
कास – आधार, कमर, पिच्छा, सहारा
कासया – कशासाठी
क्रियमाण – संग्रही (संचितांत) पडणारे नवे प्रयत्न
क्रियाशील – नेहमी कार्य करणारे
क्रियाशीलपणे – प्रत्यक्ष कार्यरूपाने
क्रिडांगण – खेळांचे मैदान
किर्ती स्फुर्तीरूपा येणे – किर्तीने लोकांना स्फुर्ती मिळणे
कुकमे – वाईट कामे
कुग्राम – वाईट गाव
कुचंबणा – कोंडमारा, फजिती
कुटिलता – कारवाई, वाकडेपणा, हीनपणा
कुटीर – झोपडी, आश्रम
कुटुंबीय – घरामधले, परिवारातले लोक
कुबेर – सर्वात मोठा खनिजदार
कुमती – वाईट बुद्धी, दृष्ट
कुरण – हिरव्या चाऱ्याचे रान
कुराण – मुसलमानांचा धर्मग्रंथ
कुलांगार – घराणे बुडवणारे
कुष्ठरोग – महारोग
कुसरी – कारागीरी, चातूर्य, ज्ञान
कृत – केलेले
कृतकृत्य – धन्य, सफल, केल्याचे सार्थक
कृती, कृत्य – कार्य, काम, प्रत्यक्ष वागणूक
कृत्रीम – नकली, ओढून ताणून बनविलेले
कृषिप्रधान – मुख्यतः शेतीवर जगणारा
क्रुरता – दृष्टपणा, निर्दयपणा, क्रोध
केवी – कशा प्रकारे, कशी
कैची – कसली, कुठली, कशाची
कैवल्य – निव्वळ चैतन्य, केवळ स्वरूप स्थिती मुक्त अवस्था, ब्रम्ह
कोटी – शंभर लाख, दर्जा, प्रकार, अवस्था
कोड – कौतूक, पांढरा डाग
कोडे – पेंच, संकट, चिंता, कौतूकान
कोदंडधारी – धनूष्य धरणारा, राम
कोप – राग, बिघाड
कौशल्य – चातुरी, कारागिरी
कंचे – खेळायच्या गोळ्या (गोट्या)
कंटक – काटे, दुष्ट लोक
कंठी धारण – मुखपाठ, वाचन
कंठरव – घशाची ओरड
कंदर – पर्वतांची दरी
कँवरराम – सिंधमधील महात्मा
कांगावा – आरडाओरड, हट्ट
कांता – बायको
कांती – तेज
क्रांती – बदल, उलथापालथ
क्रांतीकारी – एकदम बदल करणारी
किंबहुना – फार कशाला, इतकेच नव्हे तर
कुंज – वेलींची गुंफा
केंद्र, केंद्रस्थान, केंद्रबिंदू – मुळ ठिकाण, मिळण्याची जागा
कोंदला – भरला

(ख)

खडाष्टक – सहाव्या व आठव्या स्थानी विरूद्ध ग्रह, पदोपदी खटके–भांडणे
खतद्रव्य – खतांत असलेले पीक देणारे रससामर्थ्य
खस्ता – झिज, त्रास
खल – खलबत्यात घोटणे
खळ – दुष्ट
खाणी – सोने–कोळसा वगैरेच्या खदानी, स्वेदज आदि जीवांच्या चार खाणी

खादले – खाल्ले
खाद्योत्पत्ती – खाण्याच्या वस्तू उत्पन्न होणे
खात – शेण, केर वगैरेचे खत
खातारोग – मेवा मागणारा ढोंगी रोग
खानपान – खाणेपिणे
खिल्लारे – कळप
खेव – शीण, धाक, उपद्रव
खोडके – खप्पड, बसलेले, लाकुड
खोडी – खोडसाळपणा, वाईट सवय
खोली – मर्म, थांग, तत्व
खंड – तुकडे, भेद, मध्ये बंद पडणे

(ग)

गगनभेदी – खुप उंच, आकाशाला फोडून जाणारे
गगनमंडळ – आकाश, जगाची हद्द, हृदयाकाश
गठबंधन – गाठजोडा, एकी
गडणे – शिरणे, रुतणे
गणवेष – ठराविक असा सारखा बाणा (कपडे)
गणावे – समजावे, मानावें
गतात्मा – गेलेला जीव, मेलेला प्राणी
गति – स्थिती, रीत, शेवट, परिणाम, वेग, उद्धार
गतिमान – वेग पावलेले, सुरू झालेले, जोरदार
गर्तेत – गढ्ढ्यात, अवनतीत, पापांत
गर्दभ – गाढव, गधें
गर्भरेशमी – आंत रेशीम असलेले (कपडे)
गमन – जाणे येणे
गम्य – मर्म, आंतील गोष्ट, प्रवेश
गल्ला – धनधान्याची रास
गवगवा – गाजावाजा, प्रचार, ओरड
गवसणे – मिळणे, साधणे
गवार – गावढळ, अडाणी
गहिवर – हृदय भरून येणे, प्रेम
गृहस्थापना – घर बांधणे
ग्रहण – घेणें, खाणें, सुर्यचंद्राचा लोप, स्वीकार
गॉड – ख्रिस्ती धर्मातले देवाचे नाव
गाढे – मजबूत, भरपूर, घट्ट, खोल
गात्र – शरीराचे हातपायादी अवयव
ग्रामकुटुंबयोजना – पूरे गाव हे एक घर
अशी व्यवहाराची मांडणी
ग्रामजोशी – गावचा जबाबदार ब्राम्हण
ग्रामदेवता – गांव हाच देव, गांवाची गुप्त शक्ती
ग्रामवासी – गावचे रहीवासी
ग्रामशत्रू – गावाची हानी करणारे
ग्रामाधिकार – गांवाची सत्ता
ग्रामीण – गावी होणारे, गावकरी, गावातील
ग्रामोद्योग – गावचे उद्योगधंदे
गायक – गाणे म्हणणारा
गारद – बरबाद, जमीनदोस्त
गालबोट – गालाला लावलेले काजळ
लहानसा डाग
गावखर्च – गावाचा पैसा
गावगंगा – गाव हीच गंगा, गावची नदी
गांवशील – गांवाची उत्तम वागणूक
ग्रासणें – खाणें, कबजांत घेणें, मिळणें
गीताप्रिय – भगवद्गीतेला रूचणारे, मान्य
गुढी – झंडा, किर्ती
गुच्छाकार – एकच, गोड्यासारखा
गुण – राशीचें गुण, चांगला स्वभाव
गुणप्राधान्य – गुणास महत्त्व, ठराविक गुण अधिक
वा मुख्य असणें
गुणविवाह – सद्गुण पाहून लग्न करणें
गुणसाम्य – गुणांचा सारखेपणा
गुणावगुण – गुण व दोष
गुणें – कारणानें, मुळे
गुरुत्व – गुरुपणा, गुरुदेवाचे स्वरुप
गुरुत्वाकर्षण – लहानाला ओढण्याची मोठ्या वस्तुची
शक्ती, वर फेकलेली वस्तू जमिनीवर
पडण्याचा निसर्गनियम
गुरु–शास्त्र–स्वानुभव – गुरुप्रचीति, शास्त्रप्रचीति
व आत्मप्रचीति यांचा पडताळा
गुहक – कोळी, भोई
गोजिरें – सुंदर
गोघृतदुग्धतक्रपान – गायींचे तुप, दुध, ताक पिणे
गोचरभूमी – चराईचे गायरान
गोट – गट, टोळी
गोडवे – स्तुती, महत्त्व सांगणे, चोचले
गोत – नातेवाईक
गोधन – गायी हेच धन, खूप गायी
गोमट – शुद्ध , चांगली, सुंदर



गोमय – शेण
गोरस – गायीचे दुध दही वगैरे रस
गोवणे – गुंतवणे, घालणे, गुंफणे
गोवत्सठाणा – गोठा, गोठाण (गोस्थान)
गोवंश – गायीचा वंश, गाईगुरे
गोसावी – विरक्त, इंद्रिये जिंकणारा, सडाफटींग
गोस्वामी – गोसावी, तुलसीदासजी
गौण – कमी महत्त्वाचे, दुय्यम, टाकुऊ
गौरव – कीर्ति, मोठेपणा, सन्मान
गौरवे – थोरपणाने, प्रामुख्याने
गौरागदेव – चैतन्य महाप्रभु
गंगेतील पाषाण – गंगेत बुडून आतुन कोरडे
राहीलेले लोक
गंगोदक – गंगेचे पाणी
गंदेपणा – घाण, गलिच्छाता
गधं – वास, चंदनलेप वगैरे
ग्रंथसाहेब – शीख गुरुस्थानी मानतात असा
संतभजन–संग्रह
ग्रंथसंपत्ती – ग्रंथ हेच धन, ग्रंथाचा साठा
ग्रंथातरी – ग्रंथामध्ये
गुंड – बदमाष
गुंतवळे – गुंतागुंत
गुंफणें – कुशलतेने गुंतवणे, एक होणें, गुंतागुंत होणे

(घ)

घटक – लहान पण मुख्य भाग
घटोपाधी – घागरीचा व्याप–संबंध–पडदा
घडण – वळण, आकार, व्यवस्था, तयार करणे
घडी – घटका, व्यवस्था, चांगली रचना
घृणा – किळस, तिरस्कार
घाले – संकट
घोर – भयंकर
घोष, घोषणा – गरज, गर्जना

(च)

चक्र – चाक
चक्रपाणी – सुदर्शन किंवा सृष्टिचे चक्र हाती
असणारा देव
चट, चव – चटक, आवड
चर्च – ख्रिस्ती लोकांचे प्रार्थनामंदीर
चमत्कारलाघव – चमत्कारांचे कौतूक
चर्म–कला – चामड्याच्या वस्तू करण्याची
(चर्म – चामडे) कला
चराचर – स्थिर व चालणारे जिवजग
चरित्र – जिवनकथा, वागणूक, शिल, निती
चाड – गरज, आवड, किंमत
चातक – पाण्याची आतरुतेने वाटपाहणारा पक्षी
चातुर्वर्ण्य – गुणकर्मानी पदणाऱ्या माणसांच्या चार
प्रकारांवर पूर्वी झालेली
समाजव्यवस्था
चापल्या – चपळपणा, तरतरी
चारित्र्ययोगी – आचरणाची उन्नति
चारित्र्यक्षम, चारित्र्यवंत – चांगले वागणारे
चालक – चालवणारा
चाळवी – हालवी
चाळा – प्रयत्न, घडवड, सहजसवय
चिकित्सक – शोधक बुद्धचे
चिता – सरण
चित्रण – चित्रें, मांडणी, रेखाटणें
चित्रहुती – पात्राजवळ घास ठेवण्याची प्रक्रीया
चिरेदार – धारदार, टोकदार, सुंदर
चेतना – हलनचलन, स्फुर्ती, जाणीव, जोश, जागृती,
चैतन्य
चेतणे – पेटणे, भडकणे, जागृत होणे
चेतवणे – चिथावणी–उठावणी देणे, पेटवणे
चैतन्य – नवा जोम, ब्रम्हस्वरूप, चैतन्य महाप्रभू
चैतन्यघन – घनदाट भरलेले ब्रम्हतत्व
चोख, चोखटे – उत्तम, सुंदर, गोड, रोखचोख
चोखडे – चांगल्या प्रकारचे
चोहटा – चौरस्ता, चव्हाटा
चौघडे – नगारे
चौफेर – चहूकडे, सभोवार
चांग – चांगला, उत्तम
चिंतन – आठवणे, विचार करणे
चिंतातूर – फिकिरत पडलेला
चुंगी – धान्य वगैरेची वर्गणी

(छ)

छत्तिसी – विरोध, वैर
छात्रालय – विद्यार्थ्यांसाठी वसतीगृह
छाप – प्रभाव

छावणी – घर शाकारणे, छप्पर
छिन्नभिन्न – तुकडे तुकडे होणे, अस्ताव्यस्त
छी:थू – थट्टा, फजिती, अपकिर्ती
छी:छी – नको नको, दूर रहा
छेदणे – नाहीसा करणे

(ज)

जगचालक, जगनियंता, जगन्नायक, जगजेठी, जगत्पती, जगद्वंद्य– परमेश्वर
जगजेते – जगाच्या भावना जिंकणारे
जजेर – दुःखी, जीर्ण, जिरलेला
जडजिव – फारच अज्ञानी प्राणी
जडान्न – पचायला कठिन मिष्ठान्न
जणू – जसे काही
जतन – रक्षण, प्रयत्न
जत्था – जमाव, टोळी
जनक – उत्पन्न करणारा, बाप
जनगण – लोकसमुदाय
जनताविद्यापिठ – जनतेचे कॉलेज, खुले ज्ञानसत्र
जनतंत्र – लोकांच्या मतांवर चालणारे राज्य
जनमानस – लोकांचे मन
जन्मजात – जन्मावरून, जन्मापासून
जन्मांतरीचे – दुसऱ्या जन्मातील
जनार्दन – जनतेत व्यापलेला ईश्वर
जपणे – सावधगिरी घेणे, स्मरणे करणे
जयंती – थोरंचे जन्मदिवस
जलपुर्ण – पाण्याने पूर्ण भरलेले
जलआवर्तन – पात्राभोवती पाणी फिरणे
जंद – जेव्हा, जर, जोपर्यंत
जाच – वास, छळ
जातीय – जातिभेदासंबंधीचे
जातीयता, जातिनिष्ठता – आपले जातीकुळ उत्तम समजून इतरांस हीन मानण्याची वृत्ती
जारज – जाळ्यातून जन्मणारे
जिव्हा – जीभ
जिव्हाग्री – जिभेच्या शेंड्यावर
जिव्हाळा – कळकळ, झरा
जिज्ञासा – जाणून घेण्याची तळमळ
जीर्ण – जुनाट, जर्जर, म्हातारा
जिवधर्म – जिवांचा नैसर्गीक स्वभाव

जिवन – आयुष्य, पाणी, चैतन्यशक्ती
जिवनक्रम – जगण्यास जरूर अशी कामे
जिवनकला – मानवता, सहकार्य दृष्टी जगण्याची खरी कला
जिवनकोष – आयुष्य हाच ग्रंथ
जिवनजय – आयुष्य यशस्वी करणे
जिवनदर्शने – जिवनाच्या आदर्श कथा
जिवनदृष्टि – टत्तम जगण्याचें ज्ञान, आयुष्याकडे वाहण्याचा विचारी
जीवनमान – आयुष्याचें प्रमाण (दृष्टिकोन)
जीवन्मुक्ति – स्थितप्रज्ञता, जिपंतपणीं मोक्षसुख अनुभवीत व्यवहार करणें
जीवनमुल्यें – जीवनाला उवयोगी गोष्टी जीवनाचें महत्त्व,जीवनाच्या दृष्टीने किंमत ठरवणें
जिवनसंग्राम – जगण्याची ओढाताण
जिवनसंचार – जगण्यास पोषक शक्ति पसरविणे
जिवनातून उठणे – समाजात स्थान नसणे आयुष्य बिघडणे
जिवनोद्यमे – जगण्यास उपयोगी धंदे
जिवापाडे – जिवाबरोबरीने, जिवापलीकडे, जिवाभोवती
जुजबी – मामुली, वरवरचे, थोडे
जेणे – ज्यामुळे
जोखड – जुं, भार, जबाबदारी
जोड – मदत, लाभ, ठेवी
जोडणे – मिळणे, मिळवणे, प्राप्त होणे
जोपासना – पालन, सांभाळ, व्यवस्था
जोम – शक्ति
ज्योती – ज्योत, तेज, प्रकाश, ज्ञान
जंबुक – कोल्हा
जांबवती – अस्वल जातीच्या जंगली माणसाची मुलगी
जिंदगाणी, जिंदगी – संसार, जिवन, निर्वाह, मालमत्ता

(झ)

झणी – लौकर, कदाचीत, जणू
झरतृष्ट्र – पारशी धर्माचे संस्थापक संत
झरण – झरे
झळ – झीज, शेक
झळाळ – चकचकीत



झाडणी – झडती, नेटाची तपासणी, झाडू
झेला – गुच्छा
झेप – उडी, धाव
झोका – दांडीला दिलेला झटका
झुंज – कुस्ती (झुंजणे – लढणे)

(ट–ठ)

टपणे – स्थिर होणे, गुंग होणे
टाकोले हिर – जाते वैगेरे तासल्याने निघणारा चुरा
टापणे – आखणे, अंतर मोजणे, तासणे
टालस्टाय – रशियातला ग्रामोद्धारक महात्मा
टिकाग्रंथ – खुलासा करणारे ग्रंथ
टोळभैरव – उड्डाणटप्पू, आइतखाऊ
ठाकणे – उभे राहणे, नखरे करणे, शक्य होणे
ठाय – ठिकाण, थांग
ठावे – ठाऊक, माहित
ठेलो – राहिलो
ठेव – ठेवी, लाभ, पाया, योजना, पुंजी

(त–थ)

तकलादी – तकली, पोचट, निरुपयोगी
तर्कशुद्ध – बुद्धीला पटणारे, खरेखुरे
तगणे – टिकणे, जगणे
तट – तुकडे, गट, विरोधी पक्ष, किल्ल्यांची भिंत, किनारा
तत्काळ, तत्क्षणी – लगेच, त्याचवेळी
तत्त्वचिंतानुवाद – ज्ञानचर्चा, तत्त्वाचे विवरण
तत्त्वत: – खरोखर, तत्त्वाच्या दृष्टीने
तत्त्वयोजना – तत्त्वाची योग्य मांडणी
तत्त्वज्ञान – मुळ गोष्टीची माहिती
तत्त्वार्थ – खरा अर्थ, खरे स्वरूप
तत्त्वनुसंधान – तत्त्वाची आठवण
तद्रुप, तदाकार – एकमय, समरस, त्याच आकाराचे
तन्मय, तल्लीन – समरस, गुंग, मस्त
तत्पर – तयार, सज्ज, मग्न
तद्वत – त्याप्रमाणे
तप–तपस्या – कष्टाचे साधन, कायावाचा मनाकडून नेटाने उत्तम कामे करविणे
तपशिलवार – बारिक माहितीसह, मुद्देसुद
तप्त, त्रस्त – तापलेले, दुखी, त्रासलेले
तरुतळी – झाडाखाली

तव – तेव्हा, त्याऐवजी, तर, तोवर
त्वचाशक्ति – चमड्यातील गुप्त ताकद
त्वरीत – लौकर
तातडी – घाई
तात्पर्य – सार, मतलब
तात्विक – तत्त्वांसंबंधी, मुख्य, मुळचे, खरेखुरे
तात्विकता – मुळचेरुप, मुळगोष्टीचे ज्ञान
ताब – ताकद
तामस – तामोगुणी
तारका – चांदणी
तारतम्य – वेळ, ठिकाण व पात्रता पाहून कमी अधिकपणे उपयोग करण्याची कुशलता, सखोल व चौफेर विचार
तारांबळ – धावपळ, धांदल
ताल – गाण्याचा ठेका, शिस्त, नियम
तालतितंबा – गोंधळ
तालबद्ध – तालात बरोबर
ताळतंत्र – नियम, ताळमेळ, आगापिछा
त्रागा – वैताग, जळफळाट, हट्ट काकुळती
त्रिविधताप – आधिभौतीक, आधिदैविक व आध्यात्मिक (पंचभुते–प्राणी, देवता व स्वत:चे शरीर–मन यांपासून होणारे) हे दुखाचे तीन प्रकार
त्रिकाल – सकाळ, दुपार, संध्याकाळ, तिनवेळ
तिजा – तिसरा
तितिक्षा – सोशिकपणा, सहनशक्ति
तिरछी – तिरप्या डोळ्याची
तिसरा नयन – ज्ञानाचा डोळा, आग्निनाडी सुषुम्ना
तिर्थकर – जैनांचे मुळचे धर्मगुरू
तिव्र – जोरदार, खरपूस, भडक
तुतारी–अणा – बैलांना टोचायची पुराणी
तुरळक – क्वचित, थोडे, एकटदुकट
तुरूंग – कैदखाना (जेल)
तुल्य – बरोबरीचे, तोडीचे, सारखे
तृप्ती – शांती, प्रसन्नता, पुर्णता
तृष्णा – लोभ, तिव्र वासना
तेजोमय – प्रकाशमान, तेजस्वी, पवित्र
तेधवा – त्यावेळी
तोल – झोक, ओघ, धाव
तोलाचे – तोडीचे, साजेसे

तोष – संतोष, प्रसन्नता, तृप्ती
तंडणे – भांडणे, वादावादी करणे
तंत्र – पद्धती, कला
तंबी – धमकी
तांडा, तुंगा – मेळावा, टोळी, समुदाय
तों – तोपर्यंत, तेव्हाच, तर
तोंडपाटीलकी – नुसते दुसऱ्यांना राबवणे
थवा – झुंड, जमाव
थैमान – गोंधळ, नंगानाच
थोतांड – फलतू अवडंबर, अधार्मिकता, वाईट गोष्ट

(द)

दधीची – देवांना जय मिळावा म्हणून आपल्या हाडांची शस्त्रे देणारा वेदकाळाचा ऋषी
दर्पण – आरसा
दमन – धाकदडपण, जबरीने ताब्यात आणणे, पाडाव
दरिदरकुटे – अडथळे, खाचखळगे
दलित – दबलेला, मागासलेला, दुखी
द्रवणे – पाझरणे
दर्शन – पाहणे, दाखविणे, शास्त्र
दृष्टादृष्यदर्शन – पाहणारा, दिसणारे व पाहणे ही त्रिपूटी अर्थात सारे द्वैत जग
दृश्य – दिसणारी वस्तू, देखावा
दृष्टांत – उदाहरण, साक्षात्कार, सुचक स्वप्न
दहन – जाळणे
दशहत – धाक, भिती
दळभद्र – कपाळकरंटा
दक्षता – काळजी, सावधगिरी
दक्षकारूणी – चाणाक्ष व दयाळू (भावनाप्रधान)
द्वाड – वाईट
दाद – हाक, फिर्याद
दायी – देणारे, मुले सांभाळणारी बाई
दारूण – फार, भयंकर
द्वारे – दरवाजे, मार्फत्तीने, कडून, मार्गाने
दावणे – दाखवणे
दावण – ओळ, झुंड
दास्य – गुलामगिरी, सेवाभक्ति
द्वाही – बडे जाव, गाजावाजा
दिक्प्रांत – दाही दिशांतील मुलूख
दिगंतरी, दिगंती – देशोदेशी, दाही दिशांना, कुठल्याकुठे
दिन, दिस – दिवस
दिनचर्या – रात्रंदिवसाची वागणूक
दिपविर्ले – दंग, चकित, प्रभावीत, मोहीत केले
दिव्य – तेजस्वी, देवलोकातले
दिव्यदृष्टी – ज्ञान, जगाचे आतले व्यापक स्वरूप पाहण्याची शक्ति
दिव्यत्व, दिव्यपण – तेजस्विपणा, अलौकीक, दशा, आदर्श जिवन, ज्ञानाची अवस्था
दिर्घायू – मोठ्या आयुष्याचा
दीप – दिवा
दिप्ती – तेज, प्रभाव
दिक्षा – व्रत, संस्कारविधी
दिक्षीत – दिक्षा किंवा व्रत घेतलेला
दुर्गती – अधोगती, नाश, वाईट दशा
दुर्जनदमन – दुष्टांना सरळ करणे
दुतर्फा – दोन्ही बाजूंना
दुधारी – दोन धारा असलेली
दुर्धर – सांभाळता न येणारे, कठीण
दुर्भिक्ष – दुष्काळ, भिकारवाडा
दुमत – मतभेद, शंका, विरोध
दुराग्रह – वाईटाचा हट्ट, एककल्लीपणा, गैरसमज, अढी
दुराचार – वाईट वागणूक
दुरूपयोग – वाईट मार्गी लावणे व फायदा घेणे
दुर्लभ – मिळणे कठीण
दुर्वांकूर – हरळीचे कोंब
दुर्विषय – वाईट गोष्टी किंवा विषय
दुष्कृत – वाईट काम, पाप
दुष्कृतीनाश – दुष्टांचा पाडाव, पापांचा नाश
दुष्परिणाम – वाईट शेवट, खराबी
दृढ – मजबूत
दृढता – पक्केपणा
दश्य – देखावा, दिसणारी वस्तू
दुरदृष्टी – दुरवरचा विचार
दुरध्वनी – रेडियो, बिनतारी तारायंत्र
दुषण – कलंक, निंदा, दोष
दुषित – मलिन, घाणेरडे, अपवित्र
देखीसेखी – दुसऱ्यांचे पाहून
देवाचा अंकुश – सदसद्वीवेक बुद्धी



देवाधिदेव – परमात्मा
देवेंद्र – देवांचा राजा
देशक्लेश – लोकांना होणारे कष्ट
देशपिता – राज्यपाल, राष्ट्राध्यक्ष
देशभेष – वेगवेगळ्या देशांची राहणी
देशाचारी – देशाच्या परिस्थितीला धरून
देशाटन – देशोदेशी फिरणे
देशोधडी – देणाबाहेर हाकणे–भटकणे
देहधारणा – देहाची भावना, देहसंबंध
देहबद्ध – शरिराला चिकटलेली
दैना – दुर्दशा, दुखः
दुन्य – गरिबी, दीनता
दैवी – देवाचे, दिव्य, सात्विक
द्वैत – दुसरेपणा, दुजाभाव, भेद, दुही
दोषविरोध – वाईट कामांचा विरोध
द्रोह – द्वैत, वैर
द्रोही – शत्रू
दंडणे – दंड शिक्षा देणे
दंडघर – सत्ताधारी, दंडा घेणारा
दंडूशेकहा – दंडेफरास, दांडगा
दंभ – मोठेपणाचा आव
दांभिक – ढोंगी

(ध)

धकाधकी – संकट, धामधूम
धनवंतरी – सर्वात थोर देववैद्य
धनुर्धारी – धनुष्य धरणारा
धनाढ्य – पैशानी गबर
धर्म – कर्तव्य, समाजाची व्यवस्था उद्धारमार्ग, स्वभाव, सुखशांती, व मोक्ष यांचे साधन
धर्मभ्रष्टता – धर्म बाटणे, धर्मसोडणे
धर्मयुद्ध – न्यायासाठी न्यायाने लढणे
धर्मलंड – धर्मलंपट पण ढोंगी
धर्मशाला – मुशाफरखाना, गोंधळ
धर्मसमत्व, धर्मसमभाव, धर्मसमन्वय – सर्व धर्मांचा आदर, सारखेपणा, पोषकता
धर्मक्षेत्र – धर्माची हद्द
धर्मीय – धर्माचे लोक
धर्माचार्य – खरे व मुळचे धर्मप्रचारक
धर्मान्तर – दुसऱ्या धर्मात जाणे
धराधर – पृथ्वी धरणारा, शेष, वराह, पर्वत
ध्वनी – आवाज
धागे – लागेबांधे संबंध
धाड – डाका, संकट
धाम – घर, मंदिर, ठिकाण, तिर्थ
धारणा – दृष्टि, समजूत, व्यवस्था, योजना, पोषण, धरणे, राहणे
धारातिर्थ – लढाई (तरकारीचे तिर्थ)
धारिष्ट्य – वीर, सहनशिलता, हिंमत
धिक्कारणे – झिडकारणे, झोबेलसे बोलणे
धीर – विचारी, गंभीर, धैर्य, शांती
धुन, धुंद – धुनक, धुंदी, नशा, छंद
धुरंधुर, धुरीण – धुरा (जूं) धरणारा, मुख्य चालक
धुर्तपण – छाकटेपणा, चलाखी
धुम्रपान – बिडी, चिलम वैगेरे पिणे
धुलिवंदन – धुळमाती, मातीचे महत्व जाणूण नमस्कार विधी
ध्येय – साधावयाची वस्तू, ध्यानाचे केंद्र
ध्यानमुद्रा – ध्यान लावून बसणे
धेंड – नावाजलेले वजनदार लोक
धोंड – अडचण, दगड

(न)

नर्कगती, नरक – दुखः, पतन, दुर्गती
नखशिखान्त – पायापासून शेंडीपर्यंत
नजराणे – भेटीदाखल द्यायच्या वस्तु
नटराज – नटणारांत मुख्य, सोगाड्या
नटविणें – शोभविणे, सजविणे
नटवेष – नाटकी राहणी
नर्तन, नृत्य – नाच
नभ – आकाश
नररत्न – महाण तेजस्वी पुरुष
नरसीमेहता – गुजराथचे महासंत
नवनिर्माण – नव्याने सुंदर व्यवस्था निर्मान करणे
नवविध – नऊ प्रकारची (श्रवनादी)
नश्वरत्व – नाशवंतपना, नष्ट होणे
नहुष – इंद्रपदासाठी ९९ यज्ञ करणारा जुना राजा
नाकळे – गवसत नाही, कळत नाही
नागर – चतुर, सभ्य, सुधारलेला
नागविणें – लुबाडणें, कफल्ल करणें

नाचरवे – करणें हात नाही
नाटकी काव्य – छचोर गाणी
नामयात्रा – किर्तीची जा–ये
नामसंकीर्तन –नाम गाणे , भजण–कीर्तन
नामाभिधाना – नांव
नामांकित – किर्तीवान
नामोच्चार – नाव घेणें
नामी – ज्याचें नाव तो, उत्तम
नायक – मालक, मुख्य, अधिपती
न्यायनिष्ठुरता – त्यातने सत्यासाठी कडकडपणा
न्याय्य – रास्त, खरा, न्यायाने ठरणारा
न्यायसत्र – न्याय देण्याची पध्दति–स्थान
न्यायसिध्दता – न्यायाने ठरणारी गोष्ट करणें
न्यायाची व्यवस्था
न्यायसंगत – विचाराला धरूण, योग्य
निकें – सत्य, खरोखर, चोख
निगडित – चिकटलेले, घट्ट संबंध असनारे
निगा – जपणूक, व्यवथा
निजधर्मं – मानवधर्मं, आत्मधर्मं
निजधाम – वैकुंठ, उत्तम गती, आत्मरूप
निजध्यास – एकाच गोष्टीचें रात्रंदिवस चिंतन
निजांगें – स्वत:च्या शरीराने
निर्झर – झरा, ओव
नितांत – खूप, पुरेपूर
नित्यकर्म – नेहमीचे सहज घडणारे काम
नित्यानंद – नेहमी आनंदरूप असे ब्रम्ह
निदर्शक – दाखविणारे, सुचक चिन्ह
निर्दालन – दमन, नाश, नाहीसे करणे
निधान – अमोल ठेवा, खजीना
निर्धार – पक्का निश्‍चय
निधी – पैसा, ठेवा, भांडार
नि:पक्ष – कोणताही पक्ष न धरता
निर्बुद्धसा – मुर्ख
निर्भेळ – काही न मिसळता, शुद्ध
निर्मित – केलेले
निर्मिता – निर्माण करणारा, प्रभू
निर्मुलन – मुळासह नष्ट करणे
नियमन – ताब्यात घेणे, नियमबंधन
नियमीत – नेमके, नेमलेली

नियोजून – ठरवून, योजना करून, लावून
निरखीत – शोधून पाहत
निरर्थक – वाया, अर्थ नसलेले
निरय – नर्क, दु:ख
निरंतर – नेहमी, एकसारखे
निरसणे – नष्ट होणे, नाहीसे करणे
निराधार – आसरा नसलेला, पुरावा नसणे
निरासक – निरसन करणारा
निरासक्त – वैराग्यवंत
निराशावाद – वैताग, नशिबावर भरवसा
निरीक्षून – बारकाईने पाहून
निरूढ – रुढीशिवाय,शुद्ध, चालू नसलेले
निरूपण – खुलासेवार सांगणे, वर्णन
निवर्तणे – मरणे
निवांत – सावकाश, धिरेधिरे
निव – पाया
निवारणे – दूर करणे
निर्वाचन – निवडणूक
निर्वाण – बौद्धांनी देवस्थितीला दिलेले नाव
निर्वाणी – शेवटी
निर्वाळा – निवाडा, सिद्धांत, तात्पर्य, निश्‍चय
निर्वाह – पालनपोषण, व्यवस्था, निभाव
निर्विष – बाधक न होणारे, पवित्र, निर्दोष
निर्विषय – विषयाशिवायच, विषयांपलीकडील
निर्विवाद – ठाम, सर्वमान्य
निवृत्ती – प्रपंचवृत्ती मावळणे, देवाकडे वळणे
निवेदणे – मांडणे, वर्णून सांगणे
निवेदिता – विवेकानंदांची अमेरिकन शिष्या
निशा – कैफ, गुंगी
निशी – रात्र
निशाण – झेंडा चिन्ह
नि:शंक – बेलाशक, संकोच न धरता
संशय नसणारा, ठाम
निश्‍चल – स्थिर
निश्‍चिंत – बेफिक्रीर
निश्‍चित, निश्‍चयात्मक – ठाम, टिकून राहणे
निष्काम – इच्छाच नाही असा, तृप्त
स्वत:साठी लोभ न धरता
निष्क्रिय – रिकामा, कार्याला सोडून



क्रियेत न उतरलेले
निष्ठावंत – पक्क्या श्रद्धेने, श्रद्धावान
निष्णात – निपूण, तरबेज, हुशार
निष्पन्न – प्राप्त
निष्पत्ती, निष्कर्ष – फळ निघणे, तातपर्य
निषिद्ध – मना केलेले, टाकाऊ
निषेधणे – टाकाऊ ठरवणे, विरोध करणे
निसर्ग – सृष्टिरचना, सृष्टिचे नियम,
आपोआप होणे, पंचभूतांचा स्वभाव
निसर्गउपचार – औषधाशिवाय रोग बरे
करण्याचे उपवासादी उपाय
निसर्गचमत्कार – सृष्टिचा विचित्रपणा
निसर्गगुण – आधीच अंगी असणारे गुण
निसर्गरम्य – सहजसुंदर, सृष्टिशोभायुक्त
नि:स्पृह – इच्छा नसलेला, बेपर्वा, निर्लोभ
निस्सीम – खूप, बेहद्द, पुरेपूर
नुरे – न उरे
नुसखे – घरगुती औषधी चुटके
न्युनपूर्ण, न्युनाधीक – उणापूरा, कमीजास्त
नेघे – घेत नाही
नेणे – जात नाही
नेदी – देत नाही
नेदू – न देऊ
नेत्रपाती – डोळ्यांची झापड
नेतृत्व – पुढारीपणा, मार्गदर्शन, चालवणे
नेमस्त – नियमाने, मोजके, नेमल्यासारखे
नैतीक – चांगल्या वागणूकीचे, नितीबाबत, नितीवर
आधारलेले
नैमितिक – प्रासंगीक, काही निमीत्ताने करावयाचे
नैष्ठिक – पुर्ण, पक्क्या निष्ठेचे
नंदनवन – स्वर्गातला बगीचा
नंदादीप – रात्रंदीवस जवळणारा दिवा

प

पठण – वाचणे
पढतमूर्ख – ज्ञानाचा दुरुउपयोग करणारा
पतितपावन – पाप्यांनाहि पवित्र करणारा
पतन – अवनती
पतित – पडलेला, पापी
पथक – टोळीश कलापथक

पदसेव – पायांची सेवा
पद्मनाभ – ईश्‍वर
पदार्पण – पाऊल टाकणे, प्रवेश
पनपू – वाढुं देणें
पर्यटण – फिरणे, प्रवास
पर्यायाने – दुरवर विचार करता, दुसऱ्या रुपाने
परकी – दुसरेपणाची
परचक्र – दुष्टांचा हल्ला
परम – सर्वात अधिक, श्रेष्ठ, शेवटचे
परमरस – ईश्‍वरी आनंद
परम नुरुषार्थ – मोक्ष
परमात्म्य, परमात्मता – ईश्‍वरपणा
परमार्थ – सर्वात मोठा लाभ, मोक्ष
परवश, पराधीन – दुसऱ्याचे ताब्यांत, भरवशावर
परस्परें – एकमेकांकडुन, पराभारे
परसृष्टि – जड जगापलिकडचें ज्ञानजग
परमेष्टि – देवलोक, कारणमहाकारण जग
परंपरा – मालिका, चाल, प्रथा, परिपाठ
परात्पर – परा (ज्ञान) वाणीला न गवसणारा
परामर्श – विचार, समाचार
परि – परंतु
परी – प्रकार, पद्धति, सारखे
परिचर्या – सेवा, शुश्रुषा
परिधान – नेसणें
परित्राण – बचाव, तारणे, रक्षण
परिपाक, परिपक्वता – फळ, पक्वेपणा, रुपांतर
परिश्रम – कष्ट, अंगमेहनत, काम
परिवर्तन – फेरबदल
परिसीमा – हद्द, अतिरेक
परीस – लोखंडास सोने करणारा दगड
पर्व – विशेष दिवस
पर्वतावली – डोंगररांगा
पर्वतकडे – शिखरे
पवाड–पोवाडे – स्तुति, महत्व, कथा किर्ती, गरजा,
योजना, रेगापोंगा (लांबण)
पशुपाल – पशुपति, गुरें पाळणारे
पशुत्वसंयोग – जणावर उपभोग,
भोग दृष्टीने एक होणे
पाईक – पायास्वरुव, सेवक, दास

पाखांडपंथी, पाखंडी – भोगवादी, तत्त्वहीन, दुष्ट
पार्टी – मेजवानी, बैठक, पक्ष
पाठ – बोध, धडा, प्रार्थनेची पद्धती
पाठक – म्हणणारा, शिकविणारा
पाणी – तेज, पराक्रम, हात
पातळी – भुमिका, थर, पायरी, दर्जा
पात्र – भांडे, अधिकार, योग्यता
पापभक्षी – पापच खाणारे, पापी
पापाचरणी, पापमय – वाईट वागणारे
पापभिरूता – पापापासून दूर राहणे
पामर – मुर्ख, बिचारे
पायपोस – जोडा, मर्यादा
पायपुस – पायदान
पायवणी – पायांचे तिर्थ
पारखा – वेगळा, दुरचा, मुकणारा
पारणे, पांग फेडणे – पुर्ण तृप्त सुखी उन्नत करणे
पारायण – भराभर पूर्ण वाचन, विधीपुर्वक वाचन
पावन – पवित्र, उद्धरणारा
पावडी – घोड्याची रिकाब
पाश – फासा
पाशवी – पशूसारखे, जनावरांचे
पिपासू – तहानलेला
पिसाट – ओबडधोबड, सहजपणातले
पिडा – दुःख
पुण्यकोडी – पुण्याचा साठा
पुकार – हाकाटी, मागणी, आवाज
पुढारणे – पुढे नेणे, उन्नत करणे
पुण्यराशी, पुण्यश्लोक, पुण्यनिष्ठ – महापवित्र
पुण्यपरिश्रम – महत्त्वाचे पवित्र कष्ट
पुत्रपौत्र – मुले व नातू
पुनर्निर्माण, पुनरुज्जिवन – पुन्हा योग्य रुप देणे
पुरती – पूर्ण होतात, पूर्णपणे
पुरस्कार – प्रचार, महत्त्व पटवणे, उत्तेजन
पुरस्कर्ता – प्रचार व समर्थन करणारा
पुरातन – फार जुन्या काळातले
पुरूषार्थ – प्रयत्न, पराक्रम, पुरूषाचे लाभ
पुरूष – परमात्मा, जिव
पुरूषोत्तम – श्रेष्ठमानव, देव
पुर्णकलात्मक – सर्व कला पूर्णतेस गेलेला

पुर्णावली – परिपूर्ण अवस्था
पुर्ती – पूर्णता, पुरवठा, भरपाई
पुरक – पोषक, सहाय्यक, पुरे करणारा
पुर्वापार – आधिपासूनचा
पेढी – खजिना
पेल – खुप पुरवठा, जोर
पैगंबर – मुसलमान धर्म स्थापणारा महात्मा
पैरवी – धावपळ, खटपट, पिच्छा
पैस – वाव, शक्ति, शक्यता
पैसावला – वाढला, व्यापला
पोषक – सहाय्यक, जगविणारे
पोषाखाचे बंड – वरपंगाला फार महत्त्व देणे
पोलादी चोकट – न बदलणारी हद्द
पोटधर्म – पोट भरण्याचा धंदा
पंचात्र – सिंह
पंचाग्नी – उन्हात चार धुन्यांची साधना
पंचतत्वादी – पंचतत्व, तीन गुण, प्रकृती पुरूष इत्यादी
पंचमहोत्सव – सेवामंडळाचे ५ मुख्य सण
पंचायतन – पाच जनांची सभा–संघटन
पंचीकरण – जगाच्या रचनेची माहिती
पंडिताई, पांडित्य – जाड विद्वानपणा
पंक्तिप्रपंच – दुजाभाव, तोंड पाहून वागणे
पंथानुयायी, पंथीय – पंथाचे लोक
पंथ – रस्ता, संप्रदाय
पांगळा – कर्तव्य न करणारा, लंगडा
पांदण – गाडरस्ता
पिंड – शरीर, मेलेल्यास देण्याचा घास
पिंडवर्णी – प्रत्यक्षाला महत्व देणारा, व्यवहार प्रधान
पुंजाणा – केरकचरा
पेंड – ढेप
पेय – पिण्याची वस्तू
पेंढारीपण – लुटारूपणा, लुबाडणे
प्रकटविणे – आतली शक्ति बाहेर काढणे, स्पष्ट करणे
प्रक्रिया – करण्याची रीत
प्रकृती – स्वभावधर्म, शरिरचना, निसर्ग
तब्येत, स्त्री, माया
प्रखर – खरपूस, जोरदार
प्रगतीपथ – उन्नतीचा रस्ता
प्रचंड – फार मोठे



प्रचारतंत्र – प्रचाराची कला
प्रजा – लोक, संतती
प्रजातंतू – वंशाची वेल
प्रजापती – ईश्वर, ब्रम्हदेव (रजोशक्ति)
प्रत्यय, प्रत्यंतर – अनूभव, पडताळा
प्रत्यक्षांत – उघड, व्यवहारात, उपयोगात
प्रताप – शक्ति, प्रभाव, पराक्रम
प्रति – (त्या)ला, (त्यां)ना
प्रतिकार – विरोध, थांबवणी
प्रतिकुल – विरूद्ध
प्रतिध्वनी – हुबेहुब तसाच आवाज
प्रतिनिधी – दुत, आपल्यावतीचा पुढारी
प्रतिपादन – मांडणी, पटवणे
प्रतिपाद्य – ज्यांचे महत्व पटविले असे
प्रतिपाळणे – पालन करणे, राखणे
प्रतिबंधक – (रोग) न होण्याची खबरदारी
प्रतिभा – कल्पनाशक्ति, नविनता, बुद्धीतेज
प्रतिमा – मुर्ती
प्रतीक – मुर्ती, चिन्ह
प्रतिसृष्टि – जगासारखे दुसरे जग
प्रतिष्ठा – मान
प्रतिष्ठित – मानवाईक
प्रथा – परंपरा, चाल, रूढी
प्रदर्शन – देखावा, दाखविणे, चिन्ह
प्रधान – मुख्य, विशेष
प्रबल – जोरदार
प्रबंध – व्यवस्था
प्रभात – पहाट
प्रभावित – थक्क, चकित
प्रभावळ – मखर, बाजुंची शोभा, मंडळी
प्रमाण – पुरावा, मान्य, सारखे, दाखला
प्रमाणशक्ति – प्रमाणे देऊन पटविण्याची शक्ती
प्रयास – प्रयत्न, खटपटी, कष्ट
प्रयोग – व्यवहारात आणणे, नवाशोध, साधन
प्रलय – नाश, हाहाःकार
प्रलोभन – लालूच दाखविण्याची साधने, लोभ
प्रवर्तक – सुरू करणारे, वळवणारे
प्रवर्तले – सुरू झाले, सरसावले, तयार झाले
प्रवाह – ओघ, परंपरा, वाहणे

प्रविण – तरबेज
प्रवृत्त करणे – वळवणे
प्रवृत्ती – घाव, प्रपंच, ओढा
प्रशस्त – ऐसपैस, प्रसन्न, सुंदर
प्रस्थ – जोर, डामडौल
प्रवण – मग्न
प्रज्ञावृत्ती – बुद्धी, जाणीव
प्राकृतजन – संस्कृत न जाणणारे साधे लोक
प्राकृत ग्रंथ – लोकभाषेतले ग्रंथ
प्राचीन – फार जुन्या काळचे
प्रांजल – प्रामाणीक, मोकळे, निर्मळ
प्राणायम – श्वासावर ताबा मिळवणे
प्रात्यक्षिक – प्रत्यक्ष प्रयोग, नमुना
प्रातविधी – पहाटेची आवश्यक कामे
प्रातध्यान – पहाटेची ध्यान–धारणा
प्रांतव्यापी – कार्याच्या रूपाने राज्यात पसरलेले
प्रार्थी – प्रार्थना करणारे
प्राप्त – मिळणे, येणारी, भाग
प्रामाणिक – इमानदार, खरे
प्रामुख्ये – विशेषकरून
प्रायश्चित – दंड, पाप निवारणाचा मार्ग
प्रारब्धवाद – नशिबच थोर मानने
प्रिय – आवडता, ज्याला आवड आहे असा
प्रित्यार्थ – प्रेमाखातर, निमित्ताने
प्रेरणा – प्रवृत्ती, स्फुर्ती, इच्छा, संकल्प
उत्तेजन, सुचना, इशारा
प्रेषित – पाठविलेला, देवदुत
प्रोत्साहन – उत्तेजन, जोर, उठावणी
प्रोत्साहीत करणे – उत्तेजन देणे
प्रौढ – मोठ्या वयाचा

## फ

फकीर – निःस्पृह संत
फड – जत्थ, टोळ्या, मंडळे
फलद्रुप – फळास येणे, सफल
फलश्रृती – ऐकल्याचे फळ
फाहिता – कुराणातील प्रार्थना
फावणे – संधी, जागा मिळणे
फास – काट्यांचा भारा
फिचर – आकडा लावण्याचा जुवा

फुक्के – व्यर्थ, फुकट
फुटीर वृत्ती – दुहीची भावना
फुलपात्रे – फुले ठेवण्याची भांडी
फोफावणे – जोराने वाढणे
फड – वर्गणीचा पैसा

ब

बचत – काटकसरीने शिल्लक टाकणे
बजेट – पुढील खर्चाचे अंदाजपत्र
बटवारा – वाटणी
बटु – ब्रम्हचारी बालक
बडगा – भय, धाक, वजन, दंडा
बद्ध – बांधीव, अज्ञानी, संसारमग्न
बद्धकोष्ठता – पोट साफ न होणे, कुंदी
बसवाचार्य – शैव जंगमांतील मुळ महासंत
बहाल – अर्पण
बहिर्मुखदृष्टी – भेदभावनेने जगाकडे पाहणे
बहिरंग – बाहेरचे, जडभोग, वरवरचे, बाहेर धावणारी, परका, बाहेरून
बहिष्कार – व्यवहारसंबंध तोडणे
बहुविध – नाना प्रकारची
बळकावणे – दाबून, लुबाडून बसणे
बळी – ताकदवान
बळे – शक्तिने, मुळे, जबरीने
बळी देणे – अर्पण करणे, (घेणे) मारणे, (जाणे) मरणे
बागडणे – खेळणे
बागडोर – अधिकार
बाजारचुणूक – बाजाराचा नमुना
बाद – बेकाम, रहित
बारबलुते – जुन्या काळी गावाचे जबाबदार ग्रामजोशी, जागल्या वैगेरे १२ वतनदार
बालांध – बाळपणी आंधळे झालेले
बालोद्यान – मुलांची बाग, खेळात शिक्षण
बाह्य – वरवरचे
बाह्यबुद्धी – उथळ स्थुल विचार
बाष्कळ – भलतेसलते, चंचल
बावरे – वेडे, चंचल, बावळट
बाहू – हात
बाहुल्या – बुबूळ
बाहेरभितरचे – भुतबाधा
बिगार – फुकट काम करून घेणे
बिदागी – रवानगी, कलावंतांना इनाम
बिरडे – बंधन
बिजारोपण – गर्भधारणा, बी लावणे
बुद्धिभेद – भ्रमात टाकणे, गोंधळविणे
बंदर – महाराष्ट्रातली एक जुनी राजधानी
बेफाम – भरधाव, रोखठोक, बेछूट, धूंद
बोजड – समजण्यास कठीण
बोजवारा – किंमत, रूबाब, वजन
बोलभांड – बोलांनी आपलेच खरे करणारे
बोरंग – गाडरस्ता
बौद्धिक – बोध, उपदेश, बुद्धीने होणारा
बंड – धुमाकूळ, अवडंबर, दंगेखोर
बंदा – जवान गडी
बंदी – मनाई
बंदिस्त – कैदेत घालणे
बिंदू – थेंब
बिंबणे – अंगी उतरणे, मुरणे, खिळणे
ब्रम्ह – व्यापक तत्त्व, परमात्मा
ब्रम्हर्षी – ब्राम्हणातून ऋषी, सत्त्वमुर्ती
ब्रम्हकर्मा – ब्राम्हणकर्मे करणारा
ब्रम्हज्योती – ईश्वराचा ज्ञानप्रकाश
ब्रम्हमयी – ब्रम्हरूप झालेली
ब्रम्हरस, ब्रम्हानंद – सर्वश्रेष्ठ आत्मसूख
ब्रम्हवाद – स्वरूपाची चर्चा
ब्रम्हविवरण – व्यापक रूपाची माहिती
ब्रम्हवंशीय – ब्राम्हण वंशातला
ब्रम्हसत्ता – ब्राम्हाचा अनुभव–अस्तित्त्व–प्रभाव
ब्रम्हसुत्रे – व्यासाने लिहिलेला वेदग्रंथ
ब्रम्हाचरण – ज्ञानाने वागणे,विचाराचे वर्तन, ईश्वरमय जिवन
ब्रम्हांड – जग
ब्राम्हण्य – ब्राम्हणपणाचे खरे तत्त्व
ब्रम्हमुहुर्त – पहाटेचा पवित्र वेळ
ब्रीद – बाणा, माणूसकी, विशेषपणा

भ

भगवद्भाव – देवाची भावना
भजनभारूड – समाजदर्शनाने मनोरंजनातून ज्ञान देणारी भजने



भजनासक्त – भजनावर लुब्ध असणारा
भक्तकामकल्पतरू – भक्तांच्या इच्छा पुरविणारा
भर – जोर, जोश, नशा
भयावह – भय–दुःख–हानी उत्पन्न करणारा
भव – हो, संसार
भव्य – फार मोठे
भवितव्य – पुढची स्थिती
भक्ष्य – खाद्य, खाण्याच्या वस्तू
भाक – प्रार्थना, करूणा
भाकड – फोल
भागवतोत्तम – भक्तांमध्ये थोर
भान – जाणीव, आठवण
भार्या – स्त्री
भार उतरणे – पापदुखः नाहीसे करणे
भारले – गुंग झाले, भरले
भाल – मस्तक
भावी – पुढील, भावना, करतो, मानतो
भासणे – वाटणे
भिनावा – बाणावा, मुरावा
भीतर – आत
भिन्नत्व, भिन्नता – अलगपणा, द्वैत, दुसरेपणा
भुक्तिमुक्ति – जगातली सुखे व मोक्षसूख
भुजाण – शेतातले बुजगावणे
भुरळ – मोहनी, नजरबंद
भुली – भूल, भ्रम
भृगू – विष्णूच्या छातीवर लाथ मारणारा ऋषी
भुतदया – प्राण्यांची कीव
भुतहित – सर्वाचे कल्याण
भुर्दंड – जातीदंड, नसती शिक्षा
भुमीका – दृष्टी, पाया, विचार, अधिकार
भुमीपात्र – जमीन हवापाणी यांचा फरक
भुमंडळ, भुलोक – हे जग
भुवन – घर, जग
भुवैकुंठ – जमिनीवरचा देवलोक
भुषण – किर्ती, दागिना
भाषवी – शोभवी
भुषणावह – किर्ती वाढवणारे
भेदबुद्धी, भेदभ्रम, भेदवाद – द्वैत, आपपर भावना, दुसरेपणाचे अज्ञान
भेदी – फुट पाडणारे
भेरी – नगारा
भेदोन – मुरून, रुजून, फोडून
भोग – सुखाचे विषय, दुःख, व्याद
भोक्ता – भोगणारा
भोग्य – भोगण्याची वस्तू
भोवते – आजुबाजूस
भोवणे – नुकसानकारक होणे
भौतिक – पंचमहाभुतांचे, व्यवहारीक
भ्रमणे – फिरणे
भ्रमवणे – भुलवणे
भ्रमाची पोसणी – भ्रमाने वाढलेली, भ्रम वाढवणारी
भ्रमिष्ट – अज्ञानी, चुकीचा मार्ग दाखवणारे
भ्रष्ट – मिश्रित, वाईट, बाटलेला, घसरलेला
भ्रष्टाकार – पाप, बाटणे
भ्रष्टाचार – धर्महानी
भंगणे – तुटणे फुटणे
भांडार – खजिना
भ्रांती – भ्रम, अज्ञान, भूल

म

मगहर – नर्कास नेणारे ठिकाण
मति – बुद्धी
(एक)मती – एकमताने, प्रेमाने
मत्स्य – मासोळी
मतितार्थ – सार, मुख्य अर्थ
मर्दणे – जिरवणे
मद्य – दारू
मनस्वी – मनमाने
मनन – विचार
मनस्वास्थ्य – मनाची शांती
मनोधैर्य – हिंमत
मनोगत – मनातली इच्छा
मर्मभेदी – ह्रदयाला भिडणारे, मुळ मुद्याचे
मरणोन्मुख्य – मरायला टेकलेला
मलविसर्जन – शौचास बसणे
मल्ल – पहिलवान
मस्त – बेहोश
महती, महंती, महत्त्व, महिमान, महत्ता – मोठेपणा, किर्ती

महत, महा, महान – विशेष, मोठे, उच्च
महत्त्वपूर्ण – फार जरूरीचे, थोर किमतीचे
महाकारण – मोठी योजना, मुळपाया
महाकाळ – यम
महेश्वर – शंकर
महामानव – थोरपुरूष
महाप्रताप – प्रभावी कार्यकर्ते
महादिप्ती – ज्ञान, प्रभाव
महिलोन्नती – स्त्रियांची प्रगती
महिमंडल, मेदिनी – पृथ्वी, जग
मार्क्स – रशियातला महासंत
मार्गस्थ – जाणारे येणारे
माघारणे – मागे राहणे
मागोवा – पाठलाग
माझारी, माजी – मध्ये
मागुता – पुन्हा
मात – गोष्ट
मातंग – मांग
मातृदेवोभव – आईस देव माणणारा हो
माधुर्य – गोडी, गोडवा
मानव्य, मानवता – विचार, दया, न्याय व समाजप्रेम, माणुसकी
मानवी – माणसांचा–करीता–संबंधी
मानववंश, मानवमात्र – सर्व स्त्रीपुरूष
मानविणी – मेलेल्या स्त्रीयांचा पुतळा
मानसिक, मानस – मनामनाचा, मनातील, मनासंबंधी
मानसिक संयोग – मनांची एकी, मन एकाग्र होणे
मार्मिक – सखोल, तत्त्वास धरून, नेमका
मालिका – परंपरा, पथ, माळ, ओळ
मित – थोडा, मोजका, नियमीत
मिथ्या – खोटा, फालतू
मिष्टांन्न – गोडअन्न
मिश्र – मिसळलेला, वेगळ्या जाती–गुणांचा, गुंतागुंतीचा
मिलन, मिलाप – मिळणी, भेट, एकी, संबंध
मिथ्याचार – ढोंगी वागणूक
मिंधा – लाजीम, पक्षपाती, निस्तेज
मुकणे – अंतरणे
मुकुट – टोप
मुक्तद्वार – खुला रस्ता मोकळीक
मुक्ती, मोक्ष – सर्व दुखा:तून सुटका व टिकाऊ आनंदाचा लाभ
मृगनाभी – हरणाची बेंबी (कस्तूरीची)
मुडदेफरास – मारतोड करण्यात तरबेज
मृत – मेलेला
मृत्युलोक – हे मरणारे जग
मुद्रा – नजर, चेहरा, डोळ्यांचा अभ्यास
मुबलक – भरपूर
मुलायम – नाजूक
मुमुक्षुत्व – मोक्षाची तळमळ, विवेक–वैराग्यादि साधनसंपत्ती
मुहूर्त – विषेश उत्तम वेळकाळमुद्रा
मुकबधीर – मुके व बहीरे
मुर्तं – प्रत्यक्ष, प्रगटलेले, मुर्तीमंत, आकारास येणे
मूल्य – मोल
मुल्यवान – किंमती, उत्तम
मुलसिद्धांत – ईश्वरी न्याय, मुलचे तत्व
मुळतत्व – परमात्मा
मुळस्तंभ – मुख्य आधार, मुळपाया
मुळारंभ – सुरुवात, पाया
मेघश्याम – मेघासारखा सावळा, कृष्ण
मेद – चरबी, मज्जा
मेरू – हिमालयाचा अति उंच भाग
मैंद – गुप्तचोर, मकरी
मोजमाप – नियम, मर्यादा, कसोटी
मोहनी – मोह, पडण्याची शक्ती
मंगळ – पवित्र, पृथ्वीजवळचा ग्रह, कल्याण
मंडल – संस्था, सभा, घेरा, ४० दिवस
मंडण – मांडणी, पटवणे
मंदशीतल – हळू चालणारा व थंड
मंसूर – सुफी धर्मातील महान संत

य

यथार्थ – जसेच्या तसे, तात्विक, खरे
यथासांग – सर्व प्रकारे, पूर्ण
यमनियम – संयम व नियम, उच्च आचारविचार
यज्ञशेष – अर्पून उरला तो पवित्र भाग
यात्राशुद्धी यात्रानियोजन – यात्रेची नीट सुधारणा
याती – जात



यातना – त्रास, दुखः
युक्त – उचित, सहीत, जुळलेले
युवक – तरुण लोक
युवती – स्त्री
येर – इतर
येरव्ही – नाहीतर, उगीच
योग – वृत्तीची स्थिरता, संबंध, प्राप्ती, संधी, भाग्यवेळ, ईश्वरानुभव–मार्ग
योगक्षेम – पालनपोषण, मिळवून राखणे
योजक – बरोबर जुळवणी करणारा
योजणे– ठरवणे, आखणे, नेमणे
योजणा – नियम, पद्धतशीर आखणी विचारपूर्वक मांडणी
यंत्रविद् – यंत्रांचे जाणकार
यंत्रगार – यंत्रांचे कोठार

र

रक्तक्रांती – कापाकापीची चळवळ
रचना –ठेवणे, व्यवस्थित मांडणी
रणकर्कशता– फारच उर्ग शूरपणा
रणचंडीका – लढाईत चमकणारी देवी
रत – तल्लीन, मग्न, तत्पर
रवींद्र – बंगालचे महाकवी टागोर
रसाळ – गोड
रसीक – रस असणारा, जाणणारा
रसातळा जाणे – मातीत जाणे
रागद्वेष – लोभ–चीड, प्रेम–वैर
राजर्षी – राजा–क्षत्रीय पण ऋषी
राज, राव – राजा
रावा – राघू
राष्ट्रनिर्माते – देशास उत्तम घडविणारे
राष्ट्रीय – देशाला पोषक
राष्ट्रीयता – देशप्रेम, देशच घर मानणे
ऱ्हास – घसरगुंडी, नाश
राक्षसविवाह – जबरीने लग्न लावणे
रिता – रिकामा
रिद्धीसिद्धी – सुखवैभव देणाऱ्या शक्ति
रीघ – गर्दी, रांग, वाव, शिरकाव
रुचिभेद – प्रत्येकाची वेगवेगळी आवड
रुजणे – खोल शिरणे, लागणे, मुरणे
रुजू – मान्य, प्राप्त, लागू
रुदन, रोदन – रडणे
रुक्ष – निरस, कोरडे, कंटाळवाणे
रूढी – ठरीव, निर्जीव, आंधळा रिवाज
रूपक रूपकात्मक – तत्त्वांना, निराळीच रूपे देऊन वर्णन करणे
रूपांतर – रूप बदलणे, दुसरे रूप
रेखणे, रेखाटणे – लिहीणे, मांडणे, आणखी
रेखा, रूपरेषा – रेघोट्या, आणखी
रेखीव – काटेकोर, नेमका, मर्यादेने
रेणुका – वाळू, रेती
रोचक – रुचणारी, चटक लावणारी
रोजी – मजुरी, मिळकत
रोमांच – अगाबर काटे उभे राहणे
रंगनायकी – मद्रासची कान्होपात्रा
रंजन – करमणूक,
रंज – दुःखी

ल

लटक – लहर
लटका–लटीका – मिथ्या
लताकुंज – वेलीची गुंफा
लय – नाश
लवलाहे – लगबगीने
लवणकण – मिठाचा खडा
लक्षावधी – लाखो
लक्षून – पाहून
लक्ष्य – ध्येय, आवडता विषय
लक्ष्मी – देवी, स्त्री, संपत्ती, शांती
लागवेगे – चटपट
लाघव – मोहनी, कौतूक, खेळ, चातूर्य
लालसा – वासना, लालूच
लावण्या – सौंदर्य, उत्तमपणा
लिपीबद्ध करणे – लिहीणे
लीला – खेळ, क्रिडा, कौतूक
लुप्त – गुप्त, लोपलेले, नाहीसे होणे
लेखणे – मानणे
लेपन – लावणे
लेणे – दागीने, पहाडातले कोरीव काम
लोकसंग्रह – लोकांना जुळवणे ज्ञान देणे

लोकशाही–लोकतंत्र – लोकांच्या मतांवर
चालणारी राजवट
लोकेंद्र – लोकांचा नेता
लौकिक – सामान्य, व्यवहारांतील, या जनासंबंधी,
मान–किर्ती
लंबोदर – गणपती
लोह – लोखंड

व

वक्ता, व्याख्याता – बोलणारा
वर्गकलह – वेगवेगळ्या थरांच्या लोकांचा झगडा
वज्रदेह – न भंगणारे शरीर
वर्णसंकर – वर्णाची भेसळ, भ्रष्टाचार
वर्ण – रंग, विभाग
वर्णित – सांगीतलेले
वत्स – वासरू
वस्तुतः – खरे पाहता
वस्तुस्थिती – खरी गोष्ट
वर्तावे – वागावे
व्रतबंध – मौज
व्रतस्थ – शुद्ध नेमस्त वागणुकीचा
वदन – तोंड
वर्दळ – जाण्ये, धूम
वनपूष्पपत्र – रानातली फुले व पाने
वनभ्रमण, वनांतर – रानात फिरणे
वर्म – तत्व, मर्म
वदंता – उडत बातमी
वरकड – इतर
वरपंग – वरवरचे
वल्लभ – प्रिय, पति
वळू – सांड, खोंड
वरदवाणी, वरदहस्त – आशिर्वाद, कृपा
वसन – कपडे
वसने – राहणे
व्यक्ति – एकजण
व्यक्त – प्रकट
व्यक्तिशः – एकाकडून, एकापुरते
व्यक्तित्व, व्यक्तिभाव – स्वत:पुरते पाहणे, एकटेपण,
वैशिष्ट्य
व्यक्तिमुर्ती – माणसाची मुर्ती
व्यथा – दुखः
व्यर्थवादी – खोटा, हटवादी
व्यभिचारी – जारकर्मी, एकनिष्ठ नसणे
व्यवहारतः – व्यवहारदृष्टीने
व्यवसाय – धंदा
व्यष्टिसमष्टि – व्यक्ति व समाज (जग)
वाऊगा – रिकामा, खोटा
वाण – उणीव
वाखाणणे, वाणणे – स्तुती–वर्णन–करणे
वाग्बाण – टोचक शब्द
वाजा, वाद्य – बाजा
वाड्मयी – शब्दरूपी
वार्ता – बातमी
वाचा, वाणी – भाषा, बोलण्याची शक्ति
वातावरण – हवा, भोवतालची परिस्थिती
वादळ – तुफान
वाम – वाकडा, हीन
वानप्रस्थ – संसारानंतर त्यागी जिवन
वारकर्ते – घाव घालणारे
वाचाळ – बडबड्या
वालूकापात्री – वाळूत
वावरणे – वापर
वाहन – जाण्या येण्याचे साधन
वास – राहणे
व्याघ्र – वाघ
व्याप – पसारा
व्याप्ती – विस्तार
व्यापक – सर्वत्र भरलेले, मोठे, उदार
व्याख्यान – वर्णन
व्याजभोगी – व्याजखाऊ
वकृत – बिघडलेला
विकृती – फरक, बिघाड
विकसोन – फुलून, प्रगटून
विकास – वाढ, प्रगती, आतली शक्ति प्रगटविणे
विकारांध, विषयांघ – विकारांनी बेफाम
विखुरणे – दानाफान होणे
विचारस्वतंत्र्य – आपल्या विचाराने वागण्याची मुभा
विचरणे – फिरणे
विचारणे – विचार करणे



विटंबना, विडंबन – छळ, थट्टा, सोंग, लांच्छन, हानी
वितंड – तीव्र, भांडखोर
वितरण – वाटणी
विद्रुप – बेढब
विद्रोह – वैर, बंड
विद्वद्रत्न – महापंडीत
विद्यार्जन – ज्ञान, शिक्षण मिळवणे
विद्यालय, विद्याश्रम, विद्यामंदीर – शाळा
विधर्मी – वेगळ्या धर्माचे
विधाता – निर्माण करणारा
विधी–निषेध – अमुक कर व करू नको अशी
शास्त्रांची आज्ञा
विधीने सेवन – नियमांनी भोगणे
विधियुक्त – नियमाप्रमाणे, प्रक्रियेसह
विनय, विनम्रता – लीनता
विन्मुख – अलग, अंतरलेला, विरोधी
विपत्ती – संकट
विपरीत – उलट
विपर्यस्त – उलटे, चुकीचे
विपर्यास – बिघाड, घोटाळा, गैरसमज
विपुलता – वाढ, भरभराट
विभक्त – वेगळा
विभागणे – तुकडे पडणे
विभूती – देवाचे विशेष अंश
विभिन्न – निरनिराळे, अलग
वियोग – दुर राहणे, टाकणे
विरंगुळा – समाधान, विसावा
विरहभक्ती – देव समजून तळमळणे
विराणी – विरहीणी, व्यभिचारिणी
विराट – व्यापक, समाजपुरूष
विरळा – क्वचीत
विरहीत – शिवाय
विराग – वैराग्य, त्याग
विरश्री – शुरपणा
विलय, विनाश – नाश होणे
विलाम – चैन, शौक, भोग
विलिन – नम्र, समरस, तन्मय, मुक्त
विवरण, विवेचन – खुलासेवार सांगणे
विवंचना – काळजी
विवेचक – समजावणारा
विविध – वेगवेगळे
विवेक – विचार
विव्हळ – दु:खी
विश्व – जग
विश्वकर्मा – देवांचा कारागीर
विश्वसनीय – भरवशालायक
विश्वरूप – जग
विश्वव्यापी – जगभर
विश्वकुटुंब – जग हे एकच घर
विश्वरूप, विश्वब्रम्ह, विश्वभर, विश्वात्मक,
विश्वात्मा – जगरूपाने नटलेला विराटप्रभू
विश्वाकार – जगात व्यापक, जगाच्या आकाराचे
विश्वात्मभाव, विश्वाभिमान – जग मिच हा भाव
विश्रामगृह, विरामस्थान – विश्रांतीचे ठिकाण
विषद – स्पष्ट
विशाल – व्यापक, मोठे
विषम – कमीअधिक फरक असलेला, एकमेकास
बाधक गुणांचा, बेजोड
विषमयंत्र – भेदभावाची रचना
विषयरसानंद – पंच विषयांच्या गोडीचे सुख
विसंगत – मेळ व संबंध नसलेले, विचित्र, विरूद्ध
विषाद – दु:ख, खेद
विस्कटणे, विस्कळीत – अलग होणे, बिघडणे,
अव्यवस्थीत
विस्मरण – विसर
विसंबणे – विसरणे, टाळणे, अवलंबून असणे
विज्ञान – ज्ञानाचा अनुभव, निसर्गशोधांचे शास्त्र
विहार – खेळ, राहणी, सर्व व्यवहार
वृद्ध – म्हातारा
वृद्धी – वाढ, विकास
वृंद – समुदाय, मेळा
वृष्टी – वर्षाव
वृत्त – बातमी
वृत्तपत्र – वर्तमानपत्र
वृक्षारोपण – झाडे लावणे
वेचणे – खर्च करणे, उचलणे, निवडणे
वेदोत्तम – वेदांहून थोर
वेदबाह्य – पाखंड

वेधणे – लागुन राहणे, वळणे, गुंतणे, मोहीत एकतान होणे
वेशकर – ग्रामसफाई व गावरक्षण करणारा
वेश्यागामी – वेश्येच्या नादी लागलेला
वेषभूषा – कपडे दागिने वैगेरे
वेष्टिला – व्यापला, वेढला
वैकुंठपूर – विष्णूलोकासारखे सुखी गाव
वैखरी – जीभ, वाचा, बोलणे
वैचित्र्य – विचित्रपणा, नवलाई
वैतरणी – नर्काची नदी
वैदिक – वेदाबाबत, वेदापासून झालेले, वेदकाळातले
वैमनस्य – वैर, विरोध
वैयक्तिक – व्यक्तीपुरते, व्यक्तीबाबतचे
वैराण – उजाड, उदास
वैराग्यार्थ – आसक्ती जावी म्हणून
वैवाहीक – लग्नासंबंधी, लग्नानंतरचे
वैशिष्ट्य – विशेषगुण, महत्व, नाविन्य
वैश्वदेव – एक विधी, जगास देव मानून अर्पण करणे
वैश्वानर – पोटातील उष्णता (भुक)
वंचित – ठकलेला, मुकलेला

श–ष

शक्तिकर – ताकद देणारारा
शक्तिशाली – बलवान
शतंजीव – शंभर वर्षे जग
शब्दसृष्टी – कवन, शब्दांचे सुंदर जग
शमन – शांती, निवारण
शास्त्रगुह्य – ग्रंथांचे मर्म, खरे ज्ञान
शास्त्रप्रचीती – ग्रंथज्ञान पटणे
शास्त्रार्थ – ज्ञानचर्चा, वादविवाद
शास्त्रीय – नव्या शोधांनी सिद्ध झालेले, ग्रंथाचे
शासन – शिक्षा, सत्ता, राज्य, शिक्षण
श्वान – कुत्रा
शिगर – आनंद संप्रदायाचा उत्सव
शिकस्त – कमाल, आटोकाट प्रयत्न
शिथिल – कमजोर, ढिले
शिव – शांत, शंकर, हिताचे, गावाची हद्द
शिशुसंगोपन – लहान मुलांचे योग्य पालन करणारी संस्था
शिक्षा – दंड, शिक्षण
शितजल – थंड पाणी
शील – उत्तम वागणूक, निती, स्वभावाचा
शुक्रधातू – विर्यधातू
शुची – पवित्र
शुष्क – कोरडी
शुद्ध, शुद्धी – पवित्र, सफाई, जाणीव, भान
शुश्रुषा – रोग्यांची सेवा
शेखी – बढाई
शेखीं – शेवटी
शेअर – ठराविक हिस्सा
शोषक – सुकवून टाकणारे
शोषवी – सुकवी
शोषण – पिळवणूक
शौचकुप – पायखाना
शौर्य – शुरपणा
श्रद्धांजली – मरणाराबद्दलचा आदर
श्रद्धामय पुरूष – माणूस श्रद्धेनेच बनला
श्रद्धास्थान – विश्वासाचे ठिकाण
श्रमदान – गावांसाठी फुकट कष्ट करणारे
श्रमविभागणी – सहकारी तत्त्वावर कामांची वाटणी
श्रमसंपत्ती – कष्टाचं धन
श्रीयशसंपन्न – मोहक प्रभाव व टिकाऊ यश जवळ असणारा
शृंगारी – सजलेले, विलासी, शौकीन
शृंगारगायन – छचोर वासनांची गाणी
श्रेणी – वर्ग, मालिका, पायरी, दर्जे
श्रेय – सार्थक, फळ, यश, पुण्य
श्रेयस्कर – फळ देणारे, हितकारक
षडऋतू – वसंतग्रीष्म आदी वर्षाचे सहाभाग
षडगुण ऐश्वर्य – यश, श्री, औदार्य, ज्ञान वैराग्य, दिव्यत्व

स

सकाम – इच्छा, स्वार्थ धरून केलेले
सक्रिय – आचरणासह, प्रत्यक्ष, कार्य करणारे
सख्य – मैत्री
सत, सद – उत्तम
सच्चिदानंद, सत्यज्ञानानंद – अमर ज्ञानपूर्ण आनंदरूप परमात्मा



सत्रावी – मस्तकातील दिव्यरसाचा झरा
सत्वर – लौकर
सत्वांश – पोषक भाग
सदन – घर
सदाचार – चांगली वागणूक
सदैव – नेहमी
सदोष – चुकीची, वाईट
सनातन – अमर, पुर्वीपासूनचा
सप्त – सात
सप्रयोग – कृतीकार्यासह
सफलता – सार्थक, पूर्णता, यश, चीज
सबळ – महत्त्वाचे, प्रमुख, बलवान
समग्र, समस्त – संपूर्ण, सर्व
समत्वस्थापन – सर्वात सारखेपणा आणणे
समतावादी, समदर्शी – सर्वांना सारखे पाहणारा
समही ब्रम्ह – सर्वांठायी समान तोच ईश्वर
समर्थन – पाठिंबा, मांडणी, पटवणे
समन्वय – मेळ, एकी, संबंध जुळवणे
समर्पित – अर्पण, दिलेले
समयानुरूप – वेळकाळ पाहून योग्य असे
सम्यक – योग्य, पाहिजे तसे, खरेखूरे
समरस – मिसळून जाणे
समष्टी – जग
समाये, समावणे – समरस होणे, मावणे
समुच्चय – एकत्र संग्रह, गुच्छ, मेळा
समृद्ध – धनधान्यादीकांनी भरपूर, सुखी
समुळ – मुळासकट
समिती – मंडळ
समिक्षा – शोधकता, खऱ्या दृष्टीने पाहणे
सरस – अधिक उत्तम, रसाळ
सरिसे – सारखे
सरिता – नदी
सरंजाम – सामान
सरंजामशाही – वतनदारीचा 'हम करे सो कायदा'
सरोबरी – थोरवी
सर्वत्र – सर्व ठिकाणी
सर्वस्व – जिव्हाळा, सर्व काही
सर्वतोपरी, सर्वथैव, सर्वस्वी – पुर्णपणे
सर्वतोमुखी – सर्वांच्या तोंडांनी
सर्वथा – निश्चयाने
सर्वदेशी – व्यापक
सर्वनिपूण, सर्वांगपूर्ण, सर्वोदयी – सर्वबाजूंनी उत्तम, उन्नत
सर्वदुरी – जिकडे तिकडे
सर्वभूतहीत, सर्वोन्नती, सर्वोदयी – सर्व जिवांचे कल्याण, विकास
सविस्तर – खुलासेवार
सर्वस्पर्शी – सर्व गोष्टींना, बाजुंना, धरून
सर्वसाक्ष, सर्वज्ञ – सगळे पाहणारा
सर्वांगीण – सर्व भागांची, सर्व बाजूंनी, पूर्ण
सर्वांघटी, सर्वांभूती – सर्व शरीरात
सर्वांतरात्मा, सर्वेश्वर – सर्वात व्यापक परमात्मा
सर्वाद्य, सर्वाधिपती – सर्वाहून थोर
ससेमिरा – पिच्छा, धाक, छळ
सशस्त्र – हत्यारबंद, हत्याराने
सहल – फिरणे
सहस्त्र – हजार
सहसा – बहुतेक, एकदम
सहकारिता, सहकार्य, सहकार, सहयोग – एकमेकास साह्य देणे, पोषक होणे
सहशिक्षण – मुलामुलींचे एकत्र शिक्षण
सहृदयता – सहानुभूती, दयाभाव
सक्षम – ताकदवान, योग्य
साकार – आकारास आलेले, मुर्तीमंत
सॉक्रेटीस – ग्रीस देशचा महात्मा
साच, साचा, साचार – खरोखर, उचीत
साजण – शोभणे, सावल्या जाणे
सातत्याने – सतत, अखंड
सात्विक संपत्ती – सदगुण
सादर – प्रेमाने, अर्पण, मांडणे, तयार
साधन – उपाय, सामुग्री, विधी, मार्ग
साधक – पोषक, प्रयत्न करणारा, मिळवणारा
साध्य – प्राप्त, ध्येय, मिळविण्याची वस्तू
साध्यमुद्रा – ध्येयाची, साधण्याची दृष्टी
साधुत्व – सत्यपण, जोडण्याची वृत्ती
सान – लहान
सानंद – आनंदाने
साम्य – सारखेपणा

सामान्य – साधारण

सामदामदंडभेद – समजूत, लालूच, भिती व फुट या मार्गांनी लाकांना वळवण्याची राजनिती

सामुदायीक, सार्वजनीक – सर्वामिळून, सर्वांसंबंधी

सामुदायीकता, सामाजिकवृत्ती – सर्वांशी समरसता, सर्वांच्या हिताची बुद्धी, जमावाने राहण्याचा स्वभाव

सायास – खटपट

सार – सत्य, मुख्य गोष्ट, उत्तम, टिकाऊ, दूर कर

सारासार – खरेखोटे, बरे–वाईट

साशंक, साशंकी – शंकेखोर, अविश्वासू

साहित्य – सामान, ग्रंथरचना, शास्त्र

साळूंका – शंकराची पिंड

साक्षर – अक्षरओळख असणारे

साक्षात्कार – प्रत्यक्ष अनुभव

साक्षित्वरूपे – तिऱ्हाईतपणाने

सिद्ध – पूर्ण, निश्चित, तयार, संत, सफल

सिद्धांत – शुद्ध तत्त्व, मुळ अनुभव, निर्णय

सिद्धांतमय – ठाम, तत्त्वाला धरून, ठराविक

सियार – कोल्ही

सु – उत्तम

सुईण – बाळांतपण करणारी बाई

सुकर, सुगम, सुलभ – सोपे

सुकृत – चांगले काम (पुण्य)

सुघड – सुंदर

सुदृढ – खुप मजबूत

सुप्त – गुप्त, झोपलेली

सुबुद्ध, सुमती – विचारी माणूस

सुयोग – चांगले प्रसंग, उत्तम योजना

सुलक्षण – उत्तम लक्षणाची

सुवर्ण – सोने, सोनेरी, सौंदडपाने

सुहृद – सज्जन, मित्र

सुकर – डुकर

सुचनाफलक – सुचनेच्या पाट्या, तक्ते

सुत्र – महत्त्वाचे वचन, तत्त्व, धागा

सुत्रधार – मुख्य चालक

सुतिकागृह – बाळंतिणीचा दवाखाना

सुक्ष्ममती – खोल विचारी बुद्धीचा

सेतू – पूल

सेव्य – सेवा घेण्यास योग्य

सेवासेव्य – खाण्यापिण्यास योग्य व अयोग्य

सेवन, सेवणे – खाणे, पिणे, भोगणे, घेणे सेवा करणे

सेवानुरक्त, सेवाभावी, सेवाधारी – सेवा तत्पर, सेवक

सैनिक – शूर शिपाई

सोकावणे – ललचावणे

सोसाटा – वावटळ

सोज्वळ – पवित्र, निर्मळ, चमकदार

सौख्य – सुख

सौरी – वेश्या

संकल्पपूर्ती – इच्छा पूर्ण होणे

संकल्पावे, संकल्प करावे – ठरवावे, निश्चय करावा

संकष्ट – संकट, त्रास

संकुचित – उथळ, आकुंचित, कोतेपणा

संकोच – शरम, लहान होणे

संकेत – इशारा, हेतू, उद्दश, उपदेश

संग – सोबत, आसक्ती, सख्य

संगती, सुसंगती, सांगड – मेळ, चांगला, सहवास, ठीक व्यवस्था

संगम – मेळ, एकी

संग्राम – लढाई

संगोपन – ठीक पालन, सांभाळून वाढवणे

संघ, संघटना, संघटित, संघटणे – एकीकरणे

संघर्ष – झगडा, घासाघीस, विरोध

संच – कार्यकर्त्यांचा जमाव, सट

संचय, संचित – साठा, संग्रह, पुर्वपुण्य

संचरणे, सचार – घुसणे, शिरकाव, येणे जाणे

संचले – भरले, साचले, व्यापले

संजिवनीबुटी – जिवंत करणारी औषधी

संतर्पण – तृप्त करणे

संतान, संतती – लेकरे

संततिनियमन – ठराविकच मुले होऊ देणे

संतमुकुटमणी, संतवर्य – थोर संत

संतसृष्टि – संतांचे जग, भुमीका, परंपरा

संथा – शिकवण, दिक्षा, शिक्षणप्रणाली

संदेह – संशय

संध्या – संस्कृत ध्यानप्रार्थना



संधी – सांधा जोड, मोका वेळ

संन्यस्त – संन्यासाश्रम, सन्यासी, त्यागी

संपत, संपत्ती, संपदा – धनवैभव

संपन्न – धनवान, सहित, पूर्ण मिळवलेले

संपादन – मिळवणे, साधणे, नीट जुळवणे

संबोधणे – हाक मारणे, नाव देणे, म्हणणे

संभाषण – बोलचाल

संमत – मान्य

संमती – परवानगी

संमार्जन – सारवणे

संमिश्र – (मुलामुलींची) एकत्र

संयम – ताबा, मर्यादा, मन–इंद्रियांचा निग्रह

संयोग – जुळणी, एकी, योगायोग, सहवास

संरक्षण – बचाव

संरक्षक – रक्षण करणारा

संशोधन – शोध लावणेश

संशयात्मे – भ्रमिष्ट

संसर्ग – संबंध, सहवास

संस्थापन – मांडणी

संस्कार – आयुष्यातले १६ विधी, ऐकल्या– पाहिल्या– भोगल्याचे मनावर परिणाम, आठवणी, विचार, वळण

संस्कृती – संस्का रपरंपरा, धर्म, आचारविचार

सहार – नाश, मारणे

संक्षेपे – थोडक्यात

संज्ञा – नाव, पदवी

सांग – सर्व अंगासह, पूर्ण

सांगता – पुर्णता

सांसर्गीक – सहवासाने इतरांना लागणारा

सांप्रदायीकता – अति व एकांगी पंथाभिमान

सिंधू – समुद्र

सिंचन – शिंपडणे, पाणी देणे

सौंदर्यप्रसाधने – शोभा वाढवण्याचे सामान

स्थलकालपात्रभेद – ठिकाणे, वेळ व अधिकार यांचा फरक

स्पर्धा – हिरस, चढाओढ

स्पर्श – संबंध, डाग, हात लावणे

स्फटीक – चकचकीत दगड

स्मरण – आठवण

स्मरणमुर्ती, स्मारक – आठवण देणारे चिन्ह

स्व – आपण, स्वतः, आपला

स्वये – स्वतः

स्वर्गमुनीद्र – दिव्य मुनिराज

स्वजन – नातलग

स्वच्छंद, स्वच्छंदी – मोकळे, हवेतसे वागणे

स्वर्पुरी – सोन्याची नगरी

स्वभावे – सहजच

स्वत्व – आपुलकी, अभिमान, वैशिष्ट्य स्वतःची जाणीव

स्वतःसिद्ध – मुळचे, आयते, खऱ्यारूपाने

स्वयंपूर्ण – स्वतःचे जागी परिपूर्ण, स्वावलंबी

स्वसंवेद्य – स्वतःच स्वतःला जाणणारे

स्थानमान – अधिकार, दर्जा वगैरे

स्नायू – नसा

स्नानोत्तर – आंघोळीनंतर

स्वास्थ्य – निरोगीपणा

स्वादसंपन्न – चवदार

स्वानंद – स्वरूपाचा आनंद

स्वारी – हल्ला

स्वावलंबन – स्वतःवरच अवलंबून भरवसून असणे

स्वारस्य – गोडी, सार गोष्ट

स्थितप्रज्ञता – सहजसमाधी, बुद्धी स्थिर व सम होणे

स्फुरण, स्फुरणभाव, स्फुर्ती – आठवण, विचार, कल्पना, जोश, उत्साह, उत्तेजन, जाणीव, इच्छा

स्फुरणे – मनात येणे, उत्पन्न होणे

स्फुर्तीस्थान – नवी शक्ती देणारे ठिकाण

स्मृर्ती – आठवण, ऋषींचे नितीग्रंथ

सृष्टिक्रम – जगाचे रहाटगाडगे

सृष्टिसंकेत – जग उत्पन्न करण्यातला उद्देश

स्नेह – प्रेम

स्नेहाळू – प्रेमळ

स्वेदज – घामातून जन्मणारे

स्तोम – अवडंबर, बडेजाव

स्त्रैण – स्त्रीलंपट

स्थैर्य, स्थिरता – टिकाऊपणा, शांती

स्वैर – मोकाट

स्वैराचार – बेछूट वागणे

ह

हमाश – निराश, उदास
हरणे – दूर करणे
हरेभरे – हिरवेगार
हलाल – कापणे, नष्ट
हलाहल – जहाल जहर
हवन – यज्ञ, होम
हवा – वारा, पाहीजे, आवडता
हव्यास – लोभ, आवड
हस्तलिखित – हातांनी लिहिलेले
हस्तकमळ – सुंदर पवित्र हात
हस्तकलासिद्धी – हाताच्या कारागीरीत निपूणता
हसी – थट्टा
हाट – बाजार
हास्यापद – थट्टेने हसण्यालायक
हाहाःकार – हलकल्लोळ, हायहाय
हितगुज – हिताची गुप्त गोष्ट
हिंदुत्व – एककल्ली हिंदूपणा
हिमगिरिशिखरी – हिमालयाचे टोकावर
हिरावणे – हिसकणे, लुबाडणे
हिंसा – छळ, नाश, दुःख देणे
हिनता – कमीपणा, वाईटपणा, नसणे
हुडे – ढिगारे, उडवे
हूड – अल्लड, दांडगा
हृदगत, हेतू – मनातली जिव्हाळ्याची गोष्ट, विचार, इच्छा, उद्देश
हृदयपरिवर्तन – मनात बदल करणे
हेलावणे – उसळणे
होरपळला – जळला

क्ष, ज्ञ

क्षणभंगुर – क्षणात बदलणारे, नष्ट होणारे
क्षम – पात्र, शक्तिवान
क्षय – नाश, कमीत कमी होणे
क्षात्रतेज – क्षत्रियाचा शुद्ध प्रभाव
क्षालन – धुऊन काढणे
क्षिती – जमीन, पृथ्वी, खंती
क्षुद्र – तुच्छ, हलके सलके, हीन, क्षुल्लक
क्षेत्र – तिर्थ, जागा, शेत
क्षेम – कल्याण, सुख
ज्ञाता – जाणणारा, ज्ञानी
ज्ञानगम्य – फक्त ज्ञानानेच कळणारा
ज्ञानतत्व – शुद्धज्ञान, परमात्मा
ज्ञानप्रेतज्योत – ज्ञान व भक्तिचा दिवा
ज्ञानात्मक – ज्ञानासंबंधीचे, आत्मबोधाचे





# कर्मयोगी संत पु. तुकारामदादा गीताचार्य

## आत्मानुसंधान भु-वैंकुंठ अड्याल टेकडीची प्रकाशने

### ✡ मराठी साहित्य ✡

✡ ग्रामगीता ओवीबद्ध (मध्यम)
✡ ग्रामगीता ओवीबद्ध (मोठी १/८)
✡ ग्रामगीता सार
✡ गद्य ग्रामगीता
✡ सार्थ ग्रामगीता
✡ सार्थ आनंदामृत
✡ सार्थ आत्मप्रभाव
✡ कर्मयोगी (पु. तुकारामदादा चरित्र)
✡ कार्यश्रृंखला (परिचय पुस्तिका)
✡ विचारधारा भाग १ (तुकारामदादा भाषण)
✡ विचारधारा भाग २ (तुकारामदादा भाषण)
✡ विचारपुष्प (नारखेडे दादा साहित्य)
✡ आरोग्य संजीवनी
✡ ज्ञानदीप (संस्कार शिबीर मार्गदर्शिका)
✡ शिक्षण भाग १
✡ शिक्षण भाग २
✡ शिक्षण भाग ३
✡ गावातून विश्वाकडे
✡ राष्ट्रसतांचा विश्वव्यापी देव आणि सामुदायीक प्रार्थना (इंजि. भाऊ थुटे)
✡ तुकडोजींची ग्रामगीता आणि वास्तवाचा मार्ग
✡ पोहण्याची कला व व्यायामाचे प्रकार

### पॉकेट साईज पुस्तके

✡ सक्रिय पाठ
✡ अंतरंग भजनावली (ध्यान प्रार्थना भजन)
✡ ग्रामजागृती भजनावली (युवा, ग्राम, राष्ट्र)
✡ सत्ता लोकांचे हातात व चरसंडासच का?
✡ शिक्षण
✡ सत्संग (पाक्षिक:मराठी, हिंदी, इंग्रजी) (वार्षिक १०० रू., आजीवन १५०० रू)
✡ ग्राम आरोग्य (मासिक: हिन्दी, इंग्रजी) (वार्षिक १५० रू., आजीवन २००० रू)
✡ व्हॉईस ऑफ संत तुकडोजी (त्रैमासिक : इंग्रजी) (वार्षिक १०० रू, आजीवन २००० रू)

---

### ✡ हिंदी साहित्य ✡

✡ ग्रामगीता गद्य
✡ ग्रामगीता सार
✡ ग्रामगीता पद्य
✡ राष्ट्रजागृती भजनावली

### ✡ इंग्रजी साहित्य ✡

✡ Gramgeeta
✡ The Essence of Gramgeeta
✡ The Letters of Tukadoji



## पुस्तक मिळण्याची ठिकाणे

✡ आत्मानुसंधान भु-वैकुंठ, अड्याल टेकडी, ब्रम्हपूरी (चन्द्रपूर) ७७७६९०१६९५, ९९२१५८९५१४, ९२८४४२४७८१
✡ अध्यात्म गुरुकुल, गुरुकुंज मोझरी (अमरावती) ९७६७०६६६२२
✡ ग्रामगीता तत्त्वज्ञान दर्शन मंदिर, पंढरपूर (सोलापूर) ९६३७६१९३६९
✡ पुज्य चैतन्य महाराज, कोंडदेव व जामदरी आश्रम, भोकर, नांदेड ९५४५८५३१८३
✡ श्री आर. जी. माचेवाड , समर्थ नगर (नांदेड) ९७६४९८६४९८
✡ श्री सत्यपाल महाराज , सप्तखंजेरी वादक, आकोट (अकोला) ९४२३१२८१४३
✡ श्री वा. ग. वैद्य गुरुजी (वरोरा, चन्द्रपूर) ९७६७५१६९४२
✡ श्री गुरुदेव सेवामंडळ, ऊर्जानगर, चंद्रपूर ९४२१७२४२७६, ८८०६०२५८३६
✡ श्री सुभाष टापरे , दूर्गापूर , चंद्रपूर ८९७५५५६०४८
✡ श्री विशाल वसंता नखाते, मोखारा, पवनी, भंडारा ८३०८७८१७३१, ७७२१८८१६८४
✡ डॉ. प्रमोद माळवे, भांडे प्लॉट, नागपूर ९०९६६०७०२७, ९९२१८२१०४४
✡ श्री तुषारभाऊ सुर्यवंशी, वृंदावन नगर (नागपूर) ९४२२१२७३८९
✡ श्री संदीप पाल महाराज, सप्तखंजेरी कीर्तनकार, तुरखेड,९८५०३०१३७२
✡ श्री बाळकृष्ण हांडे, विश्वव्यापी गुरुदेव सेवामंडळ , वर्धा,९४२००६५६९६
✡ श्री भाऊ थुटे , सप्तखंजेरी वादक, (वर्धा) ९४२२१४३९८२
✡ श्री प्रविणभाऊ देशमुख , सप्तखंजेरी कीर्तनकार, वर्धा, ९३७०५१६६५३
✡ श्री डॉ. एस. जी. नावाडे, पुणे/यवतमाळ - ९८२३२८५५९८, ९४०४३६३४९५
✡ श्री सुरेशभाऊ देसाई , पुणे ८३०८८०३३४१